ज्ञानदीप लावू जगी

पुणे नगर वाचन मंदिर

स्थापना : ७ फेब्रुवारी १८४८

email : pnvm1848@gmail.com
www.punenagarvachan.org

पुस्तकाचे नाव	:	साताऱ्चे छत्रपति प्रतापसिंहमहाराज यांचें चरित्र
लेखक	:	रघुनाथराव गोविंदराव राणे
प्रकाशक	:	र. गो. राणे, सातारा
प्रकाशन वर्ष	:	१९२९
मूळ ग्रंथ प्रत	:	शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे

पुणे नगर वाचन मंदिर

अंकेक्षण (डिजीटायझेशन) प्रकल्प
अंकेक्षण रूपांतर - २०२१

छत्रपति

प्रतापसिंहमहाराज

यांचें चरित्र.

लेखक,
ॲडव्होकेट रघुनाथराव गोविंदराव राणे,
बी. ए.; एल्‌एल्. बी.

सातारा.

सातारचे छत्रपति

प्रतापसिंह महाराज

अर्थात्

सत्यासाठीं आत्माहुती देणारा मराठा राजपुरुष.

" I have lost my throne, my name, my property, all,
but the inward consciousness of my inno-
cence and my rectitude, because, I would
not, at the sacrifice of my consci-
ence, declare myself to be, what
my enemies had represented
me; because, instead of
accepting mercy, I
demanded
Justice..."

PRATAPSINHA.

लेखकः—रघुनाथराव गोविंदराव राणे,
बी. ए. एल्. एल्. बी.
ॲड्व्होकेट.

किंमत १।। रुपया

अर्पणपत्रिका

उद्योगप्रियता, धाडस, दूरदर्शीपणा व महत्त्वाकांक्षा इत्यादि
वीरपुरुषोचित गुणांनीं ब्रिटिश सैन्यांत अगदीं हलक्या
पदापासून चढत चढत जे थोर अंमलदारीवर
आरूढ झाले ते माझे परमपूज्य पितामह,

कै० वा० सुभेदार कान्होजीराव तानाजीराव राणे

यांच्या, व

ज्यांच्या प्रेमळ सहवासाची, दीर्घोद्योगाची व अचाट व्यासं-
गाची, स्वदेशाभिमानाची व धार्मिक बाबतींत सत्यशोधक
वृत्तीची आठवण माझ्या अंतःकरणांत अखंड
वास करते व मला कार्यप्रवृत्त ठेविते
ते माझे प्रिय वडील

कै० वा० गोविंदराव कान्होजीराव राणे

माजी शेड मॅनेजर मुंबई पोर्ट ट्रस्ट,

यांच्या दिव्य स्मृतीस ही अल्प कृती प्रेमानें अर्पण केली असे.

त्यांचा लाडका बाबू.

प्रस्तावना.

प्रस्तुत चरित्रलेख म्हणजे सन १७९० पासून १८३९ पर्यंत सुमारें पन्नास वर्षांचा महाराष्ट्राचा, विशेषतः सातारचा इतिहास होय. हा लेख वाचतांना तो एका कसलेल्या इतिहासलेखकानें लिहिलेला ग्रंथ या दृष्टीनें वाचकांनीं वाचावयास घेतला, तर त्यांची कदाचित् निराशा होईल. कारण मी मुंबई विश्वविद्यालयाचा पदवीधर असलों तरी बी. ए. च्या परिक्षेस गणित हा ऐच्छिक विषय घेतलेला होता. त्यामुळें इतिहास विषयांतील प्राविण्याबद्दल मला हक्क सांगतां येणार नाहीं. तरी देखील आपलेपणाच्या भावनेनें, प्रस्तुत चरित्राच्या कालाचा मी आस्थापूर्वक थोडा फार अभ्यास करून हें चरित्र लिहिण्याचें धाडस केलें आहे.

सन १९२३ मध्यें साताऱ्यास प्लेग झाला. त्यावेळीं डॉ. बसू यांचें Story of Satara हें पुस्तक माझ्या प्रथम वाचनांत आलें. तोपावेतों प्रतापसिंहमहाराजांबद्दल मला कांहींच माहिती नव्हती, हें कबूल करणें भाग आहे. सन १९१२ मध्यें सातारा हें इतिहासप्रसिद्ध शहर म्हणून विख्यात असल्यामुळें, मे महिन्याच्या सुटींत तें पहावयास मीं आलों होतों. त्यावेळीं जुना वाडा, नवा वाडा, जलमंदीर, म्यु. कमिटीचें ऑफिस, आदालतीचा वाडा, रंगमहाल, किल्ल्यावरील वाडा, वगैरे प्रेक्षणीय स्थळें माझ्या प्रथम पाहाण्यांत आलीं. आमचे सातारवासी मित्र रा. पावस्कर यांना महाराज कोठें आहेत ? असा अजाणपणें प्रश्न केल्यावर त्यांनीं " महाराज जलमंदीराच्या वाड्यांत रहातात " असें सांगितलें. पुन्हां मी विचारिलें " मग सातारा इंग्रजसरकारचा कसा ?" त्यांवर त्यांनीं " इंग्रजांनीं राज्य खालसा केलें व महाराजांना फक्त दोन गांवें व थोडीशीं कुरणें व बागा ठेवल्या आहेत " असें सांगितलें. पण राज्य कां, कधीं, व कसें खालसा केलें याबद्दल त्यांनादेखील कांहींच सांगतां आलें नाहीं. पुढें, वकील होऊन धंदा करण्यासाठीं साताऱ्यास आल्यानंतर, सन १९२३ सालीं "Story of Statara" हें पुस्तक वाचावयास मिळालें, तेव्हां या संबंधीं बऱ्याच गोष्टींचा मनांत चक्क प्रकाश पडला

त्यानंतर मी मराठी भाषेंतील शालेय इतिहास मुद्दाम काढून पाहिले. त्यामध्यें या विषयासंबंधानें अगदीं विपर्यस्त अशी माहिती लिहिलेली आढळली. त्यामुळें मनाला फार वाईट वाटलें. मुंबई विश्वविद्यालयाचा पदवीधर झालेल्या माणसाला, हिंदूला, महाराष्ट्रीयाला, इतकेंच नव्हे तर मराठ्याला, आपल्या मायभूमीचा इतिहास ठाऊक नसावा ना ? आपलें राज्य कधीं व कसें गेलें, तें घालविण्यास कोण कोण कारस्थानी होते, त्यांच्या देशबुडव्या राजद्रोही, स्वार्थी, घातकी कारस्थानास बळी पडून त्या काळच्या कंपनीसरकारच्या अंमलदारांनीं त्यांना कोणत्या हेतूनें कसें कसें प्रोत्साहन दिलें, तसेंच भाऊबंदकी, गृहकलह, अदूरदर्शीपणा, स्वार्थ, सत्ताभिलाष यांमुळें आपणांतील पुढारलेले लोक कसे नादान बनले होते व त्यामुळें पुढें राज्यक्रान्तिची जी लाट आली त्या लाटेंत आपण सारे कसे वाहवून गेलों, यासंबंधानें आम्हाला कांहींच माहिती नसावी ना ? आमची सुशिक्षितांची, पदवीधरांची ही स्थिती; मग साधारण शिकलेल्यांची स्थिती काय विचारावी ? अशा प्रकारचे विचार मनांत आले व मन कष्टी झालें.

अशा प्रकारचे विचार मनांत येत असतां पुढें पुढें आपणच यथामति प्रतापसिंहमहाराजांचा चरित्रलेख लिहावा असा संकल्प केला. पण ग्रंथविस्तार एवढा होईल अशी त्यावेळीं अटकळ नव्हती; व ग्रंथ लिहिण्याची सामुग्रीही Story of Satara या पुस्तकाशिवाय दुसरी जवळ नव्हती. परंतु भगवंताची इच्छा मी हें चरित्र लिहावें अशीच असावी असें वाटतें. कारण हळू हळू, एक एक साधन उपलब्ध होत गेलें. व जेवढें जेवढें हातीं आलें, त्याचा त्याचा उपयोग करून हें प्रस्तुतचें चरित्र तयार करून तें वाचकांना सादर करीत आहे.

हें चरित्र लिहितांना, बऱ्याच पुस्तकांतील माहिती गोळा करून ती व्यवस्थितपणें मांडून व त्या माहितीसंबंधानें पडताळे पाहून ती या चरित्रांत ग्रथित करावयाचा मी प्रयत्न केला आहे. काल्पनिक अगर ऐकीव ऐतिहासिक प्रसंग या पुस्तकांत घातलेले नाहींत. ज्या गोष्टी घडल्या म्हणून वर्णन केलें आहे त्या घडल्याबद्दल इतर पुस्तकांतून आधार आहेत अशी खात्री करूनच ते घातले आहेत.

सदर पुस्तक हें एका मराठा क्षत्रिय लेखकानें लिहिलें असल्यामुळें, आपलेपणाची व स्वाभिमानाची थोडी फार भावना यामध्यें वाचकांस दिसून येईल. आजपर्यंत इतिहास संशोधिला तो ब्राह्मणांनीं, लिहिला तो ब्राम्हणांनीं व प्रसिद्ध केला तोही

पण ब्राह्मणांनीं. त्यामुळें आजवरच्या इतिहासांत रामदासास शिवाजीमहाराजांचा गुरु ठरविणें, नाना फडणीसास मोठा मुत्सद्दी ठरविणें, व महादजी बाबांना स्वार्थी ठरविणें, वगैरे सारखे प्रयत्न करण्यांत आलेले आहेत. मराठी राज्य नष्ट होण्यास पेशवे व फडणीस नाना हे खरोखरींच जबाबदार असतांही, रा. नरसोपंत केळकरासारख्या समाजसुधारक म्हणविणाऱ्यांनीं ही सारी जबाबदारी मराठ्यांवरच लोटली आहे. आमच्यामतें निःपक्षपातानें मराठी राजांचा इतिहास लिहिण्याचें काम आजवर कोणींच केलें नाहीं. हेंच काम मराठा लेखकांनीं केल्यास आपणांतील थोर विभूतींचा थोरपणा आपलेपणाच्या भावनेनें योग्य प्रकारें लोकांपुढें मांडतील असें आम्हांस वाटतें, व स्वदेशाचा इतिहास महाराष्ट्रोपयोगी होईल. नीतीचें व अनुभवाचे धडे समाजाला मिळतील. अशा धोरणानें संशोधन करून खरा इतिहास लोकांत प्रसृत व्हावा असें कोणासही वाटणार. सबब अशा भरंवशानें हें आमच्या कार्यक्षेत्राबाहेरचें कार्य आम्ही हातीं घेण्याचें धाडस केलें.

प्रतापसिंहमहाराजांना ज्या काळीं पदच्युत केलें, त्या काळीं, इंग्रज लोकांमध्यें सत्तावादी पक्ष कसा जोरांत होता व आशिया खंडाच्या निरनिराळ्या विभागांना आपल्या सत्तेखालीं आणण्यासाठीं त्यांची कसकशी धडपड चाललेली होती, हें लक्षांत घेतलें असतां Satara Gazeteer कार व Edward Thornton वगैरे लेखक महाराजांच्या विरुद्ध लिहिण्यास कसे प्रवृत्त झाले हें कळून येणार आहे. सदरच्या लेखकांनीं महाराजांवर जे दोषारोप केले आहेत, व त्यांच्या काळचा एकंदर इतिहास जो गैरसमज करणारा लिहिला आहे, तो वाचला असतां प्रतापसिंहमहाराजच दोषी होते, असें वाटण्याचा संभव आहे. परंतु महाराजांच्याकाळीं रंगो बापूजीनें जे "प्रतापसिंहमहाराजांवरील आरोपांचें निराकरण" म्हणून मोडीलिपीमध्यें लंडन येथें पुस्तक छापलें आहे, तें वाचलें असतां व डॉ. बसू यांचा Story of Satara "सातारची हकीगत" वाचली असतां गॅझेटीअरमधील तुटपुंजा मजकूर अगर थार्न्टनसाहेबांचे लिखाण, हीं पक्षपाती माणसानें लिहिलेलीं अतएव त्याज्य अशींच वाटूं लागतात. सदरचीं लिखाणें हीं जे त्यांनीं लिहिलेली, हेंही ध्यानांत ठेवलें पाहिजे. "देश परतंत्र केला, कीं जेत्यांनीं प्रत्येक गोष्टीवर आपली छाप बसवून. आपलें श्रेष्ठत्व जीतांना न पटविलें तर जेत्यांना आपलें अस्तित्व त्या देशांत अबाधित ठेवतां येणेंच शक्य नसतें" (बेंद्रे) म्हणून अशा इतिहासकारांनीं जित लोकांचा स्वाभिमान, आत्मविश्वास, ईर्षा

व कर्तबगारी ही खर्ची होतील, अशी इतिहासाची मांडणी केल्यास नवल कसलें

प्रस्तुत चरित्रलेख लिहिण्यास या गोष्टींचा विचार कारणीभूत झाला आहे, हें वाचकांना आगाऊच सांगितलें पाहिजे. सदर चरित्रलेख लिहितांना लेखकास अनेक मित्रांची मदत झाली आहे. येथील नेटिव्ह जनरल लायब्ररीचे चालक यांनीं बऱ्याचशा सवलती लेखकास दिल्या आहेत. तसेंच रा. पांडुरंगराव आढाव, मारुतराव देशमुख, बाबुराव धावडे, नानासाहेब वाळवेकर व मेहेरबान एस्. बी. चव्हाण. बी. ए. डी. डे. कलेक्टर सिंध, यांनीं माहिती गोळा करण्याचे कामीं बऱ्याच महत्वाच्या सूचना वेळोवेळीं केल्या. तसेंच पूर्वीचा स्नेहसंबंध नसतांही रा. रा. वा. का बेंद्रे यांनीं मेहनत घेऊन या पुस्तकाचीं टांचणें वाचून पाहिलीं व स्वानुभवाच्या अनेक सूचना केल्या सबब या सर्वांचे आभार मानणें जरूर आहे.

रा. रा. **लक्ष्मणराव कोकाटे**, हनुमान प्रिंटिंग प्रेसचे मालक, यांचे उपकार फार मोठें आहेत. साताऱ्यास मुद्दाम येऊन या ग्रंथाचें मुद्रण करण्याचें काम त्यांनीं स्वयंस्फूर्तीनें पत्करिलें व ग्रंथ उत्कृष्ट प्रकारें छापून दिला. त्यांच आभार कोणत्या शब्दांनीं प्रगट करावेत हें समजत नाहीं.

शिवाय रा. केशवराव विचारे, रंगराव माने, शामराव देसाई संपादक "**राष्ट्र-वीर**" ना. भास्करराव जाधव, हरिभाऊ चव्हाण वगैरे अनेक मित्रांनीं वेळोवेळीं प्रोत्साहन देऊन हा ग्रंथ मजकडून लिहविला. त्यांचा सर्वांचा मी अत्यंत आभारी आहे.

हा इतिहास लिहितांना साधनांची उणीव पुष्कळ भासली. परंतु जी माहिती या पुस्तकांत दिली आहे. ती सारी साधार आहे. दंतकथा अगर कल्पित असें कांहींच लिहिलेलें नाहीं. या ग्रंथामध्यें पुष्कळशा उणीवा वाचकांना दिसून येतील. त्याची जाणीव लेखकासही आहे. तरीही वाचकांस ज्या उणीवा दिसून येतील. त्या त्यांनीं लेखकाच्या नजरेस आणल्यास, पुढील आवृत्तीचा योग आल्यास त्या शक्य तितक्या दुरुस्त करण्यांत येतील, असो. यथामति केली ही सेवा वाचक-वृंदानें गोड मानावी अशी त्यांना विनंती आहे. इत्यलम्.

सातारा.
१०-६-२९ } **रघुनाथराव गोविंदरावराव राणे.**

Publisher Mr. R G. Rane satara
Printer Mr. L. B. Kokate,
Hanuman Press, 300 Sadashiv Poona.



सत्यासाठीं आत्माहुति देणारे

छत्रपति प्रतापसिंहमहाराज.

आधारभूत पुस्तकांची यादी.

१ मराठी रियासत — सरदेसाई.
२ मराठे व इंग्रज — केळकर.
३ चिटणीसाची बखर or Historical Sketch
४ शेडगांवकर भोंसले याची बखर
५ ज्ञानकोश — डॉ. केतकर.
६ ऐतिहासिक लेखसंग्रह — खरेकृत.
७ भारत इतिहास संशोधक मंडळाचे अहवाल
८ राजवाडे यांचे लेख
९ सिद्धांत विजय — प्रकाशक रा. ब. डोंगरे.
१० ग्रामण्याचा इतिहास — ठाकरे.
११ प्रतापसिंहमहाराजांवरील आरोपांचें निराकरण
१२ कोल्हापूर राज्याचा इतिहास — मोडक.
१३ लावण्या व पोवाडे — संपादक गो. गो. अधिकारी.
१४ साधन चिकित्सा — वा. कृ. बेंद्रे.
15 Story of Satara — Dr. B. D. Basu.
16 Nana Phadnis by Cap. Macdonald.
17 History of Marathas by James Grant Duff.
18 Modern History of India by Edward Thornton.
19 Elphinstone, by Cotton.
20 Maharanee Sagunabaisaheb's Appeal to Queen Victoria Empress of India.
21 Mahabaleshwar by Parasnis, etc. etc.

अनुक्रमणिका.

सातारचे श्रीमच्छत्रपति

प्रतापसिंहमहाराज.

उपोद्घात.

मराठेशाहीचा सौभाग्यसूर्य सन १६२७ त उदयास आला, व सन १८३९ मध्यें अस्तंगत झाला, असें म्हणावयास हरकत नाहीं. पुण्यश्लोक **श्रीशिवाजी-महाराज** यांच्या जन्माबरोबर मराठेशाही उदयास आली असें मानलें, तर **श्रीप्रतापसिंहमहाराजांना** राज्यत्याग करावा लागला, तेव्हांच (५-९-१८३९) मराठेशाहीचा सौभाग्यसूर्य अस्तंगत झाला असें म्हणावें लागेल. मराठे-शाहीच्या उदयकालाची स्मृति आपणांस आनंद देते, व अंतःकरण उत्तेजित करते. त्या काळाचें स्मरण, उत्सव वगैरेंच्याद्वारां आपण सालोसाल करतों. दुसऱ्या काळाबद्दल मात्र आपण केव्हां कांहींच विचार करीत नाहीं. अर्थात् हा विचार करणें हें आनंददायक नाहीं हें खरें, किंबहुना या काळासंबंधानें विचार करतांना मन कष्टी होईल; परंतु प्रगतिमार्गास लागावयाचें तर मराठे-शाहीच्या उदयकालाप्रमाणें तिच्या अस्तमानकालाचाही विचार केला पाहिजे. विजयोत्सव जसे साजरे केले पाहिजेत, तसेंच पराजयाचीं कारणेंही शोधून काढलीं पाहिजेत. **बर्क** नांवाचा एक इंग्रज लेखक होऊन गेला. त्यानें आपल्या फ्रेंच रेव्होल्युशन नांवाच्या ग्रंथांत असें म्हटलें आहे कीं, अपयशानें माणूस जसा शिकतो तसा यशानें शिकत नाहीं.

आपण पराभूत कां झालों, याचा इंग्रज लोक विचार करीत, म्हणून ते

अखेर यशस्वी होत. आमचे हिंदुस्तानांतील लोक पहिल्यांदा यश आलें कीं, त्यानें फुगून जात व गाफील रहात, त्यामुळें अखेर अयशस्वी होत. तसेंच अपयश प्राप्त झालें कीं, ते गोंधळून जात. इंग्रजांची स्थिति याच्या उलट होती. भीमाची पाठ भूमीस लागली म्हणजे त्यास दुप्पट अवसान येत असे, असें पुराणांतरीं म्हटलें आहे. त्याप्रमाणेंच इंग्रजांची स्थिति होती. इंग्रजांनीं मराठे, शीख, गुरखे यांचेबरोबर युद्धें केलीं, त्यांत प्रारंभीं प्रारंभीं, इंग्रजांचा पराभवच झाला; परंतु त्यांनीं आपली चिकाटी सोडली नाहीं. अपयश आलें, तर तें कां आलें याचा ते फार बारकाईनें व कसोशीनें विचार करीत; व चूक दिसेल तेथें सुधारणा करीत. तीच एतद्देशीय लोकांची गोष्ट वर लिहिल्याप्रमाणें अगदीं निराळी. अशा प्रकारच्या परिस्थितीचा अखेर परिणाम असा झाला कीं, विजयश्रीनें माळ इंग्रजांना घातली.

आज आपण आत्मोन्नतीच्या खटपटीस लागलों आहों. अशा वेळीं आपणास आपल्या आजच्या स्थितीचा विचार करणें जितकें आवश्यक आहे, तितकेंच आजची स्थिति प्राप्त होण्यास कारणीभूत झालेल्या गत कालाचा (मागील इतिहासाचा) अभ्यास करणें जरूर आहे. पूर्वींच्या कालीं आपल्या हातून कोणकोणत्या बाबतींत गाफीलपणा झाला हें लक्ष्यांत आलें, म्हणजे तेच दोष आपल्यांत असल्यास ते घालविण्याच्या प्रयत्नास आपणास लागतां येईल. जी परकीय सत्ता आज आपल्यावर राज्य करीत आहे, ती, क्षेत्रफळ, लोकसंख्या, व सांपत्तिक स्थिति, या बाबतींत आपल्या महाराष्ट्राच्या मानानें देखील कमी प्रतीची असतां, तिनें आपल्या राष्ट्रास फारच थोड्या आयासांनीं कसें पादाक्रांत केलें, हें समजून घेणें खास बोधप्रद होईल. म्हणून त्या काळाचा म्हणजे श्रीमत् छत्रपति प्रतापसिंह महाराजांचा इतिहास लिहिण्याचें आम्ही धाडस करीत आहों.

छत्रपति प्रतापसिंह महाराजांचा काल म्हणजे बरोबर १०० वर्षांपूर्वींचा महाराष्ट्राचा काल. हा काल अर्थात् मराठेशाहीच्या अस्तमानाचा असल्यामुळें त्या कालाची स्मृति दुःखदायक होईल हें खरें ! परंतु राजकीय व सामाजिक

प्रगतीच्या कामीं, ह्या इतिहासाचा अभ्यास फार उपयोगी पडेल असें आमचें मत आहे. प्रतापसिंह महाराज कट्टे सुधारक, पक्के समतावादी व निशस्त्र प्रतिकाराचे जनक होते. राजसत्ताक पद्धतीला धन्यवाद द्यावयाचे झाले, तर त्यांच्यासारख्या प्रजापालनदक्ष राजाकडे पाहूनच द्यावे लागतील. **शिवाजीमहाराजांनंतर कर्तबगार व शहाणा राजपुरुष कोणता झाला असेल,** तर तो छत्रपति प्रतापसिंह होय. डॉ. **बसू** म्हणतात " सातारच्या राजांपैकीं अत्यंत उमदा, अत्यंत थोर व चांगला असा हा राजा होता. शिवाजी सोडला तर या महाराजांसारखा सद्गुणी व कर्तबगार मराठा राजपुरुष दुसरा झालाच नाहीं. *" असें असतां देखील भोंवतालच्या प्रतिकूल परिस्थितीनें अशाही अलौकिक पुरुषाचा कसा बळी घेतला, हें या चरित्राच्या वाचनानें वाचकांच्या लक्षांत येईल.

औरंगजेबासारख्या पराक्रमी, बुद्धिमान् व पाताळयंत्री दिल्लीपतीस २५ वर्षे अव्याहत लढाई करून ज्या महाराष्ट्राचें स्वातंत्र्य हरण करतां आलें नाहीं, तोच महाराष्ट्र इंग्रजांच्या मुत्सद्दीगिरीनें बोलतां बोलतां कसा ब्रिटिश साम्राज्यांत सामील झाला, हेंही या चरित्रवाचनानें समजून येणार आहे.

आम्हां महाराष्ट्रीयांमध्यें जे दुर्गुण (राष्ट्रीय) हाडींमाशीं खिळलेले आहेत, व ज्यामुळेंच इंग्रजी मुत्सद्यांचे राजकारणी डाव यशस्वी झाले ते दुर्गुण कोणकोणते होते, व ते ऐनप्रसंगीं कसे नडले हें समजण्यास, तसेंच ते घालवून देण्याच्या प्रयत्नास लागण्यास हा इतिहास बोधप्रद होईल.

त्याचप्रमाणें जातीभेदामुळें उत्पन्न झालेल्या परिस्थितीच्या कुजक्या नासक्या दुर्गंधीला गाडून टाकण्याऐवजीं **मोठेपणाच्या व घरंदाजीच्या खोट्या कल्पनेनें जातीभेदालाच कवटाळून धरणाऱ्या** आमच्या लोकांना जातिभेदाच्या विषाचा झटका किती तीव्र आहे हें पटवून देण्यास व त्यांना ताळ्यावर आणण्यास

*......the noblest, the best and the greatest of the Satara Rajas. Except Shivaji no other Maratha Prince had evinced such administrative capacity and highly virtuous character as Pratap Singh.

Dr. B. D. Basu.

हा इतिहास खास उपयोगी पडेल. देशाभिमानी असतील त्यांना स्फुरण येईल; स्वदेशभक्तीची ज्योत त्यांच्या अंतःकरणांत जास्त चेतेल, तसेंच स्वदेशाच्या ह्या गतेतिहासानें पुढें पाऊल टाकतांना कोणती सावधगिरी बाळगिली पाहिजे याचें ज्ञान होईल.

सारांश हें दुःखपर्यावसानी चरित्र आपणांस बहुविध अमोल धडे शिकवील व शहाणे करील, ह्याच भरंवशानें हें अल्प पण साद्यंत चरित्र लिहिण्याचें धाडस केलें आहे.



प्रकरण १ लें.

पूर्वपीठिका.

पुण्यश्लोक क्षत्रियकुलावतंस **श्रीशिवाजीमहाराज** यांस **संभाजी** व **राजाराम** असे दोन मुलगे होते. इ० स० १६८० मध्यें गुडघी रोगास **शिवाजीमहाराज** बळी पडले. त्यावेळीं महाराजांच्या हुकमावरून **संभाजी राजे** पन्हाळगडावर होते. महाराज रायगडावर निधन पावल्याचें वर्तमान **संभाजी राजांस** ज्यावेळीं कळलें, त्यावेळींच राणी सोयराबाईच्या मसलतीनें, मंत्रीमंडळानें **राजारामास** गादीवर बसवून राज्यकारभार चालविण्यास सुरवात केली होती. पितृवियोगाच्या दुःखद वार्तेबरोबर स्वतःला बाजूला ठेवून आपल्या कनिष्ठ बंधूस राज्यावर बसविण्यांत आलेलें आहे, हें वर्तमान समजतांच संभाजी राजांनीं पन्हाळगडावरून निघून सैन्य जमा करून, रायगडाकडे चाल केली; व अचानक किल्ल्यावर छापा घालून गड काबीज केला. कित्येक इतिहासकार संभाजीमहाराज, शिवाजीमहाराजांच्या हुकुमावरून पन्हाळगडावर नजरकैदेंत होते असें म्हणतात; पण तें बरोबर नाहीं. कर्नाटकाचा बंदोबस्त करण्यासाठीं संभाजी राजांची नेमणूक करून शिवाजीमहाराजांनीं त्यांना पन्हाळ्यावर ठेविलें होतें, असा इतिहास आतां उपलब्ध झाला आहे; व तोच खरा दिसतो. असो; संभाजीमहाराजांनीं रायगड घेतल्यापासून पुढें मराठ्यांमध्यें कलहाचें—भाऊबंदकीचें—बीं पेरलें गेलें.

संभाजीमहाराजांनीं एकंदर ९ वर्षें राज्य केलें. राजे संभाजी हे अत्यंत शूर, पराक्रमी व धाडसी होते. इंग्रजी इतिहासांत जसा रिचर्ड राजा प्रसिद्ध आहे, तसाच मराठी इतिहासांत राजा छत्रपति संभाजी प्रसिद्ध आहे. रिचर्डला जसें धर्मयुद्धांत आपलें बहुतेक सारें आयुष्य घालवावें लागलें, तसेंच संभाजी राजानांही धर्मरक्षणासाठीं, मराठा पदपादशाहीच्या रक्षणासाठीं अव्याहत शत्रूंशीं झगडावें लागलें.

गोव्याचे पोर्तुगीज, मुंबईकर टोपकर, सावंतवाडीकर भोसले, जंजिऱ्याचे हबशी व औरंगजेबाचें अफाट सैन्य, या साऱ्यांशीं लढण्यांतच त्यांना आपली सर्व कारकीर्द खर्ची घालावी लागली. आपल्या आंगच्या शौर्यसाहसादि वीरपुरुषोचित गुणांनीं, इतक्या सगळ्या बलिष्ठ शत्रूंशीं नेटानें झगडून, त्यांनीं जीवंत असे पावेतों महाराष्ट्राचें स्वातंत्र्य कायम राखलें. परंतु भाऊबंदकीमुळें शत्रू बनलेल्या सग्यासोयऱ्यांनीं, अलमगिराच्या सरदारास फितूर होऊन, व अस्तनींतल्या निखाऱ्याप्रमाणें जवळ असलेल्या लोकांनीं दगा दिल्यामुळें, शत्रूनें त्यांच्यावर अकस्मात् छापा घातला; त्यांत संभाजीमहाराज शत्रूच्या हातीं पडले. धर्मनिष्ठपणाचा टेंभा मिरविणाऱ्या अलमगिरानें—औरंगजेबानें—मुसलमान झाल्यास जीवदान देतों, जहागिरी देतों वगैरे लालूच त्यांना दाखविली. परंतु संभाजीमहाराज करारी मराठा गडी; त्या गोष्टीस तो प्राणांतींही कबूल झाला नाहीं. सबब औरंगजेबानें अमानुषपणें हाल हाल करून त्यांचा जीव घेतला. अशा प्रकारें स्वधर्म, स्वदेश व स्वराज्य यांच्या रक्षणासाठीं, संभाजीमहाराजांनीं आत्माहुति दिली ! !

संभाजीमहाराजांचा वध झाल्यानंतर महाराष्ट्रावर घोर आपत्ति गुदरली ! त्यानंतर औरंगजेबानें किल्ल्यामागून किल्ले घेतले. रायगड देशद्रोही सूर्याजी पिसाळाच्या हिकमतीनें मोंगलांच्या हातीं पडला. महाराणी **येसूबाई** व बालराजे **शिवाजी** यांना मोंगलांनीं पकडून नेलें. राजाराम वगैरे हालअपेष्टा भोगीत मद्रासकडे जिंजीच्या रक्षणास गेले. त्या काळच्या मुत्सद्यांनीं हालअपेष्टा सोसून, प्रसंगीं आत्मयज्ञ करून, मराठेपादशाहीचा लोप होऊं दिला नाहीं. राजाराममहाराज जिंजीला सुखरूपपणें पोहोंचल्यावर मराठे वीर धनाजी, संताजी वगैरे हे परत महाराष्ट्रांत आले व त्यांनीं वरचेवर मोंगल फौजेवर छापे घालून तिला सळो का पळो करून सोडलें. जिंजीहून राजाराममहाराज परत साताऱ्यास आले व मंचकारोहण करून पुनः महाराष्ट्राचा राज्यकारभार त्यांनीं साताऱ्यास राहून सुरू केला. पुढें श्रमातिरेकानें ताप येऊन राजाराममहाराज सन १७०० मध्यें वारले.

त्यानंतर त्यांची थोरली राणी, हंबीरराव मोहित्यांची मुलगी **ताराबाई,** इनें आपला मुलगा शिवाजी, (वेडा शिवाजी म्हणून प्रख्यात असलेला) यास गादीवर बसवून थोडे दिवस साताऱ्यास राज्यकारभार हांकला. परंतु पुढें १७०७ सालीं संभाजीमहाराजांचा मुलगा **शिवाजी उर्फ शाहू** यास मोंगल बादशहानें बंधमुक्त केलें व गृहकलह पेटविण्यासाठीं या देशीं पाठवून दिलें. राणी ताराबाईपुढें तेजोहीन झालेल्या सरदारांना वश करून घेऊन, **शाहूमहाराज** साताऱ्याच्या गादीवर सन १७०७ मध्यें अधिष्ठित झाले. पुढें सन १७५० पावेतों ख्यालीखुशालींत व वैभवांत राज्यनौका हांकून **शाहूमहाराज** निपुत्रिक मरण पावले. शाहूमहाराजांचे कारकीर्दीतच भट पेशवे उदयास आले व शाहूमहाराजांनंतर नांवानें पेशवे, पण वस्तुतः राजे झाले.

शाहूमहाराजांच्या मागें त्यांच्या दुसऱ्या राणीनें वेड्या शिवाजीचा मुलगा **रामराजा** यास बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब पेशव्याच्या व ताराबाईच्या कारस्थानास बळी पडून दत्तक घेतलें. हा **रामराजा** अत्यंत दुर्दैवी होता. जन्मल्यापासून राज्यावर येईपर्यंत कोल्हापूरच्या संभाजीमहाराजांमुळें अनेक दुर्धर प्रसंग त्याजवर आले होते. त्यामुळें साताऱ्याच्या गादीवर येईपावेतों त्यांस आपलें आयुष्य अज्ञातवासांत काढावें लागलें होतें. या साऱ्या संकटांच्या प्रसंगीं राजाची दाई दुर्गा, व विश्वासू नोकर मल्हार, यांनीं अनंत कष्ट सोसून त्याचें रक्षण केलें. सातारा शहरांत आज **दुर्गापेठ** व **मल्हारपेठ** या नांवाच्या ज्या दोन पेठा आहेत, त्या याच स्वामिभक्त नोकरांचें स्मारक होत.

रामराजा गादीवर येण्यापूर्वीं जन्मापासून अज्ञातवासांत वाढलेला. राजपुरुषाला उचित असें शिक्षण त्यास मिळालें नव्हतें. त्यामुळें एवढ्या मोठ्या साम्राज्याचा कारभार करण्यास तो नालायक होता. पण बाळाजी बाजीरावानें साम्राज्यसत्ता आपल्या हातांत राहावी या हेतूनेंच रामराजाची निवड केली होती. अर्थात् रामराजा केवळ नामधारी राजा होता. पुढें लौकरच **सांगोले** (जि. सोलापूर) येथें बंडावा झाला, तो मोडण्यास रामराजा सदाशिवराव भाऊबरोबर गेला. त्यावेळीं संधि साधून रामराजाकडून पेशव्यासाठीं सदाशिवभाऊनें सर्व सत्तेबद्दल लेख

लिहून घेतला; व महाराजांच्या इतमामासाठीं ५६ लाखांचा मुलूख तोडून दिला. या करारनाम्यास " **सांगोल्याचा तह** " असें म्हणतात. या तहानंतर प्रतापसिंहापावेतोंचे सारे छत्रपति पोशाखी छत्रपती, होते असें म्हटलें तर मुळींच अतिशयोक्ति होणार नाहीं. **छत्रपति म्हणजे पेशव्यांच्या हातांतील बाहुलें.** देवघरांतील देव जसें आपण पूजेस लावतों त्याप्रमाणें छत्रपतींची अवस्था होती! छत्रपतीकडून पेशव्यांनीं पेशवाईचीं वस्त्रें घ्यावयाचीं; पण तीं देण्याच्या अगर नाकारण्याच्या बाबतींत छत्रपतींना स्वातंत्र्य मात्र नव्हतें. पेशव्यांनीं छत्रपतींना मुजरा करणें, त्यांच्या समोर अनवाणी चालत जाणें, त्यांच्यावर मोर्चेलें धरणें, त्यांच्या राजधानींत नौबदी बंद करणें वगैरे सारे बाह्योपचार पाळण्यांत येत हें खरें. परंतु पेशव्यावर अगर अमलांतील इतर सरदारांवर स्वतंत्रपणें छत्रपतींना हुकमत चालवितां येत नव्हती. सैन्यावर व वसुलावर ताबा पेशव्यांचा; परराष्ट्राशीं मसलती ठरवावयाच्या त्या पेशव्यांनीं; तहनामेही परस्पर पेशवेच करीत; मर्जीखातर सोरें संपल्यानंतर पेशवे महाराजांस हें मागाहून विदीत करीत. महाराजांच्या पसंतीचा अगर नापसंतीचा विचार करण्याचें पेशव्यास कारणच वाटत नसे.

सन १७५० पासून सन १८१८ पावेतों सुमारें ६८ वर्षें " श्रीमंत " पेशवे हेच ' सरकार ' होते; व मराठेशाहीचे खरे मालक बलहीन असल्यामुळें, पोटगी मिळालेल्या एकत्र कुटुंबांतील हिंदु विधवेप्रमाणें झालेले होते, असें म्हटल्यास वावगें होणार नाहीं.

छत्रपति रामराजा साताऱ्च्या गादीवर सन १७५० मध्यें आला. शाहूमहाराजांप्रमाणेंच यालाही पुत्रसंतती झाली नाहीं. तेव्हां सन १७७७ मध्यें रामराजांनीं पेशव्यांकरवीं वावीकर भोसले घराण्यांतील त्रिंबकजी राजे भोसले यांचा मुलगा **विठोजी राजे** यांना आणवून अष्टप्रधानांच्या संमतीनें व स्वतः पसंत करून यथाविधि दत्तक घेतलें. हा दत्तकसमारंभ सातारा येथें १९ जुलई १७७७ रोजीं झाला. दत्तक झाल्यावर विठोजी राजे यांचें नांव बदलून शाहू असें ठेवण्यांत आलें. हे दुसरे शाहूमहाराज उर्फ आबासाहेब महाराज

म्हणजे आमच्या चरित्रनायकाचे वडील होत. आबासाहेब यांना दत्तक* घेतल्या-नंतर त्यांची मुंज करण्यांत आली व लग्नही करण्यांत आलें. त्यानंतर पुनः डेरवणकर भवानजी राजे शिर्के यांची कन्या **आनंदीबाई** यांचेबरोबर फाल्गुन वद्य १० शके १७०७ (१७८५) रोजीं आबासाहेब महाराजांचें चौथें लग्न झालें. या **आनंदीबाई उर्फ माईसाहेब** महाराज ह्या **प्रतापसिंहांच्या** मातोश्री होत. या माउलीच्या पोटीं प्रतापसिंहमहाराजांचा जन्म सन १७९३ सालीं म्हणजे शके १७१४ परिधावीनाम संवत्सरे माघ शु॥ ७ मीस सातारच्या किल्ल्या-वर झाला. सातारच्या किल्ल्यावर जन्म पावलेला हा पहिलाच छत्रपति होय.

प्रकरण २ रें.

पेशवे.

आबासाहेब महाराज म्हणजे धाकटे शाहूमहाराज, छत्रपति असतां, महा-राष्ट्राच्या राजकारणाची स्थिति कशा प्रकारची होती, हें नीटपणें समजण्यास पेशव्यांच्या सत्तेचा थोडा इतिहास देणें जरूर आहे. कारण पेशव्यांच्या कैचीं-तून म्हणा, अगर कैदेंतून म्हणा, सुटण्यासाठीं छत्रपतींना कसकसे प्रयत्न करावे लागले व महाराज प्रतापसिंहांना या कामीं इंग्रजांची मदत घेणें कां भाग पडलें, हें समजून येण्यास हा इतिहास फार उपयुक्त आहे.

---

*सदरची हकिकत महाराणी सगुणाबाईच्या अपिलावरून लिहिली आहे. मराठा दप्तर रुमाल १ ला यामध्यें रामराजांच्या निधनानंतर त्यांची राणी सगुणाबाई-साहेब यांनीं नानाफडणिसाच्या सांगण्यावरून विठोजी राजे यांस दत्तक घेतलें असें म्हटलें आहे तें खरें नव्हे. खुद्द महाराज जिवंत असतां दत्तविधान झालें त्यासंबंधीं आलेलीं पत्रें वाचलीं असतां हें कळून येणार आहे रघूजी राजे भोसले यांचे नागपूरकर महाराजांस आलेलें पत्र ता. २७।१२।१७७७ चें पहा. पान ३५६ स. मो.

पेशवा हा मूळ मराठी शब्द नव्हे. पारशी भाषेंत ‘ पेशवा ’ म्हणजे मुख्य प्रधान. महाराष्ट्रांत ब्राम्हणी (बहामनी) राजसत्ता उदयास आल्यामुळें, जसें इतर पारशी शब्द मराठींत शिरले त्याप्रमाणें हाही शब्द मराठींत शिरला. शाहूमहाराजांपासून भट घराणें वंशपरंपरा पेशवापदावर राहिल्यामुळें, पेशवा म्हटला कीं, बाळाजी विश्वनाथापासून दुसऱ्या बाजीरावापावेतों भट घराण्यांतील पुरुष असाच अर्थ समजला जातो. व त्याच अर्थानें या प्रकरणास नांव दिलें आहे.

या पेशव्यांचा मूळ पुरुष बाळाजी विश्वनाथ. हा जंजिऱ्याच्या हबशाच्या जुलमास कंटाळून, घाट चढून, उदरनिर्वाहासाठीं साताऱ्यास आला. साताऱ्यास धनाजी जाधव सेनापति, यांजकडे खुशामत करून कारकून म्हणून राहिला. पुढें धनाजी जाधवाची व महाराजांची मर्जी संपादन करून व आंगच्या कर्तबगारीनें, वाढत वाढत कारकुनाचा पेशवा झाला.

बाळाजी विश्वनाथ ब्राह्मण खरा, पण तो ‘ चित्पावन. ’ त्यामुळें देशस्थ ब्राह्मणांना व जुन्या सरदारांना बाळाजीचा उत्कर्ष सहन झाला नाहीं. व जातीजातींत ह्या प्रकारामुळें जो मत्सराग्नि पेटला त्यामध्यें खुद्द पेशव्याचीही आहुति पडली. चित्पावनांच्या उत्पत्तिसंबंधीं सह्याद्रिखंडांत जो उल्लेख केला आहे त्यामुळें व या चित्पावनांचा (इजिप्शियनांचा) जो बाळाजीच्या उत्कर्षा-बरोबर उत्कर्ष होऊं लागला, त्यामुळें देशस्थ ब्राह्मण त्यांना हलके समजत. ते त्यांच्याशीं रोटीबेटीव्यवहार करण्यास तयार नव्हते. अर्थात् पेशवे जसजसे सत्ताधारी झाले, तसतसा उच्चनीचपणाच्या कल्पनेनें कर्मठपणाचा जास्त जास्त आव आणूं लागले. तसेंच आपला मोठेपणा प्रस्थापित करण्यासाठीं दुसऱ्याचा असेल नसेल तो उणेपणा काढण्याची साधारण जनांची प्रवृत्ति असते, त्याच प्रवृत्तीचें चित्पावन ब्राह्मणांनीं अनुकरण केलें. देशस्थ ब्राह्मणांप्रमाणें कायस्थप्रभूही महाराजांच्या दरबारांत मोठेपणास चढलेले होते. त्यांचा व देशस्थ ब्राह्मणांचा पूर्वीपारचा स्नेह, त्यामुळें पेशवे व त्यांचे जातभाई प्रभूंचा हेवा करूं लागले, व त्यांना शूद्र ठरवूं लागले. इतकेंच नव्हे, तर दुसऱ्याच्या

कुचेष्टेनें स्वतःची प्रतिष्ठा वाढविण्याच्या प्रवृत्तीस बळी पडल्यामुळेंच पेशवे व त्यांचे जातभाई गादीच्या मालकास क्षत्रिय मानण्यास कबूल होईनात ! सारांश पेशव्यांना एकदम मोठेपणा मिळाल्यामुळें ग्रामण्यादि पिशाच्चें मराठी अमदानींत उद्भवलीं व महाराष्ट्राच्या नाशास कारण झालीं.

बाळाजी विश्वनाथ भट पेशवा सन १७२० मध्यें वारला. थोड्याफार भानगडीनंतर बाळाजीचा मुलगा बाजीराव यास शाहूमहाराजांनीं पेशवा नेमिलें. बाजीराव विशेषसा मुत्सद्दी नव्हता. मोंगल पातशाही मोडकळीस आलेली होती. त्यामुळें मराठ्यांना हिंदुस्थानांत लढाया करणें जरूर झालें व म्हणूनच मुलुखगिरीस ऊत आला. खजिन्यांत रोकड पैसा कमी जमूं लागला त्याकारणानें सरंजामी पद्धत उत्पन्न झाली, साहसी लोकांना साहसाचें फळ मिळूं लागलें. त्यामुळेंच शिंदे, होळकर, गायकवाड, नागपूरकर यांनीं मुलुखगिरी करून मोटमोठे प्रांत सर केले; व त्यांनाही राज्य स्थापन करतां आलें. बाजीराव पेशवा सन १७४० मध्यें मोहिमेवर जात असतांना नर्मदातीरीं मरण पावला.

बाजीराव पेशव्यास मुलगे चार. बाळाजी उर्फ नानासाहेब, रामचंद्रपंत, रघुनाथराव उर्फ दादासाहेब, व जनार्दनपंत. बाजीराव वारल्यावर नागपूरकर व देशस्थ ब्राह्मण दरबारी मंडळींनीं बारामतीकर सावकार यांस पेशवा करावें अशी खटपट चालविली. चिमाजीअप्पानें बाळाजीस आणून शाहूमहाराजांच्या पायांवर घातलें. तेव्हां दयाभूत अंतःकरणीं **शाहूमहाराजांनीं** नानासच पेशवाईचीं वस्त्रें दिलीं.

जन्मतः म्हणा अगर परिस्थितीमुळें म्हणा **नानासाहेब** भयंकर स्वार्थी बनला होता, व त्यामुळेंच स्वामिद्रोह करण्यास प्रवृत्त झाला. राज्यकारभार करण्यास सोयीचें व्हावें, या सबबीवर त्यानें पुण्यास आपलें ठाणें नेलें. तेथेंच शनिवारवाडा बांधून हळुहळु तीच पेशवाईची, व अखेर मराठा साम्राज्याची, गादी बनविली.

शाहूमहाराज सन १७४८ त वारले. ते आसन्नमरण स्थितींत असल्याची संधि साधून नानानें **मराठी साम्राज्याच्या कुलमुखत्यारीची सनद** कप-

टानें त्यांच्याकडून मिळविली. पण शाहूमहाराज वारले तेव्हां त्यांची **पट्टराणी सकवारबाई** ही जिवंत होती. ही महाराणी अत्यंत हुशार व राजकारण हाकण्यास समर्थ अशी होती; दरबारी मंडळीवर व इतर लोकांवर तिचें वजन व हुकमत फार होती; तेव्हां ती मागें राहिल्यास इतक्या सायासांनीं संपादन केलेली कुलमुखत्यारी आपणास पचावयाची नाहीं, हें नानासाहेब पूर्णपणें जाणून होता. ही राणी शाहूमहाराजांच्यामागें कांहीं वर्षे जगती तर पेशव्यास जो मोठेपणा व सत्ता लाभली ती खास लाभली नसती. सातारा व कोल्हापूर अशा मराठेशाहीच्या एकमेकांस पाण्यांत पाहाणाऱ्या दोन गाद्या न राहतां एकच गादी झाली असती; व मराठ्यांचें साम्राज्य भक्कम व वैभवशाली झालें असतें.

पण स्वार्थांध पेशव्यास ही गोष्ट पसंत नव्हती. कारण मराठे एक होते तर भट पेशव्यांचा पुढें जो बोलबाला झाला तो होता ना. म्हणून नानानें **सकवारबाई** राणीसाहेबांचा बळी घेण्याचा स्वामिघातकी बेत ठरविला; व राणीसाहेब महाराजांबरोबर सती जात असल्याची आपल्या लोकांकरवीं खोटीच आवाई उठविली. कर्णोपकर्णी ही बातमी **राणी सकवारबाईस** कळली. तेव्हां पेशव्याचा नीच कावा ओळखून, त्या वीरांगनेनें त्या बातमीचा खोडसाळपणा प्रसिद्ध करण्याचा बेत केला; व ती सती जाण्यास तयार होईना. पण बाळाजी बाजीराव कसला दुष्ट! त्यानें सकवारबाईच्या बंधूस गाठलें व आतां राणीसाहेबांनीं जीवाच्या भीतीनें कच खाल्ल्यास उभय कुळांची बेअब्रू होईल. शिर्के घराण्याच्या एकवीस पिढ्या रौरव नरकांत जातील वगैरे प्रकारांनीं त्याचें मन वळवून त्याच्या करवीं सकवारबाईस सती जाण्यास भाग पाडलें.* अशा प्रकारें कपटकारस्थान करून धूर्त पेशव्यानें शाहूमहाराजांच्या पादुकांच्या सरणावर **राणी सकवारबाईस** तिच्या बंधूकरवीं बळेंच लोटून दिलें. स्वामिघाताचें घोर पातक करून स्वार्थ साधला! सती जातांना सतीचें वाण घेतलेल्या त्या शूर

---

* "The wily, Brahmin, Peshwa by these arts secured his victim..." Cambell.

वीरांगननें बाळाजीस "तूंही हाय हाय करून मरशील, तुझा कुलक्षय होईल," असा मनःसंतापातिरेकानें शाप दिला.

बाळाजी बाजीराव अत्यंत लबाड होता,* हें सांगण्याची आतां जरूरी नाहीं. ब्राह्मणांच्या मतानें तो मुत्सद्दी होता, कारण त्यांच्या विचारसरणीला लुच्चा व मुत्सद्दी यांतला भेदच कळत नाहीं. पण बाळाजी बाजीराव मुत्सद्दी नसून लुच्चा व कपटी होता, हें त्यानें स्वामिनीचा बळी घेतला या कपटनाटकानें कळून येणार आहे.

आपल्या राक्षसी महत्वाकांक्षेच्या आड येणाऱ्या स्वामिनीचा घात केल्यानंतर, आपल्या हातचें बाहुलें राहील असा छत्रपति शोधण्याच्या उद्योगास बाळाजी बाजीराव लागला. ताराबाईशीं संगनमत करून तिचा नातू रामराजा ह्यास बाळाजीनें शाहू महाराजांच्या दुसऱ्या राणीस दत्तक घ्यावयास लावलें. सारांश अशा कपटकारस्थानांनीं पेशव्यानीं आपली सत्ता निरंकुश करून घेतली. यापुढें सातारचें महत्त्व पार विलयास गेलें. पुणें हेंच राजधानीचें ठिकाण झालें. रामराजा अज्ञातवासांत वाढलेला; त्याला राजकारण कांहींच कळत नव्हतें. ताराबाईनें तो आपला नातू असल्याबद्दल ग्वाही दिली नसती, व त्याला ताटांत घेऊन एकत्र जेवली नसती, तर या भुत्यांत वाढलेल्या राजास लोकांनीं छत्रपति म्हणून मुजरेही केले नसते. अशा प्रकारची छत्रपतींची स्थिति असल्यामुळें बाळाजी बाजीरावास आपला स्वार्थ अनायासें साधतां आला.

" वाइटाचें फल वाईट " असें नीतितत्त्व आहे. इतिहासांत देखील तें

---

* His measures are marked by an excessive cunning which Brahmins, in general, mistake for wisdom. He practised all the arts of dissimullation and was a perfect adept in every species of intrigue. A strong example of the worst species of Brahmin Character is shown in the manner by which he compassed the destruction of Sakawarbai.

Cambell.

आपणांस पदोपदीं खरें ठरलेलें आढळतें. बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब याच्याही बाबतींत आपणांस तेंच पाहावयास मिळतें. नानासाहेबानें स्वामिनी-घाताचें जें घोर पातक केलें, त्याचा जाब यमधर्माकडे त्यास द्यावा लागला असेल, किंवा त्याला तेथें कोणत्या प्रकारची शिक्षा देण्यांत आली असेल, हें आपणा मर्त्यलोकांस कळणें कठीण ! पण येथें, या मर्त्यलोकींच, बाळाजीस पुत्र-शोकानें मरण आलें. सन १७६१ मध्यें पानपतचा घोर संग्राम झाला त्यांत नानाचा थोरला मुलगा विश्वासराव व चुलतबंधू सदाशिवराव यांच्या चढेलपणाच्या व मूर्खपणाच्या धोरणानें मराठ्यांना अपयश आलें. खुद्द विश्वासराव गर्दीत नापत्ता झाला. सदाशिवराव पळून जात असतां मारला गेला. नानाफडणी-साचीं माणसें गर्दीत चुकलीं. त्याची आई मुसलमानांच्या हातीं पडली. हजारों मराठे वीर धारातीर्थी पडले. उत्तरेकडे पेशव्यांच्या उत्कर्षास पायबंद लागला. या घोर आपत्तीमुळें बाळाजीची कंबर खचली. पुत्रशोक व भ्रातृशोक अना-वर झाल्यामुळें तो वेडापिसा झाला. स्वामिनीघातामुळें मनास बोचण्या होऊन त्याला दुःस्वप्नें पडूं लागलीं. अखेर आत्यंतिक यातनांनीं तो सन १७६२ मध्यें मरण पावला.

बाळाजी बाजीरावानंतर त्याचा दुसरा मुलगा **माधवराव** यास महाराजांनीं पेशवाईचीं वस्त्रें दिलीं. माधवराव कर्तबगार होता. त्याला आपल्या वडिलांची चूक कळून आली. एकदां माधवरावानें शास्त्रीपंडितांना आपल्या वंशक्षयाचें कारण विचारलें असतां काशीकर **रामशास्त्री प्रभुणे** यांनीं स्पष्ट सांगितलें कीं, " स्वामिद्रोहासारखें घोर पातक नाहीं. धन्यास प्रधान प्रतिबंधांत ठेवून राज्याचा उपभोग करूं इच्छितात, याच कारणानें वंशक्षय व अपकीर्ति होत चालली आहे. " या भाषणानें माधवरावास आपल्या वडिलांनीं कोणती पुण्याई तयार करून ठेविली होती, हें कळून चुकलें होतें. पण पदरीं पडलेलें कोण सोडतो ? माधवरावानें देखील छत्रपतीची स्थिति सुधारण्याचा फारसा यत्न केला नाहीं. अखेर सन १७७२ मध्यें माधवरावाचें देहा-वसान झालें !

सकवारबाईच्या शापाचा परिणाम म्हणा अगर कसेंही म्हणा, माधवरावास संतती झाली नाहीं. सबब बाळाजी बाजीरावाचा तिसरा व कनिष्ठ मुलगा नारायणराव यास पेशवा करण्यांत आलें. राघोबादादा बाळाजीचा धाकटा भाऊ हा पेशव्यांमध्यें बाजीरावाच्या खालोखाल वीर वृत्तीचा व कर्तबगार होता. पेशवा होण्यास नारायणराव नालायक होता, ही गोष्ट त्याला ठाऊक होती. म्हणून आपण पेशवा व्हावें अशी महत्वाकांक्षा त्यास उत्पन्न झाली. परंतु पुण्याच्या कारस्थानी मंडळीस कर्तबगार पेशवा नको होता. कारण पेशवा स्वतः कर्तबगार असता तर कारभाऱ्यांना आपल्याच छंदानें, स्वैरपणें कारभार हांकण्यास संधि मिळाली नसती. म्हणून राघोबादादाच्या खटपटीस यश आलें नाहीं.

नारायणराव पेशवा झाला; पण तो हलकट व नादान होता. शिवाय तो हेकेखोरही भारी होता. त्यामुळें लौकरच लोक त्याजवर नाराज झाले. पुढें गार्द्यांनीं बंडावा केला. त्यांत नारायणरावाचा खून झाला. बाळाजी बाजीरावाच्या स्वामिनीघाताच्या घोर पातकाचा परिणाम त्याच्या तिन्ही मुलांवर कसा झाला हें यावरून दिसून येणारें आहे.

नारायणरावाच्या वधानंतर राघोबादादा थोड्या दिवसांसाठीं पेशवा झाला. राघोबादादा स्वतः कर्तबगार व पराक्रमी असल्यामुळें; सखारामबापू, नानाफडणीस वगैरे बारभाई मुत्सद्यांची, कारभारांत ढवळाढवळ करण्याची हौस जागचे जागीं जिरूं लागली. राघोबादादा दक्षिणेंत स्वारीवर गेला होता, अशी संधि साधून राघोबादादाबद्दल या मंडळींनीं छत्रपति रामराजाचें मन कलुषित केलें व त्याचेकडून तारीख १ मार्च १७७४ रोजीं असें फर्मान काढविलें कीं, " नारायणराव पंडित प्रधान यांचा मृत्यु रघुनाथराव बाजीराव यांनीं घडविला. सबब रघुनाथराव यांस पेशवाईवरून दूर करून त्यांचे ऐवजी पुढीलप्रमाणें पंचाईत पेशवाई चालविण्यास नेमिली आहे.

---

१ सगुणाबाईचें अपील.

१ भवानराव पंडित पंतप्रधान.
२ त्रिंबकराव विश्वनाथ.
३ सेना सुभे साबाजी भोसले.
४ वामन गोविंद.

या पंचायतीनें किती दिवस व कशा प्रकारें पेशवाई चालविली, त्याजबद्दल इतिहास उपलब्ध नाहीं. परंतु या पंचायतींत नानाफडणीस, सखारामबापू, मोरोबा वगैरे कारस्थानी मंडळींपैकीं कोणीही नव्हते.

नारायणराव पेशव्याची बायको गंगाबाई हिचें व नानाचें फार सख्य होतें. वरीलप्रमाणें पेशवाईबद्दल भानगडी चालल्या असतां गंगाबाई प्रसूत झाली. बाल सवाई माधव अस्तित्वांत आला. तेव्हां नानानें इंग्रज वगैरेंची मदत मिळवून सवाई माधवरावासाठीं छत्रपतींपासून पेशवाईचीं वस्त्रें मिळविलीं. सवाई माधवराव, अज्ञान बालक असल्यामुळें, कारभारी नानाफडणीस हाच पेशवा होता, असें म्हणतां येईल.

सवाई माधवरावास पेशवाईचीं वस्त्रें मिळालीं ही गोष्ट अगदीं अन्यायाची झाली. पण छत्रपतींना दोष देण्यास जागा कोठें होती? जो शिरजोर, त्यास वस्त्रें देणें छत्रपतीस भाग होतें! छत्रपति महाराजांची ही असहाय्य स्थिति राघोबास ठाऊक होती. नाना फडणीसाच्या कारभारांत ज्याचा त्याचा स्वार्थ साधत असल्यामुळें सारे जहागिरदार, सरंजामदार व निजाम वगैरे नानाच्या बाजूस. अखेर सामर्थ्यवान् होण्यासाठीं, राघोबादादास इंग्रजांचा आश्रय करावा लागला. रघुनाथरावाचे हात पुतण्याच्या रक्तानें कलंकित झाले आहेत अशी आवाई फडणीसकडून पसरली नसती, तर शिंदे, होळकर, गायकवाड वगैरेंनीं राघोबास मदत केली असती. पण नीतिभ्रष्ट झाल्याचा एकदां शिक्का बसला म्हणजे जगांत किंमत राहात नाहीं.

सवाई माधवरावाची कारकीर्द म्हणजे नाना फडणीसाची कारकीर्द. सवाई माधवराव नशिबाचा, म्हणून त्याच्या हयातींत **महादजी** शिंदे ग्वाल्हेरच्या तक्तावर होता. **महादजीनें** स्वपराक्रमानें निजाम, हैदर व इंग्रज यांच्याशीं लढून यश

मिळविलें नसतें तर नानाच्या अकलेचे **महादजीनं**तर जसे तीन तेरा झाले तसे पूर्वींच झाले असते. पण **महादजी** पडला पाटील गडी, मराठा. तेव्हां **श्रीशिवाजीमहाराजांचा** पराक्रम जसा समर्थ रामदासाच्या झोळींत व दादोजी कोंडदेवाच्या बारावंदीच्या खिशांत कोंबण्याचा प्रयत्न होतो, तसाच **महादजीनें** केलेल्या राष्ट्रसेवेचें पुण्य नाना फडणीसाच्या सारख्या भ्याड, नीतिभ्रष्ट व लबाड ब्राह्मण कारभाऱ्याच्या पदरीं घालण्याचा प्रयत्न आजवरच्या ब्राह्मण लेखकांनीं केला आहे.

सवाई माधवराव अज्ञान असतां सत्ता उपभोगण्यास **सवकल्यामुळें** नाना फडणीसास सवाई माधवराव सज्ञान झाला, तरी देखील त्यानें आपल्या एकट्याच्याच तंत्रानें चालवें असें वाटे. त्यामुळें नाना फडणीस सवाई माधवरावास जाच करूं लागला. **महादजी शिंदे** यांनीं थोर पराक्रम करून पेशव्यासाठीं बादशहाच्या वजिरीचीं वस्त्रें आणिलीं, व **छत्रपतीची** परवानगी घेऊन मोठा समारंभ करून तीं सवाई माधवरावास अर्पण केलीं. ह्या प्रसंगानें महादजी पाटील शिंदे व सवाईमाधवराव यांचें सख्य जमलें. नानास ही गोष्ट अर्थात् रुचली नाहीं. पुढें थोडक्याच दिवसांनीं विषप्रयोग होऊन राष्ट्रसेवक मर्द महादजीबाबांस पुणें (वानवडी) येथें विखारी तापानें ता. १२–२–१७९४ रोजीं मरण आलें.

महादजी शिंदे यांजबरोबर सवाई माधवरावाचें सख्य जमलें हें नानास समजतांच नानानें सवाई माधवरावाचा जास्तच छळ मांडला. बिचारा सवाई माधवराव! त्याला मायेचें असें कोणीच नव्हतें. पेशव्यांनीं छत्रपतींची जी स्थिति केली होती, त्यापेक्षांही सवाई माधवरावाची स्थिति जास्त करुणास्पद होती ! तो पेशवा होता खरा, पण सत्ता कवडीची नव्हती. छळ, जाच व नानाचीं बोलणीं मात्र त्याला भरपूर सहन करावीं लागत. पुढें बाजीराव रघुनाथ शिवनेरीस होता त्याजबरोबर मैत्री करून, संधान बांधल्याबद्दल नानानें एकदां पेशव्याची खूप निर्भत्सना केली ! सवाई माधवरावानें नानास उलट उत्तर करतांच नाना त्यास टाकूनही बोलला. तेव्हां जाच असह्य होऊन सवाई माधवरावानें शनिवारवाड्यांतील गणेशमहालांतील एका गच्चीवरून खालीं कारंजावर उडी टाकून नानाच्या अमानुष जाचांतून आपली कायमची सुटका करून घेतली ! तथापि

स्वतःच्या त्या आचरणावर पांघरूण घालण्यासाठीं नानानें काय बतावणी केली पहा !

नानाचें श्रीमन्महाराज छत्रपति शाहूमहाराजांस पत्र.

श्री.

श्रीमंत क्षेत्रिय कुलावतंस महाराज राजश्री छत्रपति

स्वामीचे शेवेशी

विनंती. सेवक बालाजी[1] जनार्दन कृतानेक विज्ञापना. सेवकाचें वर्तमान तागाईत छ २४ पावेतों स्वामीचे कृपावलोकनेंकरून यथास्थित असे विशेष. पंतप्रधान यांचे शरीरीं किंचित् वायूची भावना पांचसात दिवसांत होऊन गणपतीचे दिवाणखान्याचे दुमजल्यावरून कारंजाचे अंगे संगीन फरसावर जमीनीस आले. उजवे मांडीस जखम भारी होऊन दातास जरब बसली. तबीब वैद्य व देवी मानवी वगैरे उपाय बहुत जाहले. परंतु कांहीं गुणास न येतां तिसरे दिवशीं सायंकाळीं कैलासवास केला. ही गोष्ट मोठी वाईट जाहली. ईश्वर ईत्सेस उपाय होणार नाहीं. होणार बलोत्तर या उपरी राज्याचा बंदोबस्त राहून स्वामीसेवा घडली पाहिजे ये विसीचा विच्यार होऊन आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना पो छ २५ जमवेल सु॥ सीत तीसेन मया व आलफ कार्तिक वद्य ११ सोमवार शक १७१७ राक्षसनाम संवत्सरे छ २४ जमवेल. (सही) बालाजी जनार्दन भानु.

नानाफडणिसानें बतावणी करून सवाई माधवरावाच्या मृत्यूचें कारण वातावर घातलें. सवाई माधवरावाच्या मृत्यूनंतर जी क्रांति महाराष्ट्राच्या इतिहासांत घडली त्याचा मनोवेधक इतिहास पुढील प्रकरणांत यथावकाश येणार असल्यामुळें येथेंच थांबलेलें बरें.

---

१ हें नानाचें नांव. मराठेशाहीच्या इतिहासांत बाळाजी नांवाचे इसम स्वार्थाचे मूर्तिमंत पुतळे असेच झाले. हा तिसरा बाळाजी चौथा बाळाजी तर त्या सर्वांपेक्षांही दुष्ट होता ! २ प्रतापसिंहांवरील आरोपांचें निराकरण (मोडी) भाग २ पान ३१.

प्रकरण ३ रें.

दुसरे शाहूमहाराज.

शाहूमहाराज ऊर्फ आबासाहेबमहाराज हेही **रामराज**प्रमाणें राजवाड्यांत जन्मलेले नव्हते. नशीबानें हात दिला, छत्रपति रामराजांनीं दत्तक घेतलें म्हणून ते रंकाचे राव झाले! पूर्ववयांत राजकारणाचें शिक्षण त्यांना मिळालेलें नव्हतें. अचानक लक्ष्मीची भेट झाली असल्यामुळें तिचा मनमुराद उपभोग घेण्याकडे त्यांची प्रवृत्ति व्हावी यांत नवल कसलें? आबासाहेबांनीं आपल्या कारकीर्दीच्या पहिल्या अर्ध भागांत पेशव्यांच्या कारभाराकडे लक्षच दिलें नाहीं. उलट पेशव्यांमुळें आपणांस आजचे भाग्याचे दिवस लाभले अशी कल्पना करून ते पेशव्याशीं कृतज्ञच रहात.

आबासाहेबांच्या कारकीर्दीच्या पहिल्या अर्धांत दारूगोळा उडाला असेल तर तो लग्नसमारंभाचे प्रसंगीं. मराठे वीर गोळा झाले असतील, तर पंक्ति झोडण्यास. एरव्हीं लढाई नाहीं, कवायती नाहींत कीं कांहीं नाहीं. आबासाहेबांनीं आपली स्वतःचींच ४ लग्नें केलीं. आपला जनकबंधु **चतुरसिंग** राजे भोसले यांचें लग्न सन १७८९ सालीं केलें. तसेंच आपली बहीण ठमाबाई हिचें लग्न बाहिर्जी राजे शिर्के यांच्याशीं त्याच वर्षी करून दिलें. या लग्नमहोत्सवाशिवाय जन्मोत्सवही केले. **प्रतापसिंह** जन्मले त्यावेळीं फार मोठा उत्सव केला. हत्तीवरून साखर वांटली. पहिल्या शाहूमहाराजांनंतर पुत्रजन्मोत्सवाचा प्रसंग राजघराण्याला एक शतकानंतर लाभलेला, त्यामुळें तर त्या उत्सवाचें वैशिष्टय फार होतें.

सवाई माधवराव ७।८ वर्षांचा असतां नानानें त्याचें लग्न करण्याचें योजिलें. सवाई माधवरावाच्या औरसपणाबद्दल लोकप्रवाद असल्यामुळें लग्नानें त्याला ब्राह्मणजातीशीं एकजीव केल्याशिवाय लोकप्रवाद नष्ट होणार नाहीं, अशी नानाची समजूत होती. सवाई माधवरावाची बाजू घेणारे सासूसासरे व

सगेसोयरे असले म्हणजे मग त्याच्या जन्माबद्दलच्या भानगडी उपस्थित होणार नाहींत, असा विचार करून एवढ्या बालवयांत नानानें त्याचें लग्न करण्याचें योजलें! या लग्नसमारंभास नानानें छत्रपति शाहूमहाराजांनाही बोलावलें. त्याप्रमाणें छत्रपति गेलेही. या प्रसंगानें शाहूमहाजांना राजकारणाच्या पुष्कळशा घडामोडी कळून आल्या. हा लग्नसमारंभ १० फेब्रुवारी १७८३ मध्यें झाला.

या समारंभांत जे निरनिराळे प्रसंग आले त्यामुळें आपली वास्तविक योग्यता व अधिकार काय आहे, छत्रपतीच्या अंमलाखालीं केवढें साम्राज्य आहे, असें असतां आज आपण कसे पोषाखी छत्रपति बनलों आहों हें सर्व आबासाहेबांना कळून चुकलें. त्यांची दृष्टि अंतर्मुख झाली, व आपली स्थिति सुधारण्याच्या प्रयत्नास ते हळूहळू लागले.

राजकारणाचें निदान त्यांना पुढें पुढें चांगलें करतां येऊं लागलें. शिंदे महादजीबावा यांनीं इंग्रजांचा पराभव करून, त्यांना तह करावयास लावलें. या तहाची सुनावणी करण्यासाठीं सदर तह नाना फडणीसानें सवाईमाधवरावाच्या सहीचें पत्र लिहून सोबत पाठविला. उत्तरादाखल महाराजांनीं जें पत्र लिहिलें त्यांत पुढील मजकूर होता.

"......आपला कावा साधण्यासाठीं इंग्रजांनीं राघोबादादास वश करून घेतलें होतें हें तुम्ही जाणत आहांच. तसेंच त्यांनीं आमचे रयतेवर जुलूम केला आहे. मुलूख उजाड करून टाकिला आहे. आम्हाशीं प्रथम केलेला तह धाब्यावर बसवून युद्धाचा प्रसंग आणला. आतां पुनः दुसरा तह......असो. आमचे राज्यांत मांडलिक, जहागिरदार वगैरे बहुत. पूर्वीं राघोबाशीं जसा इंग्रजांनीं कट केला, तसा दुसऱ्या एखाद्या मांडलिकाशीं मसलत करतील. इंग्रजांच्या प्रामाणिकपणाबद्दल आम्हास शंका वाटते. सबब या तहास इंग्रजराजाची संमती मिळवा......महादजी शिंदे यांना इंग्रजांशीं दक्षतेनें वागण्याबद्दल लिहून जाणें......"

या पत्रांत आबासाहेबमहाराजांनीं सुचविलेलें धोरण विचारांत घेतां त्यांच्या मनानें परिस्थितीचें आकलन कसें पूर्णपणें केलें होतें, हें समजून येणारें

आहे. कंपनी सरकारच्या पदरीं असलेल्या त्या काळच्या नोकरशाहीच्या मुत्सद्दीपणाची पारख आबासाहेबांनीं केली होती, व म्हणूनच त्यांच्या प्रामाणिकपणाबद्दल शंका प्रदर्शित करून त्यांनीं सेनापतींना व पेशव्यालाही सावधगिरीची सूचना दिली होती. तरी देखील नानानें घोडचूक केलीच. अशा नानास म्हणे मुत्सद्दी ! नानाच्या जागीं दुसरा एकादा मुत्सद्दी असता, तर पेशवाईचे पिंड सन १८१८ मध्यें पडतेना.

१७९५ सालीं महाराजांना दुसरा मुलगा झाला. त्याचें नांव रामचंद्र असें ठेविलें. यास भाऊसाहेबमहाराज असेंही म्हणत. सन १७९५ मध्येंच सवाई माधवराव पेशव्याचा अंत झाला व तेव्हांपासून महाराष्ट्रांत यादवी सुरू झाली. नाना फडणीसाच्या मुत्सद्दीपणाचा प्रकाश (?) या काळापासूनच पहावयास मिळतो. अलिजाबहाद्दर **महादजी शिंदे** होता, तोंवर शनिवारवाड्यांत बसून शिळोप्याच्या गोष्टी सांगण्यांत वाकबगारी अगर बायकी भानगडीच्या बातम्या काढण्यांतली चतुराई, ही ब्राह्मणी मुत्सद्देगिरीचीं लक्षणें मानलीं जात होतीं. पण लढाया मारून शत्रूंना ताब्यांत ठेवणारा अगर स्वकीयांना एकजुटीनें वागावयास लावणारा, **महादजीबाबा** गेल्यावर नानाची मुत्सद्देगिरी कसास लागली ! उदाहरणार्थ सवाई माधवराव मेल्यावर त्याची बायको यशोदाबाई हिला दत्तक देऊन नानानें पेशवाई चालवावयास हवी होती. पण नानाला ही एवढी सोपी गोष्टही सुचली नाहीं. दत्तक न घेतांच यशोदाबाईसारख्या अबलेच्या नांवानें सुमारें एक वर्ष नाना कारभार पाहात होता. महादजीबाबा शिंदे मेल्यावर नानानें मराठा सरदार हाताशीं घेण्याऐवजीं आपल्याच चित्पावन जातीचा, कोल्हापूर छत्रपतींच्या छातीवर बंदूक रोखून ठेवावी अशासाठीं पेशव्यांनीं निर्माण केलेला, तासगांवकर परशराम पटवर्धन याशीं सख्य जोडलें होतें. तथापि बराच वेळ या उभयतांचा एकविचार असा होईना.

इकडे बाजीराव म्हणजे रघुनाथराव दादाचा थोरला मुलगा, शिवनेरींत नानाच्या कैदेंत होता. त्याच्याबरोबर त्याचा भाऊ चिमाजीआप्पा व दादानें मुलगा नसतांना दत्तक घेतलेला अमृतराव, हेही कैदेंतच होते. बाजीराव देखील

कांहीं कमी कारस्थानी होता असे नाहीं. त्यानें शिंद्यांचा सरदार बाळोबा तात्या यास वश करून घेतलें, व त्याच्या साहाय्यानें शिंदे–होळकरांशीं संगनमत केलें. उभयपक्षीं असें ठरलें कीं, शिंदे व होळकर यांनीं बाजीरावास पेशवा करावें व त्यामोबदला पेशवा झाल्यावर बाजीरावानें सैन्याचा खर्च व ४ लाखांचा मुलूख द्यावा. उभयपक्षीं त्याप्रमाणें आणाभाकाही झाल्या.

बाजीराव व शिंदे यांच्यामधील कराराला पक्केपणा आला, तेव्हां कुठें त्याची दाद नानाला लागली ! तेव्हां मग नानाच्या तोंडचें पाणी पळालें. त्यानें परशुरामभाऊला निकर्डाचें बोलावणें केलें. निरोप कळतांच घोडदळ घेऊन परशुरामभाऊ तासगांवाहून तांतडीनें निघाला तो अवघ्या ४८ तासांत पुण्यास येऊन दाखल झाला. नानानें बाजीरावाचा व शिंद्याचा कसकसा करार झाला आहे तें परशुरामभाऊस कळविलें. शिंदे-होळकरांपुढें आपलें सामर्थ्य अपुरें पडेल, ही जाणीव उभयतां ब्राह्मणांस होतीच, तेव्हां हट्टास पेटून अधिकार गमावून बसण्यापेक्षां बाजीरावासच वश करून घ्यावें तें श्रेयस्कर, असा दोघांचा विचार झाला. शिवाय बाळाजी विश्वनाथाचा–मूळ पेशव्याचा–वंशज जिवंत असतांना त्याला वगळून दुसरा भलताच मुलगा यशोदाबाईस दत्तक दिला, तर आपणांस लोकमत अनुकूल होणार नाहीं, हें त्यांना पक्कें ठाऊक होतें. म्हणून शिंदे होळकरांच्या करवीं, बाजीराव पेशवा झालेला पाहाण्याचा प्रसंग येण्यापेक्षां, आपणच त्यास पेशवा केलें तर आपलें महात्म्य टिकेल असा उभयतांचा बेत ठरला, व बाजीरावाचें मन वळविण्याचें काम पटवर्धनाकडे सोंपविण्यांत आलें.

त्याप्रमाणें गडबडीनें परशुराम पटवर्धन शिवनेरीस गेला, बाजीरावास भेटला व त्यास पेशवा करण्याचा, आपला व नानाचा विचार असल्याचें त्यानें सांगितलें. बाजीरावानें त्याचें सारें म्हणणें ऐकून घेतलें, व आपली असहाय्य स्थिति त्याला सांगितली. बाजीरावाला पटवर्धनाचें म्हणणें खरें वाटत नव्हतें. कारण पटवर्धन नानाकडून आलेला होता. नानाचें व बाजीरावचें वडिलार्जित हाडवैर ! शिवाय नाना घातकी व लबाड होता असें त्याला वाटे.

तेव्हां त्याच्या जाळ्यांत सांपडणें बरें नव्हे, असें बाजीरावास वाटत होतें. अखेर पटवर्धनाचें सत्यवादित्व पाहाण्यासाठीं बाजीरावानें त्यास गोमातेची शेपटी धरून गंगेची शपथ घेण्यास सांगितलें. पटवर्धनानें त्याप्रमाणें शपथ करून प्राणांतींही बाजीरावास दगा करणार नाहीं, असें वचन दिलें. तेव्हां बाजीरावानें पटवर्धनाच्या म्हणण्यास कबूली दिली. अमृतरावास बाजीरावाचा विचार पसंत पडला नाहीं. त्याच्यामतें बाजीरावानें शिंदे-होळकर यांच्याशीं करार केला तो मोडूं नये. त्यांच्याच साहाय्यानें, निदान अनुमतीनें पेशवा व्हावें. नानाच्या नादास लागूं नये. पण बाजीरावास तो विचार पसंत पडला नाहीं. परशराम पटवर्धनाच्या वचनास भाळून त्याच्याबरोबर तो पुण्यास निघाला. अमृतरावानें बाजीरावास जो उपदेश केला त्याबद्दल प्रायश्चित्त म्हणून पटवर्धनानें, जातांना त्यास कैदेंत ठेविलें, व चिमाजीआप्पास आपल्याबरोबर घेतलें.

नानाबद्दल बाजीरावाचें मन जसें साशंक होतें, तसें नानाचेंही मन बाजीरावाबद्दल साशंक होतें. सबब प्रथम भेटीनंतर लौकरच उभयपक्षीं आणभाक होऊन दोघांनींही मागचें सारें विसरून जावें असें ठरलें, आणि त्याप्रमाणें लेखी करारमदारही झाले. त्यानंतर नानानें बाजीरावास पेशवा करण्याचें कबूल केलें. अशा प्रकारें राघोबादादाला नाहीं, पण त्याच्या मुलाला तरी पेशवा होतां आलें !

पण बाजीराव जन्मतःच[1] दुर्दैवी होता. आतां इतक्या हालअपेष्टा, व बंदिवास सोसल्यानंतर तो पेशवा झाला; पण त्याच्या दुर्दैवानें नाना वगैरेंस दगा करण्याची बुद्धि झाली ! त्यामुळें बाजीरावाच्या वांट्यास पुनः एक वेळ कारागृहवास आला. चिमाजी आप्पा कबूल नसतानांही पटवर्धनानें व नानानें त्याला जबरीनें यशोदाबाईस दत्तक देऊन पेशवाईपदावर बसविलें.

---

१ ‘ बाजीराव रघुनाथ याचा जन्म पवाराची धार येथें जाहला ते समई त्याचें जन्मकाळीं उपजतांच मोठा धरणीकंप जाहला व रगताचा प्रजेन पडला. मराठी दप्तर रुमाल १ ला (शेडगांवकरांची बखर.)

त्यानंतर चिमाजीआप्पास पेशवाईचीं वस्त्रें आणून देण्यासाठीं नाना फडणीस साताऱ्यास आला. महाराजांनीं ह्या एकंदर बेबंदशाहीबद्दल नानाजवळ विचारणा केली. महाराजांची वीरवृत्ति पाहून व एकंदरींत त्यांचा असलेला अधिकार ध्यानांत आणून महाराजांना पुढाकार देऊन त्यांच्या आड आपण रहावें असें नानाला वाटलें. त्याप्रमाणें सातारा हीच राजधानी करूं या व येथूनच राज्यकारभार चालवूं या अशी त्यानें महाराजांना आशा दाखविली.[1]

छत्रपति आबासाहेब शूर होते. राजकारणही त्यांना चांगलें कळूं लागलें होतें. त्यांच्या भोंवती जिवास जीव देतील असे शूर आप्तसंबंधीही होते.[2] पण नानानें त्यांना ज्या स्थितींत ठेविलें होतें त्यामुळें नानावर विश्वास ठेवण्यास महाराज तयार नव्हते. महाराजांना सर्वसत्ताधारी करून, मराठी साम्राज्याचा कारभार साताऱ्याहून हाकावयाचा आपला बेत असल्याचें नानानें जरी महाराजांस बोलून दाखविलें होतें, तरी ब्राम्हणी वर्चस्वास म्हणजे पेशवाईस खो देण्यास नाना तयार नव्हता. सबब तोंडापुरतें गोड गोड बोलून पेशवाईचीं वस्त्रें घेऊन नानानें वाईचा रस्ता सुधारला.

नाना वाईस पोहोंचला तेव्हां आपल्या गैरहजिरींत आपल्या शत्रुपक्षाचा जोर झाला असल्याचें वर्तमान त्यास समजलें. तेव्हां तशा स्थितींत परत पुण्यास जाणें त्यास धोक्याचें वाटलें. म्हणून महाराजांकडून घेतलेलीं वस्त्रें त्यानें परस्पर पुण्यास रवाना केलीं व तो स्वतः वाईसच राहिला. बाजीराव अटकेंत होता. बाळोबा तात्या आणि परशराम पटवर्धन यांनीं चिमाजी आप्पास निमित्तमात्र पेशवा केलें होतें. पण सारा कारभार परशरामभाऊच पाही. नानाला पुणें सोडल्यापासून राज्यकारभारांत कवडीचीही किंमत राहिली नव्हती. कारण

---

१ नाना फडणीसाचें चरित्र. मॅक्डोनल्ड.

२ " The Raja was a man of courage and several of his relations were fit leaders for any dangerous enterprize. "

Nana Phadanis by MacDonald.

दौलतराव शिंद्याचा सेनापती बाळोबातात्या व परशुराम पटवर्धन यांची गट्टी जमली होती, व ते दोघेही नानाला पाण्यांत पहात होते. नानाला जसा सत्तेचा मोह अनिवार झाला होता, त्याप्रमाणें त्यांनाही आपण सत्ताधारी व्हावें व पेशव्यावर अंमल चालवावा असें वाटत होतें. नानानें हें पक्कें ओळखिलें होतें व त्यामुळें आपणांस पकडून ते कैद करतील अशी धास्ती नानास वाटूं लागली. आणि या भीतीमुळें त्यानें वाईसच मुक्काम ठेवला व तो पुण्याकडे जाईचना.

पुढें पुण्यास नाना येत नाहीं असें दिसून येतांच परशुरामभाऊनें त्याची समजूत करून त्यास घेऊन येण्याच्या निमित्तानें आपला मुलगा हरिपंत यास पाठविलें. हरिपंत हा ससैन्य आपणांस परत पुण्यास नेण्यासाठीं येत असल्याचें वर्तमान नानास समजतांच, जीवाच्या भयानें नाना महाडास पळाला. आतां नानास कांहींच सत्ता राहिली नव्हती. आपण पुनः पेशव्याचा पेशवा (कारभारी) व्हावें असें त्याला वाटत होतें, व हा स्वार्थ साधण्यासाठीं त्यानें अत्यंत मोठी घोडचूक केली. इंग्रजांना घरांत आणण्याबद्दल राघोबादादाला दोष देण्यांत येतो. पण खरा प्रकार पाहिला तर त्या दोषाचा धनी एकटा नानाच ठरतो.

बाजीराव कारागृहवासी व नाना हद्दपारींत. दोघांची अशी अवस्था झाली असल्यामुळें दोघेही समदुःखी होते. नानानें पुण्याहून निघतांना आपल्याबरोबर अगणित संपत्ति घेतली होती. त्याशिवाय निरनिराळ्या सावकारांच्या पेढीवर त्याच्या मोठाल्या ठेवी अनामत ठेवलेल्या होत्या. तसेंच कांहीं ठिकाणीं त्यानें द्रव्यही पुरून ठेविलें होतें. या द्रव्याच्या बळावर नानानें प्रथम आत्मरक्षणासाठीं सैन्य जमा करण्यास सुरवात केली. बाळाजी कुंजराच्या मार्फत नानाचें व बाजीरावाचें बोलणें सुरूं झालें व एकमेकांनीं एकमेकांस मदत करण्याचें ठरलें. तेव्हां बाजीरावास पेशवा करण्याच्या प्रयत्नास नाना लागला.

नानानें इंग्रज, निजाम व नागपूरकर यांच्याशीं खलबत करून, त्यांना निरनिराळीं आमिषें दाखवून आपल्या पक्षास मिळवून घेतलें. **सर्जेराव घाडगे** याच्या मुलीबद्दल **दौलतराव शिंद्यास** प्रयत्न होता. सबब सर्जेरावाचें मन

वळवूं असें दौलतरावास वचन देऊन, व सर्जेरावास संपत्तीनें वश करून नानानें शिंद्यास आपल्या कटांत घेतलें. अशा प्रकारें स्वार्थी नानानें बाजीरावास पेशवाई व स्वतःस फडणिशी मिळविण्यासाठीं परक्यांचे व स्वार्थी स्वजनांचे पाय धरून स्वपक्ष जोरदार केला व नंतर तो पुण्यावर चाल करून आला. अघाडीवर त्यानें नारोपंत चक्रदेवास पाठविलें.

नानानें शिंद्यास फोडलें असून नानाचा पक्ष इंग्रज वगैरेंच्या मदतीमुळें जास्त बलवान झाला आहे व नारोपंत आपणांस पकडावयास येत आहे, हें जवानमर्द ब्राह्मणभाई पटवर्धनास समजतांच तो २७।१०।१७९६ च्या सुमारास चिमाजीआप्पास घेऊन शिवनेरीकडे घूम पळत सुटला. पण चक्रदेवाच्या सैन्यानें त्याचा पाठलाग करून त्यास वाटेंतच पकडलें. अशा प्रकारें परशरामभाऊचा पाडाव केल्यावर बाजीरावास बंधमुक्त करण्यांत आलें; व त्यास नानाकडे नेण्यांत आलें. साल्पा घाटांत बाजीराव व नाना फडणीस यांची भेट झाली. नानानें पटवर्धनाच्या मध्यस्थीनें आणभाक करूनही बाजीरावास दगा दिला होता. त्यामुळें त्याचें **विश्वासघातकी मन स्वतः त्यालाच खात होतें.** बाजीरावाबद्दल त्याला शंका वाटत होती, म्हणून दगाफटका करणार नाहीं, असें लेखी आश्वासन त्यानें बाजीरावाकडून लिहून घेतलें. त्यानंतर नाना व बाजीराव पुण्यास आले.

तारीख २५।११।१७९६ रोजीं बाजीरावाला पुनः पेशवा करून नानानें अधिकारसूत्रें पुनः हातांत घेतलीं, व पुनः बाजीरावासाठीं पेशवाईचीं वस्त्रें मिळविण्याच्या खटपटीस नाना लागला. वर्षापूर्वीं याच नानानें बाजीरावास कैदेंत टाकून चिमाजीसाठीं **आबासाहेबमहाराजांकडून** वस्त्रें नेलीं होतीं. आतां उण्यापुऱ्या वर्षानंतर तोच नाना बाजीरावासाठीं वस्त्रें मागावयास पुनः साताऱ्यास आला. महाराजांनीं या साऱ्या प्रकाराबद्दल नानाची हजरी घेतलीच पण आपल्यावरचा दोष पटवर्धनाच्या माथीं मारून नानानें तीं वेळ कशीबशी मारून नेली. साताऱचे छत्रपति सत्ताधीश नसल्यामुळें पेशवाईचीं वस्त्रें देत नाहीं, असें त्यानीं कधींच म्हटलें नव्हतें. प्रसंग ओळखून आबासाहेबमहाराजांनींही बाजीरावास वस्त्रें देण्याचें नाकारलें नाहीं.

नाना फडणीस वस्त्रें घेऊन आला व मोठ्या समारंभानें पेशवाईच्या आसनावर त्यानें बाजीरावास पुनः एक वेळ बसविलें. अशा प्रकारें यादवी माजवून इंग्रज, निजाम वगैरेंचे हात घरांत शिरकविण्यास अवसर देऊन सत्तालोलुप स्वार्थी नानानें दुसऱ्यांदा बाजीरावास पेशवा केलें.

प्रकरण ४ थें.

स्वातंत्र्याची धडपड.

प्रतापसिंहमहाराज जन्मल्यापासून महाराष्ट्रांत राज्यक्रांति होण्यास सुरवात झाली होती. **प्रतापसिंहांचे** वडील छत्रपति **शाहूमहाराज ऊर्फ आबासाहेब** महाराज यांनाही आपण केवळ नामधारी छत्रपति आहों हें कळूं लागलें होतें. पेशवाईचा अधिकार मिळविण्याच्या झटापटींत आपल्या इच्छेस किती अवकाश आहे व सामर्थ्यवान् नोकराच्या म्हणण्यास आपणांस कसें ना म्हणतां येत नाहीं, हें सारें त्यांच्या चांगलेंच प्रत्ययास आलें होतें यामुळें आपण पेशव्यांच्या ताब्यांतून **स्वतंत्र व्हावें, व खरेखुरे सत्ताधारी, छत्रपति म्हणजे मालक** व्हावें असे विचार त्यांच्या मनांत डोकावूं लागले.

महाराजांचे जनकबंधू **चतुरसिंग राजे भोसले** व आप्तमंडळींपैकीं **येलोजी राजे मोहिते, सेनाजी राजे मोहिते, कुशाबा राजे महाडीक, दुर्गोजी राजे महाडीक** वगैरे तरुण मंडळी कर्तबगार व महत्वाकांक्षी होती. त्यांच्या कर्तृत्वाचें चीज होईल अशी संधि महाराजांना त्यांना देतां येत नव्हती. आपण 'छत्रपति,' मराठी साम्राज्याचे मालक असें असून या तरुणांवर एखादी जोखमीची कामगिरी आपणांस सोपवितां येत नाहीं हें विचार सुचले कीं, त्यांबद्दल महाराजांना फार विषाद वाटे.

इकडे अशा प्रकारचे स्वतंत्र होण्याबद्दल विचार महाराजांच्या मनांत होते,

तर पुण्यास पेशवाईवर अधिष्ठित झालेल्या बाजीरावाच्याही मनाची स्थिति तशाच प्रकारची होती. बाजीराव पेशवा झाला, तो नाना व दौलतराव शिंदे यांच्या मसलतीनें. त्यामुळें ते सांगतील त्याप्रमाणें वागणें त्याला भाग होतें. आतां नानाच सर्व सत्ताधारी झाला असल्यामुळें, बाजीरावास कांहींच स्वतंत्रपणें, स्वतः मुखत्यारीनें करतां येत नव्हतें. नानाच्या वागणुकीमुळें **पेशवा असतांही त्याला कारागृहांत असल्यासारखें** वाटत होतें. स्वतंत्रपणें आपणांस हुकमत चालवितां यावी असें त्यास वाटणें साहाजिक होतें, व त्याला तसें वाटत होतें. त्याच्या स्वातंत्र्याच्या मार्गांत नाना फडणीस व दौलतराव शिंदे असे **दोन कांटे होते** व ते फेंकून देणें हें बाजीरावास पहिलें कर्तव्य वाटत होतें.

या दोहोंपैकीं दौलतराव शिंदे हा कमी जाचक होता. त्याला कबूल केल्याप्रमाणें पैसा दिला कीं, तो आपल्या संस्थानाकडे निघून जाईल. ग्वाल्हेर दूर असल्यामुळें तेवढ्या लांब पल्ल्यावरून त्याचा त्रास होणार नाहीं ही बाजीरावाची खात्री होती. पण नाना फडणीसाची गोष्ट तशी नव्हती. नाना डोईजड होऊन मरेपावेतों सत्ता उपभोगणार! त्याच्या कारकीर्दींत आपणांस सवाई माधवरावाप्रमाणें सासुरवास सोसावा लागणार! अशा प्रकारच्या भीषण कल्पनेनें बाजीरावाला भंडावून सोडलें. त्यामुळें नानाचा कांटा आपल्या मार्गांतून काढून टाकण्याच्या उद्योगास बाजीराव लागला.

या कामीं छत्रपतीची मदत, निदान सहानुभूति आपणांस असावी म्हणून, त्यांना सामील करून घेण्यासाठीं, बाजीराव पेशवा मुद्दाम साताऱ्यास गेला. महाराजांची भेट घेतल्यावर एकांतीं त्यानें नानाबद्दल गोष्ट काढली. पूर्वीं चिमाजी आप्पासाठीं पेशवाईचीं वस्त्रें नेण्याकरितां नाना आला होता. यापुढें महाराजांना सत्ताधारी करून, व सातारा राजधानी करून, तेथूनच महाराजांच्या हुकमतीखालीं आपण राज्यकारभार करणार आहों, अशी बात त्यावेळीं नानानें महाराजांस झोंकून [1] दिली होती. पण सत्ताधारी झाल्यावर

---

१ ग्रँड डफ भाग ३ रा व नाना फडणीसाचें चरित्र मॅक्डोनल्डकृत.

नानाला त्या गोष्टीचा विसरही पडला. या गोष्टीची व शिवाय नानाच्या स्वार्थी व हलकट वर्तनाचीही महाराजांस चीड आलेली होती. त्यामुळें बाजीरावाचें म्हणणें महाराजांस पटलें. बाजीराव तरुण, देखणा होता; व त्याचें भाषण[1] मोहक होतें. त्याच्या गतचरित्राकडे लक्ष दिलें म्हणजे कोणालाही त्याच्याबद्दल कळवळा वाटे.

बाजीरावानेंही नानाप्रमाणेंच महाराजांच्या महत्वाकांक्षेला दुजोरा मिळेल अशाच प्रकारें बनावट गोष्टी महाराजांना सांगितल्या. [2]नानाचा बंदोबस्त झाल्यास पहिल्या शाहूमहाराजाचेवेळीं बाजीराव पेशवा ज्याप्रमाणें छत्रपतीच्या हुकमतीनें कारभार पाहात होता त्याप्रमाणें मीही आपल्या आज्ञेंत राहीन, व आपण जें जें सांगाल तें तें करीन. या बाबतींत माझा निश्चय दृढ झाला आहे, असें त्यानें बोलून दाखविलें. तसेंच नानाचा पाडाव केल्यावर नानाचा एजंट साताराचा सुभेदार बाबूराव केशव[3] यास पकडून कैद करावें व किल्ला महाराजांनीं आपल्या ताब्यांत घ्यावा म्हणजे मग पूर्वापार रिवाजाप्रमाणें महाराजांच्या संनिध राहून राज्यकारभार हाकतां येईल.

बाजीरावानें नानाच्या विरुद्ध आपल्या कटांत जसें छत्रपति महाराजांना घेतलें होतें त्याप्रमाणें दौलतराव शिंद्यासही घेतलें होतें. शिंद्यालाही नानाबद्दल चीड आलेली होती. त्यामुळें तो बाजीरावास तावडतोब अनुकूल झाला. त्याला वाटलें, नानाचा पाडाव केल्यावर बाजीरावासारखें पोर आपल्याच मुठींत

---

१ नानाफडणवीस (मॅक्डोनल्डकृत).

२ When Bajirao laid his plan for the overthrow of Nana Phadanis, he engaged the Raja of Sattara in the plot, and advised him to confine Baburao Keshav, Nana's agent and to seize the fort, assuring him that it was his determination to re-establish the old form of government and to serve the head of the state as faithfully as the first Bajirao had done.

Nana Phadnis by MacDonald page 130.

३ बाबूराव कृष्ण असें मोडक म्हणतो तर बाबूराव केशव असें डफ म्हणतो.

राहील. दौलतराव अनुकूल झाल्यावर त्याच्या करवीं बाजीरावानें १७९७ च्या डिसेंबरमध्यें नानास कैद केलें. नाना बातमी काढण्यांत मोठा कुशल होता असें म्हणतात, पण खरोखर तो तसा असता तर आपल्याला कैद करण्याचा बेत बाजीरावासारखा यःकश्चित् पोरगा करीत असल्याची बातमी अखेरपावेतों त्याला कां बरें लागूं नये ? पण खरें म्हटलें तर नाना तितकासा हुशार व शाहाणा नव्हता. जात्यभिमानानें त्याजवर चातुर्याचा नुसता खोटा आरोप करण्यांत आलेला आहे हें त्याच्या चरित्राचा निर्विकार मनानें अभ्यास केला असतां पटेल.

दौलतराव शिंद्यानें नानास अटक केल्याचें वर्तमान महाराजांस समजतांच, चतुरसिंग भोसल्याच्या आधिपत्याखालीं महाराजांच्या सैन्यानें बाबूराव केशव यास कैद केलें; व किल्ल्याचा (अजिंक्य तारा) ताबा घेतला. या **पहिल्या विजयानें** महाराजांच्या पदरच्या तरुणांस मोठा हुरूप आला. त्यांचीं मनें लांब लांब उड्या मारूं लागलीं. आपण आतां नामधारी राहिलों नसून, पहिल्या शाहूमहाराजांप्रमाणें दौलतीचे खरेखुरे अधिपति आहों असें महाराजांनाही वाटलें. पुढें किल्ल्याचा ताबा घेण्यासाठीं बाजीरावाच्या वतीनें शिवराम नारायण फडके हा आला. त्यानें महाराजांची भेट घेतली व किल्ल्याचा ताबा मागितला. त्यावर महाराजांनीं किल्ला तुमचे ताब्यांत देण्याचें कारण नाहीं असें त्यास सांगितलें. फडक्यानें पुष्कळ बुद्धिवाद केला पण त्याचा तादृश उपयोग झाला नाहीं, तेव्हां निरुपाय होऊन त्यास पुण्यास जावें लागलें.

महाराज किल्ला बळकावून बसल्याचें बाजीरावास समजतांच नसता उपद्व्याप आपण करून बसलों असें त्यास झालें. वाईस पेशव्यांचा ब्राह्मण सरदार माधव रास्ते हा होता. बाजीरावानें त्यास युक्तिप्रयुक्तीनें किल्ला घेण्याची कामगिरी सांगितली. बाजीरावाच्या पदरीं मराठे सरदार नव्हते, असें नाहीं. पण छत्रपतीवर, आपल्या धन्यावर, शस्त्र उगारील असा निमकहरामपणा मराठ्याच्या

---

१ यास (सप्तर्षिंचा किल्ला) असें म्हणत. त्यावरूनच **सात + तारा** अगर सातारा असें नांव प्रचलित झालें.

२ फडके नसून थत्ते होता असें ग्रँट डफ म्हणतो. सातारा गॅझेटियर.

हातून होणार नाहीं, अशी बाजीरावाची पक्की खात्री होती. म्हणून त्यानें ही कामगिरी बुढ्या ब्राह्मण सरदाराकडे दिली होती.

माधव रास्त्यास वाटलें कीं, सातारचे महाराज ते काय ? आपण मोठें सैन्य घेऊन चालून गेलों कीं तेव्हांच भेदरतील, व गपचूप किल्ला आपल्या हवालीं करतील ! या भरंवशानें तो महाराजांवर चाल करून गेला. प्रत्यक्ष झटापट झाली, तेव्हां त्याला अनुभव मात्र उलट आला. चतुरसिंग राजे भोसले याच्या अधिपत्याखालीं महाराजांची फौज छोटीच होती. पण तिच्या-वर यलेजी मोहिते, सेनाजी मोहिते, कुशाबा महाडीक, दुर्गोजी महाडीक वगैरे तरुण, महत्वाकांक्षी व स्वाभिमानी अंमलदार होते. त्यांनीं पहिल्याच सलामीला रास्त्याची त्रेधा उडविली ! रास्त्याला पळतां भुई थोडी झाली. पराभव पावून तो पळून मालगांवास जाऊन राहिला. या विजयानें महा-राजांना व त्यांच्या सैनिकांना विशेष हुरूप आला. त्याबरोबर त्यांचें मनो-राज्यही पण बळावलें.

रास्त्याचा पराभव झाल्यावर रास्त्यानें बाजीरावास पत्र लिहिलें व परशराम-भाऊ पटवर्धन आपल्या मदतीस दिला तरच किल्ला घेतां येईल असें कळविलें. दौलतराव शिंदे बाजीरावाजवळ होता. पण त्याच्यावर ही कामगिरी सोंप-विण्यास बाजीरावास धीर होईना. ब्राह्मण सरदारांकडूनच त्यास छत्रपति कैद करावयाचे होते.

पुण्यास राहून दौलतराव शिंदे ही सारी मौज पाहात होता. त्यानें आपला माणूस सर्जेराव घाडगे यास महाराजांकडे पाठवून महाराजांना उत्तेजनच दिलें. ब्राह्मणी अमलाचें जोखड महाराज फेंकीत असल्याचें पाहून आपणांस आनंद होत आहे. महाराजांची परवानगी असल्यास थोडीफार मदत करण्यास आपण तयार आहों. तूर्त ५ पलटणें व तोफखाना पाठविण्याचा आपला विचार आहे, असें दौलतराव शिंद्यातर्फे त्याच्या माणसानें सांगितलें. शिंदे आपणास मदत करणार ह्या कल्पनेनें महाराजांचे व त्यांच्या परिवाराचें अवसान जास्त बळावलें व ते थोडेसे गाफील झाले !

दौलतराव शिंद्यास महाराजांच्या अनुकंपनीय स्थितीबद्दल कळवळा आला म्हणून, अगर छत्रपति हे दौलतीचे स्वामी म्हणून स्वामीभक्तीची ज्योत त्याच्या अंतःकरणीं प्रदीप्त झाली म्हणून अगर ब्राह्मण पेशवे, ब्राह्मण सरदारा-करवीं ब्राह्मणी वर्चस्वाच्या परिपोषासाठीं मराठा छत्रपतीस बुडवूं पहात होता, म्हणून जातिप्रेम उत्पन्न झाल्यामुळें मदतीची गोष्ट काढली असा जर कोणी तर्क केला तर तो साफ चुकीचा आहे. आजच्याप्रमाणें त्याकाळीं देखील जातिप्रेम मराठ्यांना पूर्ण पारखें होतें. दौलतराव शिंद्याच्या मनांत वरीलपैकीं एकही विचार नव्हता. त्यानें महाराजांजवळ मदतीची गोष्ट काढली, त्याला फक्त एकच कारण होतें. नाना फडणीसाच्या कचाट्यांतून सुटण्याचा जसा बाजी-रावानें यत्न केला; त्याप्रमाणें आपल्याहून बलिष्ट होण्याचा व आपलें वर्चस्व झुगारून देण्याचा बाजीरावाचा विचार असावा असा शिंद्यास संशय आला होता. कदाचित् बाजीराव व महाराज एक झाले, तर बाजीराव आपल्यापेक्षां प्रबल होईल, म्हणून त्यांच्यामध्यें बिघाड उत्पन्न व्हावा या कुटिल बुद्धीनेंच दौलतरावानें महाराजांना मदत करतों अशी थाप मारली व तो स्वस्थ बसला.

रास्त्याकडील पराभवाचें वृत्त बाजीरावास कळलें तेव्हां परशराम पटवर्धन वाईस मांडवगडावर कैदेंत होता. त्यानें आपणास बंधमुक्त केल्यास किल्ला घेतों असें कबूल केलें. बाजीरावाच्या अनुमतीनें रास्त्यानें त्यास बंधमुक्त केलें. सैन्य जमा करून भर पावसांत पटवर्धन साताऱ्यावर चाल करून आला.

रास्त्याचा पराभव केल्यावर सातारची मंडळी जरा गाफील राहिली, त्याला कारणही पण होतें. पावसाळ्यांत पराभूत झालेला रास्ते साताऱ्यावर चालून येणार नाहीं अशी त्यांची पक्की खात्री होती. शिवाय सातारा शहराची निसर्गा-

---

१ दौलतराव शिंद्यानें हें तडजोडीचें बोलणें महाराजांचा गुप्त एजंट बापू कान्हो याजबरोबर केलें. त्यावेळीं कागलकर सर्जेराव घाडगे व निपाणकर शिदोजीराव निंबाळकर हे हजर होते असें—बापू कान्हो याचे बखरींत असल्याचें ग्रँट डफ लिहितो. भाग ३ पान १५८.

नेंच तटबंदी केली आहे. पश्चिमेस **यवतेश्वरानें** पाटभिंतीसारखी तटबंदी केलेली. उत्तरेस **वेण्णा** नदी व पलीकडे **आरळे फाटा.** पूर्वेस **कृष्णानदी** व दक्षिणेस **उरमोडी** नदी. पावसाळ्यांत पूर आला म्हणजे या नद्यांना उतार मिळणें अशक्य. ज्या काळाचा आपण विचार करीत आहों, त्या काळीं, तिन्ही नद्यांवर एकही पूल नव्हता. त्यामुळें पावसाळा संपेपावेतों शत्रूचा हल्ला साताऱ्यावर येणार नाहीं, अशा भरंवशावर महाराजांनीं आपल्या सैनिकांना शेतावर जाण्यास परवानगी दिली होती.

पटवर्धनाच्या सुदैवानें त्याला वेण्णा नदीस वर एका ठिकाणीं उतार सांपडला. रात्रौ त्या उतारानें परशुरामभाऊ १२००० सैन्य घेऊन साताऱ्यावर चालून आला; व त्यानें अकस्मात् शहरावर हल्ला चढविला (२५-६-९८). पावसाळचे दिवस असल्यामुळें, महाराजांनीं नवीन उभारलेल्या सैन्यांतील शिपायी शेतावर कामास गेले होते. पटवर्धन अकस्मात् चालून आल्यामुळें; महाराजांना लवकर सैन्य जमवितां आलें नाहीं. पटवर्धनाच्या अफाट सैन्यापुढें महाराजांनीं जमविलेले १०००।१२०० सैनिक अगदीं थोडके होते. तरीही शत्रूशीं दोन हात करण्याची हिंमत **चतुरसिंग भोसल्यानें** सोडली नाहीं. परंतु पटवर्धनाच्या १२००० सैन्यापुढें, बेसावध स्थितींत असलेल्या चतुरसिंगाच्या १००० हजार सैनिकांचा निभाव लागावा कसा ? शिवाय महाराजांचा बचाव करावयाचा होता; व किल्लाही राखावयाचा होता; म्हणून माघार घेऊन किल्ल्यांत शिरणें अगत्याचें होतें. चतुरसिंगानें आपल्या सैन्यास त्याप्रमाणें शिस्तीनें माघार घेण्याचा हुकूम दिला.

किल्ल्याखालीं जी चकमक झाली, त्यामध्यें **यलोजी** ठार झाला. **सेनाजी मोहिते** तरुण पोरगा. माधव रास्त्याच्या सेनापरिघांत तो सांपडला होता. व्यूहभेद करण्याचा त्यानें फार प्रयत्न केला. परंतु प्रचंड फौजेपुढें एकट्याचें काय चालतें ? इतक्यांत माधव रास्ते **सेनाजी**च्या दृष्टीस पडला. रास्त्यास पहातांच तितक्याही लोकांतून सेनाजीनें रास्त्यावर चाल केली व द्वंद्वयुद्धास आव्हान केलें. पण तें स्वीकारण्याचा मर्दपणा त्या ब्राह्मणांत कोठला ? रास्त्यानें पळ

काढला ! इतक्यांत त्याच्या सोबत असलेल्या पटवर्धनी सैन्यानें चान्ही बाजूंनीं सर्व प्रकारच्या शस्त्रास्त्रांनीं हल्ला चढविला. बाल अभिमन्यूला कौरवसेनेनें वेढून जसें मारलें त्याप्रमाणें माधव रास्त्यानें आपल्या सैनिकांकरवीं त्या तरुण मराठा मर्दास ठार केलें व त्याचे तुकडे तुकडे केले.[1]

चतुरसिंग भोसल्याच्या हुकमाप्रमाणें, महाराज व त्यांची मंडळी, यांना किल्ल्यावर पोहोंचविल्याचें समजतांच बाकीचें सैन्य किल्ल्यांत शिरलें. इकडे सारें शहर परशुरामभाऊस मोकळें मिळालें ! एखाद्या पुंड पाळेगाराप्रमाणें त्यानें तें मनसोक्त लुटलें ! पैसा उकळण्यासाठीं त्यानें शहरवासीयांवर अनंत प्रकारचे अत्याचार केले. शेट, सावकार, कुलीन, घरंदाज म्हटलें नाहीं; सर्वांना छळ-छळून त्यांच्याकडून पैसा काढला. अशी शहरवासीयांची परोपरीची विटंबना केली. पण याबद्दल इतिहासांत कुठें अवाक्षर तरी आहे का ?

आपल्याजवळच्या थोड्या सैन्याच्या बळावरही किल्ला लढवितां येईल असा सेनापती चतुरसिंगास भरंवसा होता; परंतु लढाईचा प्रसंग इतक्या लौकर येईल अशी अटकळ त्यांना आगाऊ नसल्यामुळें किल्ल्यांत दाणागोटा अगर दारूगोळा जमा करून ठेवलेला नव्हता. त्यामुळें थोड्याच दिवसांत महाराजांचे फौजेवर उपासमारीचा प्रसंग येऊन ठेपला. महाराजांनीं देखील किल्ल्यामध्यें कोंडून घेण्याचा अविचार केला नसता. त्यांना कोल्हापुराहून मदत मिळेल अशी अपेक्षा होती; व कोल्हापूरच्या शिवाजीमहाराजांनीं त्यांना तसें अभिवचनही दिलें होतें. वचनाप्रमाणें महाराजांकडील निरोप येतांच अष्टे, कामेरी मार्गानें शिवाजीमहाराज कांसेगांवीं येऊन दाखल झाले. कासेगांवच्या देशपांड्यानें फारसा त्रास दिला नाहीं. पण कोळेकर पेशव्यांचा पक्षपाती होता, व कराड प्रतिनिधीच्या ताब्यांत होतें. तेही ब्राह्मण. त्यांनीं प्रथम कृष्णापार तुमच्या फौजा पोंहोचवितों, असें कबूल केलें. पण लबाडीनें दिरंगाई करूं लागले. तेव्हां सुपण्याजवळ कोयना पार जाण्याचा

---

१ ग्रँट डफ भाग ३ प्र० ८ पान १६० ‘ बा. प्र. मोडक ९५ ’.

२ मराठी दप्तर रुमाल १ ला.

उपाय तेवढा शिल्लक राहिला. परंतु **कोळयाच्या** देशपांड्यानें व **वसंतगडावरील** फौजेनें **कोयने**च्या पलीकडे त्यांना जाऊं दिलें नाहीं. त्यामुळें करवीरकर छत्रपतींची मदत महाराजांना मिळूं शकली नाहीं. तेव्हां मग महाराजांनीं पटवर्धनाशीं बोलणें लावलें व किल्ला त्याचे स्वाधीन केला. (ता. २८।८।१७९८).

किल्ला पटवर्धनाचे ताब्यांत देण्यापूर्वीं कांहीं निवडक सैन्य घेऊन **चतुरसिंग** भोसले निघाला, तो थेट कोल्हापुराकडे चालता झाला. पटवर्धनानें **चतुरसिंगाला** पकडण्यासाठीं त्याचा पाठलाग केला, पण त्याला यश आलें नाहीं.

सातारचा किल्ला घेतल्यानंतर महाराजांना किल्ल्यावरच ठेवण्यांत आलें. त्यांच्याकरितां बाजीरावानें एक वाडा बांधून दिला. हा वाडा अद्याप बऱ्याच दुरुस्त स्थितींत किल्ल्यावर पाहावयास मिळतो. त्या वाड्यांत, पाहिजे तर तुरुंगांत म्हणा, **दुसरे शाहूमहाराज** मरेपावेतों राहिले. नानाचा बंदोबस्त केल्यावर, आपण अमूक करूं, तमूक करूं, म्हणून बाजीरावानें जीं अभिवचनें दिलीं होतीं, तीं त्यानें कितपत पाळलीं हें दिसतेंच आहे! उलट महाराजांचे बाबतींत पेशव्यानें आतां पूर्वीपेक्षां फौजेचा कडेकोट बंदोबस्त केला होता. महाराजांना सहाय्य करील अशी कोणतीच सत्ता नव्हती. जे होते, ते पेशव्यांचे सारथी! अखेर स्वातंत्र्यासाठीं तळमळत सातारच्या पुराणप्रसिद्ध किल्ल्यावर, स्वतःच्या **नोकराच्या कैदेंत, छत्रपति आबासाहेबमहाराजांनीं** इहलोकची यात्रा वैशाख शु॥ ९ शके १७३० म्हणजे सन १८०८ मध्यें संपविली !

———

१ जास्त माहितीसाठीं ऐतिहासिक संग्रह. कलम ५६७०, ५४०७ वगैरे पहा.

प्रकरण ५ वें.

बालपण.

प्रतापसिंहमहाराज जन्मल्यापासून सन १८०८ पावेतों, महाराष्ट्रमध्यें कोणत्या प्रकारची राज्यक्रांति चाललेली होती, व त्या क्रांतीमध्यें सांपडून त्यांना त्याच्या वडिलांबरोबर साताररच्या किल्ल्यांत आपल्याच नोकराचे, कसे कैदी व्हावें लागलें, यासंबंधी कांहीं हकिकत मागील प्रकरणांत आलेली आहे. **प्रतापसिंह** महाराजांचे वडील वारले, त्यावेळीं त्यांचें वय सुमारें १४ वर्षांचें होतें. रिती-प्रमाणें त्यांना राज्याभिषेक झाला. त्यासंबंधाचें वर्णन त्याकाळच्या कोणा पुण्याच्या लेखकानें केलेलें **लोकहितवादी** यांना उपलब्ध झालें होतें. त्यामधील कांहीं बंद हरवले, पण जे सांपडले, त्यांतील मजकूर मनोरंजक वाटल्यावरून यापुढें देत आहोंत.

"स्वस्ति श्री राज्याभिषेक शके १३५ विभव नाम संवत्सरे वैशाख शु॥ ९ बुधवारीं सु॥ समान मैया तैन व अलफ क्षत्रियकुलावतंस श्री राजा शाहू छत्रपती यानीं कैलासवास केला. त्यास पुत्र चार (?) ज्येष्ट प्रतापजी राजे किल्ल्या-वरून महाराजास माहुलीस आणोन समागमे येऊन सार्थक केलें. नंतर सातवे दिवशीं आपण जाऊन मा × × × भोसले क्रिया करणार त्याचे हातीं क्रिया करविली. दहा दिवस जाहले, दहावे दिवशीं तिघे पुत्र जाऊन विधि जाहाला. तीन दिवस गेले. दानधर्म वगैरे यथासांग राजश्री बाजीरावसाहेब प्रधानपंत याजकडून बाबूराव कात्रे येऊन पेशजी राजाराम साहेब यांचा बेहडा खर्चाचा नक्त सिवाय हत्ती घोडे सामान होते त्याजकडून अधिक दाहा हजार रुपये लावून धर्म केला. तेरावे दिवसी वाईस बाजीराव गेले. सातवे दिवशीं त्रिंब-कजी डेंगळे गेले. मुरारजी एवले पुढें आले व चिंतोपंत देशमुखहि आले,

त्रिंबकजी किल्ल्यावरी जाऊन मुहूर्त अमृतासिद्धीयोग श्राद्ध आटोपून राज्याभिषेक सिंहासनारूढ आजच व्हावें असा निश्चय करून वैशाख व।। ७ इंदुवासर श्रावण नक्षत्र शके मजकुरी दोन प्रहरपर्यंत श्राद्ध वगैरे तो विधि उरकोन महाराजास मंगलस्नान करून पुण्याःवाचन बसवून होमास प्रारंभ जाहाला. होम समाप्त जाहल्यावरी महाराजास उदक अभिषेक तेथें जाहाला. नंतर पुन्हा मंगलस्नान होऊन दुसरे पुण्याःवाचन सिंहासनारूढ होण्याचे ते होऊन श्रीदेवास वस्त्रे व ऋत्विजास देऊन सिंहासनापासी आले. हस्तावर सुवर्णाची विष्णु प्रतिमा स्थापोन पूजा जाहाली. नंतर महाराजांचे आंग देवता स्थापोन सिंहासनाची पूजा जाहाली. शुभ्र वस्त्रें पोषाख परिधान करून आणखी सिंहासनाखालीं अभिषेक सुवर्णकलशांत उदक गंगादि आणोन घालोन ऋत्विज सुवा + + + (पुढें एक बंद मजकूर गहाळ) + + + + + सिके याप्रमाणें सायंकाळचा दोन घटका दिवस राहतां देऊन च्यार घटका रात्रीस सर्व मंडळी किल्यावरून खालीं आली. प्रतापजी राजे नांव होतें, परंतु शाहू राजे ठेवावें एविसी बाजीराव यांची आवड त्याजवरून शाहू माहाराज नांव ठेऊन साकरा वाटल्या. सिकेही नूतन तसेच केले. वैशाख व।। ८ मंगळवारीं स्वारी महाराजांची उतरली. इंदुवारी रात्रीस वाईस बाजीराव यांजकडे त्रिंबकजी चिंतोपंत जाऊन वस्त्रे बहुमान देऊन उजेडावयास परत शहरांत आले. नंतर माहाराजांस आणिलें. तेच दिवसी निश्चय लग्नमुंजीचा करून आमंत्रणास पुरुषोत्तमराव पंडित अमात्य व पंडितराव मल्हार रामराव चिटणीस याजकडून करविलीं. शहरांत वगैरे जाऊन केलीं. नंतर देव–देवक–स्थापन तेच दिवसीं जाहालें. दशमीस जानवें घातलें. महाराजांचा लग्नाचा निश्चय करून रतनराव मोहिते कुटुरकर यांची कन्या वधू नेमस्त करून वद्य एकादशीस लग्नसमारंभ माहाराज रंगमहालांत नेले. इकडे वाड्यांत नवरीचे देव–देवक दुसरे कडे बसवून बहुले वगैरे एथे श्रीमंत पूज्यन हरिद्रा वाङ्निश्चय तेच दिवसी होऊन नवरा न्यावयास स्वारी तयार करून त्रिंबकजी डेंगळे एऊन हत्तीवर अंबारींत बसोन बहुत समारंभाने शनवारचे मारुतीस जाऊन वाड्यांत आले. गोधुळ

लग्न जाहाले. दोन दिवस मेजवान्या, ब्राम्हणभोजन वगैरे होऊन साडे त्रयोदशीस पूर्व रात्रीस जाहाले. कारखाने ज्याचे त्याणे केले व परवानगी जाहाली, नांव सौ० **अंबिकाबाई** ठेविली. शर्करा सर्वांस वाटल्या. चतुर्दशीस लग्न समारंभाच्या मेजवान्या जाहाल्या. ज्येष्ट शु॥ प्रतिपदेस माहाराजांची स्वारी मातुश्री आईसो माईसो सह घेऊन किल्ल्यावर गेले. स्वारी पोहोचून त्रिंबकजी डेंगळे किल्ल्याखालीं एऊन श्रीमंताकडे वाईस गेले. त्रितीयेस रात्रीं उजेडता फिरोन त्रिंबकजी तात्या सातारियास आले. स्वारीची तयारी करून किल्ल्यावर जाऊन आईसाहेबास ठेऊन महाराजांसह सर्वांस घेऊन शहरांत आले. पंतप्रधान चतुर्थी रविवारी माहुलीस आले. शुद्ध पंचमी इंदुवारी दाहा घटकेचा मुहूर्त राजश्री स्वामीचें दर्शन घ्यावयाचें सबब **पोहईवर** प्रधान पंती भेटी घेतली. स्वारी समारंभेकरून आइनेचे अंबारींत बसोन खवासखान्यांत चिंतोपंत देशमुख बसोन एऊन जिलिबी स्वार लोक वगैरे तयारीनसी आले. शहराचे नागरीक लोकही पाहावयास बहूत आले. प्रधानपंत निघोन तेही मार्गी एतां अंबारींत राजश्रीस पाहून बिनीवाले यांच्या विहिरी नजीक घोड्यावरून उतरोन चरणी जोडा न घालतां कुरनसात करून एते जाहाले. महाराजांनी पंतास पाहून हत्तीं बसविला. पालखी लाऊन उतरल्यावर प्रधानपंत जवळ एऊन चरणावरो डोई ठेविली, महाराजांनीं पुढें हस्त करून वरचेवर धरले. बहुत आदबेनें माहाराजां पाठीमागें चालोन बागांत चांदणी देऊन बैठक केली. तेथें जाऊन बसोन नजर पंतांनीं केली. त्यांस भरगच्ची चादर आंगावर घातली, नंतर जीवनराव पंडित सुमंत याणी नजर केली. त्याजलाही चादर घातली. क्षणैक बैसोन स्वारी उठोन आइन्याचे अंबारींत महाराज बसले. खवासखान्यांत बाजीराव बसोन मोर्चेल घेतले. दुसरे अंबारींत भाऊसाहेब अप्पासाहेब बसले. खवासखान्यांत चिंतोपंत देशमुख बसोन स्वारी चालती होऊन दोन प्रहरानंतर राजवाड्यांत आले. नजरा पंडित प्रधान सुमंत याणी मात्र येथें केल्या. वरकड मानकरी

यांच्या नजरा मना करून स्वारी आलियावरी सभेस मुजरे यथाविधी सर्वांची जालियावरी महाराज व पंडित प्रधान मातुश्री माईसाहेब यांजकडे गेले. नजरा करून बसले. आगतस्वागत बोलणें होऊन प्रधानपंत आपले वाड्यांत जातांना आपले अंगावरील पोषाक मंदिल कंठी मोत्याची व शिरपेच तरवार दिली. याजवरी नजर करून तोच पोषाख अंगावर घेऊन इकडील तिकडे तिकडील इकडे गेलीं.

दुसरे दिवसीं छ ५ र॥ खर ज्येष्ट शु॥ ६ भौमवारी पंडित प्रधान याणी आपलेकडील सरदार व राजमंडळ अमात्य पंत आदिकरून मराठे मंडळीस ताकीद होऊन राजवाड्यांत सभा केली. पंतप्रधान सर्वांपूर्वी जाऊन सभेंत बसोन सिंहासनास मुजरा करून मातुश्री माईसाहेबाजवळ महाराज होते तेथें जाऊन माहाराजांस घेऊन आले. माहाराज सभेंत आल्यावर सिंहासन सव्य घेऊन तक्तास मुजरा करून सिंहनसारूढ होऊन बसले. मग श्रीमंतानीं नजर करून मुजरा केला. पायावर डोई ठेऊन सिंहसनापाठीमागे मोर्चेल धरून उभे राहिले. पुरुषोत्तमराव पंडित अमात्य याणी मुजरे करून दुसरे मोर्चेल धरले. उभे राहिले त्यावर मानकरी यांच्या नजरा चालत्या जाहाल्या. नजर भीमराव विठ्ठल खासनीस पोतनीस याणी उचलोन तात्या जोशी पोतदार याजकडील कारकुनाजवळ पारखावयास देऊन जमादार बाळू याजजवळ दिली. जामदार-खान्याकडील शेले दुपेटे वगैरे घालावयाचे चिंतोपंत देशमूख याणी नेमणूक करून दिली. सनगे जमदार नि॥ कारकुनानि रघुनाथ लक्ष्मणराव चिटणवीस मुसरीफ जामदारखान्याचे ते प्रसंगीं नव्हते सबब नरहर मल्हारराव चिटणवीस याजजवळ द्यावे, त्याणी माहाराजाचा हात लाऊन आंगावर घालावे याप्रमाणें सर्वांस सनगे दिलीं. शेवटीं पंत आमात्यास चादर दिली. समया दिवे लावले म्हणून पंत प्रधान याणी मुजरा करून तक्तामागे मोर्चेल धरिले. नजरा शेले समाप्त जाहाल्यावर सभेस घटका अर्धघटका बसोन मातोश्री माईसाहेब बालोऊ माहाराजास गेले. समागमे पंत प्रधान गेले. वाड्यांत हवदावरी संध्या करून फराळ केले. च्यार साहा घटका रात्रीं माहाराजांचा निरोप घेऊन निघोन सभेंत

एऊन पंत अमात्य व पंत सुमंत वगैरे मानकरी सर्वांस नरहर मल्हारराव चिटणवीस याजकडून विडे देविले नंतर सर्व आपले घरोघर गेले. मिठाई पंत प्रधानास पाठविली. समागमे विठलपंत फडणवीस व कामाठे दिल्हे ते त्यास पंतानीं वस्त्रें दिलीं.

तिसरे दिवसी छ ६ रबिलाखर ज्येष्ट शु॥ ७ बुधवारीं श्रीमंत मातुश्री माई-साहेब याणी प्रधास पंतास मेजवानी केली. मिठाई फराळ जाहाल्यावरी थोरले कचेरी बाहेर जाहाली त्यांतून प्रधानपंत व सुमंत जीवनराव व अमात्यपंत व मल्हारराव चिटणवीस व पंडितराव व बापू देव वैद्य व महाराजांचे सासरे यांचे बंधू दोघे व परसोजी भोसले वावीकर व तात्या जोशी पोतदार याजपैकीं लक्ष्मणपंत राजमंडळपैकीं व पंतप्रधान यांजकडील शास्त्री साहा असामी व अन्याबा रहातेकर व सासरे ढमढेरे बापू कवडी वाईकर रास्ते सासरे वगैरे पंचवीस तीस असामीस आंतील कचेरीस आमात्यास सेला पागोटें पंतसुमंतास सेला आणि चादर दिली. पंडितराव गोपाळशास्त्री यास मल्हार रामराव चिटण-वीस आदिकरून राजमंडळ व पंताकडील असामीस सेले पागोटीं देऊन विडे गुलाब अत्तर लवंग दिली. याजवरी निरोप दिल्हा तसेच बाहेरचे कचेरीस न बसतां निघोन प्रधानपंत आपल्या वाड्यांत गेले.

चवथे दिवसी छ ७ रबिलाखर ज्येष्ठ शु॥ ८ गुरुवारीं माहाराज व पंडित प्रधान यांची स्वारी माहुलीस गेली. कैलासवासी शाहूमहाराज यांचें दर्शन घेतलें. दक्षिणा फळें वाहिल्यावर प्रधानपंत श्रीकृष्णास्नान करावयास गेले. माहाराज समागमे माहुलीचे पश्चमेस कळकीचे बागेंत गेले. मातुश्री माईसाहे-बानीं संगमीं स्नान केलें. पंतप्रधान यांची पाकशाळा मळ्याचे पश्चमेस प्रारंभ जाहाला. माहाराजांची रसई पूर्वेस साधी होती. माहाराजांची स्वारी आलीसी पाहून कळकीपासून पायउतारा जोडा ठिकून डेऱ्यापर्यंत एऊन मुजरा करून स्वयंपाकाची सिद्धता रांगोळ्या पत्रावळी पाट मांडले पाहून फिरोन गेले. स्नान करून माहाराज भोजनास बसल्यावर आपण भोजनास बसले. भोजन जाल्यावरी त्रिंबकजी डेंगळे याजबरोबर माहाराजास विनंति पाठविली, च्यार घटका शयन

करावें. मजलाही आज्ञा जाहाली तर मीहि करीन नाहीं तर मर्जी असल्यास स्वारी सिद्ध आहे निघावें म्हणून निरोप गेला रायाची मर्जी असेल तसें करावयाचें. रायानी च्यार घटका निजावें. आम्हांस दिवसा निजावयाची संवय नाहीं. शयन करतो म्हणून उत्तर गेल्यावर पंतप्रधान निजले. अमात्य सुमंत चिटणवीस व सरदार आले. त्याणी ज्याचे शरीरास सुखावह वाटेल तसें शयन केलें. खासा दीड प्रहर दिवस राहतां माहाराज लक्ष्मी घोडीवर बसोन फेरली. घोडीची झाड भारी त्यांत मोत्याची कंठी तुटली. ते डावे हातें धरून खिजमतगाराजवळ धावतांना दिली. एक मोती गमावलें तें दुसरें खिजमतगार पाहू लागले. त्यास महाराजांनी ताकीद केली कीं गमावले तरी गमावले पाहूं नका म्हणून आज्ञा केली; पाहावयाचे राहिले. मोती गेले तेव्हां बागेचें नांव मोतीबाग ठेवावें. कोणी म्हटलें सारी कंठी गेली असतां मोतीबाग ठेवावयास येतें म्हणोन माहाराज बोलिले. घोडी फेरली हे प्रधानपंती पाहून संतोषी जाहाले. भाऊसो व अप्पासो याणीहि घोडी फेरली. नंतर प्रधानपंत माहाराजांचेकडे जाऊन पोषाख दिल्हा, नंतर स्वारी निघाली. साहा घटका दिवस सायंकाळचा राहतां शहरांत आले. मागी बापू गोखले याणी घोड्यावर बसोन युद्धाची कवाईत दाखविली. इटे पट्टे खेळून दाखविलें. त्यास अप्पासाहेबांनीं बोलाऊन आणून विडे दिले, चांगली घोडी फेरता बोलले. राजमंदिरांत पोहचऊन पंतप्रधान सायंकाळीं आपले वाड्यांत गेले. मातुश्री आईसाहेब किल्यावर होती, त्यास प्रहररात्रीं खालीं आणिली. सामोरे बाजीराई जाऊन वाड्यांत पोहचती केली.

छ. ८ रबिलाखर ज्येष्ठ शु॥ ९ भृगुवारीं राजवाड्यांत माहाराजांचे मेजवानीचे सोयरे लोक व श्रीमंताकडील मानकरी यास जाली. च्यारपाचशे पात्र जालें. भोजनापूर्वीं पंत आपले वाड्यांत होते. बापू गोखले यास निरोपाचीं वस्त्रें देऊन राजवाड्यांत घेऊन आले. राजदर्शनें घेऊन पुण्याःवाचन करून सुमुहूर्तें माहाराजास दाली बांधोन माहुलीस भोजनास पंत गेले. बापु गोखले समागमे जाऊन स्वारी पोहचऊन भोजनास शहरांत गोखले याजकडे बापु देवाचे घराशेजारी आले. श्रीमंत माहुलीहून आपल्या वाड्यांत आले.

माहाराज व मराठे लोक यांचा भोजनाचा समारंभ जाहाला. दाली मुहूर्तेकरून अगोदर बांधिली होतीच परंतु सर्वत्र मराठे लोक याणी आपले हाते माहाराजास दाली घालोन भोजनास उठले. भोजन जाल्यानंतर सर्व मराठ्यांची सभा करून मराठ्यांचे देखत सिंहासनावर माहाराज बसोन दाली बांधोन नंतर पंतांनीं आपले वाड्यांत माहाराजास भोजनास न्यावयाचा बेत करून च्यार घटका रात्रीस राजवाड्यांत श्रीमंत एऊन मुजुमदार सुमंत पंडितराव चिटणीस व पोतनीस यांस पुढें चलावें म्हणोन पंतांनीं सांगोन पाठविलें. ते गेलेयावरी माहाराजांची स्वारींची तयारी करून निघाले. माहाराज व आप्पासाहेब व भाऊसाहेब पालखींत बसोन मोर्चेल राजश्री वर उडत पुढें जिलीब श्रीमंताकडील आली ती चालली. पंत पायउतारा मोर्चेल धरीत वाड्यांत गेले. तिघे बंधू व चवथे चतरसिंग भोसले यांचे चिरंजीव होते. वाड्यांत समारंभ चांगला तक्त नेऊन आपण दशमी म्हणून सायंकाळपर्यंत उपोषित राहून सायंकाळीं माहाराजासह भोजन केलें. आरास बहूतच. सिरा चांगली केली. माहाराजास पोशाख उमदे जडजवाहीर उभयता बंधू सुद्धां दिल्हे हत्ती एक घोडी एक नजर केली. मुजुमदार सुमंत पंडितराव चिटणीस पोतनीस यास साडे तीन सनगे वरकडास सेला–पागोटी तेरा सनगें दिलीं. भोजनास फराळास उठावें म्हणून चिंतोपंताबरोबर निरोप पाठवला. तसेच त्यांनींही अनमानें सांगितलें एक × × ×"
(पुढें दोन चार बंद गहाळ).

बाजीरावानें महाराजांना **शाहू** हें नवें नांव ठेवल्याचा वर उल्लेख केला आहे. परंतु तें नांव महाराजांना अगर माईसाहेबांना पसंत नव्हतें, त्यामुळें कागदोपत्रीं कोठेंहि महाराजांना या नांवानें संबोधिलेलें आढळत नाहीं. राज्याभिषेकसमारंभाच्यावेळीं बाजीरावानें महाराजांपाशीं जी अदबीची वागणूक दाखविली, त्यांत त्याचा हेतु होता. एक तर महाराजांना आपण मालक असें मानतों व सातारच्या किल्ल्यावर ते राहत आहेत, ते धनी म्हणून राहात आहेत;

पेशव्यांचे कैदी म्हणून नाहींत, असें लोकांना भासवावयाचें. दुसरें महाराजांच्या वडिलांना आशेस लावून फसविल्यापासून साताऱ्च्या मंडळीला बाजीराव अप्रिय झाला होता; व ते आपल्या विरुद्ध कांहीं तरी कारस्थान रचित असावेत असा बाजीरावास दाट संशय आलेला होता. म्हणून अशा कारस्थानी मंडळीमध्यें महाराजांनीं सामील होऊं नये, व आपल्याबद्दल महाराजांचें व माईसाहेबांचें मत चांगलें व्हावें, म्हणूनच बाजीरावानें हा सारा मानभावीपणा, हें सारें स्वामिभक्तीचें प्रदर्शन, करून दाखविलें होतें.

इतका जरी देखावा बाजीरावानें करून दाखविला तरी त्याचें व एकंदर पुण्याच्या दरबाराचें धोरण महाराज **प्रतापसिंहांच्या** बाबतींत कुटील असेंच होतें. कारण छत्रपति आपल्या कैदेंत नेहमींच रहावेत असें त्याचें ध्येय होतें. छत्रपतींना कैदेंतच गोडी वाटावी, त्यांच्या मनास स्वातंत्र्याची चटक लागूं नये, म्हणून त्यांना अडाणी, अशिक्षित ठेवण्याचा कसून प्रयत्न चालला होता. **आबासाहेब** महाराजांकडून साताऱ्चा **अजिंक्य तारा** घेतल्यावर बाजीरावानें विसाजीपंत काळूस्कर व काशिनाथपंत बेंद्रे असे दोन कारभारी आपल्या तर्फेचे महाराजांच्या इतमामास दिले. महाराज हयात असतांना सुद्धां या कारभाऱ्यांनीं भावी छत्रपतीस अडाणी ठेवण्याची करतां येईल ती खटपट चालविली होती. छत्रपति शहाणे झाले कीं, आपली स्थिति सुधारण्यासाठीं, म्हणजे स्वतंत्र होण्यासाठीं बंडावा करण्यास तयार होतील. आबासाहेबांच्या बाबतींत बाजीरावास एक वेळ अनुभव आलेला होताच; त्यामुळें छत्रपतींवरील आपली सत्ता अबाधित टिकावी म्हणून छत्रपतीस अप्रबुद्ध ठेवण्याचा बाजीराव वगैरेंचा प्रयत्न चालू होता.

काळुस्कर व बेंद्रे यांनीं महाराजांना शिकवणारा मिळूं नये म्हणून प्रथमपासून तजवीज करून ठेवलेली. शिवाय पेशव्यांच्या भीतीमुळें महाराजांना शिकविण्याची कामगिरी कोणीही पत्करीना. महाराजांच्या आप्तमंडळीला, सग्या-

सोयऱ्यांना देखील पेशव्यांचा वचक फार होता. त्यामुळें उघडपणें शिक्षक ठेवून प्रतापसिंहमहाराजांना शिकविणें अगदीं अशक्य होतें ! आबासाहेबमहाराज एवढ्या मोठ्या मराठेशाहीचे मालक, पण राजपुत्रांना शिकविण्यासाठीं उघडपणें शिक्षक ठेवण्याची त्यांना केवढी चोरी !

पण आबासाहेब महाराज व महाराणी आनंदीबाई हीं उभयतां चांगलींच राजकारण जाणणारीं होतीं. छत्रपतींच्या घराण्याची ख्यातीच अशी आहे कीं, त्या घराण्यांतील स्त्रियाही राजकारणांत वाकबगार अशा निपजल्या ! शिवाजी-महाराजांची आई **जिजाबाई**, महाराणी **सईबाई**, संभाजी महाराजांची राणी **येसूबाई** राजाराम महाराजांची राणी **ताराबाई**, व शाहू महाराजांची राणी **सकवारबाई** ह्यांनीं राजकारणांत चांगलाच लौकिक मिळविला होता. महाराणी आनंदीबाई ह्या देखील चांगल्या कुशल राजकारणी होत्या. त्यांच्या शहाणपणाबद्दल व चातुर्याबद्दल इंग्रज अधिकाऱ्यांना देखील विस्मय व आदर वाटे. ही महाराणी धीट होती. घोड्यावर बसण्यांत पटाईत होती. तशीच ती चांगली शिकलेली सवरलेलीही होती. आबासाहेब वारले तेव्हां तिचें वय सुमारें ३५ वर्षांचें होतें ! तथापि पडदा पाळून, दडून अगर घरांत कोंडून घेऊन बसण्याची वेडगळ चाल तिनें तेव्हांच सोडली ! इंग्रज ऑफिसरांबरोबर अगर इतर राजकारणी मुत्सद्यांबरोबर राजकारणी मसलती करावयाच्या त्या ती स्वतः करी.

---

१ The queen mother managed her horse with greatdextirity. She bore the traces of great beauty, wore a rich dress of embroidered muslin...She did not conceal her face and was both familiar and talkative with such officers as approached her. She had none of that timidity, which one naturally supposes to belong to Hindu ladies...In short she appeared to be a woman, possessed of much natural ability and greater presence of mind. She was intelligent, spritly and beautif ul

Fifteen Years in Satara.

राजमाता स्वतः धोरणी, महत्त्वाकांक्षी व हुशार असल्यामुळें बाजीरावाचा डाव तिनेंही ओळखला होता. राजपुत्रास अशिक्षित, अडाणी ठेवतां नये हें तिच्या मनानें पक्कें घेतलें होतें. पण उघडपणें राजपुत्रासाठीं शिक्षक ठेवणें शक्यही नव्हतें. पण राजमाता मोठी कल्पक होती. आपला कार्यभाग बिन-बोभाट करतां यावा अशी बिनतोड युक्ति तिनें शोधून काढली.

'या निशा सर्व भूतानां तस्यां जागर्ति संयमी' बाल छत्रपतीचें बाबतींत देखील कांहीं वर्षें असेंच चाललें होतें. ज्या वेळीं सारें जग विश्रांतिसुखाचा अनुभव घेत निद्रेंत गुंगून पडलेलें असे, अशा वेळीं म्हणजे रात्रौ २–२॥ च्या सुमारास राजमातेनें बाल छत्रपतीस जागे करावें, मुखमार्जनादि करवून भवानी मातेचें स्मरण करावयास लावावें, व नंतर त्यास वाचावयास व लिहावयास शिकवावें ! पहाटचा चौघडा सुरू झाला कीं पुनः बाल छत्रपतीस झोंपवावें. कारण काय, तर जवळपासच्या चाकर नोकरांना देखील, बाल छत्रपतींना शिक्षण दिलें जात आहे, या गोष्टीचा सुगावा लागूं नये ! सारांश प्रस्तुतच्या आपल्या चरित्रनायकाला अशा प्रकारें चोरून शिकावें लागलें ! ज्या पुण्यश्लोक शिव-रायानें हिंदवी स्वराज्य स्थापन करण्यासाठीं आपल्या जीवाकडे पाहिलें नाहीं, ज्याचा विक्रमशाली पुत्र, महाराज छत्रपति संभाजी, हिंदुधर्मासाठीं प्रत्यक्ष काळाच्या जबड्यांत बिनघोर शिरला, ज्याचा कनिष्ठ पुत्र राजाराम मराठे-शाहीच्या रक्षणासाठीं बैराग्याच्या वेशानें वणवण जिंजीपावेतों हिंडला, अनंत हालअपेष्टा सोसल्या, त्याच नरपुंगवाच्या वंशजास आपल्या स्वतःच्या राज्यांत शिकण्याची देखील चोरी असावी ? पेशव्यानें छत्रपतींची अशा प्रकारची शोचनीय स्थिति केल्याचें वाचून कोणाचें अंतःकरण कढणार नाहीं ?

विद्यादेवीच्या मंदिराचीं कवाडें बाल छत्रपतीच्याच बाबतींत बंद करण्यांत आलीं होतीं असें नाहीं; तर मराठे जहागिरदार, इनामदार, देशमुख वगैरेंच्या बाबतींतही तीं बंद केलीं होतीं. म्हणजे पेशव्यानें फर्मान काढून बंदी केली होती असा अर्थ नव्हे, तर बंदी युक्तीनें झाली होती.

ब्राह्मणी धर्माप्रमाणेंच पाहिलें, तर ब्राह्मणांनीं **अध्ययन** = स्वतः शिकणें व **अध्यापन** = शिकवणें हीं कामें करावयाचीं. द्रव्यार्जनाच्या मार्गास त्यांनीं लागावयाचें नाहीं. व म्हणूनच मोठमोठ्या दक्षिणा देऊन क्षत्रिय-वैश्यादि वर्णांनीं त्यांना पोसावयाचें. शिवाजीमहाराजांना पिंगळे, हणमंते वगैरे अनेक ब्राह्मण वीरांनीं साहाय्य केलें होतें. महाराजांचा मुख्य प्रधान ब्राह्मण. बाकीच्या अष्टप्रधानांतही ब्राह्मणांचेंच संख्याधिक्य. इतरत्रही मोठमोठ्या हुद्यांवर पुष्कळसे ब्राह्मणच होते. असें होतें, तरी राज्याभिषेकसमारंभानंतर महाराजांनीं असें फर्मान पिंगळे—मुख्य प्रधान—यास सोडलें कीं, '**ब्राह्मणास नोकरीवर घेऊं नये.**' शिवाजीमहाराजांच्या राज्यारोहणाचे मिरवणुकीस ब्राह्मण बोडके आडवे आले म्हणून द्वेषबुद्धीनें महाराजांनीं असा हुकूम सोडला असें नव्हे. तर ब्राह्मणांनीं अध्ययनअध्यापन करून आपलें ब्राह्मण्य संरक्षण करावें, व लोकशिक्षणाचें कार्य सोडूं नये, हाच आद्य छत्रपतींचा हेतु होता. आणखी ब्राह्मण जर खरोखर लोकजागृतीचेंच काम करीत रहाते, तर हिंदुस्थानचा इतिहास निराळा बनला असता. ब्राह्मणांचें गुरुत्व प्रत्येकानें कबूल केलें असतें. पण—

पण ब्राह्मणांना राज्यकारभार करण्याची एकदां गोडी लागली, व स्वार्थापायीं मराठ्यांना अप्रबुद्ध ठेवल्याशिवाय आपला निभाव नाहीं, असें त्यांना वाटूं लागलें व म्हणूनच मराठ्यांच्या शिक्षणाची त्यांनीं हेळसांड केली. बाजीराव पडला पंडित; त्यामुळें मोठा कर्मठ. त्याच्या कारकीर्दीत साऱ्या मुलखाचा ब्राह्मण पुण्यास पडलेला. कांहीं कर्तबगार असो नसो, कांहीं पढलेला असो नसो, ब्राह्मण मातेच्या उदरीं जन्म पावल्यामुळें तो पेशव्याला मान्य व्हावयाचा. पंचपक्वान्नाचें आकंठ जेवण झोडावयास मिळावयाचें. शिवाय वर ओगराळेंभर दक्षिणा मिळावयाची. यजमानाची मर्जी पाहून कुटुंबवत्सल गरीब ब्राह्मण आहे, यजमानाचें हिंत चिंतून राहीन, असा अर्ज केला, कीं एखादा गांव देखील इनाम मिळावयाचा. आज सातारा जिल्ह्याचाच प्रकार पहा ! या जिल्ह्यांत मराठे इनामदार २० देखील सांपडा-

वयाचे नाहींत. पण भट्ट इनामदार ३।४ शें तरी सांपडतील ! या साऱ्या भटजींच्या पूर्वजांनीं कोठें तरवार गाजविली होती ? बहुतेक इनामें वर वर्णन केल्या प्रकारचीं. असो. सारांश काय, कीं त्याकाळीं ब्राह्मणांची फुकट चंगळ चाललेली. मग लोकशिक्षणाचें काम ते करतात कशाला ?

शिवाय आमचे मराठे; मग सरदार असोत, वा इनामदार असोत, पहिल्या नंबरचे ऐदी, घमेंडखोर अर्थात् त्यामुळें भोळसट. जराशी त्यांच्या घरंदाजीची प्रशंसा केली कीं ते बेडकाप्रमाणें फुगत. (अजून हा सद्गुण (?) आमच्या मराठा बंधूंमधून नाहींसा झाला आहे असें खात्रीनें सांगतां यावयाचें नाहीं.) स्तुतीनें कोण बिघडत नाहीं ? स्तुतीनें स्तुति करणारा व आपली केलेली ऐकणारा असे दोघेही बिघडतात[1]. आमच्या मराठा समाजाचें तसेंच झालें. जहागिरदार अगर इनामदार मराठा असला, तरी त्याचा कारभारी ब्राह्मण हा ठरलेला. इनामदाराच्या मनांत मुलाला विद्या शिकवावी असा विचार कदाकाळीं आलाच, तर भट्ट कारभाऱ्यानें छोट्या सरकारांची अवास्तव स्तुति करून म्हणावें, छोटे सरकार तरवारबहादूरीसाठीं जन्मले आहेत. त्यांना ही भिकार धूळपाटी कशाला ? हें ऐकल्यावर आमचे सरकार काय विचारतां ? भोळे नंदी. त्यानीं कारभाऱ्याच्या सल्ल्यास मान तुकविलीच. अशा प्रकारें स्वार्थापायीं, आम्हास गाफील ठेवून, आम्हा मराठ्यांच्या कैक लहान मोठ्या दौलती, स्वार्थी कारभाऱ्यांनीं उपटल्या आहेत !

इतिहास शोधूं लागलों तर अशीं अनेक उदाहरणें सांपडतील. हें सारें फळ आमच्या भोळेपणाचें, म्हणजे अडाणीपणाचें. " **आधीं अक्कल जाते व मग भांडवल जातें** " म्हणतात तें खोटें नव्हे !

---

१ "Flattery currupts both the receiver and the giver..."
Burke.

सुदैवानें प्रतापसिंह्महाराजांना सुशिक्षित व समंजस मातापितरें लाभलीं होतीं. प्रतापसिंहाच्या बालपणीं त्याला मातेनें जें सुशिक्षण दिलें, तें जर दिलें नसतें, तर प्रतापसिंहाचें चरित्र लिहिण्याचा प्रसंगच आला नसता. हिरा खाणींत सांपडतो तेव्हां त्याला प्रकाश नसतो, अगर तो डोळ्यांत भरण्यासारखाही नसतो. पण तेंच त्याच्यावर कुशल कारागिरानें योग्य संस्कार केले व छानदार पैलू पाडले, म्हणजे मग तोच सुंदर तेजानें चमकूं लागतो ! माणसाचीही गोष्ट तीच आहे.

ज्या काळचा इतिहास आम्ही लिहीत आहों, त्या काळीं शिक्षणाभावीं मराठे अप्रबुद्ध झाले होते. **ब्राम्हण लोक मराठ्यांना माकडापेक्षां जास्त सुधारलेले समजत नाहींत**[1] असें ग्रँट डफनें लिहून ठेविलें आहे. हें कितपत खरें असेल तें असो. परंतु हें जर खरें धरलें, तर "**वर्णानां ब्राम्हणो गुरुः**" असा टेंभा मिरविणाऱ्यांना त्याबद्दल कांहींच दोष येत नाहीं कीं काय ? आम्हांस तर असेंच वाटतें, कीं मराठे शहाणे होऊं नयेत, व त्यांच्या शहाणपणाला अवसर मिळूं नये म्हणून स्वतःला वर्णश्रेष्ठ म्हणवून घेणाऱ्या या लोकांची, तेव्हां देखील खटपट चालली होती. परकीयांकडे देखील मराठा जातीची निंदा करण्यास ही शिष्ट मंडळी चुकली नाहीं. असो.

प्रतापसिंहमहाराजांच्या शिक्षणाच्या बाबतींत पेशव्यांचें धोरण कशा प्रकारचें होतें, हें वरील हकीकतीवरून वाचकांच्या लक्ष्यांत आलेलें असणा-

---

१ ता. २३।३।१८१९ रोजीं कॅ. जेम्स ग्रँट डफ यानें एल्फिन्स्टन साहेबास साताऱ्याहून पत्र पाठविलें त्यांतील पुढील मजकूर पहा.

"Brahmins, who are certainly the only people of intelligence in this country......look upon Marathas as little better than monkeys, in regard to their ever becoming men of business."

रच. सामाजिक बाबतींतहि पेशव्यांचें व त्यांच्या जातभाईंचें धोरण अनुदारपणाचें व लांछनास्पद असेंच होतें. प्रतापसिंहमहाराजांना कागदोपत्रीं लिहितांना "क्षत्रिय कुलावतंस" असें लिहावयाचें; पण ते मराठे ह्मणून क्षत्रिय नव्हत, असेंहि ह्मणावयाचें. त्या धोरणानें धार्मिक बाबतींत त्यांच्याशीं प्रतारणा करावयाची. त्यांच्या घरचे विधी पौराणिक पद्धतीनें करावयाचे, वैदिक मंत्रांनीं करावयाचे नाहींत. ज्या मराठे वीरांनीं समरांगणावर आपल्या रक्ताचा सडा पसरून, मोंगल सत्तेचा प्रतिकार केला, व चिकटंभट बगंभटादि ब्राह्मणांचें हिंदुत्व व ब्राह्मणत्व राखलें, त्या मराठ्यांस क्षत्रिय म्हणावयास त्या काळचे ब्राह्मण तयार नव्हते. खरें पाहिलें तर ब्राह्मणांचें ब्राह्मण्य नकली ठरेल, पण मराठयांचें क्षत्रियत्व पक्कें व अस्सल असेंच आहे. मराठे व रजपूत हे मूळचे एक. प्रान्तभेदामुळें आचारांत थोडासा फरक असेल पण तेवढ्यावरून ते भिन्नजातीय होत नाहींत.

उत्तर हिंदुस्थानांतील ब्राह्मणांनीं रजपुतांच्या क्षत्रियत्वाविषयीं कधींच शंका प्रदर्शित केली नाहीं. पण दख्खनी ब्राह्मणांना काय अवदसा आठवली कोण जाणे ? त्यांनीं शूद्रकमलाकरांतील 'नंदान्तं क्षत्रियकुलम्।' या वाक्याचा विपर्यास करण्यास कंबर बांधलेली दिसते. तसेंच 'कलौ आद्यंत्ययोः स्थितिः' या भिकार पौराणिक सूक्ताचें अवडंबर ते माजवूं लागले आहेत. या सूक्ताला दुसऱ्या कोणत्याहि ग्रंथांत आधार सांपडत नाहीं. शिवाय हें सूक्त उत्तर हिंदुस्थानच्या ब्राह्मणांना कसें बरें कळलें नाहीं ? पण दुरभिमानी व कृतघ्न ब्राह्मणांना **मराठे राजकारणांत उच्च पदाला गेले असले, तरी सामाजिक बाबतींत आपल्या बरोबरीलाहि आलेले नाहींत,** असें जगाला भासवावयाचें होतें, व अद्यापहि आहे.

केवळ याच दुर्बुद्धीनें ब्राह्मणांनीं **शिवाजीमहाराजांना** राज्याभिषेक करण्याचें नाकारलें. दख्खनी ब्राह्मण महाराजांना क्षत्रिय मानीनात म्हणून गागाभट्टासारखा काशीकर प्रख्यात पंडित मुद्दाम काशीहून आणवावा लागला. अनेक भानगडी कराव्या लागल्या. गरीब मावळ्यांना धोक्यांत घालून

त्यांच्या सहाय्यानें मोठमोठ्या लढाया मारून, अनंत कष्ट सोसून, शिवाजी महाराजांनीं जो अगणित खजिना जमा केला होता, तो उदरंभरू ब्राह्मणांना संतुष्ट करण्यासाठीं उधळावा लागला. तरी देखील या साऱ्या प्रकारच्या सामदामादि उपायांनें ब्राह्मणांचें समाधान झालें नाहींच !

प्रतापसिंहमहाराजांच्या घरचे विधि पुराणोक्त विधीनें करण्यांत व अखिल मराठा समाजाचा शूद्र म्हणून अपमान करण्यांत ब्राह्मणांचा काय बरें हेतु असावा ? मराठे हे शूद्र ठरवून आपल्यापेक्षां हलके आहेत असें म्हणण्यासाठींच हा अट्टाहास नसून त्यामध्यें खोल असें राजकारणहि होतें. मराठे एकदां शूद्र ठरले, कीं त्यांना शिकविण्याची आपली जबाबदारी गेली. त्यांचें शिक्षण बंद करण्यास सोयीचें झालें. तसेंच **आपण हलके आहोंत अशी त्यांची पक्की समज झाली कीं, त्या समाजाचा मनोत्साह पण नष्ट होईल;** व तो समाज मग इतर बाबतींतही खालावत जाईल, असा दूरवर विचार करूनच ते मराठयांना शूद्र ठरवूं पहात होते.

मराठ्यांना ' लोळवूं पहाण्याचा ', त्यांना मानसिक गुलामगिरींत डांबून टाकण्याचा ब्राह्मणांचा मनोदय होता, म्हणूनच ते मराठयांना शूद्र म्हणण्याचा इतका अट्टाहास करीत होते. परंतु या प्रयत्नानें स्वतः ब्राह्मणांचें लवमात्रही हित झालें नाहीं ! त्यामुळें सबंध राष्ट्रावर मात्र विपत्ती ओढवली. प्रो. राजाराम शास्त्री भागवत यांनीं " मऱ्हाठयांच्या संबंधानें चार उद्गार " या पुस्तकांत पुढीलप्रमाणें उद्गार काढले आहेत. " जर महाराष्ट्र ब्राह्मण ब्राह्मणत्वाचा हट्ट धरून क्षत्रियांस लोळविण्यास पाहतील, तर ... ... क्षत्रियच त्यांस उलट लोळवून टाकतील. " (पान १८४) हे विचार पांढरपेशामध्यें (classes) मोडणाऱ्या ब्राह्मणबंधूंनीं ध्यानांत घेतले असते, तर महाराष्ट्रामध्यें जातीद्वेषामुळें जी दुही माजून राहिली आहे, ती खास राहती ना.

बाल छत्रपतींना १८०८ मध्यें जो राज्याभिषेकसमारंभ करण्यांत आला तो पुराणोक्त मंत्रांनीं करण्यांत आला. या गोष्टींत विशेष इतकाच कीं, सवड मिळाली

कीं शूद्रत्वाचा ठसा मराठ्यांच्या—मग तो अन्नदाता धनी असला तरी त्याच्याहि—कपाळावर उठविण्यास ब्राह्मणी हृदय कसें तयार असतें, तें पहावयास मिळतें. खरें म्हटलें तर वेदोक्त काय, किंवा पुराणोक्त काय, दोन्ही सारखींच, न समजण्यासारखीं, क्लिष्ट. पण तसा पंक्तिप्रपंच ब्राह्मण बुद्धिपुरःसर करीत असल्यामुळें स्वाभिमानी माणसाला चीड येणें साहजिक नाहीं काय ?

केवळ **प्रतापसिंहांच्याच** बाबतींत असा खोडसाळपणा बाजीरावानें केला असें नव्हे, तर दुसऱ्या शाहूमहाराजांचें लग्न, मुंज वगैरे विधि पुराणोक्त विधीनें करण्याचा परिपाठ शाहाणा म्हटला जाणाऱ्या अर्धवट नानानें केला. यासंबंधीं पुढील पत्र साक्ष देतें.

श्री.

राजश्री बाबुराव स्वामीचे शेवेसी

"“विनंती उपरी तुम्हीं पत्रें पाठविलीं ती पावलीं. राजश्री स्वामी यांची मुंज्य वैशाख व॥ ५ मीस ८ घटकांचे मुहूर्तावर समारंभेकरून जाहाली. पुढें लग्नाचा समारंभ उत्तम जाहाला पाहिजे. ५।७ दिवस अवकाश असावा याजकरितां ज्येष्ट शु॥ २ स लग्नाचा तिथिनिश्चय केला आहे. पुराणोक्त विधीनें मुंज्य जाहाली. येणेंकरून बाईसाहेब आदिकरोन सर्वांस संतोष वाटला. किल्याखालीं उतरावयाचा मुहूर्त द्वादशीस योजला आहे. त्यास २०० स्वार चांगले, समागमे येक कारकून **प्रमाणिक** असे मुहूर्तापूर्वी येथें लौकर पाठवावे. आज्ञेचें लक्ष धरून १५००० पावेतों कार्य उरकून घेतों म्हणोन लिहिलें तें सविस्तर कळलें अैसीयास श्रीमंत महाराजांची मुंज्य वद्य पंचमीस पुराणोक्त विधि करून बाईसाहेबास संतोष वाटून जाहाली ही गोष्ट तुम्हीं फारच उत्तम केली......”

या पत्रावरून नाना फडणीसाच्या कुटिल कारस्थानाचा बोध होईल. काय म्हणे, “ बाईसाहेबांस संतोष जाहाला. ” बिचाऱ्या बाईसाहेब! बोलून चालून

अशिक्षित अबला! तिला पुराणोक्त व वेदोक्त यांचा गडबडगुंडा काय समजणार? समारंभ खासा झाला यानेंच ती संतुष्ट झाली. तिला वेदोक्तही सारखें व पुराणोक्तही सारखें. पण ब्राह्मणांनीं, सुशिक्षित नोकरांनीं, विश्वासघातकी वर्तन करतां नये होतें. ज्यांच्या क्षात्रवृत्तीमुळें ब्राह्मण जगांत राहिले, व ज्यांच्या मिठावर ते जगत होते, त्या आपल्या मालकाशीं त्यांनीं द्रोह करतां नये. पण असलें निमकहरामपणाचें काम नानानें केलें, बाबूरावानें केलें, झाडून साऱ्या भटाभिक्षुकांनीं केलें! व या आपल्या दगलबाजीस प्रामाणिकपणाचें सर्टिफिकेट आपणच देत आहेत!

प्रकरण ६ वें.

स्वातंत्र्याची तळमळ.

मागील दोन प्रकरणांत साताऱ्च्या छत्रपतींच्या स्थितीचें शब्द चित्र रेखाटण्याचा जो प्रयत्न केला आहे त्यावरून छत्रपतिमहाराज साताऱ्यास किल्यावर राहून राज्य करीत नसून, आपल्या नोकराच्या—पेशव्याच्या—कैदेंत होते हें वाचकांच्या लक्षांत आलें असणार! ही कैद दुसऱ्या शाहूमहाराजांपासून जास्त कडक झाली हें खरें; पण नानासाहेब पेशव्यानें रामराजांस छत्रपती केल्यापासून ही कैद चालू होतीच! थोरले माधवराव पेशवे यांनीं अंतकाळाच्या समयीं पश्चात्ताप होऊन, क्षयरोगानें कुंथत पडले असतां, विद्वान् शास्त्री पंडित जमा करून त्यांस विचारिलें कीं, ‘**पेशव्यांच्या राज्यांत** धर्मोत्कर्ष होत आहे; दौलतींतील सर्व लोक सुखी आहेत, प्रजापालन चांगलें होत आहे, असें असतां **पेशव्यांचे वंशास क्षय लागला, पानपतीं फौज गार होऊन दौलत बुडाली, याचें कारण काय?**’ तेव्हां काशीकर शास्त्री, रामशास्त्री प्रभुणे, यांनीं स्पष्टपणें उत्तर केलें कीं, “**स्वामीद्रोहासारखें थोर पातक नाहीं.** धन्यास प्रधान प्रतिबंधांत ठेऊन राज्याचा उपभोग करूं इच्छितात, याच कार-

णानें वंशक्षय व अपकीर्ति होत चालली आहे." काशीकर शास्त्र्याच्या या स्पष्टोद्गारांत[1] पेशव्यांनीं महाराजांना कैदेंत ठेवलें होतें हें आमचें विधान खरें असल्याचें आढळून येणार आहे.

छत्रपति महाराज ज्या घराण्यांत जन्मले, तें भोंसल्याचें घराणें स्वातंत्र्यप्रेमी, स्वातंत्र्यपिपासु. त्या घराण्यांत जन्मलेला पुरुष, आपल्या नोकराच्या कैदेंत कसा राहाणार ? **शिवाजीमहाराजांचे** आजे **मालोजी** हे यःकश्चित् पाटील. पण महत्वाकांक्षी जबरे ! अंगच्या कर्तबगारीनें प्याद्याचे फर्जी व्हावे तसे ते पाटलाचे राजे झाले ! शिवाजीमहाराजांचे वडील **शाहाजी राजे.** यांनीं देखील स्वामिनिष्ठेनें मोंगलांशीं मोठमोठ्या लढाया मारल्या. स्वतंत्र राज्य स्थापन करण्याचा यत्न केला. परिस्थिति प्रतिकूल म्हणून विजापूरच्या बादशाहाची नोकरी पत्करून कर्नाटकांत गेले; पण शिवाजीमहाराजांना सर्व प्रकारें साहाय्य करून स्वतंत्र राज्य स्थापण्यास अनुकूल परिस्थिति उत्पन्न करून दिली. शिवाजी महाराजांची गोष्ट तशीच. त्यांनीं मुसलमानांचा आश्रय केला असता, तर त्यांना बादशाहानें मोठ्या हुद्यावर नेमून एखादी मोठी जहागिरी दिली असती. पण त्यांनीं स्वार्थाचा विचार केला नाहीं. महाराष्ट्रभूमि परकीयांच्या गुलामगिरींत रखडत होती. तिला दास्यांतून सोडविण्यासाठीं आद्य छत्रपतीनीं आपलें आयुष्य वेचलें. अनंत हालअपेष्टा सोसल्या, व महाराष्ट्राला स्वातंत्र्याचा लाभ करून दिला. शिवप्रभूचा मुलगा राजा संभाजी यानें तर स्वातंत्र्य व धर्मरक्षणाच्या यज्ञांत आत्माहुती दिली !

अशा प्रकारच्या स्वातंत्र्यलोलुप, स्वातंत्र्यप्रेमी कुळामध्यें बाल छत्रपति **प्रतापसिंहाचा** जन्म झालेला होता. त्यांच्या वडिलानीं, **आबासाहेबमहाराजांनीं**, आपल्या हयातींत पेशव्यांच्या जुलुमाचें जड जोखड फेंकून देण्याचा यत्न केला होता, व तो बाल छत्रपतींना पुसट पुसट ठाऊकही होता. तेव्हां असा

---

१. बा. प्र. मोडककृत कोल्हापूरच्या राज्याचा इतिहास उत्तरार्ध भाग १ ला पा. ६३.

वीरबच्चा **प्रतापसिंह** व त्याची मनस्विनी माता **आनंदीबाई,** आपल्या नोक-राच्या कैदेंत कशीं बरें कुजत राहाणार ? राजमाता **आनंदीबाई** जरी अबला होती, तरी ती शिर्के कुलांत जन्म पावलेली होती. ही महत्वाकांक्षी व मुत्सद्दी होती. त्यामुळें पेशव्याच्या कैदेंतून सुटका करून घेण्याच्या प्रयत्नास साताराची मंडळी लागली यांत नवल नाहीं. शिवाय बाजीरावानें स्वार्थापायीं व दुर्वर्तनानें नामुष्की आणणारी परिस्थिति उत्पन्न केली होती. तिचा प्रतिकार करणें अत्यंत आवश्यक होतें.

दौलतीच्या मालकाला म्हणजे छत्रपतीला पेशव्यानें कैदेंत टाकून त्याची अत्यंत शोचनीय अशी स्थिति केली होती, तरी त्याची स्वतःची स्थितीही तशीच शोचनीय झालेली होती. महाराजांच्या वेळच्या मराठा व देशस्थ ब्राह्मण सरदारांना पेशव्यांनीं बाजूस लोटून जे नवे मराठे सरदार केले, ते त्यांच्याच पावलावर पाऊल ठेऊन स्वतःच बलिष्ठ बनले. पुनः या सरदारांना काटशह देण्यासाठीं पटवर्धन, रास्ते, आपटे, बिनीवाले गोखले, वगैरे जे जात-भाई सरदार केले, ते देखील तसेंच डोईजड झाले. महादजी शिंदे मेल्या-नंतर जी बजबजपुरी माजली, त्यामध्यें प्रत्येकाला आपला स्वार्थ साधावा व आपलेंच माहात्म्य वाढावें असें वाटत होतें. सर्वच पुढारी झाले, अगर सर्वच मोठेपणासाटीं हट्ट धरून बसले तर समाजाचा नाश होतो[1]. तशीच गत पेशव्यांचे अमदानींत झाली.

बाजीराव दुसऱ्या वेळीं पेशवा होतांना एकंदर कशी स्थिति होती हें मागील प्रकरणांत वर्णिलें आहेच. त्यानंतर नानाफडणीसास दौलतराव शिंद्या-करवीं बाजीरावानें पकडून कैद केलें, व नगरास किल्ल्यावर बंदोबस्तानें ठेवलें. याच सुमारास तुकोजी होळकरही मरण पावला होता. त्याला दोन औरस मुलगे खाशेराव व मल्हारराव; व दोन दासीपुत्र, यशवंतराव व विठोजी.

---

१ सर्वे यत्र विनेतारः सर्वे पंडितमानिनः । सर्वे महत्वमिच्छंति तद्वृंदमवसीदति ॥

— सुभाषित.

होळकराचे गादीसंबंधानें खाशेराव व मल्हारराव यांचे दरम्यान तंटे लागले. खाशेराव वेडसर होता. त्याचा पक्ष दौलतरावानें घेतला व मल्हाररावाचा पक्ष यशवंतराव व विठोजी यांच्याबरोबरच नानानें घेतला. त्यावरून उभयतांमध्यें लढाई होऊन मल्हाररावाच्या पक्षाचा मोड झाला. विठोजी कोल्हापुराकडे पळून गेला. या लढाईत मल्हाररावच्या पक्षास फत्तेसिंग माने रहिमतपूरकर हा होता. तोही कोल्हापुरासच गेला. या भानगडीवरून शिंद्याचें व नानाचें वांकडें आलें, व बाजीरावाशीं संगनमत करून ता. ३१।१२।१७९७ रोजीं नानास कैद करून नगरास पाठविलें.

टिपूचा नाश करण्यासाठीं इंग्रज व निजाम यांच्या मदतीस पेशव्यानें परशुरामभाऊस पाठविलें. पटवर्धनी सैन्यानें टिपूवरील स्वारीमध्यें कोल्हापूरकराशीं कटकट करून लढाई उपस्थित केली. त्यामध्यें कोल्हापूरच्या बाजूनें **चतुरसिंग भोसले** व **फत्तेसिंग माने** रहिमतपूरकर हे होते. लढाई मोठी मातबर झाली. परशुराम पटवर्धनास **चतुरसिंगानें** सातारा लुटल्याचें तासगांव लुटून व पटवर्धनाचा वाडा जाळून प्रायश्चित्त दिलें होतेंच. पण सेनाजी मोहित्याच्या खुनाचा सूड उगवावयाचा होता. परशुराम पटवर्धनाशीं लढाईचा प्रसंग आलेला पाहून **चतुरसिंगास** आनंद झाला. मोठ्या निकरानें **चतुरसिंगानें** परशुरामावर चढाई केली. त्याच्या सेनेचा पराभव केला. या लढाईत परशुरामास प्राणांतिक जखम होऊन तो मरण पावला.

सारांश बाजीरावाच्या कारकीर्दीत अनंत पक्ष उपस्थित झाले, व त्यांच्यामध्यें यादवी (civil war) सुरू झाली. शिंदे व होळकर यांच्यामधील स्पर्धा फार विकोपास गेली. बाजीराव पेशवा दौलतराव शिंद्याच्या बाजूस असल्यासारखें दाखवी. यादवी रणामध्यें कधीं शिंद्याची सरशी व्हावी; तर कधीं होळकराची सरशी व्हावी; अखेर सन १८०२ मध्यें शिंदे वानवडीस ससैन्य आला व यशवंतराव होळकर हडपसरला सैन्य घेऊन आला. बाजीरावानें होळकराची समजूत करण्याचा यत्न केला, पण तो म्हणे शिंदे हाच पेशव्यांचा निमकहराम

नोकर आहे. त्यानें स्वामिद्रोह केला आहे, सबब त्याला आधीं शासन करतों. मी पेशव्यांचा नोकरच आहे. पेशव्यांचे सारे हुकूम मला मान्य आहेत.

अखेर पाळी लढाईवर आली. शिंद्याचा पराभव झाला. तसा बाजीराव सिंहगडास पळून गेला. तेथून रायगडास गेला. यशवंतराव होळकराचें सैन्य आपणांस धुंडाळीत असल्याचें समजतांच तो रायगडाहून महाडास गेला. तेथून पुनः पळाला, तो रेवदंड्यास जाऊन राहिला. बाजीराव इंग्रजांच्या मदतीच्या अपेक्षेनें पळत होता. इंग्रजांना ही संधि चांगलीच सांपडली. त्यांनीं **वसई** येथें बाजीरावाशीं तह केला. इंग्रज, निजाम, शिंदे यांच्या मदतीनें पुनः **तिसरे वेळीं** बाजीराव पेशवा झाला.

बाजीराव पळून गेल्या मुदतींत पेशवा होण्याचा मान **अमृतरावास** मिळाला. बाजीराव महाडास पोहोंचे पावेतों अमृतराव पेशवा होण्याच्या गोष्टीस कबूल नव्हता. पण महाडाहून सुवर्णदुर्ग किल्ल्याकडे इंग्रजांशीं संगनमत करण्यासाठीं बाजीराव पळून गेल्यावर, त्यास (कित्येक म्हणतात अमृतरावाचा मुलगा विनायक याला) पेशवा करण्यांत आलें. चतुरसिंग भोंसल्याच्या खटपटीनें होळकरानें त्याच्यासाठीं वस्त्रें मिळविलीं.

बाजीरावानें इंग्रजांशीं जो तह केला त्या तहानें तो इंग्रजांचा मांडलिक झाला. आपल्या सुरक्षितपणाच्या काल्पनिक भीतीनें स्वातंत्र्याचें मोल देऊन बाजीरावानें सुरक्षितपणा पत्करला असें ग्रँट म्हणतो तें खोटें नव्हे[१]. या तहामुळें बाजीरावानें आपल्या रक्षणासाठीं इंग्रजांचें ६००० सैन्य ठेवावयाचें; त्याच्या खर्चासाठीं २६ लाखांच्या उत्पन्नाचा मुलूख द्यावयाचा; सुरतेवरील हक्क सोडावयाचा; महाडच्या तहामध्यें निजामास देऊं केलेल्या मुलुखास बाजीरावानें संमती द्यावयाची अशा अटी कबूल केल्या. तसेंच गायकवाड व निजाम यांच्या व पेशव्यांच्या दरम्यान

---

१ Such was the important treaty of Bassein, by which the Peshwa sacrificed his independence for the price of protection.

Duff.

उपस्थित होणाऱ्या भानगडी इंग्रजांनीं मिटवाव्या अशी कबूली दिली. तसेंच इतर युरोपियन लोकांना पदरीं ठेऊं नये व इंग्रजांच्या संमतिशिवाय कोणत्याही सत्तेशीं पत्रव्यवहार करूं नये, ही देखील अट कबूल केली.

या तहानंतर बाजीराव इंग्रजांचा मांडलिक बनला. हें बाजीरावाचें करणें शिंदे, होळकर, नागपूरकर भोंसले वगैरे मराठे सरदारांस पसंत पडलें नाहीं. या तहाच्या बाबतींत त्यानें शिंदे, भोंसले वगैरे स्वपक्षीयांनाही विचारलें नाहीं. केवळ भित्रेपणानें व स्वार्थानें आपल्या स्वतःच्याच जबाबदारीवर हा नामुष्की आणणारा तह बाजीरावानें घडवून आणलेला होता. आपल्या धन्यास, साताऱ्च्या महाराजांस देखील या तहाची हकिकत बाजीरावानें कळविली नाहीं. पेशव्याच्या या कृत्यानें शिंदेहोळकरादि सरदार बाजीरावावर नाखुष झाले. पेशव्यानें, त्यांच्या मालकानें, इंग्रजांचें मांडलिकत्व निष्कारण पत्करलें. त्यांच्या दृष्टीनें ही गोष्ट पेशव्याइतकीच त्यांनाही लांछनास्पद होती. मराठे सरदारांचा ससेमिरा चुकविण्यासाठीं पेशव्यानें आपल्या जातभाई सरदारांच्या सांगण्याप्रमाणें इंग्रजांशीं जी निष्कारण सहकारिता केली, ती परिणामीं सबंध दौलतीस मानहानी करणारी झाली.

परंतु बाजीराव व त्याचे पटवर्धन, रास्ते, आपटे, वगैरे सरदार आपमतलबी व स्वार्थी पडले. त्यांना स्वार्थापलीकडे राष्ट्रीय मानापमानाचा व हिताहिताचा विचार सुचला नाहीं. या अविचारामुळें मराठेशाहीवर व खुद्द बाजीरावावर पुढें घोर प्रसंग आले. " बाजीरावाचा जिना करून, त्या पायऱ्या, चढत जाऊन इंग्रजांनीं आपला मतलब साधला, " असें डॉ. बसू म्हणतात तें खोटें नव्हे. वसईच्या तहापावेतों मुंबईकडचे इंग्रज पश्चिम किनाऱ्यावर माशा मारीत बसल्यासारखे होते. पेशव्यांच्या घरांतिल यादवींत पडण्याचा २।४

---

१ ' By making Bajirao their tool, or rather using him as their ladder, the English ascended the height and gained the object of their ambition. '

Story of Sattara.

वेळां त्यांनीं यत्न केला होता. नाना फडणीसाच्या अर्धवटपणानें प्रथम त्यांना थोडासा फायदा मिळाला होता. पण अलिजाबहादर महादजीबाबानें त्यांना दे माय धरणी ठाय करावयास लावून तें सारें ओकावयास लावलें होतें. आतां देखील शिंदे, होळकर यांच्याशीं सहकार्य करून पेशवा राहता, तर इंग्रजांना मराठ्यांच्या दौलतींत हात शिरकविण्यास अवसर मिळता ना. पण मराठ्यांशीं सहकार्य तेव्हांच्याही ब्राह्मणांना पसंत नव्हतें.

वसईच्या तहानंतर बाजीरावाला चांगलेंच स्वास्थ्य मिळालें. पण याचा उपयोग आपलें व दौलतीचें सामर्थ्य वाढविण्याच्या कामीं बाजीरावानें केला नाहीं. बाजीराव चांगलाच पंडित होता. त्याच्या काळीं त्याच्याइतका विद्वान् शिक्षित ब्राम्हण महाराष्ट्रांत नव्हता असें कॅ. मेक्डोनल्ड म्हणतो. पण या शिक्षणाचा व बुद्धिमत्तेचा उपयोग बाजीरावानें साम्राज्यसत्ता कमकुवत करण्याकडेच केला, असें कष्टानें म्हणावें लागतें. इंग्रजांचा पाठिंबा मिळाला त्या जोरावर लहानमोठ्या जहागिरदारांना बाजीरावानें त्रास देण्यास सुरवात केली. त्यामुळें ते बाजीरावास दुरावले! कांहींनीं इंग्रजांकडे तक्रारी नेऊन त्यांच्याकडून आपली दाद लावून घेतली. याचा परिणाम असा झाला कीं, इंग्रजांचें महात्म्य वाढलें. तितक्याच मानानें पेशव्याचें वजन नाहींसें झालें. जो तो मध्यवर्ती पेशवाईशीं बेइमानगिरी दाखवूं लागला, व आंतून करारमदार करून इंग्रजांच्या अंकित झाला. सारांश वसईच्या तहानंतरची शांतता म्हणजे प्रचंड वादळापूर्वीं जी शांतता असते त्याच मासल्याची ही शांतता होती. घरभेदीपणा बोकाळला होता. आंतून सारें पोखरलेल्या लांकडाप्रमाणें झालें होतें.

सातारच्या दरबारास या साऱ्या गोष्टी कळत होत्या. पेशव्यावर विसंबून राहिल्यास डोळ्यादेखत सारी दौलत बुडणार हें भविष्य त्यांना दिसत होतें. सबब चतुरसिंग भोसल्यामार्फत इंग्रजांशीं महाराजांतर्फे बोलचाल सुरू झाली.

बाजीरावाच्या हेरानीं हें वर्तमानताबडतोब बाजीरावास कळविलें. बाजीरावानें चतुरसिंगास पकडण्याचें काम त्रिंबकजी डेंगळ्यास सांगितलें.

उघड लढाई करून चतुरसिंगास पकडणें अशक्य होतें. या बाबतींत परशुराम पटवर्धनाची चांगलीच फजिती झाली होती. त्रिंबकजी डेंगळ्यानें चतुरसिंगाला विश्वास दाखवून पुण्यास नेलें व विश्वासघात करून कैद केलें व कांगोरीस तुरुंगांत ठेविलें. सन (१८१७ मध्यें) तेथें तुरुंगांतच चतुरसिंग भोंसले मरण पावले.

प्रकरण ७ वें.

पेशवाईचा अंतकाल.

पेशव्यांच्या कैदेंतून सुटण्याचा साताऱ्च्या मंडळींचा दुसरा प्रयत्न देखील फसला. चतुरसिंगास फसवून पेशव्यांनीं कैदेंत टाकलें यामुळें साताऱ्च्या मंडळीस कांहीं दिवस स्वस्थ बसणें प्राप्त झालें. तथापि या प्रयत्नांनीं बाजीराव सावध झाला, व महाराजांना खुष करण्याच्या उद्योगास लागला. अर्थात् हें सारें वरकरणी होतें. आपल्या हातची सत्ता जावी हें बाजीरावास तरी कसें पसंत पडणार ? ज्या बाजीरावानें स्वातंत्र्याचें, व स्वाभिमानाचें मोल देऊन इंग्रजांकडून पेशवाई विकत घेतली होती, तो प्रतापसिंहासारख्या बाल छत्रपतीस, निर्बल मालकास, साऱ्या दौलतीचा कारभार स्वतंत्रपणें व स्वेच्छेनें करण्यास अवसर देईल हें शक्य नव्हतें. केवळ साताऱ्च्या मंडळीस नादास लावावें, म्हणजे त्यांनीं इंग्रजांशीं आपल्याविरुद्ध बोलणें लावूं नये हा बाजीरावाचा कावा होता.

---

१ पटवर्धनाचा निकाल लागल्यानंतर चतुरसिंग भोंसल्यास बाजीरावानें अभय दिलें. फत्तेसिंग मान्याच्या बरोबरीनें होळकर सेनेंत चतुरसिंग पुण्यावरील हल्ल्याच्या प्रसंगीं होता. पुढें बाजीरावानें त्याला अभय देऊन होळकराकडून फोडलें. त्यानंतर चतुरसिंग महाराजांकडे राहिला होता.

राजमाता **आनंदीबाई ऊर्फ माईसाहेब महाराज,** खंडेराव राजे शिर्के, विठ्ठल शिवदेव वगैरे मंडळी त्यावेळीं महाराजांच्या हितासाठीं झटत होती. हीं सारीं राजकारणपटु होतीं. त्यांनीं बाजीरावाचा डाव पूर्णपणें ओळखला होता. तीं बाजीरावास फसतात थोडींच !

कित्येकांस वाटतें तितका बाजीराव मूर्ख नव्हता. नानानें जी परिस्थिति उत्पन्न करून ठेविली, त्यामुळें बाजीरावास मूर्खपणा पदरीं घ्यावा लागला. नाहीं तर बाजीराव चांगलाच नामांकित पंडित होता. राजकारणी लपंडावाच्या मसलती तो चांगल्याच जाणत असे. शिवाय त्याच्या पदरीं त्रिंबकजी[1] डेंगळ्यासारखा पाताळयंत्री माणूस होता. हा मराठा होता. त्याच्या वेळीं पुण्याच्या दरबारांत त्याच्याइतका हुशार व धूर्त मुत्सद्दी कोणीही नव्हता. त्याच्याकडूनच चतुरसिंग राजे भोंसले यांस पकडण्याचें कार्य बाजीरावानें करविलें होतें. बाजीरावाचा सारा विश्वास, सारी भिस्त या त्र्यंबकजीवरच होती. याच्याच सल्ल्यानें बाजीरावानें सातारच्या दरबाराचा भेद काढण्यासाठीं महाराजांभोंवतीं आपलीं माणसें पसरून ठेविलीं होतीं. तसेंच महाराजांच्या पदरीं असलेल्या माणसांना द्रव्यानें वश करून घेतलें होतें. या माणसांकरवीं सातारच्या दरबाराची खडान्खडा बातमी बाजीरावास समजत असे.

आपल्या आसपास बाजीरावाचीं माणसें आहेत व तीं आपल्या हालचालीचा व भाषणाचाही वृत्तांत बाजीरावास कळवितात, ही गोष्ट महाराजांना व विशेषतः माईसाहेब महाराजांना कळल्याशिवाय राहिली नव्हती. पण हीं माणसें कोण आहेत हें मात्र नक्की समजण्यास मार्ग नव्हता. पेशवाई पावेतों घरभेदेपणाचें बीं मराठ्यांमध्यें उगवलें नव्हतें. परंतु श्रीवर्धनी बाळाजी विश्वनाथाचे पाय, सातार्‍यास लागतांच, धनाजी जाधवरावासारख्या थोर थोर स्वामिभक्त माणसांची देखील बुद्धि फिरली ! फडणीस नानाच्या कार-

---

१ " त्रिंबकजी हा अत्यंत शूर, धाडशी, हरजबाबी व कर्ता असा पुरुष होता. "
केळकरकृत मराठे व इंग्रज.

२ त्रिंबकजी डेंगळ्याची व त्याच्या वीरपत्नीची मर्दुमकी ज्ञानकोशामध्यें दिली आहे ती पहा.

किर्दींत तर या घरभेदीपणास ऊत आला. खरें पाहिलें तर या घरभेद्यांना कोणत्या कोटींत ढकलावें हें समजत नाहीं. यांना ना जात; ना धर्म; ना देशाची चाड; ना बापाची चाड. प्रत्यक्ष बापाला देखील द्रव्यलोभानें खड्डयांत ढकलावयास हे मागें पहाणार नाहींत ! परशुरामानें मातृवध केला तो पित्राज्ञेनें; पण थोड्याशा संपत्तीच्या लोभास बळी पडून हे मातृवधही करतील. कुलशीलाचा, लोकलज्जेचा, कसलाच विचार यांच्या मनांत यावयाचा नाहीं. स्वार्थ तेवढा एक त्यांना माहीत. तेवढा साधत असल्यास, ते वाटेल त्याची सेवा पत्करतील. आपल्या शत्रूचीही सेवा करण्यास ते तयार ना ! इमान, स्वामिभक्ति, अगर स्वदेशभक्ति अशा प्रकारच्या भावना त्यांच्या गांवींही नाहींत. पैसा हा त्यांचा देव. तो देणारास ते भजतात. त्याचे ते तेवढ्यापुरते चाकर. अशा प्रकारच्या लोकांचें त्याकाळीं पीक आलेलें. त्यामुळें अमूक माणूस बाजीरावाचा हेर नाहीं, हें उमगावें तरी कसें ? बाजीराव पेशव्याकडे पाहिलें तरी त्याचाच जातभाई, अस्सल चित्पावन बाळाजी नातू, बाजीरावाच्या घरची व कारभाराची खडान्खडा बातमी इंग्रजांना देत होता. छत्रपतीकडील बातमी बाळाजीप्रमाणें बेंदरे व काळुस्कर हे बाजीरावास देत होते. हे लोक यजमानाची चंदी खात व निमकहरामपणा करून, लांच खाऊन, धन्याच्या गुत मसलतींची बातमी शत्रूस देत. अशी स्थिति असल्यामुळें साताऱ्च्या मंडळीला कांहीं काल गप्प बसल्यासारखें भासविणें इष्ट होतें, व आपण जें कांहीं करूं ते पेशव्यास कळूं नये, अशी जास्त सावधगिरी घेणें जरूर झालें.

पुण्यास यावेळीं **माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन** हा रेसिडेंट होता. बाळाजी नातू रेसिडेंटाकडे नोकरीस होता. पेशव्यांच्या वाड्यांत तो घरोब्यानें जात येत असे, व चुगलखोरीमुळें तो पेशव्याला व रेसिडेंटाला आपलासा वाटे. पण एल्फिन्स्टन साहेब खरा पक्का मुत्सद्दी होता. तो बाळाजीकडून पेशव्याच्या घरची सारी बातमी काढी, पण बाळाजीस आपलें खरें हृद्गत कधींच

सांगत नसे, त्यामुळें बाळाजीचा पेशव्यास चांगल्या प्रकारचा उपयोग होत नसे.

बाळाजी नातू रेसिडेन्सीमध्यें नोकरीस असल्यामुळें, व त्याचें आणि रेसिडेंट एल्फिन्स्टन यांचें सख्य असल्याचें लोकांना वाटत असल्यामुळें त्या गोष्टीचा बाळाजीस चांगलाच फायदा करून घेतां येत असे. सातारच्या मंडळीलाही बाळाजीचा व रेसिडेंटाचा संबंध समजून आला होता. सबब बाळाजीस द्रव्यद्वारा सातारच्या मंडळींनीं वश करून घेतलें; व त्याच्या मार्फत स्नेह संपादन करण्याबद्दल बोलणें सुरू केलें. पुढें महाराजांच्या व कंपनी सरकाराबद्दल एल्फिन्स्टनच्या दरम्यान पत्रव्यवहार सुरू झाला. *नरसू काकडे हा महाराजांचा अत्यंत विश्वासू नोकर होता. गुप्त पत्रव्यवहार पोंहोचविण्याची कामगिरी याच्यावरच सोंपविण्यांत आली होती. रात्रौ महाडावाटे मुंबईस डाक रवाना होई.

महाराजांनीं मैत्रीबद्दल व मदतीबद्दल बोलणें काढलें, तें इंग्रजांच्या चांगलें पथ्यावर पडलें. कारण या सुमारास इंग्रजांचा गव्हर्नर जनरल **लॉर्ड वेलस्ली** हा होता. लार्ड क्लाईव्ह वॉरन हेस्टिंग यांच्याप्रमाणें याचेंही धोरण मुलुखगिरीचेंच होतें. आतांपर्यंत व्यापारासाठीं हिंदुस्थानांत आलेल्या ईस्ट इंडिया कंपनीनें अनपेक्षित योगायोगामुळें बंगाल प्रांत संपादिला होता. टिपूला बुडविल्यानंतर मद्रास, कंपनी सरकारचाच झाला होता. दौलतराव शिंदे पेशवाई राजकारणांत गुंतल्या मुदतींत इंग्रजांनीं दिल्लीच्या बादशहाची वजीरी आपणच पटकावली. पुढें मराठयांमधील फाटाफुटीचा फायदा घेऊन त्यांचा एकएकट्याचा पराभव केला व " सबसिडिअरी " सिस्टिमच्या पद्धतीचा तह करून त्यांना आपले मांडलिक करून टाकिलें. त्यामुळें उत्तरेकडे पाहिलें तर

***नरसू काकडे** हा जातीनें नामदेव शिंपी. यास महाराजांनीं दोन वाडे बांधून दिलें पैकीं एक त्याच्या वंशजाकडे आहे. शेजारचा पूर्वेकडील वाडा श्री लक्ष्मीबाईसाहेब माने यांच्याकडे आहे. त्याच वाडयांत प्रथम उद्योगारंभ करण्याचा योग प्रस्तुत लेखकास आला.

मुलुख बादशाहाचा पण अंमल कुंपणी सरकाराचा झाला होता. बादशहा मोंगल; पण नुस्ता नामधारी. रजपुतांना कंपनी सरकारनें कधींच पादाक्रांत केलें होतें. राहतां राहिले काय ते मराठे. पैकीं शिंदे, होळकर, गाइकवाड, नागपूरकर यांना तहांनीं बद्ध करून टाकिलें होतेंच. पेशव्याला तर त्या सर्वांच्या आधीं **वसईच्या तहानें** जखडून टाकिलें होतें. पेशव्यांच्या कैदखान्यांतले सातारचे बाल छत्रपति तेवढेच काय ते " सबसिडिअरी " सिस्टिमच्या जाळ्यांत अडकावयाचे राहिले होते, व ते अडकवून घेण्याच्या मोहास बळी पडत असल्याचें पाहून गव्हर्नर जनरल **वेलस्ली** यास हर्षानंद झाला, यांत नवल कसलें ?

वसईचा तह किती नामुष्कीचा होता हें बाजीरावास कळत नव्हतें असें नाहीं. स्वार्थासाठीं त्यानें अविचार केला होता. पुढें लौकरच त्याला आपली चूक समजून आली. तहाच्या वेळची परिस्थितीच त्याला इतकी भयंकर भासली होती म्हणून त्यानें इंग्रजांच्या म्हणण्यास हो म्हटलें होतें. पण आतां बापू गोखले त्याच्या पदरीं चांगला प्रसिद्धीस आला होता. महाराजांच्या मुलखांत धिंगाणा घालून यानें औंधकर परशराम भवान पंतप्रतिनिधी यास जिंकून कैद केलें. ताई तेलीण ही प्रतिनिधीच्या पदरीं नोकर होती. तिनें बंडावा केला तो यानें दीर्घकालानंतर मोडला. फत्तेसिंगाचें पारिपत्य केलें. या प्रकारच्या बारक्याशा लढाया बापू गोखल्यानें मारल्या होत्या. बापू गोखल्यास त्यामुळें इंग्रजांनाही हांकलून देऊं अशी घमेंड वाटत होती. बापू गोखले व त्र्यंबकजी डेंगळे यांच्या पराक्रमावर बाजीरावाची भिस्त. त्यामुळें अनुकूल संधि येतांच इंग्रजांच्या मांडलिकत्वाचें जोखड फेंकून देण्याचा विचार त्याला सुचूं लागला.

इकडे या साऱ्या गोष्टी घरभेद्या बाळाजीकडून बेटावर बंगला बांधून राहिलेल्या एल्फिन्स्टन साहेबास रोज समजत. त्याच्याकडून त्या मुंबई सरकारास व कलकत्त्याचे गव्हर्नर जनरलास कळत. पेशव्याच्या विचाराची दिशा अशा प्रकारें बदलत होती तर इंग्रजांच्याहि विचाराची दिशा बदलूं लागली होती.

हिंदुस्थान मऊ लागल्यामुळें त्यांनीं व्यापारी धोरणाला दुय्यम प्रतीचें करून मुलूखगिरीच्या धोरणास प्रथमस्थान दिलें होतें. मुंबईच्या गव्हर्नराचा अधिकार मद्रास व बंगालच्या गव्हर्नराइतका होता खरा पण राज्यविस्तार फार थोडा होता. वसईच्या तहानें पेशव्यास—अप्रत्यक्षपणें मराठ्यांस—त्यांनीं मांडलिक केलें होतें खरें पण मराठ्यांचा त्यांना भरंवसा वाटत नव्हता. हे मराठे जन्मतः स्वातंत्र्यप्रिय. शिवाय कडवे. यांची वागणूक सरळ नाहीं. कधीं पूर्ववत् एक होतील व आपणांवर उलटतील याचा भरंवसा नाहीं, असें कंपनी सरकारच्या नोकरशाहीस वाटे. त्यामुळें पेशव्याच्या धोरणावर, आचारावर, व विचारावर त्यांना डोळ्यांत तेल घालून देखरेख ठेवणें अत्यंत जरूरीचें होतें. आतां तर बाजीरावाची इच्छा स्वातंत्र्याकडे झुकूं लागलेली !

याच संधीस महाराजांकडूनही मदतीची गोष्ट निघालेली. पेशवाई नष्ट करणें निदान बाजीरावास जास्त मजबूत पकडींत पकडणें इंग्रजांना इष्ट वाटत होतें. अशा वेळीं महाराजांकडील वाटाघाटीस इंग्रजांकडून उत्तेजनपर उत्तर मिळालें यांत नवल कसलें ?

महाराजांना मदत करूं शकेल अशी इंग्रजांशिवाय दुसरी कोणतीच सत्ता त्यावेळीं नव्हती. जे होते, ते तहानीं बद्धपरिकर झालेले होते. बळवंतराव चिटणीस हा महाराजांचा चिटणीस त्यानें महाराजांना सल्ला[1] दिली कीं, या प्रसंगीं इंग्रजाशीं सलोखा करावा. इंग्रज बलाढ्य व विश्वासार्ह आहेत. महाराजांना चिटणीसाचें म्हणणें पटलें व इतर मुत्सद्यांचें म्हणणें तसेंच पडलें. म्हणूनच त्यांनीं नरसू काकड्याकरवीं एल्फिन्स्टन साहेबांना कळविलें कीं, बाजीरावाचें पारिपत्य करून राज्यांत शांतता प्रस्थापित करण्यासाठीं, व राज्याची घडी चांगल्या प्रकारें बसविण्यासाठीं मदत करा. इंग्रजांकडील उत्तेजनपर उत्तर येतांच वाटाघाट करण्यासाठीं महाराजांनीं आपल्यातर्फे बळवंतराव चिटणीसास नेमिलें. बळवंतराव हा बाळाजी आवजी चिटणीसाचा वंशज.

---

१ चिटणीसाची बखर.

शिवाजीमहाराजांपासून यांच्या विश्वासूपणामुळें यांच्याकडे वंशपरंपरा महाराजांची चिटणीशी चालत आलेली. पूर्वजांप्रमाणें बळवंतरावही विश्वासू होता. त्यानें पुण्यास जाऊन एल्फिन्स्टनची एकांतीं भेट घेतली, व त्यास सांगितलें कीं, " पेशवे हे महाराज सरकारांचे पदरचे नोकर. छत्रपति महाराजांनीं त्यांच्यावर विश्वास टाकून साऱ्या दौलतीचा कारभार त्यांचेकडे सोंपविला. त्यावर पेशवा बलाढ्य झाला व तो खुद्द धन्यावरही सत्ता चालवूं लागला. महाराजांचे विश्वासू नोकर काय ते आपण असाही बहाणा करूं लागला. त्याच्यासारखे महाराजांचे दुसरे नोकर होते ते, व जहागिरदार, सरंजामदार असे त्यालाच सामील झाले; व सर्वांनीं मिळून महाराजांची सत्ता संपुष्टांत आणिली. " अशा प्रकारें गतेतिहास सांगून मदतीचें मागणें बळवंतरावानें एल्फिन्स्टन साहेबाशीं केलें. एल्फिन्स्टननें बळवंतरावाचें सारें म्हणणें ऐकल्यावर त्यास असें सांगितलें कीं, आमचा व पेशव्याचा तह झालेला आहे. आम्ही वचनबद्ध झालों आहों. पेशव्यानें जोंपर्यंत तह मोडला नाहीं, तोंपर्यंत आम्हाला विश्वासघात करतां येणार नाहीं. पेशव्यानें तहाविरुद्ध जराशी वागणूक केली कीं, तुमच्या म्हणण्याचा विचार करूं. तोंपर्यंत ही गोष्ट पेशव्यास कळूं देऊं नका. तसेंच " तुमचें काम करूं व मित्रत्व वाढेल असें वागूं. " असा मोघम संदेश त्यानें चिटणीसासोबत महाराजांकडे पाठविला.

चिटणीसानें घडलेला सर्व वृत्तांत महाराजांस सांगितला. इंग्रजानीं आपलें बोलणें फेटाळलें नाहीं, इतकेंच नव्हे तर योग्य संधि मिळतांच ते आपणांस मदत करणार आहेत हें ऐकून महाराजांना थोडेसें समाधान वाटलें. महाराजांच्या कामगिरीवर म्हणून जरी बळवंतराव गेला होता, तरी आपलेंहि खासगी काम त्यांतल्यात्यांत त्यानें उरकून घेतलें होतें. बळवंतराव चिटणीसाची जहागिरी बाजीरावानें बरीचशी कमी केली होती. शिवाय चिटणीसाचें वर्षासनही बरेंच कमी केलें होतें. चिटणीसानें बाळाजीपंत नातूमार्फत त्याबद्दलची गोष्ट एल्फिन्स्टनकडे काढली. पुढें त्रिवर्गाची बैठक होऊन एल्फिन्स्टननें बळवंतरावाची जप्त जहागिरी परत करण्याचें, व वर्षासन सुरू करण्याचें काम

करतों असें कबूल केलें. चिटणीसानें आपलें कार्य इंग्रजी रेसिडेंटानें करावयाचें कबूल केलें आहे, ही देखील गोष्ट महाराजांना सांगितली.

महाराज तरुण होते; पण ते चांगलेच बुद्धिमान् होते. बळवंतराव स्वतःचें काम करून घेण्याच्या मोहास बळी पडून एखादी घोडचूक करून बसावयाचा. म्हणून महाराजांनीं चिटणीसास दक्षतेनें वागण्याबद्दल सूचना दिली. इंग्रजी नोकरशाहीचा स्वभाव महाराजांनीं पारखला होता. आपणांस मदत करतांना इंग्रजांनीं मुलुख काबीज केला व मागाहून तो परत करण्याचें त्यांनीं जर नाकारलें तर काय घ्या ? हा विचार त्यांनीं चिटणीसास बोलून दाखविला.

यानंतर कांहीं दिवसांनीं चिटणीस पुनः एक वेळ पुण्यास गेला, व त्यानें एल्फिन्स्टनची भेट घेतली. पेशवे हे महाराजांचे नोकर असल्याबद्दल व त्यांनीं अन्यायानें सत्ता बळकावली असल्याबद्दल कागदोपत्रीं कांहीं पुरावा आहे का अशी एल्फिन्स्टननें पृच्छा केली. चिटणीसानें तसा पुरावा असल्याचें सांगितलें व तो एल्फिन्स्टनच्या हवालीं करण्याचें कबूल केलें. महाराजांची संमती घेऊन चिटणीसानें कागदपत्र नेऊन ते एल्फिन्स्टन साहेबास दाखविले.

एल्फिन्स्टननें हे कागद वाचून त्यांची युक्तायुक्तता ठरविण्याचें व नकला करण्याचें व भाषांतरें करवून घेण्याचें काम बाळाजी नातूस सांगितलें. बाळाजी व चिटणीस, हे चिटणीस उतरलेल्या वाड्यांत कागदपत्र वाचीत व चर्चा करीत बसले होते. इतक्यांत त्र्यंबकजी डेंगळे २५ शिपाई घेऊन वाडा वेढावयास व दोघांना पुराव्यानिशी पकडावयास येत असल्याचें समजलें. कागदपत्र लगबगीनें गोळा करून चिटणीसानें वाड्याच्या मागील परसाच्या भिंताडावरून उडी ठोकून पोबारा केला, व आपला जीव बचावला !

या वरील प्रकारांत त्र्यंबकजी डेंगळे चिटणीसास पकडावयास आला होता हें सांगितलें आहे. त्र्यंबकजीस व बाजीरावास त्यांच्या हेरांकडून महाराजांच्या वतीनें इंग्रजांशीं काहींतरी खलबत चिटणीस हे करीत आहेत असें मोघम कळलें होतें, व चिटणीसाच्या घरावर छापा घालण्याचा हेतु चिटणीसास

पकडून कैद करून काय तें समजून घ्यावें असाच होता. पण चिटणीसाच्या धाडशी पलायनानें त्यांची निराशा झाली.

तथापि बाजीरावानें महाराजांचें मन हेरलें होतें. वसईच्या तहापासून पेशव्या-वरील भक्ति त्याच्या अंमलांतील सरदार, इनामदार, सरंजामदार व जहा-गिरदार यांच्या मनांतून नष्ट झाली होती. शिवाय बाजीरावाच्या अंमलास कंटा-ळून इंग्रजांस ते आंतून वश झाले होते. अशा परिस्थितींत महाराजांचें व इंग्रजांचें सूत जमलें, तर आपणांस पेशवाईसही मुकावें लागेल. तेव्हां गोड गोड गोष्टी सांगून महाराजांचें मन प्रसन्न करून घ्यावें; पुष्कळशी खुशामत करावी; छत्र-पति तरुण असल्यामुळें त्यांना अधिकाराची लालसा दाखविली कीं ते गप्प होतील असा विचार बाजीरावानें आपल्या मनाशीं केला.

याच वर्षी इ० स० १८१७ मध्यें अधिक श्रावण महिना आला होता. तेव्हां या श्रावण महिन्यांत दानधर्म करावा अशा बेतानें प्रचंड लवाजमा घेऊन तो क्षेत्र माहुलीस निघाला.

साताऱ्यापासून ४ मैलांवर **माहुली** हें श्रीकृष्णानदीच्या तीरीं क्षेत्राचें गांव आहे. या ठिकाणीं **कृष्णा व वेण्णा** यांचा संगम झालेला आहे. ज्या काळचा इतिहास आपण वाचतों आहों, त्या काळीं क्षेत्र माहुली आजच्या दसपट रम-णीय होती. सर्वत्र बगीचे होते. त्यामुळें धार्मिक भावनेच्या बाजीरावास माहुली हें सर्वतोपरि पसंत पडलें. श्रावण महिन्यांत सोमवारीं कृष्णास्नानास पुष्कळ लोक लांबून लांबून येत असतात. असें हें अत्यंत प्रख्यात, पवित्र, तीर्थक्षेत्र असल्यामुळें बाजीराव मुद्दाम या ठिकाणींच आला होता.

माहुलीस येण्यास जसें अधिकमासाचें निमित्त होतें, तसेंच पेंढा-ऱ्यांच्या बंदोबस्तासाठीं सैन्य जमा करावयास माहुली सोयीस्कर होईल अशी बाजीरावाची अटकळ होती. श्रावण महिन्यांत गंगास्नानास माहुलीस फार प्रचंड यात्रा जमते. कुस्त्यांचीही मोठी दंगल होते. तेव्हां अशा जमावांतून तरुण सशक्त गडी वळवून घेऊन त्यांची सैन्यांत भरती करतां येईल, अशी बाजी-

रावाची खात्री होती. बापू गोखल्याकरवीं तो सैन्यभरती करण्याच्या उद्योगास लागलाही होता. शिवाय पेंढाऱ्यांचा[1] बंदोबस्त करण्यासाठीं तुमचें सैन्य द्या असा इंग्रजांचा बाजीरावाच्या मागें ससेमिरा लागलेला होता. व म्हणून आपण

---

१ **पेंढारी**:—इंग्रजानीं सब्सिडिअरी सिस्टिम सुरू केल्यामुळें एतद्देशीय राजे-राजवाड्यानीं आपलें सैन्य पुष्कळसें कमी केलें. पूर्वीं जे लोक सैन्यांत भरती झालेले नसून सैन्याबरोबर असत, अशा प्रकारचा एक वर्ग अस्तित्वांत आलेला होता. या लोकांपैकीं बरेच जण घोडे बाळगून असत. युद्ध संपल्यानंतर लुटालूट करण्याची कामगिरी बहुशः यांच्यावर सोंपविण्यांत येत असे. लुटींपैकीं ठराविक हिस्सा त्यांना सरकारांत द्यावा लागे. पुढें शांततेच्या काळांत देखील हे टोळ्या टोळ्यांनीं राहून लुटारूपणाचा धंदा करीत. यांना लष्करी पेशाचा स्वाभिमान व दिलदारपणा मुळींच नसे. शिवाय हे एकाच जातीचे अगर धर्माचे नव्हते. त्यामुळें त्यांच्यामध्यें नीति अगर धर्मबंधन कसलेंच नव्हतें. ज्या लष्कराबरोबर लुटीसाठीं हे जात असत तें गाफिल असलें, अगर कमकुवत असलें, तर त्यांचाही गोट लुटावयास हे कमी करीत नसत. तैनाती फौजेची (सब्सिडिअरी सिस्टिम) पद्धत अंमलांत आल्यामुळें पुष्कळसें सैन्य संस्थानिकांनीं कमी केलें. अशा प्रकारें बेरोजगार झालेल्या सैनिकांची पेंढारांत बरीच भरती झाली. व एतद्देशीय राजे बलहीन झाल्यामुळें या पेशाच्या लोकांना बरेंच प्रोत्साहन मिळालें. खुद्द इंग्रजानांच जेव्हां याचा त्रास होऊं लागला तेव्हां पेंढाऱ्यांच्या बंदोबस्ताचा विचार ग. ज. स. करावा लागला. जवळ जवळ बिनभांडवली, पण किफायतशीर असा हा धंदा असल्यामुळें, पेंढारामध्यें फार लोक दाखल झाले होते. त्यामुळें जुजबी बंदोबस्ताचा कांहीएक उपयोग होईना. तेव्हां १। लाख फौज जमा करून उत्तर, पूर्व व दक्षिण अशा तिन्ही बाजूंनीं सरकारी फौजेनें त्यांच्यावर हल्ले करण्यास सुरवात केली. त्यांच्या कांहीं पुढाऱ्यांस जहागिऱ्या वगैरे देऊन फोडलें. अमीरखान व करिमखान हे त्याचपैकीं होत. त्यांनीं इंग्रजांस सामील होऊन जहागिरी संपादन केल्या. अशा प्रकारें फोडून घेतलेल्या माणसांकडून पेंढाऱ्यांच्या आश्रयस्थानांचा पत्ता काढून त्यांना कोंडून जर्जर केलें व त्यांच्या पुंडाव्याचा बंदोबस्त केला. Memoir of Central India यामध्यें हें वर्णन वाचावयास मिळेल.

माहुलीस आलें, ते सैन्य भरतीसाठींच आलें आहों, असें बाजीरावास सांगतां येत होतें.

माहुलीस बाजीराव आला, तो **अनगळांच्या घाटावरच** राहिला. तें ठिकाण त्याला फारच रमणीय वाटलें. बाजीरावाचा अगर त्याच्या नातलगाचा या ठिकाणीं चांगलासा वाडा नव्हता तेव्हां त्याला घाटावर तळ दिल्याशिवाय गत्यंतर नव्हतें. शिवाय अनगळांचा घाटही मोठा सोयीस्कर व राहावयाजोगा होता.

माहुलीस आल्यावर बाजीरावानें सरंजामानिशीं जाऊन महाराजांची भेट घेतली. पेशवा कितीही प्रबल असला तरी सातारच्या पंचक्रोशींत आला कीं, आपण छत्रपतींचे नोकर, छत्रपति हे आपले मालक हें लक्ष्यांत ठेऊन वागत असे. बाजीरावानें तसेंच केलें. सातारच्या हद्दींत पाऊल ठेवतांच पेशव्याच्या नौबती बंद झाल्या. महाराजांपुढें पेशवा अनवाणी चालत गेला व महाराजांना त्रिवार मुजरा करून हात जोडून उभा राहिला. नंतर महाराजांनीं बसावयास सांगितल्यावर आपल्या जाग्यावर बसला.

पेशव्यानें संधि साधून माहुलीस येण्यास महाराजांना बोलावणें केलें व महाराजांनीही तें कबूल केलें. नंतर महाराज व परिवाराची मंडळी माहुलीस पंताच्या वाड्यांत जाऊन राहिली. महाराज मालक असल्यामुळें ब्राह्मण पंतानें आपला वाडा **भ्रष्ट होईल अशी** सबब सांगितली नसावी. नाहींतर त्याकाळीं देखील ब्राह्मणाचें घर मराठ्यास भाड्यानेंही मिळण्याची गोष्ट कशाला ?

महाराजांना आपल्या नादास लावावयाचें असल्यामुळें, बाजीरावानें महाराजांना निरनिराळीं निमित्तें काढून मेजवान्या देण्यास सुरवात केली. साधारण माणूस मेजवानीनें वश होतो, हा व्यवहारच आहे. कारस्थानी माणसें गोड भाषणाबरोबरच गोड गोड पदार्थांचाही उपयोग दुसऱ्यास वश करून घेण्याच्या कामीं करीत असतात. याच पद्धतीचा बाजीरावानें अवलंब केला.

पुढें संधि पाहून बाजीरावानें राजकारणाच्या गोष्टी काढल्या व ज्या इंग्र-

जांशीं सख्य करून तो पेशवा झाला होता, त्यांच्याच संबंधानें म्हणाला. " इंग्रेजाशीं तह झाल्यापासून राज्यास मुळींच सुख झालें नाहीं. त्रास मात्र बेसुमार झाला. बंडाळी फार मातली. बारिक सारिक इनामदार देखील इंग्रेजाशीं सख्य जोडून दौलतीशीं फटकून वागूं लागले आहेत. कांहीं तरी कुरापत काढून बखेडा उपस्थित करतात. इंग्रेजांची त्यांना फूस. तेव्हां आतां हा बखेडा मोडण्यासाठीं इंग्रजांशीं लढाई करून काय तो सोक्ष मोक्ष लावला पाहिजे. " इंग्रजाशीं लढाई करण्याचा आपला बेत असल्याचेंही बाजीरावानें बोलून दाखविलें. महाराजांना खूष करण्यासाठीं व विशेषतः महाराज आपल्या बेतास अनुकूल व्हावेत म्हणून, तो महाराजांना म्हणाला " महाराजांचे बाबतींत मी आतांपावेतों चुकलों. मी भयंकर पातकी आहे. आजपावेतों चूक झाली पण आतां सारी दौलत महाराजांची आहे. इंग्रजांची खोडकी मोडल्यावर सारा कारभार महाराजांवर सोंपवून महाराजांच्या आज्ञेत वागावयाचें मीं ठरविलें आहे. "

बाजीराव जात्याच भिड्या होता. त्यानें मनांत आणलें व आपलें मोहनी अस्त्र एखाद्यावर सोडलें, तर तो माणूस बाजीरावास वश झालाच पाहिजे. महाराजांचे बाबतींत त्यानें अगदीं शर्थ केली. इंग्रजांचे संबंधानें त्यानें महाराजांस असें सांगितलें कीं, ते बोलण्यांत गोड असले तरी कावेबाज मोठे. आपल्यासदेखील त्यांनीं फसविलें आहे. हें त्यानें महाराजांना पटवून देण्याची पराकाष्ठा केली. इंग्रजांबद्दल महाराजांना वरीलप्रमाणें नालस्ती ऐकविण्यांत बाजीरावाचा अंतस्थ हेतु असा होता कीं, महाराजांनीं इंग्रजासंबंधानें कांहीं तरी बोलावें. म्हणजे. त्यांच्या मनाचा ठाव कळेल. शिवाय दुसराही हेतु असा असावा कीं, महाराजांना इंग्रजांच्या इमानाची शंका येऊन त्यांनीं इंग्रजांशीं कांहीं बोलणें सुरू केलें असल्यास तें तसेंच सोडावें.

महाराजांनीं बाजीरावाचा कावा ओळखिला होता. म्हणूनच बाजीरावाच्या होस हो देऊन महाराजांनीं ती वेळ निभावून नेली. महाराज तरुण होते, पण बाजीरावाच्या मोहजालांत अडकण्यासारखे खुळे मात्र खास नव्हते. बाजी-

---

१ चिटणीसाची बखर.

राव निघून गेल्यावर त्यांनीं माईसाहेब महाराजांची भेट घेऊन बाजीरावाच्या म्हणण्याबद्दल त्यांचें मत विचारलें. इतर कारभाऱ्यांचींही मतें विचारून घेतलीं. सर्वांचें मत महाराजांनीं आंखलेल्या धोरणास अनुकूळ असेंच पडलें. महाराजांनीं वरकरणी पेशव्याच्या म्हणण्याप्रमाणें वागावें, इंग्रजांशीं जोडू घातलेली मैत्री तोडू नये, वेळ येईपावेतों गप्प बसावें, असाच सर्वांचा सल्ला मिळाला.

इकडे पेंढाऱ्यांच्या बंदोबस्तासाठीं फौज पाठवा असें बाजीरावाच्या मागें सर जॉन मालकम साहेबाचें टुमणें सारखें लागलें होतें. अधिक महिनाहि संपलेला. तेव्हां पुण्यास जाणें बाजीरावास अगत्याचें झालें. पुण्यास जाण्यापूर्वीं महाराजांनीं आपल्या लवाजम्यासह वासोट्यास जाऊन राहावें अशीं त्यानें महाराजांना सूचना केली व लढाई सुरू झाली कीं आपणांस येऊन मिळावें असें ठरविलें. मोघम उत्तर देऊन महाराजांनीं तें कबूल केलें.

बाजीरावानें पुण्यास परत जाण्यापूर्वीं माहुलीस दोन गोष्टीस उपक्रम केला होता. एक श्रीकृष्णाबाईस घाट व दुसरा आपल्यासाठीं वाडा. घाट बांधण्याचें कारण असें घडल्याचें सांगतात कीं, बाजीरावानें अनगळाकडे त्यांचा घाट मागितला. अनगळ हे देशस्थ ब्राह्मण. त्यांतून ते मोठे भारी सावकार. त्यांचा नांवलौकिक फार मोठा. साताऱ्यापासून ५ मैलांवर पाटेश्वराचे डोंगरावर त्यांनीं कोटी लिंगें बांधलीं. कित्येक देवळें फारच रमणीय आहेत. त्यांनींच सार्वजनीक उपयोगासाठीं श्रीकृष्णाबाईस घाट बांधलेला. बाजीरावानें आपलें

---

१ वासोटा याला व्याघ्रगड असेंही म्हटलेलें आढळतें. हा किल्ला साताऱच्या थेट पश्चिमेस सुमारें १६ मैलांवर कोयनेच्या काठीं सह्याद्रीच्या फाट्याच्या टोकावर आहे. दबा धरून बसलेल्या वाघासारखा हा दिसतो. पूर्वीं हा चंद्रराव मोऱ्याचे राज्यांत मोडत होता. शिवाजीनें मोऱ्यांचा पाडाव केल्यावर तो महाराजांचा झाला. औंधच्या पंत प्रतिनिधींना सदर गडाचा बंदोबस्त करण्याचें काम महाराजांकडून फर्माविण्यांत आल्यावर तो पंताच्या ताब्यांत गेला. पुढें प्रतिनिधींचें व पेशव्याचें वांकडें आलें तेव्हां प्रतिनिधीच्या वतीनें ताई तेलिणीनें हा किल्ला लढविला. त्यांत बापू गोखल्याची फार तिरपीड उडविली; पण अखेर तिचा मोड झाला.

चिरकालीन स्मारक व्हावें म्हणून सदर घाट आपणांस विकत द्या असें अनगळांकडे बोलणें लावलें. त्यावर अनगळांनीं स्पष्ट सांगितलें कीं, " घाट श्रीकृष्णाबाईचा. आम्ही श्रीकृष्णाबाईस दान केला आहे. तेव्हां आतां आम्हास कांहींच करतां यावयाचें नाहीं. " बाजीरावास वाटलें श्रीमंतीच्या जोरावर अनगळ आपलें ऐकत नाहीं म्हणून अनगळांच्या सवाई चांगला घाट बांधण्यास त्यानें सुरवात केली. बाजीरावाचा घाट अनगळाच्या घाटास लागून उत्तरेकडे अपुरा राहिलेला अद्याप आपणांस पहावयास मिळतो. घाट बांधावयास सुरवात केल्यानंतर थोडक्याच दिवसांनीं बाजीरावास काशीवास पत्करावा लागला, त्यामुळें घाटाचे कार्य त्याचे हातून शेवटास गेलें नाहीं.

याच मुदतींत बाजीरावानें वाडा बांधावयास सुरवात केली होती. पाया बांधल्यानंतर वरची इमारत बांधावयास बिचाऱ्या बाजीरावास संधिच मिळाली नाहीं. आतां सदरचा पाया असलेली जागा माहुलीच्या आढाव पाटलांनीं सरकाराकडून लिलांवांत घेतली असून जमीन करण्याचें काम चाललें असल्याचें समजतें. बाजीरावानें खोदलेली विहीर बुजून गेली आहे. आतां डबर फक्त अवशिष्ट आहे. असो.

बाजीरावाची ब्याद पुण्यास परत गेल्यावर महाराजांनीं पुनः चिटणीसास एल्फिन्स्टनकडे पाठविलें व चिटणीसाकरवीं बाजीरावाचा बेत त्यास कळविला. " बाजीराव एक नंबरचा भ्याड. तो तंटाही करणार नाहीं, व लढाईसही उभा राहाणार नाहीं. वठलेल्या झाडास कधीं तरी फळें येतील का ? " अशा प्रकारें सांगून साहेबानें चिटणीसाची समजूत केली व म्हणाला, "यदाकदाचित् लढाई झालीच तर राज्य महाराजांचें आहे तें त्यांच्या ताब्यांत देऊं. याबद्दल शंका नको. तुम्ही या गोष्टी महाराजांना नीट समजावून सांगा. "

चिटणीसानें साताऱ्यास येऊन एल्फिन्स्टननें अभिवचन दिल्याचें वृत्त महाराजांना सांगितलें. एल्फिन्स्टनला आपलें वचन कितपत पाळतां आलें, तें यथाकाल पुढें येणार आहेच.

---

१ His highness is the owner of the government, which will of course revert to him; and you satisfy him of this point.'
Historical sketch by Dr. John Milne.

प्रकरण ८ वें.

पेशवाई बुडाली.

महाराजांशीं बेत ठरवून बाजीराव माहुलीहून परत पुण्यास गेला ही हकिगत मागील प्रकरणांत सांगितली आहेच. महाराजांनीं बाजीरावाचें म्हणणें कबूल केल्यामुळें बाजीरावास व त्याच्या पदरच्या मंडळीस दुप्पट अवसान आलें. बापू गोखले वगैरे मंडळीस स्वतःच्या पराक्रमाची भलतीच घमेंड. त्यांना वाटे कीं इंग्रजांना आपण तेव्हांच चीत करूं. पण छत्रपति महाराज आपलेकडे पाहिजेत. छत्रपति जर का इंग्रजांकडे असले, तर मात्र आपला शहाणपणा चालावयाचा नाहीं. खरें पाहिलें तर महाराजांकडे सैन्यबल मुळींच नव्हतें. महाराज नाणावलेले सेनापतीही नव्हते. पण ते छत्रपति होते. पेशवे किती झाले, तरी महाराजांचे चाकर. महाराजांवर त्यांनीं हुकमत चालविली होती खरी पण महाराजांच्या सन्मुख जावयाचें तर पेशव्याला हात जोडून पायीं अनवाणी चालत जावें लागे, व महाराजांना त्रिवार लवून मुजरा करावा लागे. महाराजांवर चामरें उडवावीं लागत. त्यामुळें रणांगणावर महाराजांच्या समोर पेशव्यास उभें रहाणें इष्ट वाटत नव्हतें. यदाकदाचित् धीर करून पेशवा लढाईस उभा राहाताच तरी त्याच्या हाताखालचें सैन्य त्या गोष्टीस मुळींच कबूल झालें नसतें.

त्यामुळें महाराज आपल्यास कबूल झाले हें बाजीरावाच्या चांगलेंच पथ्यावर पडलें. बापू गोखल्यास दुप्पट अवसान आलें, त्याचेंहि पण कारण हेंच. पण महाराज खरोखर बाजीरावाच्या मोहजालांत अडकले होते कीं, तो जुलुमाचा रामराम होता हें बाजीरावाच्या त्या वेळीं लक्ष्यांत आलें नाहीं. व आपण महाराजांना सर्वसत्ताधीश करतों असें जें आमीष दाखविलें त्या आमीषास बळी पडून महाराज आपल्यास सामील झाले आहेत अशीच त्यानें

आपल्या मनाची कल्पना करून घेतली, व त्यामुळेंच त्याला आनंद झाला. परंतु या गोष्टीच्या पोटीं काय भवितव्य होतें हें त्या बिचाऱ्यास काय माहीत ?

पुण्यास पोहोंचल्यावर ता. १४-१०-१८१७ रोजीं बाजीरावाची व एल्फिन्स्टनची गांठ भेट झाली. माहुलीस बाजीराव असतां मालकम साहेबाची व त्याची भेट होऊन पेंढाऱ्यांच्या बंदोबस्तासंबंधानें बोलणें झालें. त्यावेळीं जशा मासल्याचें बोलणें बाजीरावानें केलें त्याच मासल्याचें बोलणें त्यानें याही प्रसंगीं केलें. दसऱ्यानंतर पेंढाऱ्यांच्या बंदोबस्तासाठीं सैन्य पाठवितों असें एल्फिन्स्टन साहेबास त्यानें आश्वासन दिलें. बाजीराव वरून सारवासारव करीत होता खरा, पण त्याचें हृद्गत बाळाजी नातूकडून एल्फिन्स्टनला कधींच कळून चुकलें होतें.

पुढें विजयादशमीच्या मुहूर्तावर एल्फिन्स्टन व बाजीराव यांच्या दरम्यान बिघाड येण्यास सुरवात झाली. लढाईच्या शंकेनें उभयपक्षीं तयारीस सुरवात झाली. पेशव्याचें सरंजामी सैन्य पुण्यास गोळा होऊं लागलें. प्रसंग पडल्यास सैन्य कोणत्या ठिकाणीं हालवावयाचें, व स्मिथच्या सेनेनें टपाल चुकतांच आणीबाणीचा प्रसंग आहे, हें ओळखून पुण्यास यावयाचें, अशा प्रकारची तजवीज इकडे एल्फिन्स्टननेंही करून ठेविली. अशा प्रकारें दोन्ही बाजू तयार होत्या. निमित्त मात्र पाहिजे होतें. बापू गोखल्यास वाटे, एकदम इंग्रजांवर छापा घालावा, व त्यांचें सैन्य कापून काढावें. तर बाजीरावाचा बेत इंग्रज सैन्य फितूर करावें, व मग लढाईस उभें रहावें. शिवाय बाजीराव तासगांवकर पटवर्धनाची व निपाणकरांची वाट पहात होता. त्यामुळें त्याच्याकडून दिरंगाई चालली होती.

उभय सैन्यांची तयारी होते न होते, तोंच ले. शॉ नांवाच्या इंग्रज अंमलदाराची व विश्रामसिंग नाईक नांवाच्या पेशव्यांच्या नाइकाची, हमरी तुमरी होऊन त्यांत ले. शॉला विश्रामसिंगानें भाल्यानें भोसकून ठार केलें. अशा प्रकारें आगळीक होतांच लढाईस सुरवात झाली.

---

१ ग्रँड डफ भाग ३

मराठ्यांच्या घोडदळानें पहिल्या दिवसाच्या हल्ल्यांत सरशी केली. पण पायदळ शिकवलेलें नसल्यामुळें त्या विजयाचा फायदा पेशव्यांच्या सेनेस मिळाला नाहीं.

दुसऱ्या दिवसाच्या लढाईत इंग्रजांच्या तोफखान्यामुळें पेशव्यांच्या सैन्याचा जोर फिक्का पडला. असें म्हणतात कीं, बाळाजीनें मराठी फौजेला दारूऐवजीं बाजरी मिळावी अशी योजना केली होती. या दुसऱ्या दिवसाच्या संग्रामांत मोरो दिक्षित पेशव्याचा प्रधान कामास आला. दोन हजार स्वार स्वरक्षणासाठीं बरोबर घेऊन बाजीराव लढाईचा प्रसंग पर्वतीच्या टेकडीवरून पहात होता. आपल्या सैन्याची वाताहात होत असल्याचें दिसतांच त्यांना कुमक करण्याचा अगर प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न न करतां, स्वतःच्या बचावासाठीं बाजीराव सैन्य घेऊन सासवडाकडे पळत सुटला. खुद्द मालकच रणांगण सोडून पळत सुटल्यावर बाकी सैन्याची अवस्था काय विचारावी ! 'यथा राजा तथा प्रजा' या न्यायानें बाजीरावाचें सैन्य पळूं लागलें. त्यांतूनहि बापू गोखले वगैरेनीं थोपवाथोपव केली; धीर दिला ; व पुन. लढाईस कंबर बांधिली.

ता. १५।११।१८१७ रोजीं घोरपडीस इंग्रजांची व पेशव्यांच्या सैन्याची लढाई झाली. पण त्यांतही इंग्रजांची सरशी झाली. पुनः ता. १६ ला पेशव्यांच्या सैन्यानें चढाई केली पण शिस्तीनें व तयारीनें लढणाऱ्या इंग्रज फौजेनें त्यांचा मोड केला. इकडे ता. १७।११।१८१७ रोजीं बाळाजी नातूनें पुण्यांतील पेशव्यांच्या शनिवारवाड्यावर युक्तीप्रयुक्तीनें इंग्रजांचें निशाण फडकावलें. बाळाजीनें आपल्या—ब्राह्मणाच्या—हातानें पेशवाईचा अन्तविधी उरकून घेतला असेंच म्हणावें लागतें !

पुण्यावर इंग्रजांचें निशाण फडकलेलें दिसतांच पुणें इंग्रजांनीं घेतलें अशा कल्पनेनें बापू गोखले वगैरे सरदारांस बाजीरावास जाऊन मिळणें अवश्य झालें. व उरलें सुरलें सैन्य गोळा करून बाजीरावाचा माग काढीत ते सासवडास आले. इकडे पुणें इंग्रजांना अगदीं मोकळें मिळालें. तें एल्फिन्स्टननें ताब्यांत घेतलें, व पुढील आशयाचा जाहीरनामा प्रसिद्ध केला. " कांहीं

कारण नसतां, किंवा जाबसालाची तक्रार नसतां, पेशव्यांनीं इंग्रजांशीं बिघाड केला. परंतु त्याकरितां इंग्रज इतरांचें नुकसान करूं इच्छित नाहींत. सर्वांनीं आपआपल्या ठिकाणीं स्वस्थ राहावें. म्हणजे लढाईपूर्वी होतें तसें सर्वांचें चालविलें जाईल.........." या जाहिरनाम्यानें इंग्रजांना इष्ट असा परिणाम घडवून आणला. आपण गप्प बसलों तर आपलें कांहींच नुकसान होणार नाहीं असा स्वार्थाचा विचार करून, जो तो आपल्या ठिकाणीं गप्प बसला. पेशवा कसाहि असला, तरी त्याच्याच औदार्यानें आपणास भाकरी मिळालेली आहे व तोच आपला मालक आहे, संकटाचे प्रसंगीं त्याच्या खांद्यास खांदा भिडवून देशाचें स्वातंत्र्य, इभ्रत व अब्रू हीं राखण्यास झटलें पाहिजे असा विचार कोणाहि सरंजामदारानें, जहागिरदारानें अगर इनामदारानें केला नाहीं. पण यालाहि थोडेंसें कारण होतेंच.

महाराष्ट्रांतले बहुतेक सारे लोक बाजीरावाच्या अंमलास कंटाळले होते. बाजीराव धर्मभोळा व कर्मठ होता, तसाच मूर्ख व अविचारीही होता. धर्म-भोळेपणामुळें त्यानें कित्येक ब्राह्मणांस व खुषमस्कऱ्यांस इनामें करून दिलीं. बाजीरावाच्या कारकीर्दीत जितकी इनामांची संख्या झाली त्याच्या चवथ्या हिश्याएवढीही पूर्वीची संख्या नव्हती. हे इनामदार उत्पन्न करतांना पूर्वीच्या कांहीं कांहीं इनामदारांचीं इनामें काढून घेतलीं. म्हणजे पराक्रमाबद्दल व मर्दुमकी गाजविल्याबद्दल ज्यांना पूर्वीच्या छत्रपतींनीं अगर पेशव्यांनीं इनामें करून दिलीं होतीं, तीं त्यांच्याकडून नाहक काढून घेऊन बाजीरावानें आपल्या समोर गोंडा घोळणाऱ्या नादान माणसांना दिलीं! ही इनामांची गोष्ट झाली !

इतर कारभारांतहि स्थिति अशाच मासल्याची होती. अशी गोष्ट सांगतात कीं, मामलतीवर नेमणूक होऊन मामलतीचा ताबा (चार्ज) घेण्यास चाललेला माणूस मामलतीवर चालला असतां घोड्यावर बसून मागें मागें पहात जाई. कारण त्याला अशी भीति वाटे कीं, आपल्या मागून आपणास मामलतीवरून दूर करून दुसऱ्याची नेमणूक केली आहे असा हुकूम सुटला असला तर तो

वाटेंतच आपल्या हातीं यावा. कदाचित् ही अतिशयोक्ति असेल देखील, पण इतकी गोष्ट खरी, कीं पेशवाई अंमलांत शाश्वती (stability) अशी नव्हतीच. त्यामुळें लोकांना कोणत्याच गोष्टीचा विश्वास वाटत नसे. केव्हां काय हुकूम सुटेल व रावाचा रंक अगर रंकाचा राव कोण केव्हां होईल याचा भरंवसा नव्हता. या प्रकारामुळें राजसत्तेवरील लोकांचा विश्वास व त्याजबरोबर निष्ठा हीं मावळूं लागलीं होतीं. जनता मुकी व हिंदो असल्यामुळें पेशव्यांना जनतेच्या मनाचा सुगावा लागला नाहीं. पण वस्तुस्थिति मात्र आम्हीं म्हटल्याप्रमाणेंच होती.

याचा परिणाम असा झाला कीं, इंग्रजी जाहीरनाम्यानें लोकांना आनंद वाटला. या जाहीरनाम्यामुळें बाजीरावाच्या अंमलास लोक इतके कंटाळलेले होते! त्यांना वाटलें कीं, जुलमाचे व बंडाळीचे दिवस आतां संपले! या कारणामुळें पेशव्याला मदत करण्यास होतां होईल तों प्रत्येकजण टाळाटाळ करूं लागला.

बापू गोखले वगैरे बाजीरावास शोधीत सासवडास गेले. पण बाजीराव तेथें होता कोठें? सासवडास थोडे दिवस राहिल्यावर पटवर्धनास जाऊन मिळण्यासाठीं तो जेजुरीस गेला व तेथून माहुलीस जाऊन राहिला. सासवडाहून त्यानें वासोट्यास महाराजांना आणण्यासाठीं माणसें पाठविलीं, व माहुलीस तो महाराजांची वाट पहात थोडा थांबला. इकडे बाजीरावाचा माग काढीत बापू गोखले सासवडास आला होता. तेथें त्यास बाजीराव जेजुरीस गेल्याचें कळलें. बापू गोखले जेजुरीस गेला, व तेथून बाजीरावाचा पत्ता काढीत माहुलीस आला.

बापू गोखले आल्यानंतर बाजीरावास बरीच उमेद आली. आतां तो महाराजांची वाट पहात होता. महाराज आपल्या गोटांत असण्यांत बाजीरावास दोन प्रकारचे फायदे दिसत होते. (१) एक महाराज आपले बरोबर असले कीं स्वामिभक्तीनें पुष्कळसे सरंजामदार आपलेकडे येतील; व त्यामुळें इंग्रजांशीं लढण्यास आपणास सोयीचें होईल. (२) दुसरें, महाराज आपल्याकडे

असले म्हणजे त्यांना इंग्रजांशीं मसलत करण्यास व इंग्रजांच्या साहाय्यानें आपल्यास हांकून देण्यास संधि सांपडणार नाहीं. या दोन्ही हेतूंनीं बाजीराव महाराजांची मार्गप्रतिक्षा करीत माहुलीस होता.

पण बाजीराव एक नंबरचा बेहिम्मती व भित्रा. त्याला कोणीसें सांगितलें कीं, इंग्रज फौज आपला पाठलाग करीत येत आहे. मग काय विचारावें ? त्याला पळतां भुई थोडी झाली. वासोट्याहून महाराज व त्यांचा परिवार येऊन दाखल होई पावेतोंही बिचारा तेथें थांबला नाहीं ! बाजीराव माहुलीहून निघाला तो महागांवावरून कोरेगांवास गेला व तेथून वर्धनगडाच्या खिंडीनें घाट चढून महिमानगड शिंगणापूर मार्गानें तो पंढरपुरास आला. महाराज, त्यांचे दोघे धाकटे बंधू, माईसाहेबमहाराज व परिवाराची मंडळी, बाजीरावाच्या सूचनेप्रमाणें त्याच्या सैनिकांबरोबर आपल्या इभ्रतीस साजेशा स्वारीच्या थाटानें निघाली. पुढें बाजीराव व त्याला गांठण्यास निघालेले महाराज असे दौड करीत चालले होते. अखेर पंढरपूर सोडून बाजीराव जेजुरीकडे निघणार, तोंच महाराजांची व पेशव्याची गांठ पडली. बाजीराव पंढरपुरास कांहीं दिवस थांबला म्हणून तरी गांठ पडली. नाहीं तर पडलीच नसती हें खास !

पंढरपुरास देखील बाजीराव थांबला नसता. पण त्या ठिकाणीं गेल्यावर त्याच्या बरोबरच्या लोकांनीं त्यास थांबण्याबद्दल आग्रह केला. गोखले, रास्ते, पटवर्धन वगैरे सरदार बाजीरावाच्या या पळण्याच्या शर्यतीस कंटाळून गेले होते; सैन्याचीही बरीच खराबी झाली होती; व शिवाय त्रिंबकजी डेंगळा त्यास पंढरपुरास भेटणार होता; म्हणून बाजीरावानें मोठ्या निरुपायानें पंढरपुरास मुक्काम केला, व तोही थोडे दिवस.

पंढरपुरास या पळपुट्या ब्राम्हणास धीर कोठला निघायला ? त्याला क्षणोक्षणीं स्वप्न पडे कीं इंग्रज आले ! त्यांनीं आपल्यास पकडलें. पेशवाई पदावरून दूर केलें. पुनः शिवनेरीमध्यें आपल्यास कारागृहवास आला. अशा प्रकारच्या दुःस्वप्नांनीं तो भांबावून जाई व म्हणूनच तो पळपुटा बनला होता.

स्वार्थाच्या कल्पनेनें म्हणजे स्वतःचा जीव बचावण्याच्या मोहास बळी पडला नसता तर राजधानीचें ठिकाण सोडून बाजीराव पळाला नसता. पण नाना फडणीसाप्रमाणें बाजीरावास देखील गादीच्या इभ्रतीपेक्षां, देशाच्या स्वातंत्र्यापेक्षां स्वतःच्या प्राणांची किंमत जास्त वाटत होती ! व म्हणूनच पळापळ करण्याचें अविचारी धोरण त्यानें स्वीकारलें होतें.

बाजीराव पंढरपुराहून निघाला तो पुनः जेजुरीस आला. तेथून ब्राह्मणवाड्यास पळत सुटला. या ठिकाणीं त्रिंबकजी डेंगळा त्यास भेटला. इतक्यांत कर्नल स्मिथ चालून येत असल्याचें त्यास खात्रीलायक कळलें. तेव्हां बाजीरावानें दक्षिणेकडे मोर्चा वळविला. तो कोरेगांव[1] येथें पोहोंचतो तों कर्नल बर त्याला आडवा आला. बाजीरावाची अगदीं गाळण उडाली ! पण त्रिंबकजीनें त्याला धीर दिला. १८१८ च्या जानेवारीच्या पहिल्या तारखेस कर्नल बरच्या सैन्याची व त्रिंबकजीच्या सैन्याची लढाई झाली. डेंगळ्यानें **पराक्रमाची शर्थ केली**, व कर्नल बरचा मोड केला. इंग्रज लोक शकुन पाहणारे असते तर त्यांनीं तहाची भाषा चटकन् सुरू केली असती. पण शकुनावर इंग्रजांनीं कधींच विश्वास ठेवला नाहीं, नव्हे शकुनाचा अर्थच ते निराळा लावतात. विलियम धी कॉङ्करर इंग्लडच्या किनाऱ्यावर उतरतांना निसरून पडला. याचा अर्थ इंग्लंड आपल्या हस्तगत होणार असा इंग्रजांनीं लावला. तोच एखादा हिंदी असता तर त्यानें भलताच अर्थ करून आपला व आपल्या सेनेचाहि उत्साहभंग केला असता. बाजीरावाचीच गोष्ट घ्या ना. इंग्रजांवर स्वारी करण्यास बाजीरावाचें सैन्य निघालें तेव्हां त्यांच्या एका निशाणाची काठी किडून मोडण्यासारखी झाली होती ती मोडली ! झालें या एवढ्याशा गोष्टीनें पेशवा भांबावून गेला. त्याच्या सैन्यानेंही धीर सोडला, व मग असलें नाउमेद झालेलें सैन्य कसें लढलें, हें वाचकांच्या लक्षांत असेलच.

कर्नल बर च्या बरोबर झालेल्या लढाईत बाजीरावास जो विजय मिळाला

---

1 पुणें जिल्ह्यांतील.

त्याचा फायदा त्यास करून घेतां आला नाहीं. कारण तेवढ्यांत त्यांस बातमी मिळाली कीं, कर्नल स्मिथ हा आपणावर उत्तरेकडून चाल करून येत होता, तो अगदीं जवळ आला आहे. मग बाजीरावास धीर कोठला निघायला? तो जो दक्षिणेकडे पळत सुटला तो साल्प्या घाटानें घटप्रभेपावेतों पळत गेला. पण तिकडे मद्रासेहून जनरल मनरो चाल करून येत असल्याचें कळलें. तसा मोर्चा फिरवून पुनः सोलापुराकडे निघाला. तेथेंहि न थांबतां पुनः पश्चिमेकडे वळला.

इकडे कोरेगांवीं कर्नल बरचा पराभव झाल्याचें कळतांच जनरल स्मिथ बाजीरावाच्या मागें लागला. तो बाजीरावाचा पाठलाग करीत आदर्की घाटानें कोरेगांवास आला. तेथें आल्यावर सातारा घेऊन मग पुढें जावें असा त्यास सल्ला मिळाला. पुणें हातीं पडल्यामुळें जसें इंग्रजांना अर्धे अधिक यश मिळालें होतें त्याप्रमाणेंच सातारा हस्तगत होण्यांत इंग्रजांचें यश पुष्कळसें वाढणार होतें. कारण राजधानीचें ठिकाण हस्तगत झालें कीं तें राज्यच हस्तगत झाल्यासारखें असतें असा युद्धशास्त्राचा सिद्धांत आहे. राजधानीचें ठिकाण गमावून बसल्यानंतर शिस्तीनें लढाई करणें व सैन्याला मदत करणें अत्यंत अवघड असतें. शिवाय सामर्थ्याचें एकीकरण करणेंही अवघड असतें. राजारामाच्या कारकीर्दींत मराठ्यांना जिंजिवास पत्करावा लागला याचें कारण राजधानीचें ठिकाण दुर्गम असावें व तें जिंजी हेंच सोयीचें होतें म्हणून राजारामासुद्धां सारे मराठे वीर जिंजीला गेले. पुणें प्रांत जहागिरीचा असतां शिवाजी महाराजांनीं राजधानी केली ती रायगडास. यावरून देखील आमच्या विधानाची सत्यता पटणार आहे.

सातारा घेण्याचा विचार ठरतांच " **महाराज पेशव्यांचे कैदी** आहेत, त्यांना सोडविण्यास आपण आलों आहों, छत्रपतीचें राज्य पेशव्यानें बळकावलें आहे तें छत्रपतीच्या ताब्यांत देण्यासाठीं महाराजांना मदत करावयास आपण आलों आहों" असें इंग्रज अधिकारी लोकांना सांगत सुटले. ज्या सोंगाची संपादणी जाहीरनामे वगैरे काढून पुण्यास एल्फिन्स्टन करीत होता, त्याचीच बतावणी

जनरल स्मिथनें इकडे चालविली होती. आपण कोणत्या उद्देशानें येत आहों हें स्मिथनें साताऱ्याच्या किल्लेदारास निरोप पाठवून कळविलें.

ता. १० फेब्रुआरी १८१८ रोजीं कर्नल बोल व जनरल स्मिथ हे माहुलीस आले. त्या वेळीं माहुली चांगला बागायताचा गांव असावा. वाटेंत इंग्रजी लष्करानें मळ्यांची नासधूस केली असें वाचावयास मिळतें. माहुलीजवळ कृष्णापार झाल्यावर जनरल स्मिथनें आपल्या सैन्याचा मोर्चा **अजिंक्य ताऱ्या-**कडे वळविला. पूर्व संकेताप्रमाणें चार तोफांचे आवाज काढले. तेव्हां किल्लेदार व शिबंदीचे स्वार किल्याखालीं स्मिथच्या सेनेस सामोरे गेले. नंतर उभयतां सेना किल्ल्यावर आल्या. किल्ल्यावरील जरीपटका उतरवून त्या जागीं दोन मिनीटें कंपनी सरकारचें युनिअन जॅक उभारण्यांत आलें. नंतर पुनः तें उतरवून त्याजागीं पुनः जरीपटका फडकविलें !

असा हा दोन मिनिटांचा फार्स कां करण्यांत आला असावा हें चाणाक्ष वाचकांच्या लक्ष्यांत आलें असणार ! अधिकारी केवढाही मोठा असला तरी तो ईस्ट इंडिया कंपनीचा नोकर असल्यामुळें, प्रत्येक गोष्टीबद्दल कंपनी सरकारास जबाबदार असे. त्यामुळें वरून खालपर्यंत सर्वांना एकाच धोरणानें वागावें लागत असे. मुंबई सरकारचें धोरण एल्फिन्स्टनच्या जाहीरनाम्यांत जाहीर झालें होतें. त्याच धोरणानें कर्नल स्मिथ साताऱ्यास येतांना वाटेंत सांगत सुटला होता. त्याचीच नक्कल ' अजिंक्य ताऱ्याच्या' बाबतींत करण्यांत आली. जनरल स्मिथला असें भासवावयाचें होतें कीं, **प्रतापसिंह** महाराजांना मदत करण्यासाठीं आपण लढत

---

१ There was a considerable garrison in the fort of Sattara, but the Killedar would not make a resolute defence, or else he might have laughed at the efforts of General Smith for its reduction. After receiving a few shells from a mortar battery, the enemy evacuated it, *without returning a shot* and thoughtless accompained the party that took possession of a place truly wonderful, both in respect to nature and art. Fifteen Years in Satara.

आहों. सातारचा किल्ला आपण लढून घेतला, व नंतर तो महाराजांना दिला. जनरल स्मिथचें हें करणें, सातारच्या मराठी जनतेला त्यावेळीं समजलेंही नसेल; पण कंपनीच्या डायरेक्टरांकडे टपाल रवाना करतांना त्यामध्यें दाखल करण्यास हें महत्त्वाचें खास होतें.

ईस्ट इंडिया कंपनी ही व्यापारी कंपनी. तिच्या नोकरांना आपल्या स्वतःच्या जबाबदारीवर वाटेल तो धांगडधिंगा घालतां येत नव्हता. आपण जें कांहीं करतों, तें कायदेशीर असेंच करतों, असें दाखविणें त्यांना भाग होतें. मराठ्यांशीं लढाई उपस्थित केली, ती मराठ्याचें राज्य नाहींसें करण्यासाठीं केली नसून, पेशव्याच्या कैदेंतून मराठेशाहीच्या अधिपतींची सुटका करण्यासाठीं आपण जुलमी व बेइमानी पेशव्याशीं लढत आहों. सातारच्या किल्ल्यावर महाराजांना पेशव्यांनीं कैदेंत ठेविलें होतें. तो किल्ला आम्ही जिंकून घेतला, व नंतर तो महाराजांचा महाराजांना दिला, हा बाहाणा करण्याच्या हेतूनेंच जनरल स्मिथनें तोफांचे आवाज, लढाऊ पद्धतीनें किल्ल्यांत प्रवेश, निशाणांची अदलाबदल वगैरे क्षुल्लक दिसणाऱ्या पण महत्त्वाच्या गोष्टींचा फार्स करून दाखविला.

या क्षुल्लक गोष्टींचा इंग्रजांनीं भरपूर फायदा करून घेतला. भोळ्या मराठी जनतेला वाटलें, कीं इंग्रज हे आपले कैवारी आहेत. आपल्या मालकाला पेशव्याच्या कैदेंतून सोडाविण्यासाठीं आलेले देवदूत आहेत. त्यांना स्वार्थ नाहीं, मुलूख जिंकण्यासाठीं ते आलेले नाहींत; तसें असतें तर सातारचा अजिंक्य किल्ला त्यांनीं जिंकून घेतल्यावर परत महाराजांना दिला असता काय? भोळी बिचारी मराठी जनता. त्यांना वाटलें, स्वार्थी काय ते आपले लोक. इंग्रजांचा अवतार परोपकारासाठीं. इंग्रजांनीं पेशव्यास पकडलें, कीं मग महाराज सरकारांचेंच राज्य होणार! पेशवाईच्या अमदानींतील बेबंदशाही आतां नाहींशी होणार. रामराज्यासारखे दिवस आपल्याला येणार. या आशेनें सारे लोक इंग्रजांसंबधानें भरंवसा धरून आपल्याच जागीं स्वस्थ राहिले. कित्येक तर वरील

प्रकारच्या कल्पनेनें इंग्रजी फौजेस मदत करीत होते. त्यांच्या सहानुभूतीचा ओघ स्वदेशीय पेशव्याकडे न वळतां, परकीय इंग्रजांकडे वळलेला होता.

इंग्रज महाराजांना मदत करावयास आले नसून, ते आपला मुलूख गिळंकृत करणार आहेत, अशी शंका जर मराठ्यांना येती, तर त्यांनीं इंग्रजांचा प्रतिकार सहज केला असता. ज्या मराठ्यांनीं विशेष प्रकारची संघटना नसतांना नेताजी, तानाजी, धनाजी, संताजी यांसारख्या मराठा मर्दांच्या आधिपत्याखालीं विजापुरकरांस नामोहरम करून राज्य संपादन केलें व प्रचंड सैन्य घेऊन कैक वर्षे महाराष्ट्रांतच मराठ्यांशीं झुजत असलेल्या औरंगजेबासारख्या बलिष्ट दिल्लीपतीस दाद तर दिलीच नाहीं पण " या अल्ला " करावयास लावलें, तेच मराठे इंग्रजांना असे सहसासहजीं पाडाव करतां आले नसते! ता. ११-२-१८१८ रोजीं इंग्रजानीं जो जाहीरनामा प्रसिद्ध केला त्यामध्यें असें म्हटलें होतें कीं:—

"बाजीराव पेशव्याच्या कैदेंत असलेल्या साताराच्या महाराजांना आम्ही मुक्त करणार आहों; व त्यांना व त्यांच्या कुटुंबियांना सुखानें व वैभवानें राहातां येईल एवढ्या मोठ्या विस्ताराचें स्वतंत्र राज्य करून देणार आहों. याच उद्देशानें साताराचा किल्ला आम्हीं सर केला व त्यावर महाराजांचा जरीपटका उभारला आहे, व महाराजांच्या माजी दिवाणांना कामावर हजर होण्यास कळविलें आहे[1] .... "

---

१ The Raja of Sattara, who is now a prisoner in Bajirao's hands, will be released, and placed at the head of an independent sovereignty, of such an extent as may maintain the Raja and his family in comfort and dignity. With this view the Fort of Satara has been taken, the Raja's Flag has been set up in it, and his former ministers have been called into emyloyment. Whatever country is assigned to the Raja will be administered by him, and he will be bound to establish a system of justice and order.

Maharanee Sagunabai's Appl. page 107.

या जाहीरनाम्यावरून इंग्रज कोणत्या धोरणानें मराठ्यांशीं वागत होते याचा बोध सहज होणारा आहे. यामुळेंच मराठे इंग्रजांवर विश्वास टाकून गप्प बसले होते. नाहींतर त्यावेळीं देखील मराठे कमी सामर्थ्यवान् होते असें नाहीं. असो.

सातारा येथील किल्ला घेतल्याचा फार्स केल्यानंतर, जनरल स्मिथ बाजीरावाचा पाठलाग करीत निघाला. अखेर अष्टी येथें उभयतांची गांठ पडली. पेशव्याच्या मनांत तोंड चुकवून पळून जावयाचें होतें. परंतु त्याच्या सरदारांना तें मुळींच पसंत नव्हतें. अशा पळण्यानें सैनिकांमधील वीरवृत्ती नष्ठ होऊन ते सेनापतीच्या ताब्यांत राहीनासे होतात. म्हणून एकदां दोन हात होऊन काय तो सोक्षमोक्ष करून घ्यावा, असा त्यांचा विचार पडला; व आपल्या पळापळींत सैन्याची खराबी फार झाली आहे, व हालअपेष्टांनीं सैनिक गांजून गेले आहेत, वगैरे गोष्टी सांगून त्यांनीं बाजीरावाची समजूत घातली; व ते लढाईस सिद्ध झाले !

ता. २० फेब्रुआरी १८१८ रोजीं अष्टी येथील समरांगणावर बापू गोखले यानें लढाईस प्रथम सुरवात केली. घोडदळ बरोबर घेऊन त्यानें इंग्रजांवर हल्ला चढविला. इंग्रजी सैन्य गोंधळून गेलें व त्यांची पांगापांग होणार, तोंच २२ व्या पलटणीचा अंमलदार कॅ. डॉस् यानें झटपट पुढें होऊन बाजू सांवरून धरली. बापू गोखल्यास जबर दुखापत झाली. परंतु सैन्यास स्फुरण यावें म्हणून तो निकरानें लढतच होता. पण इंग्रजांनीं उलट चढाई केल्याचें पहातांच बाजीराव रणांगण सोडून धूम पळत सुटला. बाजीरावाच्या पळण्यामुळें सैन्यांत बेदिली उत्पन्न होऊन, जो तो बाजीरावाबरोबरच पळत सुटला. बेबंदशाही माजली व सगळीकडे अस्ताव्यस्तपणा झाला. गोविंदराव घोरपडे व बापू गोखले लढाईत पडले. इंग्रजांकडचा फक्त १ माणूस मेला तर मराठ्यांकडील

---

१ ग्रँट डफ पहा २ चिटणीसाची बखर Historical sketch, शेडगांवकर बखर. मराठी दत्तर रुमाल १ ला.

सुमारें शेंपन्नास माणसें मेलीं म्हणजे एका दृष्टीनें पाहिलें तर अष्टीची लढाई म्हणजे एक बारकीशी चकमक होती !

पण ह्या छोट्या चकमकीनें भयंकर क्रान्ति केली. या लढाईत महाराजांना मागें ठेवून बाजीराव कोपरगांवाकडे पळत सुटला. मराठी सैन्याची पांगापग झाल्यावर लूट करण्यासाठीं इंग्रजांच्या २२ व्या ड्रागून कंपनीनें मराठ्यांच्या छावणीवर हल्ला केला. महाराजांच्या परिवारास त्यांनीं वेढा दिला, व इतरां-प्रमाणें महाराजांनाही निःशस्त्र होण्याबद्दल सैनिक सांगू लागले. तरुण छत्र-पतींनीं तें जुमानलें नाहीं. प्रकरण बरेंच वर्दळीवर आलें. शस्त्रत्याग करून जगण्यापेक्षां शिवरायाच्या वंशजानें मेलेलें काय वाईट ! अशा विचारानें तरुण छत्रपति आपल्या छोट्या परिवाराची तयारी करून तलवार उपसून खडे उभे झाले.

महाराजांच्या पदरच्या माणसानें महाराजांच्या नांवाचा पुकारा केला, तो ऐकून कर्नल प्रिंग्ले टेलर त्या ठिकाणीं आला; व मध्यें पडून त्यानें चकमकीचा प्रसंग टाळला. महाराजांची त्या वेळची ती शांत, पण करारी मुद्रा पाहून महाराजांच्या शूरवृत्तीचें कर्नल साहेबांस मोठें कौतुक वाटलें. महाराजांच्या या वीरवृत्तीचा ठसा कर्नल टेलरच्या मनावर कायमचा राहिला. पुढें २० वर्षांनीं त्यानें महाराजांच्या या वेळच्या मुद्रेचें यथार्थपणें वर्णन केल्याचें प्रसिद्ध आहे.

महाराज, त्यांचे दोन बंधू व राजमाता माईसाहेब सहपरिवार इंग्रजांच्या छावणींत कर्नल प्रिंग्ले टेलर याजबरोबर गेले. जनरल स्मिथ याला जखम

---

१ Before me was a youth, with calm brow and resolved mind, submitting to be cut down by the men of the 22nd Dragoons, in preference to the dishonour of relinquishing his sword. When I saved him I felt that such a spirit could never descend to any of the meaness and follies with which he has since been charged.

झाली होती, पण महाराज हस्तगत झाले आहेत अशी बातमी समजतांच त्यांना भेटण्यासाठीं तो लगबगीनें पळत सुटला. महाराजांची व त्याची वाटेंतच गांठ पडली !

इकडे बाजीराव रणांगणांतून पोबारा करून निघाला तो कोपरगांवीं जाऊन थांबला. त्याच्यामागून पळत निघालेले व पराभूत झालेले सैनिक त्याला कोपरगांवींच येऊन मिळाले. त्यांच्याकडून महाराज इंग्रजांच्या हस्तगत झाल्याचें समजतांच बाजीरावाच्या तोंडचें पाणीच पळालें ! तसेंच ज्याच्या हिमतीवर आपण इंग्रजांशीं लढाई करण्यास प्रवृत्त झालों, तो बापू गोखलेही धारातीर्थी पडल्याचें त्याला समजलें. आतां बाजीराव लढणार कोणाच्या जीवावर ?

इंग्रजांशीं तह करावयास जावें, तर इंग्रजांकडे त्याची पत राहिली होती कोठें ? शिवाय आतां त्यांनीं आपणास पूर्वीइतकीही सत्ता दिली नसती, असें त्यास वाटे. अष्टीच्या लढाईपूर्वी इंग्रजांनीं छत्रपति महाराज राज्याचे मालक असून पेशवा बंडखोर आहे; त्यास कोणीही मदत करूं नये, लोकांनीं पेशव्यास चावडी दिल्यास पुनः ती वसूल केली जाईल अशा आशयाचा जाहिरनामा काढला होता. अष्टीच्या चकमकीनंतर छत्रपति महाराज इंग्रजांच्या बाजूस अशी स्थिति असल्यामुळें बाजीरावास महाराष्ट्रांत थारा मिळतो कुठला ? रागरंग ओळखून पटवर्धन सरदारांनीं बाजीरावाची रजा घेतली, व घरचा मार्ग सुधारला. इंग्रजांस शरण गेले, व आपल्या जहागिरी राखल्या. धन्याबद्दल —बाजीरावाबद्दल—कांहींच फिकीर बाळगिली नाहीं. तेंच राजाराम महाराजांच्या वेळचे ब्राह्मण, प्रभू, मराठे वगैरे सरदार! त्यांनीं आत्मयज्ञ केला, पण राजारामास अंतर दिलें नाहीं !

बाजीरावाच्या मागें इंग्रजी फौज लागली होती. त्यामुळें तो कोपरगांवाहून होळकराची अगर नागपूरकर भोसल्याची मदत मिळेल म्हणून उत्तरेकडे पळत सुटला. शेवगांस आल्यानंतर त्याचा भाऊ चिमाजी अप्पा व नारोपंत आपटे व इतरही बरेचसे सरदार कंटाळून बाजीरावचा निरोप घेऊन माघारी फिरले,

तेव्हां शिंद्यास जाऊन मिळण्यासाठीं तो उत्तरेकडे निघाला, तों माल्कमसाहेब आडवा आला.

बाजीरावाची स्थिति आतां अत्यंत शोचनीय झाली होती. जातभाई म्हणून ज्यांच्यावर त्याचा विश्वास ते चित्पावन सरदार त्याला सोडून गेलेले. मराठ्यांसंबंधानें पाहिलें तर बाजीरावाच्या लहरी, बेबंदशाही व जुलमी अंमलास कंटाळल्यामुळें ते नाराज होते. शिवाय त्यांच्या समजुतीनें हा लढा पेशवे व इंग्रज यांच्यामधील नसून पेशवे व महाराज यांच्यामधील आहे, म्हणून ते पेशव्यास मुळींच थारा देईनात. पेशव्यानें आपल्या सरंजामदाराकडे मदतीची याचना—पाहिजे तर फर्मान म्हणा—केली. पण त्यांपैकीं बहुतेक कांहीं ना कांहीं सबबीवर इंग्रजांस सामील झालेले. कित्येकांनीं बाजीरावाचा हुकूम आला म्हणून सरंजमाच्या अटीस अनुसरून सैनिक पाठविले खरे, पण ती नुसती खोगीरभरती होती. सैनिकांमध्यें जो स्वाभिमान, जी स्वामिनिष्ठा, व पराक्रमाची आवड असावी लागते त्यांपैकीं, कोणतीही बाबत त्यांच्यामध्यें नव्हती. उलट आयत्या वेळीं ही खोगीरभरती उसनेपासने घोडे जमवून केलेली असल्यामुळें सदर सैनिकांना स्वतःचा जीव बचावून व विशेषतः आपलें घोडें बचावून शीरसलामत परत या असा उपदेश केलेला होता. अशा प्रकारचे शिपायी पळ काढण्यांत तेवढे पटाईत ! मग तरवार कसली गाजवतात ? असल्या खोगीरभरतीच्या सैन्याच्या बळावर बापू गोखले काय लढणार ! ज्या ज्या वेळीं बाजीराव समरांगण सोडून दुसरीकडे पळत जाई तेव्हां तेव्हां, संधि साधून सरंजामी सैन्य बाजीरावास सोडून निघून जात असे.

बाजीराव अशीरगडास पोहोंचला, तेव्हां त्याच्याजवळ जें सैन्य शिल्लक राहिलें होतें, तें सारें परदेशी, अरब, पुरभय्ये वगैरे लोकांचें. बरें, या लोकांचे १॥–१॥, २–२ वर्षांचे पगार थकलेले. शिवाय पेशव्याच्या पळापळींत त्यांचे खाण्यापिण्याचे हाल झालेले; अशा या बेकार म्हणून बेकैद झालेल्या सैन्यावर ताबा चालवून त्यांना काबूंत ठेवील असा सामर्थ्यवान् सेनापतीही नव्हता.

अशा स्थितींत विश्वासघात करून या लोकांनीं आपणास पकडून इंग्रजांच्या हवाली केलें तर काय घ्या; अशी शंका बाजीरावाच्या मनांत आली मात्र. तों या भीषण कल्पनेनें बाजीराव अगदीं गोंधळून गेला. सैन्यानें कैद करून आपणास मालकम साहेबाच्या हवालीं करण्यापेक्षां आपणच इंग्रजांशीं तह केला तर—

असा विचार करून महू येथें मालकमसाहेब होते त्यांच्याकडे तह करण्यासाठीं बाजीरावानें आपला वकील पाठविला. लढाईचा शेवट लवकर होतो व तो तडजोडीनें, आपणास फायदेशीर असा होतो हें मनांत आणून मालकमसाहेबानें तहाचें बोलणें मान्य केलें व आपल्याच जबाबदारीवर बाजीरावाच्या सैन्याचा थकलेला पगार देण्याचें व बाजीरावास ८ लाखांची जहागिरी देण्याचें त्यानें कबूल केलें. त्यानंतर ता. १८ मे १८१८ रोजीं बाजीराव मालकमच्या सैन्यांत दाखल झाला. " मी दक्षिणेंत कधींहि जाणार नाहीं. मी व माझे वारस पेशवाईवर हक्क सांगणार नाहीं. " अशी त्यानें मालकम साहेबास लेखी कबूली दिली, तेव्हांच गव्हर्नर जनरल मार्किस ऑफ हेस्तिंग्ज् यानें ८ लाखांच्या जहागिरीस मंजुरी दिली. अशा प्रकारें पेशवाईवरील हक्क सोडल्याचें बाजीरावानें कबूल केल्यामुळें बाळाजी विश्वनाथापासून चालत आलेली पेशवाई एकदांची नष्ट झाली !

बाजीरावास ब्रह्मावर्तीं ६ चौरस मैलांचें ८ लाख उत्पन्नाचें छोटेसें संस्थान इंग्रजांनीं करून दिलें; व त्याच्यावर देखरेख ठेवण्यासाठीं एक रेसिडेंट नेमिला. बाजीरावास संस्थान करून देण्यांत इंग्रजांची मुत्सद्देगिरी चांगलीच दिसून येते. संस्थानिक बनविण्याऐवजीं इंग्रजांनीं बाजीरावास वर्षासन करून दिलें असतें तर त्यास मोकळें असल्यासारखें वाटलें असतें, व तो असंतुष्ट राहिला असता. कदाचित् तशा स्थितींत तो शिंदे, होळकर वगैरेकडे संधान बांधून पुनः सत्ता संपादन करण्याच्या मार्गास लागला असता. संस्थानिक केल्यामुळें पूर्वींपेक्षां आपण जास्त सुखी झालों, असें त्यास वाटूं लागलें. पुण्यास जे चाळे बाजीरावाचे चालू होते तेच ब्रह्मावर्तास त्याला जास्त प्रमाणावर करतां येऊं लागले.

ब्रह्मावर्ती राहूं लागल्यावर बाजीरावानें आणखी ५ लग्नें केलीं. सन १८५१ सालीं सुमारें ७६ वर्षांचा होऊन बाजीराव मरण पावला. अशा प्रकारें शेवटच्या पेशव्याचा शेवट झाला.

प्रकरण ९ वें.

पुनः सातान्यास.

अष्टीच्या संग्रामांत लढाई ऐन रंगांत आल्यावेळीं रणभूमि सोडून बाजीराव कोपरगांवास पळाला, व महाराज व परिवारांतील मंडळी इंग्रजांच्या हातीं लागली व त्यांच्या छावणींत येऊन दाखल झाली हा मजकूर मागील प्रकरणांत आला आहेच. पण ही गोष्ट कशी घडून आली हें कळणें आवश्यक आहे.

पेशव्यानें वासोटा किल्ल्याहून महाराजांना सहपरिवार काढून घेतलें व त्यांना घेऊन तो पळत सुटला होता. इंग्रजांनीं पेशव्याला बंडखोर ठरविलें होतें; व त्याच्या हातांतील महाराजांना गांठण्यासाठीं त्यांचे प्रयत्न चालले होते. या कामीं इंग्रजांची व महाराजांची आगाऊ बोलाचाल झालेली होती. त्याकामीं इंग्रजांनीं आपल्या 'पेटंट' हस्तकामार्फत पुढीलप्रमाणें कारस्थान केलें होतें.

हा 'पेटंट' हस्तक म्हणजे बाळाजो नारायण नातू, हा होय. मराठ्यांच्या गृहछिद्रांची बातमी मिळविण्यास व घरबुडवेपणाची कामगिरी करण्यास याच माणसाचा एल्फिन्स्टनला उपयोग होई. महाराजांना हस्तगत करण्याच्या कामगिरीवर एल्फिन्स्टननें याच माणसाची नेमणूक केलेली होती. सातान्यास जाऊन बाळाजोनें विठ्ठल बल्लाळ व खंडेराव राजे शिर्के यांची भेट घेतली व एल्फिन्स्टनचा निरोप त्यांना कळविला. त्यावरून नरसू काकडे यास पेशव्याच्या सैन्यांत महाराज होते, तेथें पाठविण्यांत आलें. पेशव्याचा मुक्काम एकाच ठिकाणीं नव्हता. तेव्हां पत्ता काढीत काकड्यानें सोलापूर येथें महाराजांची

गांठ घेतली, व एल्फिन्टनच्या वतीनें बाळाजीच्या व शिर्के मामा व विठ्ठल बल्लाळ दिवाण यांच्या दरम्यान झालेल्या वाटाघाटीची इत्थंभूत हकिगत सांगून इंग्रजांस मिळण्याबद्दल संकेत झाला असल्याचें सांगितलें. महाराजांनीं नरसू काकड्याकरवीं इंग्रजांना उलट निरोप कळविला, कीं जनरल स्मिथनें पेशव्यावर हल्ला करावयाचा झाल्यास दिवसा उजेडीं करावा; रात्रौ करूं नये. अशा प्रकारें महाराजांनीं इंग्रजांना मिळावें असा संकेत ठरला होता.

परंतु इतक्या लौकर व इतक्या सफाईनें हें सारें जुळून येईल, अशी कोणालाच अटकळ नव्हती. त्यामुळें अष्टीच्या झटपटीनंतर लगेच, महाराज आपल्या छावणींत आल्याबद्दलची वार्ता स्मिथला समजतांच त्याला अचंबा वाटला. तो आनंदानें बेभान झाला. व जखमी असतांही आपण ऐकलेली हकिगत खरी का खोटी, हें स्वतः अजमावण्यासाठीं म्हणजे महाराजांना भेटण्यासाठीं तो धूम पळत निघाला. वाटेंतच महाराजांचें त्याला दर्शन झालें. आनंदानें महाराजांचा जयजयकार करीत तो म्हणाला, “ जय महाराजांचा झाला. ठरल्याप्रमाणें महाराज आले हा शुभ शकुनच होय. आतां बाजीरावाची कथा काय ? सर्व प्रजाजन आतां आपल्याच बाजूस येणार ! आतां या राज्याचे मालक महाराज, आपण आहांत. ” अशा प्रकारें महाराजांचा इंग्रजी छावणींत गौरव चालला होता.

जनरल स्मिथनें थोडेसें स्थिरस्थावर झाल्यावर पुढील धोरण ठरविलें. त्याला असें वाटलें, कीं महाराजांना हस्तगत करून घेण्यासाठीं बाजीराव उलटून आपल्या सैन्यावर तुटून पडेल. अशा विचारानें त्यानें महाराजांना व त्यांच्या परिवाराला तेथून जवळच असलेल्या एका खेडेगांवीं बंदोबस्तानें रवाना केलें व बाजीरावाच्या हालचालीची पहाणी करीत तो स्वतः त्याच ठिकाणीं राहिला.

इंग्रजी सैन्यांत दाखल झाल्यावर महाराज आपल्याच बडेजावांत दंग होऊन राहिले नाहींत. त्यांना स्वपक्षीयांचा विसर पडला नव्हता. त्यांनीं

---

१ चिटणीसाची बखर.

पहिल्या प्रथम बापू गोखल्याचें प्रेत शोधून काढण्यास आपलीं माणसें पाठविलीं, व त्याचें प्रेत हुडकून काढल्यावर सत्कारपूर्वक त्यास मन्त्राग्नि दिला.

यानंतर विजयोत्सव जाहीर करण्याकरितां तोफा उडविण्यांत आल्या. मराठ्यांचा जरिपटका झेंडा उभारण्यांत आला व इंग्रजी लष्करानें त्याला सलामी दिली. अशा प्रकारें इंग्रजी छावणींत महाराजांचा सन्मान करण्यांत आला.

संध्याकाळीं स्मिथनें महाराजांची पुनः भेट घेतली, व आपणास विजय मिळाल्याचें वृत्त महाराजांनीं एल्फिन्स्टन यास पत्र लिहून कळवावें, अशी विनंती केली. बाळाजी नातूच्या नांवें तशा प्रकारचें पत्र लिहिण्याचें महाराजांनीं कबूल केलें. व त्याप्रमाणें पुण्यास पत्र रवाना झालें.

दुसऱ्या दिवशीं महाराजांना घेऊन स्मिथ साहेब पुण्यास निघाले. शिलंगण लुटावयास निघतांना जशा प्रकारची थाटानें स्वारी निघते तशा थाटानें महाराज व लष्कर निघालें होतें. आघाडीला हत्ती, त्यामागें उंटावरून नौबती, घोड्यावरून रण-नौबती, बैलगाड्यावरून रणढोल चौघडा, शिंग वगैरे देशी रणवाद्यें वाजत चाललीं होतीं. त्याच्या मागें इंग्रजी लष्कराचा बँड वाजत होता; त्यामागें आघाडीचे स्वार, त्यामागें हत्तीवर अंबारींत महाराज व त्यांचे बंधु व त्यामागें महाराजांच्या परिवारांतील लोक व पायदळाचे कांहीं शिपाई व मेण्यांतून महाराजांचा कबिला, अशा थाटानें, डामडौलानें महाराजांना पुण्यास नेण्यांत येत होतें.

वाटेंत एखाद्या गांवावरून मिरवणूक जावयाची असली, कीं गांवकरी महाराजांच्यां दर्शनास येत; व महाराजांचा जयजयकार करून त्यांना नजराणा अर्पण करीत. स्मिथ व डोव्हट लोकांना सांगत कीं, आतां महाराज हेच तुमचे मालक. बाजीराव आतां पळून गेला आहे. ते लोकांना आपल्या वागणुकीनें असें भासवीत होते कीं आपण महाराजांचे केवळ नोकर आहोंत.

अशा प्रकारें ही मिरवणूक माघ व॥ ५ मीस हिंगणगांवास आली. त्या ठिकाणीं जरिपटका उभारून त्यास सलामी देण्याचा समारंभ करण्यांत आला. त्या प्रसंगीं जनरल स्मिथनें छोटेसें लष्करी अंमलदारासारखें भाषण केलें. तो

म्हणाला "...एल्फिन्स्टन साहेबांकडून पत्र आलें आहे. त्यांनाही अत्यंत आनंद झाला आहे. मार्किस ऑफ् हेस्टिंग यांना एल्फिन्स्टननें पत्र लिहिलें आहे. महाराजांना भेटण्यासाठीं एल्फिन्स्टन लौकरच इकडे येणार आहेत. महाराज आतां मराठेशाहीचे मालक झाले आहेत. हें साम्राज्य (Empire) त्यांचें आहे. त्यांनीं इतउत्तर मालकीनें कारभार पाहावयाचा आहे. आम्ही बाजीरावास हद्दपार करूं. आतां महाराजांनीं राजधानीच्या ठिकाणीं सातान्यास जावें, व गादीवर बसावें. राज्यकारभाराचीं सूत्रें हातांत घ्यावींत. बाजीरावाचा व इंग्रजांचा पुनः समेट होईल अशी महाराजांनीं मुळींच भीति बाळगूं नये. महाराजांच्या परिवारांत पांडोबा व रंगोबा असे दोघे सोंवळेकरी आहेत, ते बाजीरावाचे हेर आहेत. त्यांना महाराजांनीं ताबडतोब घालवून द्यावें व बाजीरावांकडे पाठवावें. त्यांना यापुढें आपल्याजवळ ठेवणें धोक्याचें आहे. कोणत्या वेळीं घात करतील याचा नेम नाहीं......" अशा प्रकारें झेंडा समारंभाचे वेळीं स्मिथसाहेबानें भाषण केलें.

पुढें आठवड्यानें–बुधवार ता. २६ फेब्रुवारी १८१८ रोजीं महाराजांचा बेलसर येथें मुक्काम असतां, बाळाजी नातूस बरोबर घेऊन एल्फिन्स्टन सिंहगडाहून महाराजांस भेटण्यास आला. महाराजांचें दर्शन होतांच छत्रपतीस उचित असा मान एल्फिन्स्टननें दिला. एल्फिन्स्टननें डोक्याची टोपी काढून घेतली व लवून मुजरा केला. महाराजांनीं बसावयास सांगितल्यावर तो बसला. इकडच्या तिकडच्या कुशल चौकशीच्या गोष्टी झाल्यावर, एल्फिन्स्टन म्हणाला "...महाराज, आपण आम्हांस येऊन मिळाला हें आमचें थोर नशीब !... गव्हर्नर जनरल मार्किस ऑफ हेस्टिंग यांना आपल्यास जय मिळाला असल्याबद्दल खलिता रवाना केला आहे. शिवाय रसेल साहेबांस गव्हर्नर जनरलकडे पाठविणार आहें. ते सर्व बाबींचो व्यवस्था करतील. महाराजांना एखादें पत्र पाठवावयाचें असेल तर तें, अगर निरोप कळवावयाचा असेल तर तो अगर माणूस पाठवावयाचा असल्यास त्यास पाठवावें..." यावर महाराज

म्हणाले "आमच्यातर्फे कळवावयाचें तें पूर्वी समक्ष भेटीच्या वेळीं बळवंतराव चिटणीसानें तुम्हांस सांगितलें आहे. व तुम्हीं तें कबूल करून त्यांच्याजवळ वचनही दिलें आहे. आतां तुम्ही आपलें वचन पुरें करा. मी तुमच्या वचनावर विसंबून कशाचीही पर्वा न करितां तुम्हांस मिळालों. पूर्वी दिलेलें वचन पाळण्याचा आतां योग आला आहे. तेव्हां तुम्हीं आपल्या वचनास जागा."

यावर एल्फिन्स्टन म्हणाला "चिटणीसानें सारी हकीकत सांगितली हें खरें. आतां जाहीरनामा तयार केला आहे, तो बाळाजीपंत नातू मागाहून वाचून दाखवितील." अशा प्रकारच्या वाटाघाटीनंतर एल्फिन्स्टन पुण्यास निघून गेला.

या मुलाखतींत प्रतापसिंहमहाराजांच्या मनांत काय चाललें आहे, याचा बोध एल्फिन्स्टनला झाला. महाराज आपणांस आपलें वचन पाळावयास सांगत आहेत. महाराजांना दिलेल्या वचनास जागावयाचें, तर मराठी राज्याची सारी दौलत महाराजांच्या हवाली करावयास पाहिजे! तसें करावें किंवा कसें असा एल्फिन्स्टनला पेंच पडला. सारें राज्य महाराजांचें महाराजांना द्यावें तर हातीं पडलेली शिकार सोडावी कशी? तसें केल्यास मराठेशाही चिरडण्याचा आपला हेतु यामुळें अर्धवटच राहील! मराठी सत्ता जिवंत राहिली तर आज ना उद्यां पश्चिम हिंदुस्थानांतील आपले ठाणें आपणांस उठविण्याचा प्रसंग येणार!

बरें वचनास फिरावें, तर आपल्यावरील (इंग्रजांवरील) एतद्देशीय लोकांचा विश्वास उडेल! शिवाय मराठी साम्राज्य झटक्यासरशीं नाहींसें केलें तर औरंगजेबाच्या दक्षिणेवरील स्वारीच्या वेळीं जसे सारे मराठे एकदिलानें व शौर्यानें लढले, तसेंच एकदिलानें, जमावानें व शौर्यानें आपल्यावर तुटून पडले तर सर्वच ग्रंथ आटोपेल! म्हणजे आज जें सहज पचवतां येण्यासारखें आहे तें जास्त लोभ केल्यास ओकावें लागेल. कारण इतिहासाच्या कालीं मराठा समाज आजच्यासारखा

निशस्त्र नव्हता ! महादजीबाबा शिंदे यांच्या हाताखालीं लढून याच महाराष्ट्रांत मराठ्यांनीं इंग्रजी सैन्याला लोळविलें होतें. त्र्यंबकजीनेंहो कोरेगांवीं इंग्रजी सैन्याचा पराभव केलेला होता. तेव्हां उघडपणें व झटक्यासरशीं मराठेशाही नामशेष करणें शहाणपणाचें नव्हतें. म्हणून " त्वयार्ध मयार्ध " असें करणें एल्फिन्स्टन वगैरेंना इष्ट होतें.[१]

वरीलप्रमाणें विचार करून एल्फिन्स्टननें महाराजांना निरनिराळ्या उपायांनीं खूष करण्याचा बेत आरंभिला. ता. ८।३।१८ रोजीं महाराजांचा मुक्काम पुरंदरास असतां एल्फिन्स्टननें चांदीचीं मौल्यवान भांडीं व बनातीचे तंबू, शामियाने वगैरे जिन्नस स्वारीमध्यें उपयोगीं पडतील असे पाठवून दिले. हेतु हा कीं, महाराजांना वाटावें, इंग्रज लोक किती भले व आस्थेवाईक ! या गोष्टी मुद्दाम वर्णन करण्याचें कारण इतकेंच कीं, इंग्रज लोक मनुष्यस्वभावाची परिक्षा करून कसे वागत होते, बारीकसारिक गोष्टींमध्यें देखील ते कशी खबरदारी घेत, हें वाचकांच्या लक्षांत यावें. एल्फिन्स्टन वगैरे रोज रोज नवीन नवीन उपक्रम करून महाराजांना, व इतर लोकांना, रंजवीत होते व तहाबद्दलची गोष्ट अशा प्रकारांनीं कालावधीवर टाकीत होते.

एल्फिन्स्टनसाहेब व गव्हर्नर जनरलसाहेब महाराजांच्या संबंधाचें बोलणें लांबणीवर टाकीत होते त्यास कारणेंही होतीं. बाजीराव जोपर्यंत रणांगणावर आहे तोंपर्यंत महाराज भलत्यासलत्या अटींना संमती देणार नाहींत. तेंच बाजीरावाचा

---

१ ता. १८।६।१८१८ च्या पत्रांत एल्फिन्स्टननें आपलें धोरण ग. ज. यांना कळविलें होतें. तः—" ....next to maintaining such a force as shall prevent all thought of rebellion, the best means of securing the tranquillity of the conquered country is, to conciliate the people, the Marathas by setting up the Raja of Sattara........"(बंडाव्याचा विचारही लोकांच्या मनांत शिरकूं नये म्हणून योग्य फौज ठेवणें हा एक गोष्ट झाली. त्याचप्रमाणें जिंकलेल्या देशांत शांतता राहावी म्हणून लोकांना–मराठ्यांना–संतुष्ट करण्यासाठीं सातारच्या महाराजांना गादीवर बसविलें पाहिजे.)

पक्का बंदोबस्त झाला, सर्वत्र स्थिरस्थावर झालें, कीं मग आपण म्हणूं त्या अटी महाराजांना कबूल कराव्या लागतील. शिवाय परिस्थितीचें चक्र नेहेमीं फिरत असतें. आपलें काम कालावधीवर टाकलें कीं, आपल्यास अनुकूल अशी परिस्थिति उत्पन्न करतां येईल, व त्याचा भरपूर फायदाही मिळवितां येईल. तोपर्यंत महाराजांना खूष ठेवण्यांत चूक करतां कामा नये.

एल्फिन्स्टननें वर सांगितल्याप्रमाणें विचार केला, व बरोबर कॅप्टन ग्रँट डफ व बाळाजी नारायण नातू असे घेऊन तो महाराजांच्या भेटीस आला. त्यानें महाराजांची एकांतीं भेट घेतली, व जातांना कॅप्टन ग्रँट डफ व बाळाजी नातू यांस महाराजांकडे सल्लामसलत देण्यासाठीं व महाराजांतर्फे कांहीं बोलणें इंग्रज सरकाराशीं लावावयाचें झालें तर त्यानीं तें कॅ. ग्रँट मार्फत करावें, अशा निमित्तानें महाराजांकडे त्यांना ठेवून दिलें. अशा प्रकारें महाराजांना कळूं न देतां एल्फिन्स्टननें त्यांच्या गळीं भावी रेसिडेंट मोठ्या शिताफीनें बांधला.

यानंतर ४।५ दिवसांनीं आरसे लावून सुंदर बनविलेली एक अंबारी महाराजांकरितां एल्फिन्स्टननें पाठवून दिली. तसेंच महाराजांचें तात्पुरतें समाधान करावें म्हणून कॅ. ग्रँटनें महाराजांना कळविलें कीं, केंजळगड व कमळगड काबीज केल्यावर, किल्ले शिवाय करून सह्याद्रिच्या पूर्वेकडील निरा व वार्णा या नद्यांमधील भिमा व कृष्णा यांच्या संगमापर्यंतचा मुलूख सध्या महाराजांच्या ताब्यांत देण्याचा एल्फिन्स्टनचा विचार आहे. लढाई चालू असल्यामुळें किल्ल्यांचा ताबा देतां येणार नाहीं. किल्ल्यांवरून बंदोबस्त आमचाच राहील पण निशाण महाराजांचें फडकेल. अशा प्रकारची योजना एल्फिन्स्टननें गव्हर्नर जनरल साहेबांना सुचविली आहे.

ग्रँट साहेबाचें वरील प्रकारचें भाषण ऐकून महाराजांस एल्फिन्स्टनच्या धोरणाबद्दल शंका आली. त्यांच्या मतानें इंग्रज आपणांस स्नेहाखातर मदत करावयास आलेले. आपलें राज्य आपणास परत देण्यासाठीं आलेले. त्यांनीं तसें वचनही दिलेलें. लढाईच्या खर्चाबद्दल पाहिजे तर त्यांनीं रोख रकमेची मागणी करावी. घरांत पाहुणा म्हणून यावें, व घरधन्यास एका खोलींतच

वापर कर असें पाहुण्यानें म्हणावें, अशा प्रकारचा हा न्याय झाला! आपली सारी दौलत आपल्या ताब्यांत देण्याऐवजीं $\frac{1}{10}$ हिस्सा घ्या असें म्हणतात हें काय? महाराजांना कॅ. ग्रँटच्या ह्या म्हणण्याचा अर्थच कळेना!

त्यावर महाराज कॅ. ग्रँट डफला म्हणाले, "पूर्वीच्या करारास सोडून हें तुमचें बोलणें दिसतें. पूर्वीचा करार लक्षांत घेऊन त्याप्रमाणें ग. ज. हेस्टिंग्स यांना लिहा अगर रसेल साहेबामार्फत कळवा." कॅ. ग्रँट तरी काय करणार! "पूर्वी तसें लिहिलें आहेच. उत्तर आल्यावर मग पाहूं." असें कौन्सिलरी थाटाचें गुळमुळीत उत्तर देऊन त्यानें ती वेळ निभावून नेली.

पुढें तेथून महाराजांना वाईकडे नेण्याचा विचार ठरला. कैंजळगड घेण्याच्या उद्योगास कंपनीचें सैन्य लागलें होतें; पण तो सहजासहजीं हस्तगत होण्याचा रंग दिसेना. महाराजांना त्या ठिकाणीं नेलें, कीं त्यांना पाहून किल्लेदाराची समजूत पडेल; व विशेष आयासाशिवाय किल्ला आपल्या हस्तगत होईल, म्हणून महाराजांना वाईस नेणें कॅ. ग्रँट साहेबांस जरूर भासलें, व तसा विचार करून, वाई क्षेत्राचें गांव आहे, तेव्हां महाराजांनीं त्या ठिकाणावरून जावें हें बरें, असा बाळाजी मार्फत कॅ. ग्रँटनें सल्ला दिला. महाराजांच्या परिवारांतील मंडळीलाही तो सल्ला पसंत पडला, व सर्वांचें मत पडल्यामुळें सर्व मंडळी वाईस निघाली.

याच सुमारास विठ्ठलपंत महाजनी व बाळाजी नातू यांच्यामध्यें साताऱ्याच्या दिवाणगिरीबद्दल स्पर्धा लागली होती. स्पर्धेचें पर्यवसान पुढें एकमेकांच्या वांकुडपणा येण्यामध्यें झालें. बाळाजी नातूच्या मनांत आपणास महाराजांची दिवाणगिरी मिळावी, तर विठ्ठलपंतास वाटे आपण महाराजांजवळ इतके दिवस असलेले तेव्हां आपणास दिवाण नेमावें. बळवंतराव चिटणीसामार्फत विठ्ठलपंतानें एल्फिन्स्टनकडे संधान बांधलें. बाळाजीला वाटे, एल्फिन्स्टन साहेबाच्या आपण इतके उपयोगी पडलों आहों, तर आपली इच्छा एल्फिन्स्टन साहेब खास मोडणार नाहींत. पण एल्फिन्स्टन कांहीं नाना

फडणीस नव्हता. त्यानें दूरवर विचार करून असें ठरविलें कीं, बाळाजी नातू सारख्या चित्पावन ब्राम्हणास पेशवा करणें, म्हणजे भट पेशवाईच्या मागोमाग नातू पेशवाई सुरू करण्यासारखें होईल. शिवाय बाळाजी नातूचा त्याला विश्वास वाटत नव्हताच. तेव्हां कऱ्हाडा ब्राम्हण पेशवा करणें त्याला जास्त सोयीचें दिसलें. बाळाजीच्या स्नेहाची, व त्याच्या कामगिरीची भीड मनांत न आणतां, त्यानें विठ्ठलपंत महाजनीचीच दिवाण म्हणून नेमणूक पसंत केली.

पुढें कैंजळगड कमळगड हे किल्ले स्वाधीन झाल्यानंतर महाराजांना वासोट्याकडे नेण्यांत आलें. त्या किल्यांत महाराजांच्या कुटुंबांतील माणसें होतीं. तरी देखील इंग्रजी सैन्यानें मुद्दाम त्या किल्ल्यास वेढा दिला. खरें म्हटलें तर किल्ला घेण्याचा प्रयत्न करण्याची कांहींच आवश्यकता नव्हती. कारण वासोटा किल्ला महाराजांचा, त्या किल्यांत मंडळी महाराजांची, परंतु सारें महाराष्ट्र आम्हीं जिंकून घेतलें व निस्वार्थबुद्धीनें तें महाराजांना दिलें असें इंग्रजांना जगास निदान वरिष्ठास दाखवावयाचें होतें. म्हणून वासोटा किल्ला घेण्याचा इंग्रजी सैन्यानें उपक्रम केला. किल्ला आमच्या ताब्यांत द्या असा त्यांनीं किल्लेदारास हुकूम केला. पण इंग्रजाचा व महाराजांचा सलोखा झाला असल्याबद्दलची हकिगत वासोट्यास अद्याप पोहोंचली नव्हती. किल्यावर राजघराण्यांतील माणसें होतीं. त्यांच्या सल्ल्यावरून किल्ला लढविण्याचा बेत किल्लेदारानें केला.

किल्ल्यावर महाराजांचे पुतणे **बाबासाहेब राजे भोसले** हे होते. किल्ला घेण्यासाठीं कंपनी सरकारच्या सैन्यानें जोराचा हल्ला केला, पण गड अवघड असल्यामुळें व गडावरील सैनिक स्वामिभक्तीनें लढत असल्यामुळें यश येईना. लढाई मोठी मातबर झाली. कंपनी सरकारच्या सैन्याच्या कमांडरनें तोफा मागविल्या व त्या किल्यावर रोखून "तोफा डागूं का?" असें महाराजांस विचारलें. तेव्हां स्वजनांच्या जीविताचा विचार बाजूला करून महाराज म्हणाले "बेहत्तर! मैत्रीसाठीं तुम्ही तोफा डागा, मैत्रीपायीं स्वतः आम्ही जीवाची पर्वा केली नाहीं. आमच्या कुटुंबांतल्या माणसांनीं देखील आमच्याप्रमाणेंच वागलें पाहिजे. कांहीं

शंका मनांत न आणतां तोफा चालवा. आपल्या दोस्तीसाठीं व सार्वजनिक कल्याणासाठीं आमच्या कुटुंबाची हानी झाली तरी पुरवली'. "

महाराजांच्या वरील उद्गारांवरून त्यांची इंग्रजांवर व त्यांच्या मैत्रीवर केवढी दृढ निष्ठा होती, व त्या मैत्रीला धक्का लागूं नये, म्हणून किती स्वार्थत्याग करण्यास ते तयार होते, हें लक्ष्यांत येणार आहे. हें भाषण एल्फिन्स्टनसाहेबाच्या देखत झालेलें! अशा प्रकारच्या अनिर्व्याज दोस्तीचें इंग्रजांनीं काय बरें चीज केलें? असो. महाराज हल्ला चढविणारांमध्यें आहेत, हें कळून चुकतांच, किल्लेदारानें लढाई थांबविली, पांढरें निशाण फडकावलें व गड महाराजांच्या स्वाधीन केला.

पुढें महाराज, एल्फिन्स्टन, व लष्कर असे सातार्‍यास येण्यास निघाले. ता. ११ एप्रिल १८१८ चैत्र शु॥ ५ मीस सातार्‍यास दरबार भरला. एल्फिन्स्टन सदर दरबारास हजर होता. त्या दिवशीं शहरांत मोठा उत्सव साजरा करण्यांत आला. आनंदोत्सवाप्रीत्यर्थ तोफा सोडण्यांत आल्या. महाराज सुखरूपपणें परत आल्याबद्दल वस्तुतः हा आनंदोत्सव करण्यांत आला होता. पण इंग्रज अंमलदारांनीं वरिष्ठांकडे या गोष्टीबद्दल रिपोर्ट करतांना " आज रोजीं महाराजांना सातार्‍यास आणून गादीवर बसविलें; व सिंहासनावर बसविल्यावर दरबार भरविला. शहरवासीयांनीं आनंद केला " असें कळविलें.

दुसरे दिवशीं एल्फिन्स्टननें महाराजांना थाटाची मेजवानी दिली. दरबारच्या लोकांना मौल्यवान् पोषाख दिले. कित्येकांना जवाहिराचे दागिनेही दिले. या प्रकारच्या देणग्यांनीं दरबारी मंडळींचीं मनें एल्फिन्स्टननें आपल्याकडे आकर्षून घेतलीं. पुढील उद्देशाच्या सिध्यर्थच एल्फिन्स्टननें हें सारें केलें, असें नव्हे तर काय?

दरबारच्या दिवशीं एल्फिन्स्टननें बाळाजी नातूकरवीं एक जाहिरनामा

---

१ चिटणिसाची बखर.

२ चिटणिसाची बखर.

तयार केला; व तो दरबारांत महाराजांना वाचावयास सांगितला. त्या जाहिर-नाम्यांत इतर मजकुराबरोबर "महाराजांना पेशव्यांनीं कैदेंत टाकलें होतें, व सर्व सत्ता पेशवाच बळकावून बसला होता. इंग्रजांनीं पेशव्यांच्या कैदेंतून महाराजांना सोडविलें व त्यांना गादीवर बसविलें." असा मजकूर होता. तो वस्तुस्थितीस धरून नव्हता, म्हणून महाराजांनीं सदरच्या मजकुरास हरकत घेतली! ते म्हणाले, " मी पेशव्यांचा कैदी कधींच नव्हतों. पेशवा शिरजोर झाला म्हणून मी तुमचा स्नेह केला, व तुमच्या व पेशव्याच्या दरम्यान बेबनाव झाला, तेव्हां मी तुमच्या बाजूस आलों, अशी खरी स्थिति असतां हा मजकूर अगदींच निराळा काय घातला? बरें गादीवर बसण्याबद्दल म्हणाल तर १८०८ मध्येंच मला राज्याभिषेक झालेला आहे. आज कांहीं नव्यानें मी गादीवर बसत नाहीं! तेव्हां विपर्यास करणारा हा मजकूर काढून टाका." पण एल्फिन्स्टनला तो मजकूर पाहिजे होता. महाराजांचें म्हणणें खरें होतें, व मार्मिकपणाचें होतें, हें तो जाणत होता. पण आतां पावेतों जी बतावणी केली, तिची संपादणी करण्यास वरील मजकूर जाहीरनाम्यांत घालणें अगदीं जरूरीचें होतें. कारण जाहीर-नाम्यांतील मजकूर म्हणजे महाराजांचा कबुलीजबाब. डायरेक्टरांना दाखवि-ण्यास हा मजकूर अत्यंत महत्त्वाचा. पण महाराजांनीं वरील मजकुरास हरकत घेतल्यामुळें एल्फिन्स्टनला मोठा पेंच पडला.

दरबार आटोपल्यानंतर संध्याकाळीं महाराज, माईसाहेब, एल्फिन्स्टन, कॅ. ग्रँट डफ, बाळाजी नातू वगैरेंची बैठक झाली; व विठ्ठलपंत फडणीसास दिवाण, व बळवंत मल्हार चिटणीसास चिटणास म्हणून नेमण्याचें ठरलें. बाळाजी नातूस रेसिडेंट बरोबर साताऱ्यास नेटिव्ह रेसिडेंट म्हणून ठेवण्यांत आलें. तहाच्या वाटाघाटीसंबंधानें मि. रसेल आल्यावर काय तें पक्कें करूं असें एल्फिन्स्टननें अभिवचन दिलें. अशा प्रकारें तहाची वाटाघाट लांबणीवर पडली!

बाळाजीपंत नातूला दिवाण नेमलें नाहीं याबद्दल वाईट वाटलें! त्याच्या मनांत एल्फिन्स्टनची व महाराजांची दोस्ती झाली ती आपल्यामार्फत. तेव्हां

दोघांनींही आपल्या अलौकिक गुणाचें चीज आपणांस दिवाण नेमून करावयास पाहिजे होतें. पण हें पुण्याचें पाप पदरीं ठेवावयास महाराज कबूल नव्हते. एल्फिन्स्टननें या पांचवडच्या[1] कलिपुरुषाच्या गुणांची चांगलीच पारख केली होती. म्हणूनच त्यानें बाळाजीला कॅ. ग्रँट डफचा असिस्टंट नेमलें; व त्याच्याकरवीं पुढें राजकारणाचे डाव कसकसे साधून घेतले, हें पुढें कथानुसंधानाप्रमाणें वाचकांना कळून येईल.

प्रकरण १० वें.

इंग्रजांनीं काय दिलें?

"बाजीरावाचा बंदोबस्त केल्यावर सारी दौलत महाराजांचीच आहे," असें म्हणून जनरल स्मिथनें महाराजांचा जयजयकार केला होता, ही हकीकत वाचकांच्या लक्ष्यांत असेलच. त्या गोष्टीस आतां वर्ष दीडवर्ष होत आलेलें. आतां बाजीराव ब्रह्मावर्ती संस्थानिक बनून ८ लाख रुपये उत्पन्नाच्या ६ मैलांच्या टापूवर राज्यही करूं लागला होता. पण साताऱ्यास मात्र तहाचें घोंगडें भिजत घातलें होतें, तें तसेंच अद्याप पडलें होतें!

साताऱ्च्या महाराजांना काय द्यावें, किंवा त्यांची कशी व्यवस्था लावावी हा मोठा बिकट प्रश्न गव्हर्नरसाहेबांस व गव्हर्नर जनरल साहेबांस पूर्वीपासून पडलेला होताच. गव्हर्नर जनरल हेस्टिंग याचा विचार महाराजांना छोटेसें राज्य

---

1 पांचवड, नातूची जन्मभूमी, पुणें--बंगलोर सडकेवर पुण्यापासून ५८ मैलांवर कृष्णाकाठीं आहे. हा गांव नातू घराण्यास इनाम आहे. साताऱ्यापासून १० व्या मैलाच्या सुमारास नातूचा बंगला सडकेच्या कडेला पहावयास मिळतो.

करून द्यावें असा पडलों. कारण मराठ्यांना इंग्रजांची राज्यपद्धति आवडावी म्हणून त्यांच्याशीं जमतें घेऊन वागणें त्याला अगत्याचें दिसत होतें. शिवाय **ब्राम्हणी सत्तेनें पुनः डोकें वर करूं नये म्हणून, तिला प्रतिस्पर्धी दुसरी सत्ता उत्पन्न करावयाची तर ती मराठ्यांचीच केली पाहिजे.** हे दोघे एकमेकांशीं भांडूं लागले, कीं त्यांची दृष्टि आपल्याकडे पोहोंचावयाची नाहीं असें ग. ज. ला वाटत होतें. तसेंच इतर परिस्थितीचा विचार करतां सातारच्या महाराजांना राज्य करून देणें अगत्याचें होतें.

कॅ. ग्रँट डफ याची साताऱ्यास पोलिटिकल एजंट म्हणून नेमणूक झाल्या-नंतर एल्फिन्स्टननें ता. ८।४।१८१८ रोजीं जें पत्र लिहिलें त्यामध्यें सातारचें राज्य आपण कां उत्पन्न करीत आहों, व त्यासंबंधानें आपलें धोरण काय आहे, व त्या धोरणास अनुकूल असें वागावयाचें झाल्यास कसें वागलें पाहिजे, व त्यासंबंधानें काय काय सावधगिरी बाळगिली पाहिजे, वगैरे फार महत्त्वाचा असा मजकूर आहे. इंग्रजी मुत्सद्यांमध्यें आढळून येणारा दूरदर्शीपणा या पत्रांत आपणांस पहावयास मिळतो. मराठेशाहीचा घांस एकदम गिळावयास इंग्रज तयार नव्हते असें नाहीं. पचवितां आलें असतें, तर त्यांनीं सगळें गिळलें असतें. मैत्रीची, अभिवचनाची इभ्रतीची कसलीच चाड बाळगिली नसती ! पण सारेंच एकदम घशांत घातल्यास सारेंच ओकावें लागावयाचें, असा दूरवर विचार करून कंपनी सरकारच्या अधिकाऱ्यांनीं म्हैसूरच्या नमुन्याचें, सातारचें छोटे राज्य, तयार करण्याचें ठरविलें होतें, हें या पत्रावरून वाच-कांच्या लक्ष्यांत येणार आहे. म्हणून त्या पत्रांतील कांहीं भाग या ठिकाणीं देत आहों.

---

१ "......my object being simply to secure the conciliation of the Maratha tribes to the new order of things, and to effect a counterpoise to the remaining influence of the former Brahminical Govt. Circumstances preponderated in favour of the Raja's Elevation to sovereign station."

"........गव्हर्नर जनरल साहेबांचा मनोदय कळे पावेतों, मी तुम्हांस सातारच्या महाराजांच्या पदरीं पोलिटिकल एजंट नेमीत आहे. आतां ज्या उद्देशानें हें नवें राज्य स्थापन करण्याचें योजिलें आहे, व ज्या प्रकारें ते उद्देश साध्य होण्यासारखे आहेत ते या पत्रानें मी आपणांस कळविण्याचें ठरविलें आहे.

या देशांतील (महाराष्ट्रांतील) जुन्या व खानदानीच्या राजघराण्यांतील मंडळींना अन्नें, व प्रतिष्ठेनें वागतां येईल अशा प्रकारची त्यांच्या पोटापाण्याची सोय करावी हा, हें छोटें राज्य स्थापन करण्यांत ग. ज. चा मुख्य हेतु आहे. शिवाय पेशव्याच्या सत्तेला प्रतिस्पर्धी दुसरी सत्ता उत्पन्न केली कीं, नष्ट होऊं घातलेल्या पेशवाईस पुनः डोकें वर काढण्यास अवसर मिळणार नाहीं. महाराजांना जेवढा मुलूख देण्याचा मीं विचार केला आहे, तेवढा देण्यांत माझा आणखी असा उद्देश आहे कीं, आपल्या नोकरींत ठेवतां न येण्यासारख्या, या मुलखांतील लष्करी पेशाच्या, लोकांना पोसण्यास ह्या संस्थानांचा उपयोग व्हावा; तसेंच आजच नाहींशा करतां येण्यासारख्या नाहींत, अशा बऱ्याच धार्मिक व सामाजिक संस्था आहेत; पण त्या आपल्या राज्यांत पोसतां येणें शक्य नाहीं. अशा संस्था जगविण्यास या संस्थानाचा मोठा उपयोग होणार आहे.

"ह्या हेतूंच्या सिध्यर्थ महाराजांचा विश्वास संपादन करणें जरूर आहे. आपणांस आपली सत्ता बळकट केली पाहिजे. ग. ज. चा हुकूमही तसाच

---

१ "To afford an honourable maintainance to the repersentative of the ancient princes of this couutry; to establish among the Marathas a counterpoise to the remaining influlence of the former Brahmin Government and to remove from the minds of the Marathas the dread of complete extinction of their national independence, and still more that of their entire loss of their means of subsistence."

आहे. आपल्या सुरक्षितपणासाठीं देखील आपणांस तसें करणें अगत्याचें आहे. नाहीं पेक्षां आजपर्यंत केलेलें सारें उलटें आंगाशीं येईल व लढाईचा शेवट न लागतां ती तशीच चालू राहील. मला असें वाटतें कीं, आपलें वजन व हुकमत (Control) वाढविण्यास महाराजांची हल्लींची स्थिति पुष्कळशी अनुकूल आहे. कारण महाराजांना आपण नुकतेच बंधमुक्त केलें आहे, व बऱ्याच मोठ्या मुलखाचें राज्य त्यांना देणार आहों. हें राज्य मिळविण्यास महाराजांना कांहींच आयास पडलेले नाहींत. केवळ आमच्या औदार्यामुळें हें महाराजांना मिळालेलें आहे. म्हणून त्यांनीं आपल्यांशीं कृतज्ञतेनें वागलें पाहिजे. . . . . . .

"आपल्यावर अवलंबून रहावयास आपण महाराजांना लावलें पाहिजे. आज महाराजांची स्थिति पाहिली तर त्यांना मुलूख नाहीं कीं, सैन्य नाहीं. आज खर्चाला पाहिजे तर त्यासाठीं त्यांना आपल्या तोंडाकडेच पाहावें लागतें, मग पुढील गोष्टींची वाच्यता कशाला ?

"आतां आपल्याविरुद्ध गोष्टी म्हटल्या म्हणजे महाराज अनुभवी नाहींत, कीं पोक्त नाहींत; भोंवतालची दरबारी मंडळी वडेजावी सांगणारे; असें असल्यामुळें, बिघाड करणारा एखादा उत्पन्न झाल्यास, आपण बसवूं पहात असलेली घडी विसकटून टाकण्यास त्याला इतर लोक सामील व्हावयाचे. या बाबतींत माझी सारी भिस्त तुमच्यावरच आहे. याकामीं तुम्हीं शहाणपणानें व चिकाटीनें वागाल व मार्गांतील अडीअडचणी नाहींशा कराल असा मला पूर्ण भरंवसा आहे.

आजच्या परिस्थितींत महाराजांचा सारा कारभार तुम्ही आपल्या हातांत घ्यावा हें माझ्यामतें सर्वोत्तम होय. साऱ्या गोष्टी तुम्ही आपल्या खर्चानें व आपल्या सैन्याच्या बळावर कराव्यात.. राजाची हुशारी पाहून स्थिरस्थावर झाल्यावर थोडथोडा मुलूख महाराजांच्या ताब्यांत द्यावा.

प्रत्येक बाबतींत रेसिडेंटाची सल्लामसलत घ्या अशी सूचना महाराजांना मीं आगाऊच केली आहे. आजची बंडाळी नाहींशी होई पावेतों राज्यकारभार

महाराजांनीं तुमच्यावर सोंपवावा असेंही समजावून सांगितलें आहे, व महाराज योग्य प्रकारें राज्ययंत्र हांकूं शकतात असें दिसून येतांच राज्यासंबंधीं तह वगैरे काय करावयाचें तें करूं असेंही पण मी सुचवून ठेवलें आहे. ...

× × × × ×

प्रथम महाराजांचा विश्वास (confidence) संपादन केला पाहिजे. असा विश्वास उत्पन्न करावयाचा तर महाराजांच्या हितासाठीं आपण अनंत सायास करतों आहों अशी भावना त्यांच्या मनांत उत्पन्न करावयाची; त्यांना पुष्कळसा मान द्यावयाचा; त्यांच्या ह्मणण्याप्रमाणें वागण्यासाटीं आपण फार दक्षता घेतों हेंही भासवावयाचें........... "

सदरचें पत्र मुद्दाम येथें उद्धृत केलें आहे. त्यावरून एल्फिन्स्टन कसा मुत्सद्दी होता हें वाचकांच्या स्पष्टपणें ध्यानांत येणार आहे. इंग्रजी मुत्सद्दी मनुष्यस्वभावाची पारख करून आपलें इष्ट साधण्यासाठीं कसे डाव टाकीत असत हेंही कळून येणार आहे. म्हणजे इंग्रजांचें राजकारण उथळ नसे. त्यांत धडाडीपेक्षां शहाणपणा, व घमेंडखोरी व घिसाडघाई याऐवजीं दूरदर्शीपणा व धिम्मेपणा, कसा मिसळलेला होता हें आढळून येणार आहे. इंग्रजी मुत्सद्यांच्या गुणावगुणांची चर्चा करण्यापेक्षां वरील पत्र वाचलें म्हणजे वर्णन न करतांच पुष्कळशा गोष्टी वाचकांच्या लक्ष्यांत येतील. साताऱ्च्या भावी संस्थानचें (पाहिजे तर राज्याचें म्हणूं) भवितव्य एल्फिन्स्टननें कसें आगाऊ आंखून ठेवलें होतें, व त्याप्रमाणें आपणास हवी असलेली परिस्थिति घडवून आणण्याचा कसकसा प्रयत्न केला, हेंही या पत्रानें वाचकांच्या लक्ष्यांत आल्याशिवाय राहिलें नसेल.

एल्फिन्स्टननें वरील पत्रांत आंखून दिलेल्या धोरणाप्रमाणें वागण्यास कॅ. ग्रँट डफ यांनीं सुरवात केली. गोड गोड बोलून, नजराणे देऊन, महाराजांना मान देऊन, तो महाराजांना खूष करूं लागला. अशा प्रकारें खुबीनें, युक्तिप्रयुक्तिनें, राज्याचा किंबहुना महाराजांच्या खासगी घरचाही कारभार डफ साहेबानें आपल्या हातीं घेण्यास सुरवात केली !

इकडे महाराजांसंबंधानें विचार केला तर त्यांना वाटे कीं, एल्फिन्स्टनशीं पूर्वी संकेत केल्याप्रमाणें मराठी साम्राज्याची सारी दौलत आपल्या हातीं येणार! आपण आतां खरेखुरे हिंदुपदपातशहा होणार. ही भावना महाराजांचीच होती असें नव्हे, तर अखिल महाराष्ट्राची अशीच भावना होती. म्हणून हिंदुपद-पातशाहा या दर्ज्यास साजेशा थाटानें वागाव, अशा प्रकारचें धोरण महाराजांनीं व पदरच्या मंडळीनीं ठरवलें; खर्चाचा अंदाजही ठरविला. अर्थात् डफ साहेबांच्या धोरणास हें विरोधक होतें. डफ साहेबाच्या धोरणाप्रमाणें खर्च बेताबाहेर होऊं द्यावयाचा नव्हता. महाराजांना पुढील प्रसंगासाठीं नकळतच तयार करून ठेवावयाचें होतें. खर्च वाढवूं दिला, माणसें वाढवूं दिलीं, कीं आपलें कार्य दुर्घट खास होईल. अशा विचारानें खर्चाचा प्रश्न आला कीं, डफ हात आंखडता घेई. हें वागणें अर्थात् महाराजांच्या परिवाराच्या मंडळीला पसंत पडत नसे.

एल्फिन्स्टनला हें समजलें, तेव्हां महाराजांची समजूत करण्याचें काम त्यानें बाळाजी नातूस सांगितलें. बाळाजी जन्मतःच हुशार (पाहिजे तर लबाड म्हणा), शिवाय एल्फिन्स्टनच्या तालमींत तयार झालेला. त्यानें महाराजांची व माईसाहेबांची भेट घ्यावी, व त्यांना थापा देण्याचा, व चकविण्याचा प्रयत्न करावा. पण माईसाहेबमहाराज त्याला फसतात थोड्याच! त्यानीं बाळाजींचा कोटिक्रम त्याच्याच गळ्यांत उतरवून त्याला सांगावें, कीं "हें सारें शास्त्र पुरे! एल्फिन्स्टनला सांगा, कीं दिलेल्या वचनास जागा. आमच्या घरचा कारभार पाहाण्यास आमचे आम्ही समर्थ आहों." अशा प्रकारें निरुत्तर झाल्यावर बाळाजींनें पुढें आपल्या धोरणाची दिशा बदलली.

माईसाहेब व महाराज एकत्र असले, व एखाद्या बाबतींत माईसाहेब मध्यें पडून बोलूं लागल्या कीं, बाळाजी तिकडे लक्ष्य न दिल्यासारखें दाखवी. माईसाहेब रागवल्या कीं, माझें महाराजांशीं काम आहे, मला सांगावयाचें तें मी महाराजांना सांगेन. मला इतरांना कांहीं एक विचारावयाचें नाहीं. अशा प्रकारें उपमर्दकारक बेपर्वाइची भाषा बाळाजी बोलूं लागे. त्या वीरस्त्रीला हें

कसें सहन व्हावें ? पण आरडण्याओरडण्यापलीकडे ती बिचारी काय करणार ? बाळाजी माईसाहेबांचा अपमान करीत होता, तो ग्रँटच्या जोरावर. नाहीं तर पाचवडच्या भिक्षुकाची, सातारच्या छत्रपतीच्या मातेचा अपमान करण्याची काय किंमत होती ? बाळाजीला शासन करण्याचा अधिकार असता, तर महाराजांनीं त्याला केव्हांच कारागृह दाखविलें असतें. पण बाळाजीला दुखवणें म्हणजे कंपनी सरकारास डिवचणें असा प्रकार झाला होता. त्यामुळें पराधीन स्थितींत समर्थांच्या श्वानास भ्यावें, त्याप्रमाणें बाळाजीसारख्या कडून झालेला अपमान गप्प सोसणें त्यांना भाग होतें. मनांत चरफडत राहण्यापलिकडे बिचारे काय करणार ?

एक दोन वेळां तर माईसाहेब फार चिडल्या. बाळाजीला टाकूनही बोलल्या. पण बाळाची कसला छट्. त्यानें संभावितपणाचा व अधिकारी माणसासारखा आव आणून उत्तर केलें कीं, आम्हीं महाराजांच्या कल्याणासाठीं झटतों आहों; त्यापेक्षां दुसरें तिसरें आम्हांस कांहीं कळत नाहीं. अशा प्रकारच्या प्रत्युत्तरांनीं एका प्रसंगीं राजमाता अगदीं वैतागून गेली व म्हणाली, " मी सती जातें तर फार बरें होतें ! मग असला हा अपमान करून घेण्याचा प्रसंग येता ना ! असें वाटतें कीं, या किल्ल्याच्या तटावरून खालीं उडी घ्यावी. नाहींपेक्षां निदान काशीवास पत्करावा. " पण हृदयास पोळ पाडणाऱ्या, राजमातेच्या ह्या दुःखोद्गाराची नीचपणानें हेटाळणी करून, पाषाणहृदयी बाळाजी राजमातेस म्हणाला, " काशीस जाण्याची तुमची इच्छा असली तर इंग्रजांना तसें कळवा. काशीस जाण्यास ते तुम्हांस परवानगी देतील. " अशा प्रकारें बाळाजी नातूनें राजमातेची हेटाळणी केली !

बाजीराव पेशवा होता. पण तो देखील माईसाहेबमहाराजांना वचकून वागे. त्यांचा मानमरातब ठेवी. त्याच्या विरुद्ध कारस्थान चाललें असतां, बाळाजी वगैरे सारे मुत्सद्दी साऱ्या मसलतीबद्दलचें बोलणें माईसाहेबांशीं करीत. त्यांच्या विचाराशिवाय इकडली काडी तिकडे हालत नसे. पण आतां त्याच

माईसाहेबांना बाळाजी कसें संबोधूं लागला पहा ! जिच्या मसलतीमुळें बाजीरावास देशोधडीस लावतां आलें, त्याच माईसाहेबांचा बाळाजीसारखा इंग्रजाचा हिंदी नोकर, कशा प्रकारें उपमर्द करीत होता ! जिच्या कर्तबगारीनें इंग्रजांना अनुकूल परिस्थिती उत्पन्न करतां आली, त्याच राजमातेबद्दल कंपनीच्या पोलिटिकल एजंटाचीही बुद्धि केवळ ४।५ महिन्यांत फिरावी ना ?

बाळाजी नातूनें वर लिहिल्याप्रमाणें राजमातेचा अपमान केल्यावर ती बाळाजीस समोरही येऊं देईना. अर्थात् लबाड बाळाजीस तेंच पाहिजे होतें ! त्याचें आयतेंच काम झालें !

अशा प्रकारें राजमातेस त्रासवून सोडल्यावर प्रश्न काय तो महाराजांचा राहिला ! पण अक्कलवान् मुत्सद्यांना शक्कल काढावयास आयास कसले पडावयाचे ? लार्ड क्लाईव्हनें तांबडा दस्तैवज, कीं काळा दस्तैवज, असा भेद काढून कलकत्त्याच्या अमीचंद नांवाच्या धनाढ्य व्यापाऱ्याचें देणें बुडविलेंच कीं नाहीं !

अमीचंदासारख्या सावकारास जेथें दाद लावतां आली नाहीं, तेथें बाल महाराजांची गोष्ट काय विचारावी ? एल्फिन्स्टननें व ग्रँट डफनें महाराजांस म्हणावें, " महाराज, तुमच्या कल्याणासाठीं आमचें अंतःकरण तिळतिळ तुटतें. तुम्ही अद्याप अननुभवी आहां. दरबारची मंडळी वाकबगार नाहीं. आज सारी दौलत तुमचे हवालीं केली तर तुमची तारांबळ उडेल; गोंधळ उडून जाईल. चालू राज्यक्रांतीनें अस्थिरता उत्पन्न झाली आहे, ती अद्याप पूर्णपणें स्थिर झालेली नाहीं. आज राज्यकारभार तुमच्या हातीं दिला, कीं जो तो, तुमच्याशीं हुज्जत घालावयास येईल. आज तुमचा तुम्हींच विचार करा. प्रजाजनांना ताब्यांत ठेवण्याचें सामर्थ्य तुमच्यांत कोठें आहे ? राज्यशकट हांकण्याचें शिक्षण तुम्हास मिळालेलें नाहीं. तेव्हां प्रथम आमच्या हाताखालीं तसें शिक्षण घ्या. तुम्ही आपल्या पायावर उभे राहाण्यास समर्थ झालां, म्हणजे मग गव्हर्नर जनरल साहेबांच्या संमतीनें तुमचें राज्य तुमच्या हवालीं करूं. "

आतां विठ्ठलपंतास एल्फिन्स्टनच्या वशील्यामुळें फडणिशी मिळाली होती. त्यामुळें तो, व बळवंतराव चिटणीसास पेशव्यांनीं खालसा केलेलीं इनाम गांवें पुनः संपादन करावयाचीं होतीं म्हणून तो; असे हे दरबारांतील पुढारी कांहीं ना कांहीं निमित्तानें कंपनीच्या नोकरांचे मिंधे झाले होते. त्यामुळें वरील प्रकारचा उपदेश रेसिडेंटाकडून महाराजांना होऊं लागला, म्हणजे त्यांना ' होस हो ' म्हणावें लागे. निदान गप्प तरी बसणें भाग पडे.

महाराजांच्या दरबारांत इतर जे मानकरी होते त्यांना कोणास इनाम, कोणास दागदागिने, कोणास बक्षिसें तर कोणास पोषाख, तर कोणाचें महाराजांकडून अमकें तमकें काम करून देऊं; अशा भावी आशेच्या मधाचें बोट लावून इंग्रजांनीं आपले अंकित केलें होतें! द्रव्यानें कोण अंकित होत नाहीं? "**द्रव्येण सर्वे वशाः**" असो. अशी दरबारची स्थिती झालेली असल्यामुळें महाराजांच्या बाजूनें निस्पृहपणें बोलणारा दरबारी मंडळींत कोणीहि नव्हता. त्यामुळें इंग्रजांशीं मैत्री करण्यास आपण कोणत्या कुमुहूर्तावर गेलों, असें महाराजांना वाटूं लागल्यास नवल कसलें? पण आतां करणार काय? इंग्रजांशीं फटकून वागावें, तर त्यांना शासन करण्याची आपणांस कुवत नाहीं, तेव्हां त्यांनाच मोठेपणा देऊन त्यांच्याच कलाप्रमाणें वागणें महाराजांना कर्तव्य झालें. आतां आपणास ' राव ' बनवणें अगर ' रंक ' बनविणें हें इंग्रजांच्या इच्छेवर होतें. तेव्हां इंग्रज देतील तें घेऊन स्वस्थ बसणें प्रतापसिंहमहाराजांना भाग होतें.

अशा विचारानें महाराजांनीं ग्रँट साहेबांचें म्हणणें सर्वस्वी कबूल केलें, व वर्ष दीड वर्ष ग्रँट साहेबांच्या सासुरवासांत काढलें. आतां दंगाधोपा कोठेंच राहिला नव्हता. सर्व महाराष्ट्रावर शांततेचें साम्राज्य पसरलें होतें. कंपनी सरकारची सत्ता महाराष्ट्रांत पक्की मजबूत झाली होती. अशी अनुकूल परिस्थिती पाहून ईस्ट इंडिया कंपनीच्या नोकरांनीं साताऱ्याच्या महाराजांशीं बरेच दिवस करूं घातलेला तह एकदांचा केला!

प्रकरण ११ वें.

चौदा पेश्व्यांचें संस्थान !

महाराजांनीं इंग्रजांच्या आग्रहास्तव त्यांचा आश्रय केला होता. इंग्रजांना ते सामील झाले ते मित्रत्वाच्या नात्यानें. इंग्रजांतर्फे एल्फिन्स्टन साहेबांनीं त्यांना बाजीरावास सोडून आमचेकडे आलां तर तुमचें सारें राज्य बिनशर्थ तुम्हास देऊं म्हणून कबूल केलें [1]होतें. परंतु गव्हर्नर जनरल साहेबांचा विचार पडला वेगळा. आयता मिळालेला एवढा ५०००० चौ. मैलांचा मुलूख हातचा कसा गमवावा ? म्हणूनच तारीख २९।३।१८१८ च्या पत्रांत सर थॉमस मनरो यानें ए. ला असें सुचविलें होतें[2] कीं, "सातारच्या महाराजांस आपण देणार असलेल्या मुलुखाच्या हद्दी सध्या स्पष्टपणें कळवूं नयेत." मनरोसाहेबांच्या या पत्रावरून प्रथमपासूनच कंपनी सरकारच्या कारभाऱ्यांच्या मनांत, मराठी राज्याचा झेपेल तेवढा घास गिळावयाचा होता हें उघड होतें. व म्हणूनच तहाची गोष्ट टाकवेल तेवढ्या कालावधीवर टाकण्याचा त्यांचा कसून प्रयत्न चालला होता. प्रतापसिंहमहाराजांनीं ए. ला अनेक पत्रें लिहिलीं, परंतु एल्फिन्स्टननें गव्हर्नर जनरल साहेबांकडे बोट दाखवीत राहावें, व वेळ मारून न्यावी. ता. १३।९।१८१८ चें ए. सा. नें महाराजांस लिहिलेलें पत्र प्रसिद्ध झालेलें आहे. त्यांत पुढील मजकूर आहे. " आतां

---

१ was invited to throw myself into their Camp, here I was assured I should meet with safety, respect and protection. This invitation was accompanied by the most solemn assuarances from Mr. Elphinstone that if I would do so, and break off all intercourse with Bajeerao and come to him as an ally, my kingdom, with all rights and prerogatives should be preserved to me..........." Capt. Orans.

२ " The limits of his principality be left undefined for the present."

Sir Thomas Munro's letter, date 29-3-1818.

तहाच्या तडजोडीसंबंधीं माझ्याशीं ठराव करण्यास आपण उत्सुक झालां आहां. ...आपल्या भेटीच्या प्रसंगीं ग. ज. सा. कडे वरील बाब सोंपविली आहे. त्या बाबतींत मीही ग. ज. साहेबांस पत्रानें कळविलें आहे, असें समक्ष सांगितलें होतें. ह्या पत्रव्यवहाराचा निकाल कळावा याबद्दल आपणांस उत्कंठा लागून राहिली आहे; परंतु ग. ज. सा. कडून मजला अद्याप कांहींच समजलेलें नाहीं., विषय अत्यंत महत्त्वाचा असल्यामुळें विचार करण्यास विलंब लागणें साहजिक आहे. दरम्यान महाराजांनीं कांहीं काळजी वाळगण्याचें कारण नाहीं."

विषय महत्त्वाचा खराच ! कारण, मित्र म्हणून महाराजांच्या मदतीस गेल्यानंतर, त्या मित्राचें गाठोडें त्याचें त्यास शाबूत परत द्यावें कीं न द्यावें? द्यावयाचें तर सगळें द्यावें, कीं कितीसें ठेवून घ्यावें ? हा विषय महत्त्वाचा नव्हे तर काय ? या गोष्टी ग. ज. साहेबांस ठरविण्यास अवधि पाहिजेच होता. आणि तो अवधि मिळावा व सर्वत्र स्थिरस्थावर व्हावें. यासाठीं " महाराजांनीं कांहीं काळजी वाळगण्याचें कारण नाहीं" म्हणून सांगण्यांत येत होतें, व त्यांची समजूत करण्यांत येत होती. अशा प्रकारें लांबवीत लांबवीत ता. २५-९-१८१९ पावेतों तहाचे बोलणें चाललें होतें. अखेर प्रतापसिंहमहाराजांच्या असहाय्य स्थितीचा फायदा घेऊन ता. २५ सप्टेंबर १८१९ रोजीं इंग्रज सरकार अर्थात् **कंपनी सरकार व सातारचे महाराज प्रतापसिंह** यांच्यामध्यें तह होऊन उभय पक्षांतर्फे मुखत्यारांच्या त्यावर सह्या झाल्या. महाराजांतर्फे मुखत्यार विठ्ठल बल्लाळ फडणीस व ईस्टइंडिया कंपनीतर्फे कॅप्टन जेम्स ग्रँट डफ होते. तहामध्यें ज्या अटी होत्या त्या अर्थात् इंग्रजांना फायदेशीर अशाच होत्या, हें निराळें सांगण्याचें कारण नाहीं.

तहनाम्याच्या मराठी, इंग्रजी व उर्दू अशा तीन भाषांत नकला करून त्यांवर सह्या झाल्या. सगुणाबाईसाहेब महाराज यांनीं १८७४ मध्यें जें महा-

---

१ Official papers printed by G. Norman. 1843.

राणी व्हिक्टोरियाकडे अपील केलें त्यामध्यें तहाची नक्कल छापिली आहे तीच येथें देतों:--

तहनामा.

तहनामा बराय इस्तकाम जाविता राहिता दोस्ती फिमा बैन सरकार दौलत मदार इंग्रेज बाहादूर याणी मनांत असा निश्चय केला कीं श्रीमन्महाराज राजे प्रतापसिंव्ह छत्रपती सातारकर यांचे खानदान बहुत दिवसांपासून आहे यास्तव त्यांचे व त्यांचे मंडळीचे शान शौकतीकरितां त्यांस **कांहीं राज्य द्यावें.** त्याजवरून कप्तान जेमस ग्राट साहेब बाहादूर आजतर्फ सरकार इंग्रेज बाहादूर व विठ्ठल बल्लाळ आजतर्फ सरकार महाराज छत्रपती या उभयतांनीं तहनामा ठराविला तीं कलमें लिहिलीं जात आहेत.

कलम अव्वल

सरकार इंग्रेज बाहादूर यांचे तर्फेनें करार देत आहे कीं महाराज छत्रपती यांचे सरकारांत मुलुक द्यावयाचा याद आलाहिदा या तहनाम्याबरोबर लागली आहे त्या मुल्काचे राज्य महाराज छत्रपती व त्यांचे फरजंद व वारीस व कायम मुकाम याणी सदोदित करीत असावें याजकरितां देत आहेत. कलम.

कलम दुसरें

सरकार महाराज छत्रपती आपण व आपले फरजंद व वारिस व कायम मुकाम यांचे तर्फेनें करार करीत आहेत कीं सरकार इंग्रेज बाहादूर यांचे सरकारांतून जें राज्य देत आहे तें घेऊन सरकार इंग्रेज बाहादूर यांचे कह्यात व मदतीत निरंतर संतोषानें राहून सरकार इंग्रेज बाहादूर यांचे सलामसलतीनें हरयेक काम करीत जावूं याप्रमाणें करार करीत आहे. कलम.

कलम तिसरें

सरकार इंग्रेज बाहादूर करार करीत आहेत कीं सरकार महाराज छत्रपती यांचे मुलखास कोणी मुल्कांतील व बाहेरील उपद्रव किंवा आगळिक करून इजा देवूं लागल्यास इंग्रेज सरकारांतून मुल्काचा बच्याव करतील. सरकार महाराज छत्रपती आपण व आपले फरजंद व वारिस व कायम मुकाम यांचे

तर्फेनें करार करीत आहेत कीं इंग्रजी सरकारचें लष्कर मुलकाचे संरक्षणास आपले राज्यांत राहील अथवा येईल जाईल त्याचे खर्चास जें सामान मुलकांत पैदा होईल तें खुषखरेदीनें पैदा करून देण्याविर्सी आपले राज्यांतील रयत व अहलकाऱ्यास हामेषाकरितां हुकुम करितील व लष्करचे खर्चाकरितां कुरणे लष्करचे हातीं आहेत तीं महाराज यांचे सरकारांतून हामेषाकरितां देत आहेत व सरकार इंग्रेज बहादूर यांची कोणासीं लढाई किंवा कोणावर स्वारी जाहाल्यास सरकार इंग्रेज बहादूर यांचे मदतीस आपले राज्यांतील फौज व सामान तामगदूर जें पैदा होईल तें देत जातील. याप्रमाणें करार करीत आहेत. कलम.

कलम चौथें

सरकार महाराज छत्रपती आपण व आपले फरजंद व वारिस व कायम मुकाम यांचे तर्फेनें करार करीत आहेत कीं आपले मुलकांत लष्कर नवें ठेवणें अथवा कमी करणें तें सरकार इंग्रेज बहादूर यांचे सरदाराचे सल्याशिवाय करणार नाहीं. कलम.

कलम पांचवें

सरकार महाराज छत्रपती आपण व आपले फरजंद व वारिस व कायम मुकाम यांचे तर्फेनें करार करीत आहेत कीं या कराराप्रमाणें आपले कडील राज्याशिवाय दुसरे कोणी सरदार किंवा जाहगिरदार किंवा वकील वगैरे हरकोणास पत्र पाठविणार नाहीं व त्यासीं जाबसाल ठेवणार नाहीं. कांहीं तक्रार पडल्यास त्याचा बंदोबस्त सरकार इंग्रेज बहादूर करतील. वर करार झाला आहे त्या मुलकांतील लोकांसी व बाहेरचे लोकांसी लग्नाचें किंवा घरगुती कांहीं कारण पडल्यास सरकार इंग्रेज बहादूर यांचे सरदाराचे मार्फतीनें करीत जातील याप्रमाणें करार करीत आहेत. हेंच कलम या तहनाम्याची शर्त आहे याजकरितां सरकार महाराज छत्रपती आपण व आपले फरजंद व वारिस व कायम मुकाम या गोष्टीवर हमेशा नजर ठेवितील. महाराज यांचे सरकारांतून कांहीं तफावत

पडल्यास या तहनाम्याचे रुईनें महाराज यांचे सरकारास जो फायदा आहे तो बरबाद होईल. कलम

कलम सहावें

महाराज छत्रपती यांचे सरकारांत जो मुलुख सरकार इंग्रेज बाहादूर देत आहेत तो मुलुख दरोबस्त कांहीं दिवसां महाराज यांचे हातांत सुपुर्द होईल. परंतु आद्याप मुलकाचा बंदोबस्त चांगला झाला नाहीं व पूर्ती चौकशी होणें आहे व मेहेनत करून मुलकाची आबादी जाहाली पाहिजे, याजकरितां कांहीं दिवस मुलकाचो वहिवाट महाराज यांचे नांवानें व महाराज यांचे मसलतीनें सरकार इंग्रेज बाहादूर याजकडील सरदार जे महाराज याजजवळ राहतील ते करतील व मुलकाचा बंदोबस्त ठेवितील. महाराज व अहल्कर लोक चांगले चालीनें मुलकाचा बंदोबस्त करतील असें इंग्रेजी सरकारचे सरदार यांस समजत जाईल तसतसी वहिवाट महाराज यांचे सरकारांत सुपुर्द करीत जातील परंतु राज्याचे आबादीकरितां व मुलकाचे बंदोबस्ताकरितां सरकार इंग्रेज बहादूर यांचे सरदारी सला महाराज यांचे सरकारांत सदोदित ऐकत जातील. याप्रमाणें सरकार महाराज छत्रपती आपण व आपले फरजंद व वारिस व कायम मुकाम यांचे तर्फेनें करार करीत आहेत. कलम.

कलम सातवें

महाराज छत्रपती यांचे सरकारचा मुलुख वर करार होत आहे त्या मुलकांत जाहागिरदार आहेत त्यांची जाहागिर त्यांजकडे सरकार इंग्रेज बाहादूर यांचे बहलद्वारीनें चालेल व इंग्रेजी सरकारांतून कबूल करीत आहेत कीं जाहागिरदार दस्तुरा प्रमाणें महाराज्यांचे सरकारांत रुजू राहून चाकरी करीत जातील. कलम.

कलम आठवें

सरकार इंग्रेज बाहादूर यांचे मुलकांतील जे कोणी खुनी किंवा चोर, अपराधी वगैरे महाराज यांचे मुलकांत आल्यास महाराज यांचे सरकारांतून त्यास धरून सरकार इंग्रेज बाहादूर यांचे सरकारांत हवाली करतील. वर लिहिल्या-

प्रमाणें अपराधी महाराज यांचे मुलकांतील सरकार इंग्रेज बाहादूर महाराज यांचे सरकारांत देतील. चांगला इन्साफ करावयाकरिता व अपराध्यांची सीक्षा करावयाकरितां आपराधी लोकांस धरून आणावयास सरकार इंग्रेज बाहादूर यांचे सरकारचे शिपाई वगैरे महाराज यांचे सरकारचे मुलकांत येतील त्यांस मना करणार नाहीं व अपराधी लोकांस आश्रय देणार नाहीं. याप्रमाणें सरकार महाराज छत्रपती आपण व आपले फरजंद व वारिस व कायम मुकाम यांचे तर्फेनें कबूल करीत आहेत. कलम.

कलम नववें

कोकणचे बाजूवर बहुतकरून महाराज यांचे सरकारचे मुल्काची हद सह्याद्रि घाटाची होईल. घाटावरील डोंगर महाराज यांचे सरकारांत राहतील. त्यांपैकीं कांहीं सरकार इंग्रेज बाहादूर यांचे सरकारांत ठेविल्यास ते खेरीज करून बाकी महाराज यांचे सरकारांत होतील. हदेचे बंदोबस्त करावयाकरितां पाहाणी व मोजणी लौकर होईल. ज्या जागीं घाटाचे डोंगर कोंकणचे मैदानांत फार जातात त्या जाग्याची हद नीट व्हावयाकरितां त्यांपैकीं जितकी जागा इंग्रेज सरकारांत पाहिजे तितकी ठेऊन बाकी महाराज यांचे सरकारांत राहील. सागवानी वगैरे लांकडें इंग्रेज बाहादूर यांचे सरकारांत पाहिजे ते तीं तोडून नेतील व घांटाची जकात इंग्रेज बाहादूर यांचे सरकारांत राहील. जकातीचे मोबदला ऐवज महाराज यांचे सरकारांत इंग्रेजी सरकारांतून पावेल. कलम.

कलम दहावें

सौदागिरीचा व जकातीचा बंदोबस्त होणें आहे त्यास सारी चौकशी झाली म्हणजे याचा बंदोबस्त सरकार इंग्रेज बाहादूर व महाराज छत्रपती यांचे सरकारांतून ठराऊन आलाहिदा करार करतील. तोंपर्यंत आसपासचे मुलकांत इंग्रेज बाहादूर यांचे सरकारांतून जशी जकात घेतील त्याप्रमाणें महाराज यांचे सरकारांतून मुलकांत जकात घेत जातील. याप्रमाणें हरदू सरकारांतून करार होत आहे. कलम.

कलम अकरावें.

हा तहनामा अकरा कलमाचा लिहिला असे तारीख २५ माहे सपटंबर सन १८१९ इसवी मुताबिक छ ४ जिल्हेज सुरासन अशरीन मया तेन व अलफ सन १२३४ हिजरी या तारखेस मुक्काम सातारां येथें मुकार झाला असे त्यास एक कित्ता इंग्रेजी व मराठी व पारसी लिपिचा दुरुस्त होऊन ग्रांट साहेब बाहादूर यांचे मोहर दस्कतानसीं महाराज यांचे सरकारांत सुपुर्द झाला व दुसरा किता इंग्रजी व मराठी व पारसी लिपिचा तयार झाला तो महाराज छत्रपति यांचे मोहर व दस्कतानसीं तयार होऊन ग्रांट साहेब बाहादूर यांचे सुपुर्द झाला ग्रांट साहेब यांचे तर्फेनें ऐसा करार आमलांत आला कीं हा तहनामा नवाब मो अला अल्काब गौरनर जनरेल साहेब बाहादूर यांचे हुजुरांतून मोहर दस्कत होऊन आला म्हणजे जलदीनें महाराज यांचे सरकारांत सुपुर्द केला जाईल. ऐशीयास तहनामा हुजुरुन सही होऊन आल्यावर मुस्तकीम होऊन सरकार इंग्रेज बाहादूर यांजकडून व सरकार महाराज छत्रपती यांजकडून बाजवां व लाजम आमलांत येईल. ग्रांट साहेब बाहादूर यांची मोहर दसकती कित्ता महाराज यांचे सरकारांतून ग्रांट साहेब बहादूर यास वापस दिल्हा जाईल येणेंप्रमाणें करार

(सह्या)

कंपनीचा
शिक्का

हेस्तिंग्ज
स्टयुअर्ट
जे. अॅडम

या तहनाम्यानें महाराजांनां निरा व वारणा या नद्यांमधील भिमा व कृष्णा यांच्या संगमापावेतों मुलूख मिळाला. या मुलखाची पश्चिम हद्द सह्याद्रि पावेतों होती. महाराजांच्या अंमलाखालीं जहागिरदार होते ते:—

१ पंत प्रतिनिधी, औंधकर.
२ पंत सचीव, भोरकर.
३ अक्कलकोटकर राजे भोसले.
४ फलटणकर निंबाळकर.
५ जतकर डफळे.
६ पसरणीचे नबाव शेखमिरे.

महाराजांच्या अंमलाखालीं जे परगणे दिलेले होते त्यांची यादी डॉ. बसू यांच्या ' स्टोरी ऑफ् सातारा ' या पुस्तकांत वाचावयास सांपडेल.

प्रकरण १२ वें.

राज्यकारभार.

इंग्रजांशीं मैत्री जोडून आपणास काय फलप्राप्ती झाली, हें तहनाम्यावरून महाराजांना पुर्तेपणीं कळून चुकलें. इंग्रजांनीं मित्रत्व स जागून आपल्या राज्याचा अपहार करावयास नको होता; परंतु इंग्रज (कंपनी सरकारचे नोकर) यावेळीं नीतिमत्तेचे धडे गिरवीत बसले होते थोडेच! मार्किस ऑफ हेस्टिंगला हिंदुस्थानांतला जितका मुलूख आपल्या अंमलाखालीं आणतां येईल तितका आणावयाचा होता. महाराजांच्या मुलखाच्या बाबतींत मागें वर्णन केल्याप्रमाणें मुलूख घशाखालीं घालण्याची सोन्यासारखी आलेली संधि तो थोडाच फुकट दवडणार! शक्य असतें तर महाराजांना दिला होता, तोही मुलूख त्यानें दिला नसता. पण पूर्वी सांगितल्याप्रमाणें शांतता राखण्यासाठीं महाराजांना छोटेसें राज्य करून देणें भाग होतें. महाराजांना पण सामर्थ्य नसल्यामुळें इंग्रज देतील तें मुकाट्यानें घेऊन वर आनंद दाखविणें भाग होतें. व प्रतापसिंह महाराजांनीं देखील ह्याच शहाणपणाच्या मार्गाचा अवलंब केला.

राज्यकारभार शहाणपणानें व अक्कलहुशारीनें चालविण्यास महाराज समर्थ झाले म्हणजे मग त्यांना तहनाम्यांतील परिशिष्टांतील राज्य मिळावयाचें होतें. तोंपर्यंत महाराजांच्या नांवें रेसिडेन्ट कॅ. जेम्स ग्रँट यानें राज्यकारभार हांकावयाचा होता असें म्हटलें तरी चालेल. परंतु सुरवातीपासूनच महाराजांनीं चांगल्या प्रकारें राज्यव्यवस्था करण्यास प्रारंभ केला होता. महाराजांचे राज्यांत पेशवाईसारखा कोणावर जुलूम करण्यांत येत नसे; इतकेंच नव्हे तर प्रजेस सुखी करण्यासाठीं महाराजांचे प्रयत्न अव्याहत चाललेले असत. त्यामुळें प्रजा सुखी झाली व राज्याची भरभराट होऊं लागली.

महाराजांनीं केलेली शहरसुधारणा.

सातारा शहर डोंगर कठाडीस असल्यामुळें पाण्याच्यासंबंधानें शहरवासीयांना फार हाल सोसावे लागत. सबब प्रतापसिंहमहाराजांनीं यवतेश्वराचे देवाल्याचे पिछाडीस एक मोठा सुंदर तलाव बांधला व त्यांतील पाणी नळानें शहरांत आणिलें. तसेंच महारदरा येथेंही एक मोठा तलाव बांधून त्यांत महारदऱ्याचे ओढ्याचें मार्गानें यवतेश्वराचें पाणी आणून सोडिलें. महारदऱ्याचें पाणी खापरी नळानें शहरांत आणिलें. आज मितीस देखील महारदऱ्याचें पाणी सातारा शहरच्या $\frac{1}{3}$ भागास पुरविण्यांत येत आहे. महारदऱ्याचें काम राजशक १५५ (म्हणजे इ. स. १८२९) सालीं पुरें झालें. त्यास एक लाख रुपये खर्च आला. महारदऱ्याच्या तलावाचें पाणी शहरांत नळानें नेलें, त्यासही तितकाच खर्च आला.

साताऱ्यांत जलमंदिर नांवानें प्रसिद्ध असलेली इमारत महाराज प्रतापसिंहांनींच बांधली. या जलमंदिर इमारतीचे दोन भाग आहेत. एक मुख्य इमारत. ही इमारतही दुमजला आहे. वरच्या मजल्यावर आरसेमहाल व एक तसबिरांचा महाल अशीं दोन दालनें आहेत. आरशेमहालांत माणसास कोंडून ठेवलें, तर दार कोठें आहे हें समजावयाचें नाहीं !

तसबीरा महालांत कांचेवर काढलेलीं इतिहासप्रसिद्ध अशीं चित्रेंच

चित्रें सर्व बाजूंस लावलेलीं आहेत. चित्रकलेच्या दृष्टीनें ही चित्रें अव्वल प्रतीचीं आहते. परंतु कित्येक पैकीं बऱ्याचशा चित्रांचा नाश झालेला आहे.

प्रतापसिंहमहाराजांनीं प्रजेच्या हिताचीं अनेक कामें आपल्या कारकीर्दींत केलीं. आजपर्यंत महाराज किल्ल्यावरील वाड्यांत अगर *रंगमहालाशेजारील (हल्लीं तख्तचें मैदान म्हणून साताऱ्यांत प्रसिद्ध आहे त्या ठिकाणीं) वाड्यांत राहात असत. सदरचा वाडा शहराच्या एका बाजूस होता. प्रतापसिंहांनीं नवा वाडा बांधण्याचें काम सुरू केलें. हा नवा राजवाडा सन १८२६ मध्यें पुरा झाला. या वाड्यास रु. ५॥ लाख खर्च झाला. हा वाडा बांधकामाच्या व नक्षीकामाच्या दृष्टीनें फार अप्रतीम आहे. या वाड्याचा म्युनिसिपल शाळा (मुलांची व मुलींची), हायस्कूल व बोर्डिंग यांच्याकडे हल्लीं उपयोग करण्यांत येत आहे. या वाड्यांतील श्री अंबाबाईचें देवघर व त्यापुढील दिवाणखाना हा भाग फार प्रेक्षणीय आहे. त्या ठिकाणीं आतां कॉपीहॉल आहे. ज्या ठिकाणीं प्रतापसिंहमहाराज राजकारणी कारभार पहात असत, ती खोली हल्लीं हेडमास्तरची ऑफीस रूम झाली आहे. तसेंच ज्या ठिकाणीं पूर्वी महाराज लोकांची भेट घेत असत त्याजागीं आतां हायस्कूलची लायब्ररी आहे. हा नवा वाडा अद्याप पाहण्यासारखा आहे.

नव्या वाड्याचे दरवाजांतून एक भव्य, सुमारें ३६ फूट रुंदीचा, रस्ता सरळ ·॥· मैल लांबीचा बांधून त्याचे दोन्ही बाजूंस महाराजांनीं वाडे वगैरे बांधून दिले; व बांधण्यासही मदत केली. पेठकरी लोकांना दुकानें बांधण्यासाठीं तगाई रकमा दिल्या. हाच हल्लींचा राजरस्ता (palace street) होय.

---

*रंगमहाल—ह्या इमारतींत शाहूमहाराजांच्या वेळीं जनाना असे. शाहूमहाराज याच वाड्यामध्यें वारल्याचें प्रसिद्ध आहे. रंगमहालाचा वाडा १८७८ पर्यंत शाबूत स्थितींत होता. याच ठिकाणीं हायस्कूल होतें. एकाएकीं आग लागून वाडा नष्ट पावला. या वाड्याचा अवशेष व एक दुमजली इमारत सरकारकडून लिलावांत पंडित नांवाच्या इसमानें खरेदी केली आहे असें समजतें.

राजवाड्याजवळच या रस्त्याच्या दक्षिण बाजूस दिवाण महाजनींस महाराजांनीं वाडा बांधून दिला. त्याचेच उत्तरेस रस्त्याच्या पलीकडे पाठशाळा व नगारखाना यांसाठीं इमारती बांधल्या होत्या. या शाळेंत संस्कृत, पुढें पुढें इंग्लीशही शिकविण्याची सोय करण्यांत आली होती. याच ठिकाणीं १२ हजार रुपये खर्च करून छापखाना घालण्यांत आलेला होता व त्यामध्यें महाराजांच्या आश्रयाखालीं तयार झालेले ग्रंथ प्रकाशित करण्यांत येत होते. पुढें वेदोक्त प्रकरण उत्पन्न झालें तेव्हां याच ठिकाणीं वेदोक्तासंबंधीचा कडाक्याचा वाद झाला. इंग्रजांनीं सातारा खालसा केल्यावर याच जागेवर कोतवाल चावडी म्हणजे (Police Station) होतें. आतां सदर इमारती जमीनदोस्त झाल्या असून त्या ठिकाणीं टांगा स्टँड केला आहे. याचे उत्तरेस राजाज्ञांचा वाडा शहाजी राजांनीं बांधलेला होता. तोही सरकारनें जप्त करून जमीनदोस्त करून टाकला आहे. भवानी पेठेंत जागोजाग व्यापारी व उदमी लोकांना घरें बांधण्यास सोईस्कर जागा दिल्या. चिटणीसांनाही एक वाडा बांधून दिला. चिटणीसांना दिलेल्या जागेंत आतां पुष्कळ फरक झाला आहे. रा. ब. काळे हल्लीं रहात असलेला वाडा व त्याचे शेजारच्या वेस्टर्न इंडिया लाइफ इन्शुअरन्स कंपनीचा वाडा हे पूर्वीचे चिटणीसांचे वाडे. त्यांच्यासमोरच कांकडे यांना दोन वाडे बांधून दिले. त्यांपैकीं एक वाडा कांकडे (नामदेव शिंपी) यांचेचकडे चालत असून पूर्वेकडील वाडा रहिमतपूरकर माने यांनीं खरेदी केला आहे.

याशिवाय अदालतीचा वाडा बांधला; ४० हजार रुपये खर्च करून फरासखाना बांधिला; हल्लीं सिटी पोष्टाची इमारत असलेला दप्तरखाना, व खाजगी पागा वगैरे इमारती बांधल्या; ‘चार भिंती’ म्हणून ओळखली जाणारी इमारत, हिला नजर बंगला म्हणत, तो व त्याच्याच पूर्वेस सध्या पाया उकरून काढलेला दिसतो, तो दुसरा नजर बंगला असे बंगले बांधिले.

मे. यासाठीं गेंडा माळावर इमारती व हल्लीं डि. सु. ऑफ पोलिसची

कचेरी असलेली तुरुप (ट्रूप) पागा बांधिली. तोफखान्यासाठीं व तोफा ओतविण्यासाठीं वगैरे १॥ लाख रुपये खर्च केले. या तोफखान्याच्या इमारतींत सध्या तुरुंग आहे. शिवाय करंजें, निंब, खेड, कोल्वडी व शहरांत धनीची अशा बागांत इमारती बांधिल्या. गुरुवारचा थोरला परज (तुरुंग) बांधिला. या ठिकाणीं गुरुवारचा बाजार भरतो व सचीवाच्या वाड्यानजीक धाकटा परज बांधिला. रंगमहालाचीही दुरुस्ती केली.

देवालयांप्रीत्यर्थही महाराजांनीं फार खर्च केला. किल्ल्यावरील मंगळाईचें देऊळ रु. ५००० खर्चून नीट करून बांधिलें. प्रतापगडावरील देवालयाचें बांधकाम केलें त्यास ४०००० रु. खर्च आला. रामदास स्वामींचें देवालय सज्जनगडावर बांधिलें त्यास रु. २०००० खर्च केला. यवतेश्वराचें देऊळ बांधिलें व तलाव बांधिला. त्यास रु.१०००० खर्च आला. याशिवाय अनेक कामें केलीं. [मराठी दप्तर रुमाल १ ला पानें १५७।८ पहा].

लोकोपयोगार्थ महाराजांनीं पंचपाळा हौद, गुरुवारचा हौद, छत्रीचा हौद वगैरे जागोजागीं अनेक हौद बांधले.

महाराज प्रतापसिंहाचे वेळींच महाबळेश्वरचा शोध लागला. तोंपर्यंत उन्हाळ्यांत हवा खाण्यास युरोपियन लोक यवतेश्वरास जात असत. लॉडविक साहेबानें प्रथम महाबळेश्वरास फिरून तें राहाण्यास सोईस्कर असल्याचें ठरविलें. महाबळेश्वरास जाण्यास मेढ्यावरून केळघर घाटांतून रस्ता करण्याचें महाराजांनीं पत्करून तें काम पुरें केलें. हा रस्ता अद्याप आपणांस पहावयास मिळतो. जुना सातारा—पुणें रस्ता देखील महाराजांच्या काळीं तयार करण्यांत आलेला आहे.

सातारा शहर सुधारण्याचें व त्याचा विस्तार वाढविण्याचें कार्य महाराजांनीं हातीं घेतलें. राज्यकारभाराच्या अठरा कारखान्यासाठीं स्वतंत्र इमारती बांधल्या. रणछत्रींचे पश्चिम अंगास असलेला उष्ट्रखाना, गेंढा माळावर पायदळास छावणी, रथखाना, पवई नाक्यावरच्या मारुतीसमोर गजशाला, वगैरे

अनेक इमारती व सोईच्या जागा तयार केल्या. याशिवाय प्रतापगंज पेठ वसविली. प्रतापगंज पेठ व भवानी पेठ वसवतांना त्या त्या पेठांतून वाहात जाणाऱ्या ओढयांवरून नवे भक्कम पूल बांधले. सर्व ठिकाणीं लहान मोठे हौद बांधून पाणीपुरवठा केला. शहरची वस्ती त्यामुळें वाढली व सातारा हें खरेंखुरें राजधानीचें शहर म्हणून चमकूं लागलें.

महाराजांची शिक्षणविषयक कामगिरी.

प्रतापसिंहमहाराज शांतताप्रिय राजे होते. त्यांनीं प्रजेच्या हिताचा अहर्निश विचार करावा व खटपट करीत असावें. महाराजांना विद्येचें महत्त्व कळलेलें होतें. पेशव्याच्या जाचांतून सुटका झाल्यावर महाराजांनीं सातारा येथें पाठशाळा सुरू केली, व त्यामध्यें आपल्या आप्त वर्गांतील गृहस्थांच्या मुलांना दाखल करविलें. परंतु शिक्षण देण्यास पुरेसे शिक्षक मिळेनात. ब्राह्मणांना शिक्षक नेमण्याचे यत्न महाराजांनीं केले, पण संस्कृत भाषेचें शिक्षण मराठ्यांना देण्यास ब्राह्मण कबूल कसे होणार ? तेव्हां मुंबईहून डॉ. मिल्ने वगैरेंच्या मार्फत महाराजांनी मिशनरीं आणले. वे. शा. सं. आबाशास्त्री पारसनीसांस रखे अध्यापक नेमून पाठशाला चालविली.

प्रतापसिंहमहाराज हे दूरदर्शी राजकारणी पुरुष होते. आपला **मराठा समाज विद्यासंपन्न झाला नाहीं तर जीवनकलहाच्या चढाओढीत टिकावयाचा नाहीं**, हें त्यांनीं पक्कें ओळखिलें होतें. व म्हणूनच त्यांनीं विद्याप्रसाराचा अट्टाहास चालविला होता. इंग्रज लोकांचें सामर्थ्य कशांत आहे हें त्यांनीं ओळखिलें होतें, व त्यांची संस्कृति कळावी, त्यांच्याकडील ज्ञान आपल्याकडच्या लोकांना कळावें या उद्देशानें त्यांनीं इंग्लीश वगैरे भाषांतील ग्रंथ मराठी भाषेंत लिहिण्यास लावले. महाराजांच्या कारकीर्दीत महाराजांच्या हुकुमावरून “ **सभारंजनी** ” नांवाचा ग्रंथ माधवराव मुनशीनें लिहिला. हा ग्रंथ मागाहून **भारतवर्ष** नामक मासिकांत प्रसिद्ध करण्यांत आलेला होता. ह्या ग्रंथाच्या प्रस्तावनेंतील पुढील मजकूर मुद्दाम उद्धृत केला आहे, त्यावरून त्याकाळच्या मराठी भाषेचाही बोध होणारा आहे.

" श्रीमत् जगदीश्वराप्रती नमन करून ग्रंथ लिहिण्यास प्रारंभ करतों कीं, पूर्वी हा ग्रंथ साहेब आलीषान मिस्तर इरन गटन साहेब बहादूर याणी शेर अली मुनशी याजकडून उर्दू भाषेंत करवून याचें नांव आरायेष महफील असें ठेवून सन १८०४ या सालांत छापखान्यांत देऊन छापविला. परंतु जे लोक पारशी विद्येंत प्रवीण नाहींत त्यांचे समजूतींत येत नाहीं. याजकरितां प्रवृत्तीचे मराठी भाषेंत तर-जुमा केला असतां इकडील सर्व लोकांचे समजूतींत चांगला येईल म्हणोन श्रीमन्महाराज क्षत्रिय कुलवतंस राजश्री छत्रपती स्वामी प्रतापसिंहमहाराज याणी आज्ञा केल्यावरून इचें नांव सभारंजनी असें ठेविलें आहे.

या पुस्तकाची पृष्ठसंख्या अजमासें १०६ आहे. सभारंजनी पुस्तकाप्रमाणें " **सभानीति** " नांवाचें पुस्तक महाराजांनीं लिहवून प्रसिद्ध करविलें. सभा-नीति हा राजनीतिविषयक ग्रंथ आहे. हा ग्रंथ सन १८२७ मध्यें लिहिलेला आहे. तसेंच अर्थशास्त्रावर " आय-व्यय प्रकरण " नांवाचा ग्रंथ त्याच सुमारास महाराजांच्या आज्ञेवरून लिहून प्रसिद्ध करण्यांत आलेला आहे. याशिवाय " सेवक-बोधिनी " नांवाचा एक ग्रंथ महाराजांनी लिहिविला. विलायतेस या सेवक-बोधिनीची एक प्रत आपण पाहिली असल्याचें श्री. दादासाहेब करंदीकर यांनीं विलायतेहून मुद्दाम पत्र पाठवून कळविलें आहे. अशा प्रकारच्या राजकारणविषयक ग्रंथांवरून महाराजांना कोणत्या गोष्टींची अभिरुचि होती, त्यांचे विचार किती प्रगमनशील होते, व राज्यकारभार हांक-ण्यांत त्यांचें काय उद्दिष्ट होतें हें कळून चुकणारें आहे. महाराज जुन्यापुराण्या राजे महाराजांसारखे कूप मंडूक वृत्तीचे नव्हते. परकीय लोकांचे वर्चस्व व सामर्थ्य कोणत्या गोष्टींत आहे व त्या आपल्याकडे कशा आणल्या पाहिजेत ह्याबद्दल त्यांची खटपट अहर्निश चालू असे.

महाराजांनीं " **सिद्धांत विजय** " नांवाचा एक संस्कृत ग्रंथ आबा पारसनीस नांवाच्या एका विद्वान् प्रभू लेखकाकडून लिहविला. हा ग्रंथ कोल्हा-पूरच्या वेदोक्त प्रकरणीं **राजर्षि शाहूमहाराज** यांनीं प्रो. डोंगरे यांचे मार्फत प्रसिद्ध करविला. " सिद्धांत विजय " ग्रंथ प्रचंड असून त्यामध्यें जुन्या

कर्मठ ब्राह्मणी धर्मावर शास्त्राधारें टीका केली आहे. व क्षत्रियांचें अस्तित्व शाबीत करून दाखविलें आहे. या ग्रंथाचें एकंदर १० अध्याय आहेत. पैकीं ९ अध्याय प्रो० डोंगरे यांनीं प्रसिद्ध केले आहेत. १० वा अध्याय उपलब्ध नाहीं. महाराज छत्रपतींच्या वेळीं "सिद्धांत विजय" ग्रंथाचे पांच अध्याय सातारा येथें शिळा प्रेसवर छापून प्रसिद्ध केले होते, व बाकीचे पांच सरकारी दप्तरीं ठेवून दिले होते.

सिद्धांतविजयाप्रमाणें 'कर्मकल्पद्रुम' व संस्कृत-प्राकृत वंशवृक्ष हेही ग्रंथ महाराजांनीं तयार करविले. कर्मकल्पद्रुम साताऱ्यास शिळा प्रेसवर छापिला. "रस तरंगिणी" नांवाचेंही एक पुस्तक लिहिण्यांत आलें. Historical Museum मध्यें "रस तरंगिणी" व "सभारंजनी" हे ग्रंथ असल्याचें समजतें. तसेंच महाराजांचा आश्रित बेलवडे येथील रामचंद्र दैवज्ञ ज्योतिषी यानें इ० स० १८२७ च्या सुमारास छंदोमंजरी नामक ग्रंथ रचिला. त्याच्या श्रमाचें सार्थक करावें म्हणून महाराजांनीं बेलवडे येथें दोन चाहूर जमीन त्यास वंशपरंपरा इनाम करून दिली. छंदोमंजरी हें काव्य आहे. त्यांतील एक श्लोक उदाहरणार्थ देतों:---

मूर्ख तोपति जसे नकलांनीं । शास्त्र रितीनीं तसे न कलानीं ॥
स्वैरिणी विट जना सरमा ही । गोडनो वधु मनास रमाही ॥ १ ॥

महाराजांच्या काळीं स्त्रीशिक्षणाची कल्पना कोणास असणें शक्य तरी होतें? पण प्रतापसिंहमहाराजांनीं त्याबाबतींत देखील सुधारकांवर ताण केली होती! महाराजांची एकुलती एक कन्या राजकुमारी गोजराबाईसाहेब यांना व त्यांच्याबरोबर राजवाड्यांतील इतर बालिकांना एकत्र शिक्षण मिळावें अशी तजवीज केली. त्याकाळच्या परिस्थितीला अनुरूप असें 'लष्करी' शिक्षणही या मुलींना देण्यांत येत असे. जनरल लाडविक भोळा शिपाई गडी. त्याला या "अबला जनाला" हें लष्करी शिक्षण देत असतांना पाहून मोठें कौतुक वाटलें. थार्न्टननें तर आपल्या हिंदुस्थानच्या अर्वाचीन इतिहासांत या प्रकाराबद्दल महाराजांची कुचेष्टा करण्याचा प्रयत्न केला आहे. टीकाकार टीका

करावयाचेच. पण महाराजांची प्रगमनशीलता ह्या वरील प्रयत्नांवरून निःसंशय शाबीत होणार आहे.

महाराजांची शिक्षणविषयक कामगिरी व त्यांचा स्वतःचा दांडगा विद्याव्यासंग ह्या साऱ्या गोष्टी इंग्लंडमधील 'रॉयल एशियाटिक सोसायटीच्या' सभासदांस समजल्यावर, त्यांनीं महाराजांना आपल्या सोसायटीचे सन्मान्य सभासद करून घेऊन त्यांचा बहुमान केला. असें म्हणतात कीं, हा मान हिंदुस्थानांत पहिल्या प्रथम महाराजांनाच मिळाला.

राज्यव्यवस्था व दिनक्रम.

प्रजेचा संतोष राखून व्यवस्थितपणें राज्यकारभार हांकण्याची महाराजांची हातोटी अपूर्व होती. इंग्रजांमधील अव्वल टीकाखोर देखील महाराजांचा राज्यकारभार पाहून महाराजांवर खूष होत व महाराजांची मनसोक्त मुक्त कंठानें प्रशंसा करीत. स्वतः एल्फिन्स्टनसाहेब मुंबईचे गव्हर्नर या नात्यानें १८२२ सालीं साताऱ्यास आले होते; त्यांनीं महाराजांकडे राहून सर्व कारभाराची तपासणी केली. अर्थात् ती फार कसून केली असावी, याबद्दल शंका नको. महाराजांचें वय त्यावेळीं फारसें नव्हतें, परंतु त्यांनीं इंग्रजांच्या बरोबरीनें राज्यकारभार चालविलेला आहे, असें एल्फिन्स्टनसाहेबाला आढळून आलें. एल्फिन्स्टनसाहेबांना दरबारानंतर महाराजांनीं आपल्या "खिलवाटेंत" नेलें व त्यांनीं आपल्या राज्यांतील त्रैवार्षिक गुन्ह्यांचीं व दिवाणी दाव्यांचीं रजिस्टरें दाखविलीं. तसेंच वेळोवेळीं केलेलीं जमाखर्चाचीं बजेटें व जमाखर्चाचे तक्ते हेही दाखविले. हें सारें पाहून एल्फिन्स्टन साहेबाला मोठा अचंबा वाटला. एतद्देशीय राजेरजवाड्यांबद्दल इंग्रज लोकांची कल्पना अशी असते कीं, हे राजे नटवे, रंगेल, अघळपघळ खर्च करणारे व वरिष्ठांशीं हांजी हांजी करणारे असे असतात व प्रतापसिंह महाराजांच्या बाबतींत पहिल्या तीन वर्षांतच त्यांचा ग्रह पार बदलून गेला. एखादा चांगला सिव्हिलियन (I. C. S. झालेला कलेक्टर) जसा व्यवस्थेनें व नियमाबरहुकूम

1 मि. एडवर्ड थॉर्नटन यांच्या इतिहासांत अशा प्रकारचें वर्णन आहे.

कारभार हांकीत असतो, त्याचप्रमाणें महाराजांनीं व्यवस्था राखली होती. महाराजांच्या कारभाराच्या तपासणींत एल्फिन्स्टन साहेबाला असेंही आढळून आलें कीं, महाराज स्वतः अगदीं नियमितपणें न्यायासनावर बसून खटले ऐकत व निकाल देत. एतद्देशीय राजेरजवाड्यांप्रमाणें महाराजांचा कारभार स्वैर वृत्तीचा अगर लहरीचा नव्हता. महाराजांची कारभार करण्याची "खिलवात"[१] नांवाची खोली होती. त्या खोलींत महाराज टेबलाशीं खुर्चीवर बसून एकाद्या कलेक्टराप्रमाणें कामकाज पहात. पत्रें वगैरे स्वतः लिहीत. महाराजांमध्यें आणखी एक वैशिष्ट्य होतें, तें म्हणजे महाराज स्वतः रोजची डायरी Journal लिहीत असत. एल्फिन्स्टन साहेबानें हें सारें पाहिलें तेव्हां त्यास मोठें कौतुक वाटलें. कारण गुणी माणसाची परीक्षा गुणवानालाच होते. रत्नपारखी असतो तोच हिऱ्याची किंमत करूं शकतो. कोंबड्यापुढें मोतीं टाकून उपयोग काय? एल्फिन्स्टन साहेबांनीं महाराजांची किंमत ओळखली होती कारण ते स्वतः विद्वान्, दांडगे व्यासंगी व लोककल्याणासाठीं अहर्निश झटणारे होते. केवळ सतत दीर्घोद्योग करीत राहिल्यामुळें अगदीं साध्या कारकुनापासून वाढत वाढत ते गव्हर्नर झाले होते. सर जान मालकम त्यांच्यापेक्षां जुना नोकर व सर्वांना प्रीय. पण एल्फिन्स्टन साहेबांची उद्योगक्षमता अलौकिक. म्हणून मालकम साहेबांच्या पूर्वीं एल्फिन्स्टन साहेबांना गव्हर्नर होण्याची संधि डायरेक्टरांना देणें भाग पडलें. अशा प्रकारच्या गुणी माणसानें मुक्तकंठानें महाराजांबद्दल जे प्रशंसोद्गार काढले, तेच मुद्दाम या ठिकाणीं दिले आहेत.

एल्फिन्स्टन साहेब म्हणतो:—

सेताऱ्यांत दुसऱ्या आणखी बाबींपेक्षां महाराजांची खासगीकडील खोली

---

१ I was more struck with his private room than any thing I saw at Satara. It contains a simple table covered with green velvet, at which the descendant of Shivajee sits in a chair, and writes letters, as well as a journal of his transactions, with his own hand. I do not know what his ancestor would think of so peaceful a descendant.

पाहून मला मोठा अचंबा वाटला. या खोलींत एकच एक टेबल आहे व त्यावर हिरव्या रंगाचें मखमली आवरण (टेबल क्लाथ) पसरलेलें आहे. या टेबलाशीं शिवाजीमहाराजांचा वंशज खुर्चीवर बसतो. पत्रें वगैरे लिहितो. व रोजच्या रोज घडणाऱ्या गोष्टींची जंत्री स्वहस्तें लिहितो. अशा प्रकारच्या शांततावादी वंशजाबद्दल त्याच्या त्या पूर्वजाला (शिवाजीला) काय बरें वाटत असेल तें मला समजत नाहीं. "

महाराज प्रतापसिंहांच्या सद्वर्तनाचा व चोख कारभाराचा परिणाम एल्फिन्स्टनसारख्या इंग्रजी अंमलदारावर झाल्याशिवाय राहिला नाहीं. शिवाय कॅप्टन ग्रँट डफ साहेबाकडून माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन यास हा सर्व प्रकार नित्य समजत असे. त्यामुळें विलायतेस जाण्यापूर्वीं महाराजांच्या राज्याचा कारभार महाराजांचे हवालीं एल्फिन्स्टननें केला. महाराजांच्या कारभाराबद्दल साऱ्या इंग्रज अंमलदारांचें मत अत्यंत अनुकूल असें होतें. महाराजांच्या कारभाराइतका चोख व सुव्यवस्थित कारभार त्यांच्या स्वतःच्या राज्यांतही नव्हता, ह्याची त्यांना पूर्ण जाणीव होती. प्रतापसिंहमहाराजांनीं प्रजेच्या सुस्थितीची फारच काळजी घेतली होती म्हणूनच ते खरेखुरे लोकप्रिय होते.[१]

ग्रँट डफ साताऱ्यास रेसिडेंट असतां त्याचेजवळ बाळाजीपंत नातू हा नेटिव्ह अ० रेसिडेंट होता. हें मागें आलेंच आहे. बाळाजीपंताचे मनांत महाराजांनीं आपणास पेशवा नेमावें. परंतु महाराज इंग्रजांस सामील झाल्यापासून तहावर सह्या होईपर्यंतच्या काळांत बाळाजीनें महाराजांशीं जें बेपर्वाईचें

---

१ I would point to the principality of Sattara itself which appears to have been most successfully administered by H. H. the Raja Pratap, who has done more for the improvement of the country than our own Govt. can pretend to have done in any part of its country.

Sri Maharanee Sagunabai's Appl.

व उपमर्दकारक वर्तन केलें होतें, त्यामुळें महाराजांचे मनांतून तो अगदीं उतरला होता. किंबहुना महाराजांना त्याचेबद्दल अत्यंत तिरस्कार वाटे. परंतु बाळाजी पडला चित्पावन ब्राह्मण, त्यांतून वाईकर. त्यानें ग्रँट डफ साहेबांकडून वशीला बांधण्यास प्रारंभ केला. परंतु ग्रँट डफ वगैरे इंग्रज बाळाजीस पूर्ण ओळखून होते. त्यांनीं आपल्या उपयोगापुरताच बाळाजीस जवळ केलेला. हा कलिपुरुष साताऱ्चे महाराजांकडे दिवाण नेमून दिल्यास भलतीच भानगड उपस्थित करील, अशी त्यांना भीति वाटे. इंग्रजांचा झाला, तरी बाळाजीवर विश्वास कसा बसावा? ज्या बाळाजीनें आपल्या जातीच्या, आपल्याच धन्याच्या घरावर इंग्रजांचें निशाण फडकविलें व त्यापूर्वी घरभेदेपणानें खडान् खडा पेशव्यांच्या घरची, दरबारची, पेठेची किंबहुना हरएक महत्त्वाच्या गोष्टीची बातमी केवळ पैशाखातर दिली, तोच बाळाजी आपणाशीं इमानानें वागेल, याचा भरंवसा काय? कारण एकदां द्रव्यलोभानें नीच कृत्यास प्रवृत्त झालेलें मन, पुनः हलकटपणा करणार नाहीं याची ग्वाही कोण बरें देईल? असा विचार करून ग्रँट डफनें बाळाजीच्या बाबतींत बुध्याच लक्ष्य घातलें नाहीं. यामुळें बिचाऱ्या बाळाजीस रेसिडेन्सिमध्यें खर्डे घाशीत अगर कागदांची उलथापालथ करीत वेळ काढावा लागे. नाहीं म्हणावयास आपल्याच जातीच्या(चित्पावन)ब्राह्मणांना रेसिडेन्सीमध्यें व महाराजांच्या अमलांत नोकऱ्या मिळवून देण्याची (Service Securing) राजमान्य कामगिरी त्यानें या मुदतींत चांगलीच केली. वशिल्याचा जोर असल्यामुळें त्या बाबतींत त्याला चांगलेंच यश संपादन करतां आलें. तसेंच कायस्थ प्रभूबद्दलच्या ग्रामण्याचा अग्नि साताऱ्यास राहून त्यास चांगलाच पेटवतां येत होता.

प्रकरण १३ वें.

ग्रामण्य.

मागील प्रकरणांत उल्लेख केल्याप्रमाणें प्रतापसिंह महाराज सुव्यवस्थितपणें राज्यकारभार हांकीत होते. प्रजेस शांततेचा लाभ मिळूं लागल्यानें सातारा शहराची वाढही झपाट्यानें होऊं लागली होती. लोककल्याणाचीं अनेक कामें महाराजांनीं सुरू केलीं होतीं. प्रजेच्या संतोषामुळें महाराजांना देखील आनंद होत होता पण अशा आनंदामध्यें विरजण पडण्यास प्रथमपासूनच हळूहळू सुरवात झाली, त्याची हकिकत पुढें देत आहों.

सन १८१८ चे सुमारास संकेश्वर मठाचे स्वामी गांवोगांव संचारार्थ निघाले असतां क्षेत्र माहुलीस येऊन दाखल झाले. या स्वामींची अशी पद्धत होती कीं, संचारार्थ निघाल्यावेळीं ज्या गांवीं स्वामींचें वास्तव्य असेल, त्या गांवांतून व आजूबाजूच्या गांवांतून दक्षिणा वसूल करावयाची. कित्येक लोक जगद्गुरु हे थोर सद्गुरूंच्या गादीवरील आहेत, म्हणून भक्तिभावानें दक्षिणा देत, पण स्वामींच्या परिवाराचा खर्च दांडगा असे. त्यामुळें स्वसंतोषानें लोकांनीं दिलेल्या दक्षिणेवर खर्च भागत नसे. सबब जास्त दक्षिणा वसूल करण्यासाठीं लोकांवर जुलूम केला जाई, पुढें पुढें तर ठिकठिकाणीं दक्षिणेच्या वसुलीचे लिलाव स्वामी करूं लागले. ज्यांनीं असे लिलाव घेतलेले असत, ते लोक रामोशी, मांग वगैरे लोक पदरीं ठेवून, त्यांच्या करवीं जुलुम जबरदस्ती करून दक्षिणा गोळा करीत. वारणेच्या उत्तरेस आल्यावर स्वामींनीं महाराजांच्या प्रजेवर असाच जुलूम आरंभिला. कॅप्टन ग्रँट डफला अर्थात् या जगद्गुरूचें स्तोम आपल्या अमलांत वाढूं नये, असें वाटणें साहजिक होतें. म्हणून त्यानें महाराजांची संमति घेऊन

असें फर्मान काढलें कीं, जगद्‌गुरूंना कोणीही नाखुषीनें कांहींही देऊं नये. आमच्या अंमलांतील प्रजेवर जबरी करण्यास त्यांना अधिकार नाहीं. महाराजांच्या वतीनें सुटलेल्या या हुकुमाचा स्वामींस विशेषतः त्यांच्या आश्रितांस राग येणें स्वाभाविक होतें. तथापि स्वामींनीं माहुलीस पोहोंचल्यावर महाराजांना निरोप पाठविला कीं, तुम्ही हिंदु सुपुत्र आहां; तेव्हां स्वामींचे दर्शनास येऊन, स्वामींना आपलेकडे येण्याचें निमंत्रण द्यावें, व साताऱ्यास घेऊन जावें. महाराज तरुण असून प्रागतिक मताचे असल्यामुळें, व विशेषतः स्वाभिमानी असल्यामुळें, स्वामींचा हा आचरट हुकूम पाळण्याचें त्यांनीं स्पष्टपणें नाकारलें. स्वामींनीं व स्वामींच्या शिष्यवृंदानीं, खूप खटपट लटपट करून पाहिली. इतकेंच काय, पण रागावून व रुसूनही पाहिलें. पण महाराज मुळींच बधेनात. अखेर जसें '**डोंगराकडे महंमदास जाणें भाग पडलें**' तसें स्वामींना आपण होऊन साताऱ्यास महाराजांकडे जावें लागलें. स्वामींनीं मोठें मन करून झालेला अपमान गिळून टाकला! निदान बाह्यात्कारीं तरी त्यांनीं तसें दाखविलें! परंतु त्यांचे पदरीं असलेल्या, नागोदेवराव वगैरे, मंडळीस ती गोष्ट लागून राहिली.

स्वामी साताऱ्यास आले, ते ठकार दिक्षित यांच्या वाडयांत उतरले होते. स्वामींना महाराजसरकारांकडून सामानसुमान पुरविण्यांत येत असे. साताऱ्यास पंडितराव यांनीं स्वामींची पाद्यपूजा केली. तेव्हां बळवंतराव चिटणीस यांना वाटलें कीं, स्वामीनीं आपलेकडेही पाद्यपूजेस यावें. त्यावरून चिटणीसांनीं स्वामीस विनंती केली. त्यांवर स्वामींनी उत्तर केलें " महाराजसरकारनीं कोठें जाऊं नये, असें सांगितलें आहे. सबब येतां येत नाहीं; निरुपाय आहे. बोरगांव व जैतापुर या ठिकाणीं आपण गेलों होतों, भिक्षा घेतली, भोजनही केलें होतें." अशा प्रकारच्या गोष्टी सांगून बळवंतरावाकडे जाण्याचें स्वामींनीं नाकारलें. पण चिटणीसाची चिकाटी दांडगी. स्वामींच्या उत्तरावरून चिटणीस महाराजांकडे गेले. महाराजांनीं स्वामींना सर्वांचेंच घरीं जाण्याबद्दल "आज्ञा" केली. त्यावरून स्वामींच्या

कारभाऱ्यांनीं पुष्कळ आढेवेढे घेतले. परंतु स्वामी अखेर बळवंतरावाकडे गेले. स्वामींच्या परिवारांतल्या ७५ व इतर अजमासें २५० ब्राह्मणांना चिटणीसांनीं भोजन घातलें. विडे, दक्षिणा, शिष्टसंभावना, अत्तरगुलाब वगैरे देऊन त्यांची बोळवण केली.

बळवंतराव चिटणीसांच्या घरच्या पाद्यपूजेचा उल्लेख आम्ही बुद्धया केला आहे. जगद्‌गुरूस धार्मिक बाबतींत मोठा ठरविण्याचा अट्टाहास पेशवाईनंतर करण्यांत येऊं लागला आहे. त्यापूर्वीं जगद्‌गुरु राजास वचकून असत. धार्मिक अगर सामाजिक बाबतींत अखेरचा निर्णय करण्याचा हक्क राजांचा म्हणजे राजसत्तेचा; म्हणजेच क्षत्रियांचा होता. ही गोष्ट वरील हकिगतीवरून देखील स्पष्ट होणारी आहे. जगद्‌गुरूंना अखेर निर्णय करण्याचा अधिकार नव्हता; त्यांना छत्रपतींना वचकावें लागे. महाराजांच्या आज्ञेला मान तुकवावी लागे वगैरे गोष्टी वरील हकीगतीवरून कळून येणाऱ्या आहेत.

बळवंतराव चिटणीसानें इतका अट्टाहास करून, इतका खर्च करून संकेश्वर पीठाच्या स्वामींना बोलावलें तें उगीच भाविकपणानें नव्हतें. पाद्यपूजा झाल्यानंतर थोडक्याच दिवसांनीं स्वामी साताऱ्याहून निघाले, त्यावेळीं चिटणीसांनीं आपणांस शिफारसपत्र (certificate) द्यावें अशी विनंती केली. कायस्थ प्रभूंना क्षत्रिय मानण्यास त्याकाळचे ब्राह्मण नाखुष होते. कायस्थ प्रभू हे क्षत्रिय आहेत, अशासंबंधीं सनद देण्याबद्दल बळवंतराव चिटणीसांनीं जगद्‌गुरूंना विनंती केली. स्वामींनीं आढेवेढे न घेतां सनद दिलीही. स्वामींनीं ह्या सनदेनें प्रभू जातीला नवीन कांहीं सामाजिक हक्क दिले असें नाहीं. किंबहुना सरळ भाषेंत प्रभू जात क्षत्रिय आहे, असेंही कबूल केलें नाहीं. "पूर्वींपासून आजपर्यंत जसा जातिधर्म चालत आला असेल त्याप्रमाणें चालविणें. नवीन तंटा करूं नये. विशेष लिहिणें तें काय." (शके १७४७) इतकाच मुद्याचा मजकूर होता. यावरून डोंगर पोखरून उंदीर काढावा

१ श्री. ठाकरेकृत ग्रामण्याचा इतिहास पाहा.

त्याप्रमाणें हजारों रुपये पाद्यपूजेस खर्चून बळवंतराव चिटणीसास वरील मजकुराचें, कौन्सिलांतील उत्तराच्या थाटाचें, सर्टिफिकेट मिळालें. बळवंतराव चिटणीसांना सर्टिफिकेट दिल्यानंतर शंकराचार्यांची स्वारी नाशिकास जाण्यासाठीं निघाली, ती पुण्यास मध्यंतरी ब्राह्मण मंडळीच्या आग्रहावरून थांबली. बाळाजीपंत नातूस सातारची दिवाणगिरी न मिळाल्यामुळें तो चरफडत होताच. शंकराचार्यांची आश्रित मंडळी महाराजांच्या स्वाभिमानी वर्तनानें गरम झाली होती. त्यांना वाटे पेशवाई गेली त्याबरोबरच ब्राह्मणांचें महत्त्व गेलें. त्यांच्या मतानें महाराजांनीं बळवंतराव चिटणीसाचें म्हणणें ऐकून शंकराचार्य स्वामींना बळवंतरावाकडे पाद्यपूजेस जा, अशी आज्ञा करावयास नको होती. केवळ महाराजांना वचकूनच स्वामींनीं चिटणीसास क्षत्रियत्वाबद्दलचें शिफारसपत्र (certificate) दिलें असा स्वामींच्या आश्रित व अभिमानी मंडळींनीं आपला गैरसमज करून घेतला.

अशा प्रकारें गैरसमज करून घेतल्यानंतर त्या मंडळीनीं सांगलीकर चिंतामणराव पटवर्धन व बाळाजीपंत नातू वगैरे कर्मठ, वस्तुतः कर्मनष्ट, ब्राह्मण सत्ताधाऱ्यांकडे धांव घेतली. ‘ ब्राह्मण्य आतां नष्ट होणार ’ ‘ ब्राह्मणांना आतां जगांत कोणीच वाली राहिला नाहीं. ’ असा खोटाच कांगावा करण्यास सुरुवात झाली. राघवाचार्यादि थोडेसे सुबुद्ध ब्राह्मण खेरीज करून, बाकी सारे ब्राह्मण देशस्थ, कोंकणस्थ, कऱ्हाडे वगैरे भट व गृहस्थ एक झाले. व त्यांनीं शंकराचार्यांवर वजन पाडून प्रभू, सोनार, व जिनगर हे शूद्र आहेत, अशीं आज्ञापत्रें मिळविलीं. या खटपटींत चिंतामणराव पटवर्धन व बाळाजीपंत नातू यांचें विशेष अंग होतें, हें सांगण्याची आवश्यकता नाहीं.

शंकराचार्यांनीं सदरील आज्ञापत्र दिलें खरें, पण त्यास अट ठेवली होती. वरील आज्ञापत्र दिलें त्या वेळीं निळकंठ शास्त्री थत्ते हा ब्राह्मणाच्या बाजूनें पांडित्य करणारा म्हणजे वकील होता. विरुद्ध पक्षास राघवाचार्य व वज्रटंक असे शास्त्री होते. जो वाद नीळकंठशास्त्री आतां माजवीत आहेत, त्यासंबंधानें खुद्द नीळ-

कंठ शास्त्र्यांनीं प्रभूजाती क्षत्रिय असल्याबद्दल कबूल केलें आहे, व त्यांचें स्वदस्तुरचें पत्रही आहे, असें राघवाचार्यांचें म्हणणें होतें. त्यावरून पत्र हजर करण्याबद्दल कांहीं काल सदर वाद पुढें ढकलण्यांत आला. परंतु मुदतींत पत्र हजर करतां न आल्यामुळें, नीलकंठ शास्त्र्याच्या वतीनें निकाल देणें चिंतामणराव प्रभृतींनीं स्वामींना भाग पाडलें होतें. कांहीं काळ ब्राह्मण पक्षाचा विजय झाला. प्रभूंच्या आश्रित उपाध्ये मंडळींना पूर्वांगासहित प्रायश्चित्तें नीलकंठ शास्त्री थत्ते यांचेकडून घेऊन, पुनः जातींत यावें लागलें. तोंपर्यंत वाळींत टाकल्यामुळें हाल भोगावे लागले ते वेगळे ! पण लबाडी किती दिवस पचणार ! **सत्यमेव जयते** ! सत्याचीच अखेर सरशी होते. नीलकंठ शास्त्री थत्त्यांच्या कमनशीबानें बडोद्यास विठ्ठलराव दिवाणजी यांजकडे नीलकंठ शास्त्र्यांचें स्वदस्तुरचें पत्र सांपडलें. हें पत्र पिशाच लिपींत होतें. तें हजर करतांच दहाजणांनीं थत्त्यांचेंच अक्षर म्हणून ओळखिलें. मग नीलकंठशास्त्र्यांना तें कबूल केल्याशिवाय गत्यंतर राहिलें नाहीं. अशा प्रकारच्या भानगडी उपस्थित होऊन अखेर राघवाचार्यादि मंडळीच्या म्हणण्याप्रमाणें निकाल देणें शंकराचार्य स्वामींना भाग पडलें. अर्थात् नीळकंठशास्त्रीपक्षीय बाळाजीपंत नातू, चिंतामणराव पटवर्धन वगैरे कंपूची फटफजीति उडाली. प्रभूंचें म्हणणें खरें ठरलें. मुंज वगैरे कर्मत्रयी वैदिक मंत्रांनीं त्यांचे घरीं करणें सशास्त्र ठरल्यामुळें तीं करावयास जाणें भटांना भाग पडलें.

वरील प्रकार पुण्यास घडत होते. त्याच वेळीं त्याची झळ साताऱ्यास लागल्याशिवाय राहिली नाहीं. शंकराचार्यांनीं साताऱ्याहून प्रयाण करतांना जें शिफारस पत्र लिहून दिलें, त्याच्या जोरावर बळवंतराव चिटणीसादि वेदोक्त मंत्रांनीं आपले घरीं कार्यें करा असें ब्राह्मण मंडळीस सांगू लागले. नागोदेवराव, बाळाजीपंत नातू वगैरेंच्या शिकवणीवरून ब्राह्मण मंडळी बुद्ध्या तें नाकारूं लागली. चिटणीस कांहीं कच्चे नव्हते. ब्राह्मणांनीं वेदोक्त मंत्रांनीं कृत्यें करण्याचें नाकारतांच चिटणीसांनीं महाराजांकडे तक्रार नेली. महाराजांनीं ब्राह्मणमंडळीस त्याबद्दल जाब विचारला व अन्याय होत असल्यास अदालतींत

फिर्याद देण्यास चिटणीसास सांगितलें. अशा प्रकारें ग्रामण्याचें प्रकरण पेटत पेटत, महाराजांपावेतों कसें जाऊन पोहोंचलें; व प्रभूपासून सुरवात झालेल्या या जातीभेदग्रस्त ग्रामण्यास कसे कसे पाय फुटले, व त्यामध्यें महाराष्ट्राची सौभाग्य-लक्ष्मी कशी जळून खाक झाली, हें मागाहून पाहूं.

प्रकरण १४ वें.

धर्माभिमान कीं राजद्रोह ?

कॅप्टन ग्रँट डफ साताऱ्यास असल्या मुदतींत, मागें वर्णन केल्याप्रमाणें प्रभूंच्या ग्रामण्याची परिस्थिती लक्ष्यांत घेऊन त्यानें बाळाजीपंत नातूची साताऱ्याहून बदली केली. परंतु साताराची बातमी कळावी, व साताराचे दरबारास त्रास देतां यावा, म्हणून बाळाजीपंतानें **आबा जोश्यास** साताऱ्याच्या रेसिडेन्सीमध्यें विश्वासूक कारकून म्हणून (confidential clerk) नोकरीस लाविलें होतें. तसेंच निळोबा भडकमकरही दिवाणसाहेबांचे कचेरींत नोकरीस होता. ह्या हस्तकांकरवीं बाळाजीपंतास साताराची बातमी मिळे, व साताराला कुलंगडींही उपस्थित करतां येत असत.

कॅप्टन ग्रँट डफ साहेब सन १८२२ च्या सुमारास सातारा सोडून विलायतेस गेला, व त्याच्या जागीं कर्नल ब्रिग्ज रेसिडेंट म्हणून नेमून आला. कर्नल ब्रिग्जच्याच कारकीर्दींत बाळाजी नातू, सांगलीकर चिंतामण पटवर्धन व नीळकंठ शास्त्री थत्ते वाईकर ह्या त्रिकूटाच्या परभांच्या विरुद्ध कारस्थांस ऊत आला होता. निळकंठ शास्त्री वाईस जातीमत्सराचें व दुहीचें विष पेरीत होता, तर चिंतामण पटवर्धन संकेश्वरच्या स्वामींवर आपलें वजन खर्च करून वाटेल तसे हुकूम त्या पीठाकरवीं काढवित होता. इकडे पुण्यास बाळाजीपंत नातूनें भटभिक्षुकांना नादास लाविलें होतें; आणि पुण्याचीं भटें तरी नादान खरीं ! बाजीराव पेशवा असतांना जर कोणाची चंगळ चाललेली असेल, तर ह्या

भटभिक्षुकांची ! इतरे–जनांना किंबहुना गृहस्थ ब्राह्मणांना सुद्धां बाजीरावाचा त्रास बेसुमार होता. भटांना पोसणाऱ्या बाजीरावास देशोधडीस लावण्यास मुख्यत्वें कारणीभूत झालेला बाळाजी नातू. अशा परिस्थितींत भटाभिक्षुकांनीं खाल्लेल्या अन्नास जागावयाचें, तर या कलिपुरुषाचें तोंडही पाहतां नये. स्वामी-द्रोहाच्या घोर पातकानें कलंकित झालेल्या नराधमाचें मुखावलोकन म्हणजे पाप, अशी भावना त्यांच्या मनांत उत्पन्न व्हावयास पाहिजे होती. परंतु ब्राह्मणी स्वभावाची रचनाच विधात्यानें काय चमत्कारीक केली आहे पहा ! ज्या गोष्टीबद्दल इतर देशांतल्या सुशिक्षित समाजाला चीड येते व सामाजिक बहिष्काराची शिक्षा देण्यांत येते, किंबहुना कधीं कधीं देहांताची भयंकर शिक्षा कांहीं कांहीं समाजाकडून देण्यांत येते, त्याच गोष्टीबद्दल आमच्यांतील वर्णश्रेष्ठ-पणाचा टेंभा मिरविणाऱ्यांकडून आदर केला जातो ! म्हणजे ज्या गोष्टीबद्दल इतरांना चीड, तीच गोष्ट आमच्याकडे पूजार्ह. बाळाजीच्या कृत्याबद्दल त्याला समाजानें दोष द्यावयाचा, तें राहिलेंच बाजूला. उलट अशा प्रकारच्या इसमास त्याच्याच जातींत मान मिळूं लागला; नव्हे, पुढारीपणा मिळूं लागला. ब्राह्मण समाजांत व अनुकरणानें इतर समाजांत, **अशा प्रकारचा नादानपणा आल्यामुळें चांगल्याची बूज राहिली नाहीं,** व त्यापायीं अखेर अखिल हिंदु समाजास आजची गुलामगिरीची स्थिती प्राप्त झाली आहे. म्हटलें आहे:—

> **अपूज्या यत्र पूज्यन्ते पूज्यानां च व्यतिक्रमः ।**
> **त्रीणि तत्र भविष्यंति दुर्भिक्ष्यं मरणं भयम् ॥**

हेंच खरें ठरतें !

प्रभूंच्या बाबतींत ग्रामण्य माजलें, त्या संबंधानें पुण्याहून व सांगलीहून संकेश्वरास घोडेस्वारांची जा ये सुरू झाली. कारस्थानांना ऊत आल्यामुळें टपाल घेऊन चिंतामणराव पटवर्धनाचे स्वार वरचेवर करवीरास, संकेश्वरास व पुण्यास जाऊं येऊं लागले. आतां ही बातमी इंग्रज रेसिडेंटास दिली पाहिजे हें खरें. पण ती देतां, देतां, आपल्यावरील वहीम महाराजांवर घालून रेसि-

डेंटाचें मन महाराजांसंबंधानें कलुषित करतां आलें तर कां सोडा ! या बुद्धीनें आबा जोश्यानें तशा प्रकारचा लपंडाव केला. त्यानें रेसिडेंट कर्नल ब्रिग्जला सांगितलें, कीं प्रतापसिंह महाराज, सांगलीकर चिंतामणराव पटवर्धन, कोल्हापूरचे महाराज व संकेश्वर मठाचे स्वामी, ह्यांचे दरम्यान गुप्तपणें कांहीं तरी पत्रव्यवहार चालू आहे. व त्यांच्या दरम्यान घोडेस्वारांकरवीं टपालाची ने आण होत असावी. आबा जोश्याचा हेतु हा, कीं महाराजांच्या संबधानें रेसिडेंटाचें मन साशंक व्हावें. महाराजाबद्दलची पूज्यबुद्धि व आदर रेसिडेंटाच्या मनांतून नष्ट व्हावा.

सन १८२६ सालीं दुसरा रेसिडेंट कर्नल ब्रिग्ज हा सातारा सोडून गेला, व त्याच्या जागीं कर्नल राबर्टसन याची नेमणूक होऊन, तो आला. मुंबईचा गव्हर्नर सन १८२७ च्या सुमारास **सर जॉन मालकम** हा होता. ब्राह्मण्यसंरक्षणाची अर्थात् इतर समाजांना गुलामगिरींत डांबून टाकण्यासाठीं धडपडावयाचें, त्यांचे सामाजिक हक्क व दर्जा कबूल करावयाचा नाहीं, अशा प्रकारची चळवळ पेशवाई नष्ट झाल्यापासून फोफावतच होती. अशा समयीं सन १८२७ सालीं तांदुळवाडी (ता० कोरेगांव) येथील जत्रेस सर जॉन मालकम हे आले होते. गव्हर्नर साहेब जत्रेस जाणार हें कळतांच, त्या सुसंधीचा फायदा घेऊन, त्यांची मुलाखत घेण्यासाठीं १०।१५ हजार भटाभिक्षुकांचें डेप्युटेशन बाळाजीपंताच्या प्रेरणेनें[1] मालकम साहेबांस भेटण्यास गेलें.

---

१ या संबंधानें बाळाजीपंत नातूंचें पत्र प्रो. डोंगरे यांनीं प्रसिद्ध केलें आहे. त्यांतील पुढील मजकूर ध्यानांत घेण्यासारखा आहे:—

सांगलीस ग्रंथ झाला तो दुतर्फा स्वामींचे पत्रीं जाहल्यामुळें मनोदयानुरुप शेवटास गेला नाहीं. त्यास हाली मुंबईचे मुख्य साताऱ्यास येणार तेथें मु॥ किती दिवस होईल नकळे. त्या संधींत वाई वगैरे समस्त ब्राम्हण हजार दोन हजार जमा होऊन साहेबांजवळ फिर्याद करावी ......या (प्रभू) ज्ञातींत आचरण जाहलें नाहीं, तें हाली महाराजांचे पुस्तपन्यामुळें आचरतात याचा बंदोबस्त सरकारांतून आपण केल्याविना होत नाहीं........हा येक बेत. दुसरा मनसुबा ब्राम्हणानी जमा होऊन सदरीं लिहिल्याप्रमाणें वागणुकेचे साहेबाचे जाहिरण्यांत आणून आपले वाड्यावर चालून घेऊन मारामारी करून अबरू घ्यावी त्यांत जे जाया होतील ते होतील असाही निग्रह करावा.

भटांचा तो प्रचंड तांडा. तंबूभोंवतीं गोळा झालेला पाहतांच, माल्कम साहेबानें त्यांच्यांतील पुढाऱ्यांना येऊन भेटण्यास सांगितलें. या पुढाऱ्यांनीं मालकम साहेबांकडे तक्रार केली कीं, " साहेब, तुमच्या राज्यांत धर्मोच्छेद होऊं लागला आहे. परभू, शूद्र; वैदिक विधीनें धर्मकृत्यें करण्याचा त्यांना अधिकार नसून, तसें अधर्माचरण (?) ते करीत आहेत. मौंजिबंधन करितात, व अग्निहोत्र वगैरे वैदिक मंत्रांनीं करितात. " मालकम साहेबानें हें सारें सावधानपणें ऐकून घेतलें व सांगितलें कीं, तुमचा राजा **प्रतापसिंहमहाराज** धर्माभिमानी हिंदु आहे. त्यांच्याकडे तुम्हीं जा, व या गोष्टींची दाद मागा. त्यावर ब्राह्मण पंडितानीं साहेबांस सुचविलें कीं, **महाराज हिंदु आहेत खरे, पण ते शूद्र आहेत.** त्यांना धार्मिक बाबींचा निर्णय करण्याचा अधिकार नाहीं !

वा ! आहे कीं नाहीं ब्राह्मणांच्या पांडित्याची कमाल ! ज्या भोंसले घराण्यांतील नरपुंगवांनीं आपल्या प्राणांच्या आहुती देऊन, गोब्राह्मणप्रतिपालक हें नांव सार्थ केलें, त्याच घराण्यांतील, आजवर ब्राह्मणांनींही " क्षत्रियकुलावतंस " असें मानलेल्या राजपुरुषास, गव्हर्नर साहेबांपुढें शूद्र म्हणतांना व निर्णय करण्याचा त्यांना अधिकार नाहीं. असें म्हणतांना या ब्राह्मण पंडितांचें पांडित्य कोठें हरवलें होतें ?

कृतघ्नपणा व हरामखोरी, यांच्या जोडीला मूर्खपणानेंही त्यांच्यामध्यें ठाणें दिलेलें होतें असें दिसतें. कारण शूद्र म्हणून निर्णय करण्याचा अधिकार जर महाराजांना नाहीं, तर परधर्मी सर जॉन मालकम साहेबास तरी तसा अधिकार कसा पोहोंचतो ? **प्रतापसिंह** राजा हिंदु तरी होता; परंतु सर जॉन मालकम तर, कर्मठ ब्राह्मणांच्या मतें, बोलून चालून म्लेंच्छ—परधर्मीय. त्याच्याकडे न्याय मागावयास जातांना या १०।१५ हजार ब्राह्मणांच्या अक्कला कोठें बरें गेल्या होत्या ? पण स्वार्थापायीं अंध झालेल्या ब्राह्मणांची, व अक्कलेची कधींच फारकत झाली होती.

मालकमसाहेब, फडणीस नानासारखा कांहीं अर्ध शाहणा नव्हता. त्यानें या भटांच्या पुढाऱ्यांस सांगितलें कीं, उभयपक्षीं पंच नेमून काय करतां येईल तें करा. आह्मी परधर्मीय, तुमच्या धार्मिक लढ्यांत पडण्याची आमची मुळींच इच्छा नाहीं. ब्राह्मणांच्या अर्जावर त्यांनीं शेरा लिहिला कीं, "**जातींत जात मुखत्यार. सरकारांतून जातीचें कामांत दाखलगिरी होत नाहीं.**" झालें, या उत्तरानें ब्राह्मणांची पूर्ण निराशा झाली. संपले, शांततेचे व सनदशीरपणाचे मार्ग संपले. ब्रह्मवृंदाच्या मनांत जो कांहीं थोडासा विचार होता, तोही गेला. इतउत्तर ते विकारवश झाले. इकडे परभूंनीं देखील महाराजांकडे अर्ज केला कीं, आजवरच्या पद्धतीप्रमाणें आमचेकडे वैदिक मंत्रांनीं होमहवन, उपनयन वगैरे विधि करावयाचे ते ब्राह्मण लोक करीनासे झाले आहेत, तरी त्याबद्दल योग्य तो निकाल व्हावा. पूर्वीं श्रीशिवाजीमहाराजांच्या कारकीर्दींत यासंबंधानें वादविवाद होऊन निकाल झालेले आहेत. पेशव्यांच्या कारकीर्दींतही या निकालाप्रमाणेंच निकाल पेशव्यांनीं केला आहे. असे सर्व निकाल पाहून आमच्या न्याय्य हक्काचा बचाव करण्यांत यावा. यावर महाराजांनीं निकाल दिला तोः—

येसीयास, पूर्ववतप्रमाणें ब्राह्मण येऊन न करीत तरी ज्ञातीधर्मांत ज्याचे ते मुखत्यार सरकार दख्खल करीत नाहीं. त्यास तुम्ही ब्राह्मणाशिवाय आपले ज्ञातीचा बंदोबस्त कर्मानिसी ठेऊन चालविलें असतां मनाई व मदत नाहीं. कुंपणी सरकारांतूनही या सरकारांत सदर्हूप्रमाणें जबाब आला आहे. ... ... ता. २४ आगष्ट १८२७ इसवी.

अर्थात् हा ठराव कंपनी सरकारच्या धोरणाप्रमाणें होता. तरी ब्राह्मणांच्या मतें तो परभांच्या बाजूचा झाला. मग काय ? ब्राह्मणांच्या नातू, पटवर्धन, नागोदेवराव थत्ते वगैरे पुढाऱ्यांनीं खोट्या कंड्या पिकविण्यास सुरवात केली. महाराजांकडे अर्ज करणारा सुमंत बळवंतराव

चिटणीस, हे तर महाराजांचे अष्टप्रधानांपैकीं; व शिवाय मर्जींतले. म्हणून महाराजांनीं पक्षपात केला व परभांचे वतीनें निकाल केला, अशी कंडी ब्राह्मणांनीं पिकविली. पण वास्तविक स्थिती मुळींच तशी नव्हती. प्रभूंचा अर्जच वाचून पाहिला असतां महाराजांनीं निकाल केला, तोच योग्य होता हें लक्षांत येईल. पुढीलप्रमाणें उतारा रंगो बापूजीच्या पुस्तकावरून येथें देत आहों:--

"ब्राह्मणांनीं पुण्यांत वगैरे ग्रामण्य करून पूर्वीपासून वेदोक्त कर्मे आजपर्यंत करीत आले त्यान्वेय न करिता कोणी ब्राह्मणानी आमचे ज्ञातीत येऊ नेय व कांहीं कर्मे करूं नये असा तट केला आहे. तेव्हां आम्हास गर्भदानापासून आमरणांत कर्मे सारी करिता येतात. ब्राह्मण आले असतां आम्हाकडून मनाई नाहीं परंतु न आल्यास आह्मास सारी वेदोक्त कर्मे चालविणें येतात येविशी काय आज्ञा ती जाहली पाहिजे."

अशा प्रकारचा सरळ प्रकार या अर्जांत होता व महाराजांनीं त्या अर्जास दिलेलें उत्तरही सरळ होतें. महाराजांच्या हुकुमानंतर प्रभूंनीं आपणास शूद्र म्हणावयास लागलेल्या ब्राह्मणांची गरजच ठेविली नाहीं, व ते आपलीं धर्मकृत्यें आपणच करूं लागले. परंतु **दक्षिणा व मोठेपणा हीं हातचीं जात असलेलीं परोपजीवी भटभिक्षुकांना कशीं पाहवणार**? त्यांनीं प्रभूंना त्रास देण्यास सुरवात केली. अत्याचारही केले. त्यावरून प्रभूंनीं महाराजांकडे या बाबतींत तक्रार केली. यासंबंधीं पुढील उतारा सिद्धांतविजय ग्रंथांतून उध्दृत केला आहे:—

"ब्राह्मण आमचे गर्भदानादि संस्कार पूर्ववत् वेदोक्त चालवीत नाहीत व चालू देत नाहीत. नवी ग्रंथरचना करतात आम्ही नेहमीप्रमाणें जो अग्निसिद्ध केला आहे तोच ठेविला आहे यांत काही नवीन प्रकार नाही. तेव्हां स्वामीनीं चौकशी करून निकाल लावावा कार्तिक शु॥ १ शके १७५० सर्वधारी नाम संवत्सरे."

या प्रकरणीं महाराजांनीं निकाल देण्यापूर्वी देखील, प्रभूंनीं सभा भरवून ठराव

केला व त्याच्या नकाला गांवोगांव प्रसिद्धीसाठीं पाठविल्या त्यांतील मजकूर मनोरंजक असल्यामुळें व विशेषतः तत्कालीन परिस्थिती समजण्यास उपयोगी होणारा असल्यामुळें त्या ठरावांतील उतारे पुढें देत आहों.

"यादी समस्त चांद्रसेनीय कायस्थ प्रभु–शके १७४९ सर्वजित नाम संवत्सरे—

आमचे ज्ञातीत ब्राह्मण आजपर्यंत वेदोक्तकर्म शोडस संस्कारयुक्त हस्त श्राद्धादि वगैरे त्रय कर्माधिकारपणें करित आले असे असून वारंवार **तंटेबखेडे करावे आणि दुरभाषणें मानहानि उपहास करावी** आपणच्च येऊन कर्में करावीं गोड बोलावें आर्जव करावे पुन्हा त्याणी **तंटयांत सिरोण तट करोन वल्गना करावी** त्रय वर्गास अधिकार आहे म्हणावे सवेच नाहीं हें तंटयास आल्यावर म्हणावें अैसी तऱ्हा करावी. पेशवे बालाजी बाजीराव याची पत्रे व राजपत्रे वगैरे प्रभु म्हणोन पुरवीची असोन परभु हे चालविले. हाली परभ्यापरयंत यादींत लिहिले आहे. परंतु काशी क्षेत्राची पत्रे अैसी आसामी ब्राह्मण मंडळीचे संमताचे व पुढेंही बाजीराव कारकिर्दीपरयंत पुर्वापार चालवावें हे सिक्यानिशी सनदा असे असून पुन्हा पुण्यांत अलिकडे बखेडा करून विटंबणा उपहास व मनस्वी दुरभाषणें करून सभा तुलसीबागेंत वगैरे ठिकाणीं केल्या. यांत आम्ही मनुष्र आबरू आहे की नाहीं हा विचार न करिता आबरूचा जीव सतका आहे हें मनांत न आणितां हाजारोनी बडबड करून क्षेत्रोक्षेत्री पत्रें पाठविली आणि कर्में चालण्यास आडचणी पाडली **श्रीशंकराचार्य ब्राम्हणाचे स्वामी** याणी ही यादी व राघवाचार्य यांस पत्र सिकेमोर्तबानिशी दिले त्यात निखालस कुम बखेडा केला...सेवट महाबळेश्वरी बखेडा तीर्थविधी श्राद्धास पाडला आपणास चालवून करणें प्राप्त आले व निसीक कळले की दिवसेंदिवस उपमर्द करितात व सेवटावर द्वेषबुद्धीने निकर्ष करून ज्ञातीच बुडवावी हे आरंभिले त्या अर्थी आपले तीन कर्मापै ॥ च गर्भाधान अष्टमांगल्यादि अग्नी सिध्द करीतात तोच अग्निस्मार्थ त्यापुढें चालावा, परंतु खटपट होत नाहीं यामुळें करीत न आले

परंतु हाली करावा व श्राद्धी आपण आपले बसावे म्हणजे तरी पोटाशी धरतील तह करून चालते तीन कर्मे वेदोक्त शोडष संस्कार हास्त श्राद्धादि बसून करीतात ते करतील कटकटीचा समारोप करतील परंतु ते न करितां हाली सभा करून इकडे ब्राह्मण आले त्यास मारहाण करून बहिष्कार घातला व पुढें कोणी ब्राह्मणानी अनुष्ठादानादि जाऊन करूं नये करतील त्यास बहिष्कार पडेल वगैरे अन्योन्य भाषणें वगैरे केली त्यास ब्राह्मण आपलेहून येणें बंद केलें असतां आमची कर्मे बंद होतात तीं आह्मांस मुखत्यारपणें आपले ज्ञातीचा बंदोबस्त ब्राह्मणाशिवाय येऊन करणें......पुण्यांत व हाली ब्राह्मणाची ब्राह्मणच फजेती व विटंबणा करितात आमचे काय जाते हे समजोन आहोत पूर्वीपासून तीन कर्मे वेदोक्त शोडष संस्कार श्राध्दादि करित आलों असे चालू करून बखेडा कोणीही करणार नाही करील तो बहिष्कृत म्हणोन क्षेत्रोक्षेत्राची समंते महाराज व कुंपनी सरकार पेस्व्यासुद्धा व पुण्यांत तंटे करणार याचे समतानें सिक्कादि होऊन वर महाराजांचा सिक्का करून दिला म्हणजे आम्ही नवीन ज्याजती आरंभिलें काय असेल ते समारोप करू त्याणी ही नवे वारंवार आरंभितात ते न व्हावे व समारोप करावा ते न करिता ते करीत आहेतच व आमची गरज सोडोन आमचीच फजिती आरंभून दिकार करकरतात त्याअर्थी आम्हासही त्याची गरज नाहीं केले हे व आणखी पाहिजे ते ब्राह्मणाशिवाय आपले ज्ञातींत मुखत्यारपणें पाहिजे तें चालवू व कर्मे ज्ञातीची चालवणें तेव्हां सहजात साह्याकर्मे करणे येतात ती करू आमचे ज्ञातींत ब्राह्मणांनीं दाखल करणें गरज नाहीं आम्हास मात्र म्हणतात हे नवीन करतात ब्राह्मण आपले कर्म सोडून दुसरियाचे करितात परंतु ब्राह्मण ज्ञाती सर्वांस मान्य व माय पोट सर्वांचे समाधान ठेवून वाजवी चालवावे ते न करिता आपण सर्वांची कर्मे करितात तीन वर्णांची कर्मे सारी आपण आपला धर्म सोडून करितात क्षत्रियाचे कर्म शस्त्रधारण वगैरे करितात व आम्हास लेखनवृत्ति भार्गवरामानीं शस्त्र सोडवून उपजिविकेस दिले ते आपण चालवून आमची उपजीविका बुडवीत

चालले वैश्याची कर्मे सेतकी उदीम वाणीपणाची दुकाने हेच घालून व व्याजबट्टा वगैरे ते आपण करितात व शुद्राचे कर्म सुद्धा करून सिपायांत शूद्रासारखी पागोटी बांधून प्यादेगिरी वगैरे नीच कर्मे पत्करून करावयाची कोणास उपजीविकेस कुटुंब संरक्षणास जागा न ठेविता आपण करावे व **जमीन वगैरे इनाम घेतेसमई भट म्हणवून दानपत्र वंशपरंपरेचे करून घ्यावे रोजगार व्यापाराचा करावा भट म्हटले असतां रागास यावे** पंत व दरखदार म्हणविलें पाहिजे तीन ज्ञाती व इतर सुद्धा भिकेस लावून **अति नीच कसबिणीस लावण्या सिकवून मागे सारंग्या वाजवाव्या, गावे अशा अनेक तऱ्हा काय म्हणून उचाराव्या** असे करण्याचा आक व बहिष्कार करून ब्राह्मणांनीं कर्म जे शास्त्रांत आहे ते सोडून कोणी करूं नये हे करितात...आम्ही तरी ब्राह्मणाचे उतीर्ण काय व्हावे व हे याजवर उतरायास लच्यार हे मनांत न आणिता गरीब आम्हासारखे अनेक सर्व ज्ञातीस हरतऱ्हेने दाबावे येकामागे येक लच्यांड लावून उपहास करून.........आमची पाठच घ्यावी असे होते...ज्ञातींतील सदरी सारा मजकुर लिहीला आहे परंतु तो मनास कांहींच न आणितां ब्राह्मणांनीं केलें तें फारच अनुचित हे मनांत न वागवितां दुराग्रह बुद्धीनें विचार न करितां तटच माजवून ब्राह्मणानीं आपणास सोडल्यास आपलीं कर्मे आपण यथामतीनें जसे चालले **तसे ब्राह्मणाची गरज न ठेविता चालवावी लागतील......आपण आपले कर्म यथाज्ञाने जशी होतील तशी चालवावीं** येविसी सरकारास स्वज्ञातीनें विनंती करून आज्ञा घेऊन ब्राह्मणाचा आटक न धरिता षट्कर्मांतील यजन आध्यायन दान ही तीन कर्मे पूरवीपासून वेदोक्त आपली चालत आहेत ती व हाली ब्राह्मण न येण्यामुळें याजन आध्यापन प्रतिग्रह ही तीन कर्मे नवीन करणें प्राप्त जाहली येकूण षट्कर्मे आपली आपण स्वज्ञातींतच करीत जावी..."

वरील पत्रांतील मजकुरावरून १८२६।२७ च्या सुमारास सामाजिक स्थितीच्या थर्मामिटरचा पारा किती अंशावर चढला होता, तसेंच ब्राह्मण-

समाजानें आपलें कर्तव्य सोडून कशी वागणूक अंगिकारिली होती व त्यामुळें त्या समाजाचा ओज व प्रतिष्ठा कशी नष्ट झाली होती हें कळून येणार आहे. तसेंच पात्रता नाहींशी झाली असतां देखील, आपला वरचढपणा मिरविण्यासाठीं ब्राह्मण, विशेषतः चिंतामणराव पटवर्धन, बाळाजी नातू वगैरे ब्राह्मण्यसंरक्षणाच्या प्रेरणेनें कसा दुराग्रह धरीत होते, हेंही वरील उताऱ्यावरून वाचकांच्या प्रत्ययास येणारें आहे.

या एकंदर भानगडीचें अखेर, पर्यवसान असें झालें, कीं महाराज व त्यांची आप्त मंडळी यांनाही क्षत्रिय मानावयास ब्राह्मण कबूल होईनात. त्यांच्यापैकीं बेमुर्वतखोर होते, ते उघड उघड महाराज शूद्र आहेत, असें प्रतिपादन करूं लागले. महाराजांची आप्त मंडळी **शिर्के, सुर्वे, मोहिते, महाडिक, गुजर** वगैरे यांनाही ते शूद्र म्हणूं लागले. शिवाजी महाराजांच्या वेळेपासून छत्रपतींच्या घराण्यांत जे विधी वेदोक्त मंत्रानीं करण्यांत येत होते, ते करण्याचें ब्रह्मवृंदानें नाकारलें. व याला आधार संकेश्वरच्या स्वामींचें आज्ञापत्र, असें ते म्हणूं लागले. सारांश **धर्माभिमानाच्या वेडांत छत्रपती महाराजांचा द्रोह करण्यास** त्याकाळच्या ब्राह्मणांनीं सुरवात केली. प्रभू मंडळींच्या प्रमुखत्वाखालीं साताऱ्या मराठे मंडळींनीं, महाराज **प्रतापसिंहांकडे** तक्रार केली. महाराज स्वाभिमानी कमी होते असें नाहीं. पण **शौर्यादि क्षत्रियोचित गुणांबरोबर त्यांचे ठायी शांती होती.** ते विचारी होते. त्यांच्या ऐवजीं एखादा तापट स्वभावाचा राजा असता तर शूद्र म्हणून संबोधिल्याबद्दल त्यानें तसें बोलणाऱ्या भटांच्या जिभा, तेथल्या तेथेंच चिरून टाकल्या असत्या. गृहकर्में व संस्कार वेदोक्त विधिनीं करण्याचें नाकारल्याबद्दल राजोपाध्ये वगैरे राजद्रोही इनामदारांचीं इनामें जप्त करून त्यांना कारागृह दाखविलें असतें. पण **प्रतापसिंह महाराज पडले शांततावादी व न्यायी.** त्यांनीं विचार केला कीं हा प्रश्न शास्त्राधारें सोडविला पाहिजे. ब्राह्मणांचें करणें अचरटपणाचें आहे, हें खरें. आपल्या बाजूस सत्य व न्याय हीं आहेत. तेव्हां युक्तिवादानें व बुद्धिवादानें मराठ्यांचें क्षत्रियत्व आपण त्यांना पटवून देऊं. राजदंडानें हें प्रस्थापित करतां नये. पण महाराष्ट्रीय भ्याड भटांना

भगवद्गीतेचे अगर वेदाचेही आधार दाखवून कोणतीही गोष्ट पटत नाहीं ही गोष्ट महाराजांनीं ध्यानीं आणली नाहीं. असो.

महाराजांनीं भोंसले व त्यांची आप्तस्वकीय मराठे मंडळी, ही क्षत्रिय आहेत हें शाबीत करण्यासाठीं कोणता उपाय योजला, व या सामाजिक झगड्याचा अखेर परिणाम कसा झाला, हा मनोरंजक इतिहास पुढें दुसऱ्या स्वतंत्र प्रकरणांत येणार आहे.

प्रकरण १५ वें.

अंमलांतील जहागिरी.

१८१९ च्या तहनाम्यांत ठरल्याप्रमाणें महाराजांना देऊं केलेल्या राज्याची मुखत्यारी ग्रँट डफनें सातारा सोडून जाण्यापूर्वीं महाराजांना दिली. पण त्यापूर्वीं एल्फिन्स्टन साहेबांच्या प्रेरणेनें महाराजांच्या अंमलांतील मुलुखाची पहाणी करण्याचें काम सुरूं केलें. या कामीं कॅ. ॲडॅम्सची नेमणूक केली. कॅ. ॲडॅम्सची सर्वे—पहाणी—साताऱ्यामध्यें सर्वश्रुत आहे. या सर्वेमध्यें सर्व जमीनीची पहाणी होऊन त्यांच्या प्रती लावण्यांत आल्या. प्रत्येक नंबरांतील जमीनीची मोजदाद करतांना तिच्या मालकीचा प्रकार, जमीनींत कर्दा (वहिवाटदार), जमीनीची चकबंदी (चतुःसीमा) यांची नोंद करण्यांत आली. शिवाय प्रत्येक नंबरांत (१) अव्वल (२) दुम (मध्यमप्रतीची) (३) सीम (कनिष्ट) व (४) पड, जमीन किती आहे याची मोजणी होऊन त्याप्रमाणें नोंद होऊन आकारही निश्चित करून घेण्यांत आला.

या ॲडॅम साहेबांच्या पहाणीचा एक मोठाच उपयोग इंग्रजी राज्यास झाला. देशामध्यें जे हुषार, व लिहिणारे वाचणारे लोक होते, त्यांना या कामगिरीवर नेमून अडकवून टाकतां आलें. सरकारी नोकरीची रुपेरी शृंखला त्यांच्या पायांत अडकवली नसती, व ते मोकळे राहते, तर त्यांनीं कांहीं तरी

चळवळ देशामध्यें उत्पन्न केली असती; व नष्ट झालेली ब्राह्मणी सत्ता पुनः स्थापन करण्याच्या इराद्यानें देशांत फंदफितुरी अगर पुंडाई तरी खास माजविली असती. म्हणून मुत्सद्दी एल्फिन्स्टननें पहाणीचें निमित्त काढून ही सारी बुद्धि उद्योगास लाविली, यामुळें महाराष्ट्रांत कंपनी सरकारचें आसन स्थिर झालें.

वर सांगितलेल्या पहाणीच्या प्रसंगीं जत परगण्याचीही पहाणी केली. तेव्हां जत परगण्यांत अंदाधुंदी माजून राहिली असल्याचें दिसून आलें. जतची जहागिर ही डफळे नांवाच्या क्षत्रिय मराठ्यांची. हे डफळे मूळ विजापूरच्या बादशाहाचे सरदार. पुढें औरंगजेबाच्या वतीनें साताऱ्यावर यांनीं हल्ला केला, व मंगळाईच्या बुरुजास सुरुंग लावून त्यांनीं तो पाडला; तेव्हांपासून त्या बुरुजास डफळ्यांचा बुरुज असें म्हणतात. पुढें मुसलमानी सत्ता नष्ट झाल्यावर डफळे मराठे सरदारांत मोडूं लागले व पेशव्यांशीं मिळून राहूं लागले. महाराज प्रतापसिंह गादीवर आले त्यावेळीं डफळ्यांच्या जहागिरीवर कान्होजीराव डफळे हे होते. कान्होजीराव सन १८१० मध्यें कैलासवासी झाले, तेव्हां सदर जहागिरी बाजीरावानें त्रिंबकजी डेंगळ्यास दिली.

त्रिंबकजी कसा असला तरी मराठा गडी. जतची जहागिरी मराठ्याची; शिवाय जहागिरीची मालकीण रेणुकाबाई ही बाई माणूस. म्हणून त्रिंबकरावानें जहागिरीचा ताबा घेण्याचा यत्न केला नाहीं. कांहीं गांवें रेणुकाबाईच्या ताब्यांत होतीं, तर कांहीं गांवें तिची सवत बळकावून बसली होती. सवती-सवतींचें भांडण व सरकारी रीत्या मालक त्रिंबकजी डेंगळा; अशी परिस्थिती असल्यामुळें जतच्या मुलुखांत जो तो गांवेंच्या गांवें बळकावून बसला होता. सर्वत्र अराजकता व बंडावा माजून राहिला होता. बळी तो कान पिळी अशी अवस्था झाली होती. त्यामुळेंच सारीकडे बेबंदशाही माजून राहिली होती.

महाराजांनीं इंग्रजांशीं जो तह केला, त्या तहानें जतची जहागीर महाराजांच्या अंमलामध्यें असल्याचें इंग्रजांनीं कबूल केलें. त्यामुळें तेथील बंडाळी

मोडून जहागिरीची व्यवस्था पाहणें महाराजांना भाग पडलें. १८२० च्या सुमारास बरेंच मोठें सैन्य घेऊन महाराज जतेस गेले. तेथील बंडावा मोडून सर्वत्र स्थिरस्थावर झाल्यावर महाराजांनीं रेणुकाबाईच्या स्वाधीन सारी जहागीर केली व तिच्याशीं तह केला. तसेंच त्याच वेळीं इंग्रजांशींही तिनें तह केला. या तहांनीं जत साताराच्या अंमलाखालची जहागिरी असल्याचें कायम ठरलें. हा तह १८२० मध्यें जत येथें झाला. त्यानंतर त्या परगण्यांतील पुंडांच्या बंदोबस्ताकरितां महाराज जत येथें राहिले असतां, त्यांचे बंधू रामचंद्र राजे ऊर्फ भाऊसाहेब हे राजशक १४७ मध्यें म्हणजे स. १८२१ मध्यें वारले. तसेंच महाराज जतेहून परत साताऱ्यास येतांना भीमातीरीं धूळखेड नांवाच्या गांवीं महाराजांचा मुक्काम असतां एकाएकीं अजारी पडून मातोश्री माईसाहेब याही मरण पावल्या.

रेणुकाबाई व तिची सवत साळूबाई या दोघींही दिवंगत झाल्यावर, महाराजांनीं डफळ्याच्या घराण्यांतील वारसांचा तपास करून कान्होजीचा आजा यशवंतराव याच्या दुसऱ्या मुलाचा मुलगा रामराव हाच जवळचा वारस असल्यामुळें त्यास वारस कबूल करून गादीवर बसविलें. रामराव ह्यानें सन १८३९ पावेतों जहागिरीचा उपभोग घेतला, व तो निपुत्रिक मरण पावला. आपल्या हयातींत त्यानें दत्तक घेण्याची परवानगी मागितली होती, पण जतची भानगड विचित्र स्वरूपाची असल्यामुळें त्यावेळेस परवानगी देण्याचें महाराजांनीं नाकारलें होतें. बाळाजी नातूला, बाळाजीपंत किबे याजकडून वरील भानगड समजली तेव्हां त्यानें जतच्या रामरावाशीं संधान बांधलें व तुमचें काम करून देतों अशी थाप मारून त्यांच्याकडून सोळा हजार रुपये उपटले.

अशा रीतीनें डफळे यांचें दत्तकाचें प्रकरण उपस्थित होत आहे, तोंच भोरच्या पंतसचिवाच्या जहागिरीचा प्रश्न तशाच रंगास आला होता.

पेशवाई बुडाली, तेव्हां भोरास जहागिरीवर पंतसचिव, चिमणाजी शंकर हे होते, यांच्याबद्दल बंदोबस्त करावा म्हणून सन १८१५ पासून बाजीराव

पेशव्यानें त्यांस आपलेकडेच ठेऊन घेतलें होतें. इंग्रजांबरोबरच्या शेवटल्या झटापटींत सचीव हे बाजीरावाबरोबरच होते. बाजीराव जिकडे जिकडे पळत गेला, तिकडे तिकडे इतर ब्राह्मण–सरदारांप्रमाणें हेही गेले. टेंभुरणी येथें बाजीरावाचा मुक्काम असतां एल्फिन्स्टनसाहेबाचा जाहिरनामा यांच्या अवलोकनांत आला; तेव्हां जहागिरीच्या बचावासाठीं बाजीरावाचा निरोप घेऊन हे मागें फिरले. इंग्रजांशीं तह करून छत्रपति महाराज सरकारचें मांडलिकत्व क़बूल करून यांनीं आपली जहागिरी राखली. चिमणाजी शंकर इ. स. १८२७ मध्यें वारले. त्यापूर्वीं महाराजांचे परवानगीनें त्यांनीं आपल्याच घराण्यांतील रघुनाथ नांवाच्या मुलास दत्तक घेतलें.

चिमणाजी शंकर यानें रघुनाथ ह्यास दत्तक घेतलें, पण ती गोष्ट त्याची बायको भवानीबाई इजला पसंत नव्हती. चिमणाजी शंकर मयत झाल्यावर बाईचीं व रघुनाथराव याचीं रोज भांडणें होऊं लागलीं, व त्यामुळें जहागिरींत गोंधळ माजून राहिला. या गोष्टी महाराजांचे कानीं आल्यानंतर त्यांनीं दोघांनाही बोलावणें करून साताऱ्यास आणविलें व दोघांची समजूत करून तडजोडीनें त्यांचा तंटा मिटविला. त्या तडजोडींत असें ठरलें कीं, भवानीबाईनें सातारा येथें सचिवाच्या वाड्यांत राहावें व पंतानें तिच्या खर्चासाठीं नेमणूक करून द्यावी. अशा रीतीनें भोर संस्थानाच्या हद्दींतून कलहाचें मूळ महाराजांनीं नाहींसें केलें.

ज्याचें बरें करावें त्याला आपलें बरें केलेलें पटत नाहीं अशी म्हण आहे, ती भवानीबाईच्यासंबंधानें खरी ठरली. बाळाजीपंत किबे, आबा जोशी व विसाजीपंत भडकमकर यांनीं बाईच्या कानीं लागून तिचें मन बिघडविलें; व इंग्रजांची संमति मिळालेली नसल्यामुळें रघुनाथराव हा खरोखरीं दत्तक घेतलेला असूनही तो आपण नाशाबीत करूं, अशा प्रकारच्या गोष्टी सांगून त्यांनीं तिला आपल्या कटांत घेतलें.

इकडे रघुनाथरावाचीही मनोवृत्ति महाराजांच्या विरुद्ध होऊं लागली होती. रघुनाथरावाला पुत्रसंतति कांहीं नव्हती; व चिमणाजी शंकर ह्यास दत्तक

घेण्याची महाराजांनीं परवानगी दिली तेव्हां नजर म्हणून छत्रपति सरकारास चिमणाजी शंकर याच्या नंतरच्या सचीवानीं दरसाल १५००० रुपये द्यावे असा हुकूम केला. त्यामुळें पंतसचीवाचे गादीवर आल्यापासून रघुनाथरावास छत्रपति सरकारांत सालोसाल १५००० रुपये द्यावे लागूं लागले. चिमणाजी शंकरास देखील ही अट मान्य होती, असें नाहीं. त्यानें याबद्दल एल्फिन्स्टनकडे तक्रार केली होती, परंतु सचीव इंग्रजांच्या प्रीतींतले असले तरी १८१९ च्या तहानें ते महाराज प्रतापसिंहांचे मांडलिक असल्यामुळें एल्फिन्स्टनला त्यांना मदत करतां येईना. १८२७ सालीं एल्फिन्स्टननें पंत सचिवास साफ सांगितलें कीं, तुमची गादी बेवारस झाल्यास ती चालविणें अगर आपल्या राज्यास जोडणें ही गोष्ट सातारच्या महाराजांच्या इच्छेवर राहील. वाटतील त्या अटी लादण्यास ते मुखत्यार आहेत.

उपरीनिर्दिष्ट प्रकरणाची माहिती बाळाजीपंतास समजतांच त्यानें पंताकडे आपला माणूस पाठवून मुंबई सरकारांतून तुमची दाद लावून देतों, महाराजांचे हातांत काय आहे, वगैरे निरोप पाठविला. पंतांना बाळाजी नातूचा इंग्रजांकडे आपलें चांगला वशीला आहे, ही गोष्ट समजली होती. सबब बाळाजीपंतानें आपलें काम पत्करलें, तर तो तें खास फत्ते करील, असें त्यांना वाटलें.

---

1 The Punt Suchiv, one of the most considerable of that body, and the most favoured by the British Government, in conequence of his having been the first to abandon the Peshava, having complained against this prerogative, as claimed by the Raja was informed by Mr. Elphinstone himself in August 1827, that "although you and your heirs are to hold your jagheer on certain stipulated terms, yet that, on a total failure of heirs, it must revert to His Highness the Raja, and that if His Highness allows it to be continued in such case by adoption or otherwise, His Highness is at liberty to attach what conditions he pleases to the permission."

Sagunabai's Appeal, page 75.

पुढें या कामीं बाळाजीनें पंताची भेट घेतली, व काम फत्ते करून देतों अशी थाप ठोकून बक्षीस म्हणून मुसें खोरें व मुठें खोरें असे दोन गांव संपादन केले. शिवाय ह्या कामगिरीबद्दल वेतन म्हणून दरसाल २००० रुपये पंताकडून बाळाजी घेत होता. तसेंच पंताच्या या स्थितीचा फायदा घेऊन बाळाजीनें आपल्या सग्यासोयऱ्यांची पंताच्या दरबारांत लहान मोठ्या हुद्यांवर वर्णी लाविली होती. निरनिराळ्या कामगिरींचीं नांवें सांगून पंताकडून बऱ्याच मोठमोठ्या रकमा बाळाजी नातू उकळीत होता. सारांश देशस्थ पंतसचिवाच्या राशीला चित्पावन नातू आल्यामुळें पंताची नागवणूक बरीच चालली होती.

जतकर डफळे व भोरचे पंतसाचीव यांच्याप्रमाणें अक्कलकोटकर राजे भोसले हेही महाराजांवर नाखूश झाले होते व त्यांनींहि बाळाजीच्या वतीनें मुंबईसरकारकडे संधान बांधिलें होतें. त्याबद्दलची हकीकत पुढें दिल्याप्रमाणें आहे.

सन १८२७ च्या सुमारास अक्कलकोटकर फत्तेसिंग राजे भोसले यांनीं महाराजांचें स्वामित्व नाकबूल करण्याचें ठरविलें. त्यांच्या पदरच्या मंडळींनीं व विशेषतः राजेसाहेबांच्या मातुश्रीनें त्यांना या गोष्टीस भर दिली. अक्कलकोटकरांचें म्हणणें कीं, आम्हीं स्वतंत्र राजे आहों. महाराजांचा व आमचा मांडलिक म्हणून संबंध आम्हास कबूल नाहीं. अशा प्रकारें उभयतां भोसले वंशीयांमध्यें बिघाड होऊन लढाईची तयारी झाली.

महाराजांनीं आपलें सैन्य अक्कलकोटकरांचा बंदोबस्त करण्यासाठीं पाठविलें. या सैन्यावर दौलतखान व सेनापती बळवंतराव राजे भोसले असे होते. लढाई मोठी मातबर झाली. टूप्स कमांडर या लढाइत पडला. पण सेनापती बळवंतराव व रिसालदारांचा मुख्य दौलतखान यानीं पराक्रमाची शिकस्त केली. अक्कलकोटचा भुईकोट किल्ला त्यांनीं सर केला, व अक्कलकोटकरांचा मुलुखही

---

1 मराठी द. रुमाल 1 ला.

जिंकून पादाक्रांत केला. तेव्हां उभयपक्षीं समेट होऊन अक्कलकोटकर भोंसल्यांनीं सन १८१९ च्या तहास मान्यता दिली. तेव्हां मग महाराजांनीं जिंकलेला त्यांच्याकडील तीन लाखांचा मुलूख महाराजांनीं त्यांचा त्यांस परत दिला. या लढाईस महाराजांना सुमारें एक लाख रुपये खर्च आला. या लढाईपासून अक्कलकोटकर महाराजावर नाखूष होऊन राहिले होते.

ग्रामण्याच्या कामीं शंकराचार्यांचीं जीं पत्रें मागाहून प्रसिद्ध झालीं, त्यामुळें बाळाजीपंताची व चिंतामणराव पटवर्धनाची बरीच फजिती झाली होती; व मुंबई सरकारांत देखील त्यांचें वजन बरेंच कमी झालें होतें. यावेळीं मुंबईचे गव्हर्नर लॉर्ड क्लेअर हे होते. त्यांचे कौन्सिलर युरोपियन होते. बाळाजीच्या नशिबानें बरेचसे कौन्सिलर व सेक्रेटरी विलोबी हे सत्तावादी होते. एडवर्ड थॉर्न्टन ह्या इतिहासकाराप्रमाणेंच त्यांनाही वाटे कीं, हिंदुस्थानाच्या नकाशाला एकच तांबडा रंग द्यावा; मध्यें पिवळ्या रंगाचीं तुकडीं ठेवूंच नयेत. या लोकांच्या कानीं बाळाजीपंतानें जत व भोर ह्या संस्थानांची हकिगत घातली, व हे संस्थानिक निपुत्रिक असल्यामुळें महाराजांनीं तेथील गाद्यांवर दत्तक घेण्यास परवानगी देण्याचें नाकबूल केल्यास व त्या जहागिरी आपल्या राज्यांत सामील करून घेतल्यास महाराज जास्त सामर्थ्यवान् होतील, व एखादे वेळेस हें छत्रपतींचें प्रस्थ इंग्रजांना डोईजड होईल असें बाळाजीनें त्यांना सांगितलें. ह्या कौन्सिलरांना स्वार्थामुळें बाळाजीचें म्हणणें पसंत पडलें व त्यांनीं तहांतील कलमाचा अर्थ सरळ वाटतो, तसा नाहीं व त्यामुळें जहागिऱ्यांवर महाराजांना स्वामित्व पोहोंचत नाहीं असें ठरविण्याचा घाट घातला.

सर्व गोष्टींची ठीकठाक रचना झाल्यावर बाळाजीनें पंताकडून हें प्रकरण उपस्थित केलें. महाराजांकडे हें प्रकरण आलें तेव्हां महाराजांनीं आपणांस जहागिऱ्यांवर हक्क १८१९ च्या तहानें कसा प्राप्त झाला आहे याची सप्रमाण कैफियत मुंबई सरकारकडे पाठविली. ह्यावेळीं साताऱ्यास रेसिडेन्ट मेजर जनरल रॉबर्टसन हे होते. त्यांनीं तहाच्या तिन्ही भाषेंतील नकला वाचून व वेळोवेळीं तहाची झालेली अंमलबजावणी पाहून महाराजांचेंच म्हणणें खरें आहे असा आपला अभिप्राय दिला. मुंबई सरकाराकडे हें प्रकरण गेल्यावर त्याचा

निकाल महाराजांचे विरुद्ध करण्यांत आला; व तहामध्यें दर्शविलेल्या मांडलिक राजांवर महाराजांचा कोणत्याही प्रकारचा ताबा नाहीं, सर्वस्वी ताबा कंपनी सरकारचा आहे असें ठरविण्यांत आलें.

लार्ड क्लेअर ह्यांनीं कौन्सिलरांच्या मतानुरूप वरीलप्रमाणें महाराजांचे विरुद्ध जरी निकाल दिला, तरी कोर्ट ऑफ डायरेक्टर्सकडे अपील करण्याची परवानगी महाराजांनीं मागतांच ती देण्याचें औदार्य दाखविलें. कोर्ट ऑफ डायरेक्टर्सकडे गेलेल्या या प्रकरणाचा निकाल लॉर्ड क्लेअर साहेब मुंबईचे गव्हर्नर असल्या मुदतींत आला नाहीं. ज्यावेळेस तो हुकूम मुंबईस आला त्यावेळीं मुंबईचे गव्हर्नर धर्मनिष्ठ सर ग्रँट साहेब हे असल्यामुळें, त्या निकालमुळें पुढें छत्रपतींवर कसकसे घोर प्रसंग गुदरले याचा वृत्तांत पुढील प्रकरणांत दिला आहे.

प्रकरण १६ वें.

वंचना.

मुंबईचे गव्हर्नर लॉर्ड क्लेअर साहेब यांच्या कारकीर्दीची मुदत संपल्यावर, ते मुंबई सोडून विलायतेस गेले व त्यांच्या जागीं गव्हर्नर सर रॉबर्ट ग्रँट यांची नेमणूक झाली. सर रॉबर्ट ग्रँट साहेब १८३५ च्या मार्च महिन्यांत मुंबईस येऊन दाखल झाले. हे मोठे कर्मठ व धार्मिक वृत्तीचे अशी त्यांची ख्याती असे. खिश्चन धर्माचा त्यांना मोठा अभिमान. अशा प्रकारच्या धार्मिक वृत्तीच्या सद्‌गृहस्थाकडून खरें पाहिलें असतां महाराजांना त्रास तर बिलकूल होऊं नये, परंतु त्यांच्या बाबतींत अनुभव मात्र निराळाच आला. आज देखील धार्मिक वृत्तीचे, म्हणूनच कर्मठ, जे अधिकारी आढळतात, मग ते इंग्रज असोत अगर एतद्देशीय असोत, तेच धर्माच्या नांवाखालीं धर्मवेडेपणानें गरीब रयतेचा चुराडा करीत असतात!

एतद्देशीय भटभिक्षुक, प्राय: त्यांच्या जातीचे धर्मवेडे गृहस्थ ब्राह्मण अशा धार्मिक वृत्तीच्या अधिकाऱ्यांच्या कानास लागतात; व त्यांच्या कानांत इतरांविषयीं ओततां येईल तितकें सारें विष ओततात. धर्माच्या सोंवळ्या नांवाखालीं, मग हे कर्मठ अधिकारी काय पाहिजे तो अन्याय करीत असतात. हा अनुभव प्रतापसिंहमहाराजांचे बाबतींत देखील आला. सर रॉबर्ट ग्रँट साहेब इंग्लंडहून मुंबईस आल्यावर महाराजांचे वांकुडपणावर असलेल्या कौन्सिलरांनीं, विशेषत: एतद्देशीय बाळाजी नातूसारख्या अधिकाऱ्यांनीं, गव्हर्नर साहेबांचे कानास लागून त्यांचें मन महाराजांसंबंधानें कलुषित केलें. गव्हर्नर साहेबांचे कौन्सिलचे सभासद जतच्या व भोरच्या प्रकरणापासून महाराजांचे विरुद्ध होतेच. त्यांना चिंतामण पटवर्धन, बाळाजी नातू, पंत सचीव वगैरे महाराजांच्या उलट खटपटीस लागलेल्या लोकांकडून प्रोत्साहन मिळत होतेंच.

सन १८३५ च्या मे महिन्यांत शिरस्त्याप्रमाणें गव्हर्नरसाहेब महाबळेश्वरास हवा खाण्यास आले होते. अलिकडच्या रिवाजाप्रमाणें प्रतापसिंह महाराज लवाजम्यासह या नव्या गव्हर्नरसाहेबांच्या भेटीला महाबळेश्वरास गेले. भेटीमध्यें अर्थात् महाराजांनीं आपल्या अंमलाखालच्या जहागिऱ्यांबद्दल डायरेक्टरांकडे काम पाठविलें होतें, त्याचें काय झालें, म्हणून गोष्ट काढली. बोलतां बोलतां सदरच्या जहागिऱ्या आपल्या अंमलाखालच्या असल्यामुळें त्यांचें मालक बेवारस मयत झाल्यास त्या आपल्या राज्यांत जमा करण्याचा अधिकार आपणांस—सातारच्या राजास—कसा पोंचतो हें तहनाम्याचा अर्थ करून महाराजांनीं स्पष्ट करून सांगितलें, व कोर्ट ऑफ डायरेक्टर्सकडे त्याबद्दल दाद मागितली असून अद्याप कांहींच उत्तर आलें नाहीं, आल्यावर तें आपणास कळविण्यांत यावें म्हणून गव्हर्नर साहेबांना सुचविलें. त्यावर गव्हर्नर साहेबांनीं मोठा सहानुभूतीचा आव आणून महाराजांचें म्हणणें शांतपणानें ऐकून घेतल्याचा बहाणा केला, व जनरल लॅाडविक, त्यावेळचे साताऱ्याचे रेसिडेन्ट तेथें होते, त्यांस महाराजांचे म्हणण्याप्रमाणें डाय-

रेक्टरांकडे पाठविण्यासाठीं खलिता तयार करण्यास सांगितलें. जनरल लॉड-विक बिचारा शिपाईगडी, त्याला मुलकी खात्यांतील डावपेंच काय माहीत ? त्यानें गव्हर्नर साहेबांच्या हुकुमावरून ताबडतोब खलिता तयार करून त्यांचेकडे नेला.

सर रॉबर्ट ग्रँट मोठे धार्मिक, तसेंच ढोंगीही होते. त्यांनीं धार्मिक वृत्तीचें अवडंबर माजविलें होतें. महाराजांसमोर त्यांनीं सहानुभूतीचें प्रदर्शन करून दाखविलें खरें, परंतु त्यांच्याइतका दांभिक कोणीच सांपडणार नाहीं. कारण महाराजांचें व त्यांचें बोलणें चाललें होतें, त्याच वेळीं कोर्ट ऑफ डायरेक्टर्सचा हुकूम त्यांच्या खिशांत होता ! सर रॉबर्ट ग्रँटच्या ऐवजीं दुसरा एखादा सद्गृहस्थ असता, तर त्यानें महाराजांना डायरेक्टर्सचा हुकूम दाखविला असता; परंतु ग्रँटसाहेब साधेसिधे सद्गृहस्थ नव्हते. ते पडले पक्के कर्मठ ! म्हणून रेसिडेंटास व महाराजांस त्यांनीं कोर्ट ऑफ डायेक्टर्सच्या निकालाबद्दल खरा प्रकार कळविला नाहीं. याच प्रसंगीं महाराजांनीं शिरस्त्या-प्रमाणें गव्हर्नरसाहेबांना साताऱ्यास आपलेकडे येण्याचें आमंत्रण दिलें. महाबळे-श्वरास गव्हर्नर आले, कीं महाराजांनीं त्यांना भेट द्यावयाची, व नंतर गव्हर्नरसाहेबांनीं साताऱ्यास जाऊन महाराजांना परत भेट द्यावयाची असा क्रम एल्फिन्स्टनसाहेबांपासून चालत आलेला; पण धर्मनिष्ठपणाचा टेंभा मिर-विणाऱ्या सर रॉबर्ट ग्रँट साहेबांनीं, महाराजांस साताऱ्यास येतों असें अभि-वचन देऊन, तें बुद्धिपुरःसर मोडलें. या खेपेस हे गव्हर्नर साताऱ्यास गेलेच नाहींत. महाराजांचा त्यांनीं बुद्धिपुरःसर अपमान केला. बिचारे महाराज ! त्यांना गव्हर्नरांच्या या वागणुकीनें वाईट वाटलें, पण करतात काय ?

जनरल लॉडविक यानें खलिता तयार केला म्हणून वर सांगितलें आहेच. तो खलिता त्यांनीं गव्हर्नरसाहेबांपाशीं दिला; परंतु सर राबर्ट ग्रँट यांनीं तो तसाच ठेवून घेतला. खरें पाहतां हा खलिता तयार करण्याची मुळींच गरज नव्हती. केवळ महाराजांना नादास लावण्यासाठींच जनरल लॉडविकला तक्ता तयार करण्यास या कर्मठ गव्हर्नरांनीं सांगितलें होतें. जनरल लॉड-

विकला तरी हें आंतलें इंगीत काय माहीत ? त्याला वाटलें गव्हर्नर धार्मिक वृत्तीचा असल्यामुळें सज्जन असेल. गव्हर्नरसाहेबांची ' खरी वृत्ति कमठ-पणाच्या पांघरुणाखालीं झांकलेली होती. ती त्या बिचाऱ्या शिपाई गड्यास कशी ओळखूं यावी ?

गव्हर्नरसाहेबांच्या विश्वासावर एक वर्ष गेलें. गव्हर्नरसाहेबांकडून आज उत्तर येईल, उद्यां उत्तर येईल, या भरंवशावर महाराज राहिले होते. तरी देखील १८३६ च्या मे महिन्यापावेतों त्यांच्याकडून कांहींच उत्तर आलें नाहीं.

१८३६ च्या मे मध्यें गव्हर्नरसाहेब पुनः महाबळेश्वरास आले. महाराज प्रतापसिंह पुनः या वर्षींही शिरस्त्याप्रमाणें गव्हर्नरसाहेबांना भेटण्यासाठीं गेले. गव्हर्नरसाहेबांनीं आपणांस उगीच नादास लाविलें आहे, डायरेक्टरांकडे आपल्यासंबंधानें कांहींच लिहिलें नाहीं, व लिहिण्याचा त्यांचा हेतु नाहीं, हें महाराजांनीं आतां पुरतेपणीं हेरलें होतें. सबब गव्हर्नरसाहेबांच्या भेटीच्यावेळीं, त्यांनीं कलकत्त्यास अगर इंग्लंडास आपला वकील पाठविण्यास आपणास परवानगी मिळावी, आपल्या वकिलाकरवीं आपण आपलें म्हणणें डायरेक्टरांस कळवूं, व दाद लावून घेऊं, असें बोलणें केलें; व पुनः गव्हर्नरसाहेबांना साताऱ्यास येण्याबद्दल निमंत्रण केलें; परंतु ह्याही खेपेस महाराजांच्या आमंत्रणाचा गव्हर्नरसाहेबानीं अव्हेर केला.

महाराजांनीं आपला वकील इंग्लंडास पाठविण्याचा बेत केला आहे, हें ऐकतांच गव्हर्नरसाहेब गडबडले. त्यांचा नूर एकदम उतरला. महाराजांचा वकील इंग्लंडास गेला व तेथें त्यानें डायरेक्टरांची भेट घेतली, म्हणजे आपल्या लबाडीचा सगळा प्रकार उघड होणार ! डायरेक्टरांचा हुकूम गव्हर्नर व सेक्रेटरी यांनीं लबाडीनें दाबून ठेवला आहे, व अशा प्रकारची लबाडीची वागणूक सुमारें २ वर्षें केली, हें डायरेक्टरांना समजलें तर आपल्यास खास ठपका येईल, व कदाचित् नोकरीवरूनही आपणांस कमी करण्यांत येईल. म्हणजे मग **साताराचा लॉर्ड** होण्याची आपली मनीषा तशीच राहून जाईल. या भीतीनें गव्हर्नरसाहेबांचें मन व्यग्र झालें.

प्रतापसिंहमहाराज हे कर्तबगार होते. एखादी गोष्ट हातांत घेतली कीं, शिकस्तीचे प्रयत्न करून ते ती यशस्वी करीत, हें गव्हर्नरसाहेबांस समजून चुकलें होतें. जहागिऱ्यांच्या स्वामित्वाच्या संबंधानें डायरेक्टरांकडून जो हुकूम आला होता, त्या बाबतींत मुंबईसरकारनें त्यांना फसविलें होतें, किंबहुना त्या बाबीचा उल्लेख केल्यामुळेंच गव्हर्नरांनीं त्यांचा दोन वेळां अपमानही केला होता.

प्रतापसिंहासारखा कर्तबगार व तेजस्वी राजपुरुष ह्या गोष्टी गप्प गिळून बसणार नाहीं, हें ग्रँटसाहेबांनीं पुरतेपणीं ओळखिलें होतें. महाराज गव्हर्नरजनरलकडे, अगर कोर्ट ऑफ डायरेक्टर्सकडे दाद मिळेपावेतों क्रमशः डेप्युटेशनें पाठवितील व मग आपली लबाडी उघडकीस येईल, व आपण महाराजांचा जो अपमान केला, त्याची दाद लावून घेण्याचा तेही प्रयत्न करतील; मग आपल्या चुकीची तरफदारी आपणांस मुळींच करतां येणार नाहीं, हें मुंबईसरकार जाणून होतें, तेव्हां या सर्व आपत्ती टाळण्यासाठीं महाराजांना कसें संकटांत आणावें याविषयीं मुंबईसरकारचें विचारयंत्र झपाट्यानें सुरू झालें.

सर रॉबर्ट ग्रँटसाहेब पट्टीचे वकील. त्यांना, इतर कांहीं इंग्रज लोकांप्रमाणेंच हिंदी लोकांबद्दल भयंकर अप्रीति वाटत असलेली. त्यांतच त्यांनीं हिंदुस्थानांत पाऊल ठेविलें न ठेविलें, तोंच प्रतापसिंहांची स्तुति केलेलें पत्र, व त्यांना नजर करण्यासाठीं कंपनी सरकारकडून रु. ३०००० च्या किंमतीची तरवार ग्रँट साहेबच्या हातीं आलेली. मग त्या अप्रीतीचें रूपांतर हेव्यादाव्यांत झाल्यास नवल कसलें? हिंदी राजा आणि तो चांगला, तो स्तुत्यर्ह. गव्हर्नरसाहेबांस चीड कां बरें येऊं नये? त्यांनीं पहिल्यापासूनच आपल्यापेक्षां चढ होऊं पहाणाऱ्या या राजाची कशी नापत करावी, त्यांना पेंचांत कसें आणावें, याबद्दल विचार चालविला.

गव्हर्नरसाहेबांच्या मनाचा कल कोणत्या दिशेकडे वाहत आहे हें चाणाक्ष कौन्सिलरांनीं व त्यांच्या कंपूपैकीं बाळाजी नातू वगैरेनीं ओळखिलें. मग तेव्हांपासून वेळींअवेळीं गव्हर्नरांसमोर ते महाराजांची नालस्ती करूं लागले. एकानें म्हणावें, " प्रतापसिंहाला वेड लागलें आहे. हिंदुस्थानचे मालक कंपनी सरकार

असतां प्रतापसिंह आपणांस छत्रपति म्हणवून घेतो. हिंदुपदपादशाहा असें म्हणवितो. आतां वेडाच्या भरांत हा आपल्या मुलीला घोड्यावर बसणें, नेम मारणें, तोफा डागणें, भाला फेंकणें वगैरे मर्दानी शिक्षण देऊं लागला आहे. बायकांना कां असलें शिक्षण द्यावयाचें ? " अशा प्रकारें महाराजांच्या कृतींचा विपर्यास करून सर रॉबर्ट ग्रँट साहेबांस नातू कंपूनें आपलेसे केले. गव्हर्नर साहेब बाळाजीच्या पक्षास सामील झाले असून, महाराजांवर गव्हर्नरसाहेबांची इतराजी झाली आहे, असें बाळाजी नातूच्या हस्तकांनीं लोकांस सांगावें. त्यामुळें राजकारणांतील भानगडीमुळें नाराज झालेले लोक बाळाजीकडे धूम ठोकूं लागले. निरनिराळ्या संस्थानिकांनीं गव्हर्नरसाहेबांकडे दाद लागावी म्हणून बाळाजीस लांचलुचपत देण्यास सुरवात केली. महाराजांचे बंधू खुद्द आप्पासाहेब हेही नातूंच्या कटांत सामील झाले. नातूला आतां जास्त जास्त उच्चीचे ग्रह आले. पुण्याच्या दप्तरांत त्याला प्रधान अमानतदार नेमण्यांत आलें.

या जागीं बाळाजीला काम कांहींच नव्हतें. कधीं कधीं या आफिसकडे बाळाजी महिनेच्या महिने फिरकत नसे. त्याचें खरें काम प्रतापसिंहाला कसें चीत करतां येईल, व नष्ट पावूं लागलेलें ब्राह्मण्य कसें जिवंत राखतां येईल, व त्यासाठीं कसकशा योजना कराव्या एवढेंच होतें. या जागेवर राहून बाळाजीनें पुढें कसकसें खोट्या पुराव्यांचें जाळें तयार केलें, हें यथाकाल येणार आहेच, पण या प्रकरणीं खटपट करीत असतां बाळाजीनें आपली तुंबडी चांगलीच भरून घेतली हें या ठिकाणीं नमूद केलें पाहिजे.

बाळाजीच्या करवीं गव्हर्नरसाहेबांना प्रतापसिंहाविरुद्ध कारस्थान रचण्यास हीच जागा सोयीस्कर होती. बाळाजीस मध्यवर्ती राहून आज मुंबईस तर ८।४ दिवसांनीं साताऱ्यास अशा येरझाऱ्या घालतां येऊं लागल्या; व स्वपक्षास चांगलीच बळकटी आणतां येऊं लागली. तसेंच नवीं नवीं व कल्पनातीत अशीं कुभांडेंही रचतां येऊं लागलीं.

———

१ E. Thornton.

प्रकरण १७ वें.

तर्कट-कुभांड.

सन १८३६ च्या उन्हाळ्यामध्यें महाराजांची व गव्हर्नर सर रॉबर्ट ग्रँट-साहेबांची भेट महाबळेश्वरास झाली, हा मजकूर मागील प्रकरणांत आलेला आहे. याच भेटींत महाराजांनीं आपण आपल्यातर्फे वकील इंग्लडास पाठ-विणार आहों, व जहागिऱ्यांच्या संबंधानें आपली दाद लावून घेणार आहों, वगैरे गोष्टी सरळ सरळ सर रॉबर्ट ग्रँट यांच्या कानावर घातल्या, हेंही वाच-कांच्या लक्षांत असेलच. त्यानंतर महाराजांवर कुभांड रचण्यास सर रॉबर्ट ग्रँटसाहेब व त्यांचे पक्षपाती यांनीं कशी कंबर कसली तें पाहूं.

कर्नल लॉडविकसाहेब हे या सुमारास साताऱ्यास रेसिडेंट होते. बाळाजी-पंत नातूच्या हस्तकांनीं त्यांना महाराजांकडील भलीबुरी बातमी देण्याचें काम पहिल्यापासूनच केलेलें होतें. प्रतापसिंह महाराज जरी आपल्या राज्यांत सत्ता-धारी होते व बाळाजी नातू जरी त्यांचा पेशवा नव्हता, तरी देखील महाराज सरकारचे पदरीं नोकरीस बरेचसे चित्पावन ब्राह्मण होते. त्यानीं पगार खावा महाराजांचा, व संध्याकाळीं रेसिडेन्सिमध्यें जाऊन चुगल्या कराव्यात रेसिडेंटा-कडे. याच चुगलखोर लोकांकडून रेसिडेंट लॉडविकसाहेबांस एकदां असें कळलें कीं, महाराजांनीं विलायतेस पाठविण्यासाठीं मुंबईंत राहणाऱ्या सय्यद मीर यांस वकील नेमिलें आहे. तहनामा व इतर कागदपत्राच्या नकला त्याच्या हवालीं केल्या आहेत. लवकरच तो वकील कलकत्यास अगर विला-यतेस जाणार आहे. सर रॉबर्ट ग्रँट यानेंही कर्नल लॉडविक यांस खाजगी भेटींत महाराजांविषयीं सूचना करून ठेविली होती, त्याचें मन निरनिराळ्या गोष्टी सांगून कलुषित केलें होतें. कदाचित् गव्हर्नरसाहेबांच्या सूचनेवरून देखील असेल, ता. २० जून १८३६ रोजीं लॉडविक साहेबानीं महाराजां-विरुद्ध पहिली कागाळी मुंबई सरकारास कळविली. सदर तारखेस रेसिडेंट

साहेबांनीं मुंबई सरकारचे सेक्रेटरीस पत्र पाठविलें ते पुढील आशयाचें होतें. "राइट ऑन्‌रेबल गव्हर्नर इन् कौन्सिल यांच्या नजरेस पुढील गोष्टी आणण्याची आपल्याकडून तजवीज व्हावी म्हणून मी आपणांस कळवीत आहें. आमच्या खासगी बातमीदाराकडून मिळालेल्या माहितीप्रमाणें सातारच्या महाराजांनीं ब्रिटिश रेसिडेंटास आपला मनोदय न कळवितां, महाराज सरकार व इंग्रज सरकार यांच्या दरम्यान झालेल्या १८१९ च्या तहांतील कलमासंबंधानें उत्पन्न झालेल्या भानगडीबद्दल दाद लावून घेण्यासाठीं सय्यद मीर जात मुसलमान राहणार मुंबई या इसमास महाराजांनीं वकील नेमिलें असावें अगर त्याच्याशीं वकील नेमण्याबद्दलचा करार केला असावा, किंवा तसा करार करण्याच्या बेतांत महाराज असावेत. सदरचा वकील कलकत्त्यास अगर विलायतेस रवाना होणार आहे. सदर बातमी आम्हांस कळतांच महाराजांशीं आम्ही या संबंधानें बोलण्यासाठीं भेट घेण्याबद्दल विनंति केली व ता. १६ जून १८३६ रोजीं त्याप्रमाणें त्यांची भेट घेतली.

महाराजांची सदरची वागणूक त्यांच्या व इंग्रज सरकारच्या दरम्यान झालेल्या १८१९ सालच्या तहाच्या ५ कलमाशीं विसंगत आहे आहे, किंवा कसें, व विसंगत असल्यास कितपत विसंगत आहे, हें ठरविण्यास मी स्वतः असमर्थ आहे. सबब हें प्रकरण आपल्याकडे विचारासाठीं पाठवीत आहें. विलायतेस वकील रवाना करण्यासंबंधानें हकीगत मजला अगाऊ न कळविण्यांत महाराजांचा हेतु समजण्यासारखा उघड आहे. कारण तहाच्या कलमाप्रमाणें महाराजांनीं रेसिडेंटाला एकदां विचारलें, व त्यांचें मत घतेलें, तर मग त्यांनीं त्याप्रमाणें वागलेंच पाहिजे. आतां वकीलातीच्या बाबतींत रेसिडेंटाचें मत काय पडेल, हें महाराजांना उघड उघड कळून चुकलें होतें. सबब रेसिडेंटाच्या मताविरुद्ध उघडपणें वागणें, म्हणजे तहाच्या दुसऱ्या कलमाचें उल्लंघन केल्यासारखें होणार होतें. महाराजांनीं अशा प्रकारचें जें हें विश्वास नाहींसा होण्यासारखें आचरण केलें आहे, त्यासंबंधानें मीं काय धोरणानें वागावें याबद्दल ताबडतोब माहिती देण्यांत यावी. माझ्या माहितीप्रमाणें महाराजांचें हें

पहिलेंच गैरकृत्य आहे. आजपावेतों महाराज ब्रिटिश सरकारच्या मित्रत्वावर पूर्ण विश्वास व अढळ निष्ठा ठेवून मजशीं वागत आलेले आहेत [good faith and firm reliance on the friendship of the British government.)........."

रेसिडेंट लॉडविक यांच्या सदरच्या पत्रांत 'गैरवर्तणुकीचा' उल्लेख केला आहे. ती गैरवर्तणूक तरी कसली ? कर्नल लॉडविकसाहेबांना किंबहुना त्यांचे वरिष्ठ जे गव्हर्नरसाहेब, सर राबर्ट ग्रँट यांना देखील महाराजांनीं आपण इंग्लंडास वकील पाठविणार आहों, हें सांगितलें होतें. त्यावेळीं गव्हर्नरसाहेबांनीं वकील पाठवूं नका, आमची मनाई आहे, असें महाराजांना सांगितलें नव्हतें. अशा स्थितींत महाराजांचें कृत्य गैर म्हणावें तरी कसें ? खरें म्हटलें, तर गैरकायदा व अन्यायाचें आचरण स्वतः मुंबईसरकारचें होतें. त्यांनींच मुळीं कोर्ट ऑफ डायरेक्टर्सचा हुकूम लबाडीनें दाबून ठेवला होता. त्याची बातमी महाराजांना कळूं दिली नाहीं. ती बातमी मिळावी म्हणून महाराजांची खटपट, व त्यासाठींच गव्हर्नरसाहेबांना सांगून महाराज आपल्यातर्फे वकील कोर्ट ऑफ डायरेक्टर्सकडे पाठवीत होते. ह्या सगळ्या गोष्टी उघड उघड होत होत्या. यांत अन्यायाचें अगर गैर तें काय होतें ?

खुद्द कर्नल लॉडविकसाहेबांची मनोदेवताही महाराजांचें हें करणें गैरवर्तन आहे, व त्यामुळें तहाच्या कलमाचें उल्लंघन झालें आहे, असें ठांसून म्हणावयास कोठें तयार होती ? गव्हर्नरसाहेब हे त्यांचे वरिष्ठ पडले, तेव्हां निरुपायास्तव बिचाऱ्यांस वरिष्ठांच्या आज्ञेप्रमाणें महाराजांविरुद्ध कांहीं तरी कागाळी करणें भाग होतें, व म्हणूनच त्यानीं वरील प्रकारचें पत्र लिहिलें होतें.

सदरच्या पत्रांतील तहाच्या ५ व्या कलमाचें उल्लंघन होतें कीं कसें, यासंबंधाचा मजकूर मोठा आश्चर्यकारक आहे. तहांतील ५ व्या कलमास अनुसरून महाराजांनीं रेसिडेंटाचें मत घ्यावयास जावें, कीं रेसिडेंटसाहेब वरिष्ठांच्या खुशामतीसाठीं नकार देणार हें ठरलेलेंच ! बरें हें तरी आम्ही आपल्या कल्पनेवरून ह्मणतों असें नाहीं ! खुद्द रेसिडेंटच आपल्या पत्रांत ही

गोष्ट कबूल करतात. मग अशा स्थितींत रेसिडेंटास विचारण्यांत हंशील काय ? रेसिडेंटास विचारून नकार मिळाल्यावर त्याविरुद्ध वागावें, म्हणजे मग तहाविरुद्ध खास वागल्यासारखें होणार. म्हणजे रेसिडेंटास विचारणें उघड उघड वेडेपणाचें होतें. पण विचारलें नाहीं हा देखील गुन्हा होतो कीं काय ? अशाबद्दल इंग्रजी मुत्सद्यांचीं खलबतें चाललीं होतीं. आहे कीं नाहीं या अपूर्व कायदेबाजीची तारीफ ?

आज इंग्रजी अंमलाखालीं साध्या गुन्हेगारालासुध्दां अपील करण्याचा हक्क आहे. अपीलाचा निकाल काय झाला म्हणून अपील कोर्टाकडे चौकशी करण्यास त्या आरोपीस यत्किंचित आडकाठी नाहीं. असें असतां प्रतापसिंहांसारख्या दोस्त सरकारास डायरेक्टर्सकडे आपला माणूस चौकशीसाठीं पाठवावयाचा म्हटला, कीं तहनाम्याचा भंग होतो, कीं काय अशी मुंबई सरकारास धास्ती पडते ! आहे कीं नाहीं आश्चर्य ? असो.

सदरच्या पत्राचें उत्तर मुंबईसरकाराकडून रेसिडेंट लॉडविकसाहेबांस कधींच आलें नाहीं. पुढें ता. २२ जुलै १८३६ रोजीं लॉडविक साहेबांनीं गव्हर्नरसाहेबांना दुसरें पत्र पुढील आशयाचें लिहिलें. " विनंती विशेष २३ व्या पलटणींतील दोघा नेटिव्ह ऑफिसरांच्या जबान्यांच्या नकला पत्रासोबत पाठवीत आहे. त्या, गव्हर्नर साहेबांच्या अवलोकनांत ताबडतोब आणण्यांत याव्यात. माझ्यामतें सदरचे साक्षीदार **सच्चे व अत्यंत विश्वासु** आहेत. पुनः येत्या रविवारीं येऊन भेटा, असें गोविंदराव दिवाणाकडून त्यांना निमंत्रण मिळालेलें असल्यामुळें तोपावेतों काय करावयाचें तें मीं तहकूब केलें आहे. कारण त्या भेटीनंतर या कटाचे मुख्य सूत्रधार कोण कोण आहेत, हें समजून येण्याचा संभव आहे. व त्यानंतर योग्य त्याप्रमाणें वागण्यास बरें पडेल.

बाप दिवाण असल्यामुळें ज्याला दिवाण म्हणतात, त्या गोविंदराव दिवाणाविरुद्ध, व ज्यानें अंमलदारांना वळविण्याचा प्रयत्न केला त्या ब्राम्हणाविरुद्ध, त्यांना पकडण्यास पुरेसा, पुरावा उपलब्ध झालेला आहे, असें माझें मत आहे.

महाराजांच्या संमतीनें आपलें म्हणजे दोस्त राष्ट्राचें सैन्य फितूर करण्याचा

जर प्रयत्न झालेला असेल, तर तसें करणें तहाच्याविरुद्ध होतें. कोणीही तसें केल्यास तो गुन्हा ठरतो, व त्यास अत्यंत कडक शासन केलें पाहिजे.

गव्हर्नरसाहेबांची परवानगी मिळाल्यास सदरच्या दोन्ही इसमांस पकडावें व आणून कॅम्पांत कैदेंत ठेवावें, अशी माझी सूचना आहे. पकडल्यानंतर ताबडतोब महाराजांना हें विदित करावयाचें. तसेंच हे लोक महाराजांच्या नांवाचा उपयोग हा गुन्हा करण्याच्या कामीं करीत असल्यामुळें, त्यांना ताबडतोब पकडावें लागलें, असें महाराजांना सांगून त्यांची समजूत करावयाची, हा एक मार्ग. दुसरा मार्ग—महाराजांना सांगून सदर इसमांस पकडावयाचें, व यदाकदाचित् त्यांनीं नाकारलेंच, तर आपणच सदर गुन्हेगारांना जबरीनें पकडावयाचें.

पहिल्या उपायाप्रमाणें वागल्यास फारशा भानगडी उत्पन्न होणार नाहींत व माफीच्या आशेनें त्यांच्या जबान्या महत्त्वाच्या होण्याचा संभव फार ......

या पत्राचें उत्तर शक्य तितक्या लवकर मिळावें. सदर साक्षीदारांच्या जबान्या कोणत्या धोरणानें झालेल्या आहेत, हें बऱ्याच लोकांना कळलेलें असल्यामुळें या गोष्टीची वाच्यता होण्याचा संभव फार आहे......"

सदरचें ता. २२ जुलैचें पत्र मुंबईस जाऊन धडकतें न धडकतें, तोंच ता. २४ जुलै रोजीं मुंबईसरकारकडून त्यास उत्तर रवाना झालें! इतक्या तांतडीनें उत्तर रवाना झाल्याबद्दल वाचकांना कदाचित् आश्चर्य वाटेल. परंतु खरा प्रकार लक्ष्यांत घेतला, तर आश्चर्य करण्यासारखें त्यांत कांहींच नाहीं. महाराजांना पाण्यांत पाहणारा, बाळाजीपंत नातू प्रधान—अमानतदार हुद्यावर पुण्यास होता. त्याला काम असें वस्तुतः कांहींच नव्हतें. महाराजांना गोत्यांत आणण्यासाठींच या बहुमानाच्या पण रिकामपणाच्या कामगिरीवर बाळाजीची नेमणूक सर रॉबर्ट ग्रँटसाहेबांनीं केलेली! महाराजांनीं कोर्ट ऑफ डायरेक्टर्सकडे चौकशी करण्यासाठीं आपण वकील पाठविणार आहों, असें सर रॉबर्ट ग्रँटसाहेबांना सांगितलें, कीं ताबडतोब फितुरासंबंधाची कुभांडाची रचना तयार होऊं लागली. या गोष्टी एकाच वेळीं होऊं लागल्या हें लक्षांत घेतां, या फितुराची

रचना करण्यामध्यें बाळाजी नातूचें अंग असावें, असें वाटणें साहजिक आहे. आम्ही म्हणतों तशीच खरोखर स्थिती असल्यास त्याबद्दलची वाटाघाट आगाऊ होऊन गव्हर्नरसाहेबांना हें सर्व तर्कट आगाऊ कळविण्यांत आलें असलें पाहिजे. त्यामुळें ता. २२ जुलैचें पत्र मुंबईस येऊन थडकतें, न थडकतें तोंच त्यास उत्तर गेलें, यांत नवल तें कसलें ? किंबहुना हें उत्तर, रेसिडेंटसाहेबांच्याच पत्राची वाट पहात असावें !

ता. २४-७-१८३६ च्या या पत्रामध्यें काय गूढ भरलेलें होतें, तें समजत नाहीं. पण या पत्रांत महाराजांना जास्त पेंचांत आणण्यासंबंधाचा मजकूर खास असावा. कर्नल लॉडविकसाहेबानें गव्हर्नरसाहेबांच्या एका पत्रांतील मजकूर, त्यांनीं ता. ९-१०-१८४० रोजीं ईस्ट इंडिया कंपनीच्या कोर्ट ऑफ डायरेक्टर्सना लिहीलेल्या पत्रांत नमूद केला आहे. तोच मजकूर या ता. २४-७-३६ च्या पत्रांतील असावा. तो मजकूर असा- " त्या हिंदी अंमलदारांना महाराजांना भेटण्यास मीं सांगावें व शिकवावें, कीं त्यांनीं भेटल्यानंतर महाराजांना म्हणावें कीं, ' महाराज, आम्ही या कटांत सामील झालों आहों, हें आमच्या वरिष्ठांच्या नजरेस आलें आहे. या प्रसंगांतून महाराजांनीं आमचा बचाव करावा अशी आमची विनंती आहे. पळून जाण्यास पुरेसा पैसा; नाहींपेक्षां नोकरी तरी खास मिळावी, म्हणून शिक्का मोर्तबाचें आज्ञापत्र, आम्हांस

---

१ ह्या पत्रांतील पुढील उतारा देत आहों.

"that the native officers should ask to see the Raja, tell him they had heard their part of the plot had been discovered, beg, that he would protect them, either by advancing money to escape with, or a pass under his hand and seal to insure them service; that if he gave them money, the evidence would be strong, if a paper convincing. If however he should give them up to me, with loud complaints of calumny in this case was to pretend to secure them, and suspicion being hushed an opportunity would be afforded of securing the principal agents."

देण्यांत यावें.' महाराजांनीं त्यांना पैसे दिले, तर पुरावा भक्कम झाला. आज्ञापत्र दिलें तर पुरावा पक्का झाला. पण महाराजांनीं सदर आरोपींना माझ्या हवालीं केलें व त्यांच्याबद्दल तक्रार केली तर मी त्यांना ताब्यांत घेऊन अटक केल्याचा बाहाणा करावयाचा. अशा प्रकारच्या रचनेनंतर संशय वगैरे उत्पन्न होतील; ते नष्ट झाल्यानंतर मुख्य गुन्हेगार सांपडण्यास सोयीचें पडेल.''' अशा प्रकारचा मजकूर गव्हर्नरसाहेबांच्या पत्रांत होता.

या पत्रावरून मुंबईचे धर्मनिष्ठ गव्हर्नरसाहेब, लॉडविक साहेबांकरवीं महाराजांवर कशा प्रकारें तोहमत आणीत होते, हें स्पष्ट दिसतें. वरिष्ठाच्या दडपणामुळें, व कपटकारस्थानाच्या पुढील परिणामाची जाणीव झालेली नसल्यामुळें, कर्नल लॉडविक सर राबर्ट ग्रँट साहेबांच्या म्हणण्याप्रमाणें कांहीं काल वागत होते. ता. २२-७-३६ चें पत्र लॉडविक साहेबांनीं अशाच गाफिलगिरींत लिहिलें. ज्या नेटिव्ह अंमलदारांना 'थोर' व 'अत्यंत सच्चे' म्हणून त्यांनीं संबोधिलें आहे. ते खरोखरच सच्चे होते काय? तसें असतें तर त्यांच्या सच्चेपणाचें वर्णन करण्याची जरूरी काय होती? पुढें थोडक्याच दिवसांनीं कर्नल साहेबांनीं आपण होऊन दिलेलें हें सच्चेपणाचें सर्टिफिकेट परत घेतलें! म्हणजे यानंतर थोडक्याच दिवसांनीं गुप्त कमिशनपुढें तपासणी झाल्यावर **याच साक्षिदारांनीं खोटया जबान्या** दिल्या असे उद्गार खुद्द त्यांनींच काढलेले आहेत!

आतां **प्रतापसिंहमहाराजांवर** हें जें दोघां हिंदी अंमलदारांकरवीं तर्कट उभारण्यांत आलें होतें त्याचें स्वरूप जाणून घेण्याची वाचकांना इच्छा झाली असणारच! ती हकिगत पुढील प्रकरणांत दिली आहे.

प्रकरण १८ वें.

फितुराचा आरोप.

(पहिला आरोप.)

आपल्या कथानकाच्या काळीं सातारा शहराच्या पूर्व बाजूस रेसिडेन्सीच्या उत्तरेस इंग्रज सरकारचें लष्कर छावणीस असे. या ठिकाणीं २३ वी नेटिव्ह पलटण छावणीस होती. ता. ११ जुलै १८३६ रोजीं २३ व्या पलटणींतला सुभेदार शिवगुलामसिंग हा कांहीं कामानिमित्त शहरांत चालला होता. वाटेंत अंताजी वाघ नांवाच्या अनोळखी भटानें त्यास नमस्कार केला. व म्हणाला "तुमच्या पलटणीचे मेजर सुभेदार कोण आहेत ? तुम्ही कोणाला सांगणार नाहीं अशी शपथ घेत असाल, तर तुम्हास सांगतों." सुभेदारानें त्या अनोळखी ब्राह्मणाशीं ताबडतोब आणभाक केली ! त्यानंतर अंताजी म्हाणाला--" शिंद्याचा वकील साताऱ्यास आलेला आहे. इंग्रज सरकारास हिंदुस्थानांतून घालवून देण्यासाठीं एतद्देशीय सारे राजे एक झाले आहेत. " हें सारें संभाषण रस्त्यावर एका झाडाखालीं झालें; व त्याच ठिकाणीं शपथविधी देखील झाला. त्यानंतर अंताजीनें शिवगुलामसिंगास त्याचें घर कोठेंसें आहे म्हणून विचारलें. शिवगुलामसिंगानें अंताजीस लांबून आपलें घर दाखविलें. नंतर अंताजी साताऱ्यास परत गेला; व सुभेदार शिवगुलाम आपल्या वाटेनें गेला.

महाराजांवरील कुभांडाचा हा पहिला प्रवेश झाला. शिव गुलामसिंग कसा झाला तरी मिलिटरी ऑफिसर. त्यांतून परदेशी. त्याच्याशीं अंताजीसारख्या दक्षिणी भटानें, पूर्वींची ओळखपाळख नसतां इतकी लगट केली कशी ? अंताजी जर वेडगळ म्हणावा, तर त्याला हा उपद्व्याप सांगितला कोणीं ? शहाणा म्हणावा, तर भर रस्त्यांत इंग्रजसरकारास घालवून देण्याचा कट झाला आहे, असली महत्त्वाची गोष्ट अनोळखी पुरभय्यास तो सांगतो कशी ? आतां शिवगुलामसिंगासंबंधानें पाहूं.

शिवगुलामसिंग सुभेदार होता. त्यानें अनोळखी दक्षिणी ब्राह्मणास शपथ तरी काय समजून दिली ? बरें. अंताजी तरी असा कोण अंमलदार होता ? शिवाय "या थोर व सच्चा" स्वामिभक्त सुभेदार शिवगुलामसिंगानें आपल्या स्वामिभक्तिविरुद्ध शपथ तरी कशी दिली ? व इंग्रज सरकारचें राज्य उलथून पाडण्याचा कट होत असल्याचें ऐकून, त्यानें अंताजीस परत गप्प कसें जाऊं दिलें ? निदान त्याच्याकडून जास्त माहिती कां काढून घेतली नाहीं ? या स्वामिभक्त 'सच्चा' अंमलदारानें हें वृत्त आपल्या अधिकाऱ्यांना तरी कळवावयास नको काय ? साराच प्रकार विचित्र !

ता. ११-७-३६ ची हकिगत हा पहिला प्रवेश झाला. ता. २१ जुलै १८३६ रोजीं म्हणजे ज्या दिवशीं कर्नल लॉडविक यांनीं महाराजांविरुद्ध फितुरासंबंधानें कागाळीचें पत्र लिहिलें, त्याच्या आधल्या दिवशीं अंताजी इंग्रज लष्कराच्या कॅम्पांत सुभेदार शिवगुलामसिंगाच्या घरीं आला. मागील भेटीप्रमाणें याही वेळीं त्याच विषयासंबंधानें अंताजीनें बडबड सुरू केली. नंतर अंताजीनें पृच्छा केली. "नेटिव्ह ॲडज्युटंट कोठें आहेत ?" चंदरसिंग हवालदार तेथें होता. 'सच्चा' शिवगुलामसिंगानें अंताजीस तोच नेटिव्ह ॲडज्युटंट आहे असें बळेंच सांगितलें; व त्याची व अंताजीची ओळखपाळख करून देण्यांत आली. सुभेदार शिवगुलामसिंगानें चंदरसिंगास बाजूस नेलें व ही हकिगत ॲडज्युटंट ले. स्टोक यांस कळविण्यास सांगितलें. तसा चंदरसिंग ले. स्टोकसाहेबांस सांगण्यासाठीं ताबडतोब तेथून निघून गेला.

इकडे अंताजीचें व सुभेदाराचें बोलणें चाललें होतेंच. अंताजी म्हणाला, "गोविंदराव दिवाणानें तुम्हांस भेटण्यास बोलाविलें आहे. येत असाल तर मजबरोबर चला." हें बोलणें होत आहे, तोंच चंदरसिंग परत आला व ले. स्टोकनें सुभेदारास बोलाविलें असल्याचें म्हणाला. अंताजीस तेथेंच बसवून सुभेदार शिवगुलाम लेफ्टनंट स्टोक यांस भेटण्यास गेला. सुभेदारानें ले. स्टोक यांस गोविंदराव दिवाणानें आपणांस बोलाविलें असल्याचें सांगितलें. ले. स्टोकनें त्याला गोविंदरावाकडे जाण्यास परवानगी दिली, व बरोबर चंदरसिंगास व सुभेदार गुल्जार

मिश्रास घेऊन जाण्यास सांगितलें. नंतर उभयतां सुभेदार परत अंताजी बसला होता तेथें आले. अंताजीशीं गुल्जार मिश्राची ओळख करून देतांना गुल्जार आपला अत्यंत जिवलग मित्र आहे, असें शिवगुलामानें सांगितलें. त्यानंतर अंताजी, शिवगुलाम, गुल्जार व चंदरसिंग असे गोविंदराव दिवाणाकडे निघाले.

हा या कपटनाटकांतील दुसरा प्रवेश झाला. यांत चंदरसिंग हाच नेटिव्ह ॲडज्युटंट म्हणून 'सच्चा' शिवगुलामानें अंताजीस भासविलें आहे, तें कां ? खऱ्याखुऱ्या ॲडज्युटंटाचा संबंध या नाटकांत आणला नाहीं ? आम्हास वाटतें, खरा सुभेदार मेजर शिवगुलाम इतका 'थोर' व 'सच्चा' नसावा; व म्हणूनच या कपटनाटकाच्या कर्त्यांनीं त्याच्याऐवजीं चंदरसिंगाची नेमणूक केली असावी. आतां याही प्रवेशांत पाहिलें, तरी देखील अंताजीचें चित्र अगदीं खुळेपणाचें रंगविलें आहे. आधीं परदेशी सुभेदारापावेतों अंताजीचा प्रवेश झाला कसा ? हवालदार व नेटिव्ह ॲडज्युटंट यांच्या दर्जामधील फरक अंताजीस कसा समजला नाहीं ? शिवाय शिवगुलामानें चंदरसिंगास ले. स्टोककडे पाठविलें, तेव्हां तरी अंताजीस संशय यावयास पाहिजे होता. निदान त्याच्या म्हणण्याप्रमाणें तो फक्त शिवगुलामसिंगास न्यावयास आला होता. मग चंदरसिंग व गुल्जार मिश्र यांना त्यानें बरोबर कां येऊं द्यावें ? शिवाय ले. स्टोकनें तरी त्यांना जावूं कसें दिलें ? आपल्या अधिकाऱ्यांना लोक कसे फितुर करतात, याची परिक्षा घेण्यासाठीं त्यांना रजा देणें हें शिस्तीच्या दृष्टीनें गैर नव्हे काय ? खरें म्हटलें, तर अंताजीस ताबडतोब अटक करून महाराजांना त्याच्या पाजीपणाबद्दल कळवावयास हवें होतें ! पण ले. स्टोकनें हें केव्हां केलें असतें ? महाराजांविरुद्ध काहूर उठवावयाचें नसतें तेव्हां. सारांश या साऱ्या प्रकारावरून हें सारें बनावट कारस्थान तयार करण्यांत येत होतें, असें स्पष्ट दिसतें. ले. स्टोकला या कामगिरी बद्दल कॅप्टनची जागा मिळावयाची असणार ! दुसरें काय ? असो.

अंताजी, शिवगुलामसिंग, गुल्जार मिश्र व चंदरसिंग गोविंदरावाच्या वाड्याकडे निघाले. वाटेंत अंताजीनें त्यांना उभे केलें, व ज्या झाडाखालीं ता. ११–७–३६ रोजीं अंताजी व शिवगुलामसिंग बोलत उभे होते, तें झाड अंताजीनें त्यांना दाखविलें. नंतर तेथून तडक निघाले, ते अदालतीच्या वाड्याकडे गेले. त्या तिवर्गांना वाटेवर सोडून, गोविंदराव दिवाणास शोधण्याच्या निमित्तानें अंताजी अदालतींत गेला. थोड्या वेळानें बाहेर येऊन आपल्या या सोबत्यांना घेऊन तो दिवाणांच्या वाड्याकडे गेला. दिवाणांचा वाडा तेथून सुमारें अर्धा मैल उत्तरेस आहे.

दिवाणांचे वाड्यांत गेल्यावर अंताजीनें त्यांना रस्त्याच्या बाजूच्या खोलींत नेऊन बसविलें. याच सुमारास रेसिडेंट त्याच रस्त्यानें महाराजांकडे जात होते. त्यांना पाहून सुभेदारांनीं भेदरल्याची बतावणी केली, व ते घरांतून बाहेर पडले. त्यांचे मागून अंताजीही पडला. नंतर सुभेदार महाराजांची पागा पहावयास गेले. पागा पाहून ते राजवाड्याकडे गेले. त्या ठिकाणीं वाड्यापुढील भव्य पटांगणांत महाराज व रेसिडेंट हे महाराजांना कंपनी सरकारकडून नजर केलेल्या २ छोट्या तोफांची तपासणी करीत होते. महाराजांशेजारीं गोविंदराव दिवाणही होता. अंताजी व त्याचे सोबती आसपास रेंगाळत होते. तपासणीचें काम झाल्यावर महाराजांचा निरोप घेऊन रेसिडेंट निघून गेले. महाराज वाड्यांत गेले. व गोविंदराव दिवाण देखील आपल्या वाड्याकडे निघाले. त्यांच्यामागून अंताजीनें शिवगुलामसिंग, गुल्जार मिश्र व चंदरसिंग यांना दिवाणाच्या वाड्याकडे नेलें.

हवालदार चंदरसिंगास तेथेंच रस्त्यावर सोडून अंताजी त्या दोघां सुभेदारांना घेऊन वाड्यांत गेला. हवालदार चंदरसिंगास खालींच कां ठेवण्यांत आलें ? सुभेदार शिवगुलामसिंगानें अंताजीस चंदरसिंग हा नेटिव्ह ॲडज्युटंट आहे असें सांगितलें होतें. मग अशा बड्या अंमलदारास खालीं रस्त्यावरच भटकत कां ठेविलें ?

इकडे अंताजीनें त्या दोघां सुभेदारांची व दिवाणाची भेट करून दिली. नंतर दिवाणानें चाकरास दरवाजा बंद करण्यास सांगितलें. [दरवाजा बंद

करण्याचें काय कारण होतें ?] गोविंदराव दिवाणानें त्या सुभेदारांना बसावयास सांगितलें. गोष्टी सुरू झाल्या. रेसिडेंट साहेबांना पाहून सुभेदारांची कशी गाळण उडाली, व ते वाड्यांतून गडबडीनें कसे निसटले, याचें अंताजीनें रसभरीत वर्णन केलें. त्यावर भिण्याचें कांहीं कारण नाहीं, असें दिवाण म्हणाले. व आणखीही म्हणाले कीं, रेसिडेंट व महाराज यांच्यामध्यें आतां सख्यभाव उरलेला नाहीं. तयारी चालू आहे. सुभेदारांनीं पलटणें वश करून घ्यावीं. पलटणें आम्हांस येऊन मिळाल्यास, सुभेदारांना मोठ्या हुद्याची बढती देण्यांत येईल. याप्रमाणें बोलणें चाललें असतांना शिंद्यांचा वकील आल्याची वर्दी नोकरानें येऊन दिवाणांस दिली. तेव्हां दिवाण उठले. सुभेदारांना पानसुपारी देण्यास सांगून दिवाण निघून गेले. जातां जातां अंताजीस म्हणाले कीं, सुभेदारांची व महाराजांची भेट करून द्या.

या प्रवेशांत सुभेदारांच्या भितीचा फार्स कां बरें घालण्यांत आला असावा ? दिवाणांच्या वाड्यांत सुभेदार गेले होते, तर बाहेरून न दिसतां बसतां येण्यासारखी जागा तेथें नव्हती कीं काय ? दिवाणाचें घर म्हणजे चावडी नव्हे ! पण एखाद्या नाटककाराप्रमाणें हा सीन [देखावा] कां बरें दाखविण्यांत आला ? कदाचित् रेसिडेंट साहेब व महाराज हें दृष्टीस पडले होते, असें सांगण्यास मिळावें, म्हणून हा भीतीचा, व पळापळीचा उल्लेख जबान्यांत करण्यांत आलेला आहे. हेतु हा कीं, रेसिडेंट साहेबांना वाटावें, कीं हे लोक खरोखरच गेले होते. कारण त्यांनीं आपणांस व महाराजांस पाहिलेलें सांगतात. मग बाकीचें खोटें कसें सांगतील ? **महाराजांच्या दुर्दैवानें त्यांच्या शत्रूच्या या कपटास रेसिडेंट लॉडविक हे बळी पडलेही.** नाहींतर दुसऱ्याच दिवशीं रेसिडेंट कर्नल लॉडविक यांनीं मुंबईसरकारास जें पत्र लिहिलें, त्यांत या हलकट, नीच सुभेदारांना **'अत्यंत सन्माननीय'** (of greatest respectability) अशा प्रकारचें प्रशंसापत्र खास दिलें नसतें !

याच कथानकांतील दुसरा लक्षांत घेण्यासारखा विशेष हा कीं, रेसिडेंटास दिवाणांच्या वाड्यांतून पाहतांच ज्यांना कांपरें सुटलें, व गडबडीनें पळतां भुई

थोडी, अशी ज्यांची स्थिती झाली, ते भ्याड अंमलदार पलटणें फितूर करतात कसलीं ? त्यांचा पुरुषार्थ व त्यांची अक्कल ही गोविंदराव दिवाणांस ओळखतां आली नसती काय ? शिवाय तिसरी गोष्ट अशी कीं, इतक्या महत्वाच्या कामासाठीं जर खरोखरच या सुभेदारांना बोलावून आणलें असतें, तर शिंद्याचा वकील आला, या निरोपासरशींच या सुभेदारांना घालवून देण्यांत आलें नसतें. व महाराजांची भेट करून देण्याचें काम अंताजीसारख्या यःकश्चित् माणसास खास सांगण्यांत आलें नसतें. सारांश हें सारें कथानक कसें लबाडीचें आहे, हें वाचतां वाचतां वाचकांच्या लक्ष्यांत येईल.

अंताजी त्या सुभेदारांना घेऊन राजवाड्याकडे गेला. वाड्याच्या बाहेरल्या अंगास गोविंदराव दिवाण महाराजांशीं कांहीं बोलत असल्याचें सुभेदारांच्या दृष्टीस पडलें. महाराजांना पाहतांच सुभेदारांनीं मुजरे केले. महाराजांनीं ते मुजरे स्विकारल्यासारखें दाखविलें. महाराजांना मुजरे करून सुभेदार परतले, व आपल्या लाईनींत येऊन दाखल झाले. त्यानंतर त्यांनीं हा वृत्तांत आपल्या अधिऱ्यांना विदित केला. कॅप्टन लिडेल यांनीं त्यांच्या जबान्या लिहून घेतल्या व त्यांच्या नकला ता. २२-७-१८३६ च्या पत्रासोबत रेसिडेंट लॉडविक यांनीं मुंबईसरकारकडे रवाना केल्या !

हा या नाटकाचा प्रथमाङ्क झाला. घटकाभर हें खरें धरलें, तरी अंताजीस सदर सुभेदारांपैकीं फक्त शिवगुलामसिंगास बोलावून आणण्याचें काम सांगितलें होतें, या गोष्टीस तरी पुरावा काय ? बाळाजी नातू आदि कम्पूच्या प्रेरणेनें, व इंग्रज अधिकाऱ्यांच्या मसलतीनें अंताजीनें सुभेदाराकडे प्रवेश मिळविला असावा, व त्यांना घेऊन दिवाणाच्या वाड्याकडे गेला असावा. पुढें या लबाड त्रिकूटानें थापबाजी करून दिवाणांचे देवडीपर्यंत प्रवेश मिळविला असणार, असा तर्क केल्यास तें गैर म्हणतां येणार नाहीं. ते दिवाणांच्या वाड्याच्या देवडीपर्यंत गेले, एवढ्या या गोष्टीवरून त्यांना दिवाणानें बोलाविलें होतें, अगर आमंत्रण पाठविलें होतें, असें म्हणतां येणार नाहीं. गोविंदरावानें आमंत्रण दिलें असतें, तर भयाभीत होऊन पळून जाण्याचा प्रसंग त्यांचेवर खास येता ना. तसें असतें तर शिंद्याचा वकील

आल्याच्या खबरीवर गोविंदरावानें त्यांना ताबडतोब निरोप दिला तसा निरोपही पण दिला नसता. तसेंच दिवाणानें महाराजांच्या सांगण्यावरून जर शिवगुलामसिंगास बोलावलें असतें, तर महाराजांकडे त्याची शिफारस केली असती. नुसता मुजरा करून परत जाण्याचा प्रसंग त्याजवर आला नसता हें खास. महाराजांनीं त्यांना बोलावलें असतें, तर त्यांनीं या सुभेदारांना आपल्याजवळ बोलावलें असतें. त्याच्याशीं चार गोष्टी केल्या असत्या. जातांना त्यांना पानसुपारी देण्यास सांगितलें असतें. परंतु सुभेदारांच्या बाबतींत तें कांहीं नाहीं. यावरून या कथानकाची सत्यासत्यता कळून येणार आहे! हा सारा धडधडीत खोटा प्रकार प्रतापसिंहमहाराजांना, व गोविंदराव दिवाणांना फितुरीच्या आरोपाच्या जाळ्यांत अडकविण्यासाठीं बनविण्यांत आला होता असें म्हणणें रास्त होणार नाहीं काय?

आतांपावेतों झाल्या प्रकाराचा हा एक अंक झाला. पुढील दुसऱ्या अंकांतील भानगडी म्हणजे रेसिडेंटसाहेबांचें पत्र, व त्यास गव्हर्नरसाहेबांकडील उत्तर; म्हणजे गेल्या प्रकरणांत उल्लेख केलेलें गव्हर्नरसाहेबांचें रेसिडेंटसाहेबांस गुप्त पत्र. आतांपावेतों झाल्या त्या सगळ्या भानगडी गव्हर्नरसाहेबांना 'खात्रीलायक पक्का पुरावा' म्हणून महाराजांविरुद्ध उपयोगी पडतील असें वाटेना. अशा प्रकारें खुद्द सूत्रधारासच वाटूं लागलें कीं, सुभेदारांच्या वरील जबान्यांनीं कांहीं एक गुन्हा शाबीद होणार नाहीं. सुभेदारांच्या तोंडून वदवलेली गोष्ट अगदीं असंभाव्य आहे. असल्या गोष्टीवर वरिष्ठ सरकारचा विश्वास बसणें शक्य नाहीं, व त्यामुळें आरोपीवर शिंतोडा उडूं शकत नाहीं. असा विचार मनांत आल्यावर मग पुनः नव्या रचनेस सुरवात झाली. व पुढील दुसऱ्या अंकांत मागच्या चुका सुधारण्याचा यत्न करण्यांत आला.

ता. २५–७–१८३६ रोजीं अंताजी पुनः सुभेदारांकडे गेला व त्यांस भेटून म्हणाला; " तुम्हांस पाहून महाराज फार खुष झाले आहेत. तुम्हांस 'मेजवानी देण्याबद्दल' गोविंदराव दिवाणांस महाराजांनीं हुकूम केला आहे." आणखीही म्हणाला " दक्षिणी व कर्नाटकी ब्राह्मणांना निरनिराळ्या ठिकाणीं (महाराजांनीं) पाठविलें असून, त्यांच्याकरवीं निरनिराळ्या संस्था-

निकांना आपआपल्या राज्यांतील इंग्रज फौज फितुर करण्याबद्दल कळविण्यांत आलें आहे. व त्या अनुरोधानें व्यवस्था करण्यांत आली आहे. " या भेटींत विशेष महत्त्वाचें कांहींही झालेलें नाहीं.

त्यानंतर ता. ३१–७–१८३६ पावेतों सर्वत्र स्थिरस्थावर होतें. गव्हर्नर साहेबांकडून पत्र आलें नसल्यामुळें, इतक्या अवधींत गप्प बसणें हें या कपट-नाटकांतील पात्रांना भाग पडलें असावें. ता. ३१–७–१८३६ रोजीं पुनः अंताजी ब्राह्मण मिलिटरी लाईन्समध्यें गेला. सुभेदारांना गांठून म्हणाला, ' महाराजांनीं व दिवाणांनीं तुम्हांस भेटण्यास बोलावलें आहे. ता. ५–८–१८३६ रोजीं वेष बदलून भेटावयास या. अंताजी व सुभेदार यांच्या दरम्यान वरीलप्रमाणें ता. ५–८–१८३६ रोजीं महाराजांची भेट घेण्याचें निश्चित ठरलें. परंतु ठरल्याप्रमाणें ता. ५ रोजीं अंताजी त्यांना न्यावयास मात्र आला नाहीं. पुढें सबंध आगष्ट महिन्यांत अंताजी सारा एकच वेळ सुभेदारांच्या दृष्टीस पडला. त्यावेळीं अंताजीनें फसविल्याबद्दल सुभेदारांनीं त्याची खूप निर्भत्सना केली. त्यावर निरवानिरव करण्याच्या इराद्यानें अंताजी म्हणाला, " मी काय करणार उदेपूरचा वकील वारल्यामुळें महाराज फार हवालदील झाले आहेत. शिवाय पाऊसही फार पडत होता म्हणून येतां आलें नाहीं. " अशा प्रकारें बतावणी करून अंताजीनें त्यांची समजूत केली !

ता. ८-९-३६ रोजीं अंताजी पुन्हां सुभेदारांना भेटावयास गेला. शिवगुलामसिंग घरीं नव्हता, म्हणून अंताजी गुल्जार मिश्राकडे गेला. तेथें त्यास शिवगुलामसिंग रेसिडेन्सींत पाहाऱ्यास गेला आहे, असें समजलें. अंताजीनें त्यानंतर गुल्जार मिश्रास सांगितलें कीं, महाराजांनीं आज तुम्हांस भेटावयास बोलावलें आहे. आज न आल्यास पुढें मग लवकर भेटण्याची संधि तुम्हास मिळणार नाहीं. सुभेदार गुल्जार मिश्रानें अंताजीस तेथेंच बसवून तो सुभेदार शिवगुलामसिंगास भेटण्यास रेसिडेन्सींत गेला. तेथें शिवगुलामसिंगास भेटून त्यानें अंताजी आल्याचें व महाराजांकडून आजचें आज येण्याचें आमंत्रण आलें असल्याचें सांगितलें. उभयतांनीं मसलत करून सु. शिवगुलामसिंगानें आजारी

असल्याचें निमित्त करून रजा मिळवावी असें ठरविलें. त्याप्रमाणें आजाराचें ढोंग करून शिवगुलामसिंग रजा मागण्यास रेसिडेंटसाहेबाकडे गेला. रेसिडेंट-साहेबांना या थोर अब्रूदार अंमलदाराचें म्हणणें खरें वाटलें नाहीं, व त्या-प्रमाणें त्यानें म्हणूनही दाखविलें. अखेर शिवगुलामसिंगानें महाराजांकडे फितुर प्रकरणीं भेटीस जात आहों. असें सांगितलें मग मात्र सुभेदार शिव-गुलामसिंगास ताबडतोब रजा देणें रेसिडेंट लॉडविक यांस भाग पडलें. कारण रेसिडेंटसाहेबांस वरिष्ठांकडून तसें सांगणें असणार !

रजा मिळाल्यावर संध्याकाळीं सूर्यास्ताचे सुमारास अंताजी त्या सुभेदारांना घेऊन शहराकडे निघाला. नंतर ही त्रैमूर्ती परशराम गांध्याच्या दुकानांत येऊन दाखल झाली. हा परशराम अंताजीचा पुतण्या होता. दोघांही सुभे-दारांना दुकानांत बसवून अंताजी दिवाणांच्या वाड्याकडे गेला. अर्ध्यापाऊण तासानें तो परत आला व म्हणाला दिवाणांच्या वाड्यांत सध्यां माणसांची वर्दळ फार आहे. थोडा वेळ थांबूं, व मग प्रवेश मिळाला तर पाहूं. थोड्या वेळानें अंताजी पुनः दिवाणांचे वाड्याकडे गेला. तो सुमारें ८ वाजतां परत आला. येतांना त्यानें दोन युरोपियन पद्धतीचे झगे आणले व ते त्यानें परश-रामजवळ दिले. व तो पुनः दिवाणांच्या वाड्यांत गेला. तो पावणेनवाच्या सुमारास परत आला. दरम्यानच्या वेळांत सुभेदारांनीं वेषांतर केलें, व ते पुढील प्रसंगास तयार होऊन राहिले. नंतर ते तिघेही दिवाणांच्या वाड्यांत सव्वानवाचे सुमारास, शिरले. व झोंपण्याच्या एका खोलींत चोरासारखे लपून राहिले. कांहीं वेळानें दिवाण आले व त्यांना म्हणाले कीं, महाराजांची भेट झाल्यावर " महाराज सांगतील त्याप्रमाणें वागण्यास आम्ही तयार आहों " येवढेंच फक्त बोलावयाचें. सुभेदारांनीं तें कबूल केलें. हें बोलणें चाललें आहे, तोंच नागपूरच्या माजी राजाचा कोणी एक नातलग तेथें दिवाणास भेटण्यास आला. त्यास पाहतांच एका सुभेदारानें घाबरल्याचें ढोंग केलें. दिवाणांनीं त्यास आश्वा-सन देऊन भिण्याचें कारण नाहीं, असें सांगितलें. सुभेदाराची ती अवस्था पाहून त्याची प्रशंसा करावी म्हणून तो नागपूरकर इसम म्हणाला, " **परदेशी लोक**

मोठे इमानी (?) नागपूरच्या राजास पळून जाण्यास इंग्रजाच्या पदरच्या २ परदेशी सुभेदारांनीं मदत केली. व अखेर ते राजाबरोबरच पळून गेले." अशाप्रकारें त्या सुभेदारांशीं बोलून, सुभेदारांना तेथेंच बसवून ठेवून, गोविंदराव दिवाण व नागपूरकर इसम असे बाहेर गेले. नंतर थोड्या वेळानें गोविंदराव परत आले व अंताजीस म्हणाले, " तूं सुभेदारांना घेऊन ये. मी पुढें जातों व महाराज एकटे आहेत कीं काय तें पाहतों." असें म्हणून गोविंदराव तेथून गेला. अंताजीही सुभेदारांना वेषांतर केलेल्या स्थितींत बरोबर घेऊन निघाला. वाड्याच्या दरवाज्यांत आल्यावर अंताजी पुढें व साहेबी पोषाखांतील सुभेदार मागें, असे वाड्यांत शिरले. पहारेकऱ्यांनीं त्यांना आंत जाण्यास मज्जाव केला नाहीं. तेथें दिवाण त्यांची वाट पहात होते. त्यांनीं त्यांना वरच्या खोलींत नेलें. तेथें महाराज हुक्का पीत बसले होते. शेजारी एक बाई बसली होती. ही मंडळी गेल्यावर तिला महाराजांनीं दुसरीकडे जाण्यास सांगितलें. त्यावरून ती निघून गेली.

सुभेदारांनीं खोलींत प्रवेश केल्यावर महाराजांना लवून मुजरे केले. महाराजांनीं त्यांच्या मुजऱ्यांचा स्वीकार करून मागील खेपेस सुभेदारांनीं मुजरे केले होते, त्या गोष्टीचा उल्लेख केला. नंतर सुभेदार म्हणाले " महाराजांची काय आज्ञा आहे?" त्यावर आपणच महाराज प्रतापसिंह आहों हें पटवून देण्यासाठीं महाराजांनीं पुढील प्रमाणें ४ गोष्टींची माहिती सांगितली. त्या ४ गोष्टि अशा.

१ मुंबई शहरामधील गडबड. २ हैद्राबादेहून सातारला इंग्रजी फौज आली ती. ३ बेलापूर (जि. विजापूर) येथील गडबड. ४ उत्तर हिंदुस्थानांतील फौज नर्मदेच्या दक्षिण तीरावर आली ती.

या चार गोष्टींचा उल्लेख केल्यानंतर महाराज म्हणाले, "आमचा मुलूख व आमची संपत्ति इंग्रजांनीं हरण केली आहे. कर्नल लॉडविक रेसिडेंट विलायतेस जाणार आहेत, अगर त्यांची मुंबई किंवा कलकत्ता येथें बदली होणार आहे." ह्यानंतर आपण रजपूत (क्षत्रिय) आहों, बम्मण नाहीं याबद्दलहि उल्लेख केला.

महाबळेश्वर येथील शिपायांच्या बराकी पूर्वीच्या ठिकाणाहून आपण दुसरीकडे कां नेल्या याबद्दल खुलासा करून महाराज मुद्याकडे वळले. ते म्हणाले " तुमच्या विश्वासांतले जे लोक असतील, ते वश करून घ्या. त्याबद्दल तुम्हाला चांगलें बक्षीस देऊं. " येणेंप्रमाणें संभाषण झाल्यावर सुभेदार शिवगुलामसिंगानें आपलें शिरोभूषण काढून तें महाराजांच्या पायांवर ठेविलें. व आपल्या वरिष्ठांना या गोष्टी कळूं देऊं नका, अशी महाराजांस प्रार्थना केली. त्यावर महाराजांनीं त्यांना तसें अभिवचन दिलें; व पानविडे देण्यास सांगून त्यांना निरोप दिला. परत वाड्याबाहेर पोंचविण्यासाठीं सोबत एक नोकर दिला. त्याच्याबरोबर ते परशराम अताराचे दुकानांत गेले. तेथें युरोपियन पद्धतीचे पोषाख होते ते उतरून पहिले कपडे चढवून १० वाजतां हे सुभेदार कँपांत येऊन दाखल झाले, व ॲडज्युटंट यांस भेटून त्यांनीं झालेली सर्व हकिगत सांगितली व महाराजांकडील विडे त्यांचे हवालीं करून घरीं गेले. दुसरे दिवशीं त्यांच्या जबान्या घेण्यांत आल्या.

या दिवसाची हकिगतही बनावट आहे असें आम्हांस वाटतें. खरें पाहिलें, तर या सुभेदारांना वेषांतर करण्याचें काय कारण होतें ? ते सरळ साध्या पोषाखांत जाते, तर त्यांना महाराज भेटले नसते कीं काय ? त्यांना कसली भीति वाटत होती देव जाणे ! दुसरें असें कीं, महाराजांना भेटण्यास त्यांना रात्रीं कसें जातां आलें. रात्रीं कॅम्प सोडून अमलदारांना राहतां येत नाहीं. तेव्हां अशा भलत्याच वेळीं भेटावयास या असा महाराजांनीं तरी सल्ला कसा दिला असेल ? आम्हांस वाटतें सुभेदारांना हा भेटीचा वेळ ठरवून देण्यांत मुख्य नाटककाराची झालेली चूक स्पष्ट दिसत असून त्यावरूनही हा प्रकार बनावट असल्याचें शाबीत होत आहे.

प्रतापसिंहमहाराजांची ओळख वाचकांना आतांपर्यंत चांगलीच होऊन चुकली आहे. या महाराजांसारखा हुशार, राजकारणी पुरुष सुभेदार शिवगुलामसिंग व गुल्जार मिश्र यांना आपण महाराज आहोंत, असें पटवून देण्याचा खुळचट प्रयत्न करतील हे अगदींच असंभवनीय आहे. शिवाय या कपट-

नाटकांतील महाराज मात्र अचळपचळ बोलत होते. तर सुभेदार महाराजांना कांहींच सांगत नव्हते. सुभेदारांनीं होकारही दर्शविला नाहीं. अमके शिपाई महाराजांकडे आणतां येतील, वगैरे कांहीं नाहीं. या साऱ्या गोष्टींचा विचार केला म्हणजे ही हकिगत साफ बनावट आहे हें पूर्णपणें लक्ष्यांत येईल. याशिवाय या प्रसंगासंबंधानें या सुभेदारांच्या ज्या जबान्या झाल्या, त्यांमध्यें इतका भयंकर गैरमेळ आहे कीं, त्यावरून देखील ही कादंबरी कशी बनावट आहे हें पटतें. असो.

वरील प्रसंगानंतर ता. १४ सप्टेंबर १८३६ रोजीं अंताजी पुन्हां सुभेदारांकडे गेला, व म्हणाला, " महाराज तुमचेवर फार खूष झाले आहेत व गांवाशेजारील बागेंत तुम्हांस मेजवानीस आमंत्रण देणार आहेत. " सुभेदारांनीं तें मेजवानीचें आमंत्रण स्वीकारलें नाहीं. त्यांनीं सुचविलें कीं, महाराजांनीं कांहींतरी खूण आपणांस द्यावी. त्यावर अंताजीनें सांगितलें कीं, दसऱ्याचें दिवशीं महाराज आपल्यास शेलापागोटें करतील. याप्रमाणें बोलणें झाल्यावर अंताजी पुन्हां परत शहरांत गेला.

या प्रसंगांतील मेजवानीचें आमंत्रण नाकारण्यांत सुभेदारांचा काय हेतु होता, हें कळत नाहीं. मेजवानीऐवजीं खुणेची वस्तू देण्याबद्दल जें सुचविण्यांत आलें, तें मात्र योग्य होतें. त्याबद्दलचा इतिहास वाचकांना पुनः सांगण्याची आवश्यकता नाहीं. सर राबर्ट ग्रँट यांचें कर्नल लॉडविकसाहेबांना आलेलें पत्र पान १७७ वर दिलें आहे. त्यावरून वाचकांना या सुभेदारांचे व फितुराच्या आरोपाचें स्थूल स्वरूप कळून चुकणार आहे. दसऱ्याचे दिवसाशिवाय महाराजांकडून सुभेदारांना शेलापागोटें मिळण्याची संधि कां बरें नसावी ? यावरून महाराजांची भेट व महाराजांची ' खुणी ' या गोष्टी खोट्या होत्या हें साधारण अनुमानानेंच सिद्ध होत नाहीं कां ? याप्रमाणें हे दोन अंक झाले. आतां तिसरा अंक पाहूं.

यांत अंताजीचा चुकारपणा पहावयास मिळतो. कारण पुढें बरेच दिवस अंताजी सुभेदाराकडे आला नाहीं. त्यामुळें सुभेदारांना त्याचा शोध लावण्यासाठीं चंदरसिंगास बरोबर घेऊन परशरामाच्या दुकानीं

जावें लागलें. ता. २७।९।३६ रोजीं संध्याकाळीं ते परशरामाच्या दुकानीं गेले. बराच तपास केल्यावर अंताजी त्यांस सांपडला. अंताजीनें सांगितलें कीं, महाराजांनीं व दिवाणांनीं सुभेदारांची भेट घेऊं नकोस, असें बजावलें आहे, म्हणून वारंवार येत नाहीं. त्यांवर सुभेदारांनीं त्यास दिवाणाकडे नेण्यास सांगितलें. अंताजी दिवाणांचे वाड्यांत गेला व १५ मिनिटांनीं परत येऊन म्हणाला कीं, दिवाण कामांत आहेत. आतां भेट होणार नाहीं. सुभेदारांनीं फार आग्रह केल्यावर, अंताजी पुनः दिवाणांचे वाडयांत गेला. तो तासभर वेळ झाला तरी परत येईना. तेव्हां सुभेदारांनीं एका मुलाकडून परशरामास बोलावून आणलें, व त्यास दिवाणांचे वाडयांत पाठविलें. परशराम वाडयांतून परत आला व सुभेदारांना म्हणाला कीं, त्या दिवशीं दिवाणांची गांठ पडणें शक्य नाहीं. सुभेदारांनीं पुनः गुरुवारीं परत यावें म्हणजे भेट होईल." अशा प्रकारें विन्मुख होऊन सुभेदार परत आले व झालेली हकिकत त्यांनीं ॲडज्युटंटास सांगितली.

महाराज सुभेदारांवर खूष झाले होते, व फितुर करण्याच्या कामीं त्यांची महाराजांनीं दिवाणातर्फे निवड केली होती, तर दिवाणांच्या वाडयांतही बिचाऱ्यांचा प्रवेश होऊं नये! २-२ वेळां प्रयत्न करूनही दिवाणांनीं त्यांची गांठ घेऊं नये? या प्रकारावरून एकच गोष्ट सिद्ध होते, ती ही कीं, दिवाणांची व सुभेदारांची कधींच भेट झाली नव्हती. कांहीं ना कांहीं निमित्तानें दिवाणांच्या वाडयांत शिरून त्या वाडयाची यथार्थ कल्पना मिळविण्यासाठीं सुभेदार आपला साथीदार अंताजी याच्या करवीं प्रयत्न करीत होते. महाराजांना संकटांत पाडण्यासाठीं जें जाळें विणलें जात होतें, त्यांचे धागे दोरे तयार करण्यासाठीं हा सारा खटाटोप चालला होता असें म्हटलें तर तें मुळींच अतिशयोक्तीचें होणार नाहीं.

पुन्हां ता. २९-९-३६ रोजीं सुभेदार परशरामाचे दुकानीं गेले. तेथें अंताजीची चौकशी केली. तो भेटला नाहीं, म्हणून त्याचा शोध काढण्यासाठीं घरीं गेले. तों अंताजी वाईस गेल्याचें कोणी सांगितलें, तर कोणी कांहीं

निराळेंच सांगितलें. अंताजीची गांठ पडण्यासाठीं सुभेदारांनीं शिकस्त केली पण त्यांच्या खटपटीस यश आलें नाहीं अखेर निराशा होऊन ते परत आले.

पुढें ले. स्टोकनें अंताजीचा तपास लावण्यासाठीं चंदरसिंग हवालदारास सांगितलें. चंदरसिंगास फिरतां फिरतां अंताजी अचानक सांपडला. तेथून आडबाजूस जाऊन चंदरसिंग व अंताजी बराच वेळ बोलत बसले. अंताजी म्हणाला महाराजांना सोलापूराहून एका मित्राचें पत्र आलें आहे. तेव्हांपासून महाराज फार हवालदील झाले आहेत. सुभेदारांना भेटावयास आपण तयार आहों, असें अताजीनें चंदरसिंगास सांगितलें व म्हणाला कॅम्पानजीक चौकी आहे. तेथें ते आल्यास मी त्यांना भेटेन असें कळवा. याप्रमाणें संभाषण झाल्यावर चंदारसिंग परत गेला.

चंदरसिंगाच्या सांगण्याप्रमाणें सुभेदार संकेतस्थळीं गेले. पण अंताजीची व त्यांची गांठ पडली नाहीं. त्यावर सुभेदार चिडले, व बराच वेळ वाट पाहून तपास काढण्यासाठीं त्यांनीं परशरामाच्या दुकानीं चंदरसिंगास पाठविलें. अंताजी त्या ठिकाणीं होता. त्यास पहातांच चंदरसिंगानें सुभेदारांना बोलाविण्यासाठीं एक इसम पाठविला. सुभेदार त्या ठिकाणीं जाऊन अंताजीस भेटले. त्यानंतर इंग्रजसरकारविरुद्ध द्रोही असें बराच वेळ संभाषण झालें. सोलापूराहून मि. हँड यांचें महाराजांना पत्र आलें आहे. व त्यामुळें महाराज हवालदील झाले आहेत. वगैरे हकीगत अंताजीनें सुभेदारांना सांगितली. त्यानंतर सुभेदार कॅम्पांत परत गेले. ले. स्टोकची भेट घेऊन झालेला वृत्तांत त्यांनीं ले. स्टोक यास विदित केला. त्यानंतर पुन्हां त्यांच्या जबान्या घेण्यांत आल्या.

या प्रवेशांत दिवाणांच्या अगर महाराजांच्या भेटीचा यत्न नाहीं, ही गोष्ट लक्ष्यांत घेण्यासारखी आहे. अंताजीच्या भेटीची उत्सुकता सुभेदारांना, तर त्यांची गांठ पडूं नये म्हणून अंताजीचा प्रयत्न. याही बाबी विचार करण्यासारख्या आहेत.

आतां चौथ्या अंकास सुरवात ता. ७–१०–१८३६ रोजीं झाली. या दिवशीं सुभेदार अंताजीची शिकार करण्यास निघाले. अंताजीला त्यांनीं वाटेंत

गांठलें. अंताजीबरोबर इकडल्या तिकडल्या गोष्टी केल्यावर, त्यास म्हणाले एक छानदार दुभती गाय विकावयाची आहे. दूध फार देते. मालक बदलून जाणार आहे. सबब तो थोड्या किंमतीस विकत देईल. तुम्ही घेत असल्यास आपण मध्यस्ती करून सौदा पटवून देऊं. अंताजीला लोभ सुटला, व तो त्यांच्याबरोबर कॅम्पांत गेला. त्याला बिचाऱ्याला या "सच्चा" "अब्रूदार" सुभेदारांचा संशय कसा यावा ? निःशंकपणें अंताजी सुभेदारांबरोबर कॅम्पांत गेला. तेथें जाऊन पोंहोचल्यावर त्यास अटक करण्यांत आली. गरीब बिचारा ब्राह्मण ' **कंकणस्य तु लोभेन**—या हितोपदेशांतील गोष्टीप्रमाणें या 'वाघाची'-च शिकार झाली. तरी देखील त्याच्या गुरुजींनीं त्याला धीर दिला. त्या धीराच्या जोरावरच तो आल्या प्रसंगास तोंड देत होता. अंताजीस कैद केल्यावर, रेसिडेंट लॉडविक यांनीं महाराजांना पत्र लिहून दिवाणावर व व परशरामावर कोणकोणते आरोप ठेवले आहेत तें कळविलें. व त्यांना ताबड-तोब कैद करून पाठवून देण्यास सांगितलें. रेसिडेंटसाहेबाचें पत्र मिळतांच यत्किंचित्‌ही वेळ न लावतां महाराजांनीं दोघांही आरोपींस कैद करून रेसि-डेंटाकडे पाठविलें. गोविंदराव दिवाणाबरोबर बरेच लोक रेसिडेन्सीपावेतों गेले होते. त्यांपैकींच गोविंदरावाच्या एका नोकराकडे बोट दाखवून "याच इसमानें पहिल्या भेटीच्या वेळीं आपणांस विडे दिले." असें सुभेदार शिवगुलामसिंगानें सांगितलें. त्यावरून त्या इसमास तेथल्या तेथें अटक करण्यांत आली.

न्यायमनसुबा न करितां गोविंदराव दिवाणास रेसिडेन्सीशेजारीं एका दारूच्या कोठारांत कोंडून ठेवण्यांत आलें.

आतांपर्यंत दिली ती हकिगत कंपनीसरकारच्या स्पेशल सीक्रेट कमिटीनें आपल्या रिपोर्टांत जी कटाची हकिगत म्हणून वर्णन केली आहे, तीच हकि-गत यत्किंचित् फरक न करतां दिली आहे. व त्याच हकिगतीवरून ती कशी बनावट व खोटी आहे, तें ठिकठिकाणीं थोडक्यांत टीका करून विशद करण्याचा प्रयत्न केला आहे.

आतां गोविंदराव दिवाणाची व कटाच्या अस्तित्वाची चौकशी ज्या स्पेशल

गुप्त कमिटीपुढें झाली. त्या कमिटीच्या रचनेसंबंधानें, तिच्या कार्यपद्धतिसंबंधानें व तिनें घेतलेल्या पुराव्यासंबंधानें पुढील प्रकरणांत विचार करावयाचा असल्यामुळें हें प्रकरण येथें संपविणें इष्ट आहे.

प्रकरण १९ वें.

" स्पेशल सिक्रेट कमिशन. "

मागील प्रकरणांत वर्णन केल्याप्रमाणें साताऱ्यांत फितूराचा प्रयत्न चालला आहे, व त्यासंबंधानें दोघां ' अब्रूदार ' व ' सच्च्या ' अंमलदारांचे जबाब घेऊन त्यांच्या नकला सोबत ठेवून ता. २२ जुलै १८३६ रोजीं कर्नल लॉडविक यांनीं गव्हर्नरसाहेबांना पत्र पाठविलें तें वाचकांच्या स्मरणांत असेल. या पत्राच्या व त्यानंतरच्या पत्रांचा आधार देऊन, प्रतापसिंहमहाराजांवर रुष्ट झालेल्या मुंबईच्या गव्हर्नर सर रॉबर्ट ग्रँट यांनीं, कोर्ट ऑफ डायरेक्टर्सच्या गुप्त कमिटीला पत्र लिहिलें. या पत्रांत साताऱ्यांत व इतरत्र ब्रिटिशांचीं एतद्देशीय पलटणें फितूर करून, बंडावा करून कंपनीसरकारचा अंमल हिंदुस्थानांतून नाहींसा करण्याचा कट होत असून, सातारच्या महाराजांनीं १८१९ च्या तहाच्या कलमांचें उल्लंघन करून इतर संस्थानिकांशीं व परकीय सत्तेशीं संगनमत करण्याचे उद्योग आरंभिले आहेत, व अशा प्रकारें कंपनी सरकारशीं बेइमानगिरी केलेली आहे, वगैरे मजकूर गुप्त कमिटीस कळविला होता. अर्थात् कोर्ट ऑफ डायरेक्टर्स यांचें मत महाराजांसंबंधानें कलुषित करावें यासाठीं हा बुद्धिपुरःसर खोडसाळ प्रयत्न करण्यांत आलेला होता.

महाराजांवर जो फितुराचा म्हणून पुरावा करण्यांत आला तो मागील प्रकरणांत आम्ही सविस्तर दिला आहे. हा पुरावा बनावट होता हें त्या पुराव्यावरून दिसून येणार आहेच. शिवाय जॉन ब्रिग्ज व इतर पुष्कळ

इंग्रजांनीं देखील हा सारा बनावट पुरावा बाळाजी नातू यानें तयार केला असें निर्भीडपणें म्हटलें आहे. असो.

अंताजी वाघ भटजी, त्याचा भाचा परशुराम व गोविंदराव दिवाण यांना कैद केल्यावर रेसिडेंट कर्नल लॉडविक यांनीं तें वर्तमान गव्हर्नरसाहेबांस ता. ७।१०।३६ च्या पत्रानें कळविलें. अर्थात् ही गोष्ट कळतांच गव्हर्नरसाहेबांच्या मनांत आनंदाच्या उर्मी उठल्या. व रेसिडेंटास पत्र लिहून त्यांनीं त्याप्रमाणें कळविलें. या पत्रांत गव्हर्नरसाहेबांनीं आरोपींना दूरदूर ठेवण्याबद्दल, आरोपींच्या घरांची झडती घेण्याबद्दल व कांहीं कागदपत्र सांपडल्यास ते जप्त करण्याबद्दल सूचना केली होती.

अंताजी व गोविंदराव यांची चौकशी करण्यासाठीं म्हणजे पर्यायानें महाराजांवर फितुराचा आरोप शाबीत करण्यासाठीं गव्हर्नरसाहेबानीं एक गुप्त कमिशन नेमिलें. या कमिशनचे सभासद (१) रेसिडेंट कर्नल लॉडविक, (२) ले. कर्नल ओव्हॅन्स व (३) मिस्टर विलोबी असे तिघेजण होते.

न्यायाधीश, फिर्यादी व आरोपी हे भिन्न असावे लागतात; पण या कमिशनच्या घटनेचा विचार केला, तर फिर्यादी तेच न्यायाधीश. अशा परिस्थितींत फिर्यादीचें म्हणणें तेंच जज्जमेंट असा प्रकार ठेवलेला. अशा या प्रकाराला कधीं कोणीं न्याय म्हटलें आहे काय ? गोविंदरावास अटक केली. रेसिडेंटानीं. सुभेदार शिवगुलामसिंग व गुल्जार मिश्र यांना सच्चेपणाचे आगाऊ सर्टिफिकेट देवून बसलेले रेसिडेंटच. साताऱ्यांत ब्रिटीश सैन्य फितूर करण्याचे प्रयत्न चालले आहेत, असें कळविणार रेसिडेंटच. व तेच या गोष्टींचा न्याय करणारे मग न्याय काय होणार हें कोणीही सांगू शकेल !

वरील गोष्ट झाली ती कर्नल लॉडविकसाहेबांची. आतां दुसरे कमिशनर मि. विलोबी. हेही कमिशनर म्हणून न्याय करण्यास पूर्णपणें नालायक होते. कारण मि. विलोबी हे गव्हर्नरसाहेबांचे सेक्रेटरी होते. त्यामुळें गव्हर्नरसाहेबांच्या कलाप्रमाणें त्यांना मत देणें भाग होतें; त्याशिवाय मि. विलोबी यांना महाराजांची भीति वाटत होती. जहागिऱ्यांच्या बाबतींत महा-

राजांच्या वतीनें डायरेक्टरांनीं जो निकाल दिला होता, तो महाराजांपासून लपवून ठेवण्यांत मि. विलोबी यांचेंच प्रामुख्यानें अंग होतें. डायरेक्टरांकडून कांहींच कळलें नाहीं, म्हणून त्या प्रकरणीं चौकशी करण्यासाठीं आपला वकील पिठावण्याची महाराजांची खटपट चालू होती. महाराजांचा वकील विलायतेस जाता, म्हणजे गव्हर्नरसाहेबांप्रमाणें सेक्रेटरी मि. विलोबी यांच्यावरही ठपका येता. याच कारणांमुळें मि. विलोबी हे महाराजांना सातारच्या गादीवरून दूर करावें म्हणून, जें कारस्थान चाललें होतें, त्यांत सामील झाले होते. किंबहुना आपल्यावरील संकट टाळण्यासाठीं महाराजांना संकटांत लोटणें, त्याचें कर्तव्य बनलें होतें. प्रतापसिंहमहाराजांवर अपराधाची शाबिती करणें व कोर्ट ऑफ डायरेक्टर्सना महाराज अपराधी आहेत व ब्रिटिश सत्ता उलथून पाडण्यास ते उद्युक्त झालेले होते असें भासविलें तरच आपला बचाव आहे या जाणीवेनें मि. विलोबी प्रेरित झाले होते. शिवाय गव्हर्नरसाहेबांप्रमाणें त्यांनाही महाराजांच्या कर्तबगारीचा हेवा वाटत होता, व महाराजांसारखे कर्तृत्ववान् एतद्देशीय राजसत्ताधारी नसतील तर बरें, असें त्यांचेंही मत होतें.

आतां राहिले तिसरे कमिशनर, ले० कर्नल ओव्हॅन्स. हे तर पहिल्या प्रतीचे शठ. कमिशनर म्हणून यांची नेमणूक केली, त्यावेळीं हे मुंबईच्या फौजेचे कार्टर मास्टर जनरल होते. गव्हर्नरसाहेबांनीं कमिशनर म्हणून त्यांची नेमणूक करतांना त्यांना 'सूतोवाच' करून ठेविलें होतें. व गव्हर्नरसाहेबांना खूश करण्यासारखी कामगिरी त्यांनीं केल्यास लवकरच त्यांना सातारचे रेसिडेंट करण्यांत येईल असें अभिवचन दिलेलें होतें. या साऱ्या गोष्टींचा ले० कर्नल ओव्हॅन्सचे बाबतींत विचार केला, तर न्यायाधीश होण्यास तेही कसे नालायक होते हें स्पष्टपणें लक्ष्यांत येणार आहे.

आतां कर्नल ओव्हॅन्स यांच्या सत्यवादित्वाची ओळख त्यांच्या चरित्रावरून होण्यासारखी आहे. एकदां कोल्हापूरकरांशीं इंग्रजांचें युद्ध झालें. त्यामध्यें हे वीर गडकऱ्यांचे तावडींत सांपडले. गडकऱ्यांनीं त्यांना कैद केलें,

व अटकेंत ठेवलें. सुटका करण्यासाठीं या वीरानें गडकऱ्यांची करुणा भाकिली. तेव्हां त्यांनीं या वीरास जें जें सांगितलें, तें तें करण्याचें त्यानें कबूल केलें. गडकऱ्यांनीं त्याच्या वेषावरून हा थोर अंमलदार आहे, वचनास फिरावयाचा नाहीं, अशा विश्वासानें त्याच्या शब्दावर विश्वास ठेवून जीवदान देऊन त्यास मुक्त केलें. व त्याच्या लष्करांत पोहोंचविलें, पण लष्करांत पोहोंल्यावर आपण निर्भय झालों असें दिसून येतांच या बहादुर ओव्हॅन्ससाहेबांनीं गडकऱ्यांना कबूल केलेल्या गोष्टी पार नाकबूल केल्या. 'अशा सत्यप्रेमी ' ओव्हॅन्ससाहेबांना काय विशेषणानें संबोधावें तें वाचक ठरवोत !

अशा प्रकारच्या कमिशनाकडून चौकशी करावयाची म्हणजे गुन्ह्याची शाबिती करण्याचा नुस्ता फार्स करावयाचा. तसें नसतें तर मुंबईसरकारच्या पदरीं कायदेपंडित नव्हते, कीं न्यायाधीश नव्हते ? मुंबईस हायकोर्टाची स्थापना याच्या पूर्वीच झालेली होती. त्या कोर्टाच्या मुख्य न्यायाधीशाची योजना मुंबईसरकारनें केली असती तर काय बिघडलें असतें ? पण मग सर राबर्ट ग्रँटसाहेबांच्या मनाप्रमाणें निकाल कदाचित्, झाला नसता; व तसें होतें, तर त्यांच्या फजितीस पार उरता ना, म्हणून मुंबईसरकारनें केवळ न्यायाचा फार्स करण्यासाठीं आपल्या कक्षेंतल्या उपरी निर्दिष्ट लोकांचें कमिशन नेमिलें.

अशा प्रकारचे न्यायाधीश नेमण्यांत न्यायदेवतेची उघड उघड थट्टा करण्यांत आलेली होती असें कोणासही वाटेल. कारण या कमिशनपैकीं दोघां कमिशनरांनीं आपलीं मतें उघड उघड बोलून दाखविलीं होतीं. रेसिडेंट-साहेबांनीं गव्हर्नरसाहेबांना ता. २२–७–३६ च्या पत्रांत आपलें मत " सातार्‍यांत कट झाला आहे. " असें स्पष्ट कळविलें होतें. त्यामुळें त्यांचें मन पूर्वग्रहदूषित झालेलें होतें, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. मि. विलो-बीनीं डायरेक्टराना कळवितांना रेसिडेंटसाहेबांपेक्षांही जास्त कडक भाषेंत हें कळविलें होतें. अशा प्रकारच्या कमिशननें न्याय कसा केला हें पाहिलें असतां या कमिशनच्या निकालास किती महत्त्व दिलें पाहिजे हेंही कळून येईल.

उपरी निर्दिष्ट कमिशनचे अध्यक्ष कर्नल लॉडविक यांना नेमिले होतें

खरें, परंतु गव्हर्नर सर ग्रँटसाहेब यांना लॉडविक साहेबांचा तितकासा विश्वास वाटत नव्हता. म्हणून कमिशनासंबंधानें त्यांनीं असा नियम घालून दिला होता कीं, दोघां कमिशनरांचें जें मत ठरेल तें अध्यक्षांनीं मान्य करावयास पाहिजे. त्यांनीं आपलें भिन्न मत दर्शवितां नये. पुढील इतिहास लक्ष्यांत घेतां गव्हर्नरसाहेबांचा हा चाणाक्षपणा नांवाजण्यासारखा खास होता.

ता. १२ ऑक्टोबर १८३६ रोजीं कमिशननें सातान्यास जमून गोविंदराव वगैरेंच्या चौकशीस प्रारंभ केला. साक्षीदार तपासण्यास सुरवात केली. ह्या फितुराच्या खटल्यांत साक्षीदार सारे ३. पण हे तीन साक्षीदार तपासण्यास २१ दिवस लागले. म्हणजे महाराजांतर्फे अगर गोविंदराव दिवाणातर्फे साक्षीदारांची उलट तपासणी झाली म्हणून वेळ लागला असा जर कोणाचा समज असला तर तो साफ चुकीचा आहे. हा वेळ साक्षीदारांना आपआपल्या जबान्यांची जुळवाजुळव करून आरोप शाबीत करण्यास कसें कसें बोललें पाहिजे, हें तयार करण्यासाठींच २१ दिवसांचा अवधि लागला. पण इतक्या उप्पर देखील या साक्षीदारांची फजिती उडालीच! खोट्याच्या नशीबीं फजिति ठेवलेली!

कमिशनचे अध्यक्ष कर्नल लॉडविक यांनीं हिंदुस्थानास रामराम ठोकून मायभूमि इंग्लंड येथें गेल्यावर इंडिया हौसमध्यें या कमिशन संबंधानें स्वानुभवाची माहिती सांगितली आहे. त्यांच्या त्या भाषणांत या कमिशनच्या चौकशीचा फार मनोरंजक वृत्तांत वर्णन केला [1]आहे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणें जेव्हां २३ व्या पलटणींतला अंमलदार प्रथम साक्ष देण्यासाठीं कमिशनरांसमोर आला तेव्हां त्याची घाबरगुंडीच वळली. सर्वांगास घाम सुटला. पायापासून डोकीपावतों तो लटलटा कांपत होता. मुखावाटे शब्द फुटेना. दुसरे दोघे कमिशनर एकमेकांच्या तोंडाकडे पहात बसले. आपण जुळवून आणलेला डाव आतां फसतो अशी शंका येऊन ते थोडेसे निराशहीपण झाले. कर्नलसाहेबांनीं तर त्याला उलट सुलट प्रश्न करून सळो का

---

[1] प्र. म. आरोपाचें निराकरण.

पळो केलें. अशी स्थिती झाली तेव्हां हातची शिकार निसटूं नये म्हणून मि० विलोबी व ले. क. ओव्हॅन्स यांना मध्यें पडावें लागलें. त्यांनीं साक्षीदारांस धीर दिला. आपणास पाहिजे असलेल्या गोष्टीबद्दल सूचक प्रश्न विचारण्यास प्रारंभ केला. व त्याच्याकडून एकदांची ठराविक जबानी वदवून ती लिहून घेतली. लॅडविकसाहेब म्हणतात " या साक्षीदारांचीं जर पूर्तेपणीं चौकशी केली असती तर या साक्षीचे तुकडे तुकडे होऊन तेव्हांच मोडून खालीं जमीनीस पडत. सुभेदार शिवगुलामसिंग व गुल्जार मिश्र यांचे साक्षीचेवेळीं चेहरे प्रेतवत् झाले होते. " या साक्षीदारांची मनोदेवताच त्यांना आंतून बोचित होती. आपण धडधडीत खोट्या गोष्टी सांगत आहों; असें त्यांचें मनच त्यांना सांगत असलें पाहिजे; व म्हणूनच त्यांचे चेहरे प्रेतवत् झाले. नाहींतर एवढे मोठे अंमलदार, असे गर्भगळीत कां होते ? लॅडविक साहेबांनीं हें सर्व सूक्ष्मपणें अवलोकिलें होतें. व म्हणूनच या साक्षीदारांवर विश्वास ठेवण्यास ते मुळींच तयार नव्हते. परंतु त्यांच्या सोबत्यांनीं या साक्षी ग्राह्य व विश्वासार्ह ठरविल्या. कमिशनच्या नियमाप्रमाणें कर्नलसाहेबांनाही मान तुकविणें भाग पडलें. तथापि त्याचवेळीं त्यांनीं बजावून सांगितलें कीं, राजावर गुन्हा ठरविण्यास व फितुराची शाबिती करण्यास आपणांपुढें आला हा पुरावा अगदीं समूळ खोटा आहे.

साक्षिदारांचे जबाब चालले असतां, महाराजांतर्फे माणसास हजर राहावयास परवानगी दिली तर नाहींच, परंतु जबान्यांच्या नकलाही पण महाराजांना दिल्या नाहींत. पुढें पार्लमेंटरी पेपरामध्यें या जबान्या प्रसिद्ध करण्यांत आल्या. तेव्हां त्या महाराजांच्या एजंटास सन १८४२ च्या सुमारास पहावयास मिळाल्या त्यावरून " प्रतापसिंहमहाराजांवरील आरोपांचें निराकरण " म्हणून महाराजांच्या आज्ञेवरून सन १८४७ मध्यें लंडन येथें मोडी लिपींत जो ग्रंथ छापून प्रसिद्ध करण्यांत आला होता त्यामध्यें या जबान्यांची चर्चा केली आहे. या पुस्तकाच्या पान ३९ ते ४१ मध्यें सुभेदार शिवगुलामसिंग व गुल्जार मिश्र यांची कसकशी फजिती उडाली याचें हृदयंगम वर्णन केलें आहे. हा

मजकूर पार्लमेंटरी बुकाचीं पानें ३२७, ३३०, ३३१, ३४२, ३४३, ८७२, १०६३ यावरून घेतला आहे. यांत शिवगुलामसिंग म्हणतो कीं, **वरचे मजल्यावर** महाराजांस भेटलों म्हणून लिहून देतो " तर गुल्जार मिश्र "**खालचे खोलींत** राजास भेटलों " म्हणून लिहून देतो. " गोविंदराव दिवाणास अहमदनगरास किल्ल्यामध्यें कैदेंत ठेवल्यावेळीं जाच छळ वगैरे करून बळजबरीनें जबाब घेतला आहे त्यांत "महाराजांची भेट **उवड्यावर** चौकांत झाल्याचें म्हटलें आहे. " या सर्वांवरून जर कांहीं निष्कर्ष निघत असेल तर तो एकच कीं, महाराजांची व या खोडसाळ साक्षीदारांची कधींच गांठ पडली नसावी. गांठ पडती तर गांठ पडलेल्या ठिकाणाबद्दल थापबाजी करण्याचा प्रसंग साक्षीदारांवर खास येता ना.

या साक्षीदारांचे जबाब घेतले, त्यावेळीं महाराजांविरुद्ध पुरावा गोळा करण्याचें काम (investigation) चाललें नसून महाराजांवर आरोप शाबित होतो, कीं कसें, याबद्दल चौकशी (trial) चालली होती, व त्या प्रकरणीं निकाल व्हावयाचा होता. आजच्या कायद्याप्रमाणें काय, किंवा त्यावेळच्या कायद्याप्रमाणें काय, महाराजांना हजर राहाण्याबद्दल कमिशनरांनीं सुचवावयास पाहिजे होतें. पण या कमिशनरांनीं तसें तर केलें नाहींच, पण महाराजांनीं आपला माणूस हजर रहाण्यास परवानगी मागितली असतांही ती नाकारण्यांत आली. महाराजांतर्फे काय म्हणणें आहे, ह्याची देखील वास्तपूस्त करण्यांत आली नाहीं. अशा प्रकारची चौकशी म्हणजे न्याय कसा म्हणतां येईल ? पण असें असून देखील ह्या कमिशनरांनीं मुंबईस परत गेल्यावर रिपोर्ट केला कीं, आमचे पुढें जो पुरावा झाला, तो खोडून काढण्याचा महाराजांचा प्रयत्न साफ फसला. (altogether failed to disprove) या खोडसाळ रिपोर्टावरून- देखील या कमिशनरांच्या मनाची, त्याच्या सचेपणाची व अब्रूदारपणाची कल्पना येणार आहे !

महाराजांवर ब्रिटिश सैन्य फितुर करण्याचा यत्न केल्याचा आरोप शाबित करण्यासाठीं कमिशन नेमून जी चौकशी झाली त्यास न्यायदेवतेची विडंबना

करण्यांत आली असें जर कोणीं म्हटलें तर तें गैरवाजवी ठरेल काय ? कारण चौकशीच्यावेळीं कोणत्याही प्रकारची न्यायपद्धति अवलंबिली नव्हती. कोणतें-ही कायदेशास्त्र घ्या, त्यालादेखील या कमिशनची चौकशीची पद्धत अगदीं बेकायदा, जुलमी व अरेरावीची अशी होती असाच कबुलीजबाब द्यावा लागेल. कोणीही समंजस माणूस या चौकशीची तरफदारी करूं शकणार नाहीं. २२ जुलै १८४३ मध्यें सर हारफोर्ड जोन्स ब्रिजेस यांनीं कोर्ट ऑफ डायरे-क्टर्स यांना पत्र लिहिलें त्यांत ते म्हणतात, " या कमिशननें महाराजांच्या चौकशीचा जो फार्स केला तो कोणत्या न्यायशास्त्राप्रमाणें अगर कायद्याप्रमाणें केला असें मला विचारल्यास, विशेषतः इंग्लंडच्या कायद्याप्रमाणें कीं, मुसल-मानांच्या न्यायदानपद्धतीप्रमाणें कीं हिंदुधर्म शास्त्राप्रमाणें ही चौकशी झाली. असे तीन प्रश्न केल्यास त्या तिन्ही प्रश्नांस माझें उत्तर एकच व तें नकारार्थी.'[१]

सारांश या संस्मरणीय कमिशननें केलेली चौकशी म्हणजे निव्वळ ' सुल-तानशाही ' होती. इसापनीतिमध्यें लांडगा व करडूं यांची गोष्ट वाचल्यांचे कित्येक वाचकांस स्मरत असेल. लांडग्यानें करडास खाण्यापूर्वीं जशा तऱ्हेचा युक्तिवाद लढविला तशा प्रकारचा युक्तिवाद या कमिशनरांनीं योजला असें

---

१ I promise you to answer in a few words when you will please to question me by what code of Laws, and by what rules, commission of mock trial of the Prince conducted its proceedings, by the law of England, by the Mohammedan law or by Hindoo law ? No, No, No.

२ Some of the gentlemen appointed to sit on this memorable commission seem to have adopted for the rules of thei proceedings Sic. volo, Sic. jubes, Stat proratione volunle and then we come to a code equally memorable with the commissiou itself and then we come to a code of the wolf and the lamb.

कष्टानें म्हणावें लागतें. तरी देखील सातारा गॅझेटियरमध्यें या कमिशनची पाठ थोपटली आहे, व प्रतापसिंह महाराजांना दोष लावला आहे. एखाद्या देशाला खच्ची करावयाचा तर त्याचा इतिहासच तिरस्करणीय असा लिहावा असें कांहीं मुत्सद्यांचें मत आहे, तेंच या गॅझेटियरच्या लेखकानें ध्यानांत ठेवलेलें दिसतें. तसें नसतें, तर इतिहासाचा विपर्यास त्यानें कां बरें केला असता? सुदैवानें या कमिशनासंबंधानें डॉक्टर बसू म्हणतात कीं या कमिशनने गोळा केलेल्या पुराव्यावरून मांजरालाही कोणी फासास लटकावलें नसतें, इतका तो कुचकामाचा होता. (The mass of evidence they collected was so worthless that no one would have hanged a cat on it.)

असें होतें तरी कमिशनरांनीं तो पुरावा सबळ असल्याबद्दल आपलें मत दिलें. ग्रँटसाहेबांनीं कमिशनरांचा रिपोर्ट वाचला, तेव्हां आपल्या कर्तृत्वाचें इष्ट असें फळ आल्याचें पाहून त्यांना आनंद वाटल्याशिवाय कसा बरें राहिला असेल ?

प्रकरण २० वें.

कटांतील पात्रें.

महाराजांविरुद्ध कटाचा जो पुरावा मागील प्रकरणांत दिला आहे, त्यावरून इंग्रजी फौजेस फितूर करण्याचा प्रयत्न महाराजांनीं केला कीं कसें हें वाचकांना कळून चुकलें असणार! महाराजांवर व गोविंदराव दिवाणावर तोहमत आणावी म्हणून कट झाला होता, ही गोष्ट शाबीत करतां येण्यासारखी आहे. गव्हर्नरसाहेब या कटांत कां सामील झाले, ह्याचीं कारणें वर आलेलींच आहेत. बाळाजीपंत नातू या कटाचीं सूत्रें कां हालवीत होता हेंही मागील हकिगतीवरून वाचकांच्या लक्ष्यांत आलें असेलच. पण अंताजी भयास

व परदेशी शिपायांस या कटांत सामील होण्यास काय कारणें होतीं? असा प्रश्न उत्पन्न होणें साहजिक आहे. त्या प्रश्नाचें समाधानकारक उत्तर न मिळाल्यास महाराजांवरील आरोपाचें पूर्णपणें निरसन झालें, असें सामान्य वाचकांस वाटावयाचें नाहीं. वाचकांचें मनांत किंचित्‌ही शंका राहूं नये म्हणून त्याकाळीं घडलेल्या पुढील सामान्य गोष्टी या ठिकाणीं देणें अगत्याचें झालें आहे.

महाराजांच्या पदरच्या एका ब्राह्मण नोकरास चोरीच्या आरोपावरून रेसिडेंट कर्नल लॉडविक यांनीं पकडून देहांत प्रायश्चित्ताची शिक्षा दिली! या नोकराची व अंताजीची चांगली दोस्ती होती, व घरोबा होता. पुढें सुभेदार गुल्जार मिश्र व शिवगुलामसिंग यांचें त्या नोकराच्या विधवेकडे जाणें येणें सुरू झालें. नवऱ्याच्या शिक्षेबद्दल महाराजांनीं रदबदली केली नाहीं, अगर जीव वांचविण्याचा प्रयत्न केला नाहीं, यामुळें अंताजी व ती विधवा हीं दोघें महाराजांचा मनापासून द्वेष करीत. महाराजांचें व इंग्रजांचें आतां पूर्वीइतकें मेथकूट नसून महाराजांच्या नाशाचें कालकूट गव्हर्नरसाहेबांच्या व त्यांच्या कौन्सिलरांच्या मनांत बाळाजी नातू ओतीत आहे, ही गोष्ट त्यांनाही समजली होती. सबब कांहींशा सूडबुद्धीनें ही मंडळी बाळाजीपंत नातूस सामील झाली. बाळाजीपंत नातूनें त्यांना वचनबद्ध करून घेऊन त्यांच्याकरवीं आपणास पाहिजे होते ते ते डाव करून घेण्याचे कामीं त्यांचा उपयोग केला!

सुभेदार शिवगुलामसिंग व गुल्जार मिश्र यांच्याबद्दल आणखी एक बलवत्तर कारण होतें. कर्नल लॉडविक यांनीं **महाबळेश्वर** हें हवा खाण्याचें उत्तम स्थळ असल्याचा प्रथम शोध लाविला व त्यांच्याच कारकीर्दींमध्यें प्रतापसिंह महाराजांच्या मदतीनें महाबळेश्वराचें (नेहेरचें) महत्व वाढलें. गव्हर्नरसाहेब उन्हाळ्यांत महाडाच्या वाटेनें मुंबईहून या ठिकाणीं येऊन राहूं लागले. गव्हर्नर साहेबांचा मुक्काम असला म्हणजे महाराजही या ठिकाणीं जावून रहात. दिवाणांनीं आपणांसाठीं एक बंगला बांधला होता, व महाराजांबरोबर गेले म्हणजे तेहि त्या ठिकाणीं रहात. गव्हर्नर साहेबांचा मुक्काम महाबळेश्वरास असला म्हणजे साताऱ्याहून कांहीं फौज बंदोबस्तासाठीं तेथें पाठविण्यांत येई.

प्रथम या फौजेची छावणी गोविंदराव दिवाणाच्या बंगल्याजवळ होती. हे दांडगे लोक बेमुर्वतखोरपणानें वागत. गोविंदराव दिवाण हे कऱ्हाडे ब्राह्मण. त्यांचें ही सोंवळेंओंवळें होतेंच. त्यांनीं आपल्या विहिरीस शिवूनही फौजेची मंडळी भ्रष्टाचार करतात, सबब त्यांचा तळ दुसरीकडे ठेवावा अशी रेसिडेंटसाहेबांना विनंती केली. रेसिडेंटसाहेबांनीं दिवाणाच्या म्हणण्याप्रमाणें फौजेचा तळ दुसरीकडे हालविला !

ज्या फौजेबद्दल या तक्रारी झाल्या व तळ हालविण्यांत आला त्या फौजेचे मुख्य सुभेदार वगैरे शिवगुलामसिंग व गुल्जार मिश्र हे होते. त्यांच्याच प्रोत्साहनावरून परदेशी शिपाई दिवाण गोविंदरावाच्या विहिरीवर पाण्यास जात. ते म्हणत आम्हां परदेशीयांपेक्षां हे दख्खनी ब्राह्मण उच्च कोठले ? त्या सोंवळ्या ओंवळ्यावरून एकमेकांस उच्च नीच मानण्यास सुरवात झाली. व मग कुरबुरही सुरू झाली. दांडगटपणाच्या गुर्मीनें परदेशी मंडळींची प्रथम सरशी होत असे. पण गोविंदरावाच्या वर निर्देश केलेल्या कारवाईनें त्यांना पूर्वीच्या कॅम्पाच्या ठिकाणास मुकावें लागलें. अर्थात् याची चीड सर्व परदेशी मंडळीस आलीच. त्यांच्या ऑफिसरांना तर जास्त आली ! पण मनांतल्या मनांत जळफळण्यापलिकडे, त्यावेळीं ते बिचारे करतात काय ?

बाळाजीपंत नातूस या गोष्टी कळल्या, तेव्हां त्यास फार आनंद झाला. महाराजांच्या विरुद्ध अगर महाराजांच्या मंडळीविरुद्ध जे जे कोणी मिळतील ते ते बाळाजीस हवे होतेच ? त्याला आयतीच ही संधि मिळाली ! मग काय, बाळाजीच्या आनंदास सीमा राहिली नाहीं ! आतां त्यानें महाराजांना लोटून देण्यासाठीं खड्डा खोदण्यास दुप्पट उमेदीनें कंबर कसली.

बाजीरावानें इंग्रजांच्या वर्चस्वाचें जोखड फेंकून देण्यासाठीं लढाईस उभे राहण्यापूर्वी इंग्रजांचीं पलटणें फोडण्याचा यत्न केला होता, ती गोष्ट बाळाजीपंत नातूनें स्वतः पाहिलेली होती. पलटण फोडण्याचा अगर फितूर

एल्फिस्टनचें चरित्र. कॉटन कृत.

करण्याचा यत्न चालला आहे. अशी बातमी मिळाली कीं इंग्रज अंमलदार फार कडक वागतात. व त्या गोष्टींची त्यांना फार चीड असते. ही गोष्ट बाळाजीच्या अनुभवास आली होती. सबब त्यानें या लष्करी अंमलदारांच्या साहाय्यानें तशी रचना महाराजांविरुद्ध करण्याचा घाट घातला. व आपलें हृद्गत त्यानें सर रॉबर्ट ग्रँट यांस बोलूनही दाखविलें. त्यांनीं या गोष्टीस लगेच संमति दिली. गव्हर्नरसाहेबांनीं संमती दर्शवितांच नाटकाच्या कथानकास प्रारंभ करण्यांत आला. अंताजी ब्राह्मणाची व पुरभय्यांची ओळख झालेली विधवेच्या बिऱ्हाडीं! तेथें अंताजीनें त्यांना या नाटकाची हकिगत कळवून त्यांना शपथा दिल्या व या नाटकांत भाग घेतल्यास बाळाजीच्या व गव्हर्नर साहेबांच्या वशिल्यानें अधिक बढती मिळेल अशी आशा दाखविली. अशा प्रकारें स्वार्थाच्या आशेनें व सूडाच्या बुद्धीनें ते बाळाजी नातूच्या कारस्थानास बळी पडले.

सारांश कर्नल लॉडविक साहेबांना प्रथम "सच्चे" व "प्रामाणिक" वाटलेले पुरभय्ये अंमलदार सच्चे नसून पक्के लुच्चे होते. व प्रामाणिक नसून दिवाणाबद्दलच्या खुनशी सूडबुद्धीनें महाराजांविरुद्ध कारस्थानांत सामील झाले होते, हें आता वाचकांच्या पूर्णपणें ध्यानांत येईल व वरीलप्रमाणें वस्तुस्थिती असल्यामुळें साक्षीच्यावेळीं सदरील अंमलदारांच्या मुद्रा काळवंडल्या, पाय लटलट कांपूं लागले व घामाघूम होऊन मुखावाटें शब्दही फुटेना! तसेंच वरील परिस्थिती मुंबईसरकारास व मि. विलोबी यांस ठाऊक होती म्हणून सदरच्या अंमलदारांची उलट तपासणी करण्यास महाराजांना अवसर देण्यास ते कबूल नव्हते.

प्रकरण २१ वें.

लॉडविकसाहेबांचें विलायतेस गमन.

सर राबर्ट ग्रँट व कर्नल लॉडविक हे दोघेही इंग्रज. दोघेही ईस्ट इंडिया कंपनीचे नोकर. पण एक पडला कर्मठ ब्राह्मणी वृत्तीचा, व दुसरा पडला शिपाई गडी. लॉडविकसाहेब हा शिपाईगडी असल्यामुळें मन म्हणून पदार्थ त्यांच्या ठायीं होता; व तें मन कोंवळे होतें ! त्यांच्या मनास न्याय, अन्याय, दया, माया, सहानुभूति वगैरे कोमल विकारांचा ओलावा होता; पण सर रॉबर्ट ग्रँटसाहेबांचें मन कर्मनिष्ठ वेदाभ्यास-जड भटजीबुवांप्रमाणें निष्ठुर व कठोर बनलें होतें. न्यायान्यायाच्याऐवजीं स्वार्थ, आपमतलब वगैरे विकारांनीं त्यांना पछाडलें होतें. महाराजांविरुद्ध खोटीं कारस्थानें रचण्यांत आपण किती अन्याय करतों, हें ग्रँटसाहेबांना कळण्याच्या स्थितींत ते नव्हते. स्वतःचा बचाव व्हावा व लॉर्ड ऑफ सातारा होण्याचा मान मिळावा यासाठीं सातारचें राज्य नष्ट करावयाचें, या विचारानें त्यांना इतकें मूढ केलें होतें कीं, **एका अनपराधी, सच्छील, सद्वर्तनी राजपुरुषाचा आपण नाहक बळी घेत आहों** हा विचारही त्यांच्या मनांत कधीं आला नाहीं ! एरव्हीं सर राबर्ट ग्रँटसाहेब मोठें धार्मिक वृत्तीचे होते. त्यांचीं धर्मविषयक कवनें फार प्रसिद्ध आहेत. त्यांचीं प्रवचनेंही अत्यंत गहन वेदान्त विषयासंबंधाचीं आहेत. पण केवळ स्वार्थापायीं हें सारें तत्वज्ञान रद्द ठरलें ! **स्वार्थ हा मनोविकारच असा प्रबळ आहे कीं त्याच्यापुढें साऱ्या सद्गुणांचें मातेरें होतें.** असो.

कर्नल लॉडविकसाहेबांची गोष्ट पडली निराळी. तो साधा सिधा शिपाई गडी. त्याला लगाव बत्ती कीं लगाव बत्ती, पण स्वार्थ नाहीं त्यामुळें ग्रँटसाहेबांचें कारस्थान त्याला प्रथम प्रथम समजलें नाहीं, नव्हे समजून घेण्याचा

विचारही त्यानें केला नाहीं. व म्हणूनच न कळत ग्रँटसाहेबांस त्याचेकडून मदत होत गेली. परंतु पुढें कमिशनचे अध्यक्ष म्हणून चौकशीचे वेळीं त्यानें जो एकंदर प्रकार अवलोकन केला, त्या वेळेपासून या कारस्थानाबद्दल त्याला थोडा थोडा बोध होऊं लागला. त्याला वाटे कीं, जहागिरसंबंधाचा पत्रव्यवहार कोर्ट ऑफ डायरेक्टरांकडून अद्याप मुंबईस आलेला नाहीं. गव्हर्नर व त्यांचे सल्लागार यांनीं विलायतेहून आलेला हुकूम दाबून ठेवलेला आहे, या गोष्टीचा त्याला देखील सुगावा नव्हता. तसेंच बाळाजी नातू वरचेवर सातान्यास येत असे, तोही बनावट कारस्थानें रचण्यासाठीं येत होता, हेंही गौप्य त्याला अद्याप उलगडलें नव्हतें. म्हणून लॉर्डविकसाहेबांनीं उभयपक्षी समजूत करण्याचा प्रयत्न सुरू केला. महाराजांना भेटून विलायतेस वकील पाठवूं नये म्हणून त्यांनीं महाराजांना सल्ला दिली. महाराजांनीं त्याचें म्हणणें कबूल केलें. लॉर्डविकसाहेबांनीं गव्हर्नरसाहेबांनाही पत्र लिहून महाराजांबद्दल सहानुभूतिपूर्वक लिहिलें व जहागिऱ्याच्या स्वामीत्वाबद्दल माजलेली भानगड मिटवून टाकण्यास विनंति केली.

पण सर राबर्ट ग्रँटसाहेबांना पडतें घ्यावयाचें नव्हतें. त्यांना महाराजांशीं तडजोड नको होती. महाराजांचीच चूक असती, तर त्यांना क्षमा करण्याचा प्रश्न उद्भवता. पण "**लांडगा व कोंकरूं**" या गोष्टीप्रमाणेंच हा प्रकार होता. लांडग्याच्या मनांत कोंकरास कसें तरी खावयाचें होतें, तसेंच सर राबर्ट ग्रँट यांना सातारचें राज्य कोणत्या ना कोणत्या निमित्तानें खालसा करावयाचें होतें. एल्फिन्स्टनसाहेबानें हें मध्येंच राज्य ठेवण्यांत गैरमुत्सद्दीगिरी केली असें त्यांना वाटे. निरा व कृष्णा ह्यांमधील हा सुंदर सुपीक प्रदेश एका विधर्मी हिंदी राजाकडे राहावा, हें त्यांना गैरसोयीचें वाटे. शिवाय या राजाची सर्वत्र स्तुति झालेली ऐकून असूयेनें त्याचें मन चलबिचल पावे. व म्हणूनच बाळाजीपंत नातू वगैरेकरवीं मागें वर्णन केल्याप्रमाणें बनावट कारस्थान त्यांनीं रचिलें होतें. खुद्द लॉर्डविकसाहेबांनाही सूचना करण्यास त्यानें कमी केलें नाहीं.

फितूराचा वृत्तांत या सदराखालीं, प्रकरण १८ मध्यें शिवगुलामसिंगानें अंताजी भटास महाराजांनीं आपणांस अभयपत्र, किंवा शिफारसपत्र, असें खुणेचें कांहीं तरी द्यावें असें सांगितलें होतें. हें शिवगुलामसिंगाचें मागणें स्वताच्या अकलेचें नव्हतें. गव्हर्नरसाहेबांनीं रेसिडेंटसाहेबास तें प्रथम सुचविलें, व त्यांच्या हुकूमावरून रेसिडेंटसाहेबांनीं सुभेदार शिवगुलामसिंगास तसें करण्यास सांगावयाचें होतें. ता. ९-१०-४० रोजीं कर्नल लॉडविकसाहेबांनीं ईस्ट इंडिया कंपनीचे डायरेक्टर्सचे कोर्टाकडे सर रॉबर्ट ग्रँट यांच्या फितूराच्या कटांतील कामगिरीचा वृत्तांत पत्र लिहून कळविला आहे. त्यांत सर ग्रँटसाहेबांनीं ज्या पत्रानें सूचना केल्या होत्या त्या पत्रांतील मजकूर उधृत केला होता, तो असाः—
"...असें सुचविलें होतें कीं, हिंदी अंमलदारांनीं महाराजांची भेट घ्यावी व कटामध्यें त्यांचें अंग असल्याची बातमी षट्कर्णी झाल्याचें त्याच्या कानीं आलें आहे, असें त्यांनीं महाराजांना सांगावें व विनंति करावी कीं, महाराज आतां आमचें रक्षण करा. येथून पळून जाऊन जन्मभर राहतां येईल अशी पुरेशी रक्कम तरी द्या अगर कोठेंतरी नोकरी मिळेल असें शिफारशीचें स्वदस्तुरचें पत्र तरी द्या राजानें रक्कम दिली तरीही बळकट पुरावा झाला. शिफारशीचें पत्र दिलें तर पुरावा बिनतोड झाला."

Suggesting that the Native officers should ask to see the Raja, tell him they had heard their part of the plot had been discovered, beg that he would protect them, either by advancing money to escape with or a pass, under his hand and seal to insure them services that if he gave them money, the evidence would be strong; if a paper convincing."

लॉडविकसाहेबांच्या पत्रांतील वरील मजकुरावरून गव्हर्नर सर रॉबर्ट ग्रँट यांच्या कुटिल कारस्थानाची व त्यांच्या मनाच्या घडणीचीही कल्पना होईल. तसेंच महाराजांवरील आरोप कसे फोल होते व महाराजांवर पुरावा कसा व कोठून तयार होत होता हेंही पुर्तेपणीं कळून चुकलें असेल.

लॉडविकसाहेबांना देखील याच पत्रानें ग्रँटसाहेबांच्या हेतूचा पहिल्या

प्रथम बोध झाला, व त्यांना हें पसंत पडलें नाहीं. त्यांना अब्रूची चाड होती. सत्यापासून त्यांचें मन पराङ्मुख झालें नव्हतें. त्यांच्याच शब्दांत सांगावयाचें तर, "Honour and honesty being my motto in public as in private life, I spurned such shifts as these." (खासगी व्यवहारांत काय, किंवा लोकहिताच्या अगर सार्वजनिक कामांत काय अब्रूनें व सचोटीनें वागावयाचें असें माझें ब्रीद असल्यामुळें या युक्त्या मी मनावर घेतल्या नाहींत.)

रेसिडेंट कर्नल लॉडविकसाहेबांनीं, आपल्या वरिष्ठांच्या म्हणजे गव्हर्नर-साहेबांच्या सल्ल्याप्रमाणें वागणें हें त्याचें कर्तव्य होतें. पण ह्या हलकट कटा-मध्यें त्यांची व्हावी तशी मदत वरिष्ठांना होईना. गव्हर्नर त्यामुळें अडून बसले, अशांतला भाग नाहीं. त्यांना मदत करण्यास बाळाजीपंत तयार होता; अंताजी भट तयार होता, व इतर पुष्कळ लांचखाऊ व हलकट लोक तयार होते. व त्यांच्या मदतीनें कटाच्या सांखळीचे दुवे तयार होत चालले होते. पण आपल्या हाताखालच्या अधिकाऱ्यानें आपणांस मदत केली नाहीं ह्या गोष्टीची सर साहेबांस चीड आली. लॉडविकसाहेबांऐवजीं ले. कर्नल ओव्हॅन्स असता तर त्यानें मदत करण्याचें आनंदानें कबूल केलें असतें. व त्यांच्या म्हणण्याप्रमाणें शब्दशः रचना केली असती, हे विचार त्यांना वेळोवेळीं सुचत.

कमिशनच्यावेळीं अध्यक्ष म्हणून लॉडविकसाहेबांचें वर्तन ग्रँटसाहेबांच्या दृष्टीनें अश्लाघ्य असेंच होतें. त्यांनीं या कटाच्या पुराव्याचा व कमिशनचा मूळ हेतू लक्ष्यांत घेऊन साक्षीदारांना सांवरून धरावयास पाहिजे होतें. पण तें राहिलें बाजूलाच. साक्षीदार पुढें येतांच लॉडविकसाहेबांनीं त्यांना प्रश्नावर प्रश्न विचारून तेढण्यास सुरवात केली. त्यामुळें साक्षीदारांची घाबरगुंडी उडाली. तोंडांतून शब्द निघेना. विचारे चळचळ कांपूं लागले. कमिशनमध्यें विलोबी व ओव्हॅन्स होते म्हणून बचावलें. नाहींतर डाव साफ फसता. नव्हे उलट अंगावरही येता. या गोष्टि गव्हर्नरसाहेबांना समजल्या,वर लॉर्ड-

विकसाहेबांस साताऱ्यांस ठेवणें इष्ट नाहीं, हें त्यांच्या मनानें पक्कें घेतलें, व ह्या रेसिडेंटाची बदली करण्याच्या कामास ते आधीं लागले.

कर्नल लॉडविक रेसिडेंट म्हणून नेमणूक होऊन आल्यापासून महाराजांचें व त्यांचें बरें होतें. पुढें जहागिऱ्यांच्या स्वामित्वाबद्दलची भानगड उपस्थित झाली. त्यांत गव्हर्नरसाहेबांनीं रेसिडेंटास महाराजांच्या म्हणण्याप्रमाणें खलिता तयार करून पाठविण्यास सांगितलें होतें. रेसिडेंटांनीं त्याप्रमाणें खलिता तयार करून पाठविला. पण त्याबद्दल गव्हर्नरांनीं कांहीं तजवीज केली नाहीं, उलट महाराजांवर नुसतें कुभांड रचण्यांत आलें. त्यामुळें रेसिडेंट साहेबांबद्दल महाराजांचें मन कलुषित झालें. रेसिडेंटाला महाराजांच्या सच्छील वर्तनाची, सदाचरणाची व प्रेमळपणाची किंमत कळत होती, म्हणून त्यानें गव्हर्नरसाहेबांना मोकळ्या मनानें या सर्व गोष्टी कळविल्या. व मुंबईसरकारच्या वागणुकीमुळेंच आपलें महाराजांवरील वजन कमी झालें आहे. त्यामुळें पूर्वीप्रमाणें महाराज आपल्याशीं मित्रत्वानें वागत नाहींत, तरी कोर्ट ऑफ डायरेक्टर्सकडून जहागिऱ्यांचा प्रश्न लवकर निकाल करून घ्यावा अशी तक्रार केली.

वरील पत्र सर रॉबर्ट ग्रँटसाहेबांस मिळालें, तेव्हां त्यांना उलट बरेंच वाटलें. साताऱ्याच्या रेसिडेंटाचे जागीं ले. कर्नल ओव्हॅन्स यांना नेमण्याचें गव्हर्नर साहेबांनीं वचन दिलें होतें, त्याप्रमाणें तें पुरें करण्याची संधि गव्हर्नरसाहेबांना आतां चांगलीच लाभली. लॉडविकसाहेबांना साताऱ्याहून घालवून देण्यास मार्चपासून सुरवात झाली होती. लॉडविक साहेबांची प्रकृति ठीक नाहीं. त्यांनीं थोडे दिवस रजेवर जावें, असा प्रथम प्रयत्न करण्यांत आला. तें जमेना. सामोपचार थकले. तेव्हां सार्वजनिक हिताच्या आड लॉडविकसाहेब येतात तर त्यांचा कांटा काढलाच पाहिजे. व्यक्तीच्या बऱ्यावाईटासाठीं सार्वजनिक हित बुडवतां नये, वगैरे बोलणें गव्हर्नरसाहेबांनीं सुरू केलें. ८ एप्रील १८३७ च्या त्यांच्या मिनीटमध्यें हा मजकूर आपणांस वाचावयास मिळतो. गव्हर्नरसाहेबांच्या मनाची स्थिति अशा प्रकारची असतांना, तारीख १३ मे

१८३७ रोजीं लॉडविकसाहेबांना कोठून बुद्धि झाली, आणि त्यांनीं वरील-प्रमाणें तक्रारीचें पत्र लिहिलें. मग काय विचारावें? आंधळयाला दृष्टिलाभ व्हावा, तसा आनंद गव्हर्नर साहेबांना झाला. ६ जून १८३७ रोजीं लॉडविक साहेबांना गव्हर्नरसाहेबांनीं आपल्या सेक्रेटरीकरवीं कळविलें कीं, "महाराजांवरील आपलें वजन कमी झालें आहे, इतकेंच नव्हे तर तें पार नाहींसें झालें आहे असें दिसतें. आतां महाराजांना तुमच्याविषयीं तिट्कारा व द्वेष वाटत आहे; व तहान्वयें तुमच्या सल्ल्यानें महाराजांनीं वागावयाचें त्याऐवजीं ते बेगुमानपणें व तहाची फिकीर न बाळगतां वागत आहेत...अशी परिस्थिति कशी व कां उत्पन्न झाली त्याची यावेळीं चिकित्सा करावयाची आवश्यकता गव्हर्नरसाहेबांना वाटत नाहीं...जर महाराज रेसिडेंटाच्या सांगण्याविरुद्ध वागत असले व त्यामुळें तहनाम्याचा अवमान होत असला, तर तहनाम्याच्या परिणामाचा धाकदपटशा दाखवून महाराजांना आपलें वर्तन सुधारण्यास लावतां येईल. पण केवळ हिंदी राजाच्या पदरीं असलेल्या रेसिडेंटानें धाकदपटशाच्या जोरावर कारभार हांकावा असा राजकारणाचा सर्व्या रोख नाहीं....शहाण-पणानें, सौजन्यानें व कडक शिस्तीनें वागून त्यानें प्रेम संपादन करावें असाच आमच्या राज्यपद्धतीचा हेतू आहे....महाराजांचें मन फार भडकून गेलेलें आहे, अशा प्रकारच्या स्थितींत फार वर्षांच्या परिचित सल्लागाराला जें मन ताळ्यावर आणतां येणार नाहीं; तें ताळ्यावर आणण्यास नवा माणूस नेमणें जरूर आहे...." अशी प्रस्तावना करून जनरल लॉडविकसाहेबांना रजा देऊन त्यांच्या जागीं ले० कर्नल ओव्हॅन्स यांची नेमणूक करण्यांत आली, व त्यांना लॉडविकसाहेबांपेक्षां सालिना ४००० चार हजार रुपये पगार जास्त देण्यांत आला. ले० कर्नल ओव्हॅन्ससाहेबांच्या कोणत्या कामगिरीबद्दल हें बक्षीस होतें, हें वाचकांना उघड करून सांगण्याची जरूर नाहीं.

तारीख १५ जून १८३७ रोजीं ले० कर्नल ओव्हॅन्ससाहेब यांना रेसि-डेंसीचा चार्ज देऊन सातारा सोडून बिचारे जनरल लॉडविक निघाले ते मुंबई मार्गानें विलायतेस रवाना झाले!

प्रकरण २२ वें.

ओव्हॅन्सच्या कारकीर्दीचा पूर्वरंग.

कर्नल ओव्हॅन्स यांना सातान्यास रेसिडेंट म्हणून पाठवितांना गव्हर्नर ग्रँट-साहेबांनीं त्यांच्यापाशीं एक अत्यंत महत्त्वाचा कागद दिला होता. गव्हर्नर-साहेबांकडे हा कागद सुमारें ७ महिने होता. परंतु ज. लॉडविक हे त्यावेळीं सातान्यास रेसिडेंट असल्यामुळें सर रॉबर्ट ग्रँट यांनीं तो अर्ज खरा आहे, किंवा खोटा आहे, याची चौकशी करण्यास त्यावेळीं तो रेसिडेंटाकडे पाठविला नाहीं. ग्रँटसाहेब हे नामांकित वकील होते. त्यामुळें सदर अर्ज कितपत खरा असणार हें त्यांनीं ताडलें होतेंच! तेव्हां सदर अर्ज ज. लॉडविकसाहेबांकडे चौकशीस दिला तर याचा बनावटपणा उघडकीस येईल. व तसें होणें गव्हर्नरसाहेबांना इष्ट नव्हतें. म्हणूनच तो अर्ज लॉडविकसाहेब सातारा सोडून गेल्यानंतर गव्हर्नरसाहेबांनीं पेटींतून काढला, व या अर्जाबद्दल चौकशी करून काय तें कळवा, असें त्यांनीं क. ओव्हॅन्स यांना सांगितलें. अर्थात् या चौकशींत तो अर्ज बनावट ठरतां नये, हें कर्नल ओव्हॅन्सनें ओळखलें असणारच! हा अर्ज कसला व कोणाचा होता हें जाणण्यास वाचक उत्सुक झाले असतील.

इतका महत्त्वाचा हा कागद तरी काय होता? हा एक बनावट अर्ज गोविंदराव दिवाणाच्या आईच्या (गिरजाबाई महाजन) नांवचा ग. साहेबां-कडे आलेला होता. गोविंदराव दिवाणास कैद केल्यानंतर प्रथम त्यास एका दारूच्या कोठारांत ठेवलें होतें. नंतर तेथून त्यास पुण्यास नेण्यांत आलें. त्या-ठिकाणीं गोविंदराव दिवाण कैदेंत असतां, त्याच्या आईनें, गिरजाबाईनें गव्हर्नरसाहेबांस लिहिलेलें असें बनावट पत्र नातू कंपूनें तयार केलें. त्या पत्रांत गव्हर्नरसाहेबांस पाहिजे होता, त्याप्रमाणें फितुराचा मजकूर घालण्यांत आलेला होता. त्यामध्यें महाराजांशीं प्रामाणिकपणानें व स्वामिनिष्ठेनें वागणाऱ्या साऱ्या

दरबारी मंडळीचीं नांवें गोंवण्यांत आलीं होतीं. गोविंदरावाचेंही नांव त्यांत होतेंच.

कर्नल लॉडविक साहेब साताऱ्यास रेसिडेंट होते, तेव्हां त्यांना खोट्या व बनावट गोष्टी सांगण्याचें धैर्य बाळाजी नातूस होत नसे. काय सांगावयाचें तें त्यानें गव्हर्नर ग्रँट साहेब व मि. विलोबी यांना सांगावयाचें. व मग त्यांच्या संमतीनें रचना करावयाची. ती तयार झाल्यावर प्रकरण परस्पर रेसिडेंटपुढें यावयाचें. रेसिडेंट विश्वासांत घेतलेले नसल्यामुळें, केलेल्या कारस्थानाचा विचका होईल अशी धास्ती फार. आतां रेसिडेंटाच्या अधिकारावर क. ओव्हॅन्स आलेले. ते तर नातूचे दोस्त. दोघेही एका माळेचे मणि. मि. विलोबींनीं देखील नातूची चांगलीच परीक्षा करून ठेवली होती (पा. बु. पान १३१९). तो म्हणतो, "**नातू हा खराब माणूस आहे, व तो ओव्हॅन्सच्या या फितुराचा सल्लागार झाला आहे.**" अशा प्रकारें नातू व क. ओव्हॅन्स यांची दुकल साताऱ्यास जमतांच त्यांनीं लुच्चे, लफंगे लोक जमा करून, कांहींना द्रव्य देऊन व कांहींना द्रव्याची आशा दाखवून महाराजांना संकटांत आणण्यासाठीं यत्न चालविला!

बाळाजी नातूनें केलेली ही रचना क. ओव्हॅन्सला पूर्णपणें माहीत झाली होती. परंतु ओव्हॅन्स इतका सत्यनिष्ठ कीं, त्यानें "गिरजाबाईनें हा अर्ज कोणाकडून लिहून घेतला तें आपणांस माहीत नाहीं" असें अस्खलित खोटें विधान केलें. खरें पाहिलें तर गिरजाबाईला या अर्जाची कांहीं खबर नव्हती. बाळाजीपंत नातू ऊर्फ दादा नातू यांनीं हा अर्ज कृष्णाजी सदाशिव भिडे नांवाच्या आपल्या हाताखालीं पूर्वी काम करीत असलेल्या एका पेन्शनराकडून लिहून घेतला होता. या कृष्णाजी भिड्यास दरमहा ५ रुपये साक्षीभत्ता या सबबीवर पगार मिळे. अशा योग्यतेच्या माणसास ओव्हॅन्ससाहेब "अब्रूदार माणूस" असें शिफारसपत्र देतात. व "या कृष्णाजीनें गिरजाबाईच्या सांगण्यावरून अर्ज लिहिला" असें आपण होऊन ओव्हॅन्ससाहेब मागाहून कबूल करतात. पण वस्तुस्थिती मात्र तशी नव्हती. बाळाजीपंत नातू यांनीं कृष्णाजी सदाशिव भिडे यांस १२५० रु. देण्याचें कबूल केलें होतें. व तसा करार झाल्या-

वर भिडे यांनीं बाळाजीपंताच्या सांगण्याबरहुकूम गिरजाबाईच्या नांवें बनावट अर्ज तयार केला. त्याठिकाणीं गिरजाबाई हजर नव्हती. तिनें भिड्यास अगर बाळाजी नातूस अर्ज लिहिण्याबद्दल कधींही सांगितलें नव्हतें. या कामगिरीबद्दल करारापैकीं १५० रु. कृष्णाजी भिडे यांस देण्यांत आले. व त्याबद्दल त्याजकडून पावती घेण्यांत आली ! बाकीची रक्कम द्रव्यलोभानें क. ओव्हॅन्स व बाळाजीपंत नातू यांनीं स्वतःच गिळंकृत केली. या प्रकारावरूनसुद्धां महाराजांवर उभारलेलीं कुभांडें कशा प्रकारचीं बनावट व लबाडीनें रचलेलीं होतीं, हें कळून येईल.

गिरजाबाईचा भाऊ विष्णू केशव देवस्थली याचीही खोटी जबानी तयार करून ती महाराजांविरुद्ध पुरावा म्हणून पाठविण्यांत आली. मुंबईसरकारास हे प्रकार कळत नव्हते, असें नाहीं. महाराजांविरुद्ध नातूकंपूनें अनेक लोकांच्या जबान्या लिहून घेतल्या होत्या. या साक्षीदारांना आपली उलट तपासणी होण्याची अगर महाराजांसमोर उभें राहून साक्ष देण्याची पाळी मुळींच येणार नाहीं हें पूर्णपणें कळलें होतें. उलट बाळाजी नातू सांगतील तसें लिहून देऊन भरपूर रक्कम उपटतां येत होती. त्यामुळें द्रव्यलोभी लोकांचें खासें फावलें, गिरजाबाईची ज्याप्रमाणें खरोखर प्रत्यक्ष साक्ष घेतली नाहीं, उगीच बनावट जबानी तयार करण्यांत आली, त्याचप्रमाणें विष्णू केशव देवस्थली याचीही जबानी घेण्यांत आली नव्हती. पण बनावट मजकूर तयार करून त्यावर खोटी सही करून पाठविली होती. ता. १६-११-१८४३ रोजीं सदर विष्णू केशव देवस्थली यांनीं रंगोबापूस पत्र पाठविलें आहे. त्यासंबंधानें उहापोह यथाकाल करूं.

गिरजाबाईच्या नांवें बनावट अर्ज तयार करण्याची कल्पना बाळाजीपंत नातूंची हें वर आलें आहेच. ता. ७ आक्टोबर १८३६ रोजीं गोविंदराव दिवाण यांस कैद करण्यांत आलें व त्यानंतर कमिशनपुढें त्याचा जबाब झाला. त्यामध्यें २३ व्या पलटणींतील शिपाई ओळखीचे नाहींत; व ते आपल्यास भेटावयास कधींच आले नव्हते, असें त्यानें स्पष्टपणें सांगितलें. कमिशन-

पुढील पुरावा अगदींच कुचकामाचा झाला. तेव्हां गोविंदरावाचा कबुली जबाब मिळवा असा सल्ला ग. ग्रँटसाहेब यांचेकडून आला. तेव्हां नातूंनीं शक्कल लढवून गोविंदराव याच्या सांगण्यावरून व त्यानें दिलेल्या माहितीवरून त्याची मातोश्री गिरजाबाई यांनीं सर्व हकिगतीचा अर्ज तयार केला, असा बाहाणा करून हा बनावट अर्ज गोविंदराव साताऱ्यास असतां कृष्णाजी भिडे यांजकडून लिहून घेतला; व तो पंढरपूराहून मुंबईस गव्हर्नरसाहेबांच्या नांवें रवाना केला. पण तारखा वगैरे बदलून असें भासविलें कीं, गिरजाबाई पुण्यास गोविंदरावास भेटण्यास गेल्यावेळीं गोविंदरावानें सांगितल्यावरून हा अर्ज महादेव फगरे यानें लिहिला. वस्तुतः हा अर्ज कृष्णाजी भिडे पेन्शनर कारकून यास १२५० रु. देण्याचें अमिष दाखवून बाळाजीपंत दादानीं सखाराम बल्लाळ महाजनी यांच्या घरीं लिहविला. हें सखाराम बल्लाळ गोविंदरावाचे चुलते. पण हे अप्पासाहेब महाराजांच्या पक्षांतले व म्हणूनच नातू कम्पूस साह्य झालेले.

गिरजाबाईच्या नांवें बनावट केलेला अर्ज क. ओव्हॅन्स यांचे हातीं आल्यावर गिरजाबाईचा जबाब घेण्यांत आला. यावेळीं खरी गिरजाबाई बाजूस ठेऊन एक तोतया बाई गिरजाबाई म्हणून सखाराम बल्लाळ यानें हजर केली. पुढें कृष्णाजी सदाशिव भिडे याची जबानी झाली. (ता. ७-९-३७). त्यावेळीं कृष्णाजी भिडे यानें आपण साताऱ्यास सखाराम बल्लाळ याचे घरीं सदरचा अर्ज लिहिला तसेंच गिरजाबाईचे नांवचा जबाबही लिहिला हें कबूल केलें. कृष्णाजी सदाशिवची जबानी, क. ओव्हॅन्स यांना मोठी अडचणीची वाटली, सबब त्यांनीं ती तशीच दाबून ठेविली. ही जबानी मुंबईसरकारपुढें व हिंदुस्थानसरकारकडे वेळींच जाती, तर नातूकम्पूचा डाव अगदीं उघडा होता; व फितुराचें कुभांड कसें बनावट रचलें आहे, हें उघड दिसून येतें. म्हणूनच भिड्याची जबानी तशीच दाबून ठेविली होती.

"**पापास वाचा फुटते**" असें म्हणतात तसाच प्रकार या प्रकरणीं झाला. भिडे यास देऊं केलेली रक्कम बाळाजी नातू देईनात तेव्हां भिडे

यानें क. ओव्हॅन्स व बाळाजी नातू यांजवर लाचलुचपत खाल्ल्याचा आरोप करून अर्ज केला. त्यांत हें सारें प्रकरण उघडकीस आलें. (प्र. म. आ. निराकरण भा. २ पा. १४२–९).

महाराज प्रतापसिंह व कंपनीसरकार यांच्या दरम्यान ता. २५-९-१८१९ रोजीं जो तह झाला, त्याप्रमाणें महाराजांनीं रेसिडेंटाच्या विचारानें राज्यकारभार हांकावयाचा असा करार होता. रेसिडेंटाची नेमणूक महाराजांना सल्ला मसलत देण्यासाठीं म्हणूनच केलेली होती. आजपर्यंतचे रेसिडेंट ग्रँट डफ, ब्रिग्ज, लॉडविक यांची वागणूक त्याप्रमाणेंच झालेली. जनरल लॉडविक यांच्या कारकीर्दीच्या अखेरी अखेरीस त्यांचे व महाराजांचे दरम्यान थोडासा परकेपणा आला व त्याला कारण जनरल लॉडविकच्या मतें मुंबईसरकार. ग. ग्रँटसाहेब यांनीं हेंच निमित्त पुढें करून जनरल लॉडविकसाहेबांना रेसिडेंटच्या जागेवरून हालविलें होतें. पण ले० क० ओव्हॅन्स यांना मात्र साताऱ्यास रेसिडेंट म्हणून नेमून पाठवितांना त्यांनीं महाराजांशीं तुटकपणानें व आपमतलबी वृत्तीनें वागावें अशी सूचना केली होती.[१] ले० क० ओव्हॅन्सनीं साताऱ्यास आल्यानंतर महाराजांची भेट घेतली, तेव्हां **महाराजांचा उमदा व उदार स्वभाव** पाहून त्यांना आपल्या स्वतःच्या वर्तनाबद्दल लज्जा वाटली. महाराजांचा मनमोकळा स्वभाव कोठें ? व ले० क० ओव्हॅन्स यांचा घुमेपणा कोठें ? पहिल्याच भेटीच्या वेळीं महाराजांनीं आपण सर्व जबाबदारी रेसिडेंटावर टाकण्यास कबूल असल्याचें सांगितलें. पण तो कसला शठ ? त्यानें महाराजांचें म्हणणें नुसतें ऐकून घेतलें, व तें वर मुंबईसरकाराकडे कळविलें. ता. २४ जून १८३७ च्या पत्रांत ले० कर्नल ओव्हॅन्स म्हणतात, " उपरिनिर्दिष्ट भेटीच्या प्रसंगीं सर्वस्वी माझ्या तंत्रानें वागण्याचा महाराजांचा कल असल्याचें दिसून आलें. "

---

१ In all your communications with the Raja, Government are of opinion that you should be reserve and distant. (13th June 1837).

तरी देखील ले० क० ओव्हॅन्स यांनीं अशा प्रकारच्या सरळ हृदयी माणसाच्या छळास कंबर बांधली. उपरिनिर्दिष्ट गिरजाबाईच्या पत्रासंबंधानें चौकशी करून त्यानें असें कळविलें कीं, तें गिरजाबाईकडीलच आहे. लेखकाचा मात्र पत्ता लागत नाहीं. हा रिपोर्ट धडधडीत खोटा होता. पण एवढ्याच गोष्टींमध्यें ओव्हॅन्सनीं आपली पुण्याई खर्च केली असें नाहीं. नातू कम्पूच्या साहाय्यानें त्यानें महाराजांविरुद्ध पुरावा गोळा करण्यास सुरवात केली.

सातान्यास येऊन ओव्हॅन्सचे पाय लागतात न लागतात, तोंच त्यानें आपला स्टाफऑफिसर कॅ. डुरक (Durack) यास भाऊ लेले नांवाच्या एका भटास पैसे देऊन हस्तक म्हणून नेमून घेतलें. व महाराजांना संकटांत घालण्यास उपयुक्त असा पुरावा गोळा करण्याची (बनविण्याची) कामगिरी सांगितली, व त्या कामगिरीबद्दल बक्षिस देण्याचें लेखी आश्वासनही दिलें.

भाऊ लेल्यासारखे आणखी अनेक लोक रेसिडेंटांनीं जमा केले होते. या सान्याच लोकांना पैसे देत असें नाहीं. यांपैकीं कांहीं फरारी होते त्यांना तुमचा गुन्हा माफ करूं असें वचन दिलें होतें. कांहींना गांव इनाम करून देऊं अशीं अभिवचनें दिलीं होतीं. तर कांहींना धाक दपटशा दाखवून त्यांचा जबाब लिहून घेतला होता. याच भानगडींत फडनिसांना इनाम मिळालें आगस्त्यांना कळंबी मिळाली. बाळाजीपंत नातूस गायकवाडांचे पांचवड व इतर गांव मिळाले.

गिरजाबाईचा बंधु विष्णू केशव देवस्थली याची जबानी घेतलीच नव्हती पण ती घेतली असल्याचा खोटा बाहाणा केला. पार्लमेंटरी बुक १ पान १२८ साक्ष नं. ४० येथें विष्णूपंताची साक्ष छापली आहे. या जबानींत गिरजाबाईची जबानी विष्णूपंतांनीं क. ओव्हॅन्सकडे नेवून गुदरली असें म्हटलें आहे. तें सारें लबाडीचें आहे. ता. १६।११।१८४३ रोजीं, विष्णूपंताची जबानी पार्लमेंटरी बुकांत छापल्यानंतर त्याची नक्कल काशी येथें महाराजांच्या अवलोकनांत आली. महाराजांना मोठा विस्मय वाटला. विष्णूपंत महारा-

जांच्या विश्वासांतला. तो असें खोटें कसें लिहून देईल ? म्हणून महाराजांनीं विष्णूपंतास विचारणा केली. त्यावरून विष्णूपंतानें "मी जबानी दिलीच नाहीं. मला फितूरप्रकरणाचा मजकूर बिलकूल माहीत नाहीं. व गिरजाबाईची जबानी मी रेसिडेंट ओव्हॅन्ससाहेबांकडे गुजरली नाहीं या बाबे रेसिडेंट ओव्हॅन्ससाहेबांचे व बालाजी नारायण नातू यांचें माझें बोलणेंही झालें नाहीं. असें असतां ही खोटी जबानी बालाजी नातू याणी कोणापासून लिहून घेतली हें तेच जाणत असतील जो मजकूर माझें नांवें लिहिला तो कोणताच मला माहीत नाहीं." असें महाराजांना सांगितलें. त्यांवर महाराजांनीं त्याचा जबाब मि. कार्पेंटरजज्ज व एजंट यांचेसमोर शपथेवर लिहून घेतला व तो इंग्लंडमधील वकीलाकडे पाठविला. विष्णुपंतानें ओव्हॅन्सकडे खरोखरी जबाब लिहून दिला असता तर मुंबईसरकारनें खोट्या प्रतिज्ञेबद्दल (Perjury) आरोप ठेवून त्याच्यावर काम चालविलें नसतें ? पण विष्णुपंताचें मागाहूनचें म्हणणें खोटें आहे, असें म्हणण्याचें धारिष्ट ओव्हॅन्स साहेबांनाहि झालें नाहीं, कीं मुंबईसरकारासही झालें नाहीं. कारण त्यांचें मन त्यांना साक्ष देत होतें.

बरें विष्णूपंताचा जबाब बनावट तयार कां करण्यांत आला ? आम्हास वाटतें विष्णूपंत देवस्थली यांनीं स्वतःच दिलेलें उत्तर समाधानकारक आहे. ते म्हणतात, "मी महाराज सरकारचा चाकर व गोविंदराव याचा मामा हें लिहून देतों असें खरेपणा दिसण्याकरितां त्यांणीं खोटें लिहिलें असें मला वाटतें." अशा प्रकारचे, सातार्‍यास चाललेले हे चाळे, मुंबईसरकारास कळत नव्हते असें म्हणण्याचें धाडस आम्ही करीत नाहीं. किंबहुना यांपैकीं महत्वाच्या गोष्टींची कल्पना सर रॉबर्ट ग्रँटसाहेबांसारख्या पट्टीच्या वकीलाविना दुसर्‍यास सुचली नसावी. कारण जो पुरावा—खोटा कां असेना—म्हणून तयार केला होता त्याची जुळवणी चांगलीच खुबीची एकसूत्री अशी दिसते. असो. या प्रकारामुळें लफंग्या व बदमाश लोकांचें छान फावलें. खोटी जबानी द्यावी

व दौलत कमवावी यामुळें ६०।७० लोकांच्या जबान्या क. ओव्हॅन्स यांना मुंबईसरकारकडे पाठवितां आल्या.

केवळ द्रव्यलोभानेंच होते तरी इतके लोकही महाराजांविरुद्ध जाब देण्यास येते ना. पण या लोकांना एक गोष्ट पूर्तेपणें कळून चुकली होती कीं, आपण ज्या गोष्टी सांगणार त्या खऱ्याच मानल्या जाणार. त्याबद्दल तेढून उलट प्रश्न करणारा कोणीही नाहीं. महाराजांसमोर उभे राहून जबाब देण्याचा प्रसंग कधींही येणार नाहीं. अशी वस्तुस्थिती असल्यामुळें बाळाजी नातू कंपूनें तयार केलेल्या जबान्यांवर भराभर सह्या करून देण्यांत आल्या. अशा प्रकारच्या बनावट पुराव्याच्या जोरावर मुंबईसरकारनें हिंदुस्थानसरकारास व ईस्ट इंडिया कंपनीच्या डायरेक्टरांसही फसविलें व महाराजांवर निष्कारण आरोप तयार केले.

महाराजांविरुद्ध ही खटपट क. ओव्हॅन्स यांनीं केली ती, फितुराचा म्हणजे पहिला आरोप सबळ करण्यासाठींच नसून, फितुराचा आरोप पुराव्यानिशीं पक्का शाबीद न झाल्यामुळें दुसरे आरोप ठेवण्यासाठीं हा पुरावा चालला होता. या दुसऱ्या आरोपाची हकिगत पुढील स्वतंत्र प्रकरणांत दिली आहे.

प्रकरण २३ वें.

दुसरा आरोप.

इंग्रजी लष्कर फोडण्याचा महाराजांनीं प्रयत्न केला म्हणून जी तोहमत महाराजांवर घेण्यांत आली तिच्या खरेखोटेपणाची चर्चा आम्हीं मागें केली आहेच. हें कुभांड कितपत टिकेल ह्याची ग्वाही हें कुभांड रचणाऱ्यांचें मन स्वतः त्यांना देत होतें. मुंबईसरकारनें हें सारें कुभांड सजविलें खरें, पण हिंदुस्थानसरकारनें हें सारें बनावट आहे असा शेरा मारला तर काय

घ्या, असा पोक्त विचार करून महाराजांवर आणखी दुसरा आरोप ठेवण्यांत आला.

नागपूरकर मुधोजी भोंसले यांना पदच्युत करून जोधपुरास नेऊन ठेविलें होतें. वेदोक्ताच्या लढ्याचा निर्णय करण्याच्या कामीं शिवानंद शास्त्री यांना रेसिडेंटाच्या परवानगीनें महाराजांनीं नागपुरास पाठविलें होतें. या निव्वळ धर्मकारणाचें, राजकारण असल्याबद्दल बोभाटा करून व त्यासाठीं आणखी कांहीं बनावट साक्षीदार तयार करून मुधोजी भोंसल्यास सहाय्य करून इंग्रजांना हिंदुस्थानांतून घालवून देण्याचा महाराजांनीं कट केला आहे. असा त्यांजवर आरोप ठेवून तें प्रकरण ले. क. चार्लस् ओव्हॅन्स यांनीं गव्हर्नरमार्फत गव्हर्नरजनरलकडे पाठविलें. सुदैवानें गव्हर्नरजनरल लॉर्ड ऑक्लंड यांनीं फितुराचा आरोप साफ खोटा असल्याचें ठरविलें. पार्लमेंटरी बुक १ पान १०९ कलम ४ (प्र. म. आ. निराकरण भा. २ पान १०४).

या प्रकरणांत ओव्हॅन्स कंपूचा मुख्य व महत्त्वाचा साक्षीदार म्हटला म्हणजे राघो गोपाळ गयावळ. या राघोभटाचा धंदा काशी—रामेश्वराची यात्रा करणें व यात्रेकरू जमा करून नेणें. याला मोडी लिहितां वाचितां येत नसे. हा गया येथील छोटेलाल वैद्य गयावळ याच्याकडे नोकरीस होता. गयेस यात्रा न्यावयासाठीं नेहमींप्रमाणें छोटालाल याचा गुमास्ता म्हणून हा माहुलीस श्रीभागीरथींची कावड घेऊन रामेश्वरास जाण्यासाठीं आला होता. माहुलीस त्याच्या बायकोचें माहेर होतें.

सन १८३८ च्या फेब्रुवारीचा तो सुमार होता. ले. क. ओव्हॅन्स हे साताराचे रेसिडेंट होते. एके दिवशीं हा राघोबाभटजी गयावळ सासुरवाडीस असतां बाळाजीपंताकडील ३ जासूद, ले. क. ओव्हॅन्स यांचे २ पट्टेवाले व पंतप्रतिनिधींचा वकील महादजी गंगाधर उर्फ दाजीबा पटवर्धन, बरोबर ४ शिपाई असे १० असामी त्याजकडे आले. व त्या भटजीस कैद करून रेसिडेंटसाहेबाकडे निघाले. बिचारा राघोबा भटजी ! त्यानें पुष्कळ, पुष्कळ प्रकारें सांगितलें; अनेक शपथा घेतल्या; मी गरीब ब्राह्मण आहें, मला गरि-

बाला कां पकडतां, मीं काय कोणाची चोरी केली ? का दरोडा घातला ? का काय केलें ? म्हणून तुम्ही मला कैद करतां ? पण बिचाऱ्या राघोबाभटाचें ऐकतो कोण ? भर दुपारीं त्याला उन्हांतून माहुलीहून रेसिडेन्सीकडे चालविलें, विसाव्याच्या मारुतजिवळ आल्यावर बिचाऱ्या राघोबाभटास दम लागला पाऊल पुढें पडेना. घामाघूम झाला. त्याला वाटलें, येथें जरा मुक्काम करतील तर थोडें बरें वाटेल. पण राघोबाभटजीला सुख देण्याकरितां का त्या दहा-जणांनीं चालविलें होतें ? दाजीबा पटवर्धनानें विसाव्याच्या मारुतीजवळ विसावा घेण्याचें साफ नाकारलें. तेव्हां निरुपायानें बिचाऱ्यास धापा टाकीत रेसिडेन्सीकडे निघावें लागलें. या कडक कैदेमुळें राघोबा भटजी तर पार भेदरून गेला !

राघोबाला रेसिडेन्सीमध्यें आणल्यावर त्यास संत्रीच्या पाहाऱ्यांत ठेविलें. नंतर त्यास रेसिडेंटासमोर उभें करण्यांत आलें. रेसिडेंटांनीं त्यास विचारण्यास सुरवात केली.

रे० ओ०— महाराजांकडून तुम्हांस दरमहा रु० १५ पगार मिळतो हें खरें ना ?

राघोबा भटजी— महाराजांकडून पगार मिळत नाहीं.

रे० ओ०— महाराजांनीं तुमचेजवळ कांहीं कागद देऊन तुम्हांस कोठें पाठविलें होतें काय ?

राघोबा भटजी— मी श्रीक्षेत्र गया येथील उपाध्याय आहे. महाराजांनीं आपल्या उपाध्येपणाचा कागद लिहून दिला. त्याशिवाय कागदपत्र मला दिले नाहींत किंवा कोणाकडे द्यावयासही सांगितलें नाहीं.

रे० ओ०— फितुराबद्दल तुम्हांस कांहीं माहिती आहे काय ?

राघोबा भटजी— फितुराबद्दल वगैरे कागदपत्र आम्हांस कांहींच ठाऊक नाहीं.

रे० ओ०— तुम्हांस चार दिवस अटकेंत ठेवण्यांत येत आहे. तुम्हांस आणखी कांहीं पुसावयाचें आहे.

राघोबा भटजी— चार दिवस ठेवणार ते आठ दिवस ठेवा, पण मला गरिबाला कैद करूं नका, किंवा माझा जीव घेऊं नका.

रेसिडेंटसाहेबांनीं बाळाजी किबे यांना या ब्राह्मण कैद्याची जेवणाखाण्याची व्यवस्था करण्यास सांगितली. पण 'जी हुजुर' करणाऱ्या बाळाजीपंत किब्यानें जी सरकार म्हणून सांगितलें पण इतर कैद्यांप्रमाणेंच या गयावळास वागविलें. बिचारा कर्मठ ब्राह्मण. स्नानसंध्या वगैरेंनीं शुचिर्भूत झाल्याशिवाय तो बिचारा जेवणार कसा ? संध्याकाळीं दूध पिऊन बिचारा बाळाजीपंत नातू, दाजी पटवर्धन व बाळाजीपंत किबे यांना 'आशिर्वाद' देत उपाशीं झोंपी गेला !

दुसरे दिवशीं रे० ओव्हॅन्स यांनीं पुन्हां राघोभटास आपल्यासमोर बोलावून घेतलें. बाळाजी नातू व महादजी पटवर्धन सांगतील त्याप्रमाणें ऐकावें, असे त्यास म्हणाला. रेसिडेंट गेल्यानंतर दाजीबा पटवर्धन, बाळाजी नातू असे तेथें आले, व राघोभटजीस घेऊन एका खोलींत गेले.

बाळाजी म्हणाला, जयपूरचे राजे, जोधपूरचे राजे, शिंदे, होळकर, गायकवाड यांजकडे फितुराबद्दल महाराजांनीं पत्रें दिलीं तीं मीं पोहोंचतीं केलीं असें तुम्ही कबूल करा, अगर लिहून द्या म्हणजे तुम्हांस रेसिडेंटसाहेबांकडून दहा हजार रुपये बक्षीस व एक गांव इनाम देववितों. तुमचें कल्याण करवितों.

राघोबा भटजीनें विचार केला कीं, हे इनाम देतील ही गोष्ट खरी, परंतु असें लबाडीचें काम केलें तर आपणांस लोकांमध्यें तोंड दाखविण्यास जागा राहावयाची नाहीं. तेव्हां बाळाजीपंतास तो म्हणाला. " आपण थोर माणूस, आणि माझ्यासारख्या सच्छील ब्राह्मणास असें खोटें लिहून द्यावयास कसें बरें सांगतां ? हें असें करणें ठीक नाहीं ! "

त्यावर बाळाजीपंत नातू म्हणाला, " भटजी, आम्ही सांगतों त्याप्रमाणें करा. म्हणजे इंग्रजीसरकार तुह्मांवर मेहेरबानी ठेवील. तूर्त कैदेंत लोक

आहेत त्यांनीं आमच्या सांगण्याप्रमाणें लिहून दिलें आहे. व त्यावर रेसिडेंटाची मर्जी बहाल आहे. तुम्ही कबूल केलें तर तुमचेवरही सरकारची मर्जी बहाल होईल. राघोबा इतक्या गोष्टी सांगूनही बधेना, तेव्हां बाळाजी म्हणाला " इतक्याउप्पर तुह्मी कबूल होत नाहीं तर तुम्हांस काळ्या पाण्यावर पाठवूं, अगर फाशीही देऊं, अगर बेडी घालून जन्मठेप देऊं. "

राघो भटजी घाबरून गेला. परंतु खोट्या कर्मास त्याचें मन प्रवृत्त होईना. भयाभीत होऊन तो म्हणाला " मला कांहींच ठाऊक नाहीं. तेव्हां खोटें काय म्हणून लिहून द्यावें. "

नंतर राघोबाभटजीस पटवर्धन व नातू यांनीं पुनः रेसिडेंटाकडे नेलें व हा भटजी कांहीं कबूल होत नाहीं, असा रिपोर्ट दिला. रेसिडेंटांनीं नंतर फार राग आल्याचा अविर्भाव करून दाखविला व भटजीला घाबरवून सोडिलें. तरीदेखील जुन्या काळांतला कर्मनिष्ठ ब्राह्मण तो. तो खोट्या गोष्टीस कबूल होईना. पण बाळाजीपंत नातू कांहीं कमी अक्कलवान् नव्हता. त्यानें गणेश विष्णु गुणे, मंत्री यांचा कारकून, यास बोलावून आणिलें. व त्यास कांहीं कागद लिहावयास सांगितले. कागद लिहून झाल्यावर त्याजवर सही करण्यास राघोबा भटजीस सांगण्यांत आलें. परंतु राघोबाभटानें तें नाकारलें. तो म्हणाला तुम्ही सही करण्यास सांगता खरी पण मला मोडी वाचावयास येत नाहीं; मग तुम्हीं भलतासलता मजकूर लिहिला त्यावर सही करूं कशी ? त्यावरून दाजी पटवर्धनास राग आला. तो म्हणाला, असा युक्तिवाद करून हा भटजी ऐकावयाचा नाहीं. याला चौदावें रत्न दाखविलें पाहिजे. नंतर दाजीबानें गुण्यास हांक मारली. गुण्यानें राघोभटजीचें हातीं लेखणी दिली व बलात्कारानें त्याजकडून त्या कागदावर सही करून घेतली. हात धरून अक्षरें काढून घेतलीं. (प्र. म. आ. नि. भाग २ पान ८२)

अशा प्रकारें तेरा दिवस राघोभटजीकडून निरनिराळ्या कागदांवर सह्या घेण्याचा क्रम चालला होता. एकदां ह्या राघोभटजीची कंठाळी रेसिडेंटसाहेबासमोर ठेवून ती उलगडण्यांत आली; व त्यांतून कांहीं कागद बाहेर

काढण्यांत आले. हे कागद त्या कंटाळींत केव्हां कसे आले हें त्या बिचाऱ्या भटजीस समजावें कसें ?

राघो भटजी रेसिडेंटसाहेबाचें म्हणणें कबूल करीना. सबब त्यास १८॥ महिने कैदेंत ठेवण्यांत आलें. अखेर १८३९ मध्यें महाराजांना राज्यावरून दूर करून काशीस नेलें तेव्हां राघो भटजीस कारागृहांतून मोकळे केलें.

तारीख २४-३-१८४० रोजीं मुंबईचे गव्हर्नरसाहेबांना राघोभटजीनें जें पत्र लिहिलें आहे, त्यामध्यें त्यानें आपणांवर कसकसा जुलूम करण्यांत आला. याचें वर्णन केलें आहे. (प्र. म. आ. नि. भाग २ पान ८० ते ८३ पहा) तो म्हणतो मोडीचें अक्षर आम्हांस लिहितां येत नाहीं असें सांगत असतां पटवर्धन त्याजबरोबर एक दांडगा—गुण्या—होता...या दोघांनीं माझे हातीं लेखणी देऊन हात धरून अक्षरें काढून घेतलीं. असे तेरा दिवसपर्यंत दररोज ओव्हॅन्स रेसिडेंटसाहेब व नातू व पटवर्धन हे कागद लिहून त्याजवर माझे हातें लेखणी देऊन हात धरून अक्षरें काढून घेत होते.."

अशा प्रकारें बनवलेला पुरावा नातूकंपूनें रे. ओ. साहेबांचे हातीं मुंबईसरकारकडे पाठवावा. तेथें सेक्रेटरी विलोबी होतेच. शिवाय गव्हर्नर सर रॉबर्ट ग्रँटसाहेब हेही होते. त्यांनीं ह्या पुराव्याचा जेवढा बडेजाव करतां येईल तेवढा करावा. परंतु महाराजांच्या सुदैवानें लॉर्ड ऑक्लंड गव्हर्नरजनरलसाहेब यांनीं या सर्व पुराव्याचें स्वरूप व तो तयार करणारांचें ह्रद्गत चांगलेंच ओळखलें होतें व म्हणून त्यांनीं हा पुरावा खोटा ठरविला.

आतां महाराजांवर हा जो मुधोजी भोंसल्याशीं संगनमत केल्याचा पुरावा सांगितला, त्यासंबंधानें अंमळ विचार केला तर हा आरोप कसा खोटा होता हें वाचकांना समजून येणार आहे. एक तर असें, कीं खुद्द महाराजांचें पत्र मुधोजी भोंसले यास पाहिजे होतें. तसें महाराजांचें स्वदस्तूरचें पत्रही नाहीं. मुधोजी भोंसले याचें पत्र आहे. पण तें मुधोजी भोंसले आप्पासाहेब यांचे स्वदस्तूरचें आहे हें कशावरून ? शिवाय यासंबंधानें दुसराही एक

विचार लक्ष्यांत घेण्यासारखा आहे. महाराजांना इंग्रजी सत्ता उलथून टाकावयाची असती, तर त्यांनीं पदच्युत झालेल्या, परांगदा पावलेल्या, निर्धन, राजपुरुषाशीं संधान बांधलें असतें काय ? व हें म्हणणें कितीसें सयुक्तिक दिसेल? बरें मुधोजी राजे भोंसले ऊर्फ आप्पासाहेब यांनीं महाराजांना इंग्रजांविरुद्ध मदत ती काय करावयाची ? आप्पासाहेबाजवळ ना सैन्यबळ; कीं ना द्रव्यबळ. अशा स्थितींत आप्पासाहेब, प्रतापसिंहमहाराजांच्या उपयोगी काय पडणार ?

महाराजांना पदच्युत करण्यापूर्वी सर जेम्स कार्नाक यांनीं महाराजांना या फितुरासंबंधानें विचारलें. जेम्स कार्नाक म्हणाले, आम्हांस मुधोजी भोंसले यांचें पत्र मिळालें आहे. त्यावर महाराजांनीं सांगितलें कीं "अंडरसन साहेबास कोणी कांहीं मजकुराचें पत्र लिहिलें पण तें जर अंडरसन साहेबास मिळालें नाहीं तर अंडरसनसाहेब काय सांगेल ? " महाराजांच्या या मार्मिक उत्तरानें गव्हर्नरसाहेब निरुत्तर झाले.

राघोभटजीवर जो जुलूम करण्यांत आला, त्यावरूनही हा आरोप महाराजांवर कसा बनावट रचण्यांत आला होता, तें कळून येणार आहे. राघोभटानें जर खरोखर महाराजांना पत्रें आणून देण्याचें वगैरे काम केलें असतें, तर माफी व दहा हजार रुपयांचें बक्षीस व शिवाय एखादें गांव इनाम मिळत असतांना तें घेण्याचें तो कां बरें सोडून देईल ? राघोभटजीनें जें कार्नाकसाहेबांना पत्र लिहिलेलें आहे, तें वाचलें असतां राघोबाभटाप्रमाणेंच महाराजांचेंही अनपराधित्व शाबीत होतें; व हा आरोप नातू कंपूनें बनावट तयार केला होता हेंही उघड होतें.

दुसरें असें कीं, महाराजांविरुद्ध पुरावा घेतला, तो लुंग्यासुंग्या भटांभिक्षुकांचा. ज्या आप्पासाहेबांशीं महाराजांनीं संगनमत केलें असें शाबीद करण्याचा खटाटोप चालला होता त्या आप्पासाहेबांचा पुरावा कां घेतला नाहीं ? आप्पासाहेब कांहीं मोकळा नव्हता. जोधपुरास रेसिडेंटच्या पाहाऱ्यामध्येंच हे नागपूरचे पदच्युत राजे होते मग यांची जबानी कां घेतली नाहीं ? पण सर्वच रेसिडेंट ओव्हॅन्ससारखे नव्हते, किंवा त्यांच्या राशीस बाळाजी नातू, बाळाजी किबे वगैरे आलेले नव्हते. जर आप्पा-

साहेब भोसल्यांनीं ईस्ट इंडिया कंपनीचें हिंदुस्थानांतील राज्य उलथून टाकावयाचा यत्न केला होता, तर त्याबद्दल त्यांची चौकशी कां बरें करण्यांत आली नाहीं? जो कांहीं पुरावा या आरोपाच्या बाबतींत घेण्यांत आला, तो फक्त सातारा येथें घेण्यांत आला. राघोबा भटजीचें म्हणणें खरें मानलें तर बाळाजी नातू व किबे यांच्या धाकदपटशाहानें अगर लाचलुचपतीनें बनावट असाच पुरावा घेण्यांत आला असेंच म्हणावें लागतें. मुधोजी राजे भोंसले यांचें जर स्वदस्तुरचें पत्र बाळाजी नातू कंपूच्या हातीं लागलें होतें, तर त्यांनीं मुधोजी राजे याजवर आरोप शाबीत करावयाची कांहीं तरी खटपट करावयास पाहिजे होती. परंतु खरा प्रकार पाहिला तर अशा प्रकारचा उपक्रम रेसिडेंटनीं केला नाहीं, कीं हिंदुस्थान सरकारास तसें करण्यास यांनीं सुचविलें नाहीं.

आतां ज्या राघोबा भटाच्या कंठाळींत हे कागद सांपडतात, तो राघोबा भट ह्मणतो "हे कागद माझ्या कंठाळींत कसे आले, तें मला ठाऊक नाहीं. मुधोजी भोसले यांनीं मला दिले नाहींत, राजकारभाराच्या भानगडी मला माहीत नाहींत. मी आपला गरीब ब्राह्मण. यात्रा जमा करून नेणार." मग हे कागद राघोभटाच्या कंठाळींत आले कसे? राघोभट रेसिडेंन्सींत कैदेंत होता, तेव्हां त्याची कंठाळ नातूकंपूच्या स्वाधीन होती. त्या कंठाळींत बनावट कागद घुसडणें फारसें कठीण नव्हतें ज्या कंपूनें पेडणें मुक्कामीं बनावट शिक्के तयार करण्याचा व पत्रें लिहिण्याचा कारखाना उघडला होता, त्यांना २१४ पत्रें पदच्युत राजाच्या नांवचीं तयार करून, तीं गरीब ब्राह्मणाच्या कंठाळींत कोंबणें कठीण कसलें?

मुधोजीराव भोंसल्याकडील पत्र, ओव्हॅन्स वगैरेंच्या मतानें जर मोठा बळकट पुरावा होता, तर त्याबद्दल मुधोजीरावाकडे चौकशी कां बरें केली नाहीं? गरीब राघोभट गयावळास छळण्याचा व त्याला १०००० रुपये व १ गांव इनाम देण्याची लालूच दाखविण्याचा व्याप ले० क० ओव्हॅन्स यांनीं कां बरें केला? तसेंच हिंदुस्थान सरकारास लिहून त्यांच्या मार्फत जोधपूर दरबारच्या रेसिडेंटाकरवीं मुधोजीरावाचा जबाब कां बरें घेण्यांत

आला नाहीं ? आम्हांस वाटतें, असें करण्याचें धैर्य ओव्हॅन्स कंपूत नव्हतें. त्यांना आपण करीत असलेल्या गोष्टींचा खरेखोटेपणा कसोटीस लावला तर त्याचें बनावट स्वरूप उघडकीस येईल असें भय वाटत होतें, म्हणून तसला प्रयत्न त्यांनीं केला नाहीं. राघोभटाला छळून आपणच लिहिलेल्या कागदांवर त्याच्या सह्या करवून घेण्यापेक्षां जास्त प्रयत्नास ते लागले नाहींत !

राघोभटाच्या कंठाळींत घालून पुन्हा त्यांतून बाहेर काढलेल्या या पत्रांचा गव्हर्नर कान्र्याकसाहेबांनीं मोठाच बाऊ केला ! त्यांना वाटलें कीं, हीं पत्रें खरींच आहेत. ले० क० ओव्हॅन्सनीं त्यांच्या खरेपणाची ग्वाही दिलेली, बाळाजीपंत नातू व बाळाजी किबे यांनीं तीं राघोबाच्या कंठाळींत सांपडलेलीं, असें प्रतिज्ञेवर सांगितलेलें. इतक्या गोष्टी ऐकल्यावर कान्र्याक साहेबांनीं तरी बिचाऱ्यांनीं काय करावें ? त्यांना खऱ्या प्रकाराबद्दल उमज पडावा कसा ? महाराजांचा नाश करण्यासाठीं पूर्वींच्या गव्हर्नराच्या कारकीर्दीमध्यें ब्राह्मण व नोकरशाही यांचा कट झाला होता, व त्यास कारणही होतें, हें त्यास पूर्णपणें कळलें नसावें. म्हणून सरळपणें या गोष्टीचा जसा अर्थ करतां येण्यासारखा होता तसाच अर्थ कदाचित् या गव्हर्नरानें केला असावा. या गोष्टी कान्र्याकसाहेबांनीं महाराजांना विचारल्या तेव्हां महाराजांना तरी त्या पत्रांची माहिती कोठें होती? त्यांनीं सरळपणें कान्र्याकसाहेबांना विचारलें कीं आपणास अंडरसनसाहेबांनीं कांहीं मजकुराचें पत्र लिहिलें, तर त्याबद्दल अंडरसन साहेब जबाबदार—आपण त्याबद्दल खरोखर माहीत नसल्यास काय बरें सांगणार !" असो. अशा प्रकारें महाराजांना पदच्युत करण्यापूर्वीं महाराजांवर जो मोटा बळकट पुरावा धरून महाराजांना भेडसावण्यांत आलें, तो पुरावा वर वर्णन केल्याप्रकारचा होता. अशा प्रकारच्या बनावट पुराव्याचा व्यूह रचून त्यामध्यें महाराजांना अडकविण्याचा प्रयत्न चालला होता, हें वाचकांच्या लक्ष्यांत आलें असेलच.

प्रकरण २४ वें.

क्षत्रिय कीं शूद्र.

प्रभू व ब्राह्मण यांच्यामध्यें वाद उपस्थित झाला व तो कोणत्या थरास जाऊन पोहोंचला, तें मागील 'धर्माभिमान कीं राजद्रोह' या प्रकरणांत सांगितलें आहेच. त्या भानगडींत चिंतामणराव पटवर्धनानें संकेश्वर मठाच्या स्वामींस धाकदपटशा दाखवून त्यांजकडून सन १८२५ मध्यें यादी मिळविली. ती प्रभू जातीविरुद्ध होती खरी, परंतु त्यामध्यें आणखीहि मजकूर असा होता कीं, "कलींत क्षत्रिय नाहींत. कै. शिवाजीमहाराज, संभाजीमहाराज यांनीं क्षत्रिय मुळींच नाहींत असें ठरविल्याचें दाखले महाराजांचे दप्तरांत बार झालेले आहेत."[1]

अशा प्रकारचा खोटा मजकूर चिंतामणराव पटवर्धन वगैरेनीं शंकराचार्यांच्या यादींत घुसडून दिला. बळवंतराव चिटणीसानें हा मजकूर मराठा मंडळीच्या अवलोकनांत आणला व त्यांना ब्राह्मणांविरुद्ध महाराजांकडे तक्रार करण्यास चिथावणी दिली. त्यावरून त्यांनीं ता० २७-७-१८२७ रोजीं महाराजांकडे एक यादी लिहिली त्यामध्यें ४ कलमें होतीं. कलम १ लें असें होतें:--

१ ब्राह्मणांचा व चांद्रसेनीय कायस्थ प्रभू यांचा खटला दोन तीन वर्षें पडला आहे. उभयतांनीं परस्परें लिहीणें असेल ते लिहावे. परंतु पुण्याहून ब्राह्मणांनीं पत्रें पाठविलीं त्यांत क्षत्रिय नाहीत असे भाव, तेव्हांच येविसीं बोलावें. तरीच सामिलता दिसेल सबब न बोलले या पत्रांत चंद्रसेनिय व आपला मजकूर ल्याहवा. ते मोघम क्षत्रिय नाहींत असें लिहिले. ती पत्रें सारी माघारी आणवून त्यांतील ही अक्षरे काढून टाकावीत.

---

1 सिद्धांत विजय.

दुसऱ्या कलमांत हीच गोष्ट जास्त विस्तारानें मांडली आहे. त्या कलमांतील मजकूर पुढीलप्रमाणें आहे:—

२ हाली चिंतामणराव पटवर्धन यांनीं शंकराचार्य करविरकर याचे समते यादी करून यादी व पत्रें केली. त्याचे मनांत येकंदर क्षत्रियच नाहींत असें समजानी केले नाहीसे वाटते. सबब मोघम क्षत्रिय नाहींत हे लिहीले परंतु सर्व समजदार असतात असें सर्व ठिकाणीं देशोदेशीं आहे आसे नाहीं. व हालीचे यादींत कैलासवासी शिवाजीमहाराज संभाजीमहाराज व शाहूमहाराज पत्रे व निर्णय ठरविला असें जमेस धरून लिहीतात. त्यास सरकारी दप्तरीं कोणतेही ज्ञातीविषयीं निर्णय ठरून बार झाले नाहीं. **कोणतेही ज्ञातींत आपळी कमी आहे तरी सावरून नीट दाखविणें असी चाल आहे.** तेव्हां त्याणीं निर्णय केले ते आपली जात (क्षत्रिय) नाहीं असें कसें लिहीतील तेव्हां पत्रें खोटीं असतील असें वाटतें. यद्यपि असली तरी ज्ञातीप्रकरणांत सरकार पाहणें नाहीं तेव्हां या पत्राचे समत लिहिणे गरज नाहीं. दक्षिण हिंदुस्थानांत चाल इकडील सहीची पत्र मानतात त्याअर्थी लिहूं नये लिहिली गेली असतील तरी दुसरी पत्रें इतके जागीं पाठवावी कीं हा मजकूर चांद्रसेनी प्रभूचा व ब्राह्मणाचा आहे. क्षत्रिय आहेत त्याचा नाहीं किंवा सारांश यादी एकंदर सारे आणवून कैलासवासी महाराजांचे निर्णय ठरले व पत्र बार केले हें व क्षत्रिय नाहीत हे काढून पाहिजे तरी रवाना करवी येविसी कसें ठरलें ते ठरून उत्तर यावे हें कंपनी सरकारकडे करणे आहे.

तसेंच पुढील कलम ३ मधील मजकूर—

३ सदरहू प्रमाणें न झाले तर ज्ञातीवाले आपले ज्ञातीविसी मुखत्यार आहेत. तेव्हां खटला नसतां जो काढील त्यांस पुसणें ज्ञातीविषयानें येईल सबब हें व्हावें हें चांगलें आहे. हा विचार कंपनी सरकारास कळवावा असे नाहीं सबब लिहीले आहे व सरकारही ज्ञातीप्रकरणांत पहात नाहीं त्यांत चांद्रसेनी प्रभूविसीही सरकारी कागदांत सड लिहीली आहे. हें नसावें परस्परें आपले ज्ञातींत मुखत्यार आहे सड राहिली असतां सरकारी मदत ब्राम्हणाकडे

आहे असें दिसतें. व मुखत्यार म्हणण्यास दोष सरकारांस येतो व आमचे ज्ञातीचा मार्ग पुसणें तो ब्राह्मणास पुसूं किंवा आम्ही पाहूं परंतु हें कांहीं नसतां लिहिणें गरज नाहीं सबब लिहिलें आहे लिहील्याप्रमाणें ठरवून व्हावें."

यात्रमाणें मराठे मंडळीनीं महाराजांना यादी लिहून ब्राह्मण पुढारी चिंतामण पटवर्धन याच्या कलींत क्षत्रिय नाहींत या खोडसाळ विधानाचा बंदोबस्त तरी करा, अगर तसें न केल्यास या बाबतींत ब्राह्मणांना तुम्हीच सामील झाला आहां, असें म्हणणें ओघानेंच प्राप्त होईल, असें कळविलें. त्यावेळीं कांहीं मराठ्यांमध्यें आजच्यापेक्षां जास्त स्वाभिमान होता व आपणांस ब्राह्मण क्षत्रिय म्हणावयास कबूल नाहींत ही गोष्ट ते मुकाट्यानें ऐकून घेण्यास तयार नव्हते. महाराजांना भेटून व इतर मार्गानीं त्यांनीं महाराजांना या गोष्टीचा निर्णय करून द्यावयास भाग पाडलें.

महाराजांनीं ब्राह्मण विद्वान मंडळीस व शंकराचार्यांस याबद्दल पत्र लिहिलें. त्यावर शंकराचार्यांचें उत्तर आलें तें असें—

फाल्गुन मासी आम्ही श्रीगोदावरी यात्रेस जाण्या बाो पुण्यानजीक पर्वतीचे मु॥ जाऊन राहिलों. त्या समई चांद्रसेनीय ज्ञातीचे शास्त्रार्थाबाो ब्राह्मणांत तंटा पडला होता तेव्हां उभय पक्षीचे ब्राह्मण दर्शनास येऊन मार समजविला. त्या सभेंत तुम्ही बोलला कीं, स्वामींनी गंगोदक व तुल(सी) घेऊन श्रीदेवासंनिध बसून निरमछरपणें चांद्रसेनीय ज्ञातीस वेदकर्म अधिकार आहे किंवा नाहीं हे सत्ये सांगावे अथवा निरमछर शास्त्री-पंडित माहनक्षेत्री बसवून शास्त्रसंमते निरणय करून सांगावे परंतु त्यावेळीं चांद्रसेनीय शास्त्रार्थ विस्य खंडन मंडन करून पत्रे दिल्ही कारण **चिंतामणराव याचे मनीं चांद्रसेनीय यांचा द्वेष—कोपीपक्षो आणखी चांद्रसेनीय ज्ञातीचे द्वेषाचे आग्रगण्य बालाजीपंत नातु विपरीत बोधिता** नातु आमचे संस्थानास उपद्रव करतील या भीतिस्तव नातूचें मनोधारणार्थ मुद्रापूर्वक पत्रे दिल्ही परंतु ती पत्रें मिथ्या सा। हल्लीं रद करून चांद्रसेनीय ज्ञातीविसी शास्त्रग्रंथ ग्रंथसंमती

पाहता चांद्रसेनांना वैदिककर्म अधिकार सत्ये आहे त्याजवरून हें पत्र तुह्मास लिहिले आहे.

या उत्तरावरून शंकराचार्य म्हणजे चिंतामण पटवर्धनाच्या हातचें बाहुलें होता व तो 'शिकविता धनी शिकविल' तें बरळत होता, हें कळून येणार आहे. 'कलींत क्षत्रिय नाहींत' इतकें चिंतामणरावानें फर्मान सोडलें मात्र. कीं भटाभिक्षुकांनीं त्याप्रमाणें अंमलबजावणी करण्यास सुरवात केली. **क्षत्रिय कुलावतंस छत्रपतींना देखील क्षत्रिय म्हणावयास ब्राह्मण कबूल होईनात.** जे ब्राह्मणांतील विद्वान्, पंडित, शास्त्री होते, ते विद्वत्तेचा आव आणून महाराजांना म्हणाले, "महाराज, आपण क्षत्रिय असतां तर तुमची मुंज वेदोक्त मंत्रांनीं केली असती, तुमच्या येथील इतर विधी वेदोक्त पद्धतीनें केले असते. राज्याभिषेक वेदोक्त मंत्रांनीं केला असता. पण तुमच्या व तुमच्या वडिलांच्या वेळेपासून सारे विधि पुराणोक्तच मंत्रांनीं करण्यांत येत आहेत. तेव्हां तुम्ही क्षत्रिय नाहीं याबद्दल आणखी पुरावा काय पाहिजे ?" ब्राह्मण पंडितांच्या म्हणण्याप्रमाणें परिस्थितीचा विचार केला असतां सत्याचा अंश होता.

आपण क्षत्रिय असतां आपला विश्वासघात करून ब्राम्हणांनीं पुराणोक्त विधीची पद्धत आपल्या गळ्यांत अडकवली असणार ! असा प्रतापसिंह महाराजांना संशय आला. कारण आद्य छत्रपतींनीं आपलें क्षत्रियत्व शाबीद करण्यासाठीं जो प्रयत्न केला, त्यांना हें वेदोक्त पुराणोक्त बंड समजलें नसेल असें कसें म्हणावें ? मध्यंतरी छत्रपतींना इतर गोष्टीप्रमाणें धार्मिक बाबींकडे देखील लक्ष्य देण्यास अवसर नव्हता. त्या गोष्टीचा फायदा घेऊन, दगलबाजी करून, ब्राह्मण पंडितरावानें हा प्रघात पाडला असावा. ही दगलबाजी कोणीं, केव्हां व कशी केली, या गोष्टीची चौकशी करून, विचार करणें महत्वाचें असलें तरी आतां प्रश्न अधिकाराचा होता. महाराजांना वेदोक्त पद्धतीनें विधि करून घेण्याचा अधिकार आहे कीं कसें ? तसेंच महाराजांचे आप्त, सोयरे, धायरे वगैरे राजेरजवाडे कोणत्या प्रकारचे

विधीमार्ग अनुसरतात. जर नागपूरकर, तंजावरकर, उदेपूरकर, म्हैसूरकर हे क्षत्रियोचित वेदोक्त विधीनें आपल्या घरीं कर्में आचरीत असले, तर आपणांसहि तसें करावयास अधिकार आहे. त्यांच्याकडे जर पुराणोक्त विधीनेंच कर्में चालविलीं जात असलीं तर तीं कां ? याचाही तपास आणविला पाहिजे.

प्रतापसिंह महाराज विचारी व शांतताप्रिय होते. सनदशीर मार्गानें प्रत्येक गोष्ट करावी हें त्यांचें ध्येय होतें. म्हणूनच त्यांनीं वरीलप्रमाणें योजना ठरविली. त्यांच्याऐवजीं दुसरा एखादा राजा असता तर त्यानें पंडितरावास व राजोपाध्यास फर्मान सोडलें असतें कीं, याउप्पर आमच्या इकडील सर्व कर्में वेदोक्त पद्धतीनें झालीं पाहिजेत; तसें न केल्यास तुमचीं इनामें जप्त करूं; व जो कोणी आमच्या ह्मणण्याप्रमाणें वागण्यास कबूल होईल, त्यालाच पंडितराव व राजोपाध्ये नेमूं. पण तसें एकदम करणें महाराजांच्या न्यायी व विचारी मनास पसंत पडलें नाहीं. त्यांनीं तंजावर, म्हैसूर, नागपूर, वडोदें, धार, देवास, उदेपूर वगैरे ठिकाणीं आपलीं माणसें पाठवून तिकडील हकीकत समजावून घेण्याचा बेत ठरविला, व त्याप्रमाणें माणसें पाठविण्यास रेसिडेंटची परवानगी मागितली. त्याप्रमाणें महाराजांना माणसें पाठविण्यास रेसिडेंटाकडून तारिख ११।१२।१८२८ रोजीं परवानगी मिळाली.

महाराजांच्या बाबतींत व मराठामंडळाच्या बाबतींत ते क्षत्रिय नाहींत म्हणून ब्राह्मणांनीं जो हेका धरला, त्या बाबतींत शास्त्राधारें वादविवाद करून निर्णय करावा असा महाराजांनीं बेत ठरविला, व पंडितांची एक सभा बोलावली. या सभेपुढें एकंदर २४ मुद्दे निर्णयासाठीं आलेले होते. ही सभा अत्यंत महत्वाची होती. कारण पुण्यापासून ते बेळगांव पावेतों झाडून सारे शास्त्री पंडित शालजोड्या पांघरून सभेसाठीं आले होते. संस्कृत पाठशाळेंत ही

---

१ या ठिकाणीं शहर फौजदार कचेरी होती. आतां ही इमारत पाडून त्या ठिकाणीं टांगा स्टँड केला आहे. ही इमारत कांहीं वर्षांमागें चांगल्या स्थितींत होती. व ती आपण पाहिल्याचें पुष्कळ लोक सांगतात.

सभा कित्येक दिवस भरत होती. क्षत्रियमंडळाच्यातर्फे वकीलपत्र एका क्षत्रियासच द्यावें लागलें. हे क्षत्रिय गृहस्थ म्हणजे विठ्ठल सखाराम उर्फ आबा पारसनीस. यांनीं फारशी भाषेंत व संस्कृत भाषेंत चांगलें प्राविण्य संपादन केलें होतें. शास्त्रांचाही अभ्यास चांगलाच केला होता. ब्राह्मण मंडळीचें वकीलपत्र वे. शा. सं. राघवाचार्य गजेंद्रगडकर यांस देण्यांत आलें होतें. संस्कृत पाठशाळेंत शास्त्राधारें उभयतांचा वादविवाद कित्येक दिवस चालला होता. अथपासून इतिपर्यंत सारा वाद लेखी पूर्वपक्ष उत्तरपक्ष अशा पद्धतीनें चालला होता.

ज्या दिवशीं निकाल व्हावयाचा त्या दिवशीं शेंकडो कोसांहून ब्राह्मण-मंडळी निकाल ऐकण्यासाठीं जमली होती. **निकाल आपल्याविरुद्ध दिला तर तुमचीं डोकीं फोडूं मग काय होईल ते होवो अशा प्रकारें पंचांना ब्राह्मणांनीं धमकी दिली.** ” आपल्याविरुद्ध निकाल देणारांची साधल्यास डोकीं फोडून सूड घेण्याची विद्या भिक्षुकवर्गास चांगलीच अवगत असल्या-मुळें “ दंगाधोपा होऊं नये म्हणून महाराज स्वतः नागव्या तरवारीनें पहारा करित होते. महाराजांनीं सेनापति बाळासाहेब अगर दौलतखान यांना या कामगिरीवर मुद्दामच नेमिलें नाहीं. कारण बेजबाबदारपणें वागणाऱ्या भटाभिक्षुकांशीं तो प्रसंग होता. भटांनी कांहीं फाजीलपणा केला व दौलतखान अगर बाळासाहेब चिडते तर भटांचे मुडदे पाडल्याशिवाय ते राहते ना. तेव्हां इतक्या थरास गोष्टी जाऊं नयेत म्हणून बंदोबस्ताचें काम महाराजांनीं स्वतः आपल्याकडे घेतलें होतें.

पुष्कळशी भवति न भवति होऊन अखेर या सभेंत **क्षत्रियांचें अस्तित्व शाबीद झालें.** परशुरामानें निःक्षत्रिय पृथ्वी केल्याची गोष्ट खोटी ठरली. क्षत्रियांना वैदिककर्म सोडावयास लावण्याचा परशुरामानें प्रयत्नही केला नाहीं. क्षत्रिय संकरज आहेत, हें म्हणणें मिथ्या आहे. दोन राजे सोम व

---

२ या आबा पारसनीसांचे नातू इंग्रजी अमलांत साताऱ्चे शहर फौज-दार होते.

सूर्य वंशांतील कलि—आरंभीं बद्रिकाश्रमास गेले, म्हणून सारेच क्षत्रिय नाहींसे झाले असें नाहीं. तसेंच 'नंदांतं क्षत्रिय कुलम्' । हें म्हणणें मिथ्या आहे. आचाराप्रमाणें जाती ठरत नाहींत. मांसभक्षक क्षत्रियांस कलींत वैदिक कर्म करण्यास हरकत नाहीं. तसेंच सोंवळ्याओंवळ्याचे निर्बंध, शूद्रान्नसेवन, वांगीं, गाजरें वगैरे अभक्षणीय पदार्थांचें सेवन, कर्मलोप वगैरे गोष्टींनीं क्षत्रियत्वास व वेदाधिकारास हरकत येत नाहीं. वगैरे अनेक गोष्टींचा निर्णय या सभेंत लागला. सातारा, कोल्हापूर, चंदी येथील राजघराण्यांत ऋग्वेदावरून कर्म चालतें. पण उदेपुरास यजुर्वेदावरून कर्म चालतें. त्याप्रमाणें सातार्‍यास यजुर्वेदावरून महाराजांनीं कर्म सुरू करावें.

अशा प्रकारचा सभेनें निकाल दिला पण त्यानें ब्राह्मणांचें समाधान झालें नाहीं. उलट ते जास्तच चिडून गेले. ब्राम्हण जर सत्यान्वेषी असते. तर या निकालानें ते खास चिडले नसते. ब्राम्हणांमध्यें मनाचा थोरपणा असता तर हिंदुस्थानचा इतिहास निराळा बनला असता. "हिंदूंमध्यें राष्ट्रीय भावनांचा उदय व्हावा असें वाटत असल्यास धार्मिक भेदाभेदांना त्यांनीं फांटा दिला पाहिजे, व आपले पूर्वापारचे हक्क, ज्याप्रमाणें जपानमधील सामुत्सरायानीं सोडून दिले, त्याप्रमाणेंच ब्राम्हणांनींही सोडून दिले पाहिजेत" असें ब्रिगेडिअर जनरल कॉस्मॉस स्टुअर्ड यानीं म्हटलें आहे. पण अशा प्रकारचे विचार फारच थोड्या ब्राम्हणांना सुचतात व त्यांपैकीं फारच थोड्यांना ते उघडपणें बोलून दाखविण्याचें धैर्य असतें. राजारामशास्त्री भागवत, अगर गोपाळराव आगरकर यांच्यासारखे थोडके; बहुसंख्यांक ब्राह्मणसमाज कर्मठ व त्यामुळें मनाचा कोता.

---

१ Before Indians could aspire to Nationalism, they must rise superior to religious differences, and the twiee born Castes among Hindus, must voluntarily sacrifice their ancient previleges, as did the Samutsarias in Japan.

Brig. Gen. Cosmos Steward D. S. O.
Blackwoods Magazine, No. 848.

तसें नसतें तर महाराज व त्यांची आप्तमंडळी क्षत्रिय आहेत, असें शास्त्राधारें शाबीद होतांच ते आनंदानें महाराजांचें अभिनंदन करावयास गेले असते. परंतु त्यावेळचे भटभिक्षुक सद्भावनेनें महाराजांच्या व मराठामंडळाच्या क्षत्रियत्वास विरोध करीत नव्हते. त्यांचा हेतु नीचतम कोटींतला होता. त्यांच्या गुरूची शिकवण सात्विक वृत्तीची नव्हती. गुरुजींनीं त्यांना केवळ कलह करण्यासाठीं जमा व्हावयास सांगितलें होतें. पण त्यांना महाराजांचा दरारा इतका वाटला कीं, त्यांच्यापैकीं कोणासही ब्र उच्चारण्याची छाती झाली नाहीं.

या सभेच्या निकालानंतर ब्राम्हणांनीं हट्टास पेटून महाराजांच्या व इतरांच्या घरीं वैदिक मंत्रांनीं कर्म करण्याचें नाकारलें. किंबहुना कोणीही महाराजांकडे व त्यांच्या आप्तमंडळीकडे वैदिक मंत्रांनीं कर्म करण्यास जाऊं नये, असा ब्राम्हणांनीं कट केला. पंडितराव वगैरे ब्राम्हण इनाम जाईल या भीतीनें उघड उघड या ब्राम्हणांस सामील झाले नाहींत. ब्राम्हणांनीं असा कट केल्यामुळें गुजराथेंतून व उत्तर हिंदुस्थानांतून ब्राम्हण आणवावे लागले. तथापि पूर्वींचे दक्षिणी पुरोहित वगैरे होते, त्यांची वृत्ति महाराजांनीं बुडविली नाहीं. पण दुबार खर्च करावा लागणार यासंबंधानें क्षत्रिय (मराठे) मंडळींची साताऱ्यास सभा होऊन पुढीलप्रमाणें कलमी यादी ठरली.

१ सातारीयांतील मंडळी जी आहे, त्यांस ज्यावेळेस सुरवात करावयास सांगतील तेवेळेस प्रारंभ हिंदुस्थानी ब्राम्हणाचें हातीं करितो.

२ इसमवार महाडीक, शिर्के, गुजर, मोहिते, आहिरराव, पालकर, खानविलकर, सुर्वे, भोंसले यांनीं एक एक उपाध्या हिंदुस्थानी करावा. त्यांजकडून दरोबस्त कर्म करवावे. आणि त्याचे उत्पन्न जुन्या उपाध्यास द्यावे. परंतु हा दुबार खर्च पडेल. याकरितां याची कसर जुन्या उपाध्यास पर्व प्रकरणीं दानधर्म न करतां माहेवारी वगैरे पोंचत असेल त्यांत कमी करून साधावे. म्हणजे खर्च फार पडणार नाहीं. चार कार्ये एकदाच उभीं राहिल्यास ज्या इसमाचा जो उपाध्या हिंदुस्थानी त्यापासून ब्राह्मण लागेल ते त्यांचे

कर्मांचे आजपर्यंत जुन्या उपाध्यांनीं कर्म चालविले नाहीं व पुढें विश्वास नाहीं सबब नवा याचे हातून काम चालवावे.

७ ब्राह्मणभोजन कोणास शक्तीनुसार घालणें त्याबद्दल दक्षिणी ब्राह्मणही बोलवावयाचे ते बोलवावे न येत तरी जितका संकल्प तितके दिवस भरती होईतो हिंदुस्थानी व गुजराथी यांस जेवणास बोलवावे अगर सिधा दिला तरी चिंता नाहीं तीनही ब्राह्मण खरेच यांत अंदेशा नाहीं. शास्त्रांत ब्राम्हणभोजनाचे पुण्य सारखेच आहे.

सदरहू यादीमधील महत्वाचीं वाटलीं तीं कलमें दिलीं आहेत. त्यावरून त्याकाळीं देखील मराठे क्षत्रिय धार्मिक बाबतींत कर्मठपणा सोडून स्वावलंबन करण्यास कसे तयार झाले होते (म्हणजे कसे सत्यशोधक बनले होते) हें कळून येणार आहे. असो.

अशा प्रकारें ब्राह्मण व क्षत्रिय यांमध्यें जो झगडा सुरू झाला त्यामध्यें क्षत्रिय सत्ताधारी असल्यामुळें नव्हे, तर त्यांचा सत्पक्ष असल्यामुळें ब्राह्मणांची वेळोवेळीं फजितीच झाली. जगद्‌गुरु शंकराचार्य करवीर यांच्याकडून सांगलीकर चिंतामण पटवर्धनानें धाकदपटशा दाखवून खोटीं पत्रें लिहून घेतल्याचा मजकूर मागें आलाच आहे. स्वामी आपल्या ताब्यांत रहावे म्हणून नातूनी इंग्रज सरकारांत स्वामीबद्दल खोटीच चहाडी केली कीं, महाराज प्रतापसिंहाच्या वतीनें स्वामी गोव्याच्या सरकारशीं खलबत करीत आहेत. त्यावरून धारवाडच्या कमिशनरांनीं स्वामीची चौकशी केली. स्वामीची एकांतीं भेट घेऊन स्वामींना श्रीची शपथ व श्रीमद्भगवद्गीता हातांत देऊन सत्य असेल तें सांगावयास सांगितलें. त्याप्रमाणें शपथ घेऊन स्वामींनीं सांगितलें कीं, आमच्यामार्फत प्रतापसिंह महाराजांचीं गोव्यास पत्रें गेलीं नाहींत. हें सारें खोटें तुफान आमच्यावर उभें केलेलें आहे. गोवें व सातारा येथील मजकुराबद्दल आम्हांस कांहीं माहीत नाहीं. चिंतामणराव यांनीं आश्विन शु॥ १० शके १७४९ सर्वजित नाम संवत्सरी जी यादी चंद्रसेनीय ज्ञातीसंबंधानें पाठविली ती दरोबस्त खोटी

सबब रद्द आहे. हा मजकूर स्वतः स्वामीनींच कार्तिक शु॥ ९ शके १७५२ रोजीं (इ. स. १८३०) मध्यें उलट पत्र लिहून प्रसिद्ध केला आहे.

यानंतर १८३१ मध्यें रेसिडेंटाची परवानगी घेऊन महाराजांनीं उदेपुरास शिवानंद शास्त्री यास पाठविलें. यासंबंधानें रेसिडेंटानीं परवानगी दिली होती त्या पत्रांतील हांशील......... " सिवानंदशास्त्री उदेपुरास रवाना करावे येविसी तेथील रसिदटास चकती व दस्तक या यादीसमागमे पाठविले परंतु शास्त्री यास ताकीद व्हावी कीं ज्ञातीधर्माखेरीज दुसरे कामात दखल होऊं नये येविसी राणाजीस व पुरोहित यास पत्रें लिहिली......

रेसिडेंटाची परवानगी घेऊन उदेपूराप्रमाणेंच कोल्हापूर, म्हैसूर, तंजावर वगैरे दक्षिणेकडील संस्थानिकांकडे कोणत्या प्रकारें याज्ञिकें केलीं जात आहेत, हें समजावून घेण्यासाठीं ठाकूरदास व अप्पाभट वाळींबे असे पाठविले. उदेपूरच्या महाराण्यांनीं भोंसले घराणें आपल्याच घराण्याची शाखा आहे, व महाराजांशीं एक ताट करण्यास आपली मुळींच हरकत नाहीं असें कळविलें. सन १८३६ च्या ऑगस्ट महिन्यामध्यें उदेपूरच्या महाराण्यानें अजमीरच्या पोलिटिकल एजन्टाच्या मार्फतीनें महाराजांना " हत्ती, घोडा, ढाल, तरवार, पोषाख, जवाहीर " असें बंधुभावनेनें पाठविलें.

या गोष्टींनीं महाराजांना शूद्र ठरवूं पहाणाऱ्या भटाभिक्षुकांच्या क्रोधास जास्त ऊत आला. ब्राह्मणांना जसजसें अपयश येत चाललें तसतसें ते विकारवश होऊन स्वामिद्रोह करण्यास व देशद्रोह करण्यास अधिक निष्ठेनें झटूं लागले.

अर्थातच पुढें पुढें मराठे क्षत्रिय व ब्राम्हण यांच्यामध्यें पुष्कळच तेढ आली. परंतु क्षत्रियत्व शाबीद करण्याच्या या वादामध्यें सर्वसाधारण मराठा समाज पडलेला होता, असा समज करून घेणें चुकीचें होईल. महाराज व त्यांचे आप्तसंबंधी एवढेच कायते या वादांत पडलेले होते. बाकीचा बहुजनसमाज अज्ञानी

१ प्रतापसिंहावरील आरोपांचें निराकरण भाग २ पान ७३ पहा.

असल्यामुळें या बाबतींत पूर्ण उदासीन होता. आज जीं नामांकित मराठ्यांचीं घराणीं आहेत, तीं देखील यासंबंधानें त्यावेळीं पूर्णपणें उदासीन होतीं. इतकीं कीं, त्यांची जात कुणबी म्हणून ब्राम्हणांनीं खुशाल लिहावी, व त्याबद्दल त्यांनीं हुं का चूं करूं नये. यामुळें ब्राम्हणांशीं क्षत्रियत्वाचा वाद घालणारी काय तीं (१) भोंसले, (२) शिर्के, (३) मोहिते, (४) महाडिक, (५) गुजर, (६) आहिराव, (७) पालकर अशीं हीं सातच घराणीं होतीं. आज सतकुळीचे मराठे म्हणून भूषण मानणारीं जीं घराणीं साताऱ्यांत आहेत, तीं हींच सात घराणीं. या घराण्यांतील समंजस पुरुषांनीं ब्राम्हणांच्या खोडसाळपणाचें जड जोखड फेंकून दिलें. व आपलें क्षत्रियत्व प्रस्थापित करण्यासाठीं वेदोक्त परिपाठ सुरू केले. जे इतर कुळीचे मराठे त्यांच्याप्रमाणें ब्राम्हणी धर्मांविरुद्ध या बंडाव्यांत मनाच्या कमकुवतपणानें, अगर परिस्थितीचें यथार्थ ज्ञान न झाल्यामुळें सामील झाले नाहींत, त्यांना या सतकुळींत दाखल करून घेतलें नाहीं. पण तेवढ्यावरून ते क्षत्रिय नाहींत, कमअस्सल अगर हीन होते, असें या सतकुळीच्या मराठ्यांनीं ठरविलें अगर मानलें असें मात्र नाहीं.

महाराज व त्यांचे आश्रित अशा प्रकारें आपल्या क्षत्रियत्वाचा पुरस्कार करूं लागतांच, भटाभिक्षुकांनीं त्यांना विरोध करावयास सुरुवात केली. महाराजांना व त्यांच्या आप्तस्वकीयांना नास्तिक धर्मद्रोही असेंही म्हणावें, व मूक जनतेंत त्यांच्याबद्दल कंड्या पिकवाव्यात. पण महाराज फारच शांत स्वभावाचे. त्यांनीं या सर्व गोष्टींनीं आपलें मन चळूं दिलें नाहीं, व भटाभिक्षुकांच्या आचरटपणाकडे लक्षही देण्याचें सोडलें.

पण त्या काळच्या ब्राह्मणांनीं मात्र आपले सनातन चाळे सारखे सुरू ठेविले होते. महाराज शांतपणें वागत, याचा अर्थ त्यांनीं निराळाच केला. त्यांना वाटलें महाराज आपलें कांहीं करूं शकत नाहींत. या भटाभिक्षुकांना त्यांच्यांतील स्वदेशाभिमानी म्हणवल्या जाणाऱ्या चळवळ्या लोकांचेंही फार साहाय्य होतें.

पुण्याच्या लोकांना साताऱ्चें वैभव सहन होत नव्हतें. पुण्याची ब्राह्मण पेश-वाई नष्ट व्हावी व कोल्हापूर, सातारा येथील मराठ्यांच्या गाद्या मात्र राहा-व्यात हें बऱ्याचशा पुणेकरांना पसंत नव्हतें. त्यांच्या प्रोत्साहनानें भटा-भिक्षुकांनीं महाराजांविरुद्ध अर्जाचीं भेंडाळीं मुंबईच्या गव्हर्नराकडे पाठवीत असावें; डेप्युटेशनें न्यावींत; व महाराजांना गादीवरून काढा, शिक्षा करा, असें विनवीत राहावें व प्रसंगीं सरकारास धमकीही द्यावी. यासंबंधानें वाईकर ६००० ब्राम्हणांनीं नातूच्या प्रेरणेनें १८३१ च्या सुमारास अर्ज केले होते त्यांपैकीं एक अर्ज प्र. म. आ. निराकरण या पुस्तकांत भा. २ पान ९२-९३ वर छापिला आहे. तो पुढीलप्रमाणें:—

" अर्जी समस्त ब्राम्हण वाईकर असामी साहा हजार ऐशीजे.

आम्ही ता. २४ मार्च सन १८३१ ची अर्जी दिल्ही त्याचा जाब ता. २१ अपरिलचा आला कीं तुमचे फिर्यादीचा कंपनी सरकारांतून दरखलगिरी करवत नाहीं. त्याजवरून आम्ही अर्ज करतो जे आजपर्यंत **हिंदुस्थानचे पाछायतीवर मोंगल व पेशवे जाहले** त्याणी कंपनी सरकारचे राज्यासारखे सर्वत्र ठिकाणीं राज्य करून त्या आपले राज्यांत लहानमोठे राजेरजवाडे जहागिरदार वगैरे ठेविले त्याजपाशीं तहनामा करून नेमिले त्यांची वागणूक होते ते पाहावें हा मामुल सरकारचा पाहून हलीं कंपनी सरकारांतून सातारकर व कोल्हापूरकर राजे वगैरे जहागिरदार यांचा सरंजाम जो होता तो कायम ठेऊन तहनामे केले त्यांतही रयतेचें संरक्षणा-विसी कलमें लिहिलीं आहेत त्याप्रमाणें आपण सातारा मु० रेसिडेंट ठेवून **रयतेचा व जहागिरदाराचा** कंपनीसरकराचें तर्फेनें बंदोबस्त राहावा म्हणोन सरकारनें खर्च कबूल करून ठेविले आहेत असें असतां आम्हावर महाराजाकडील जुलूम होतो त्याविसी वाजवीचे रीतीनें आमचे धर्माप्रमाणें जो आम्हावर बेनाहक राज्यानी जुलूम करून नाबुद करावें असा मार्ग चालविला आहे त्यास दाद देण्याविसी दोन तीन मजबूद कारणें सरकारास अर्जीत सुचविली असतां दखलगिरी रयेत लोकांची करवत नाहीं असा जाब

देणें हें सरकारास योग्य कसें दिसेल रयतेचा सर्व प्रकारें बंदोबस्त राहावा या कारणास्तव आपले सारखे मोठे लौकिकवान् सरदार लोक विलायतेहून कंपनी सरकारने मेहत देवून पाठविले त्यांस पेशजीचे अर्जीप्रमाणें बंदोबस्त कंपनी सरकारांतून करून घेणें हे आम्हास वाजिब जाणून आम्ही हा अर्ज लिहिला आहे. आपला रसिदंट व फौज राज्याचे रक्षणार्थ आहे तोंपर्यंत आपणांस आमची दाद घेणें जरूर आहे. ज्या दिवशीं सरकार राज्याचा पुस्तपन्हा तुमचे बंदोबस्ताविसी करणार नाहींत असा साफ जाब मिळेल त्यावेळेस आम्हाकडून जी बंदोबस्ताविसी तजवीज होईल ती करूं. वगैरे–"

वाईकर भटजींचा एक अर्ज नमुन्यादाखल दिला आहे. त्यावरून सातारकर व करवीरकर या मराठयांच्या गाद्यांबद्दल पुणेंकर भटाभिक्षुकांना किती आदर वाटत होता हें दिसून येणार आहेत. तसेंच **आत्मोन्नतीचे प्रयत्न दुसऱ्यानीं केले तर स्वार्थामुळें व वर्णश्रेष्ठपणाच्या भ्रामक खुळ्या कल्पनेनें अधर्माचरण झालें,** आमच्या धर्मावर घाला घातला, असा गिल्ला करावयाचा ब्राम्हणांचा परिपाठ किती जुना आहे, हेंही या अर्जावरून दिसून येणार आहे. छत्रपती शिवाजीमहाराजांच्या गादीवरील राजपुरुषाबद्दल जो उल्लेख प्रत्येक महाराष्ट्रीयानें केलाच पाहिचे तो न करतां सातारच्या छत्रपतींना जहागिरदार असेंच या धर्माभिमानी म्हणविणाऱ्यांनीं संबोधिलें आहे. या लोकांना अवरंगजेबासारखे मोंगल व खिस्ती लोक पातशाहा पुरवतात पण मराठा जातीचा राजा खपत नाहीं, हा कृतघ्नपणा, ही स्वाभिमानशून्यता ! हा परजातीमत्सर आपल्या महाराष्ट्रांत त्या काळीं किती अंशापावेतों चढला होता, हें या अर्जाच्या अवलोकनानें वाचकांच्या लक्ष्यांत येईल. या अशा प्रकारच्या राष्ट्रीय रोगास (जातीमत्सरास) समाजपुरुष बळी पडला व त्यामुळें पारऱ्यांत खितपत पडला आहे.

खरें पाहिलें, तर जातीभेदाला धर्माचा पाठिंबा मुळींच नाहीं. वेदानें जातीभेदाला संमती दिलेली नाहीं. ब्राह्मणांनाच उपनयनाचा अगर कर्मत्रयीचा अधिकार आहे, अशा प्रकारें वेदाज्ञा कोठेंही सांपडावयाची नाहीं. मॅक्समुल्लर

म्हणतो "विचित्र प्रकारच्या या जातीभेदाला वेदांची संमती नाहीं; तसेंच ब्राह्मण जे अधिकार आपणांस आहेत असें म्हणतात व शूद्रांना अवनतीला नेणारे जे निर्बंध त्यांनीं घातले आहेत, त्यांना वेदानें संमती दिलेली नाहीं."[१] पण लटक्या मोठेपणास बळी पडल्यामुळें धर्मभोळ्या ब्राह्मणांना विचार कोठला सुचतो ? ते भलत्या समजुतीस बळी पडून क्षत्रिय म्हणवतो म्हणून मराठा छत्रपतीचा कंपनी सरकाराकडून नाश करण्याचा प्रयत्न अर्जद्वारां, डेप्युटेशनद्वारां व प्रसंगीं खोट्या साक्ष्या देऊनही करण्यास उद्युक्त झाले.

सन १८३६–७ च्या सुमारास ब्राह्मणांनीं आपल्या सुपीक डोक्यांतून अशी शक्कल काढिली कीं, प्रतापसिंह महाराज हे राजे असले, तरी त्यांना वैदिक मंत्रांनीं राज्याभिषेक झालेला नसल्यामुळें, ते क्षत्रिय राजे नाहींत. व त्यांना क्षत्रिय कुलावतंस असें संबोधणें गैर आहे. ब्राह्मणांच्या वरील विधानांत धार्मिकदृष्टीनें पाहातां सत्यतेचा अंश बराच होता. महाराजांना राज्याभिषेक झाला तेव्हां त्यांचें वय लहान होतें. महाराणी आनंदीबाई माईसाहेब या बोलून चालून अबला. त्यांना या वेदोक्ताची व पुराणोक्ताची भानगड काय समजणार ? अशा प्रकारच्या संधीचा फायदा घेऊन पंडितराव वगैरे ब्राह्मणांनीं महाराजांना पुराणोक्त विधीनें राज्याभिषेक केला होता. अशा प्रकारची वस्तुस्थिती होती. म्हणून महाराजांनीं वेदोक्त विधीप्रमाणें राज्याभिषेकाची पोथी आबा पारसनीसाकरवीं तयार करविली व त्या पोथीप्रमाणें आपणांस सन १८३८ सालीं पुनः राज्याभिषेक करविला.

महाराज व त्यांचे बंधू नित्य सकाळ संध्याकाळ शुचिर्भूत होऊन संध्या

---

१ There is no authority whatever in the Hymns of the Vedas for the complicated system of castes, no authority for the offensive previlegs claimed by the Brahmins, no authority for the degradation of Shudras.

Max Muller.

करीत. सारांश शास्त्राप्रमाणें क्षत्रियधर्माचें पाळण महाराज करीत असतांही अशा धर्मनिष्ठ, कर्मनिष्ठ, स्वधर्माभिमानी महाराजांचा नाश करण्याची बुद्धि ब्राह्मणांनीं धरिली होती !

प्रकरण २५ वें.

भाऊबंदकी.

छत्रपति प्रतापसिंहमहाराज यांना रामचंद्र राजे ऊर्फ भाऊसाहेब, व शहाजी राजे उर्फ आप्पासाहेब असे दोघे बंधू होते. पैकीं रामचंद्र राजे ऊर्फ भाऊसाहेब सन १८२० मध्यें जत येथें मरण पावले, हें पूर्वी सांगितलें आहेच. शहाजी राजे ऊर्फ आप्पासाहेब महाराज हे प्रथम प्रतापसिंहमहाराजां-जवळच असत. नव्या वाड्यामध्यें उभयतां बंधू प्रथम प्रेमानें रहात असत. प्रतापसिंहमहाराज मनाचे प्रेमळ व उदार असल्यामुळें आपपरभाव त्यांच्या ठायीं मुळींच नव्हता. माईसाहेब वारल्यानंतरदेखील आप्पासाहेब व बुवा-साहेब यांचें फार चांगल्या रीतीनें चाललें होतें. कॅप्टन ग्रँट डफ रेसिडेंट असतां महाराजांनीं आप्पासाहेबांना खासगीसाठीं दरमहा ५५०० (साडे पांच हजार) तनखा नेमून दिला होता. अदालतींत मुख्य न्यायाधीश म्हणून नेमणूक करून दिली होती. आप्पासाहेब प्रथमपासूनच फार खर्चिक किंबहुना उधळे होते. त्यामुळें त्यांना कर्जही बरेंच झालें होतें. सन १८१९ सालीं तहनाम्या-वर सह्या झाल्यावर प्रतापसिंहमहाराजांनीं आप्पासाहेबांना ३००० रुपये देणगीदाखल दिले. कारण आप्पासाहेबांना तेवढ्या लहान वयांतही उनाड-पणाच्या संवयी लागलेल्या होत्या, व त्यापायीं कर्ज झालेलें होतें. एल्फिन्स्टन-साहेबांनीं सन १८१९ च्या मार्चमध्यें कॅप्टन ग्रँट डफना पत्र लिहून आप्पा-साहेबांच्या स्वभावाचें वर्णन केलें आहे. “ आप्पासाहेब हट्टी, हलकट नादांत

गुरफटलेला व दुर्वर्तनी तरुण आहे. राजांनीं कितीही सांगितलें अगर ताकीद दिली, तरी त्याच्या वर्तणुकींत फरक होत नाहीं. ”

He is an obstinate, ill disposed lad, with very low vicious habits, which all the admonitions of the Raja cannot get the better of him.”

असें होतें तरी देखील वडील बंधू या नात्यानें प्रतापसिंहमहाराजांचे आप्पासाहेबांशीं वर्तन फार प्रेमळपणाचें होतें. आप्पासाहेबांना चांगलें वळण लागावें, ही त्यांची फार इच्छा होती. महाराजांना मूलबाळ कांहींही नसल्यामुळें आपल्यामागें आप्पासाहेब हेच गादीचे वारस व्हावेत. अशीही महाराजांची इच्छा होती. म्हणून आप्पासाहेबांचे बाबतींत महाराज फार लक्ष देत असत. परंतु आप्पासाहेब मात्र आपल्या वर्तणुकीमुळें महाराजांना बंधू शोभण्यासारखे नव्हते. महाराजांचें वर्तन आप्पासाहेबाशीं प्रेमळपणाचें होतें, तर आप्पासाहेब महाराजांशीं फटकून वागत. बाळाजी नातूला महाराजांचा पेशवा होण्याच्या बाबतींत निराश व्हावें लागल्यापासून त्यानें आप्पासाहेबांकडे संधान बांधण्यास सुरवात केली होती ! याच कलीपुरुषाच्या प्रेरणेनें आप्पासाहेबांनीं सातारच्या राज्याची निम्मी वांटणी आपल्यास मिळावी म्हणून खटपट सुरू केली. खुळा बिचारा आप्पासाहेब ! खाजगी मालमत्तेप्रमाणें राज्याची वांटणी होत नसते, हें त्या बिचाऱ्यास कसें कळलें नाहीं देव जाणे ! परंतु ब्राह्मणी तर्कटशास्त्रानें वेडा बनल्यानंतर आप्पासाहेबांस तरी हें कसें कळणार ?

सर जॉन माल्कमसाहेब गव्हर्नर असतांना आप्पासाहेबांनीं त्यांचेकडे आपणांस मराठी राज्यांतील अर्धें राज्य तोडून विभागून द्यावें, अशी मागणी केली. परंतु ती खुळी मागणी त्याचवेळीं फेटाळण्यांत आली. पुढें १८३५ च्या एप्रीलमध्यें सर राबर्ट ग्रँट गव्हर्नर म्हणून महाबळेश्वरास आले त्यावेळीं त्यांच्यापाशीं देखील पुनः तेंच मागणें आप्पासाहेबांनीं केलें.

आप्पासाहेब भोळसर व खुळसट होते. इतकेंच काय पण ते व्यसनीही होते;

बाहेरख्यालीपणामुळें ते लोकांना फार अप्रीय झालेले होते. आप्पासाहेबांनीं पुण्याहून एक बाई काढून आणून आपल्याकडे ठेविली होती. ती बाई राजवाड्यांत आणून ठेवल्यावरुन आप्पासाहेबांचे व त्यांचे वडील कुटुंबाचें मोठें कडाक्याचें भांडण झालें. अखेर आप्पासाहेबांनीं आपल्या थोरल्या पत्नीस मारहाण केली. जीवाच्या भीतीनें व अशा नरपशू पतीचें मुखावलोकनही नको, म्हणून संतापानें राणीसाहेब प्रतापसिंहमहाराजांकडे गेल्या; व नंतर त्यांच्या राणीजवळ राहूं लागल्या. इतक्या थरावर गोष्टी गेल्या तरी प्रतापसिंह महाराजांनीं आपली शांतवृत्ती व आप्पासाहेबांच्या ठिकाणचें प्रेम अणुमात्रही कमी होऊं दिलें नाहीं. ते म्हणत पोरमत आहे. आज ना उद्यां येईल ताळ्यावर !

खाण्यास चांगलें चांगलें मिळत असलें व उद्योगधंदा नसला कीं मनुष्य स्वेच्छाचारी बनतो. जवळ पैसाअडका भरपूर असला कीं निरनिराळे मतलबी व हलकट लोक भोंवतीं गोळा होतात, अवास्तव भलतीच स्तुति करतात, व अनेक प्रकारचीं व्यसनें लावून नादान बनवितात. असा व्यवहारांतील अनुभव आहे. आप्पासाहेबांची स्थिती अशीच झाली होती. महाराजांकडून त्यांना पैसा मुबलक मिळे. खाण्यापिण्यास भरपूर व शिवाय ऐषआराम करण्यास सर्व प्रकारचीं साधनें मिळत. उद्योग कांहींच नव्हता. त्यामुळें त्यांना कुसंगति जडली होती. अधःपाताची एक एक पायरी ते उतरूं लागले होते. महाराजांना हें समजतांच आप्पासाहेबांनीं हलकट लोकांचे नादीं लागूं नये, म्हणून त्यांचे मागें कांहीं उद्योग लावून द्यावा या उद्देशानें मुख्य न्यायाधिशाचें काम महाराजांनीं आप्पासाहेबांवर सोंपविलें. शिवाय त्यांना दरमहा ५॥ हजार रुपयांचा तनखा नेमून दिला होता तो निराळा. परंतु व्यसनाधीन झालेल्या आप्पासाहेबांना ही रक्कम पुरते कसची ? त्यांनीं हळूहळू लांचलुचपत खाण्यास प्रारंभ केला. आप्पासाहेब लांच खातात, असें समजल्यावर त्यांच्या नांवावर मध्यस्थी हलकट लोक मधल्यामध्यें पैसे उकळूं लागले. अशा प्रकारचा हा जुलूम लोकांना असह्य होऊं लागल्यावर त्यांनीं त्याबद्दल महाराजांचे कानीं तक्रार नेली. महाराजांनीं

खात्री करून घेतों, व मग कायतें करतों, असें लोकांना अभिवचन दिलें. नंतर त्यांनीं आप्पासाहेबांना सारा प्रकार कळविला, व आपलें वर्तन सुधारण्यास सांगितलें. पण आपलें वर्तन सुधारण्याऐवजीं आप्पासाहेबांनीं महाराजांचा द्वेष करण्यास मात्र सुरवात केली.

वाड्यांतील ही भाऊबंदकी लोकांना कळण्यास उशीर लागला नाहीं. आप्पासाहेब या घरगुती गोष्टींमुळें महाराजांचे शत्रु बनूं पहात होते, तर दुसरीकडे चिंतामण पटवर्धन, बाळाजी नातू वगैरे ब्राह्मण पुढारी आप्पासाहेब महाराज आपल्या हातीं पडले तर त्यांना पुढें करून महाराजांच्या विरुद्ध कारस्थानें करण्यास फार सोईचें होईल असा विचार करीत होते. व त्या दृष्टीनें त्यांची खटपट सुरू होती. आप्पासाहेबांच्या नादान वृत्तीमुळें व खुळचट स्वभावामुळें, विशेषतः मराठ्यांमध्यें भाऊबंदकीच्या कामीं उत्पन्न होणारा पाशवी मदांधपणा त्यांच्या ठिकाणीं उत्पन्न झाला असल्यामुळें, बाळाजीपंतास वरील परिस्थितीमुळें या प्रयत्नांत यश ताबडतोब आलें. समानशील झाल्यामुळें आप्पासाहेब व बाळाजी नातू अशा दोघांचें सख्य जमलें. आप्पासाहेबांना गादी मिळाली तर बाळाजीस पेशवा करावयाचें, असें उभयपक्षीं ठरून त्याप्रमाणें आणाभाकाही झाल्या. झालें. आतां कलिपुरुष बाळाजीस हर्षवायु झाला. मराठेशाहीच्या मालकास, प्रतापसिंहमहाराजांस बुडविण्याच्या, जमिनदोस्त करण्याच्या, पदच्युत करण्याच्या प्रयत्नास तो लागला. बाळाजीपंतानें आप्पासाहेबांची कड घेऊन त्यांची बाजू इंग्रजाकडे मांडण्यास सुरवात केली. त्यानें आपल्या नीच अंतःकरणांस शोभेल अशा प्रकारें हलकटपणाची बतावणी करण्यास सुरवात केली !

आप्पासाहेब बाहेरख्याली होते, तर प्रतापसिंहमहाराज अत्यंत पवित्र वर्तनाचे होते. बाळाजीस ही गोष्ट ठाऊक नव्हती असें नाहीं. आप्पासाहेबांच्या हलकटपणामुळें होणारा जाच, छळ, चुकावा म्हणून त्यांची वडील राणी प्रतापसिंह महाराजांच्या कुटुंबाजवळ रहावयास गेली, या गोष्टीबद्दल बाळाजीनें हलकट वदंता उठविली. आपल्या समाजांत वडील दीर पित्या-

समान समजला जातो. लौकिकदृष्ट्या देखील राणीसाहेबांचें हें करणें मुळींच गैर नव्हतें. शिवाय ह्या राणी फार पुण्यशील व सद्वर्तनी होत्या. त्यांच्यासारख्या साध्वीसंबंधानें वाईट कल्पनाही कोणाच्या मनांत आली नव्हती. पण हलकट बाळाजी नातूस स्वार्थामुळें या साध्वीबद्दल हलकट वदंता उठवितांना बिलकूल शरम वाटली नाहीं ! त्यानें या साध्वि, पतिव्रता राणीबद्दल स्वकपोल-कल्पित हलकटपणाची हकिगत ब्रिटिश अधिकाऱ्यांस कळविली !

ही आवई खोटी होती व ती बाळाजीच्याच एकट्याच्या कुजक्या डोकींत उत्पन्न झाली होती. दुसऱ्या कोणीही असलें विधान केलेलें नाहीं. ह्या एका गोष्टीवरून देखील हें विधान कसें खोडसाळपणाचें बनावट होतें, हें उघड होत आहे. त्या काळच्या ब्रिटिश रेसिडेंटास हा बाळाजीचा खोडसाळ-पणा ठाऊक असल्यामुळें त्याबद्दल बाळाजीचीच त्यानें निर्भत्सना केली ! पण ही गोष्ट या ठिकाणीं नमूद करण्याचें कारण इतकेंच कीं, ब्राम्हणमंडळी आपल्या शत्रूची निंदा करावयास प्रवृत्त झाली म्हणजे "देशद्रोही, स्वराज्यद्वेष्टे" असल्या प्रकारच्याच विशेषणांनीं संबोधून थांबत नाहींत. तर ते आपल्या हलकटपणाचें प्रदर्शन कोठवर करतात, हें वाचकांच्या लक्ष्यांत आणून द्यावें, ह्याच उद्देशानें हें एक उदाहरण या ठिकाणीं दिलें आहे. असो. आप्पासाहेब हस्तगत झाल्यानंतर ब्राम्हण्यसंरक्षणार्थ मराठेशाहीचा बळी घेण्यास सज्ज झालेल्या बाळाजी नातू, चिंतामण पटवर्धन वगैरेनीं काय काय घडामोडी केल्या याचा वृत्तांत आतांपावेतों यथाक्रम दिला आहे.

रंगोबापू व यशवंतराव राजे शिर्के हे विलायतेस जाईपावेतों आप्पासाहेब नव्या वाड्यांतच होते. परंतु क. ओव्हॅन्ससाहेबानीं बाळाजी नातूमार्फत आप्पा-साहेबांचें मन वळवून त्यांस वाड्यांतून काढून आपल्या शेजारीं गोलवडीच्या तळावाच्या पूर्वेस माळावर नेऊन ठेविलें. या ठिकाणीं आप्पासाहेब जाऊन राहिल्यानंतर ओव्हॅन्स साहेबानीं प्रतापसिंहमहाराजांना गादीवरून दूर करून आप्पासाहेबांना गादीवर बसविणार आहों अशी बातमी लोकांत पसरून लोकां-

मध्यें दुफळी उत्पन्न केली. स्वार्थाच्या आशेनें आप्पासाहेबांच्या पक्षास बरेच लोक मिळाले. कांहीं लोक ओव्हॅन्ससाहेबाच्या व ब्रिटिश सत्तेच्या जोरदापणालाच भिऊन गप्प राहिले. अशा प्रकारें महाराजांच्या घरच्या भाऊबंदकीच्या आगीनें पेट घेतल्यामुळें बाळाजी नातूनें पेटविलेल्या राजद्रोहाच्या व स्वामिद्रोहाच्या वणव्यास जास्त अवसान चढलें! व क. ओव्हॅन्सला, व सर जेम्स कार्न्याकला सातारची राजलक्ष्मी त्यामध्यें भस्मसात करतां आली! सारांश **अंतस्थ कलह हा प्रतिपक्षाच्या हल्ल्यापेक्षां जास्त नाशकारक असतो** हें आप्पासाहेबांच्या हकिकतीवरूनही दिसून येतें.

प्रकरण २६ वें.

आणखी शत्रू!

स्वार्थहानी झाल्यामुळें बाळाजीपंत नातू, ब्राम्हणांच्या धार्मिक वर्चस्वास धक्का बसूं नये म्हणून, चिंतामण पांडुरंग पटवर्धन सांगलीकर वगैरे ब्राह्मण व भाऊबंदकीमुळें श्री० आप्पासाहेबमहाराज हे जसे महाराजांचा द्वेष करूं लागले होते, व रेसिडेंटाच्या बाजूनें महाराजांविरुद्ध खटपट करीत होते, त्याचप्रमाणें आणखी कित्येक असेच शत्रू महाराजांना उत्पन्न झालेले होते.

गुमानपुरी गोसावी हा आपल्या दुर्वर्तनामुळें लोकांमध्यें अत्यंत अप्रीय झाला होता. अखेर त्यास आपला मठ सोडून पलायन करावें लागलें. सदर गुमानपुरी गोसाव्यानें आपल्या गादीवर पट्टशिष्य म्हणून कोणासच नेमिलें नव्हतें. सबब मठास महाराजांकडून दिलेलीं इनाम गांवें कोणाकडे चालवावींत असा प्रश्न उत्पन्न झाला. जो तो शिष्य आपलाच हक्क सांगूं लागला. परंतु कोणालाही आपला हक्क शाबीत करतां आला नाहीं. तेव्हां हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें महाराजसरकारनीं तीं गांवें खालसा केलीं. या गोष्टीमुळें गुमानपुरी भोंवतीं गोळा झालेले, व मठाची इनाम मिळकत आपणास

मिळावी अशी इच्छा करणारे, बुभुक्षित शिष्य साहजिकच महाराजांचा द्वेष करूं लागले.

हेळगांव पाडळी हें गांव मूळचें महाराजांचें. पण दुसऱ्या बाजीराव पेशव्यानें महाराजांना न विचारतां आपल्या पदरीं पूजाअर्चा करणाऱ्या एका कात्रे नांवाच्या भिक्षुकी वृत्तीच्या ब्राम्हणास तें गांव इनाम करून दिलें. पुढें ॲडामच्या देखरेखीखालीं राज्याची पाहणी करतांना–सदर इनामाचें वास्तविक स्वरूप आढळून आल्यावरून, महाराजांनीं इनाम रद्द करून गांव खालसा केलें. त्यावरून विश्वनाथ निळकंठ कात्रे महाराजांवर रुष्ट झाला.

तसेंच ओझर्डें तालुके वाळवे (पेठेशेजारी) येथील इनामदार रघुनाथ गोपाळ देशपांडे हा सदर इनाम गांवाबद्दल सरकारबाब म्हणून महाराजांना कांहीं वसूल देत नसे. सर्वेमध्यें सदर गांव महाराजांनीं इनाम करून दिला असला तरी कांहीं इतर बाबींबद्दल सरकारबाब देणें त्यास भाग होतें. व दरसाल रु. १८० सरकारबाब म्हणून देशपांडे यांनीं द्यावेत, असा महाराजांनीं हुकूम केला. पूर्वीप्रमाणें सर्वच फुकट खाण्यास मिळेनासें झाल्याबद्दल, देशपांडे मजकूर यांस घुस्सा आला; व तेही महाराजांविरुद्ध असलेल्या मंडळींत सामील झाले.

पेशव्यांच्या पदरीं प्रसिद्धीस आलेल्या सखाराम बापू बोकीलाच्या घराण्यांतील पुरुषांनीं, महाराजांच्या असहाय्य स्थितीचा फायदा घेऊन ल्हासुर्णे व कोरेगांव वगैरे गांवांतील मिळकती, इनाम म्हणून बळकावल्या होत्या. त्या अनधिकारी असल्याचें सर्वेचे चौकशींत आढळून आलें. सबब बोकिलांवर दरसाल रु. ५००० सरकारबाब म्हणून बसविण्यांत आले. व वसूल करण्याबद्दल हुकूम झाला. या हुकुमामुळें कोरेगांवचे बोकील नाराज झाले. व तेही बाळाजीपंतादि महाराजांच्या कट्टया शत्रूंच्या पक्षास सामील झाले.

जतच्या गंगाबाई डफळे या, बिगर हक्कानें कांहीं गांवांची वहिवाट करीत होत्या. महाराजांच्या पूर्वींच्या राजवटींत महाराष्ट्रांतील राजसत्ता एकंदरींत कमकुवत होती, त्यावेळीं या गांवांसंबंधानें कोण चौकशी करणार ? स्वतः

महाराज पेशव्यांच्या कैदखान्यांत पडलेले. अशी स्थिति असल्यामुळें या गांवांची वहिवाट डफळ्यांना निरंकुश करतां आली. पुढें महाराजांनीं जेव्हां प्रत्येक गांवच्या प्रत्येक खातेदाराची व इनामदाराची हक्कनोंदणी करण्यास सुरुवात केली, तेव्हां बिगरहक्कानें गांवेंच्या गांवें, या इनामदारांनीं कशीं गिळंकृत केलीं होतीं, हें उघडकीस आलें. त्यावरून महाराजांनीं इतर जहागिरदार, इनामदार, वगैरेप्रमाणेंच जतकरणीसही गांवें खालसा करून देण्यास सांगितलें. तसेंच गंगाबाईच्या मनांत आपल्या नवऱ्याच्या जहागिरीवर दत्तक मुलगा घ्यावा असा हेतु होता पण गंगाबाईनें भलत्या कोणास दत्तक घेऊं नये, म्हणून महाराजांनीं हुकूम काढून तिला कळविलें कीं, "जतची जहागिरी ही सातारच्या छत्रपतीमहाराजांच्या अमलाखालील असल्यामुळें जतच्या सध्यांच्या राणीसाहेबांनीं छत्रपतीसरकारच्या परवानगीशिवाय दत्तक घेऊं नये. परवानगीशिवाय दत्तक घेतल्यास तो महाराजांकडून मंजूर केला जाणार नाहीं." या जतप्रकरणीं महाराजांना प्रथमपासून फार त्रास पडलेला. गंगाबाईसाहेब राज्यकारभाराला अगदीं नालायक होत्या. त्यामुळें त्यांच्या जहागिरींत अनेक भानगडी उपस्थित झालेल्या होत्या. व बंडावाही माजून राहिला होता. महाराजांना जतला बंडाचा मोड करण्यासाठीं ससैन्य जावें लागलें होतें वगैरे इतिहास इतरत्र आलेला आहेच. अशा प्रकारच्या परिस्थितीमुळें महाराजांनीं जतच्या राणीस परवानगीबद्दल कळविलें होतें. पण जत संस्थानच्या हितसंरक्षणासाठीं महाराजांनीं केलेल्या हुकमाचा कसा विपरीत परिणाम झाला हें वाचकांस पुढें कळून येईलच.

महाराजांचे वेळीं औंधास पंतप्रतिनिधि होते. हे गैरवर्तनी असल्यामुळें त्यांच्या जहागिरीचा कारभार महाराजांना आपल्या हातीं घ्यावा लागला. महाराजांनीं खटपट करून व योग्य आणि लायक माणसें व्यवस्थेस नेमून कारभाराची घडी सुव्यवस्थित बसविली. ही गोष्ट पंतप्रतिनिधीचा भलताच उपयोग करून घेणाऱ्या नादान वृत्तीच्या दरबारी मंडळीस कशी रुचणार? पंताच्या कानास लागून त्यांनीं पंताचें मन महाराजांविषयीं कलुषित केलें, व

त्यांचेकरवीं ता. १ डिसेंबर १८३७ रोजीं महाराजांविरुद्ध इंग्रजांकडे तक्रार करविली.

विशाळगडकर (संस्थान कोल्हापूर) सकवारबाई ही विटें येथें साताऱ्याचे अंमलांत रहात असे. विटें व आसपासच्या ६ गांवच्या मिळकती सकवारबाईनें संपादन केल्या होत्या. सकवारबाई आपल्या दत्तक मुलापासून वेगळी राहिली होती. ती साताऱ्यास येऊन राहिल्यावर तिनें ही मिळकत संपादन केली होती. ती मेल्यावर सदरची मिळकत बेवारसा म्हणून सरकारजमा करण्यांत आली होती. सकवारबाईचा दत्तक मुलगा—विशाळगडचे अधिपती—ती मिळकत वारसाहक्कानें मागूं लागला. परंतु परप्रान्ताच्या माणसास आपल्या राज्यांत मिळकत देणें तहाविरुद्ध होतें, म्हणून महाराजांनीं विशाळगडकरांची मागणी नाकबूल केली. त्यावर विशाळगडकरांनीं नाराज होऊन गव्हर्नरसाहेबांकडे अर्ज केला.

ग्वाल्हेरचे महाराज जनकोजी शिंदे हे आपले मामा कृष्णराव कदम यांना सापगांव इनाम करून देण्यासाठीं, आपल्या हद्दींतील गांव वजावाटीस देण्यास कबूल होते. व त्यांना अदलाबदल करण्यास इंग्रजांची परवानगीही होती. नव्हे मुंबईसरकारकडून त्याबद्दल मध्यस्ती चाललेली होती. व रेसिडेंटानीं महाराजांस तसें कळविलेंही होतें. पण शिंदेसरकारचे मामा नंबर एकचे भांडखोर, असली ही ब्याद आपले अंमलांत नको, असें महाराजांनीं रेसिडेंटास कळविलें. परंतु या गोष्टीमुळें कृष्णराव कदम मामासाहेब व शिंदेसरकार यांना तर महाराजांचा राग आलाच पण ब्रिटीश रेसिडेंटास व मुंबईसरकारासमुद्धां घुस्सा आला !

वर दाखल केल्याप्रमाणें अनेक कारणांनीं महाराजांवर कांहीं कांहीं लोक आपल्या स्वार्थापायीं नाखुष झाले होते. विचार केला, तर यांपैकीं कोणाच्याही बाबतींत महाराजांनीं अन्याय केला नव्हता. प्रजेच्या हिताविषयीं दक्ष व राजकारण नीट (चांगलें) जाणणारा कोणताही दुसरा राजा, प्रतापसिंहमहाराजांच्या जागीं असता, तर त्यानेंसुद्धां हेंच केलें असतें. वोकिल, देशपांडे

वगैरेंना बिगरहक्कानें गांवेंच्या गांवें उपभोगावयास देणें, हें वाजवी नव्हतें. पूर्वी महाराजांच्या विपरीत स्थितीचा फायदा घेऊन, जे इनामदार इनाम नसलेल्या जमिनींचा लबाडीनें व अप्रामाणिकपणानें उपभोग घेत होते, त्यांना त्यांच्या लबाडीबद्दल खरोखर शासन करावयास पाहिजे होतें; पण प्रतापसिंह-महाराज हे अत्यंत प्रेमळ व उदार अंतःकरणाचे असल्यामुळें त्यांनीं त्यांना शासन तर केलें नाहींच. पण ह्या फुकटखाऊ लोकांकडून जें न्यायानें त्यांचें नव्हतें, तेवढेंच फक्त त्यांच्याकडून काढून घेतलें. परंतु तेवढ्याबद्दल देखील या स्वार्थसाधूंनीं ब्रिटिशसरकारपावेतों धांव टोकली. व महाराजांविरुद्ध जें कारस्थान रचण्यांत येत होतें त्यांत हे आप्पलपोटे सामील झाले. " आपली पोळी भाजण्यासाठीं शेजाऱ्याचें घर जाळणें " जितकें अधम स्वार्थ कोटींतील ठरतें, तितकेंच किंबहुना त्याहून अधिक अधमपणाचें वर्तन या स्वार्थी लोकांनीं केलें. दुर्दैवानें आपल्या हिंदी समाजांत जो हा दुर्गुण (आप्पलपोटे-पणा) हाडीमाशीं खिळलेला आहे, त्याच दुर्गुणास हेही लोक बळी पडले !

प्रकरण २७ वें.

तिसरा आरोप.

मागें 'राजद्रोह कीं धर्माभिमान ' या प्रकरणांत आबा जोश्यानें रेसिडेंट ब्रिग्ज यांना महाराजांच्या तर्फेचे घोडेस्वार कोल्हापूरकर, सांगलीकर, संकेश्वरच्या मठाचे स्वामी व पोर्तुगीज [गोवें] सरकार यांच्याकडे जाऊं येऊं लागले आहेत, अशी गप्प झोंकून दिली होती, असा मजकूर आला आहे. पण त्या-वेळचे रेसिडेंट जनरल ब्रिग्जसाहेब हे असल्यामुळें असल्या बाजार गप्पांना त्यांनीं कवडीचीही किंमत दिली नाहीं. महाराजांचा उमदा स्वभाव, व कंपनी-सरकारावरील त्यांची अढळ निष्ठा, हीं त्यांना पूर्ण परिचित झालेलीं होतीं. त्यामुळें महाराजांच्या नाशाचें नातूंकडूनें आबा जोश्याच्या हस्तें पेरलेलें बीं,

सदर रेसिडेंटाच्या मनोभूमिकेंत जीव धरूं शकलें नाहीं. तथापि नातूकंपू कच्चा दिलाचा नव्हता. कोंकणस्थ ब्राह्मणांच्या हाडीमासीं मुरलेला प्रयत्नवादी-पणा व चिकाटी हीं त्यांच्यामध्येंही होतीं, व अनुकूल काळ प्राप्त होईपर्यंत महाराजांचा नाश करण्याचा प्रयत्न त्यांनीं अप्रतिहतपणें चालविला होता. नातू कंपूच्या सुदैवानें आतां कर्नल ओव्हॅन्स रेसिडेंट झालेले व सर रार्बट ग्रँट-साहेब मुंबईचे गव्हर्नर असलेले; त्यामुळें त्यांच्या कारस्थानाला चांगलाच पाठिंबा मिळत होता.

पलटणें फितूर करण्याबद्दलचा आरोप टिकत नाहीं, असें दिसूं लागतांच संकेश्वरच्या स्वामीवर एके काळीं केलेला आरोप आतां महाराजांवर करावा अशी शक्कल नातूकंपूनें काढली. नातूकंपू ब्राह्मणी असल्यामुळें त्यांच्यामध्यें लिहिणाऱ्या वाचणाऱ्यांचा तुटवडा नव्हता. त्यांनीं महाराजांवर आरोप पक्का करण्यासाठीं तोंडी पुराव्यापेक्षां लेखी पुरावाच जास्त मजबूत ठरेल, अशा धोरणानें बनावट दस्ताऐवज करण्याचा कारखाना उघडला ! इंग्रजी व पोर्तुगीज जाणणारे लोक पैदा केले. खोटे शिक्के व मोर्तबें तयार केलीं; व या सर्व साधनांच्या योगानें महाराजांना गुंतविणारीं पत्रें तयार केलीं.

हें कुभांड महाराजांवर रचण्यास आणखी एक कारण घडलें होतें. संकेश्वरचे स्वामी अत्यंत खटपटी व खर्चीक होते. गांवोगांव संचार करून पाद्यपूजेच्या प्रसंगीं, जी दक्षिणा मिळे त्यामध्येंदेखील त्यांचा खर्च भागत नसे. दरसाल गांवोगांवीं पट्टी वसूल करण्यासाठीं त्यांचीं माणसें जात. पुढें पुढें या स्वामींनीं निरनिराळ्या गांवची पट्टी वसूल करण्याची खोती विकण्याचा सपाटा सुरू केला. जे लोक अशी खोती विकत घेत, ते मांग, रामोशी वगैरे लोक पदरीं ठेवून गांवकऱ्यांना धाकदपटशा दाखवून पट्टी वसूल करीत. नागो देवराव याच कामगिरीवर कोंकणांत गेला होता. त्याच्याबरोबर त्याचा साथीदार बाळकोबातात्या हाही होता. बाळकोबा हा नागोदेवरावांचा मेहुणा. ह्याच लोकांबरोबर मोरो जोशी, दाजी बल्लाळ, नारायण चिवटे, रावजी कोटनीस, व सखाराम कामत, असे लोक होते. एकदां ते अत्यंत कंगाल स्थितीस पोहोचले

होते. अशा स्थितींत नागोदेवराव आजारी पडून मयत झाला. मरतांना त्यानें संकेश्वराच्या स्वामींना जुलै १८३६ च्या सुमारास एक पत्र लिहिलें. ह्या पत्रासंबंधानें पुष्कळसा गाजावाजा करण्यांत आलेला आहे. त्यासंबंधानें प्रसंगानुसार लिहूं.

नागोदेवराव मेल्यानंतर त्याच्याबरोबरच्या मंडळीची स्थिती जास्त जास्तच खालावली. 'बुभुक्षितः किं न करोति पापम्' पैसा मिळवण्यासाठीं ह्या चोरट्यांनीं वेंगुर्लें येथील इंग्रजांचा खजिना लुटण्याचा बेत केला, व त्याप्रमाणें १८३६ नव्हेंबरच्या सुमारास खजिन्यावर हल्ला केला. परंतु तेथील पहारेकरी सावध असल्यामुळें कांहीं चोरटे पकडले गेले व ब्राह्मण चोरटे बाळोबा केळकर वगैरे पळून पोर्तुगीज हद्दींत दडून राहिले. बाळकोबा केळकर हा बाळाजीपंताचा दूरचा संबंधी होता. त्याला माफी मिळवून देण्यासाठीं बाळाजीपंताची खटपट चालू होती. अशा स्थितींत बाळाजी पंताला बाळकोबा केळकराची सुटवणूक करण्यासाठीं सदर गोव्याच्या कटाचें कुभांड रचावें लागलें.

सन १८३७ च्या मे महिन्यांत "पांडुरंगपंत" नांवचा एक ब्राम्हण बटू लेफ्टनंट हॉर्न यांच्याकडे येऊं जाऊं लागला. ले. हॉर्न हे ८ व्या नेटिव्ह पलटणींत हुद्यावर होते. ही पलटण सातान्यांतच होती. या पोरानें ले. हॉर्न यांना असें सांगितलें कीं, भाऊ लेले यानें आपणास पाठविलें असून त्यास बरीच मोठी रक्कम मिळाली तर गोविंदराव दिवाणाच्या व इतरांच्या सहीचे महाराजांवर राजद्रोह शाबीद करणारे कागद ते मिळवून देतील. ले. हॉर्नयाला हें पोर अनेक वेळां भेटलें. पण कांहीं उपयोग झाला नाहीं. नंतर तें पोर कॅ. डुरँक यांना भेटलें व त्यांना त्यानें लेखी असें लिहून दिलें कीं, सध्यां रु. १००० व मागाहून रु. १००००० बक्षीस अशी रक्कम कबूल केल्यास गोविंदरावाच्या हातचा एक अत्यंत महत्वाचा व गोविंदरावाला गुन्ह्यांत अडकविणारा कागद आपण मिळवून देऊं. कॅ. डुरँक यांनीं 'पांडुरंगपंतास' भाऊ लेल्यास स्वतः भेटावयास सांग असें सांगितलें.

पांडुरंग हा भाऊ लेल्याचाच हस्तक. त्यानें भाऊ लेल्यास कॅ. डुरँकचा

निरोप कळविला. त्यावर भाऊ लेल्यानें स्वतः जाऊन कॅप्टनसाहेबांची भेट घेतली, व पांडुरंगानें सांगितल्याप्रमाणें सर्व कांहीं सांगितलें. कॅ. डुरॅकनें भाऊ लेल्याचें सारें म्हणणें ऐकून घेतलें. पण रेसिडेंटला कळवावयाचें तें त्यानें कळविलें नाहीं. कारण त्यावेळीं रेसिडेंट लॉडविकसाहेब होते. व ओव्हॅन्स-साहेब 'येणार येणार' अशा जाहिराती फडकत होत्या. त्यामुळें ओव्हन्स येईपावेतों सुमारें महिनाभर कॅ. डुरॅकसाहेब गप्प राहिले!

रेसिडेंट ओव्हॅन्ससाहेब साताऱ्यास येऊन दाखल झाल्यानंतर एक दिवस त्यांना अशी बातमी समजली कीं, गोंव्याच्या सरकाराशीं कांहीं पत्रव्यवहार साताऱ्या महाराजांनीं केला असून त्यासंबंधाचे महत्वाचे कागद पेडणें येथील एका वाण्याकडे ठेवलेले आहेत. ही महत्वाची बातमी रेसिडेंटसाहेबांस कळ-तांच त्यांनीं ती लगबगीनें मुंबईसरकारास कळविली, व आपला माणूस गोमां-तकांत पाठविला.

आतां वाण्याकडे हे कागद कां व कसे ठेवण्यांत आले, हें गूढ उकललें पाहिजे. बाळकोबातात्या वगैरेंनीं माफीच्या आशेनें हें बनावट कागद तयार केले खरे, परंतु ते कागद तसेच माफीवारी फुकट कसे द्यावे? सबब रेसिडेंटाच्या माणसास त्यानीं सांगितलें कीं, नडीच्या प्रसंगीं ते एका वाण्याकडे गहाण ठेवले आहेत व त्याचेकडून रु. ५०० घेतले आहेत. रेसिडेंटाच्या माणसानें वाण्याची गांठ घेतली. वाणी कसला? तो कांहीं खरा सावकार नव्हता. ह्याच लफंग्यांनीं आपल्या सोनेरी टोळींतील एकास केला वाणी. या सोंगाड्या वाण्यानें प्रथम रु. ८०० मागितले. पण रेसिडेंटाच्या माणसानें इतकी रक्कम देण्याचें नाकारलें. अखेर रु. ६००, ५०० असे होत होत रु. ४०० ला सौदा पटला. रेसिडेंटांना ही बातमी समजली तशी ताबडतोब त्यानीं पैशाची व्यवस्था केली!

अशा प्रकारें रु. ४०० व शिवाय बाळकोबातात्या केळकरादी गुन्हे-गारांना अभयपत्रें, इनामें वगैरे देऊन जें पुराव्याचें बोचकें खरेदी केलें, त्यांत काय बरें होतें? यामध्यें एकंदर ४२ कागद होते. त्यापैकीं ३० कागद महा-

राज प्रतापसिंह व गोव्याचे गव्हर्नर डॉन मॅन्युअल यांच्यामधील पत्रव्यवहारासंबंधीं होते. बाकीच्या १२ कागदांत १ महाराज व गोव्याचे गव्हर्नर यांच्या दरम्यान तह झाला अशी कल्पना करून त्या तहाची अस्सल प्रत म्हणून होती व कांहीं संकेश्वरच्या स्वामींचीं नागोदेवरावास पत्रें वगैरे सटरफटर पत्रव्यवहार होता.

अशा प्रकारचा, रेसिडेंट ओव्हॅन्स यांच्या समजुतीप्रमाणें, भक्कम पुरावा त्यांच्याहातीं येतांच त्यांनीं सर्व पुराव्यावरून गव्हर्नरसाहेबांस पुढीलप्रमाणें हकिगत कळविली.

सातारच्या महाराजांनीं इंग्रजीराज्य नाहींसें करण्यासाठीं फार भयंकर कट केला आहे. गोव्याच्या गव्हर्नराशीं दळणवळण ठेवून व गव्हर्नरास १ घोडा नजर करून महाराजांनीं त्याशीं मैत्री जोडली व आतां उभयतां सरकारांमध्यें तह होऊन असें ठरलें आहे, कीं, गोव्याच्या गव्हर्नरांनीं जलमार्गानें ३०००० सैनिक पोर्च्युगीज, फ्रेंच, रशियन व टर्कीश असे गोव्यास आणावयाचे. त्या सैन्याचा खर्च प्रतापसिंहमहाराजांनीं करावयाचा. प्रतापसिंहांना हिंदुस्थानचा पातशाहा करावयाचें व हिंदुस्थानशीं व्यापार करण्याची परवानगी पोर्च्युगीजांना द्यावयाची असें प्रतापसिंह व डॉन मॅन्युअल यांच्या दरम्यान तह होऊन ठरलें आहे, अशी हकिगत मुंबईसरकारास रेसिडेंटसाहेबांनीं कळविली.

इंग्रजी राज्य उलथून टाकण्याचा हा तिसरा कट केल्याचा आरोप रेसिडेंटाच्या पत्रावरून सर रॉबर्ट ग्रँट यांना कळला, तेव्हां त्यांनीं हिंदुस्थानसरकारास त्यासंबंधानें पत्र लिहिलें व महाराजांना पदच्युत करून सातारचें राज्य खालसा करावें अगर कसें याबद्दल विचारणा केली. या पत्रांतून गव्हर्नरसाहेबांच्या मनोवृत्तीवर प्रकाश पाडणारे पुढील उतारे या ठिकाणीं देत आहों ... ...

“ महाराजांवर जे आरोप ठेवण्यांत आले आहेत ते (१) गोव्याचा कट व (२) जोधपूरचा कट. परंतु ह्यापैकीं कोणताही एक अगर दोन्हीं विशेष भयंकर स्वरूपाचे आहेत असें म्हणतां येणार नाहीं. महाराजांचा मोठा गुन्हा म्हटला म्हणजे आपल्या सैन्यांतील शिपायांना फितूर करण्याचा त्यांनीं प्रयत्न

केला हा होय .... सध्यांचे स्थितींत मला असें वाटतें कीं, ज्या गुन्ह्यासाठीं बाजीरावाला पदच्युत करण्यांत आलें व त्याला स्वातंत्र्यास मुकावें लागलें, त्याच गुन्ह्यासाठीं ब्रिटिश सरकारनें बाजीरावाच्या अवशिष्ट दौलतीवर स्थापन केलेल्या ह्या राजाला बाजीरावाप्रमाणेंच शासन करणें भाग आहे. ... — ह्या राजाच्या गादीवर त्याच्या भावाला बसवावें अशी माझ्यानें शिफारस करवत नाहीं. तहानें आपणांस तसें करणें कर्तव्यही नाहीं. कारण सदरचा तह हल्लींच्या राजाशींच झालेला होता, आणि त्याचे फायदे हल्लींच्या राजानीं गमावलेले आहेत. आतांपर्यंत जो खल केला, त्यास कारणीभूत होणाऱ्या गोष्टी लक्ष्यांत घेतां असें दिसून येतें कीं, साताऱ्यासारखें संस्थान अस्तित्वांत ठेवलें असतां आपल्यास पुष्कळशा अडचणी सोसाव्या लागतात. एक तर हें संस्थान आपल्या राज्यांत मध्येंच असल्यामुळें आपल्या दळणवळणास अडथळा येतो. व शिवाय ह्या ठिकाणीं नेहमींच तंटे माजून राहण्याचा व तंटे उभारलीं जाण्याचा संभव आहे. ... ... राजाला

---

१ Delinquency brought home to the Raja consists, first, of the Goa intrique, and next, that of Jodhpur; but neither even of these, nor both together, can be considered as costituting his deepest offencc. His greatest crime is,......the attempt to seduce our troops from their fidelity......At present......I feel clear that this adoption of one of the worst & wickedest of the offences which cost Bajee Rao his throne and liberty, by him whom the favor of the British Government exalted on the ruin of that prince, must irresistibly consign him to the same fate."

1 I am not disposed to recommend him (Appa Saheb) for the throne which his brother has forfieted. The treaty does not bind us to it, for it was personal with the present Raja, and its advantages have been lost. The very events which have caused this discussion, show the extreme inconvenience bound up in the existence of such a state as Satara, a state obtruded into the heart of our dominions, intercepting some of the most important of our internal communications, and likely to be ever a hotbed of faction and mischief.

पदच्युत करतांना, व सातारचें राज्य खालसा करून आपल्या राज्यास जोड-तांना, राजाची ही विश्वासघातकी व राजद्रोही वर्तणूक, व तहाच्या कलमांचा त्यानें केलेला भंग हीं जाहीरनाम्यांत दाखल करून त्याप्रमाणें जाहीरनामा काढणें जरूर आहे. ... ... पोर्तुगिज सरकारशीं ह्यासंबंधानें पत्रव्यवहार करावा, कीं कसें, अगर काय पत्रव्यवहार करावा हें मला सुचवतां येणार नाहीं. तो प्रश्न हिंदुस्थानसरकारच्याही वरिष्ठ सत्ताधाऱ्यांचा आहे. तथापि हिंदुस्थानांतील पोर्तुगीज सत्तेखालीं असलेला प्रदेश आपल्या (कंपनी) सरकारच्या ताब्यांत घ्यावयाचें म्हटल्यास आपल्यास सबळ कारणें सांपडतील. हे प्रदेश पूर्वीच्या वैभवाचें स्मरण करून देणारे म्हणून पोर्तुगीजलोकांना थोडेसे महत्त्वाचे वाटतील. याशिवाय त्या राष्ट्राला ह्या प्रदेशांचा कवडीचाही उपयोग नाहीं. परंतु आपणांस मात्र हे प्रदेश पोर्च्युगीज अंमलाखालीं असल्यामुळें अत्यंत गैरसोयीचे आहेत, कारण त्यामुळें आपली सत्ता हिंदुस्थानांत सर्वत्र बसण्यास प्रतिबंध येतो. शिवाय आपल्या सत्तेखालील असंतुष्ट व राजद्रोहीलोकांना निरनिराळ्याबाबतींत ते आश्रय-स्थान होऊन राहीले आहेत. गोव्याच्या गव्हर्नरानें सातारच्या महाराजांना लिहि-लेल्या एका पत्रांमध्यें असें म्हटलें आहे कीं, 'ब्रिटिशसत्तेविरुद्ध युरोपियन मदत आणण्यास तुम्हांला (महाराजांना) गोवा हेंच एकटें दार मोकळें आहे.' म्हणून मला असें वाटतें कीं हें गैरसोयीचें व धोका उत्पन्न करणारें दार बंद करण्याची प्राप्त झालेली ही पहिली संधि दवडण्यांत येऊं नये, अशा पद्धतीचा अवलंब करण्यांत यावा."

सर रॉबर्ट ग्रँटसाहेबांच्या वरील पत्रांतील विचार लक्ष्यांत घेतले म्हणजे "लांडगा व करडूं" यांच्या गोष्टीची आठवण होते. करडास मारून खाणें हा लांडग्याचा उद्देश असल्यामुळें त्यानें शिव्या दिल्यासंबंधानें जसा

In deposing the Raja and annexing the Satara territories to our own, it would be necessary to issue a proclamation, fully setting forth the perfidious and treasonable conduct of which that prince has been quilty, and reffrring to that article of the treaty under which, in conseqnence of his proceedings, his realm has been forfieted."

युक्तिवाद केला, तशाच मासल्याचा ग्रँटसाहेबांचा तर्कटपणा होता असें म्हणावें लागतें. साताऱ्याच्या राज्यामुळें इंग्रजी सत्तेस मध्यें खंड पडत होता, व हा सुपीक प्रदेश इंग्रजी अमलाखालीं येता, तर उत्पन्नाच्या व कारभाराच्या दृष्टीनें कंपनीसरकारास फायदेशीर होतें; म्हणून हा प्रदेश आपल्या राज्यांत सामील करावा ही ग्रँटसाहेबांची इच्छा. या इच्छेच्या पूर्ततेसाठींच त्यांनीं महाराजांवर निरनिराळीं कुभांडें घेतलीं होतीं, असें ओघानें म्हणावें लागतें.

पार्लमेंट सभेमध्यें ह्या कुभांडांसंबंधानें जी चर्चा झाली त्यावेळीं सर जेम्स हॉग् यांनीं सर जेम्स कान्यॉक, सर राबर्ट ग्रँट व ले. क. ओव्हॅन्स यांच्या बाजूनें भाषण करून, त्यांत गोव्याच्या कटास बरेंच उचलून धरलें होतें. ते म्हणाले "दुसऱ्या बाबींसंबंधानें जरी संशय घेण्यासारखी स्थिति असली, तरी गोव्याच्या कटासंबंधीं पार्लमेंटरी कागदांमध्यें जो तोंडी व लेखी पुरावा संकलित केलेला आहे, त्यावरून महाराजांचा गुन्हा निःसंशय शाबीत होत आहे[१]." हॉग्-साहेबांनीं इतर दोन आरोप संशयास्पद तरी ठरविले हें महाराजांचें नशीब म्हणावयाचें! सातारा गॅझेटियरकार तेवढें देखील कबूल करण्यास तयार नाहीं.

सर रॉबर्ट ग्रँटसाहेब व सर जेम्स हॉग् या दोघांच्या विचारांमधील विसंगत-पणा वाचकांच्या लक्ष्यांत आल्याशिवाय राहिला नसेल. ग्रँटसाहेबांच्या मतें महाराजांचा मोठा अपराध कोणता असेल, तर तो पलटणी फितूर केल्याचा. गोव्याच्या कटास ते महत्व देण्यास तयार नव्हते. पण हॉगसाहेबांच्या मतानें फितु-राच्या आरोपांत कांहींच तथ्य नाहीं. त्यांनीं साक्षीदारांच्या जबान्या वाचल्या-बरोबर त्यांतील खऱ्याखोट्याचा बोध त्यांना झाला होता. पण गोव्याच्या

---

१ ......Whatever doubt might be entertained on other parts of the question, the oral and documentary evidence contained in the Parliamentary papers proved the Raja's quilt in regard to the Goa plot, beyond the possibility of doubt."

(Sir James Hogg).

कटामध्यें जो लेखी पुरावा होता त्याचें वास्तविक स्वरूप ६००० मैलांवरून त्यांना कसें बरें कळावें ?

सबब ज्या तोंडी व लेखी पुराव्यास सर जेम्स हॉग् वगैरे दूरस्थ लोकांनीं उचलून धरलें होतें, तो पुरावा बनावट, खोटा व लबाडीचा होता, कीं कसें, ह्यासंबंधानें त्या पुराव्याची तपासणी केली असतां कळून येणार आहे.

एक तर बाळकोबातात्या वगैरे मंडळींनीं ब्रिटिश सरकाराकडून माफी मिळावी, साधल्यास चार पैसे मिळावे, व स्थायिक उत्पन्नाची सोय व्हावी, ह्या उद्देशानें हें पुराव्याचें बोचकें ओव्हॅन्ससाहेबांना विकलें होतें. ह्या बोचक्यांतील कागद जर बनावट नसते, तर गोमांतकांतल्या सावकारानें चारशें रुपयांसारख्या क्षुल्लक रकमेला हे कागद खास विकले नसते. ज्या कागदांच्या जोरावर प्रताप-सिंहांसारख्या छत्रपति राजाला साम्राज्यसत्तेशीं द्रोह केल्याबद्दल गुन्हेगार ठरवितां आलें असतें, असे महत्वाचे कागद त्याच सावकारानें महाराजांना विकले असते, व ते खरे असते, तर महाराजांनीं त्याला चार लाख रुपये आनंदानें दिले असते, व आपल्याविरुद्ध असलेला पुरावा रेसिडेंटाच्या अगर मुंबईसरकारच्या हातीं जाऊं दिला नसता. ही एकच गोष्ट लक्ष्यांत घेतली, म्हणजे महाराजांचें गिऱ्हा-ईक न शोधतां, रेसिडेंटाचेंच गिऱ्हाईक केळकरकंपूनें जें पसंत केलें, तें केवळ हा पुरावा खरा नव्हता म्हणूनच. अशा खोट्या व बनावट पुराव्याच्या जोरा-वर महाराजांना दोषी ठरविणें अविचाराचें नव्हे काय ?

दुसरें असें कीं, महाराजांची डॉन मॅन्युअल यास पत्रें व डॉन मॅन्युअलचीं महाराजांस पत्रें अशीं हीं सुमारें ३० पत्रें बाळकोबा केळकरादि चोरट्यांकडे कशीं यावींत ? महाराजांना आलेलीं पत्रें महाराजांच्या खास गुप्त पेटींत असावयास पाहिजे होतीं. तसेंच डॉन मॅन्युअलला जर महाराजांनीं कांहीं पत्रें लिहिलीं असतीं, तर तीं त्या गव्हर्नराच्या गुप्त पेटीमध्यें असावयास हवींत; परंतु ह्या गोव्याच्या कटाची जी हकिगत दिली आहे त्यांत हें अत्यंत महत्वाचे गुप्त पत्रव्यवहार छत्रपति प्रतापसिंहासारख्यांनीं चोरट्या लोकांचे हातीं कसे


जाऊं दिले याबद्दल अवाक्षरही नाहीं. एक तर सातारचे महाराज व गोव्याचे गव्हर्नर असे दोघेही अत्यंत खुळचट व मूर्ख असले पाहिजेत, किंवा ह्या चोरट्यांकडे असलेले कागद बनावट व खोटे असले पाहिजेत. पण महाराजांच्या चरित्रावरून पाहतां दुसरा तर्कच खरा असला पाहिजे हें कळून येणार आहे.

गोव्याच्या कटांतील पुरावा खोटा होता, हें अनेक कारणांनीं शाबीत करतां येण्यासारखें आहे. ह्या कटासंबंधीं जीं ३० पत्रें महाराजांच्या व डॉन मॅन्युअल यांच्या दरम्यानच्या पत्रव्यवहारासंबंधाचीं म्हणून आहेत त्यांपैकीं १० पत्रें मोरो जोशी ह्या नांवाच्या बाळकोबा केळकराच्या साथीदारानें लिहिलेलीं आहेत. ह्या मोरो जोश्यानें कांहीं पत्रें महाराजांच्या नांवचीं लिहीलीं आहेत, तर ३ पत्रें डॉन मॅन्युअलच्या नांवें लिहिलीं आहेत. तसेंच दाजी बल्लाळ वैद्य यानें एक पत्र महाराजांच्या नांवचें व ३ पत्रें डॉन मॅन्युअलच्या नांवचीं लिहिलीं आहेत. ह्याच सोनेरी टोळींतला नाना फाटक ह्यानें महाराजांचे नांवचें एक व डॉन मॅन्युअलच्या नांवचीं आठ अशीं ९ पत्रें लिहिलीं आहेत. याशिवाय नारायण चिवटे, रावजी कोटनीस, सखाराम कामत ह्यांनीं पत्रें लिहिलेलीं आहेत. ह्या सर्वांच्या जबान्या झालेल्या आहेत व त्यांनीं पत्रें लिहिल्याची गोष्ट कबूल केलेली आहे. ह्यावरून देखील हीं पत्रें बनावट असल्याचें उघड होत नाहीं काय ? महाराजांजवळ अगर डॉन मॅन्युअलजवळ लिहिणारे नव्हते कीं काय? म्हणून त्यांनीं ह्या सोनेरी टोळीपैकीं लेखक आपलीं गुप्त पत्रें लिहिण्यासाठीं बोलावून आणले ! हीं पत्रें बनावट आहेत हें लवकर समजून येऊं नये म्हणून कांहीं पत्रांवर महाराजांचे शिक्के उठवण्यांत आले होते. सर्व शिक्के खरे असते, तर ह्या कागदांचा बनावटपणा शाबीत करणें कठीण झालें असतें. कारण आप्पासाहेबांच्या मध्यस्थीनें महाराजांच्या नोकरास सामील करून बाळाजीपंतानें कांहीं कागदांवर महाराजांचे खासगीचे शिक्के उठविले होते. या कामीं "बाळाजी नारायण नातू व बाळाजी काशी किबे यांनीं आण्णा सिंदकर, हैबतराव शिकारखाने व विश्वनाथराव यांस भूलथाप, इनाम


१ प्र. म. आ. नि भा. २ पान १०३.

गांव व रुपये देण्याचें कबूल करून महाराज छत्रपतिसरकारचा खासा शिक्का चोरून काढवून फितुराचीं खोटीं पत्रें लिहून त्याजवर मोर्तब शिक्के केले. "

अशा रितीनें बेमालूम बनावट पत्रें बाळाजीपंत नातूकंपूनें तयार केलीं. परंतु हीं पत्रें बनावट होतीं हें शाबीत करणारा पुरावा त्याच पत्रांमध्यें आपणांस पाहावयास मिळतो. पूज्यपाद प्रथम छत्रपति श्री-शिवाजीमहाराज ह्यांचा शिक्का सर्वांच्या माहितीचा आहे.




अशा मजकुराचा खरा शिक्का असतां ले. क. ओव्हॅन्स यांनीं रु. ४०० देऊन व आणखीही खर्च करून जी कागदांची कंठाळ खरेदी केली त्यामध्यें कांहीं कागदांवर शिवाजीमहाराजांचा म्हणून जो शिक्का उठविलेला आहे तो:—



ही गोष्ट शिक्यांची झाली. मोर्तबांची स्थितीही तशीच होती. अस्सल मोर्तब:—असें आहे तर कंठाळींतल्या कागदावर जें मोर्तब उठविलेलें आहे त्यांमधील मजकूर व त्याचा आकार असा आहे:—





या शिक्क्यांवरून व या मोर्तबांवरूनच हे कागद खरे नसून बनावट होते हें शाबीत होणार आहे.

धारवाडचे पोलिटिकल एजट जे. ए. डन्लॉपसाहेब यांना मुंबई सरकारनें कांहीं कागद व शिक्के विकत घ्यावयास सांगितलें. त्यावरून त्यांनीं विकत

घेतले. त्यांमधील शिक्क्यासंबंधानें डन्लॉपसाहेबांनीं मुंबई सरकारास ता. ६।१।३८ रोजीं जें पत्र लिहीलें त्यामध्यें ते शिक्के प्रतापसिंहमहाराजांचे आहेत, असें कळविलें होतें.(पार्लमेंटरी पे.८२९) परंतु इतक्या आयासांनीं मिळविलेले शिक्के बनावट आहेत असें पुढें चौकशीअंतीं डन्लॉपसाहेबांनाच कळून आलें. तारीख १९ फेब्रुआरी १८३८ रोजीं मुंबईसरकारकडे दस्तैवज पाठवितांना त्यानीं मुंबईसरकारास असें कळविलें कीं, 'हे दस्तैवज मिळविण्याच्या कामीं त्रास फार पडला, खर्चही झाला व पुष्कळशी बुद्धीही खर्च करावी लागली खरी. तथापि हे कागद व शिक्के खरे आहेत असें मला वाटत नाहीं.'

डन्लॉपसाहेबांनीं ज्या शिक्क्यांचा उल्लेख केलेला आहे, त्या शिक्क्यांमध्यें मजकूर असा होता. "श्री राजा शाहू नरपती हर्षनिधान सदाशिव बाजीराव मुख्य प्रधान." हा शिक्का महाराजांचा असल्याबद्दलचें म्हणणें अत्यंत खोडसाळपणाचें व लबाडीचें आहे. प्रतापसिंहमहाराजांचें नांव राज्याभिषेक समारंभाचे वेळीं शाहू असें दुसऱ्या बाजीरावानें टेविलें होतें खरें,[1] परंतु तें नांव महाराजांनीं कधींही धारण केलें नव्हतें. व कोणत्याही कागदपत्राला महाराजांचें तसें नांव दाखल नाहीं. सबब शिक्क्यांतील शाहू राजा दुसरा कोणीतरी असला पाहिजे. शिवाय ह्या शिक्क्यामध्यें ज्या सदाशिव बाजीरावाचा उल्लेख केला आहे असा सदाशिव बाजीराव महाराजांचा कधींच मुख्य प्रधान नव्हता. किंबहुना पेशव्यांच्या घराण्यांत सदाशिव बाजीराव ह्या नांवाचा कोणीही पुरुष नाहीं. ' पहिल्या बाजीरावाला चार मुलगे बाळाजी, रामचंद्र, रघुनाथ व जनार्दन दुसऱ्या बाजीरावाला देखील सदाशिव नांवाचा मुलगा नव्हता. ह्यावरून म्हणजे शिक्क्यांतील मजकुरावरून हा शिक्का खोटा व बनावट होता हें निर्विवाद शाबीत होत आहे. महाराजांच्या खऱ्या शिक्क्यांमध्यें मजकूर होता तो असा:—"श्री गौरीनाथ वर प्राप्त शाहू राजात्मजन्मनः ॥ मुद्रा प्रतापसिंहस्य भद्रा सर्वत्र राजते ॥ ॥"

अशा प्रकारें गोव्याच्या कटासंबंधीं कागद कसे बनावट होते, हें वाच-

---

१ भा. इ. सं. म. ष० वृ० १८३४ पान २१९.

कांच्या लक्ष्यांत आलें असेल. हे कागद प्रथमतःच महाराजांना दाखविण्यांत येते, तर ह्या कागदांचें वास्तविक स्वरूप महाराजांनीं कंपनी सरकारास अगर हिंदुस्थानसरकारास, रेसिडेंटास अगर मुंबईसरकारास तेव्हांच कळविलें असतें. पण मग बाळकोबा तात्या, बाळाजी काशी किबे व बाळाजी नारायण नातू यांचें कारस्थान उघडकीस येऊन त्यांची फटफजिती होती! कारस्थानी बाळाजी नातूनें हें धोरण लक्ष्यांत ठेवून, दुसऱ्या आरोपासंबंधाच्या पुराव्याप्रमाणेंच हेही कागद महाराजांच्या अवलोकनांत येऊं नयेत, किंबहुना त्यासंबंधींची किंचित्‌ही बातमी महाराजांना समजूं नये अशी खबरदारी घेतली होती.

एक गोष्ट ह्या ठिकाणीं लिहावयास पाहिजे म्हणजे इंग्रजलोकांच्या डोळ्यांत नातूकंपूनें ह्या पुराव्यासंबंधानें कशी धूळफेंक केली, हें वाचकांना समजून येईल. मागें जें पुराव्याचें बोचकें बाळकोबा केळकरानें पेडण्याच्या वाण्याकडे गहाण टाकिलें होतें असें लिहिलें आहे त्यांतील महाराजांचे हे कागद बाळकोबा केळकराकडे कसे आले? ह्या प्रश्नाचें उत्तर नातूकंपूनें असें दिलें कीं, नागोदेवराव हा महाराजांचा गोव्यासंबंधानें पत्रव्यवहाराचे बाबतींत एजंट होता. व म्हणून त्याच्याजवळ हीं पत्रें होतीं. ह्या बाबतींत नागोदेवराव व महाराज ह्यांचा संबंध दाखविण्यासाठीं ४२ पत्रांपैकीं एक पत्र हजर करण्यांत आलें होत. हें पत्र नागोदेवरावानें मरणसमयीं संकेश्वरच्या स्वामींना लिहिलेल्या पत्राची नक्कल होती. ह्या पत्रामध्यें स्वामीचा नामनिर्देश स्पष्टपणें केला नसल्यामुळें, व 'महाराज' असें वेळोवेळीं संबोधिलें असल्यामुळें, हें पत्र महाराजांना म्हणजे छत्रपतिप्रतापसिंहांना लिहिलें होतें असा इंग्रज अधिकाऱ्यांचा गैरसमज करून देण्यांत आला. सर रॉबर्ट ग्रँट पक्षीचे वकील. पण त्यांनींही आपला असाच समज करून घेतला कीं, हें पत्र खुद्द छत्रपतींनाच नागोदेवराव ह्यानें लिहिलें होतें. परंतु ग्रामण्याची परिस्थिति जर त्यांनीं लक्ष्यांत घेतली असती, तर नागोदेवराव व महाराज यांचा संबंध बाळकोबा लावित होता तसा लावणें, कितपत संभवनीय

आहे, हें त्यांना कळून चुकलें असतें. ग्रामण्याच्या बाबीवरून बाळाजी नातू, चिंतामणराव पटवर्धन वगैरे जसे महाराजांचे शत्रू बनले होते, तसाच नागोदेवरावही १८१८ पासून महाराजांचा शत्रु बनला होता. बहुसंख्यांक ब्राह्मणसमाज महाराजांचा द्वेष करीत असलेला. मग नागोदेवराव त्यास अपवाद कसा होणार ? माल्कमसाहेबांनीं एकदां असे उद्गार काढले आहेत कीं, "ज्या ज्या ठिकाणीं मी गेलों, त्या त्या ठिकाणीं ब्राह्मणांनीं महाराजांविरुद्ध एकच गिल्ला करावा." लॉर्ड क्लेअर मुंबईचे गव्हर्नर असतां ३।४ हजार भटांभिक्षुकांचें डेप्युटेशन महाराजांविरुद्ध तक्रारी अर्ज घेऊन त्यांचेकडे गेलें होते. सारांश ब्राह्मण व महाराज यांच्यामध्यें अशा तऱ्हेचा वांकुडपणा उत्पन्न झालेला असतां, आपल्याविरुद्ध पक्षाकडील पुढाऱ्यांस, म्हणजे आपल्या शत्रूस, आपला एजंट महाराज नेमतील ही गोष्ट कोणास तरी खरी वाटेल काय ? आतां जें पत्र नागोदेवरावानें महाराजांना लिहिलें असें म्हटलें आहे, त्या पत्रांत जो मजकूर होता, त्यावरून हें पत्र महाराजांना म्हणजे प्रतापसिंहमहाराजांना नसून तें संकेश्वराच्या स्वामीलाच उद्देशून कसें होतें, हें कळून येणार आहे.

सर रॉबर्ट ग्रँट म्हणतात, हें पत्र धार्मिक स्वरूपाचें होतें. यांत राजकारणाचा भाग कांहींही नव्हता. परंतु नागोदेवराव व महाराज प्रतापसिंह यांचा पत्रव्यवहार होता, किंबहुना नागोदेवराव हा महाराजांचा एजंट होता, हें शाबीत करण्यास हें पत्र महत्त्वाचें होतें. म्हणूनच हें धार्मिक स्वरूपाचें पत्र होतें, तरी तें पुराव्यामध्यें दाखल केलें होतें.

या पत्रांत "**स्वामिचे चरण** या सेवकास आतां दिसावयाचे नाहींत;" असा प्रारंभींच उल्लेख केलेला होता. ब्राह्मणांची महाराजांबद्दलची आकांक्षा अशी होती कीं, महाराज नष्ट होतील तर बरें. असें म्हणणाऱ्या ब्राह्मणांपैकीं,

---

१ Every march I made, I was met by Brahmins loudly invailing against the Raja.

किंबहुना त्यांचा कैवारी म्हणजे नागोदेवराव. तो महाराजांच्या संबंधानें कधीं तरी वरीलप्रमाणें लिहील काय ? यावरून हें पत्र संकेश्वरच्या स्वामीसच लिहिलेलें होतें; महाराजप्रतापसिंहांसंबंधानें तें खास नव्हतें, असें वरील वाक्यांवरून देखील शाबीद होत नाहीं काय ?

याच पत्रांत आणखी पांच गोष्टींचें मागणें नागोदेवराव यानें, "**महाराजांकडे**" केलें होतें. त्या मागण्याही लक्षांत घेण्यासारख्या आहेत. त्या अशाः—

१ **रेवणसिद्धास** नंदादीप व नैवेद्य चालू ठेवावा. २ **रेवणसिद्ध** येथील दुकानचें कर्ज फेडावें. ३ माझीं मुलें अज्ञान आहेत, त्यांचें महाराजांनीं कळेल तसें पालनपोषण, व शिक्षण करावें. ४ चिंतामणराव यांचें कर्ज आहे तें फेडण्याची तजवीज व्हावी. ५ दाजीबा यानें २ वर्षें माझी सेवाशुश्रूषा केली, त्याची योग्य संभावना करण्यांत यावी. 'महाराजांनीं' आजपावेतों माझा योगक्षेम चालविला; तसाच पुढेंही चालविण्यास समर्थ आहेत. कागदपत्र व शिक्के बाळकृष्ण रघुनाथ केळकर यांचे ताब्यांत दिले आहेत. 'महाराजांचे' सत्यसंकल्पेंकरून सर्व गोष्टी सिद्धीस जातील; परंतु महाराजांचे **पाय मज दीनाला अंतरणार आहेत**, याबद्दल दुःख वाटत आहे. या पत्रांमध्यें '**महाराज**' असा उल्लेख पुष्कळ वेळां केला होता. त्यामुळें तें पत्र महाराजांना म्हणजे प्रतापसिंहमहाराजांनाच उद्देशून असावें, अशी ओव्हॅन्ससाहेबांप्रमाणें त्यांच्या पक्षपाती लोकांनीं आपली समजूत करून घेतली. परंतु या ठिकाणीं ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं, महाराज हें संबोधन जसें राजे लोकांना लावितात तसें जगद्गुरू अगर गुरूलाही वापरतात. सातार्‍यांत आज जे दादामहाराज म्हणून वारकरी सांप्रदायाचे प्रमुख आहेत, त्यांचे शिष्य त्यांना महाराज असें संबोधितात. ह्यांवरून ते संस्थानिक आहेत असा जर कोणी अर्थ काढला तर तें जसें हास्यास्पद होईल, तशीच गोष्ट या पत्रासंबंधानें आहे. या पत्रांतील मजकुरावरून हा '**महाराज**' शब्द कोणास उद्देशून लिहिलेला होता, हें ठरवावयास पाहिजे. या पत्राच्या वाचनास सुरुवात केली कीं प्रथम श्री॥नें आरंभ न करितां 'श्रीसिद्धराज' अशी सुरवात

केली होती. यावरूनही हें पत्र एखाद्या ब्राह्मणेतरास लिहिलें नसून तें धर्माधिकारी जगद्‌गुरूंनाच लिहिलेलें होतें असें दिसून येणार आहे. ब्राह्मण, मग इंग्रजी विद्येनें विभूषित झालेला असला तरीही, तो ब्राह्मणेतरास नमस्कार असें संबोधावयाचा नाहीं. ब्राह्मणेतरांनीं रामराम म्हणावें, व ब्राह्मणांनींच नमस्कार शब्द वापरावा असा प्रघात ब्राह्मणांनीं पाळलेला आपण आजच्या काळांतसुद्धां पाहातोंचना. तसेंच ब्राह्मणेतर राजांसही लिहावयाचें म्हणजे 'श्री' असें साधें लिहावयाचें. व जगद्‌गुरूस लिहावयाचें तें "श्रीसिद्धराज" असें लिहावयाचें. शिवाय संकेश्वरच्या स्वामीचें कुळदैवत 'श्रीसिद्धराज' हा आहे. तर महाराजांची कुळस्वामिनी श्रीभवानी आहे. तेव्हां श्रीसिद्धराज हा प्रयोग नागोदेवराव यानें महाराजांना उद्देशून केला नसून त्यानें जें पत्र लिहीलें होतें, तें संकेश्वरच्या स्वामीला, आपल्या मालकासच लिहिलें होतें. या पत्राबरोबरच आणखी एक पत्र त्यानें बाळकृष्ण रघुनाथ केळकर यांस लिहिलें होतें त्यामध्यें "हें पत्र महाराजांना नेऊन द्या म्हणजे ते आपला बंदोबस्त लावतील, तुम्ही व मी आजपावेतों एकमेकांशीं कसें वागलों याची आठवण ठेवा व सर्व मंडळींची काळजी घ्या. श्रीसिद्धदेवाच्या कृपेनें सर्वांनीं झटून यश संपादावें. देवाची कृपा आपल्यावर असलेमुळें यशःसिद्धी मिळेल असा मजला पूर्ण भरंवसा आहे. असा मजकूर सदर पत्रामध्यें होता. सदरचीं दोन्हीं पत्रें पार्लमेंटरी कागदांमध्यें छापलेलीं आहेत.

नागोदेवराव व महाराज छत्रपती यांचा संबंध ग्रामण्यामुळें कशा प्रकारचा होता, हें वाचकांच्या परिचयाचें पूर्ण आहे. नागोदेवराव हा जगद्‌गुरूंचा पक्षपाती होता. महाराज कायस्थांची बाजू घेऊन वागतात व शिवाय क्षत्रिय म्हणवूं पाहातात यांजबद्दल त्याला फार राग आला होता. महाराजांचा नाश करण्यास, व आपल्या मताचा आप्पासाहेब त्यांचे जागीं आणावा या हेतूनें जो ब्राह्मण. कंपू प्रेरित झाला होता; त्यांत चिंतामणराव पटवर्धनाच्या धाकदपटशानें संकेश्वरचे स्वामीही सामील झालेले होते. नागोदेवराव त्यांच्याच टोळींतला. मग तो अंतःकाळीं कां होईना, महाराजांकडे कसा वळणार ? हें एकच प्रमाण

या गोष्टीस पुरेसें आहे. नागोदेवराव हा जर महाराजांचा मुनीम असता, तर तो मेल्यानंतर त्यानें लिहिलेलें पत्र घेऊन बाळकोबा केळकर वगैरे मंडळी प्रतापसिंहमहाराजांकडे जाती. व या कागदांच्या जोरावर त्यांनीं महाराजांकडून जबर रक्कम उकळली असती. मग वेंगुर्ल्याच्या सरकारी खजिन्यावर छापा घालण्याचा प्रयत्न या भुकेकंगाल ब्राह्मणापसंदांनीं खास केला नसता. महाराज खरोखर गुन्हेगार असते, तर या लफंग्यांना त्यांचेकडून मोठमोठ्या रकमा खास उकळतां आल्या असत्या. सारांश हे पुडक्यांतील कागद एकूण एक बनावट होते. व केवळ इंग्रजी हद्दींत मोकळेपणानें हिंडतां यावें, घ केलेल्या गुन्ह्याबद्दल माफी मिळावी, व जमल्यास मोठमोठ्या रकमाही मिळा-व्यात म्हणून हा सारा खटाटोप, हद्दपारीची शिक्षा भोगीत असणाऱ्या, उप-द्व्यापीकंपूनें केला होता. व त्यांवरून शिक्केही उठवले होते. हे शिक्के आपण बना-वट केले, ही गोष्ट या लोकांना मागाहून कबूल करावी लागली. परंतु त्यांचें कारण त्यांनीं असें सांगितलें कीं, तसे शिक्के बनावट करण्यास नागोदेवराव यांस महा-राजांनींच सांगितलें होतें. पण बाळकोबाच्या या म्हणण्यास आधार काय ? महाराजांच्या हातचें पत्र जर या लोकांनीं दाखविलें असतें तर गोष्ट निराळी. पण मूळांतच जेथें लबाडी तेथें खरेपणा शोधून कोठला सांपडावयाला ?

अशा प्रकारें महाराजांवर जीं ३ कुभांडें घेण्यांत आलीं त्यामध्यें बाळाजी नातू, बाळाजी किबे, बाळकोबा केळकर, भिडे, दाजीबा पटवर्धन हेच साऱ्या खटपटीस होते, अंताजी भटजी. पांडुरंगपंत, राघोबा गयावळ वगैरे माणसें पुढें करून त्यांनीं महाराजांविरुद्ध इंग्रजी अंमलदारांचें मन बिघडविलें व महा-राष्ट्रीय स्वराज्याला जिवंत गाडण्यासाठीं अशा प्रकारें ३ खड्डे या देशबुडव्यांनीं खोदून ठेविले.

प्रकरण २८ वें.

दीर्घद्वेषी सर रॉबर्ट ग्रँट !

आपल्यावरील संकट टळावें म्हणून, छत्रपति प्रतापसिंहमहाराजांना पेंचांत पकडून हद्दपार करण्यासाठीं उत्सुक झालेल्या सर रॉबर्ट ग्रँटसाहेबांनीं युक्ति-प्रयुक्तीनें जनरल लॉडविड रेसिडेंट यांची विलायतेस रवानगी केली, व त्यांच्या जागीं आपल्या हितसंबंधास जागेल अशा ले. क. ओव्हॅन्सची नेमणूक केली हें मागें सांगितलेंच आहे. सातारच्या रेसिडेन्सीच्या कारभाराचीं सूत्रें ले. क. ओव्हॅन्स यांनीं हातीं घेतांच नवीन दोन कटांचा अपूर्व शोध लाविला. हे दोन कट म्हणजे गोव्याच्या गव्हर्नराशीं संगनमत करून युरोपांतून सैन्य आणून इंग्रजी सत्ता उलथून पाडावयाची हा एक; व नागपूरच्या पदच्युत राजाकडून पैसे घेऊन सैन्यबल मदतीस देऊन बंडाची उभारणी करावयाची हा दुसरा. या दोन्ही कुभांडाबद्दलची विस्तृत हकिकत स्वतंत्र प्रकरणांत पूर्वी दिली आहे.

ले. क. ओव्हॅन्स सातारच्या रेसिडेन्सीचा ताबा घेईपावेतों या दोन कुभांडांसंबंधीं हकिकतीची वाच्यता कोणीच कशी केली नाहीं ? लॉडविकसाहेब यासंबंधानें म्हणतात " महाराजांनीं कट केल्यासंबंधी हकिकत खरी असती, तर कमिशनचा मुक्काम साताऱ्यास होता तेव्हां कोणाही साक्षीदारानें त्याबद्दल माहिती सांगण्यास कमिशनसमोर यावयाची तयारी कां दाखविली नाहीं ! पण महाराजांच्या विरुद्ध साक्ष देण्यास त्यावेळीं कोणी पुढें येईना, हें मात्र खरें. नाहीं म्हणावें, तर एक अंतोबा भटजी मात्र साक्षीदार म्हणून पुढें आला. पण अंतोबा वाघ किती किंमतवान्, किती लायखीचा, किंवा किती विश्वास ठेवण्यासारखा होता, हें कांहीं नव्यानें सांगावयास नको. आणखी याही साक्षीदारानें मागाहून सारी लबाडी कबूल केली. " मी

आपल्या कल्पनेनेंच ही तर्कटाची कादंबरी रचिली " अशी कबूली जनरल लॅडविकसाहेबाकडे त्यानें दिली ![1]

वर ज्या दोन कटांचा शोध ले. क. ओव्हॅन्स यांनीं लाविला असें सांगितलें, त्याबद्दलचा मजकूर गव्हर्नर सर रॉबर्ट ग्रँट यांनीं हिंदुस्थान सरकारास लिहून कळविला. गोंवे सरकाराबद्दलही त्यामध्यें चर्चा केली होती. व त्या बाबतींत काय करणें इष्ट आहे हेंही गव्हर्नर साहेबांनीं सुचविलें होतें. हा मजकूर हिंदुस्थान सरकारास रुचला नाहीं. महाराजांचा दिलदार व उमदा स्वभाव, सरळपणाची वागणूक, शांततेबद्दल आवड व सनदशीर वागण्याची धडपड ह्या साऱ्या गोष्टी हिंदुस्थानसरकाराच्या पूर्ण परिचयाच्या झाल्या होत्या. ज्या ब्रम्हसंमधांनीं ले. क. ओव्हॅन्स व सर राबर्ट ग्रँट यांना पछाडलें होतें, ते ब्रम्हसमंध महाराजांच्या सुदैवानें हिंदुस्थानसरकारापावेतों अद्याप पोहोंचले नव्हते. तसेंच सर राबर्ट ग्रँट व ले. क. ओव्हॅन्स अगर सेक्रेटरी विलोबी यांना महाराजांचा नाश करण्यास जशीं बलवत्तर कारणें होतीं, तशा प्रकारची गोष्ट गव्हर्नर जनरलसोहबांची नव्हती. त्यामुळें त्यांचें मन विकारवश झालेलें नव्हतें. खरें काय, व खोटें काय, हें ओळखतां येण्यासारखी त्यांच्या मनाची स्थिती होती.

मुंबईसरकारच्या पत्रव्यवहारास हिंदुस्थानसरकारकडून जीं उत्तरें दिलीं जात, तीं वरील कारणामुळें सरळ सरळ अशींच असत. ता. २।१०।१८३७ रोजीं

---

१ " Can it be credited that had a conspiracy on the part of the Raja really existed at the time, some information would not have been given while the commission was assembled at Sattara ? Yet it is notorious, that not one person could be found to depose to that effect but an infamous Brahmin, who acknowledged on a subsequent day that the plot was only in his own imagination and brought forward from motive of revenge against the Raja and his divan................"

General Lodwick.

गव्हर्नरजनरल लॉर्ड ऑक्लंड यानीं मुंबईसरकारास पत्र लिहून कळविलें कीं, " महाराजांना योग्य तऱ्हेनें वरील आरोपासंबंधानें आपली बाजू मांडण्यास व त्यांना आपला निरपराधीपणा शाबीद करून दाखविण्यास अवकाश दिल्यावांचून कोणत्याही प्रकारचें शासन करणें गैरशिस्त होईल. त्यांच्याविरुद्ध जो पुरावा गोळा केलेला आहे त्या सर्वांचें एक फेरिस्त व टिप्पण तयार करून त्याची एक नक्कल महाराजांकडे रवाना करावी व त्यावर त्यांचें म्हणणें काय आहे हें विचारण्यांत यावें."

वरिष्ठ सरकारचा हुकूम तो ! त्याची अंमलबजावणी व्हावयास पाहिजे होती. पण मुंबईच्या गव्हर्नरानीं या हुकुमाची बजावणी कशी केली, तें पहा. त्यानीं ले. क. ओव्हन्सकडे या हुकुमाची एक नक्कल पाठविली व हुकुमाप्रमाणें महाराजांविरुद्ध गोळा केलेल्या पुराव्याचें फेरिस्त व टांचण करावयास फर्माविलें. म्हणजे गव्हर्नरसाहेबांनीं आपल्याकडून दाखवावयाची तेवढी दक्षता दाखविली. गव्हर्नरसाहेबांच्या हुकुमाप्रमाणें रेसिडेंट ओव्हन्स यानींदेखील फेरिस्त व त्रोटक टांचण तयार केलें. तथापि त्यांत एक गोम त्यांनीं ठेविलीच.

आपण महाराजांविरुद्ध गोळा केलेला पुरावा कितपत खरा आहे, हें ओव्हन्ससाहेबांना पुरें ठाऊक होतें. व हा पुरावा उघड्यावर आला तर सत्याच्या कसोटीस तो किती उतरेल, व त्या कामीं आपल्या अंगावर बाजू उलटण्याचा कसा संभव आहे ह्याची साक्ष रेसिडेंटसाहेबांचें मन त्यांस देत होतें. त्यामुळें सारा पुरावा उघड करण्यास त्यांचें मन तयार होईना. तेव्हां त्यानीं अखेर तीन महत्वाचे कागद या टांचणांतून वगळलेच. व अखेर असा अर्धवट मजकुराचा मसुदा तयार करून, तो रेसिडेंट ओव्हन्स यांनीं मुंबईसरकाराकडे पाठविला. असो, इतक्या गोष्टी साधारण न्यायाच्या तरी झाल्या !

पण हा तरी मसुदा महाराजांच्या हातांत पडला काय? साधारणपणें आपली अपेक्षा अशीच असणार कीं, हा मसुदा गव्हर्नरसाहेबांनीं महाराजांकडे पाठविला असावा, व त्यावर त्यांचें काय म्हणणें आहे अशी विचारणा केली असावी. परंतु गव्हर्नरसाहेब काय किंवा रेसिडेंट ओव्हन्स काय; दोघेही

सर्वसाधारण सरळ वृत्तींचे नव्हते. हें पुराव्याचें बाड महाराजांपुढें उघडें करणें, म्हणजे स्वतःवर संकट ओढवून घेणें होतें, हें ते जाणून होते. म्हणून ले. क. ओव्हॅन्स यानीं सदरचा मसुदा पाठवितांना त्याच्या सोबतच्या पत्रांत " हा मसुदा महाराजांचे हातीं न पडेल तर बरें[१] ? " असें आग्रहानें कळविलें, व लांबच लांब पत्र लिहून त्याबद्दलच्या कारणांची मिमांसा केली होती.

गव्हर्नरसाहेब आपणांस मोठे धर्ममार्तंड म्हणावेत. त्यांनीं लिहिलेलीं गीतें फार प्रसिद्ध आहेत. भाविक लोक त्यांना मोठे सात्त्विक वृत्तीचे समजतात. पण मनाचा खरा खोटेपणा व्याख्यानें, कीर्तनें, लेख, कविता यामध्यें अजमावतां येणें शक्य नसतो. पुनर्विवाहाचा पुरस्कार करणारे स्वतःवर प्रसंग पडला कीं, एखाद्या शेंबड्यालेंबड्या पोरीशीं लग्न लावून आपल्या संसाराचा गाडा चालू करतात; व्यासपीठावरून लंब्या बाता मारणारे व फंडगुंडागिरीचा निषेध करून देशहितासाठीं प्राण देण्याचा प्रसंग आल्यास त्यावेळीं आपण पहिल्या नंबरास असणार असें ठांसून सांगून टाळ्या मिळविणारे, प्रसंग आला कीं स्वतःच बदमाषगिरी करून पैसा उकळतात; असा व्यवहार आपण नित्य पाहतोंच. सर रॉबर्ट ग्रँट कोणत्या कोटींतले होते हें वाचकांनींच ठरवावें. ले. क. ओव्हॅन्स यांची सूचना ग्रँटसाहेबांना ताबडतोब पटली. त्यांनीं ले. क. ओव्हॅन्सच्या मताप्रमाणेंच वागणें योग्य दिसतें असा शेरा मारून तयार झालेला अर्धवट मसुदादेखील महाराजांकडे पाठविला नाहीं. वरीष्ठ सरकारच्या हुकुमाची सरसाहेबांनीं अशा प्रकारें संभावना केली, न्यायी वृत्तीचें ढोंग करणाऱ्या ग्रँटसाहेबांनीं महाराजांना न्याय मिळण्याच्या कामीं अशाप्रकारें अडथळा आणला. नातू–किबे–केळकर कंपनीमध्यें तयार झालेला हा पुराव्याचा माल धर्मनिष्ठपणाचा टेंभा मिरविणाऱ्या सर रॉबर्ट ग्रँटसाहेबांनीं आपली पुण्याई खर्च करून अशा प्रकारें महाराजांच्या अवलोकनांत येऊं नये अशी खबरदारी घेतली.

---

१ Story of the Sattara, Page 114.

महाराजांना हा मसुदा न मिळाल्यामुळें ह्या पुराव्याचे बाबतींत आपलें काय म्हणणें आहे, हें हिंदुस्थानसरकारास कळविण्याची संधिच महाराजानां लाभली नाहीं. त्यामुळें हा एकपक्षी पुरावाच खरा धरून महाराजांसंबंधानें तर्कवितर्क करण्यांत येऊं लागले. परंतु ह्या पुराव्याची किंमत गव्हर्नर जनरल लॉर्ड ऑक्लंड व त्यांचे कौन्सिलर्स यांनीं उपरीनिर्दिष्ट ता. २।१०।३७ च्या पत्रांत केली होती. त्यांनीं म्हटलें आहे कीं, "या पुराव्यानें महाराजांवर कोणताही आरोप शाबीद होत नाहीं." याच पत्रांत "पुरावा असमाधानकारक असल्याचें लिहिलें आहे." हिंदुस्थानसरकारचे मुख्य चिटणीस मि. मॅक्नॉटन लिहितात. "कमिशननें जो निकाल केला तो अपुरा आहे, व हा अपुरा निकालही ज्या पुराव्याच्या आधारावर केला आहे, तो पुरावाच मुळांत असमाधानकारक आणि अनिश्चित स्वरूपाचा आहे. कमिशनचा निकाल बरोबर आहे असें मानण्यास ग. ज. तयार असले, तरी देखील हें प्रकरण अद्याप अर्धवट स्थितींतच आहे असें त्यांना वाटतें. महाराज प्रतापसिंह यांच्यासंबंधानें कोणतीही कडक योजना अवलंबावयाची झाल्यास, आहे ह्या पुराव्यापेक्षां जास्त खात्रीलायक व सबळ पुरावा हवा असें त्यांचें मत आहे. सध्यां ज कागदपत्र गव्हर्नरजनरलसाहेबांच्या समोर आहेत त्यांवरून त्यांना असें वाटतें कीं, सातारा तेथें महाराजांविरुद्ध कट चालले आहेत, खासगी व धार्मिक बाबींमुळें कांहीं लोक महाराजांशीं दावा धरून त्यांच्याबद्दल

---

१ "......much of the evidence by which even this imperfect result was obtained was uncertain and unsatisfactory, and whilst His Lordship was willing to place confidence in the judgement of the Commission, he felt that the case was incomplete; and to justify the Government in any strong and final measure, further information was absolutely necessary. But from all the papers before him, he has increased reason to doubt, whether any certain grounds of action can possibly be obtained amidst the intrigues, the personal animosities and exaggerated rumours of all description..... "

भलभलत्या कंड्या पिकवीत आहेत, अशा प्रकारच्या परिस्थितींत खात्रीलायक खरा पुरावा उपलब्ध होईल कीं कसें, याबद्दल शंका आहे.

"तहनाम्याविरुद्ध वागून तहाचा भंग महाराजांनीं केला, असा जो आरोप महाराजांवर करण्यांत आला आहे, तो इतका क्षुल्लक व त्रोटक आहे कीं, त्याच्या मानानें त्याच्यासंबंधीं बातम्या फारच अतिशयोक्तीच्या आहेत, असेंच आढळून येतें. सारांश सातारच्या महाराजांसंबंधानें जो पुरावा पाठविण्यांत आला आहे त्या पुराव्यामध्यें महाराजांना दोषी ठरवितां येईल असा पुरावा फारच थोडा आहे. किंबहुना नाहींच (nothing) असें ग. ज. यांना व त्यांच्या कौन्सिलर्सना वाटतें. ... ... तसेंच आपल्या ता. ३० सप्टेंबर १८३७ च्या पत्रांत पोर्च्युगीज, अरब वगैरे लोकांशीं महाराजांनीं संगनमत केलें आहे असें आपण लिहितां. परंतु कोणाही विचारवंत माणसास असला विचार क्षणभरही सुचावयाचा नाहीं. शिवाय कमिशनच्याच रिपोर्टामध्यें सातारचे प्रतापसिंहमहाराज अप्रबुद्ध अगर वेडसर असल्याबद्दल आढळ होत नाहीं. ... ..."

गव्हर्नरजनरलसाहेबांनीं स्पष्टपणें लिहून कळविलें कीं, "इतउत्तर जास्त पुरावा गोळा करण्याच्या भानगडींत पडणें व्यर्थ आहे. कारण तशा प्रकारच्या पुराव्यानें कोणतीच गोष्ट शाबीद होणार नाहीं." पण ग० ज० साहेबांचा हा सल्ला सर रॉबर्ट ग्रँट यांना, किंवा त्यांच्या पक्षांतील लोकांना कसा पसंत पडावा? गव्हर्नरजनरलांचे हुकुमाप्रमाणें त्यांनीं वागावयाचें, म्हणजे प्रतापसिंह महाराजांचा नाश करण्याचा आजवरचा त्यांचा बेत जागचे जागींच जिरणार ! किंबहुना महाराजांनीं विलायतेस डेप्युटेशन पाठविण्याचें ठरविलें होतें, त्याप्रमाणें त्यांचें डेप्युटेशन जर विलायतेस जाऊन पोहोंचलें तर त्यांच्याकडून जहागिऱ्यांच्या स्वामित्वाबद्दलचा हुकूम आपण दाबून ठेविला आहे, ही गोष्ट डायरेक्टरांना समजेल. मग आपल्या फजितीस पार राहाणार नाहीं. आतांपावेतों महाराजांविरुद्ध जो पुरावा आपण तयार केला, तो केवळ महाराजांना

पेंचांत आणण्यासाठीं तयार केला असा डायरेक्टर आपणांवर उघडपणें आरोप करतील. व या संबधानें परिस्थितीचा पुरावा इतका बिनतोड आहे कीं, आपला निरपराधीपणा शाबित करणें शक्य नाहीं. याच विचारानें प्रतापसिंह महाराजांची उघडपणें व पद्धतशीर चौकशी करावयास ले० क० ओव्हॅन्स व सर रॉबर्ट ग्रँट हे तयार नव्हते. उघड व पद्धतशीर चौकशी होती. तर नातू कंपूनें तयार केलेल्या पुराव्याचा बनावटपणा पद्धतशीरपणें उघड होता. अशा प्रकारें वागण्यांत आपलेंच मरण नातूकंपूस व त्यांच्या आश्रयदात्यांस उघड उघड दिसत होतें. सबब हिंदुस्थानसरकारच्या उपरीनिर्दिष्ट पत्रासंबंधानें गव्हर्नर साहेबानीं पुढील आशयाचें टिप्पण दप्तरीं लिहून ठेविलें. " हिंदुस्थानसरकारकडील ता. २।१०।३७ चें पत्र वाचून आश्चर्य वाटलें व वाईटही वाटलें. त्या पत्रामध्यें शेवटल्या कलमांत जो मार्ग सुचवला आहे, त्याप्रमाणें वागावयाचें, तर ब्रिटिश सरकारच्या अब्रूस मोठाच धोका बसेल ! मला वाटतें तें पत्र दप्तरीं दाखल करावें. ले. क. ओव्हॅन्स यांना इकडून गेलेलें पत्र व त्यांचें आलेलें उत्तर अशीं हिंदुस्थानसरकारकडे माहिती करितां पाठविण्यांत यावींत. "

यानंतर ता. १६।१०।३७ चें हिंदुस्थानसरकारचें पत्र मुंबईसरकारास आलें. त्या पत्रामध्यें सर रॉबर्ट ग्रँट यांनीं प्रतापसिंहमहाराजांच्या बाबतींत जी वागणूक अंगिकारली होती, ती हिंदुस्थानसरकारास नापसंत असल्याचें स्पष्ट लिहिलें होतें. " महाराजांच्या शत्रूंनीं म्हणा, किंवा इंग्रज सरकारच्या शत्रूंनीं म्हणा, जीं कारस्थानें उभारलीं आहेत तीं, व साताऱ्च्या महाराजांना ब्रिटिश सरकारच्या उपकारांचें विस्मरण झालें आहे व ते असंतुष्ट झाले आहेत हें, अशा साऱ्या गोष्टी खऱ्या मानल्या तरीही मुंबईसरकारानें मागाहून जीं कुलंगडीं उत्पन्न केलीं आहेत, त्यांचा विचार करतां तीं कमकुवत आहेत. व त्यांवरून एकंदर सारा पुरावा एकतर खोटा असला पाहेजे किंवा असल्या खुळचट योजना मनांत वागवित असल्यास साताऱ्चे महाराज वेडे तरी असले पाहिजेत. " (........for they prove either the exten

of the falsehood which is mingled with these accusations, or the imbecility with which the Raja is capable of entertiaining projects of so wild a description.)

ग. ज. साहेबांचे वरील उद्गार लक्ष्यांत घेतां मिं. एडवर्ड थार्न्टनचे व रा. टुल्ल यांचे निरर्गल उद्गार कसे एकपक्षीय व खोडसाळपणाचे आहेत हें कळून येणार आहे. ग. ज. साहेबांनीं हें महाराजांविरुद्ध उठविलेलें काहूर तावडतोब बंद करा अशी मुंबईसरकारास सूचना केली होती. (......protracted scrutiny should be at once brought to a conclusion .... ग. ज. साहेबांना असें वाटत होतें कीं, ही चौकशी लोकांमध्यें ब्रिटिश सत्तेसंबंधानें अविश्वास उत्पन्न करावयाची. म्हणून मुंबईसरकारास ती तावडतोब बंद करण्यास त्यांनीं लिहिलें होतें.

हें पत्र मुंबईसरकारास पसंत पडलें नाहीं. कारण यांनीं प्रतापसिंह महाराजांना पदच्युत करण्याचा डाव छान जुळवून आणला होता. सातारचें राज्य खालसा होतें तर मग गव्हर्नरसाहेबांना लॉर्ड करण्यांत आलें असतें. पण हें सारें सुखस्वप्न ग.ज. साहेबांच्या हुकुमामुळें पार विरघळून गेलें. बिचारे ग्रँटसाहेब, भग्नमनोरथ झाल्यामुळें ते मनांतल्या मनांत फार चरफडले! डाव फसला असल्याचें पाहून त्यांना आतां दुःस्वप्नेंही पडूं लागलीं. त्यांनीं ओव्हन्ससाहेबांना ग. ज. चा हुकूम मोठ्या नाखुषीनें कळविला. पण त्यांतल्यात्यांत मुत्सद्देगिरी केलीच. त्यानीं चौकशी थांबवा असें कळविण्याऐवजीं " **लश्कर पुरी करा** " असें आपल्याच हुकुमानें कळविलें.

गव्हर्नर ग्रँटसाहेब व रेसिडेंट ओव्हन्स यांनीं हिंदुस्थानसरकारचे हुकूम अशा प्रकारें धाब्यावर बसवले. महाराजांची उघडपणें चौकशी करावी कीं कसें; चौकशी करावयाची तर कशा प्रकारें करावी, त्याचा परिणाम इतर संस्थानिकांवर काय होईल अशा प्रकारें मीमांसा करण्यांत बराचसा काल गेला. अखेर धर्मनिष्ठ ग्रँटसाहेब दापोडी[1] येथें ९ जुलै १८३८ रोजीं मयत झाले !

---

1 दापोडी हें पुण्यानजीक ४ मैलांवर खेडेगांव आहे.

प्रकरण २९ वें.

वकीलातीची विलायतेस रवानगी.

जहागिऱ्यांच्या स्वामित्वासंबंधाचा डायरेक्टरांनीं दिलेला निकाल गव्हर्नर-साहेबांनीं दडपून ठेविल्यानंतर तो समजावून घेण्यासाठीं महाराजांनीं विलायतेस आपल्यातर्फे शिष्टमंडळ (वकीलात) पाठविण्याचें ठरविलें, व आपला तसा विचार असल्याचें त्यांनीं गव्हर्नर सर रॉबर्ट ग्रँटसाहेबांस भेटीच्यावेळीं इ. स. १८३६ मध्येंच बोलून दाखविलें होतें. त्यानंतर जनरल लॉडविक-साहेबांनीं इ. स. १८३६ च्या जून महिन्याचे सुमारास महाराजांना दोन समजुतीच्या गोष्टी सांगून त्या बाबतींत स्वस्थ राहण्यास सांगितलें, वगैरे मजकूर पूर्वीं आला आहे. जनरल लॉडविक हा साधासुधा शिपाईगडी असल्यामुळें, तो मनाचा थोर होता. त्याचें मन मोडण्यास महाराज तयार नसत व तोहा महाराजांच्या हिताविषयीं नेहमीं दक्ष असे. जनरल लॉडविकप्रमाणें पेन्शनर फिजिशियन जनरल डॉक्टर मिल्ने हेही महाराजांचे चहाते होते. महाराजांनीं त्यांना एक पत्र लिहिलें व साताऱ्यास येऊन आपणांस भेटा अशी विनंति केली. परंतु खोडसाळपणानें तें पत्र मधल्यामध्येंच उघडून वाचण्यांत आलें ! पुढें तर ता. ३० जानेवारी १८३९ रोजीं डॉक्टर मिल्नेसाहेबांनीं साताऱ्याच्या महाराजांशीं प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष कोणत्याही प्रकारचा संबंध ठेवूं नये, असें मुंबईसरकाराकडून त्यांस फर्माविण्यांत आलें.

मुंबईस महाराजांचे आणखी पुष्कळ युरोपियन स्नेही होते. मुंबई गॅझेटचे संपादक मि. मॅक्डोनल्ड यांना महाराजांच्या निरपराधीपणाची खात्री पटली होती. डॉक्टर मिल्ने यांनीं व मॅक्डोनल्डसाहेबांनीं मुंबईसरकारास व हिंदुस्थानसरकारास महाराजांसंबंधानें बरींच पत्रें लिहिलीं होतीं. परंतु त्यांचा

कांहींएक उपयोग झाला नाहीं. शेवटीं निरुपाय होऊन विलायतेस वकीलात पाठविणें महाराजांना अवश्य वाटलें.

प्रथमचें शिष्टमंडळ सन १८३८ मध्यें सय्यद मीर अफझिल अल्ली याचे नेतृत्वाखालीं पाठविण्यांत आलें. सय्यद मीर हा १८३८ च्या डिसेंबरमध्यें विलायतेस दाखल झाला. सय्यद मीर विलायतेस गेला, ही गोष्ट हिंदुस्थानांतल्या व विलायतेंतल्या कंपनीसरकारच्या इंग्रज अधिकाऱ्यांना रुचली नाहीं. त्यामुळें सय्यद मीरसंबंधानें बराचसा गैरसमज पसरविण्यांत आला, व त्यामुळें विलायतेंतील लोकमत बरेंचसें महाराजांविरुद्ध झालें. सय्यद मीर इंग्लंडास गेल्यावर आपल्या कामास लागण्याऐवजीं बरेच दिवस स्वस्थ बसला. त्याला कारणेंही होतीं. त्याला वाटलें कीं, सर रॉबर्ट ग्रँटसाहेब दिवंगत झाल्यामुळें आतां महाराजांवर कोणत्याही प्रकारचें अरिष्ट येणार नाहीं. महाराजांसंबंधानें नवीन गव्हर्नर सर जेम्स कार्न्याक यांचें चांगलें मत असल्यामुळें, ग्रँटसाहेबांनीं उत्पन्न केलेली वावटळ उडून जाईल, व निर्भय झाल्यावर महाराज आपणांस ताबडतोब परत बोलावतील. त्याचें हें मत १८४० पावेतों असेंच कायम होतें. पुढें त्यानें १४।९।४० रोजीं कोर्ट ऑफ डायरेक्टर्संना एक पत्र लिहून सर्व हकीकत कळविली. निराश होऊन रंगोबापूजीबरोबर पटेना म्हणून, सय्यद मीर अफझिल अल्लीसाहेब मक्केला निघून गेला. सय्यद मीर याच्या हातून कांहींच कामगिरी घडून आली नाहीं. महाराजांची सदरच्या माणसाशीं चांगलीशी ओळख नसावी असें वाटतें.

आजच्याप्रमाणें, त्याकाळीं परदेशगमन सोपें नव्हतें. उच्च वर्णीय हिंदु विलायतेस जाण्यास धजत नसत. म्हणूनच सय्यद मीर अफजिल अल्ली यास व आणखी दुसऱ्या एका मुसलमान गृहस्थास महाराजांनीं पाठविलें होतें. परंतु जिव्हाळ्याच्या माणसांशिवाय आपल्या वकीलातीचें काम कळकळीनें केलें जाणार नाहीं, हें ध्यानांत आणून महाराजांनीं यशवंतराव राजे शिर्के, भगवंतराव विठ्ठल, रंगोबापूजी गुप्ते व इतर नोकरमंडळी मिळून एकंदर आठ माणसें सन १८३९ च्या फेब्रुआरीच्या सुरवातीस विलायतेस पाठविण्यासाठीं साताऱ्याहून

मुंबईस रवाना केली. यशवंतराव राजे शिर्के, हा कडक वृत्तीचा, शिस्तीचा व बाणेदार मुत्सद्दी होता. भगवंतराव विठ्ठल, व कारकून रंगोबापूजी हे राजे शिर्क्यांच्या जोडीला पाठविलेले होते. सय्यद मीरच्या जाण्याला मुंबईसरकारनें हरकत घेतलेली नव्हती. कारण सय्यद मीर मक्केला जातों असें सांगून, मुंबईहून निघाला होता. परंतु यशवंतराव राजे शिर्के यांच्या आधिपत्याखालीं ही वकीलात विलायतेस जावयास निघाली, तेव्हां मात्र त्यांच्या मार्गांत अडचणी आणण्यास, हरप्रकारें त्यांचा अपमान, छळ व नुकसानी करण्यास ॲक्टिंग गव्हर्नर मि. फॅरिस व त्यांचे साथीदार यांनीं कंबर बांधली.

सदरची वकीलात मुंबईस येऊन दाखल होतांच, गव्हर्नर साहेबांनीं मि. एलिएट यांना असा हुकूम फर्माविला कीं, सदरचे लोक सातारच्या महाराजांच्या वतीनें इंग्लंडास जात असल्यास, महाराजांवरील चौकशीचें काम पुरें होई-पावेतों, त्यांना थांबवून ठेवावें. इकडे महाराजांच्या मंडळींनीं साडेपांच हजार रुपये देऊन फ्रेंच्यांच्या एका जहाजामध्यें आपल्या प्रवासाची सोय करून घेतली होती. ह्या बोटीचा कॅप्टन ' द उल्मा ' हा होता. २१ फेब्रु-आरीपर्यंत ह्या आठही हिंदु गृहस्थांना मुंबईसच अटकावून ठेविलें, व सातारच्या महाराजांनीं कोणच्या कारणासाठीं व कोणत्या अधिकारानें सदर लोकांना विलायतेस रवाना करण्याचें योजिलें आहे, हें महाराजांकडून लिहून येईपर्यंत या मंडळींना कोणत्याही गलबतांतून रवाना करतां येणार नाहीं, असें ॲक्टिंग सेक्रेटरी मि. बॉईड यांनीं बजाविलें. यामुळें यशवंतराव राजे शिर्के व त्यांची मंडळी यांना मुंबईस स्वस्थ बसावें लागलें.

२२ फेब्रुआरी १८३९ रोजीं ॲक्टिंग गव्हर्नर मि. फॅरिस यांनीं या मंडळींना मि. बॉईड यांच्या मार्फत असें कळविलें कीं, " ऑनरेबल कोर्ट ऑफ डायरेक्टर्स व महाराणीसरकारचे अधिकारी सदर वकीलातींतील लोकांना सार्वजनिकरित्या ओळखणार नाहींत. महाराजांचे आपण नातेवाईक आहोंत व महाराजांतर्फे वकील जात आहों, त्यामुळें विलायतेस आपली दाद लागेल व पाहुणे म्हणून बरदास्त राखिली जाईल, अशी राजे शिर्के

यांची समजूत असल्यास ती साफ चुकीची आहे. " गव्हर्नर साहेबांनीं यशवंतराव वगैरेंस वरीलप्रमाणें धमकी दिली. व सर्व कागदपत्राच्या नकला गुप्तकमटीकडे पाठवून डायरेक्टरांना कळकळीची विनंती केली कीं, विलायतेस हें मंडळ आल्यास त्याला कोणीही ओळखूं नये. तसेंच अशा तऱ्हेनें वकीलात पाठविणें तहाच्या कलमांविरुद्ध आहे, अगर कसें हेंही गुप्त चौकशीकमिटीनें ठरवून कळवावें.

मुंबई कौन्सिलांत सहा आठवडे महाराजांच्या माणसांना विलायतेस जाऊं द्यावें, कीं कसें, अशाबद्दल सारखीं खलबतें चाललीं होतीं. या मुदतींत त्यांच्या कैक वेळां जबान्या घेण्यांत येत होत्या. फौजदारी खटल्यांतील आरोपींना पोलिस मॅजिस्ट्रेटकडे पाठवीपर्यंत ज्या गोष्टींचा अनुभव अनुभवावयास मिळतो, तशा तऱ्हेचा अनुभव या आठ मंडळीस मुंबई येथें पाऊल ठेविल्यापासून अनुभवावयास मिळाला. धमकी घालण्यांत आली, भीति दाखविण्यांत आली, व विलायतेच्या खर्चासाठीं बरीच मोठी रक्कम अनामत ठेवा असें सांगण्यांत आलें. मागणी केलेली रक्कम जबरी असल्यामुळें, ती हजर करण्यांत येणार नाहीं, अशी इलियटसाहेबांची अटकळ होती, परंतु मॅजिस्ट्रेट मि. इलियटसाहेबांनीं मागणी केल्याप्रमाणें रक्कम सरकारी तिजोरींत आदा करण्यांत आली.

इतकें झाल्यावर आपलें कृत्य कायदेशीर आहे किंवा कसें, याबद्दल ॲक्टिंग गव्हर्नर फॅरिससाहेबांना मोठी शंका आली व त्यांनीं ॲडव्होकेट जनरलला त्याबद्दल विचारणा केली. ॲडव्होकेट जनरलनें या वकीलातीच्या जबान्या उलटून सुलटून पुनः पुनः घेतल्या, परंतु विलायतेला जाण्यास प्रतिबंध करण्यासारखें कांहींही सबळ कारण त्यास आढळून आलें नाहीं.

अशा रीतीनें कांहींएक कारण नसतां, मुंबईसरकार हट्टास पेटून महाराजांची वकीलात मुंबईहून विलायतेस जाऊं नये म्हणून प्रयत्नास लागलें. कायदेशीर उपाय थकले असें दिसून येतांच, अन्याय्य उपायांचा अवलंब करण्यास तें प्रवृत्त झालें. मि. फॅरीस यांनीं कस्टमच्या कलेक्टराला असें

सांगितलें कीं, या माणसांना मुंबईतून जातां येणार नाहीं अशी तजवीज करावी. गव्हर्नरसाहेबांचें सांगणें तें. त्याप्रमाणें ह्या मंडळींना घेऊन जाणाऱ्या गलबताला परवानगी देण्याची वेळ येतांच तशी परवानगी देण्याचें कलेक्टरसाहेबांनीं साफ नाकारलें. या फ्रेंच जहाजाच्या मालकाला विलायतेच्या प्रवासाचें भाडें म्हणून महाराजांच्या मंडळींनीं ५॥ हजार रुपये दिले होते. सदर जहाजाच्या उतारूंच्या यादींत महाराजांकडील मंडळींचीं नांवें होतीं, म्हणूनच त्या जहाजाला परवानगी देण्यांत येत नव्हती. अखेर या लोकांना न नेण्याच्या अटीवर परवाना मिळवून दउल्माचें जहाज विलायतेस निघून गेलें. इतकें झालें, तरी यशवंतराव राजे शिर्क्यांनीं व महाराजांनीं हिंमत सोडिली नाहीं! अखेर पुन्हां लिव्हर्पूलला जाणाऱ्या इंग्लिश कंपनीच्या जहाजामध्यें महाराजांच्या मंडळींनीं आपली सोय करून घेतली. ही कंपनी इंग्रज असल्यामुळें तिला बंदर परवाना नाकारण्याची हिंमत कस्टमखात्याच्या कलेक्टरला होईना. शिवाय विरोध करण्याची लेखी परवानगी गव्हर्नरसाहेबांनीं कोणासच दिलेली नव्हती. त्यानीं तोंडीं भांडीं आपल्या अधिकारांत जें करतां येईल तें करा असें फर्माविलें असल्यामुळें, निरुपाय होऊन कस्टमच्या कलेक्टरसाहेबांना महाराजांचें डेप्युटेशन आपल्याच देशाच्या जहाजांतून आपल्याच देशीं जातांना डोळे उघडे ठेवून पाहणें भाग पडलें!

प्रकरण ३० वें.

सत्याग्रही बाणेदार मराठा.

सर रॉबर्ट ग्रँटसाहेब हे ९।७।१८३८ रोजीं मयत झाल्यावर त्यांच्या जागीं मि. फॅरिस यांची गव्हर्नर म्हणून तात्पुर्ती नेमणूक हिंदुस्थान सरकारच्या हुकुमानें करण्यांत आली. त्यांनीं महाराजांतर्फे विलायतेस जाणाऱ्या शिष्टमंडळाची मुंबई मुक्कामीं कशी बोळवण केली व विलायतेच्या प्रवासापासून पराङ्मुख करण्यासाठीं त्यांच्या मार्गांत कसकशीं विघ्नें उत्पन्न केलीं, यासंबंधीं माहिती मागें दिलेली आहे. त्यावरून महाराजांच्या बाबतींत मि. फॅरिस यांचेंही मत मि. विलोबी वगैरेप्रमाणेंच होतें, हें निराळें सांगण्याची आवश्यकता नाहीं.

ग्रँट यांच्या मागून सर जेम्स रिव्हेट कार्न्याक यांची कंपनीच्या डायरेक्टरांनीं मुंबईच्या गव्हर्नराच्या जागीं नेमणूक केली. सर कार्न्याक हिंदुस्थानच्या राजकारणाला अपरिचित होते, असें नाहीं. स. १८१५ च्या सुमारास हे बडोद्यास दुय्यम पो. एजंट म्हणून होते. तेथें असतां लक्ष्मीची मर्जी संपादन करून ते मायभूमीस परत गेले. पैशाच्या जोरावर कंपनीचे डायरेक्टर झाले, व पुढें (डेप्युटी) दुय्यम अध्यक्ष झाले. ता. २६।१२।३५ रोजीं कंपनी सरकारच्या वतीनें डायरेक्टरांनीं महाराजांचा गौरव करून एक मौल्यवान् तरवार मुंबईच्या गव्हर्नराच्या मार्फत नजर करण्यासाठीं पाठविली व सोबत पुढील आशयाचें पत्र पाठविलें होतें. त्या पत्रावर या कार्न्याक साहेबांची दुय्यम अध्यक्ष म्हणून सही आहे. सदरचें पत्रः—

इंडिया हौस, लंडन ता. २९।१२।१८३५.

श्रीमन्महाराज राजश्री छत्रपति साहेब, संस्थान सातारा यांसः—

महाराजांस ईश्वरानीं मोठेपणा दील्हा आहे. त्या अन्वयेच महाराजांची

स्थिति फार चांगली असून लौकीक व कीर्तिवान् योग्य आहा. महाराजांची स्तुति मुंबई गव्हर्नरनें हमेशा वेळोवेळीं केली आहे कीं, महाराजांची मोठेपणाची चाल आणि सुज्ञ फार उत्कृष्ट मोठ्या योग्यतेची आहे आणखी महाराजानी आपले राज्याचे काम फार चांगले सुमार्गाचे रितीनें चालवून राज्याचे सौरक्षण करितात हे आम्हास कळून आम्हीं फार खुषी जाहालो आहो...... अणखी महाराज सर्वांहून फार फार मोठे किर्तीवान् आहेत. त्याचप्रमाणें आम्ही महाराजांचा स्वच्छ दील व निर्मल चाल नजरेंत आणून फार फार संतोष मानितो. आणि महाराजांनीं......वगैरे कामे फार मेहनतीनें तजवीज करूनच केली व मुलुखाचा बंदोबस्त चांगले रितीनें ठेविला आहे. त्याजवरून हिंदुस्थानांत सर्व लोकांचे नजरेत महाराजांचे योग्यतेप्रमाणेंच आबरू व किर्ती फार मोठी वाढत चालली आहे. आणि या चालीचा कित्ता दुसरे राजेरजवाडे वगैरे लोकांनीं घेऊन चालावें असी सुरेख मोठ्या नामदारीची शिस्त व शिरस्ते व पधति दिलात अणून मोटे संतोषी होऊन मान्य करितो..... सर्वत्र डरेक्टरस यांचा येक विच्यार होऊन आम्ही महाराजाकरितां येक तरवार पाठवावी असे सर्वांच्या अनुमतें ठरून कबूल होऊन ही तरवार मुंबई गवरमेटाचे मार्फतीनें आम्ही रा। केल्या अन्वयें महाराजांस पावती होईल ती घेऊन महाराजांनीं कोर्टाचे दोस्तीची यादगारी वा। उत्तम प्रकारचा मान देऊन तरवार ठेवितील....'

क्लार्क चेअरमन.
जेमस रिविट करनाक
डिपुटी.

सदरील पत्रकावरून महाराजासंबंधानें कंपनीच्या डायरेक्टरांचें मत कळून येणार आहे. पण हें पत्र व तरवार महाराजांना ग्रँट साहेबांनीं दिली नाहीं !

तसेंच पुढें तारीख ७–२–३८ रोजीं मुंबईसरकारास जें पत्र कोर्ट ऑफ

१ प्र. म. आ. निराकरण भाग १ ला पान १०–११. वरून.

डायरेक्टर्सनीं लिहिलें त्यावरही सर जेम्स कार्न्याक यांची चेअरमन म्हणून सही होती. त्यामध्यें डायरेक्टरांनीं मुंबईसरकारची चांगलीच कानउघडणी केली आहे, व जहागिऱ्यांवरील महाराजांचा हक्कही कबूल केला आहे. मुंबईसरकार महाराजांविरुद्ध पुरावा गोळा करीत होतें, व त्यांस संकटांत लोटूं पहात होतें हें कृत्य कोर्ट ऑफ डायरेक्टर्सना १८३९ च्या जानेवारीपावेतों आवडत नव्हतें. जानेवारीच्या त्यांच्या एका पत्रामध्यें त्यांनीं तशा प्रकारचे उद्गार काढले आहेत. ते म्हणतात, "सातारच्या महाराजांच्या बाबतींत आणखी चौकशी करणें, म्हणजे केवळ कालाचा अपव्यय आहे इतकेंच नव्हे, तर त्यामुळें आपल्या राज्यकारभाराला व इज्जतीलाही बराच कमीपणा येणार आहे."

कोर्ट ऑफ डायरेक्टर्सची महाराजांच्या स्नेहावर व विश्वासावर अशा प्रकारची अढळ निष्ठा असल्यामुळें सर रॉबर्टसाहेब निधन पावल्यावर त्यांचे जागीं सर जेम्स कार्न्याकची नेमणूक त्यांनीं मुद्दाम केली होती. व महाराजांविरुद्ध जी मोहीम सुरू होती, ती थांबविण्यासाठीं डायरेक्टर्सनीं सर जेम्स कार्न्याक यांना स्पष्ट इशारा दिला होता. महाराजांनीं झाल्या गेल्या गोष्टी विसरून जाव्यात असें त्यांना सांगण्याबद्दल कार्न्याक यांस सूचना केली होती. डायरेक्टरांचा हेतु असा कीं, महाराज प्रतापसिंहांसारख्या कर्तृत्वशाली हिंदी राजाशीं कंपनीसरकारची दोस्ती अबाधित राहावी.

कार्न्याकसाहेबांना हिंदुस्थानांत जाऊन मुंबईच्या गव्हर्नरच्या जागेचा चार्ज घेतल्यानंतर त्यांनीं महाराज प्रतापसिंह यांची भेट घ्यावी व पूर्वी त्यांच्या व इंग्रजसरकारच्या दरम्यान जो चांगुलपणा व परस्परांविषयीं विश्वास होता तो पुनः जोडावा म्हणून डायरेक्टरांनीं त्यांना पूर्ण अधिकार दिला होता. परंतु कार्न्याकसाहेबानीं ह्या अधिकाराचा कशा प्रकारें दुरुपयोग केला, हें पुढें प्रसंगानें वाचकांस कळून येणार आहे.

सर रॉबर्ट ग्रँट दिवंगत झाले पण विलोबी, फॅरिस वगैरे महाराजांचा मनापासून द्वेष करणारे कौन्सिलर्स सर जेम्स यांच्या कौन्सिलांत होते. त्यांनीं कंपनीसरकारच्या इभ्रतीचा प्रश्न गव्हर्नरसाहेबांपुढें मांडला. व महाराजांसंबंधानें

जो बनावट पुरावा गोळा केला होता, तो त्यांना एकतर्फी बनवून सांगितला. सर जेम्स यानीं विचार केला कीं, आपण बिनशर्त सख्य जोडावयास आलेले, तर कौन्सिलर्स महाराजांचा बळी घ्यावयास उत्सुक झालेले. बरं, या कौन्सिलरांच्या म्हणण्याविरुद्ध वागावें तर ते नाखूष होणार. बरें, त्यांना तरी उगाच नाखूष कां करा. त्यांना खूष ठेवण्यांत आपला उलट फायदाच आहे. अशा प्रकारें दूरवर विचार करून सरसाहेबांनीं कौन्सिलरांना अशी तडजोड सुचविली कीं, मी महाराजांना माफी देतों व हें प्रकरण मिटवून टाकतों पण तुमच्या इभ्रतीसाठीं महाराजांना अशी अट घालतों कीं, त्यांनीं **'आपण चुकलों असें कबूल करावें.'** सर जेम्स याला थार्न्टनप्रमाणें असें वाटत होतें कीं, राज्यलोभानें एतद्देशीय राजे एवढेंसें खोटें बोलण्यास सहज कबूल होतील, पण महाराजांचा स्वभाव त्याला काय माहीत?

मि. विलोबी, फॅरिस, नातूकंपू यांना महाराजांच्या स्वभावाची पूर्ण कल्पना होती. हा क्षत्रिय बच्चा प्राणांतींही खोटी गोष्ट कबूल करणार नाहीं. सत्यापायीं अधिकार गेला, हद्दपार व्हावें लागलें, अपमान सोसावा लागला, कष्टदशा आली नव्हे मृत्यूच्या जबड्यांत उडी घ्यावी लागली तरी प्रतापसिंह माघार घेणार नाहीं. कीर्तीनें मरेल, पण अपकीर्तीचें जिणें तो पत्करणार नाहीं, हें यांनीं पक्कें हेरलें होतें. व या तडजोडींत आपणच यशस्वी होऊं अशी त्यांची पक्की खात्री होती. सर जे. कार्न्याक यानीं वरीलप्रमाणें तडजोड सुचवतांच त्यानीं या तडजोडीस मान्यता दिली, पण आपणास वाटत असलेले विचार गव्हर्नरसाहेबांपासून लपविण्याच्या उद्देशानें त्यानीं आणखीही कलमें या तडजोडीस जोडावीत असा आग्रह धरला. गव्हर्नरसाहेबांनीं त्याचें म्हणणें अखेर कबूल केलें व त्याप्रमाणें पुढील आशयाचा मसुदा तयार करण्यांत आला.

" इंग्रजी सरकारांत अशी खबर मिळाली कीं, ज्या कंपनीसरकारानें तुमच्याशीं तह करून, तुम्हास सातारच्या गादीवर बसविलें, त्याच कंपनीसरकाराशीं विरोधी अशा सत्तेबरोबर बदसल्लागारांच्या नादानें तुम्ही पत्रव्यवहार सुरू केला आहे. सदरप्रमाणें खबर मिळाल्यावरून तिच्या खरेखोटेपणाबद्दल

चौकशी करणें कंपनीच्या अधिकाऱ्यांना अपरिहार्य झालें. सदर चौकशींत असें निष्पन्न झालें कीं, इंग्रज सरकारशीं मैत्री जोडल्यामुळें तुम्हाला जो सुरक्षितपणा व कंपनी सरकारशीं स्नेहभाव यांचा लाभ झालेला होता तो गमावून बसण्यास कारणीभूत होईल अशी वागणूक तुम्ही केली आहे. असें आहे तरी देखील तुमच्यावर व तुमच्या घराण्यावर असलेल्या प्रेमामुळें झाल्या गेल्या गोष्टी इतउत्तर विसरून जाण्याचें या सरकारानें ठरविलें आहे. परंतु त्याच वेळीं असेंही ठरविण्यांत आलें आहे कीं, तुम्ही पुढें नमूद केल्याप्रमाणें अटी अक्षरशः पाळण्याचें कबूल केलें पाहिजे.

(१) ता. २५।९।१९ च्या तहनाम्याप्रमाणें इतउत्तर अक्षरशः वागणूक करण्याचें महाराजानीं कबूल केलें आहे. त्या तहनाम्यांमधील दुसरें कलम पुढीलप्रमाणें आहे:—“ सरकार महाराज छत्रपति आपण व आपले फर्जंद व वारिस व कायम मुकाम यांचे तर्फेनें करार करित आहेत कीं सरकार इंग्रेज बाहादूर यांचे कह्यात व मदतीत निरंतर संतोषानें राहून सरकार इंग्रेज बाहादूर यांचे सलामसलतीनें हरएक काम करीत जावूं. या प्रमाणें करार करीत आहे. कलम” या कलमाप्रमाणें महाराजानीं वागण्याचें कबूल केलें आहे.

(२) महाराजांचे बंधू आप्पासाहेब महाराज यानां आतां पावेतों महाराजांकडून जो तनखा देण्यांत येत होता तो देण्याचें महाराजांनी कबूल केलें आहे. तसेंच आप्पासाहेब महाराजांची खासगी मालमत्ता, त्यांची त्यांना देण्याचें कबूल केलें आहे. यासंबंधानें उत्पन्न होणारी भानगड रेसिडेंटांकडे सोपवावयाची व त्यांच्या निर्णयाप्रमाणें वागावयाचें. इंग्रजसरकारच्या संरक्षणाखालीं आप्पासाहेब महाराजांच्या इच्छेस येईल त्याठिकाणीं त्यानीं राहावें, यास महाराजानीं संमती द्यावयाची.

(३) बळवंतराव चिटणीस यास मंत्री मंडळांतून कमी करावयाचें व इंग्रज सरकारच्या परवानगीशिवाय महाराजांच्य राज्यांत त्यानीं राहूं नये.

(४) सोबतच्या निराळ्या यादीमध्यें ज्यांची ज्यांची नांवें जोडलीं आहेत, त्यांच्या शरिरास, मालमत्तेस व त्यांचा जो तनखा असेल त्यांचे

सन १८३६ पूर्वी जसें होते तसें रक्षण करण्याचें अभिवचन इंग्रज सरकारनें दिलें असल्यामुळें तें अभिवचन महाराजांनीं पाळावयाचें आहे. त्याच्या संबंधानें ज्या भानगडी उपस्थित होतील, त्या सर्व रेसिडेंटाकडे सोंपवावयाच्या. महाराजांनीं त्यासंबंधानें स्वतः निर्णय करावयाचा नाहीं. या यादीमध्यें आणखी नांवें दाखल करावयाचीं झाल्यास तीं दाखल करण्याचा अधिकार इंग्रजसरकारास आहे. त्यांच्या संबंधानेंही महाराजांनीं वर वर्णन केल्यांप्रमाणेंच वागणूक करावयाची आहे.

वरील अटींना महाराजांनीं संमती द्यावयाची असून, त्या अटी ता. २५।९।१८१९ च्या तहनाम्याची पुरवणी कलमें आहेत, असें समजण्यांत यावयाचें आहे. व त्यावर महाराजांनीं सही व शिक्का करावयाचा आहे. सुचविलेल्या ह्या अटींमध्यें कोणत्याही प्रकारें फेरफार करावयाचा नाहीं, हेंही सुचवून ठेवित आहों. तसेंच ह्या अटी ताबडतोब कबूल करण्यांत यावयास पाहिजेत. इंग्रजसरकार महाराजांचे हितचिंतक असल्यामुळें त्यांनीं या अटी अगदीं सौम्य स्वरुपाच्या अशा सुचविलेल्या आहेत हें महाराजांच्या लक्ष्यांत येईल.

तुमचें राज्य रक्षण करावें अशी ब्रिटिशसरकारची मनीषा आहे हें महाराजांना व सर्व देशाला कळून चुकणार आहे, म्हणून तहाच्या तत्त्वाप्रमाणें व कलमाप्रमाणें मैत्री व परस्परांचा विश्वास ही राखण्यासाठीं महाराजांनीं इतउत्तर कसोशी दाखविली पाहिजे."

ता. २३।८।३९ रोजीं मुद्दाम साताऱ्यास येऊन सर जेम्स कार्न्याक यांनीं महाराजांची भेट घेतली व वरील मसूदा, विशेषतः त्यामध्यें सुचविलेल्या अटी वाचल्या. म्हणजे कार्न्याकसाहेब महाराजांच्या दुष्मानांच्या हातांत सांपडले होते हें निर्विवाद ठरतें. या अटींपैकीं एक अट बळवंतराव चिटणिसास हद्दपार करण्याबद्दल आहे. हें कां ? तर दादा (बाळाजी) नातूचें व त्याचें पटत नव्हतें. ता. १।८।३७ रोजीं बळवंतरावास कैद करून

रेसिडेन्सी शेजारीं एका बंगल्यांत ठेविलें असतां इतर कैद्यांप्रमाणें याही कैद्यास ले. कर्नल ओव्हॅन्स याचे सूचनेवरून बाळाजी नातूनें महाराजांच्या विरुद्ध साक्षी देण्याबद्दल सूचना केली; व तसें केल्यास कैदेंतून सुटका होईल व इनामही मिळून इंग्रजसरकारची मर्जी बहाल होईल, असें आमिष दाखविलें! पण बळवंतराव चिटणीस पडला स्वामिभक्त. आपल्यावरील संकट टाळण्याच्या दुर्बुद्धीनें धडधडीत खोटी जबानी देणें, त्याला कसें पसंत पडणार? त्या बाबतींत बाळाजी नातूनें बळवंतराव चिटणीसास नाहक त्रास देवविला होता.[1]

महाराजांशीं गव्हर्नरसाहेबांचा सलोखा झाला कीं, बळवंतराव चिटणीस कैदेंतून मोकळा होणार. बळवंतराव कशा प्रकारचा कारस्थानी होता हें बाळाजी पूर्णपणें जाणून होता. तो बंधमुक्त होऊन महाराजांपाशीं राहूं लागला म्हणजे आतांपावेतों महाराजांवर जो डाव आपण केला तो उलटा आपल्या आंगाशीं येणार ह्यांत तिळमात्र शंका नको अशी बाळाजीस भीति वाटत होती. शिवाय तो बळवंतरावाचा दीर्घद्वेष करीत होताच. ग्रामण्याची चळवळ यशस्वी करावयाची तर बळवंतरावाची नाचक्की केल्याशिवाय, त्याला हद्दपार केल्याशिवाय, होणार नाहीं. त्याशिवाय ब्राह्मण्य संरक्षण व्हावयाचें नाहीं, असें बाळाजी नातूस मनापासून वाटत होतें. शिवाय ओव्हॅन्ससाहेबांनाही बळवंतरावाचा राग आला होता. तेव्हां अशा प्रकारच्या माणसांनीं आगाऊ सुचविलेलें असल्याशिवाय, या महत्त्वाच्या यादींत कार्न्याकसाहेबांनी बळवंतराव चिटणीसाच्या हद्दपारीची अट खास घातली नसावी.

कांहीं लोकांच्या माफीचें कलमही या पुरवणी तहाच्या मसुद्यामध्यें समाविष्ट करण्यांत आलें होतें. कार्न्याकसाहेब मुंबईस आल्यास ४।२ महीनेही झाले नव्हते. मग या विशिष्ट व्यक्तींची व त्यांची ओळख झाली कधीं ? व त्यांच्या सुरक्षितेबद्दलची काळजी कार्न्याकसाहेबांना सुचली कशी ? तेव्हां हें सर्व कारस्थान बाळाजी नातूचें व ओव्हॅन्सचें असणार, दुसरें काय ?

---

१ प्र. म. आ. नि. भाग २ पान ६४ पहा. (बळवंतराव चिटणीसाचें पत्र.)

या पुरवणी तहांतील साऱ्या अटी महाराजांना अपमानास्पद वाटल्या. आपल्या स्वामिभक्त नोकरास कांहीं अपराध नसतां हद्दपार करण्यास कां संमती द्यावी ? कोणाही न्यायी राजानें अशा प्रकारें प्रजाजनांना वागवावें, म्हणजे मग तो राजा कसला ! जें न्यायास येईल, तें करावयास महाराज तयारच होते. परंतु बळवंतराव चिटणीसानें कांहीं एक अन्यायाचें वर्तन केलें नसतां, अगर तशी शाबिती झाली नसतां, त्यास हद्दपारीची शिक्षा देण्यास आपण संमती द्यावी, हें न्यायवृत्तीच्या **प्रतापसिंह** महाराजांना संमत झालें नाहीं.

या पुरवणीतहाच्या प्रस्तावनेंतील मजकूर तर धडधडीत खोटा होता असो. ता. २३।८।३९ रोजीं गव्हर्नरसाहेब मुद्दाम साताऱ्यास आले. महाराजांना रेसिडेन्सींत बोलावून घेतलें, त्यावेळीं त्याचें व महाराजांचें बोलणें झालें, त्यांतील कांहीं मजकूर पुढीलप्रमाणें:—

सर जेम्स कार्न्याक:—महाराजांनीं फितूर केला हा खरा आहे.

छ. प्रतापसिंहमहाराज:—तसें वाटत असल्यास कमिटीकडून चौकशी करावी.

सर जे. का.:—चौकशी करावयाचें कारण नाहीं. आम्हास फुरसत नाहीं. आम्ही सांगूं तें ऐकावें. आणि या यादीवर सही करून द्यावी. (ही यादी पृ. २६८–९ वर व पा. बु. २ पा. १२०० वर आहे.)

छ. प्र. म.:—दस्ताऐवजीं मुद्दा असल्यास इकडून बोलणेंच नाहीं.

स. जे. का.:—आम्हापाशीं मुधोजी भोंसले याचें पत्र आहे.

छ. प्र. म.:—समजा हांडरसनसाहेबाचें नांवें कोणी पत्र लिहून पाठविलें आणि हांडरसनसाहेबांस कांहीं माहिती नाहीं. तरी ते उत्तर काय करतील तसें तो (तुम्ही म्हणतां त्या पत्राचा) मजकूर इकडे माहितच नाहीं. त्याचें उत्तर काय सांगावें. इंग्रेजी **सरकारचे खात्री करितों. पाहिजे तर विहीरींत उडी टाकूं. परंतु कांहीं नसतां हें ऐकणें होणार नाहीं.**

प्रतापसिंह महाराजांच्या आंगचा बाणेदारपणा या संवादामध्यें दिसून येतो.

राज्य लोभानें त्यांनीं खोटेपणा पदरीं घेण्याचें साफ नाकारलें. लोभासाठीं, प्रेमासाठीं मैत्रीसाठीं, प्राण देण्यासही ते तयार होते, पण जे खरें नाहीं तें कबूल करून राज्य राखावें, असली दुर्वासना, असला नामर्दपणाचा विचार, त्यांना सुचला नाहीं. एकोणिसाव्या शतकांत सत्याग्रही राजा हा एवढाच झाला, असें म्हटलें तर अतिशयोक्ति मुळींच व्हावयाची नाहीं. सर जेम्स कार्न्याक यानीं सारखी ३ दिवस महाराजांची भेट घेतली, व याच गोष्टी त्यांना निरनिराळ्या तऱ्हांनीं सांगितल्या. महाराजांचे बंधू आप्पासाहेब यशवंत माळावर[1] तळ देऊन राहिले होते आपला शत्रूपक्ष आपणास संकटांत लोटण्याच्या प्रयत्नास लागला होता. गव्हर्नरसाहेब, आपण देत असलेल्या सरळ जबाबानीं आपल्यावर रागास आले होते. बरें ते तरी काय म्हणत होते कीं " चूक झाली म्हणा व मोकळे व्हा " मग ही सारी भानगड ते मिटविणार होते. त्यांनीं तसें अभिवचनही पण दिलें होतें. इतकें सारें महाराजांना कळत होतें. पण--

महाराजांनीं कंपनीसरकाराविरुद्ध खरोखर विश्वासघाताचें वर्तन केलें असतें तर चूक झाल्याची कबुली देऊन, निदान दुसऱ्या कोणाच्या तरी माथीं हा अपराध मारून महाराजांनीं आपला बचाव करून घेतला असता; व ती आणीबाणीची वेळ निभावून नेली असती. पण प्रतापसिंह ऊर्फ बुवासाहेब-महाराज संत कोटींतील होते. सत्य हाच त्यांचा बाणा होता. विश्वासघाताचा विचार त्यांच्या पवित्र मनास कधींच स्पर्श करूं शकला नव्हता. कंपनी सरकारावर त्यांची अढळ निष्ठा होती. आपला निरपराधीपणा सर जेम्स कार्न्याक-

---

१ **यशवंत माळ** हें ठिकाण सातारच्या पूर्वेस कोलवडीच्या तळ्याच्या आग्नेय दिशेस आहे. बुवासाहेबावर रुसून आप्पासाहेब या ठिकाणीं येऊन राहिले होते. येथें आल्यापासून नातूकंपूच्या सल्ल्यानें महाराजांच्या आश्रित मंडळीस फितूर करण्याचा त्यांनीं क्रम सुरू केला होता. तें कारस्थान या ठिकाणीं यशस्वी झालें व आप्पासाहेबांच्या देशद्रोही, राजद्रोही व बंधुद्रोही कारस्थानाचें फळ म्हणजे राज्य-लाभ आप्पासाहेबांना या ठिकाणींच झाला म्हणून त्यांनीं या पापभूमीस '**यशवंत माळ**' असें नांव ठेविलें.

साहेबांना आपण पटवून देऊं, अशी त्यांची खात्री होती. **अपकीर्तीनें राज्यवैभव उपभोगीत राहाण्यापेक्षां किर्तीसाठीं मृत्यु पुरवला असें** मानणाऱ्या साधु पुरुषांप्रमाणें बुवासाहेबांची वृत्ति होती.

तारीख १२ डिसेंबर १८४४ रोजीं हिंदुस्थानसरकारास महाराजांनीं जें पत्र लिहिलें, त्यामध्यें ता. २३ आगष्ट रोजीं सर कार्न्याक साहेबांच्या भेटीच्या प्रसंगाचा उल्लेख केलेला आढळतो. ग. साहेबांनीं "माफी मागा व या यादीवर सही करून मोकळे व्हा. मग तुमच्या राज्यास धोका नाहीं. नाहीं तर तुम्ही राज्य गमावून बसाल" असा स्पष्ट इशारा दिला होता. परंतु महाराज म्हणतात "कीर्ती गमावून राज्य राखावें या गोष्टीस मला संमती देतां येईना. मी निरपराधी आहे व माझें निरपराधित्व कोणाही कायदेशीर पंचायतीसमोर मला शाबीत करतां येईल, अशी माझी पक्की भावना झाली असल्यामुळें गुन्हा केल्याची कबूली देऊन, व आपल्या स्वतःच्या अधःपाताला कारणीभूत होऊन या अटी मान्य कराव्या असें मला वाटलें नाहीं....गुन्ह्या-बद्दल कबूली देऊन मला राज्य राखतां येत होतें, व इंग्रजसरकारची दोस्ती व विश्वासही कायम राखता आला असता. मी जर खरोखर गुन्हेगार असतों तर ग. सा. च्या अटी मी मोठ्या कृतज्ञतापूर्वक आतुरतेनें पत्करल्या असत्या. पण माझी चौकशी करा असेंच मी आग्रहानें सांगत होतों. चौकशीमध्यें मी अपराधी ठरलों तर माझी बेअब्रू होईल, मला शीलभ्रष्ट झाल्याचा काळीमा लागेल, मी ढोंगी व लुच्चा आहे असें जगजाहीर होईल हें मला पूर्णपणें कळत होतें. सत्य व कीर्ती यांच्या मानानें सत्ता व लक्ष्मी यांना मी कशाप्रकारें कवडी किंमतीची समजत होतों हें ग. साची चौकशी चालू असतांना मला राज्यावरून दूर टेवा पण माझी चौकशी करा असें जें मी आग्रहानें सांगत होतों त्यावरून कळून येणार आहे.... मनाची अढळ शांतता व निरपराधीपणाबद्दल आत्म-विश्वास याखेरीज सर्व कांहीं, धनदौलत, राज्य, व मोठेपणाचें वैभव हीं सारीं मी गमावून बसलों आहे! कां? तर २३।८।३९ च्या पूर्वी मी इंग्रज-सरकारचा द्वेष्टा, इंग्रजसरकारचें नुकसान करण्यास प्रवृत्त झालेला मांडलिक

होतों म्हणून नव्हे. तर स्वतःच्या सदसद्विवेकबुद्धीचा खून करून माझ्या शत्रूंच्या म्हणण्याप्रमाणें मी कबूली देण्यास कबूल झालों नाहीं म्हणून; दयेचा स्वीकार करण्याऐवजीं मी न्यायाची मागणी केली म्हणून. "

महाराज प्रतापसिंहांच्या वरील उद्गारांत महाराजांचें सारें सच्चरित्र सांठविलेलें आहे. क्षत्रियामध्यें जो बाणेदारपणा असावयास पाहिजे तो छत्रपति प्रतापसिंहांमध्यें दिसून येतो. ' सत्याग्रहाचा जनक ' अशी महाराजांना पदवी दिली तर ती यथार्थ होणार नाहीं का ?

सर जेम्स कार्न्याकसाहेबांना महाराजांचा निरपराधीपणा पटला नसावा असें आम्हांस तरी वाटत नाहीं. पण राजनीति कुटिल असते. कधीं इभ्रतीची कल्पना, तर कधीं स्वार्थ, हीं माणसास नीतिमार्गापासून भ्रष्ट करतात. कार्न्याक साहेब अशाच कांहींतरी मनोविकारास बळी पडले व महाराजांवर रुष्ट होऊन साताऱ्याहून गेले.

प्रकरण ३१ वें.

महाराजांस पदच्युत केलें !

सर जेम्स कार्न्याक यांनीं कबूल करण्यास सांगितल्याप्रमाणें आरोपाबद्दल कबुली महाराज देत तर नाहींत, उलट आपल्यावरील आरोप खोटा असून त्याची शाबिती करा, व मग आपणांस वाटेल तें शासन करा, असें महाराजांचें म्हणणें पडलें. ही गोष्ट गव्हर्नरसाहेबांना रुचली नाहीं. त्यांना डायरेक्टरांनीं हिंदुस्थानांत पाठवितांना साताऱ्याची भानगड बिनशर्त मिटविण्यास सांगितली होती. सर रॉबर्ट ग्रँट यांनीं ही वावटळ उगाच उठविली होती व त्यांत बिलकूल तथ्य नव्हतें, अशी डायरेक्टरांची दृढ समजूत झाली होती. व म्हणून सर जेम्स कार्न्याक यांना तशी समज दिली होती. परंतु कार्न्याकसाहेबांनीं सुरुवात केली ती भलत्याच धोरणानें, व महाराज आपलें ऐकत नाहींत,

असें दिसून येतांच त्यांस महाराजांबद्दल धुस्सा आला !

इकडे स्वार्थास व भाऊबंदकीस बळी पडलेला आप्पासाहेब, बाळाजी नातू वगैरेंच्या चिथावणीवरून यशवंत माळावर कर्नल ओव्हॅन्सच्या पायांजवळ " मला राजा करा " " मला राजा करा " अशी विनवणी करीत बसला होता; आप्पासाहेबांचें म्हणणें महाराजांना घालवून द्या, मला गादीवर बसवा, मग सारें राज्य तुमचें हवालीं करतों; तुम्ही सांगाल तसें वागतों; महाराज गुन्हेगार आहेत असें म्हणावयास सांगा; म्हणतों. बाळाजी नातूस मुख्य पेशवा करा म्हणून सांगा; तसें करतों. जहागिऱ्यावरील स्वामित्वावर पाणी सोडण्यास सांगा; सोडतों. इंग्रज इंजिनियराला काम पाहिजे म्हणतां; खजिना उपसून इमारतीच्या कामास सुरुवात करतों. तुम्हांस पुण्याहून येण्याजाण्यास लष्करी हालचाल करण्यास पूल पाहिजेत, बरें, नद्यांवरून पूल बांधीन. मला एकदां सिंहासनावर बसूं द्या, अशी मागणी करीत आप्पासाहेब बसलेले. मग काय ! धूर्त कार्न्याक साहेबांनीं आप्पासाहेबांची राक्षसी तपश्चर्या फलद्रूप केली. ता. ४ सप्टेंबर १८३९ रोजीं आप्पासाहेब महाराजांशीं नवा ४ कलमी तह करण्यांत आला. आप्पासाहेबांनीं या तहानें साताऱ्च्या अंमलाखालील जहागिऱ्यांवरील स्वामित्व गमाविलें.

वरील तहनाम्यावर उभय पक्षांच्या सह्या झाल्यावर श्रीमन्महाराज छत्रपति प्रतापसिंह यांना पदच्युत करण्याच्या कामास कर्नल ओव्हॅन्स हे लागले. इतके दिवस ज्या गोष्टीचा कर्नलसाहेबांस ध्यास लागून राहिला होता, ती गोष्ट आतां आपल्याच हातून घडणार असा विचार मनांत येतांच त्यांचें आसुरी मन आनंदानें भरून गेलें. आतां महाराजांना पदच्युत करण्याची कामगिरी कशा सफाईनें पार पाडावी याची जुळवाजुळव करण्याचे विचार त्यांच्या डोक्यांत घोळूं लागले.

ता. ४।९।३९ च्या तहाची हकिकत कळवून तुम्हांस राज्यावरून दूर केलें आहे, असें कर्नलसाहेबांनीं महाराजांना आपल्याकडे बोलावून सांगितलें असतें, तर खास भागलें असतें. तसा बेत कर्नलसाहेबांना सुचला नसेल, असें

आम्हांस तरी वाटत नाहीं. पण कर्नलसाहेब तसे कांहीं सोंवळे नव्हते. मायभूमि सोडून ६००० मैलांचा जलप्रवास करून कंपनीसरकारची नोकरी करण्यास जे लोक येत, ते केवळ साम्राज्यवादी म्हणून येत नव्हते. किंवा हिंदुस्थानच्या कल्याणासाठीं या भूमीवर अवतरले नव्हते. त्यांना हिंदुस्थान ही सुवर्णभूमि आहे, त्या ठिकाणीं जाऊन आपणांस अगणित संपत्ति जमा करतां येईल, असें वाटत होतें. त्यामुळें कंपनीसरकारचे बहुतेक सारे नोकर धन संपादन करण्याचे खटपटींत होते. कंपनी-सरकारची अशी शिस्त होती, कीं लुटींत जें सांपडेल त्याचा $\frac{1}{8}$ ज्याला लूट मिळाली त्याचा; व $\frac{7}{8}$ कंपनीसरकारचा. ही गोष्ट लक्षांत ठेवूनच कर्नल ओव्हॅन्स हे बेत ठरवूं लागले.

महाराजांनीं आपल्या कारकीर्दींत काटकसरीनें वागून सरकारी खजिन्यांत बरीच शिल्लक टाकलेली होती. शिवाय खाजगींतूनही त्यांनीं सुमारें ३० लक्ष रुपये शिलकेंत टाकले होते. जडजवाहीरही मौल्यवान् होतें. घरभेद्या आप्पासाहेबाकडून कर्नलसाहेबांस या गोष्टींची बातमी मिळालेली होती. तेव्हां ४।५ लक्ष रुपयांचा फायदा करून घेतां आला तर कां सोडा ? अशा विचारानें कर्नल ओव्हॅन्सनीं पुढील बेत कायम केला.

पेशवाई बुडवावी असा इंग्रजांचा बेत ठरला, तेव्हां क्षुल्लकशा कारणांवरून झटापटीस सुरवात झाली. त्याप्रमाणें उगीच कांहींतरी कुरापत काढण्यांत येईल, व मग प्रसंग लढाईचा उद्भवेल; व महाराजांनींच तह धाब्यावर बसवून आमच्याविरुद्ध बंड पुकारलें असा खोटाच दोषारोप करण्यांत येईल, अशी महाराजांना शंका आली होती. सबब इंग्रजांना—ओव्हन्स सारख्याला—कोणतेंच कारण निमित्तास मिळूं नये म्हणून, आपल्या पोलिसांचीं हत्यारें त्यांनीं काढून घेतलीं. इंग्रजी लष्करच्या लोकांना वाटेल तेव्हां शहरांत येण्याजाण्यास कोणीही अटकाव करूं नये, असा आपल्या नगररक्षकांस सक्त हुकूम दिला.

इंग्रजांशीं लढाईचा प्रसंग टाळण्यासाठींच हा महाराजांचा प्रयत्न होता. यावरून महाराज भ्याड होते असा जर कोणी तर्क काढूं पाहील, तर ती चूक

होय. सन १८१८ मध्यें अष्टीच्या लढाईच्यावेळीं महाराज कसे वागले हें वाचकांच्या लक्षांत असेलच, तेव्हां महाराजांच्या शूरपणाची शंका घेणें गैर आहे. महाराज शूर होते, पण ते शाहाणे व सात्विक वृत्तीचे होते. त्यांना आपल्या प्रजेची कळकळ फार वाटे. आपण छत्रपति, तेव्हां राज्य ही आपली खासगी मिळकत, असें त्यांना वाटत नसे. उत्कृष्ट पौर्वात्य राजाप्रमाणें **प्रजा ही आपलीं लेकरें आहेत**, असेंच त्यांना वाटे. आपणांस राजा करण्यांत परमेश्वरानें फक्त कर्तृत्वाचा मान आपल्यास दिला आहे, प्रजेच्या हितासाठीं राजानें सर्वतोपरि झटलें पाहिजे, अशी वृत्ती त्यांच्या ठायीं बाणून गेली होती. म्हणूनच ते इंग्रजांशीं लढण्याच्या विरुद्ध होते. आत्मरक्षणासाठीं महाराजांनीं प्रयत्न केले असते, तर नाहक रक्तपात होता, शहरावर आपत्ती गुदरून, बुभुक्षित सैनिकांना लूट करण्यास संधि मिळती या सर्व आपत्ति लक्षांत घेऊनच महाराजांनीं वर सांगितल्या प्रकारचा हुकूम शहरपन्ह्याचे लोकांस सोडला होता.

महाराजांचा सेनापती **बळवंराव राजे भोसले** मोठा स्वाभिमानी व स्वामिभक्त. तो शिपाई गडी अव्वल कडव्या वृत्तीचा. त्याला महाराजांचें हें धोरण मुळींच पसंत नसे. तो म्हणे, काय होणार तें होवो. दोन हात होऊन काय तें होवो. आपण क्षत्रिय बच्चे **"आह्मां क्षत्रियां रण हेंचि धन"**। रणक्षेत्रीं मरण आलें तर स्वर्गाचें राज्य तरी मिळेल. यश आलें, तर आपलें इहलोकाचें राज्य बळकट होईल. पण हा झाला शिपाईगड्याचा वेदांत (**हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं जित्वा वा भोक्ष्यसे महीम्** । श्रीमद्भगवद्गीता) परिस्थितीचा विचार करून वागणाऱ्या मुत्सद्दी प्रतापसिंह महाराजांना हा वेदांत कसा पटणार ? न्यायासाठीं झालें, तरी इंग्रजांशीं लढाई करून भागण्यासारखें नव्हतें. इंग्रजांनीं बहुतेक सारें हिंदुस्थान व्यापलें होतें. त्यांची फौज अफाट होती.. त्यांच्या फौजेंत महाराष्ट्राचे जवानही होते. शिवाय मदतीची मागणी करतां येईल अशी कोणतीच सामर्थ्यवान् सत्ता उरलेली नव्हती. पूर्वीच्या मराठे संघाचें अस्तित्व उरलेलें नव्हतें. मग लढाईला उभें राहणार कशाच्या जोरावर! दिव्या-

वर झडप घालण्यांत पतंगाचा जितका वेडेपणा असतो, तितकाच वेडेपणा इंग्रजांशीं लढाई करण्यास उद्युक्त होण्यांत होता, हें महाराज पूर्णपणें जाणून होते. व म्हणूनच त्यांनीं उपरिनिर्दिष्ट हुकूम दिला होता.

इंग्रजांशीं लढून आपणास न्याय मिळणार नाहीं. पण इंग्रजांच्या न्यायप्रीयतेवर विसंबून राहिल्यास आपणास न्याय मिळेल, असें महाराजांना वाटत होतें. आजपावेतों २० वर्षे महाराजांचा इंग्रजांशीं जो संबंध होता, त्यामुळें त्यांची राज्यपद्धती व न्यायपद्धती महाराजांना कळून चुकलेली होती. व त्यांवर त्यांचा विश्वास बसला होता. राज्यकारभार एकाच्या तंत्रानें चालत असला, म्हणजे विकारवश होऊन तो माणूस अरेरावीनें वागतो व जुलूमही करूं शकतो. पण इंग्रजी राज्यव्यवस्था—कंपनीच्या कारकीर्दीतहि तशा प्रकारची नव्हती. आपल्या शत्रूंच्या नादानें ओव्हॅन्स कदाचित् चूक करील. कदाचित् सर जेम्स रिव्हेट कार्न्याक देखील चकले जातील. पण त्यांच्यावर गव्हर्नर जनरल आहेत, व त्यांचें कौन्सिल आहे ते न्याय देतील. कदाचित् गव्हर्नरसाहेबांच्या होस, गव्हर्नर जनरल हो देतील, पण त्यांचेवर डायरेक्टर्स आहेत. त्यांच्यावर प्रोप्रायटर्सची जनरल बॉडी आहे. अशा प्रकारें न्याय मिळण्यास पूर्ण अवकाश आहे, मग रक्तपाताचें निष्फळ धोरण अवलंबिण्यांत फायदा कसला ! आपल्या बाबतींत सर जेम्स कार्न्याक हे धडधडीत अन्याय करीत आहेत. या अन्यायास डायरेक्टर्सकडून प्रोत्साहन मिळणार नाहीं. उलट अन्याय केल्याबद्दल डायरेक्टर्स त्यांची चांगलीच कानउघाडणी करतील, अशा विचारानें महाराजांनीं बळवंतराव सेनापतींस व इतर स्वामिभक्त व स्वाभिमानी तरुणांस कांहीं हालचाल करूं नका, गप्प रहा, काय होईल तें मला कळवा असें सांगितलें.

ता. ४ सप्टेंबर रोजीं आप्पासाहेबांशीं तहनामा झाला, ती गुणगुण महाराजांना कळल्याशिवाय राहिली नाहीं. त्यादिवशीं सेनापति बळवंतराव यांस त्यांच्या राहत्या वाड्यावरून * महाराजांनीं बोलावून घेऊन त्यांच्या जवळची

---

* सेनापतांचा वाडा रंगमहालाच्या ईशान्येस व पंडितरावांच्या वाड्याच्या पश्चिमेस होता. आतां त्यांचा मागमूसही उरूं दिलेला नाहीं. याच वाड्याच्या

तलवार मागून घेतली, व काठी घेऊन राजवाड्यावर स्वतः पाहारा करण्यास सांगितलें. कोणत्याही वेळीं कोणीही इंग्रज अंमलदार आल्यास त्याच्या सांगण्याप्रमाणें वागा, कोणत्याही कारणानें त्यांच्याशीं वदेळीस येऊं नका. आप्पासाहेब झाले तरी ते आपलेच बंधू. त्यांना गादीवर बसविलें तरी आपल्याच घराण्यांत सिंहासन राहणार वगैरे प्रकारांनीं त्यांची समजूत केली.

पुण्याहून खास पलटणें आगाऊ मागवून घेतलीं होतीं. तह झाल्यावर त्याच रात्रीस क. ओव्हॅन्स यांनीं या पलटणांस वाड्याची नाकेबंदी करण्यास हुकूम दिला. त्यांना कोणीही कसलीच हरकत केली नाहीं. वाड्याची चौफेर नाकेबंदी केल्यावर गांवांतील निरनिराळ्या ठिकाणीं शहर रोखण्यासाठीं पलटणें पाठविलीं. नंतर कर्नल ओव्हॅन्स व कॅप्टन गोडार्ड असे थोडे सैनिक बरोबर घेऊन वाड्यांत शिरले. त्यांना आंत जाण्यास कोणीही मज्जाव केला नाहीं. त्याबद्दल ओव्हॅन्ससाहेबांना थोडें वाईट वाटलें. ते तसेच थेट अंतःपुरापर्यंत गेले. महाराज नित्यक्रमाप्रमाणें स्वस्थ झोंपी गेले होते. कर्नल ओव्हॅन्स यांच्या हुकूमावरून त्यांना जागें करण्यांत आलें. व कर्नल ओव्हॅन्स आले असें त्यांना नोकरानें सांगितलें. महाराजांच्या मनांत लबाडीचा अगर भितीचा विचार येता तर ते निसटून जाण्याचा यत्न करते. पण छे? त्या शूर व उमद्या वीरास तें कांहीं नव्हे! जागें झाल्याबरोबर ते शांत मनानें कर्नलसाहेबांस भेटावयास गेले. कर्नल ओव्हॅन्स यांनीं सर जेम्स कार्न्याक यांचा हुकूम महाराजांस दाखविला व आपणांस राज्यावरून दूर केलें असल्याचें सांगितलें. महाराजांनीं तें स्वस्थपणें ऐकून घेतलें व तुम्ही म्हणाल तसें वागण्यास आपण कबूल असल्याचें सांगितलें. कर्नल ओव्हॅन्स यांनीं आपल्याबरोबर चला असें सांगतांच महाराजांनीं तें कबूल केलें.

यावेळीं महाराजांच्या अंगावर फक्त झोंपतांना घालतात तसे कपडे होते.

उत्तरेस शाहूमहाराजांच्यावेळीं बांधलेला राजवाडा होता आतां या जागेस तक्ताची जागा म्हणतात. येथें सार्वजनिक शौचकूप होते. पुराणवस्तुरक्षक खात्यानें ती जागा म्यु. कडून ताब्यांत घेतली आहे, व मोकळी राखली आहे.

त्याच कपड्यांनिशीं महाराजांना चौकांत नेऊन म्यान्यांत बसविण्यांत आलें. व घाईघाईनें म्याना लिंबाकडे काढला. या घाईत महाराजांच्या एका विश्वासु नोकरानें एक शाल महाराजांच्या अंगावर टाकली अशा पेहेरावानें महाराजांना वाड्यांतून रात्रौ ३ च्या सुमाराला बाहेर काढलें. क. ओव्हॅन्सनें महाराजांना कपडे घालू दिले असते तर काय होतें ? पण मनाचा मोठेपणा कर्नल ओव्हॅन्समध्यें होता कोठें ? महाराजांची जितकी विटंबना करतां येईल, तितकी त्यास करावयाची होती. त्यांतच त्यास आसुरी आनंद.

लिंबास सकाळीं ६ च्या सुमारास महाराजांना आणण्यांत आलें. महाराजांना लिंबास व पुढें पोंहोंचविण्याची कामगिरी ले. क्रिस्टॉल यास सांगण्यांत आली होती. क्रिस्टॉलसाहेब अत्यंत निष्ठुर. शिवाय बेमुर्वतखोरपणें वागण्यास त्यास कर्नलसाहेबांकडून फूसही मिळाली असणार ! मग काय ? " **आधींच मर्कट तशांतहि मद्य प्याला** " अशी ले. क्रिस्टॉलची अवस्था व्हावी यांत नवल कसलें ? महाराज पदच्युत केलेले असले, तरी ते राजे होते. त्यांच्या दर्जाप्रमाणें त्यांना वागवावयास पाहिजे होतें. पण लूट करण्यासाठीं योजलेला डाव महाराजांच्या वर्तनानें फसल्यामुळें क. ओव्हॅन्स यांना महाराजांचा बेसुमार राग आला होता. म्हणूनच कीं काय त्यांनीं महाराजांचा छळ करण्यास सुरवात केली

ता. ५ रोजीं सकाळीं ६ वाजतां महाराजांना लिंबास नेण्यांत आल्यावर, एका गोठ्यांत मुक्कामास ठेविलें होतें. हा गोठा घाणीनें बुजबुजलेला होता. "**त्या जागेंत उंदीर, पिसा, चिलटें वगैरे दुष्ट प्राणी भरलेले होते. अशा त्या खराब जागेंत साताऱ्च्या राजास ठेविलें होतें** " राजद्रोही गुन्हेगाराला आज कोणत्या प्रकारें वागविण्यांत येतें, हें वाचकांना महशूर असेलच पण निरपराधी महाराजांना अत्यंत शोचनीयरीतीनें वागविण्यांत येत होतें.

लिंबास महाराजांना ७–१२–१८३९ पावेतों ठेवण्यांत आलें. महाराजांना कैद करून आणल्यानंतर त्यांच्या आप्तांपैकीं त्यांजवर प्रेम करणाऱ्या लोकांनाही कैद करून त्यांच्याकडे पाठविण्यांत आलें. सेनापति बाळासाहेब

यांना महाराजांबरोबरच कैद करून आणलें होतें. महाराजांच्या कुटुंबियांना ९ तारखेच्या संध्याकाळपावेतों त्या ठिकाणीं आणण्यांत आलें. राजकन्या श्री. सकल सौभाग्यसंपन्न गोजराबाईसाहेब गुजर या गरोदर स्थितींत होत्या. त्यांनाही सातान्याहून हालविलें. गोजराबाईसाहेब म्हणजे महाराजांची एकुलती एक कन्या. अत्यंत लाडकी. लिंबास त्या घाणीनें, पिसा, ढेंकूण वगैरे कृमीनीं बुजबुजलेल्या त्या गोठ्यांत मराठेशाहीचा स्वामी, आपला बाप, बैठक टाकून बसलेला पाहतांच त्या कोमल हृदयी राजबालेचें हृदय भडभडून आलें. तिच्या दुःखाचा आवेग अनावर झाला. हंबरडा फोडून ती धाडकन् धरणीवर पडली व बेशुद्ध झाली.

अनिवार शोकामुळें अकालीं गर्भपात झाला. महाराजांच्या दुःखांत या प्रसंगानें भर घातली. पण निष्ठुर क्रिस्टालला कांहींच वाटलें नाहीं. " गाईला आत्मा नाहीं " या तत्वाप्रमाणें ' हिंदु लोक मनुष्य प्राणी नाहींत ' असेंच कदाचित् त्याला शिकविलें असणार ! नाहींतर त्यानें महाराजांची अशी विटंबना कशी बरें केली असती ?

लिंबास २-२। महिने महाराजांना ठेवण्यांत कंपनीच्या अधिकाऱ्यांचे दोन हेतू असावेत. एक राज्यलोभानें व परिस्थितीस, अपमानास अगर हालअपेष्टांस कंटाळून महाराजांनीं तडजोडीचें बोलणें लावावें. गुन्हा केला, माफ करा व परत राज्यावर बसवा अशी भाषा करावी. तसें झालें कीं, आतांपर्यंत आपण जो अनाचार केला त्याची संपादणी करण्यास बरें पडेल. वरिष्ठांना सांगतां येईल कीं, महाराजांचा गुन्हा शाबीत करतां येणें कठीण होतें हें खरें, पण ते खरोखरच गुन्हेगार होते, व म्हणूनच त्यांनीं आतां कबुलीजबाब दिला. महाराज मनाचे खंबीर नसते, अगर त्यांचें मन गुन्ह्यानें कलंकित झालें असतें तर त्यांनीं क. ओव्हन्सच्या इच्छेप्रमाणें अगर सर जेम्स कार्न्याक यांच्या सूचनेप्रमाणें कबुली दिली असती. पण महाराजांनीं गुन्हा केलाच नव्हता. ब्रिटिश अमलाबद्दल त्यांचे स्वप्नांत देखील बंडखोरीची अगर फितुरीची कल्पना आलेली नव्हती. बाजीराव पेशव्यानें ब्रिटिश सैन्य फितुर करण्याचे प्रयत्न

केले, पण ते कसे फोल ठरले, हें सर्व त्यांनीं अवलोकिलें होतें. तेव्हां अशी खुळी कल्पनाही त्यांनीं आपल्या मनास शिवूं दिली नव्हती. महाराज निरपराधी होते म्हणूनच कबुलीच्या भाषेस लागले नाहींत.

महाराजांना लिंब्रास वरील कारणासाठीं ठेविलें होतें, असें आम्हांस वाटतें. त्याचप्रमाणें आणखीही दुसरा हेतु असावा. इंग्रज हे क्षात्रवृत्तीचे लोक नव्हत. त्यांनीं राज्यें घेतलीं, मुलुख आपल्या अंमलाखालीं सामील केला खरा, पण जो घेतां आला, तोच घेतला. गुरख्यांचा मुलूख इंग्रजांनीं घेतला नाहीं. मराठ्यांचाही मुलूख सर्व एकदम घेतला नाहीं. परिस्थिती पाहून ते पाऊल पुढें टाकतात. महाराजांना पदच्युत केल्यावर महाराजांच्यावतीनें कोण कोण डोकें वर करतात, हें त्यांना पाहावयाचें होतें. स्वामिनिष्ठेनें अगर स्वदेशाभिमानानें महाराजांना पदच्युत केल्याबद्दल जनतेच्या हृदयास काय काय धक्के बसतात, हें त्यांना अजमावयाचें होतें. आणि त्यांच्या सुदैवानें मनाप्रमाणेंच त्यांना अनुभव आला. इंग्रजांनीं अरेरावानें महाराजांना पदच्युत केल्याबद्दल दुःख प्रदर्शित करण्याऐवजीं जुलमानें कां होईना, पण सातारच्या नागरिकांनीं आप्पासाहेबांच्या सिंहासनारोहणाच्या वेळीं गुढ्या उभारल्या, रात्रौ आरास केली! इतरत्र प्रजेची बुद्धि बाळाजी नातूच्या बगलेंतील ब्राह्मणब्रुवांनीं भ्रष्टविली होती. त्यामुळें वरकरणी सर्वत्र शांतताच दिसत होती. महाराजांचे आप्त शिर्के वगैरे सर्व बदललेल्या परिस्थितीला मान वांकवूनच राहिले. याच स्वाभिमानशून्यतेचा अनिष्ट परिणाम त्यावेळीं दिसला नाहीं !

महाराजांबरोबर त्यांचे आप्त स्वकीय वगैरे १०००।१२०० माणसें होतीं. या सर्वांना देशत्याग करावयाचा होता. ता. ७–१२–१८३९ रोजीं त्यांनीं लिंब्राहून काशीवास करण्यासाठीं मुक्काम हालविला. ले. क्रिस्टॉल जितक्या निष्ठुरतेनें वागतां येईल तितक्या निष्ठुरतेनें वागत होताच. रोजच्या मुक्कामाच्या मजला लांबलांबच्या असत. राजमंडळींतील माणसांना त्रास फार होई. पण करणार

काय ? महाराजांचे कारकून ले. क्रिस्टॉलकडे जाऊन तक्रार कळवीत, पण तो पाषाणहृदयी, उलट त्यांनाच गुरकावण्या दाखवी. त्यांचें कांहींच ऐकत नसे.

एकदां अशा प्रकारें मजल चालली असतां एका मुक्कामावर महाराजांचे कारकून ले. क्रिस्टॉलकडे मुक्काम हालवूं नये म्हणून विनंती करण्यास गेले. सेनापती बाळासाहेब यांची पत्नी नऊ महिन्यांची गरोदर होती. तिला प्रसूति-वेदना सुरू झाल्या होत्या. सबब बाळंत होईपावेतों मुक्काम हालवूं नये, अशी कळकळीनें प्रार्थना करण्यास कारकून गेले होते. पण क्रिस्टॉल कसला निर्दय ! त्याला माणुसकी अशी कांहीं नव्हतीच. त्यानें बेमुर्वतखोरपणानें त्यांचें सांगणें ऐकण्याचें नाकारलें, व ताबडतोब मुक्काम हालविण्याची सूचना दिली. तशा त्या स्थितींत खिन्न मनानें सर्वांना मुक्काम हालवून मार्गक्रमण करावें लागलें. " सत्तेपुढें शाहाणपण नाहीं " म्हणतात तें याप्रकारासच ! बुवासाहेब म्हणजे एका संस्थानाचे माजी अधिपति. पण त्यांच्या शब्दाला ब्रिटिश लेफ्ट-नंट दर्ज्याचा अधिकारी क्रिस्टॉल कवडीचीही किंमत देत नव्हता.

पुढें मार्गांत प्रसूतीवेदना असह्य झाल्या. सर्वांना काळजीनें व चिंतेनें वेडे केलें. सेनापतीच्या पत्नीचा काय शेवट होतो ही घोर चिंता सर्वांना वाटत होती. पण ईश्वरी नेमानेम अतर्क्य. ती बाई मार्गांतच रस्त्याच्या कडेस दाट जंगलांत सुखरूप प्रसूत झाली. मुलगा झाला. त्यानंतर लगेच त्या बाळबाळंतिणीला त्या जंगलांतील थंडी वाऱ्यातूनच मेण्यांतून चालविलें होतें. हाच बालक " जंगली राजा " म्हणून साताऱ्च्या जनतेला परिचित आहे.

प्रतापसिंहमहाराज शांत वृत्तीचे व सात्विक बाण्याचे होते. हेही दिवस जातील असा विचार करून ते आपली शांत वृत्ती ढळूं देत नसत. "ठेविलें **अनंतें तैसेंची राहावें** " असा विचार करून वागणाऱ्या साधुकोटींतील ते होते. पण बाळासाहेब सेनापती रजोगुण वृत्तीचा होता. त्याला कैद करव-ल्यास क. ओव्हॅन्सला कांहीं कारण नव्हतें. वरिष्ठांचा हुकुमही नव्हता. पण ओव्हॅसनें त्यांना तर कैद केलेंच पण त्यांच्या गरोदर पत्नीलाही कैद केली. अपमानानें बाळासहेब आंतल्याआंत जळत होता. मोकळा असता अगर

महाराजांनीं त्यास आवरून धरलें नसतें, तर त्यानें पुढील परिणामाकडे लक्ष न देतां ले. क्रिस्टॉलच्या नरडीचा घोट घेतला असता. पण करतो काय! महाराज त्यास परोपरीच्या बुद्धिवादानें गप्प करीत होते. त्यामुळें वरून राखे-मुळें विझल्यासारखा दिसणारा निखारा आंतून पिचत होता!

बाळासाहेबांच्या छळाची अद्याप सीमा झाली नव्हती. क. ओव्हॅन्स यानें आपल्या फौजेंतील कांहीं व महाराजांच्या सैन्यांतील बाळासाहेबावर नाराज असलेले असे कांहीं, शिपाई एकत्र करून त्यांची एक तुकडी बाळासाहेबास लुबाडण्यासाठीं पाठविली. मजल दर मजल चालली असतां मागाहून येऊन या टोळीनें ले. क्रिस्टॉलची गांठ घेऊन मजकूर समजावला. नंतर त्यांनीं बाळासाहेबांस आडविलें व तुमचें साताऱ्यास देणें मोठें आहे' तें आपण बुडवूं पाहतां तरी त्या कर्जदाराचें देणें देण्यासाठीं तुमचेकडील सर्व जंगम मालमत्ता जत करण्यासाठीं क. ओव्हॅन्सच्या हुकुमानें आम्हीं आलों आहों तेव्हां जती करणें आम्हांस भाग आहे. बऱ्या बोलानें तुमच्या जवळची सर्व जंगम मिळकत आमच्या हवालीं केल्यास जप्ती पुरी करून आम्ही आपल्या मार्गानें परत जाऊं. नाहीं पेक्षां दिवाणी तुरुंगांत ठेवण्यासाठीं तुम्हास पकडून परत साताऱ्यास नेऊं.

ही टोळी क. ओव्हॅन्स यानें मुद्दाम सेनापतीस लुबाडण्यासाठीं पाठविली होती. हेतु असा कीं बाळासाहेब अकिंचन व्हावेत. बाळासाहेब सेनापतीसारखा मराठा—क्षत्रिय—बच्चा दिवाणी तुरुंगांत बसण्यापेक्षां सर्व संपत्तीला लाथ मारील. तसें झालें, कीं ते पैसे आपणांस गडप करतां येतील. शिवाय महाराज व सेना-पती यांच्याजवळची संपत्ति हरण झाली कीं ते तेवढेच निर्बल झाले. विला-यतेस त्यांनीं पाठविलेल्या वकीलातीस त्याना मदत करतां येणार नाहीं. व त्यामुळें वकीलातीचें काम तितकें ढिलें पडेल.

बाळासाहेब सेनापती क्षत्रिय बच्चा. तो कांहीं द्रव्यलोभी शेट सावकार नव्हता. ज्या क्षत्रियांच्या खाणींत शिबी राजासारखे आंगचे मांस दान करणारे झाले, ज्या क्षत्रिय वंशांत कर्णासारखे उदारधी झाले, ज्या क्षत्रिय कुलामध्यें श्रीतुकाराम महा-

राजांसारखे कांचनाला मृत्तिकेसमान मानणारे विरक्त भगवद्भक्त झाले, त्याच नररत्नांच्या खाणींत बाळासाहेब सेनापती जन्म पावले होते. त्यांनीं चामडी देईन पण दमडी देणार नाहीं अशा प्रकारचें धोरण धरलें नाहीं. त्यांनीं कोणाचें कर्ज, कसलें कर्ज, फिर्याद कधीं दिली वगैरे कांहीं विचारणा केली नाहीं. कारण बोलून चालून जेथें अन्याय चाललेला तेथें न्यायाची अपेक्षा काय करावयाची ? त्यांनीं आपल्याजवळची सारी धनदौलत त्या लफंग्या टोळीच्या हवाली केली. त्या लफंग्यांनीं त्यांनाच लुबाडून न राहतां त्यांच्या परिवारांतील मंडळीकडे बोट केलें. तेव्हां बायकामुलांच्या आंगावरील दागदागिनेही त्यांच्या हवालीं करण्यांत आले. चांदीचीं ताटें, तांबे, पेले, तस्तं वगैरे हरएक मौल्यवान सामान त्या टोळीच्या हवाली केलें. अशा रीतीनें त्यांना निष्कांचन करून त्यांच्या दुःखावर आणखी डागण्या देण्यांत आल्या.

वीरवृत्तीला अपमान मरणापेक्षां जास्त दुःसह असतो ! बाळासाहेब सेनापतींच्या मानी वीरवृत्तीला लागोपाठ होत असलेला छळ व अपमान कसा सोसणार ? ते मनांत कुढत होते. याचा परिणाम त्यांच्या प्रकृतीवर झाला. महाराजांनीं परोपरीनें त्यांना शांत करण्याचा प्रयत्न चालविला होता. पण महाराजांची स्थिति तरी काय होती ? क्रिस्टॉलसारखा यःकश्चित अंमलदार; पण तोही महाराजांचा अपमान करावयाचा. राज्यास मुकावें लागलेलें, देशास मुकावें लागलेलें, जवळचें वित्तही गमावलेलें अशी स्थिति महाराजांची. त्यामुळें बाळासाहेबाचें मन जास्तच भडकून जाई ! आपल्या डोळ्यादेखत महाराजांची अशी स्थिति त्यांना पाहवत नसे.

होतां होतां बाळासाहेबांची स्थिति एके दिवशीं अत्यवस्थ झाली. आजच्या दिवस मुक्काम हालवूं नका अशी महाराजांतर्फे विनंती करण्यास क्रिस्टालकडे लोक गेले. पण त्या कृत्तरहृदयी क्रिस्टालनें त्यांचें म्हणणें जुमानलें नाहीं. मात्र मुक्काम हालविण्याचा हुकूम त्यानें ताबडतोब सोडला.

बाळासाहेबांना मेण्यांत घालून चालविलें होतें. चिंतेनें सर्वांचीं मनें व्यग्र झालीं होती. परमेश्वरा, तूंच आतां वाली अशा प्रकारें परमेश्वरावर भार

टाकून महाराज व त्यांचे आश्रित चालले होते. मुक्कामास पोंचल्यावर बाळासाहेबांचा मेणा उघडून पाहिला तों बाळासाहेबांचा देह लांब अस्ताव्यस्त पडलेला. प्राणज्योति केव्हांच निघून गेलेली! इहलोकाचा प्रवास संपवून बाळासाहेब परलोकास केव्हांच गेलेले! जणूं या लोकीं आपणांस न्याय मिळणार नाहीं, सबब परमेश्वराकडे न्याय मागण्यास ते गेले!

बाळासाहेबांची तशी ती अवस्था पाहून सर्वत्र हाहाःकार झाला. महाराजांवर तर दुःखाचा पर्वतच कोसळला. पण ले. क्रिस्टॉलला त्याबद्दल कांहींच वाटलें नाहीं. अशा पशुतुल्य वर्तनाबद्दल त्याला बक्षीस मिळावयाचें होतें. म्हणूनच कीं काय या गोष्टीबद्दल तो दरकार बाळगीत नव्हता. पण त्याचें वर्तन निंद्य होतें, ही गोष्ट मुंबईसरकारास पटत नसली, तरी डायरेक्टरांस पटत होती. ता. २–९–१८४० च्या पत्रांत डायरेक्टरांनीं ले. क्रिस्टालच्या या कृत्याचा निषेध केला. ते लिहितात. " साताराचे महाराजांचे स्वारीबरोबर बनारस येथें बाळासाहेब सेनापती जात असतां, त्यांची प्रकृति बिघडून जेव्हां आम्ही त्यांच्या मृत्यूची खबर ऐकली तेव्हां आम्हांस मोठा संताप आला. ले. क्रिस्टॉल साताराचे पदच्युत राजास कैद करून नेण्याचे कामावर होता. त्याचें वर्तुणुकीविशीचा मजकूर आम्हांस कळून भारी कोपायमान गोष्ट वाटली... सेनापतीकडील मजकूर क्रिस्टाल यांस कळला असतां त्यांस असत्य वाटून कुच्य करून त्यांस चालण्याविशी सांगितले त्यांजवरून आमचे नजरेस असें आले आहे कीं, क्रिस्टाल यास त्या लोकांचे सांगणें खोटें वाटलें. ही सबब बिनजबाबदारी आहे. यद्यपि बरोबर डॉक्टर नव्हता तरी मुक्काम करण्याचें कबूल करावयाचें होतें. अथवा त्या आजाऱ्याची भेट जातीनें जाऊन घेऊन त्यांस नजरेनें पाहावयाचा होता. त्यानंतर आपले बुद्धिप्रमाणें करावयाचें होतें. " (प्र. आरोपांचें निराकरण पान.)

डायरेक्टरांनीं जें लिहिलें तें मनुष्यस्वभावाचें लक्षण ज्याचें ठायीं असेल त्याला सांगण्यास तें ठीक! पण ले. क्रिस्टाल मनुष्य का होता? त्याचा स्वभाव मुंबईसरकाराला ठाऊक का नव्हता? त्यांनीं हा मुर्दाड पशुतुल्य माणूस

बुध्याच या कामगिरीवर नेमला असावा; व त्यांच्या मनाप्रमाणें कामगिरी केल्याबद्दल दरसाल रु. ५०० चें प्रमोशन दिलें. मुंबईसरकारचा हेतुच असा असावा कीं, क्रिस्टालनें महाराज व सेनापती यांची करतां येईल तितकी विटंबना व उपहास करावा. त्यांची सोय गैरसोय पाहूं नये. त्यांस त्रास होईल असें वर्तन करावें. छळ करकरून सतावून सोडावें. म्हणजे गांजून जाऊन महाराजांनीं आपली शांतवृत्ती सोडावी. अपमानास व जाचास कंटाळून कैदेंतून पळून जावें. अगर बंडावा करावा. म्हणजे मग डायरेक्टरांस त्यांच्याविरुद्ध कागाळी सांगण्यास सबळ कारण ओव्हेन्स वगैरेंस मिळालें असतें. या हेतूनेंच त्रास देण्याबद्दलची कामगिरी ले. क्रिस्टाल यास सांगितलेली असणार व तशी सांगितली असल्याशिवाय रु. ५०० चें प्रमोशन त्या पशुतुल्य वर्तनाबद्दल ले. क्रिस्टाल यांस दिलें नसतें ! ज्या वर्तनाबद्दल खुद्द इंग्लीश लोकांनीं क्रिस्टॉलचा धिक्कार केला, ज्या वर्तनाचा डायरेक्टरांनीं निषेध केला, त्याच वर्तनाचा मुंबईसरकारनें कां बरें गौरव करावा ? सर जेम्स कार्न्याक यांना क्रिस्टॉलची अरेरावी व चढेलखोरपणा पसंत पडला, ह्याचें कारण क्रिस्टॉल त्यांच्या हुकुमाप्रमाणें वागत होता, हेंच असावें. नाहींतर आपल्या दुर्वर्तनानें निरपराधी सेनापती बाळासाहेबाचा बळी घेणाऱ्या क्रिस्टालच्या वर्तनाला गव्हर्नरांनीं शाबासकी दिली नसती.

बाळासाहेब यास रीतीप्रमाणें मंत्राग्नि देण्यांत आला, व पुनः कूच करून मुक्कामावर मुक्काम होण्यास सुरवात झाली. अखेर एकदाचा प्रवास संपला. ता. २५–३–१८४० रोजीं महाराज काशीस येऊन दाखल झाले. काशीस पोहोंचल्यावर महाराजांना मेजर कार्पेंटर याच्या हवालीं करण्यांत आलें. नेपोलियन बोनापार्ट यास सेंट हेलीना येथें कैदेंत टेवल्यावर तेथील हवेनें शरीरप्रकृतीवर परिणाम होऊन जसें त्यास मरण आलें, त्याचप्रमाणें सातारच्या समशीतोष्ण वातावरणांत जन्मलेल्या व वाढलेल्या प्रतापसिंहांस काशीच्या कडक वातावरणांत ठेवल्यामुळें त्यांची शरीरप्रकृती ढासळूं लागली. पण आपल्या अनपराधत्वाची पक्की खात्री असल्यामुळें व इंग्रजांच्या न्यायीपणावर अढळ निष्ठा असल्यामुळें महाराज शेवटपर्यंत न्यायासाठीं झगडत राहिले. तो मनोरंजक व उद्बोधक वृत्तांत पुढील भागांत वाचावयास सांपडेल.